राष्ट्रीय ज्ञानकोश

९

उक्तिविशेष

संपादक

अमरेन्द्र गाडगीळ

राष्ट्रीय ज्ञानकोश : १

संस्कृत

उक्तिविशेष

[मूळ संस्कृत श्लोक, संदर्भ, अर्थ व व्यवहार-विवरण यांसह]

संपादक :

अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., मुंबई २

श्री : ७५६ (७.७६.२१)

★ ★

★ ★

आवृत्ती पहिली :
शके १८९८, सन १९७६

★ ★

मूल्य रु. ३०–००

★ ★

पृष्ठसंख्या ३२ + ३२८

★ ★

प्रकाशक :

अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
यांचेकरिता
३, राउण्ड बिल्डिंग
मुंबई ४०० ००२

★ ★

मुद्रक :

ले. कर्नल वि. वा. जोशी
सकाळ छापखाना
५९५ बुधवार पेठ
पुणे ४११ ००२

उक्तिविशेष (संस्कृत)

शुभाशंसन (पुरस्कार) :
पद्मभूषण डॉ. रा. ना. दांडेकर
एम्. ए., पीएच्. डी.

प्रस्तावना (मार्गदर्शन) :
डॉ. श्री. भा. वर्णेकर
एम्. ए., डी. लिट्.

भूमिका (प्रयोजन) :
प्रा. श्री. के. क्षीरसागर

आयोजन-संपादन :
अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ

संकलन-लेखन :
कु. निर्मला गणेश कामत
एम्. ए.

कु. सुमन महादेवकर
एम्. ए.

या ग्रंथासाठी सवलतीच्या दरातील कागद महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्यातर्फे उपलब्ध झाला तो वापरला.

हे राष्ट्रीय ज्ञानकोशाचे कार्य हाती घेण्यासाठी
ज्यांच्या कोशकार्यामधून प्रेरणा लाभली त्या
डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर
यांच्या चैतन्यदायी स्मृतीस

ऋणनिर्देश

राष्ट्रीय ज्ञानकोशाचा हा पहिला भाग प्रकाशित केला जात असताना हा तयार करण्यासाठीं कष्ट घेतलेल्या साऱ्यांचीच आठवण मनात ताजी होणे स्वाभाविक आहे. परंतु त्या सर्वांचा नामनिर्देश येथे करणे शक्य नाही. मात्र ज्यांनी खरोखरीच मनापासून हे काम पुरे करण्यासाठी मला साहाय्य केले त्या सर्वांचा मी अवश्य ऋणी आहे. या कामात ज्यांनी मला शेवटपर्यंत साथ दिली त्या दोघींचा नामनिर्देश मात्र येथे करणे मी माझे कर्तव्य समजतो; त्या म्हणजे कु. निर्मला कामत, एम्. ए. आणि कु. सुमन महादेवकर, एम. ए. या दोघींचेही बहुमोल साहाय्य मला लाभले आहे.

संदर्भ मिळविण्याच्या दृष्टीने पुण्याची भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था व विशेषत: तेथील ग्रंथपाल श्री. वा. ल. मंजूळ यांचा फार उपयोग झाला. याशिवाय केसरी मराठा ग्रंथशाला व श्रीमती अंबूताई गद्रे यांचे मातृस्मृति ग्रंथालय यांतही काही ग्रंथ मिळाले. जे संदर्भ-ग्रंथ केवळ अवलोकिले ते आणि ज्यांचा प्रत्यक्ष उपयोग केला ते अशा सर्व ग्रंथकर्त्यांचे व त्या त्या ग्रंथांच्या आवृत्यांच्या संपादकांचे अप्रत्यक्ष साहाय्य या कामी लाभलेले आहेच. तसेच संस्कृत सुभाषितांचा चालता-बोलता ज्ञानकोश असलेल्या श्री. नी. शं. नवरे यांच्यासारख्या सर्वदा सह-कार्यतत्पर सज्जनांच्या ज्ञानाचाही लाभ मला या कामी झाला. शुद्धि-पत्राचे किचकट काम डॉ. वा. के. लेले यांनी तत्परतेने करून दिले. या व अशा सर्व संस्थांचा व व्यक्तींचा मी व्यक्तिश: आणि प्रकाशकांच्याही वतीने ऋणी आहे.

महाराष्ट्र शासनाकडून या ग्रंथासाठी सवलतीच्या दरातील कागद उपलब्ध झाला त्याचाही आम्ही येथे कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतो.

ज्यांनी पुरस्कार लिहून आपले आशीर्वाद या ग्रंथाला दिले ते पुरस्कारदाते डॉ. रा. ना. दांडेकर, आपल्या प्रस्तावनेने ग्रंथाचे हृद्‌गत वाचकांपर्यंत नेऊन पोचविणारे प्रस्तावनाकार डॉ. श्री. भा. वर्णेकर आणि आपल्या भूमिकेच्या स्पष्टीकरणाने नव्या पिढीला राष्ट्रोत्थाना-साठी कोशकार्याचे महत्त्व केवढे मोलाचे असते हे पटवून देणारे भूमिकालेखक प्रा. श्री. के. क्षीरसागर यांचा तर मी विशेषकरून ऋणी आहे.

— संपादक

पुरस्कार : डॉ. रा. ना. दांडेकर	...	सहा-सात
प्रस्तावना : डॉ. श्री. भा. वर्णेकर	...	आठ-तेरा
भूमिका : प्रा. श्री. के. क्षीरसागर	...	चौदा-सोळा
राष्ट्रीय ज्ञानकोश : संपादकांचे निवेदन	...	सतरा-अठरा
उक्तिविशेषांचा संदर्भक्रम इ.	...	एकोणीस-बावीस
उक्तिविशेष : अनुक्रम	...	तेवीस-बत्तीस
उक्तिविशेष–संस्कृत	...	१–२९१
काही संदर्भग्रंथ (यादी)	...	२९२
परिशिष्ट	...	२९३–३०४
श्लोकसूची	...	३०४–३१६
विषयसूची	...	३१७–३२४
शुद्धिपत्र	...	३२५–३२६

शुभाशंसन

पद्मभूषण डॉ. **रामचन्द्र नारायण दांडेकर,** एम्. ए., पीएच्. डी., वैदिक संशोधक; (भूतपूर्व) संस्कृत विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ; मानद सचिव, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था; अध्यक्ष, आंतरराष्ट्रीय प्राच्य विद्या मंडळ.

सुभाषितमयैर्द्रव्यैः संग्रहं न करोति यः ।
सोऽपि प्रस्तावयज्ञेषु कां प्रदास्यति दक्षिणाम् ॥ □

सुभाषित-संग्रह हे संस्कृत साहित्याचे एक अनन्यसाधारण लेणे आहे. या संग्रहात सामान्यपणे निरनिराळ्या लेखकांची–काही ज्ञात पण बहुसंख्य अज्ञात अशा लेखकांची–निरनिराळ्या विषयांसंबंधीची वचने एकत्रित करण्यात आलेली असतात. मुख्यतः मौखिक परंपरेने पारेषित होत आलेली सर्वसाधारण जनसमाजाची प्रज्ञा या वाङ्मयाच्या रूपाने शब्दबद्ध झाली आहे असे म्हणावयास हरकत नाही. अशा प्रकारची सूत्ररूप, सारगर्भ व बह्वंशी छन्दोबद्ध अशी चिरप्रवाही स्वरूपाची वचने उपयोजिण्याच्या प्रथेचा माग ऋग्वेदसंहितेपर्यंत मागे शोधता येईल. ब्राह्मणग्रंथांत आलेल्या गाथा म्हणजे तर सुभाषितांचे प्रत्यक्ष पूर्वजच !

संस्कृत सुभाषित-संग्रह प्राधान्याने दोन दृष्टींनी महत्त्वाचे आहेत. संस्कृत साहित्याच्या इतिहासाच्या दृष्टीने आणि निरनिराळ्या कालखंडांतील भारतीय विचारसरणी व जीवनपद्धती यांवर ते जो प्रकाश पाडतात त्या दृष्टीने. पण आणखी एका दृष्टीने संस्कृत सुभाषिते मला महत्त्वाची वाटतात. एखाद्या वक्त्याला किंवा लेखकाला संस्कृत भाषेशी आणि अभिजात भारतीय संस्कृतीशी परिचय असलेल्या श्रोतृ-वाचक-वर्गाच्या मनावर एखादा मुद्दा परिणामकारक रीतीने ठसवावयाचा असल्यास त्यासाठी संस्कृत सुभाषितांइतके दुसरे प्रभावी साधन नाही. विनोदाने असे म्हणता येईल की, संस्कृत सुभाषिते ही होमिओपाथीच्या गोळ्यांसारखी आहेत– लहान, गोड, घेण्यास सुलभ आणि अचूक लक्ष्यवेधी ! एखाद्या संपूर्ण अग्रलेखाने जो परिणाम कदाचित साधला गेला नसता तो त्या अग्रलेखाच्या 'मय्यप्यास्था न ते चेत् त्वयि मम सुतरामेष राजन् गतोऽस्मि'* यासारख्या सुभाषितवजा शीर्षकाने सहज साधला जातो. बहुतेक सर्व नामवंत मराठी वक्त्यांनी व लेखकांनी विचारसंसूचनाच्या या प्रभावी उपकरणाचा प्रभूततया उपयोग केलेला आहे. आणि अजूनपर्यंत तरी तो तसा केला जात आहे.

□ पंचतंत्र : २.१७१. (चौखम्बा प्रथमावृत्ती १९५९) (संपादकांची टीप)

* भर्तृहरीच्या शतकत्रयामधील वैराग्यशतकातील एका श्लोकाचा हा चतुर्थ चरण आहे. पण निर्णयसागरच्या शके १८१० आणि १८४४ च्या आवृत्त्या,

'संस्कृत भाषेशी आणि अभिजात भारतीय संस्कृतीशी परिचय असलेल्या' हे शब्द मी वर बुद्धयाच वापरले आहेत. कारण असा परिचय असल्याशिवाय सुभाषितांचे संदर्भ आणि अर्थ – वाच्य व व्यंग्य असे दोन्ही प्रकारचे अर्थ – पर्याप्तपणे प्रतीत होणे कठीण आहे; आणि तसे ते प्रतीत झाले नाहीत तर त्या सुभाषितांची गत 'ग्रीष्मे कुसरितो यथा' अशी होते. असे घडण्यासारखी परिस्थिती आताच निर्माण झाली आहे व उत्तरोत्तर ती अधिकच चिंताजनक होईल अशी साधार भीती वाटू लागली आहे.

आणि बरोबर याच कारणासाठी श्री. अमरेन्द्र गाडगीळ यांनी संपादिलेल्या 'उक्तिविशेष-संस्कृत' या ग्रंथाचे मला मनःपूर्वक स्वागत करावेसे वाटते. श्री. गाडगीळ यांच्या ग्रंथाचे स्वरूप, अर्थातच पूर्णतया संस्कृत सुभाषित-संग्रहासारखे नाही. मराठी व्याख्यानात, लेखनात व व्यवहारात जी संस्कृत वचने सहजपणे आणि वारंवार वापरली जातात त्यांचा संदर्भ, ती ज्यांत आली आहेत ते संपूर्ण श्लोक किंवा वाक्ये, त्यांचा मर्मग्राही अर्थ, व्यवहारातील त्यांची समर्पकता, इत्यादी माहिती त्यांनी व्यवस्थितपणे दिलेली आहे. या ग्रंथातील काही उक्ती एकूण ग्रंथाच्या स्वरूपाशी फारशा सुसंबद्ध नाहीत किंवा काही अन्य विपुलप्रचार उक्तींचा समावेश या ग्रंथात करावयास पाहिजे होता तो केलेला नाही, असे काही बहुश्रुत वाचकांना वाटणे शक्य आहे. पण त्यामुळे या ग्रंथाचे मूल्य मुळीच कमी होत नाही. मराठी श्रोतृ-वाचक-वर्गात 'भारतीयत्वा'ची जाणीव निर्माण करण्याचे व ती जागृत ठेवण्याचे कार्य हा ग्रंथ चांगल्या रीतीने करील.

प्रस्तुत ग्रंथ हा 'भारतीय राष्ट्रीय ज्ञानकोश' या एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा पहिला भाग आहे. हा सर्वच संकल्पित प्रकल्प अत्यंत प्रशंसनीय, कालोचित आणि म्हणून प्रोत्साहनार्ह आहे. तो यशस्वी रीतीने सिद्धीस नेण्यासाठी, प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनाने 'क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते' असा अनुभव संपादकांना प्राप्त होईल अशी आशा आहे.

भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर,
पुणे ४११ ००४.
५ जून, १९७६.

रामचन्द्र नारायण दांडेकर

तसेच आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावलीची शके १८६७ आवृत्ती या तीनही आवृत्त्यांत प्रस्तुत श्लोकाचा क्रम व पाठही वेगवेगळा दिलेला आहे तो अनुक्रमे असा :
'मय्यप्यास्था न ते चेत् सा त्वयि मम सुतरामेष राजन् गतोऽस्मि' ।। २९ ।।
'मय्यप्यास्था न ते चेत्त्वयि मम नितरामेव राजन्ननास्था' ।। ५२ ।।
'मय्यप्यास्था न ते चेत्त्वयि मम सुतरामेष राजन् गतोऽस्मि' ।। ३० ।।
(संपादकांची टीप)

प्रस्तावना

डॉ. श्री. भा. वर्णेकर, एम. ए., डी. लिट्.
संस्कृत विभाग प्रमुख, नागपूर विद्यापीठ;
सदस्य, साहित्य अकादमी (जनरल कौन्सिल).

मानवी बुद्धी ही तेजोगर्भ रत्नासारखी आहे; पण तिचे सर्वांगीण तेज प्रकट होण्यासाठी अनेक प्रकारच्या संस्कारांनी तिला विविध पैलू पाडावे लागतात. बुद्धीला पैलू पाडल्यावाचून तिचे अन्तर्हित तेज लखलखत नाही. 'अष्टपैलू विद्वान' हा वाक्प्रचार सर्वत्र रूढ आहे. (हे अष्टपैलू श्री. हणमंते यांच्या संकेतकोशात नमूद केलेले नाही.) * तदनुसार विद्वत्तेचे आठ वेगवेगळे पैलू असतील तर त्यांमध्ये 'बहुश्रुतता' हा एक स्पृहणीय पैलू आहे. अध्यापक, प्रवचनकार, सार्वजनिक व्याख्याता किंवा लोकसभेचा सदस्य यासारख्या व्यावसायिक वक्त्यांच्या ठिकाणी प्रत्युत्पन्नमतित्वाप्रमाणे बहुश्रुतत्व हा बुद्धि-गुण असणे, अत्यंत आवश्यक असते. लोकसभेचे सदस्यत्व लाभलेल्या माझ्या एका सुप्रसिद्ध मित्राने, "मजसारख्या संस्कृतानभिज्ञ माणसाला उपयोगी पडेल असा एखादा संस्कृत सुभाषितांचा (भाषांतरासहित) कोश तुम्ही मला देऊ शकता काय?" अशी मागणी अनेकदा केली पण "मागणी तसा पुरवठा" मला करता आला

---

*अष्टबुद्धयः – वा. रा. ६.११३.२४. (निर्णयसागर आवृत्ती शके १८१०) "अतिलक्षणसंपन्नं माधुर्यगुणभूषणम्। बुद्धया ह्यष्टाङ्गया युक्तं त्वमेवार्हसि भाषितुम्॥" अशा शब्दांत हनुमानाचा गौरव सीतेने केला आहे. हा प्रसंग रावणवधानंतर हनुमान श्रीरामविजयाची वार्ता सीतेला सांगण्यासाठी अशोकवनात (दुसऱ्या वेळी) आला त्या वेळचा आहे. हनुमानाला पाहून सीतेचे हृदय भरून आले, तिला काही बोलवेना. त्यामुळे व्याकुळ होऊन हनुमानाने तिच्या मौनाचे कारण तिला विचारले. त्या वेळी सीतेने त्याच्याविषयी जी कृतज्ञतेची भावना अतिगौरवपूर्ण शब्दांत व्यक्त केली, तो हा प्रसंग मोठा हृद्य आहे. या श्लोकावर तिलकटीकेत पुढीलप्रमाणे विवरण केले आहे: "शुश्रूषा श्रवणं चैव ग्रहणं धारणं तथा। ऊहापोहोऽर्थविज्ञानं तत्त्वज्ञानं च धीगुणाः॥ इत्युक्ताष्टाङ्गबुद्धया युक्तम्॥" शुश्रूषा, श्रवण, ग्रहण, धारणा, चिन्तन, ऊहापोह, अर्थविज्ञान आणि तत्त्वज्ञान ही येथे बुद्धीची आठ अंगे सांगितली आहेत. तथापि आम्ही पाहिलेल्या कोणत्याही कोशात 'अष्टावधानी'पणातील आठ 'अवधानां'चा मात्र तपशील आढळत नाही; तसेच विद्वत्तेचे आठ पैलू कोणते हाही प्रश्न अनुत्तरित आहे. बुद्धीचे आठ गुण आणि विद्वत्तेचे आठ पैलू हे वेगवेगळे असले पाहिजेत.

(संपादकांची टीप)

नाही; कारण त्या खासदाराची विशिष्ट अपेक्षा पुरवील असा उत्तम सुभाषितकोश (व तोही भाषांतरासहित) मला कोठे आढळला नाही.

"सुभाषितसंग्रह" किंवा "सूक्तिकोष" हा वाङमयप्रकार फार जुना आहे. जागतिक वाङमयात प्राचीनतम असलेले आमचे वेद, हे मंत्रदृष्टचा ऋषींच्या स्वानुभूतिपूर्ण सूक्तांचे (सूक्त म्हणजेच सुभाषित) कोशच आहेत. वेदग्रंथ हे "सुभाषितसंग्रहच" आहेत असे काही आधुनिक वैदिक पंडितांचे मत आहे, व ते अंशतः खरेही आहे. महाभारत, रामायण हे राष्ट्रीय ग्रंथ हृद्य सुभाषितांचे रत्नाकर आहेत. महाभारतातील सुभाषिते महाभारतकारांनी इतर ग्रंथांतून घेतली की इतर ग्रंथकारांनी ती महाभारतातून घेतली याबद्दल संशोधकांमध्ये मतभेद आहेत. (मतभेद असणे हेच आज संशोधकाचे ठळक लक्षण आहे. इतरांशी मतैक्य असले तर त्या विद्वानाला कोणी संशोधक मानीत नाहीत.) 'धम्मपद' हा पाली धर्मग्रंथ भगवान बुद्धाच्या केवळ सुभाषितांचा हृदयंगम संग्रहच आहे. हालाची 'गाथासप्तशती' हा महाराष्ट्री भाषेतील काव्यग्रंथ, लक्ष सुभाषितांच्या मंथनातून निर्माण झाला आहे. भर्तृहरीच्या (८ वे शतक) 'शतकत्रयी'-मध्ये पूर्वीच्या ग्रंथांतील सुभाषिते संकलित झालेली आहेत. तात्पर्य, सुभाषितांचा कोश करण्याची परंपरा वेदाइतकी प्राचीन असून, सार्वलौकिक आहे. संस्कृत वाङमयाच्या इतिहासात ही परंपरा अव्याहत चालू असल्याचे आढळून येते. १०व्या शतकात 'कवीन्द्रवचनसमुच्चयः,' नन्दनकृत 'प्रसन्नसाहित्यरत्नाकरः', अमितगतिकृत 'सुभाषितरत्नसन्दोहः' हे उत्तम सुभाषितकोश निर्माण झाले. तेराव्या शतकात श्रीधरदासाचे 'सदुक्तिकर्णामृतम्', जल्हणाची 'सूक्तिमुक्तावली', वल्लभदेवाची 'सुभाषितावली' यासारखे संस्कारित सुभाषितकोश निर्माण झाले. त्यांमध्ये नवीन किंवा दुर्लक्षित सुभाषितांची भर पडली. त्यानंतरही हे कोशसंवर्धनाचे कार्य चालू राहिले. १६व्या शतकात जगन्नाथ पंडितराजाने 'भामिनीविलास' या नावाने स्वतःच्याच सुभाषितांचा संग्रह संकलित केला आहे.

"दुर्वृत्ता जारजन्मानः हरिष्यन्तीति शंकया । मदीय पद्यरत्नानां मंजूषैषा विनिर्मिता ।।" (—'दुराचारी जारपुत्र माझ्या सुभाषितांचे अपहरण करतील, म्हणून मी माझ्या पद्यरत्नांची ही मंजूषा निर्माण केली आहे.') या सुभाषितवजा श्लोकात संकलनाचे प्रयोजन पंडितराजांनी आपल्या सडेतोड शैलीत सांगून टाकले आहे.

१७ व्या शतकापासून संस्कृत वाङमयाचा अर्वाचीन कालखंड सुरू होतो. या काळात संस्कृत मंदाकिनीचा प्रवाह कुंठित झाला अशी चुकीची समजूत पाश्चात्य समालोचकांनी करून दिली व "प्रामाण्यबुद्धिराङ्ग्लेषु" या नवीन सुभाषितानुसार परप्रत्ययनेय वृत्तीच्या काही भारतीयांनीही ती शिरोधार्य मानली. पण ती समजूत आता अर्वाचीन संस्कृत साहित्यविषयक अनेक प्रबंधांनी खंडित झालेली आहे.

संस्कृत वाङमयाच्या अर्वाचीन कालखंडात जे अनेक सुभाषितकोश निर्माण झाले त्यांची प्रदीर्घ सूची व आवश्यक ती माहिती आम्ही आपल्या 'अर्वाचीन संस्कृत

साहित्य ' या बृहत्प्रबंधात (पृ. १४६ ते १६७) दिलेली आहे. या सुभाषितकोशकारांमध्ये भारतातल्या सर्व भागांतले विद्वान आहेत. हुतात्मा छत्रपती संभाजी महाराजांच्या नावे प्रसिद्ध असलेला ' बुधभूषणम् ' हा ग्रंथ म्हणजे एक छोटासा सुभाषितसंग्रहच आहे.

आज सर्वत्र प्रचारात असलेला सुप्रसिद्ध सुभाषितसंग्रह म्हणजे काशीनाथ पांडुरंग परब यांनी संपादित केलेला व वासुदेव लक्ष्मण पणशीकर यांनी सुधारलेला ' सुभाषितरत्नभाण्डागारम् ' हा ग्रंथ होय. या ग्रंथाच्या आजवर ८ आवृत्ती प्रकाशित झाल्या आहेत. सुभाषितकोशाप्रमाणे फार प्राचीन काळापासून शब्दकोशनिर्मितीचेही कार्य संस्कृतच्या वाङमयक्षेत्रात चालू आहे. 'अमरकोश' हा प्राचीन शब्दकोशांपैकी सर्वांत अधिक मान्य शब्दकोश. इ. स. च्या ६ व्या शतकापूर्वी या कोशाचा चिनी भाषेत अनुवाद झाला होता. आजपर्यंत या कोशावर पन्नासपेक्षा अधिक टीका लिहिण्यात आल्या आहेत; त्यांमध्ये इ. स. ११ व्या शतकात लिहिण्यात आलेली क्षीरस्वामीची व १७ व्या शतकातल्या भानूजी भट्टाची ' रामाश्रमी ' या दोन टीका विशेष विद्वन्मान्य आहेत. अमरकोशाबाबत या प्रचलित शतकात झालेले अत्यंत श्लाघनीय कार्य म्हणजे भारताचे माजी अर्थमंत्री पद्मविभूषण डॉ. चिंतामणराव देशमुख यांनी लिहिलेले अमरकोशाच्या वनौषधीवर्गावरील संस्कृत भाष्य ! डॉ. देशमुख हे अद्वितीय अर्थशास्त्रज्ञ किंवा उत्कृष्ट प्रशासक म्हणून प्रसिद्ध असले, तरी मुळात ते वनस्पतिशास्त्रज्ञ आहेत. त्या विषयात त्यांनी मुंबई विद्यापीठाची सर्वोच्च पदवी प्रथम प्राप्त केली व नंतर ते अवांतर शास्त्रांकडे वळले. तथापि त्यांनी आपला संस्कृत साहित्याचा व वनस्पतिशास्त्राचा आवडता व्यासंग अव्याहत चालू ठेविला व त्याचे उत्कृष्ट फळ त्यांनी प्रस्तुत वनौषधीवर्ग-भाष्याच्या रूपाने विद्वत्समाजाला सादर केले. आज हा ग्रंथ पुण्यात मुद्रणालयात आहे. पं. वसंतराव गाडगीळ तो लवकरच प्रकाशित करतील, अशी आशा आहे.

अमरकोशानंतर ७ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत ' त्रिकाण्डकोश,' ' धनंजयनिघण्टु,' ' वैजयन्ती,' ' शब्दकल्पद्रुम,' ' नानार्थरत्नमाला,' ' शब्दरत्नाकर ' इत्यादी संस्कृत शब्दकोश निर्माण झाले. जगातल्या सर्व भाषांमध्ये संस्कृतइतकी व्युत्पत्तिसिद्ध किंवा निरुक्तिगर्भ भाषा दुसरी नाही. संस्कृत भाषाशास्त्रज्ञाला अमुक शब्दाचे अमुक अर्थ का, याचे जसे सकारण उत्तर देता येते, तसे इतर भाषेच्या शास्त्रज्ञाला देणे शक्य होत नाही. संस्कृत भाषेच्या या असाधारण वैशिष्टयातच तिची " संस्कृतता " सामावलेली आहे. यामुळे अमरादिकांच्या कोशांतील संस्कृत शब्दांची केवळ व्युत्पत्ती किंवा निरुक्ती नीट जाणली तर अभ्यासकाला विलक्षण बहुज्ञता प्राप्त होऊ शकते. भारतीय संस्कृतीचे मौलिक ज्ञान प्राप्त करण्यासाठी हा उद्योग फार आवश्यक आहे. त्या दृष्टीने संस्कृत भाषेचे शब्दकोश हे जणू सूत्रात्मक भारतीय संस्कृतिकोश आहेत असे म्हणणे अवास्तव होणार नाही. (काही उदाहरणे देऊन

आमच्या या मताचे विवरण करण्याचा मोह या ठिकाणी होत आहे; पण या संक्षिप्त प्रस्तावनालेखात तो टाळणे आवश्यक आहे.)

प्रस्तुत सुभाषितात्मक राष्ट्रीय ज्ञानकोशाच्या निमित्ताने सुभाषितकोशांचे पर्यालोचन करण्याच्या ओघात किंचित विषयान्तर करून संस्कृत शब्दकोशांचा परामर्श घेणे आवश्यक वाटले; त्याप्रमाणे संस्कृत वाङमयाशी संबंधित काही अवान्तर कोशांचा निर्देश करणेही आवश्यक वाटते. हे संस्कृत कोश म्हणजे त्या त्या विशिष्ट शास्त्रांचे ज्ञानकोशच आहेत :

	कोश	कर्ता
(१)	न्यायकोश:	: भीमाचार्य झळकीकर
(२)	मीमांसाकोश: (४ भाग)	: केवलानंद सरस्वती
(३)	निघण्टुमणिमाला (वैदिककोश:)	: मधुसूदन विद्यावाचस्पती
(४)	गोज्ञानकोश: (गोविषयक वेदमंत्रांचा कोश)	: पं. श्री. दा. सातवळेकर
(५)	वैदिककोश: (ब्राह्मणवाक्यांचा कोश)	: हंसराज
(६)	ऐतरेय-ब्राह्मण-आरण्यककोश:	: केवलानंद सरस्वती
(७)	धर्मकोश: (व्यवहारकांड) (३ भाग)	: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
(८)	धर्मकोश: (उपनिषत्कांड)	: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
(९)	स्मृतितत्त्वम् (२८ स्मृतींतील वचनसंग्रह)	: रघुनंदन भट्टाचार्य
(१०)	स्मृतीनां समुच्चय: (२७ स्मृतींचा संग्रह)	:
(११)	पुराणविषयानुक्रमणिका	: यशपाल टंडन
(१२)	पुराणशब्दानुक्रमणिका (३ भाग)	: डी. आर. दीक्षितर
(१३)	गणितीयकोश:	: डॉ. व्रजमोहन
(१४)	भरतकोश: (नाट्यसंगीत परिभाषाकोश)	: तिरुपति देवस्थान (प्रकाशक)
(१५)	भारतीय राजनीतिकोश: (कालिदास खंड)	: वेंकटेशशास्त्री जोशी
(१६)	कहावत-रत्नाकर (संस्कृत-हिंदी म्हणींचा कोश)	:

असल्या विविध विषयांवरील कोशांप्रमाणे मुद्रित व हस्तलिखित ग्रंथांच्या सूचींचाही कोशग्रंथाप्रमाणेच संदर्भासाठी अभ्यासूंना उपयोग होतो. गेल्या शे-सव्वाशे वर्षांत असल्या ग्रंथसूचीवजा कोशांची निर्मिती भरपूर प्रमाणात झालेली असून, त्यांचा एकूण वृत्तान्त मोठा स्फूर्तिदायक आहे. मराठी अभ्यासकांना डॉ. श्री.व्यं. केतकर यांचा ज्ञानकोश (२१ खंड) व पं. महादेवशास्त्री जोशी यांचा रोचक शैलीत लिहिलेला भारतीय संस्कृतिकोश (८ खंड) यांचा किती मोठा उपयोग होतो, ते सांगण्याची आवश्यकता नाही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली आकारास येत असलेल्या बृहत्काय विश्वकोशाची सारा अभ्यासकवर्ग आतुरतेने वाट पाहात आहे. या प्रकारचे विविध ज्ञानकोश गेल्या शतकापर्यंत अभ्यासकांना उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्या काळात वाङ्मयीन संशोधनकार्य करणे मोठे दुर्घट होते. वाङ्मयीन संशोधनकार्यासाठी किंवा ऐनवेळी हव्या त्या विषयावर निबंध-लेखन करण्याची आवश्यकता असणाऱ्या वृत्तपत्रीय लेखकांसाठी किंवा विविध विषयांवर व्याख्याने देणाऱ्या अभ्यासू वक्त्यांसाठी, या कोशवाङ्मयाचा कल्पवृक्षाप्रमाणे उपयोग होत असतो. इतस्तत: विखुरलेले माहितीवजा ज्ञान संकलित करणे, हे वाङ्मयीन क्षेत्रातले एक प्रकारे " पूर्तकर्म " आहे. ज्याला ज्याला ते ज्या ज्या प्रकारे करण्याची शक्यता असेल त्याने ते अवश्य करावयास हवे.

आमचे मित्र श्री. अमरेंद्र गाडगीळ यांनी या क्षेत्रात गणेशकोश, रामकोश यांसारखे माहितीपूर्ण कोश यापूर्वी मोठ्या साक्षेपीपणाने निर्माण करून जे यश संपादन केले, त्यामध्ये भर टाकणारा हा त्यांचा प्रस्तुत " राष्ट्रीय ज्ञानकोश " (भाग–१) आहे. आजवर झालेल्या संस्कृत सुभाषितसंग्रहांच्या जातीचा हा सुभाषितसंग्रह आहे हे खरे असले, तरी आजवर प्रकाशित झालेल्या सुभाषितसंग्रहांत जे आढळत नाही, ते श्री. गाडगिळांच्या या राष्ट्रीय ज्ञानकोशात आहे. उदाहरणार्थ, सुभाषितरत्नभांडागारात सुभाषितांचा फार मोठा संग्रह (सूचीसहित) असला, तरी त्यात फारच थोड्या सुभाषितांचे संदर्भ (केवळ कवीचे नाव) दिलेले आहेत. त्यामुळे ऐनवेळी एखादे पाठांतरातले सुभाषित संपूर्णपणे न आठवले, तर ते पूर्णतया जाणून घेण्यासाठी किंवा क्वचित त्यातला पाठभेद जाणण्यासाठी त्या कोशाचा उपयोग होतो. त्यातही आजच्या परिस्थितीत अनेक विकासयोजनाबरोबर संस्कृत भाषेच्या अज्ञानाची विकासयोजना पद्धतशीरपणे, सरकार व जनता यांच्या सहकार्याने, मोठ्या वेगाने कार्यान्वित होत असल्याने, भाषांतराच्या व किंचित स्पष्टीकरणाच्या अभावी आजच्या सामान्य आणि असामान्य सुशिक्षितांच्या दृष्टीने आजवर झालेले संस्कृत सुभाषितांचे ते अनेक कोश मुळीच उपयोगाचे राहिलेले नाहीत. श्री. अमरेन्द्र गाडगीळ यांनी आजच्या संस्कृतानभिज्ञ अभ्यासकाची नेमकी अडचण ओळखून प्रस्तुत "राष्ट्रीय ज्ञानकोश " तयार केला आहे. संस्कृतच्या अध्ययनाला संपूर्ण महाराष्ट्रात कितीही ओहोटी लागलेली असली तरी " शुभस्य शीघ्रम् ", " मन:पूतं समाचरेत् ", " भिन्न-

रुचिर्हि लोक:", "नि:स्पृहस्य तृणं जगत्," "जामाता दशमो ग्रह:", "ऋणं कृत्वा घृतं पिबेत्" यांसारखे शेकडो सुभाषितखंड सुसंस्कृत समाजाच्या जिव्हाग्री नाचत आहेत. याव्यतिरिक्त एखादा संस्कृत साहित्याचा विशेषज्ञ बोलण्याच्या ओघात सहज उत्तमोत्तम सुभाषिते उद्धृत करून आपले विचार मांडू लागला, म्हणजे इतरांना त्याच्या या वाग्वैभवाचा जणू हेवा वाटू लागतो. आपल्यालाही संस्कृतातल्या उत्तम सुभाषितांचा असा मनसोक्त वापर करता यावा व तद्द्वारा आपल्या बहुश्रुततेची श्रोत्यांवर छाप पाडता यावी असे अनेकांना वाटणे स्वाभाविक आहे. दहा वाक्ये उच्चारून जो आशय अभिव्यक्त होऊ शकत नाही, तो संस्कृतातल्या एका श्लोकार्धाने ठसठशीतपणे व्यक्त होतो व संस्कृत भाषेविषयी एक विशिष्ट श्रद्धाबुद्धी प्रत्येक भारतीयाच्या अन्त:करणात तेवत असल्याने त्याचा आशय श्रोत्यांच्या अन्त:करणात ठसून जातो. हिंदी-मराठी-सारख्या इतर प्रादेशिक भाषांतही त्याच संस्कृत सुभाषितांच्या अर्थाच्या म्हणी आहेत, पण त्यांच्या ठिकाणी संस्कृत वचनाची प्रौढता किंवा गंभीरता तर नाहीच, उलट काहीशी ग्राम्यतेची झाक त्यात असते. त्यामुळे अनेक प्रादेशिक म्हणी आशयदृष्टचा उत्तम असल्या तरी त्यांतील ग्राम्यतेमुळे सभ्य माणसाला त्या तोंडाशी आल्या तरी सभ्य मंडळीत त्यांचा वापर करावासा वाटत नाही. (आमच्या या विधानासाठी काही उदाहरणे देणे आवश्यक व शक्य असूनही स्थलाभावी ती येथे देत नाही.)

श्री. अमरेंद्र गाडगीळ यांनी प्रत्येक सुभाषिताचा संदर्भ या कोशात दिला असल्याने वाचकाला त्या सुभाषिताचे स्वारस्य अधिक लक्षात येते. वक्तृ-बोद्धव्य संबंधाचे ज्ञान झाले म्हणजे वाक्याचा व्यङ्ग्यार्थ अधिक उत्कटत्वाने प्रतीत होतो, हा साहित्यशास्त्राचा सिद्धांत अनुभवसिद्ध आहे. प्रस्तुत राष्ट्रीय ज्ञानकोशात प्रत्येक सुभाषिताचा संदर्भ दिलेला असल्याने या कोशाची उपयुक्तता शतपटीने वाढलेली आहे व तीच या कोशाची 'अपूर्वता' आहे.

श्री. अमरेंद्र गाडगीळ यांच्या संकल्पित राष्ट्रीय ज्ञानकोशाचे सर्व खंड याच पद्धतीने लवकर प्रकाशात येतील याची खात्री आहे, कारण हाती घेतलेले काम तडीस नेण्यासाठी लागणारा दुर्लभ साक्षेपीपणा आणि एकांतिकपणा त्यांच्या स्वभावातच आहे.

ज्येष्ठ शुद्ध १३ — श्री. भा. वर्णेकर

शिवराज्याभिषेकदिन, १९७६.

भूमिका

प्रा. श्रीकृष्ण के. क्षीरसागर
मराठीतील ख्यातनाम टीकाकार;
(भूतपूर्व) मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष ;
(भूतपूर्व) सदस्य, साहित्य अकादमी सल्लागार समिती.

श्री. अमरेंद्र गाडगीळ यांनी विशिष्ट विचारप्रणाली आणि राष्ट्रीय ध्येय डोळ्यापुढे ठेवून जे विपुल वाङमय निर्माण केले आहे, ते आता महाराष्ट्राच्या परिचयाचे आहे. आता अनेक खंडांत प्रसिद्ध होणाऱ्या राष्ट्रीय ज्ञानकोशाचे कार्य ते हाती घेत आहेत. त्यांतील हा सुमारे साडेपाचशे सुभाषितांचा संदर्भासह संग्रह करणारा पहिला खंड आहे.

काही तथाकथित वस्तुनिष्ठ ज्ञानाच्या भोक्त्यांना " राष्ट्रीय ज्ञानकोश " या ग्रंथनामात 'वदतोव्याघात' आहे असा भास होईल. ज्ञानकोशात 'राष्ट्रीय', 'परराष्ट्रीय' आणि 'आंतरराष्ट्रीय' हे भेद करणे अशास्त्रीय नव्हे काय? भारताला जे 'ज्ञान' ते इंग्लंड-अमेरिकेलाही 'ज्ञानच' वाटायला हवे; भारताला जो जागतिक इतिहास वाटतो, तोच पाकिस्तानला आणि अरबस्तानला जागतिक इतिहास म्हणून मान्य व्हायला हवा. ही झाली तात्त्विक दृष्टी; पण व्यावहारिक स्थिती यापेक्षा वेगळी आहे. प्रत्येक राष्ट्राला राष्ट्रवर्धनाच्या दृष्टीने जागतिक ज्ञान निवडून घ्यावे लागते. इतकेच नव्हे, तर ते राष्ट्रवर्धनाच्या दृष्टीने सजवावेही लागते. स्वामी विवेकानंदांना एका दाक्षिणात्य पंडिताने त्यांच्या निस्सीम भारताभिमानासंबंधी अशीच शंका विचारली होती : "आपण संन्यासी आणि अद्वैतवेदान्ती; मग आपणांला सर्व देश सारखेच वाटले पाहिजेत. आपल्यासारख्यांनी स्वत:च्या देशाबद्दल विशेष प्रेम का बाळगावे ? आपण तर सर्व देश सारखेच मानले पाहिजेत."

स्वामीजींनी आपल्या लढाऊ पद्धतीने त्या पंडिताची शंका धुडकावून लावली. ते त्या पंडिताला म्हणाले, "ज्याला स्वत:ची आई पोसता येत नाही, त्याने गावातील लोकांच्या आया पोसण्याचा सोस का करावा ? "

आज भारतातील ज्ञानकोशकारांनी तर राष्ट्रीय दृष्टी ठेवण्याची विशेष गरज आहे. त्यात आपल्या राष्ट्रातील वाचकांना निकोप ज्ञान मिळेल एवढेच नव्हे, तर इतर देशांतील ज्ञानकोशांत हिंदुस्थानासंबंधी जो कलुषित मजकूर आढळतो, त्याचीही आपोआप दुरुस्ती होईल. कारण त्यातील बराच भाग दुष्टपणाने नव्हे तर अडाणी-पणामुळे दूषित झालेला असतो. 'आपले मराठी ज्ञानकोश इतर देशांतील लोक

कसचे वाचतात ! ' हा विचार न्यूनगंडाचाच द्योतक आहे. एखादी भाषा अवगत नसली तरी तिजमधील ग्रंथांचा संग्रह करून ठेवून योग्य वेळी योग्य माणसाकडून त्या ग्रंथाचा उपयोग करण्याइतके ते लोक पुढारलेले आहेत. डॉ. केतकरांचा महाराष्ट्रीय ज्ञानकोश युरोपातील काही देशांनी विकत घेऊन संग्रहात ठेवल्याचे नमूद आहे. अशा तऱ्हेने आपण आपल्या देशासंबंधीचे प्रमाणभूत ज्ञान प्रकाशित केल्यास इतर देशांनी आपल्यासंबंधी प्रकाशित केलेले अज्ञान दुरुस्त होण्याचाही संभव आहे. निदान, आपल्या देशातील लोक तरी स्वतःच्या देशाची माहिती परकीयांच्या गैरमाहित आणि विकृत लिखाणातून घेणार नाहीत. परकीयांचे अडाणी समज दुरुस्त करण्याकरिता आपणांला इंग्रजीतून वा फ्रेंचमधूनही लिहावे लागेल. श्री. अमरेंद्र गाडगीळ यांनी तशा तऱ्हेचे इंग्रजीतून करवून घेतलेले लिखाण प्रकाशनार्थ तयार आहे, असे कळते.

या ज्ञानकोशाचा पहिला भाग उक्तिविशेषांचा म्हणजे सर्वतोमुखी असलेल्या संस्कृत वचनांचा आहे. "निःस्पृहस्य तृणं जगत्", "त्वमेव माता च पिता त्वमेव" यांसारखी वचने सर्व सुसंस्कृत लोकांच्या तोंडी असतात. पण ते वचन कोणत्या ग्रंथात, कोणत्या प्रसंगी, कोणाच्या तोंडी आहे हे पुष्कळदा विद्वानांनाही माहीत नसते किंवा स्मरत नसते. संदर्भासह संपूर्ण वचन पुरविण्याचे काम या ग्रंथाने केले आहे. संपूर्ण अर्थ व संपूर्ण संदर्भ बिनचूकपणे दिलेला असल्याने लेखक, वक्ते, संपादक या वर्गातील लोकांना आपल्या तोंडी असलेल्या लोकप्रिय संस्कृत वचनांचा अधिक सुबुद्धपणे आणि समर्पकपणे उपयोग करता येईल. तसेच ज्यांच्याजवळ अशा वचनांचा संग्रह फारसा नाही, त्यांना या ग्रंथाच्या साहाय्याने तो वाढविता येईल.

श्री. अमरेंद्र गाडगीळ यांची ही कल्पना माझ्या माहितीप्रमाणे तरी सर्वस्वी नवीन आहे. बऱ्याच वर्षांपूर्वी 'सुभाषितरत्नभांडागारम्' नावाचा ग्रंथ महाराष्ट्रातच निघाला आहे हे खरे; पण आपल्याला अर्धवट आठविणारी वचने ज्यात वर्णानुक्रमे शोधता येतील व ज्यात ती संदर्भासह सापडतील अशा ग्रंथाची फार उणीव होती. उदाहरणार्थ "जानामि धर्मं नच मे प्रवृत्तिः" ('I see the right, yet the wrong pursue') हे संस्कृत वचन पांडवगीतेतील दुर्योधनाचे आहे, हे कळल्याने आनंद होतो आणि कृष्णपूजनाला विरोध म्हणून त्याने ते उद्गार काढले आहेत हे कळल्याने अधिकच प्रकाश पडतो. "ॐ शांतिः शांतिः शांतिः" हे वचन सर्वांनी ऐकलेले असते. अन्य वाङ्मयाचा उल्लेख काव्यात करण्याची फॅशन पाडणारा इंग्रज कवी टी. एस. इलियट यानेही आपल्या इंग्रजी काव्यात हे वचन वापरले आहे. पण ज्या वैदिक मंत्रातून हे वचन घेतले आहे, तो संपूर्ण मंत्र भारतीयांनाही पुष्कळदा माहीत नसतो. श्री गाडगिळांनी तो संपूर्ण मंत्र अर्थासह दिला आहे.

श्री. अमरेंद्र गाडगीळ यांनी दिलेले अर्थ व संदर्भ सर्वत्र समाधानकारक असले तरी क्वचित एखाद्या जागी वेगळा अर्थ दिला असता तर बरे झाले असते, असे

वाटते. "जिताक्षस्य तृणं नारी" या वचनाचा अर्थ गाडगीळ यांनी 'संयमी माणसाला स्त्रीविषयी अभिलाषा नसते' असा दिला आहे. यात मूळ वचनापेक्षा क्षीण असा अर्थ प्रतीत होतो. 'ज्याने नेत्रांवर विजय मिळविला आहे अशा माणसाला स्त्री तृणवत् म्हणजे कस्पटासमान असते' असा मूळ वचनाचा रोख आहे. पण असे स्थळ मला तरी या ग्रंथात एकच आढळले.

श्री. गाडगीळ यांनी आपल्या राष्ट्रीय ज्ञानकोशाच्या या पहिल्याच खंडाच्या द्वारे एक अत्यंत सर्वोपयोगी ग्रंथ महाराष्ट्राला देऊन पुढील खंडांविषयी उत्कंठा उत्पन्न केली आहे.

त्यांचे सर्व खंड निर्विघ्नपणे पुरे होऊन वाचकांच्या हाती पडोत, हीच प्रार्थना आणि हाच आशीर्वाद ! श्री. गाडगीळ यांच्याबरोबरच त्यांचे विद्याप्रेमी प्रकाशक वोरा अँण्ड कंपनी यांचेही अभिनंदन केले पाहिजे.

१ जून १९७६, श्रीकृष्ण के. क्षीरसागर
पुणे विद्यापीठ परिसर

राष्ट्रीय ज्ञानकोश

जागतिक ज्ञानकोश अनेक झालेले आहेत. परदेशात झाले तसे आपल्या देशात झाले, होतही आहेत. हे ज्ञानकोश - विश्वकोश पाहिले, सूक्ष्मपणे त्यांतील हिंदुस्थानासंबंधीच्या नोंदी पाहिल्या म्हणजे असे आढळून येते की, त्यांत कित्येक बाबतीत हिंदुस्थानाविषयक माहितीचा तपशील चुकीचा, अपुरा व विकृतही दिलेला आहे. वास्तविक ज्यांनी या देश-धर्म-संस्कृतीची जडणघडण केली, ज्यांच्या कर्तृत्वाचा वारसा आजच्या नव्या 'भारता'नेही अभिमानाने सांगावयाला पाहिजे त्यांची नावनिशाणीही या परदेशी जागतिक ज्ञानकोशांत - विश्वकोशांत सापडत नाही. जगाच्या तुलनेत हिंदुस्थानाच्या वाट्याला येणारी कोशातील स्थलमर्यादा ही त्यातील एक अडचण लक्षात येण्यासारखी आहे. परदेशी जागतिक ज्ञानकोशांत आमच्या दृष्टीने राष्ट्रीय विचार, राष्ट्रीय दृष्टी याची अपेक्षा साहजिकच करता येणार नाही. परंतु परदेशी कोशांचे अनुकरण करणारे स्वदेशातील कोशही जेव्हा आंधळेपणाने परकीयांनी घालून दिलेल्या हिंदुस्थानविषयक माहितीच्या चाकोरीतूनच जाताना दिसतात, तेव्हा मन विषण्ण झाल्यावाचून राहात नाही.

या विचाराच्या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रीय ज्ञानकोश तयार करण्याची योजना मी आखली. त्या योजनेचा तपशील लिहून काढला तेव्हा असे लक्षात आले की, हे काम एवढे प्रचंड, इतक्या खर्चाचे व इतक्या प्रदीर्घ कालावधीचे आहे की, एखाद-दुसऱ्या व्यक्तीने आपले चालू व्याप सांभाळून ते तडीला नेणे दुरापास्त आहे. त्यासाठी एखादी स्वतंत्र संस्था स्थापन करून तिला माणसांचे व द्रव्याचे भरपूर पाठबळ मिळवावे लागेल, तरच राष्ट्रीय दृष्टया अत्यंत महत्त्वाचे हे कार्य विशिष्ट कालावधीत पुरे होऊ शकेल. परंतु अशा प्रकारच्या संस्था-स्थापनेला आवश्यक असलेली कोणतीच अनुकूलता माझ्यापाशी उपलब्ध नसल्यामुळे तो विचार मनातून काढून टाकावा लागला; आणि आपल्याला उपलब्ध असलेल्या तुटपुंज्या साधनसामग्रीनिशीच या कार्याला हात घालण्याचे मी ठरविले.

प्रथम प्रस्तुत भारतीय राष्ट्रीय ज्ञानकोश दोन मोठ्या खंडांत प्रकाशित करण्याची कल्पना होती. परंतु त्यासाठी लागणारे द्रव्य, माणसांची व इतर सामग्रीची जुळवाजुळव हेही सद्य:स्थितीत साध्य होणे अवघड वाटल्यामुळे याचे लहान लहान भाग करण्याचे ठरविले. संकल्पित योजनेनुसार याचे पंधरा-सोळा तरी भाग होतील; त्यांपैकी हा पहिला भाग प्रसिद्ध केला जात आहे.

भारतीय राष्ट्रीय ज्ञानकोशाच्या या पहिल्या भागात सर्वसामान्यपणे सुसंस्कृत सुविद्य मंडळीत रूढ असलेल्या संस्कृत उक्तिविशेषांचा संदर्भासह संग्रह केलेला आहे.

यांतील संदर्भ हे महत्त्वाचे आहेत. संदर्भामुळे अर्थाची सुस्पष्टता सुकर होते; आणि वक्ते, लेखक, प्राध्यापक इत्यादींना मूळ उक्तींचा वापर करताना त्यांवर भाष्य करणे सुलभ होते. पण माझ्या दृष्टीने हा सामान्य लाभ झाला. याहून महत्त्वाचा, चिरकालिक, मौलिक लाभ कोणता असेल तर संदर्भ समजल्यामुळे आपल्या सांस्कृतिक वारशाचे ज्ञान होणे; आणि आपल्या हजारो - शेकडो वर्षांच्या अविरत, अखंड परंपरेचे स्मरणीय दर्शन घडणे. याचा उपयोग राष्ट्रीय स्वाभिमानाला व आत्मविश्वासाला उजळा देण्यासाठी व तसेच या नित्यपरिचित उक्ती अधिक प्रभावीपणे उपयोगात आणण्यासाठीही होऊ शकेल.

संस्कृतच्या अभ्यासकांना हे परिश्रमपूर्वक संकलित केलेले मूळ संदर्भ अती उपयुक्त व श्रम वाचविणारी एक कुपीच सापडल्यासारखे वाटतील. पण त्याबरोबरच सर्वसामान्य वाचकालाही वेदकालापासून अद्ययावत् असा सांस्कृतिक मोलाचा एक वाचनीय संदर्भग्रंथ हाती आल्याचे समाधान लाभेल, अशी आशा आहे.

राष्ट्रीय गौरवाचा यथार्थ गाथा आपल्या देशवासियांसमोर सतत राहावा ही या भारतीय राष्ट्रीय ज्ञानकोश-निर्मितीमागची प्रेरणा आहे. या देशाच्या सांस्कृतिक एकात्मतेचे महान् शिल्पकार पूज्यपाद श्रीमत् आद्य शंकराचार्य यांच्यासारख्या संस्मरणीय व्यक्ती; आपल्या देशाच्या इतिहासाला क्रांतिकारक वळण लावणाऱ्या शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकासारख्या महत्त्वाच्या घटना; प्रत्येक भारतीयाने आयुष्यात एकदा तरी जाऊन ज्याचे दर्शन घेतलेच पाहिजे असे राष्ट्रीय संस्मरणाचे कुरुक्षेत्रासारखे स्थळ; तसेच जगद्वंद्यतेला पोचलेला श्रीमत् भगवद्गीतेसारखा अद्वितीय भारतीय ग्रंथ; या आणि यासारख्या प्रत्येक क्षेत्रातील राष्ट्रीय गौरवाच्या बाबींचा तपशीलवार. अचूक व विश्वसनीय परिचय स्वदेशबांधवांना करून देणे हा या खटाटोपाचा हेतू आहे. आत्मज्ञान हे पारमार्थिक मार्गात जसे सर्वश्रेष्ठ ज्ञान समजले जाते तसेच, आपला देश, आपला धर्म, आपली संस्कृती, आपला इतिहास, आपला भूगोल याचे सर्वांगपरिपूर्ण व यथार्थ ज्ञान म्हणजेच ऐहिक अर्थाने आत्मज्ञान करून घेणे हे राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीने परमावश्यक असते. अशा राष्ट्रीय आत्मगौरवयुक्त आत्मज्ञानातूनच राष्ट्रीय आत्मविश्वास वाढत असतो; आणि या राष्ट्रीय आत्मविश्वासाच्या जाणिवेने राष्ट्रीय आत्मप्रत्यय घेण्याची ईर्षा बळावत असते. खोटच्या अध्यात्माच्या मागे लागून राष्ट्रीयदृष्टचा आत्मप्रत्ययहीन बनलेल्या स्वदेशबांधवांसाठी नवा इतिहास घडविण्याच्या दृष्टीने हा प्रयत्न अखंड स्फूर्तिनिर्झर ठरावा, अशी खरी अपेक्षा आहे.

—संपादक : **अमरेंद्र गाडगीळ**

उक्तिविशेषांचा संदर्भक्रम व नियम

संदर्भात प्रथम ग्रंथनामाचा संक्षेप, कांड / पर्व यांचा क्रमांक, सर्ग / अध्याय क्रमांक व शेवटी श्लोक / वाक्य असा क्रम आहे. उदा.– महाभारत, शांतिपर्व अध्याय १७ व श्लोक क्र. १८ हा संदर्भ–महा. १२.१७.१८. असा दिला आहे.

ज्या उक्तिविशेषांचा संदर्भ उपलब्ध होऊ शकला नाही व जे उक्तिविशेष सुभाषित म्हणूनच प्रचलित आहेत त्यांचा संदर्भ देताना 'लोकोक्ती' असा निर्देश केला आहे.

उक्तिविशेषांची लेखन-पद्धती

उक्तिविशेष

सं. – संदर्भ : ग्रंथ – अध्याय–श्लोकक्रमांक इत्यादीसह कोण, केव्हा म्हणाले हे सर्व त्या वेळच्या प्रसंग-परिस्थितीसह.

मू. – मूळ : संपूर्ण श्लोक–वाक्य.

अ. – श्लोकाचा–वाक्याचा अर्थ.

व्य. – व्यवहार : मूळ अर्थाचे स्पष्टीकरण व त्या उक्तीचा व्यवहारात केला जाणारा उपयोग.

उपयोजिलेले संदर्भग्रंथ व संक्षेप

ग्रंथनाम	प्रकाशक – आवृत्ती	संक्षेप
अथर्ववेद	: स्वाध्यायमंडळ, पारडी	अथर्व
अध्यात्म रामायण	:	अध्या.
अमृतबिंदु उपनिषद्	: उपनिषत्संग्रह (मोतीलाल बनारसीदासः १९७०)	
आनंदमठ	:	
ईशावास्य उपनिषद्	: उपनिषत्संग्रह (मो. ब.)	ईश.
उत्तररामचरित	:	उरा.
ऋग्वेद	: स्वाध्याय मंडळ, पारडी	ऋग्.
ऐतरेय ब्राह्मण	:	ऐब्रा.
कठ उपनिषद्	: उपनिषत्संग्रह (मो. ब. १९७०)	कठ.
कादंबरी	: रामनारायण बेनीमाधव (१९७७)	का.
किरातार्जुनीय	: निर्णयसागर (१९२९)	किरा.
कुमारसंभव	: चौखम्बा (१९६३)	कुसं.

कुवलयानंद	:		
गुरुगीता	:		
जाबालोपनिषद्	:	उपनिषत्संग्रह (मो. ब. १९७०)	
छांदोग्य उपनिषद्	:	" "	छां.
तैत्तिरीय उपनिषद्	:	" "	तैत्ति.
दीघ निकाय	:		
नीतिशतक	:	निर्णयसागर (१९२२)	नीश.
पद्मपुराण			
पंचतंत्र	:	चौखम्बा (१९५९)	पंच.
प्रसन्नराघव	:		प्ररा.
पांडवगीता	:		
ब्रह्मसूत्र	:	विष्णुशास्त्री बापट (१९२५)	ब्रसू
बृहदारण्यक उपनिषद्	:	उपनिषत्संग्रह (मो. ब. १९७०)	बृहद्.
भगवद्गीता	:		भगी.
भविष्यपुराण	:		
भागवत	:	गीताप्रेस, गोरखपूर (१९७२)	भाग.
भामिनीविलास			
भारतीय संस्कृती कोश	:	पं. महादेवशास्त्री जोशी	भासंको.
भोजप्रबंध	:	निर्णयसागर (१९०४)	भोज.
मनुस्मृति	:	निर्णयसागर (१८८७)	मनु.
मराठ्यांच्या इतिहासाची साधने (खंड)	:		म. इ. सा. खं.
महाभारत	:	भांडारकर ओरि. रिसर्च इन्स्टिटयूट (१९६१)	महा.
मार्कंडेय पुराण	:		
मालतीमाधव	:		मामा.
मालविकाग्निमित्र	:		मात्व.
मुद्राराक्षस	:		मुद्रा.
मुण्डकोपनिषद्	:	उपनिषत्संग्रह (मो. ब. १९७०)	मुण्डक.

मृच्छकटिक	:	मृच्छ.
मेघदूत	:	मेघ.
मैत्रायणि उपनिषद्	: उपनिषत्संग्रह (मो. ब. १९७०)	
यजुर्वेद	: स्वाध्याय मंडळ, पारडी	यजु.
योगवासिष्ठ	: निर्णयसागर (१९१८)	योवा.
रघुवंश	: निर्णयसागर (१९०८)	रघु.
वराहपुराण	:	
वाल्मीकि रामायण	: निर्णयसागर (१९३०)	वारा.
विक्रमोर्वशीय	:	विक्र.
वेणीसंहार	:	वेसं.
वैराग्यशतक	: निर्णयसागर (१९२२)	वैश.
शाकुंतल	:	शाकुं.
शृंगारशतक	: निर्णयसागर (१९२२)	शृंश.
श्वेताश्वतर उदनिषद्	: उपनिषत्संग्रह (मो. ब. १९७०)	
समयोचितपद्यमालिका	: निर्णयसागर (१९५०)	सप.
सर्वदर्शनसंग्रह (चार्वाक, बौद्ध, वैद)	: भांडारकर ओरि. रिसर्च इन्स्टिटयूट (१९६०)	सदसं·
सर्वलक्षणसंग्रह	: निर्णयसागर (१९४०)	सर्वलसं.
सुभाषितरत्नभांडागारम्	. निर्णयसागर (१९५२)	सुर·
स्कंदपुराण	:	स्कंपु.
स्वप्नवासवदत्ता	:	स्वप्न.
हितोपदेश	. निर्णयसागर (१९५५)	हित.

आधारभूत स्तोत्रे

चर्पटपंजरिका	:	चर्पट.
देव्यपराधक्षमापन	:	
निर्वाणदशक	:	
विष्णुपञ्जरिका	:	
शिवमहिम्न	:	शिम.

यांपैकी रामायण आणि महाभारत यांची अनुक्रमे कांडे व पर्वनामे न देता संदर्भात खालीलप्रमाणे क्रमांक दिले आहेत.

रामायण

१. बालकांड
२. अयोध्याकांड
३. अरण्यकांड
४. किष्किंधाकांड
५. सुंदरकांड
६. युद्धकांड
७. उत्तरकांड

महाभारत

१. आदिपर्व
२. सभापर्व
३. वनपर्व
४. विराटपर्व
५. उद्योगपर्व
६. भीष्मपर्व
७. द्रोणपर्व
८. कर्णपर्व
९. शल्यपर्व
१०. सौप्तिकपर्व
११. स्त्रीपर्व
१२. शांतिपर्व
१३. अनुशासनपर्व
१४. अश्वमेधपर्व
१५. आश्रमवासिकपर्व
१६. मौसलपर्व
१७. महाप्रास्थानिकपर्व
१८. स्वर्गारोहणपर्व

निर्णयसागर, चौखम्बा इ. सारख्या मान्यता पावलेल्या प्रकाशकांची नावेच फक्त दिली आहेत.

(इतर अवलोकिलेल्या संदर्भ ग्रंथांची यादी पृ. २९२ वर पाहा.)

उक्तिविशेष : अनुक्रम

अ.	उक्तिविशेष	पृ.
१.	अङ्गं गलितं पलितं मुण्डम्	१
२.	अंगुष्ठमात्रः पुरुषः	१
३.	अग्निमीळे पुरोहितम्	२
४.	अग्ने नय सुपथा	२
५.	अतिपरिचयादवज्ञा	३
६.	अतीयात् सागरो वेलाम्	३
७.	अति सर्वत्र वर्जयेत्	४
८.	अतिस्नेहः पापशङ्की	४
९.	अन्ते मतिः सा गतिः	४
१०.	अथातो ब्रह्मजिज्ञासा	५
११.	अर्थस्य पुरुषो दासः	५
१२.	अर्थातुराणां न गुरुर्न बन्धुः	६
१३.	अद्वेष्टा सर्वभूतानाम्	६
१४.	अधिकस्य अधिकं फलम्	७
१५.	अर्धं त्यजति पण्डितः	७
१६.	अनन्तानीह दुःखानि	८
१७.	अनन्तपारं किल शब्दशास्त्रम्	८
१८.	अनामिका सार्थवती बभूव	९
१९.	अनायासेन मरणम्	९
२०.	अनिर्वेदः श्रियो मूलम्	९
२१.	अनुद्वेगः श्रियो मूलम्	१०
२२.	अनृणी चाप्रवासी च	११
२३.	अन्नदाता सुखी भव	११
२४.	अप्रियस्य च पथ्यस्य	१२
२५.	अबला यत्र प्रबला	१३
२६.	अरसिकेषु कवित्वनिवेदनम्	१३
२७.	अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छन्	१४
२८.	अविद्यया मृत्युं तीर्त्वा	१४
२९.	अविवेकः परमापदां पदम्	१५
३०.	अव्यवस्थितचित्तस्य प्रसादोऽपि भयङ्करः	१६
३१.	अव्यापारेषु व्यापारः	१७
३२.	अहं ब्रह्मास्मि	१७
३३.	अहिंसा परमो धर्मः	१८
३४.	अहिंसा सत्यमक्रोधः	१८
३५.	अहो रूपमहो ध्वनिः	१९
३६.	आ नो भद्राः क्रतवः ...	१९
३७.	आचारप्रभवो धर्मः	२०
३८.	आततायिनमायान्तम्	२०
३९.	आन्तरः कोऽपि हेतुः	२१
४०.	आत्मा वा अरे द्रष्टव्यः	२२
४१.	आत्मनः प्रतिकूलानि	२२
४२.	आत्मानं रथिनं विद्धि	२३
४३.	आत्मानं सततं रक्षेत्	२३
४४.	आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्	२४
४५.	आत्मवत् सर्वभूतानि	२५
४६.	आपत्काले तु संप्राप्ते . .	२५
४७.	आपरितोषात् विदुषाम्	२६
४८.	आये दुःखं व्यये दुःखम्	२६
४९.	आराधनाय लोकानाम्	२७
५०.	आशा नाम मनुष्याणाम्	२७
५१.	आशा हि परमं दुःखम्	२८
५२.	आहारनिद्राभयमैथुनं च	२८
५३.	इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः	२९
५४.	इन्द्रो वृत्रवधेनैव	२९
५५.	इन्द्राय स्वाह तक्षकाय स्वाहा।	३०
५६.	इष्टं धर्मेण योजयेत्	३१
५७.	इहैव फलमश्नुते	३१
५८.	ईशावास्यमिदं सर्वम्	३२
५९.	ईश्वरेच्छा बलीयसी	३३
६०.	उत्तिष्ठत ! जाग्रत !	३४

अ.	उक्तिविशेष	पृ.
६१.	उत्साहो बलवानार्य	४३
६२.	उदारचरितानां तु	३५
६३.	उद्धरेत् आत्मनात्मानम्	३५
६४.	उद्योगिनं पुरुषसिंहम्..	३६
६५.	उद्यमेन हि सिध्यन्ति	३६
६६.	उपमा कालिदासस्य	३७
६७.	ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष	३७
६८.	ऋणं कृत्वा घृतं पिबेत्	३८
६९.	ऋणानि त्रीण्यपाकृत्य	३८
७०.	एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति	३९
७१.	एका भार्या सुंदरी वा दरी वा	४०
७२.	एको देवः सर्वभूतेषु गूढः	४०
७३.	एको देवः केशवो वा शिवो वा	४१
७४.	एतद्देशप्रसूतस्य..	४१
७५.	एरण्डोऽपि द्रुमायते	४१
७६.	एष धर्मः सनातनः	४२
७७.	औषधं जान्हवीतोयम्	४३
७८.	कण्टकेनैव कण्टकम्	४३
७९.	करतलामलक (फल)वत्	४४
८०.	करिष्ये वचनं तव	४४
८१.	कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्	४५
८२.	कर्तव्यो धर्मसंग्रहः	४५
८३.	कर्मण्येवाधिकारस्ते	४५
८४.	कलां नार्हन्ति षोडशीम्	४६
८५.	कल्याणी बत गाथेयम्	४७
८६.	कविताकामिनी कौतुकाय	४७
८७.	कस्मै देवाय हविषा विधेम	४८
८८.	क्रमशः पूर्यते घटः	४८
८९.	क्वचिदपि कुमाता न भवति	४९
९०.	क्वचिदपि च हा हेति रुदितम्	४९
९१.	क्व सूर्यप्रभवो वंशः	५०
९२.	काकः काकः पिकः पिकः	५०
९३.	काकतालीयवत्प्राप्तम्	५१
९४.	काकोऽपि जीवति चिराय	५२
९५.	कामये दुःखतप्तानाम्	५३
९६.	कारणेन विना कार्यम्	५४
९७.	कार्यं भवति शासनम्	५५
९८.	कालाय तस्मै नमः	५५
९९.	कालो गच्छति धीमताम्	५६
१००.	कालो हि दुरतिक्रमः	५७
१०१.	कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी	५८
१०२.	काव्येषु नाटकं रम्यम्	५९
१०३.	काश्यां तु मरणान्मुक्तिः	५९
१०४.	काष्ठघण्टाविडम्बना	६०
१०५.	किं चित्रं यदि..	६१
१०६.	किमिव हि मधुराणाम्	६१
१०७.	किमु यत्र चतुष्टयम्	६२
१०८.	क्रियासिद्धिः सत्त्वे	६२
१०९.	कृतघ्ने नास्ति निष्कृतिः	६३
११०.	कृते च प्रतिकर्तव्यम्	६४
१११.	कृण्वन्तो विश्वमार्यम्	६४
११२.	कृष्णं वन्दे जगद्गुरुम्	६५
११३.	कृष्णस्तु भगवान् स्वयम्	६६
११४.	केवलाघो भवति केवलादी	६७
११५.	केवलं बध्यते शिखा	६७
११६.	क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते	६८
११७.	क्लैब्यं मा स्म गमः	६८
११८.	कोऽर्थवान् को दरिद्रः	६९
११९.	कोऽहं कस्त्वं कुत आयातः	७०
१२०.	कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः	७०

अ.	उक्तिविशेष	पृ.
१२१.	क्षणशः कणशश्चैव	७१
१२२.	क्षारं जलं कापुरुषाः पिबन्ति	७१
१२३.	क्षुरस्य धारा निशिता	७२
१२४.	खटाटोपो भयंकरः	७२
१२५.	खल्वाटो निर्धनः क्वचित्	७३
१२६.	गच्छ तात यथासुखम्	७३
१२७.	गजस्तत्र न हन्यते	७४
१२८.	गणना लघुचेतसाम्	७४
१२९.	गतानुगतिको लोकः	७५
१३०.	गतिरेका पतिर्नार्या	७६
१३१.	गतोदके सेतुबन्धो न	७६
१३२.	गते शोको न कर्तव्यः	७६
१३३.	गर्जन्ति न वृथा शूराः	७७
१३४.	गहना कर्मणो गतिः	७७
१३५.	गीता सुगीता कर्तव्या	७८
१३६.	गुणाः पूजास्थानम्	७९
१३७.	गुणाः सर्वत्र पूज्यन्ते	८०
१३८.	गुणलुब्धाः स्वयमेव संपदः	८०
१३९.	गुणी गुणं वेत्ति	८०
१४०.	गृहं तु गृहिणीहीनम्	८१
१४१.	गृहीत इव केशेषु	८१
१४२.	चक्रं भ्रमति मस्तके	८२
१४३.	चक्षुर्वै सत्यम्	८३
१४४.	चञ्चुप्रवेशात् मुसलप्रवेशः	८३
१४५.	चतुर्थे किं करिष्यति	८३
१४६.	चंदनं न वने वने	८४
१४७.	चराति चरतो भगः। चरैवेति	८४
१४८.	चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्	८५
१४९.	चिन्तासमं नास्ति शरीरशोषणम्	८६
१५०.	छिन्नोऽपि रोहति तरुः	८६
१५१.	छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति	८७
१५२.	जननी जन्मभूमिश्च	८८
१५३.	जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु	८८
१५४.	जातस्य हि ध्रुवो मृत्युः	८९
१५५.	जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः	८९
१५६.	जामाता दशमो ग्रहः	९०
१५७	जाया त्वर्धं शरीरस्य	९१
१५८.	जीर्णमङ्गे सुभाषितम्	९१
१५९.	जीवो जीवस्य जीवनम्	९२
१६०.	ज्येष्ठो भ्राता पितृसमः	९२
१६१.	ज्ञानाग्निः सर्वकर्माणि	९३
१६२.	ज्ञानादेव तु कैवल्यम्	९३
१६३.	तक्रं शक्रस्य दुर्लभम्	९४
१६४.	ततो युद्धाय युज्यस्व	९४
१५६.	तत्र श्रीर्विजयो भूतिः	९५
१६६.	तत्त्वमसि	९६
१६७.	तथा चतुर्भिः पुरुषः परीक्ष्यते	९७
१६८.	तदेव लग्नम्	९७
१६९.	तद्वनं भविता राष्ट्रम्	९८
१७०.	तद्विद्धि प्रणिपातेन	९८
१७१.	तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु	९९
१७२.	तपो मानसमुच्यते	९९
१७३.	तपो हि दुरतिक्रमः	१००
१७४.	तमसो मा ज्योतिर्गमय	१००
१७५.	तवाऽस्मि दासः	१०१
१७६.	तस्य जन्म निरर्थकम्	१०१
१७७.	तस्मात् पुत्र इति प्रोक्तः	१०१
१७८.	तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते	१०२
१७९.	तस्मै श्रीगुरवे नमः	१०३
१८०.	त्वमसि पयसामर्णव इव	१०४
१८१.	त्वमेव सर्वं मम देवदेव	१०५
१८२.	ताडयेन्न तु लालयेत्	१०५

उक्तिविशेष : अनुक्रम

अ.	उक्तिविशेष	पृ.
१८३.	तान् प्रति नैष यत्नः	१०५
१८४.	त्यागात् शान्तिरनन्तरम्	१०५
१८५.	तितीर्षुर्दुस्तरं मोहात्	१०६
१८६.	तेऽपि यान्ति परां गतिम्	१०६
१८७.	ते केन जानीमहे	१०७
१८८.	तेजस्तेजसि शाम्यतु	१०७
१८९.	तेजसां हि न वयः समीक्ष्यते	१०८
१९०.	तेन त्यक्तेन भुञ्जीथाः	१०८
१९१.	ते महामहिमशालिनः	१०८
१९२.	ते हि नो दिवसा गताः	१०९
१९३.	तैलबिन्दुरिवाम्भसि	१०९
१९४.	तं देवाः स्थविरं विदुः	११०
१९५.	दण्ड एव परो लोके	११०
१९६.	दण्डस्य हि भयात् सर्वं..	१११
१९७.	दर्वी पाकरसानिव	१११
१९८.	द्रव्येण सर्वे वशाः	११२
१९९.	दाता भवति वा न वा	११३
२००.	दानेन पाणिर्न तु कङ्कणेन	११३
२०१.	दारिद्र्यमेकं गुणराशिनाशि	११४
२०२.	दारिद्र्यान्मरणाद्वापि	११४
२०३.	द्वा सुपर्णा सयुजा सखाया	११५
२०४.	दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो	११५
२०५.	दिव्या गीर्वाणभारती	११६
२०६.	दीर्घसूत्री विनश्यति	११७
२०७.	दुर्जनं प्रथमं वन्दे	११७
२०८.	दूरस्थाः पर्वता रम्या	११७
२०९.	देवा विश्वस्य भुवनस्य गोपाः	११८
२१०.	देवो दुर्बलघातकः	११८
२११.	देवो न जानाति कुतो मनुष्यः	११९
२१२.	दैवं चैवात्र पञ्चमम्	१२०
२१३.	दैवं पुरुषकारेण	१२१
२१४.	दैवायत्तं कुले जन्म	१२१
२१५.	दोग्ध्री धेनुर्वोढा	१२२
२१६.	दृष्टा देवी	१२२
२१७.	धनानि भूमौ	१२३
२१८.	धन्यो गृहस्थाश्रमः	१२३
२१९.	धर्मसारमिदं जगत्	१२४
२२०.	धर्मश्च जानाति नरस्य वृत्तम्	१२४
२२१.	धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्	१२५
२२२.	धर्मे सत्यं प्रतिष्ठितम्	१२६
२२३.	धर्मो रक्षति रक्षितः	१२६
२२४.	धारणात् धर्ममित्याहुः	१२७
२२५.	धिगस्तु परवश्यताम्	१२८
२२६.	धियो यो नः प्रचोदयात्	१२९
२२७.	न ऋते श्रान्तस्य सख्याय....	१२९
२२८.	न कश्चिदतिवर्तते	१३०
२२९.	न कालः खड्गमुद्यम्य	१३१
२३०.	न जातु कामः	१३२
२३१.	न जानपदिकं दुःखम्	१३३
२३२.	न तत्र दिवसं वसेत्	१३३
२३३.	न देवचरितं चरेत्	१३४
२३४	न देवा दण्डमादाय	१३५
२३५.	न देवाय न धर्माय	१३५
२३६	न दैवं पर्युपासते	१३६
२३७.	न पापानां वधे पापम्	१३६
२३८.	न ब्रूयात् सत्यमप्रियम्	१३७
२३९.	नभः स्पृशम्	१३७
२४०.	न भीतो मरणादस्मि	१३७
२४१.	न भूतो न भविष्यति	१३८

अ.	उक्तिविशेष	पृ.
२४२.	नमः शिवाय	१३९
२४३.	नमः सिद्धम्	१३९
२४४.	न मातुः परदैवतम्	१४०
२४५.	न मूर्खजन-चित्तमाराधयेत्	१४०
२४६.	न मे दह्यति किञ्चन	१४१
२४७.	न मे भक्तः प्रणश्यति	१४१
२४८.	न मे स्तेनो जनपदे	१४२
२४९.	न रत्नमन्विष्यते मृग्यते हि तत्	१४२
२५०.	न वा अरे पत्युः कामाय	१४३
२५१.	न वैद्यः प्रभुरायुषः	१४३
२५२.	न त्वहं कामये राज्यं	१४४
२५३.	न शोभार्थाविमौ बाहू	१४४
२५४.	न सा सभा	१४४
२५५.	न स्त्री स्वातंत्र्यमर्हति	१४५
२५६.	न हि कल्याणकृत्..	१४६
२५७.	न हि कस्तूरिकामोदः..	१४७
२५८.	न हि ज्ञानेन...	१४८
२५९.	न हि वंध्या विजानाति	१४८
२६०.	न हि स्त्रीवधकृते	१४९
२६१.	न हिन्दुर्न यवनः	१४९
२६२.	नातिचरामि...	१५०
२६३.	नादत्तमुपतिष्ठते	१५०
२६४.	नादत्ते कस्यचित्पापं	१५१
२६५.	नानृषिः कुरुते काव्यं	१५२
२६६.	नान्यतः शुद्धिमर्हतः	१५३
२६७.	नापृष्टः कस्यचित् ब्रूयात्	१५३
२६८.	नायमात्मा प्रवचनेन	१५४
२६९.	नाराजके जनपदे	१५५
२७०.	ना विष्णुः पृथिवीपतिः	१५६
२७१.	नासतो विद्यते भावः	१५६

अ.	उक्तिविशेष	पृ.
२७२.	नासदासीत् नो सदासीत्	१५६
२७३.	न्यायात्पथः प्रविचलन्ति...	१५७
२७४.	निकामे निकामे नः पर्जन्यः	१५७
२७५.	निन्दन्तु नीतिनिपुणाः	१५७
२७६.	निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्	१५८
२७७.	निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु	१५८
२७८.	निर्वीरमुर्वीतलम्	१५९
२७९.	निस्त्रैगुण्ये पथि विचरतः...	१६०
२८०.	निःस्पृहस्य तृणं जगत्	१६१
२८१.	नीचैर्गच्छत्युपरि च दशा	१६१
२८२.	नूपुरे त्वभिजानामि	१६२
२८३.	नृदेहमाद्यं सुलभम्	१६३
२८४.	नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता	१६३
२८५.	नेह नानास्ति किञ्चन	१६४
२८६.	नैनं छिन्दन्ति शस्त्राणि	१६५
२८७.	नैव स्त्री न पुनः पुमान्	१६५
२८८.	पञ्चैता मातरः स्मृताः	१६६
२८९.	पण्डिताः समदर्शिनः	१६७
२९०.	पतिरेको गतिः सदा	१६७
२९१.	पत्रं पुष्पं फलं तोयम्	१६७
२९२.	पदमेकं न गच्छति	१६८
२९३.	पद्मपत्रमिवाम्भसा	१६८
२९४.	पयःपानं भुजङ्गानाम्	१६९
२९५.	परदुःखं शीतलम्	१७०
२९६.	परहस्तगतं धनम्	१७०
२९७.	परोपकारः पुण्याय	१७१
२९८.	परोपकाराय सतां विभूतयः	१७१
२९९.	परोपदेशे पाण्डित्यम्	१७२
३००.	पश्येम शरदः शतम्	१७३

अ.	उक्तिविशेष	पृ.
३०१.	प्रजापुण्यैश्च जीवति	१७४
३०२.	प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः	१७५
३०३.	प्रतिपच्चन्द्ररेखेव वर्धिष्णु	१७५
३०४.	प्रथमग्रासे मक्षिकापातः	१७६
३०५.	प्रसादचिन्हानि पुरः-फलानि	१७६
३०६.	प्राप्तं प्राप्तं उपासीत	१७७
३०७.	प्रारब्धमुधत्तमजना न परित्यजन्ति	१७७
३०८.	पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना	१७८
३०९.	पुत्रं मित्रवदाचरेत्	१७८
३१०.	पुराणं पञ्चलक्षणम्	१७८
३११.	पुराणमित्येव न साधु सर्वम्	१८०
३१२.	पृथिव्यां त्रीणि रत्नानि	१८०
३१३.	फलानुमेयाः प्रारम्भाः	१८१
३१४.	बहुजनहिताय बहुजनसुखाय	१८२
३१५.	बहुरत्ना वसुंधरा	१८२
३१६.	बहूनां जन्मनामन्ते	१८३
३१७.	बादरायणसंबंधात् यूयं यूयं वयं वयम्	१८३
३१८.	बालादपि सुभाषितं ग्राह्यम्	१८४
३१९.	बालानां रोदनं बलम्	१८४
३२०.	बुद्धं सरणं गच्छामि	१८५
३२१.	बुद्धिः कर्मानुसारिणी	१८५
३२२.	बुद्धिनाशात् प्रणश्यति	१८६
३२३.	बुद्धिर्यस्य बलं तस्य	१८६
३२४.	बुद्धिस्तु मा गान्मम	१८७
३२५.	बुभुक्षितः किं न करोति पापम्	१८८
३२६.	बोद्धारो मत्सरग्रस्ताः	१८९
३२७.	भवन्ति नम्रास्तरवः	१८९
३२८.	भवति योजयितुर्वचनीयता	१८९
३२९.	भवितव्यं भवत्येव	१९०
३३०.	भावो हि कारणम्	१९०
३३१.	भिद्यते हृदयग्रंथिः	१९०
३३२.	भिन्नरुचिर्हि लोकः	१९१
३३३.	भूतानि कालः पचतीति वार्ता	१९१
३३४.	भूमौ स्थितस्य पतनात् भयमेव नास्ति	१९२
३३५.	भोगा न भुक्ता वयमेव भुक्ताः	१९२
३३६.	मदायत्तं तु पौरुषम्	१९३
३३७.	मधु तिष्ठति जिव्हाग्रे	१९३
३३८.	मन एव मनुष्याणाम्...	१९३
३३९.	मनःपूतं समाचरेत्	१९४
३४०.	मनस्वी कार्यार्थी न गणयति...	१९४
३४१.	मनस्येकं वचस्येकम्..	१९५
३४२.	मनसैव कृतं पापम्..	१९६
३४३.	मनोरथानामगतिर्न विद्यते	१९६
३४४.	मरणादतिरिच्यते	१९७
३४५.	मरणान्तानि वैराणि	१९७
३४६.	महतो महीयान्	१९८
३४७.	महाजनो येन गतः स पन्थाः	१९९
३४८.	माघे सन्ति त्रयो गुणाः	१९९
३४९.	मा निषाद प्रतिष्ठां..	१९९
३५०.	मा भैः	१९९
३५१.	माता गौरवेणातिरिच्यते	२००

अ.	उक्तिविशेष	पृ.
३५२.	माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः	२००
३५३.	माता रुद्राणां दुहिता वसूनाम्	२०१
३५४.	मातेव रक्षति	२०२
३५५.	मातृदेवो भव	२०२
३५६.	मातृवत्परदारेषु	२०३
३५७.	मामनुस्मर युध्य च	२०३
३५८.	मामयं प्रहरिष्यति	२०४
३५९.	मिथ्याचारः स उच्यते	२०५
३६०.	मिष्टान्नमितरे जनाः	२०५
३६१.	मुहूर्तं ज्वलितं श्रेयः	२०५
३६२.	मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः	२०६
३६३.	मूलच्छेदं न कारयेत्	२०६
३६४.	मूलान्यपि निकृन्तति	२०६
३६५.	मृदुर्हि परिभूयते	२०७
३६६.	मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः	२०७
३६७.	मौनं सर्वार्थसाधनम्	२०८
३६८.	यः क्रियावान् स पण्डितः	२०९
३६९.	यततामपि सिद्धानाम्	२०९
३७०.	यतो धर्मस्ततो जयः	२०९
३७१.	यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः	२१०
३७२.	यंत्रारूढानि मायया	२११
३७३.	यत्ने कृते यदि न सिध्यति..	२११
३७४.	यत्र नार्यस्तु पूज्यन्ते	२१२
३७५.	यथा काष्ठं च काष्ठं च	२१२
३७६.	यथा राजा तथा प्रजाः	२१३
३७७.	यद् गत्वा न निवर्तन्ते	२१३
३७८.	यदभावि न तद्भावि	२१४
३७९.	यद्वा तद्वा भविष्यति	२१४
३८०.	यदहरेव विरजेत्तदहरेव प्रव्रजेत्	२१५
३८१.	यद्यदाचरति श्रेष्ठः..	२१५
३८२.	यद्यद्विभूतिमत्सत्वम्..	२१६
३८३.	यदा यदा हि धर्मस्य	२१६
३८४.	यदिहास्ति तदन्यत्र	२१७
३८५.	यद् रोचते तद् ग्राह्यम्	२१७
३८६.	यदेव रोचते यस्मै..	२१८
३८७.	यस्य राष्ट्रे प्रजाः	२१८
३८८.	यस्यार्थाः स च पण्डितः	२१९
३८९.	या निशा सर्वभूतानाम्	२१९
३९०.	यादृशी भावना यस्य	२२०
३९१.	याचको याचकं दृष्ट्वा	२२०
३९२.	युद्धस्य वार्ता रम्या	२२१
३९३.	येनकेनप्रकारेण....	२२१
३९४.	ये यथा मां प्रपद्यन्ते..	२२१
३९५.	यो भुङ्क्ते स्तेन एव सः	२२२
३९६.	यो वै भूमा तत्सुखम्	२२२
३९७.	योगः कर्मसु कौशलम्	२२३
३९८.	योगेनान्ते तनुत्यजाम्	२२३
३९९.	योगक्षेमं वहाम्यहम्	२२३
४००.	योजकस्तत्र दुर्लभः	२२४
४०१.	रत्नं समागच्छतु काञ्चनेन	२२४
४०२.	राजद्वारे स्मशाने च...	२२५
४०३.	राजा कालस्य कारणम्	२२५
४०४.	राजा प्रकृतिरंजनात्	२२६
४०५.	रामरावणयोर्युद्धम्..	२२६
४०६.	रामः सत्यपराक्रमः	२२७
४०७.	रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति	२२७
४०८.	रामो द्विर्नाभिभाषते	२२८
४०९.	रिक्तपाणिर्न पश्येत	२२८

अ.	उक्तिविशेष	पृ.
४१०.	रुचीनां वैचित्र्यात्	२२८
४११.	लभेत सिकतासु तैलम्	२२८
४१२.	लिखितमपि ललाटे प्रोज्झितुं कः समर्थः	२२९
४१३.	लोकस्तदनुवर्तते	२२९
४१४.	लोकोत्तराणां चेतांसि..	२२९
४१५.	लोभमूलानि पापानि	२३०
४१६.	वक्ता दशसहस्रेषु	२३०
४१७.	वक्ता श्रोता च दुर्लभः	२३०
४१८.	वचनं कर्तुमुद्यतः	२३१
४१९.	वचने किं दरिद्रता	२३१
४२०.	वज्रलेपो भविष्यति	२३२
४२१.	वज्रादपि कठोराणि..	२३२
४२२.	वटस्य पत्रस्य पुटे शयानम्	२३२
४२३.	वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम्	२३३
४२४.	वन्दे मातरम्	२३४
४२५.	वयं पञ्चाधिकं शतम्	२३५
४२६.	वसुधैव कुटुम्बकम्	२३६
४२७.	वाग्भूषणं भूषणम्	२३६
४२८.	वाचमर्थोऽनुधावति	२३६
४२९.	वादे वादे जायते तत्त्वबोधः	२३७
४३०.	वासः प्रधानं खलु योग्यतायाः	२३७
४३१.	विद्याविनयसंपन्ने...	२३८
४३२.	विपरीतो वधक्रमः	२३८
४३३.	वितरति गुरुः प्राज्ञे..	२३८
४३४.	विद्वान् सर्वत्र पूज्यते	२३९
४३५.	विद्वांसमपि कर्षति	२४०
४३६.	विनाशकाले विपरीतबुद्धिः	२४०
४३७.	विनाश्रयं न शोभन्ते	२४१

अ.	उक्तिविशेष	पृ.
४३८.	विपदः सन्तु नः शश्वत्	२४१
४३९.	विभवो नैव शाश्वतः	२४२
४४०.	वीराः सम्भावितात्मानो	२४२
४४१.	वृद्धा नारी पतिव्रता	२४२
४४२.	वेदोऽखिलो धर्ममूलम्	२४२
४४३.	वैद्यराज नमस्तुभ्यं यमराजसहोदर	२४३
४४४.	व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्	२४३
४४५.	विद्ययाऽमृतमश्नुते	२४४
४४६.	शठं प्रति शाठ्यम्	२४४
४४७.	शतं वर्षाणि जीवति	२४५
४४८.	शनैः पन्थाः शनैः कन्था	२४५
४४९.	शत्रोरपि गुणा ग्राह्या	२४५
४५०.	शरदि न वर्षति गर्जति	२४६
४५१.	शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्	२४६
४५२.	शान्तं पापं शान्तं पापम्	२४७
४५३.	शान्तिः शान्तिः शान्तिः	२४७
४५४.	शाकाय वा स्याल्लवणाय वा	२५०
४५५.	शापादपि शरादपि	२५०
४५६.	शाब्दे परे च निष्णातम्	२५०
४५७.	शास्त्रात् रूढिर्बलियसी	२५१
४५८.	शिवः केवलोऽहम्	२५१
४५९.	शिवस्य हृदयं विष्णुः	२५२
४६०.	शिष्यादिच्छेत् पराजयम्	२५३
४६१.	शिष्यस्तेऽहं शाधि मां	२५३
४६२.	शिष्यापराधे गुरोर्दण्डः	२५४
४६३.	शीलं परं भूषणम्	२५४
४६४.	शुनि चैव श्वपाके च	२५५
४६५.	शुभास्ते पन्थानः सन्तु	२५५
४६६.	शुभस्य शीघ्रम्...	२५६

अ.	उक्तिविशेष	पृ.
४६७.	शूरश्च कृतविद्यश्च	२५६
४६८.	शूराणां च नदीनां च प्रभवा दुर्विदः किल	२५६
४६९.	शेषं कोपेन पूरयेत्	२५७
४७०.	श्वः कार्यमद्य कुर्वीत्	२५७
४७१.	श्रद्धामयोऽयं पुरुषः	२५८
४७२.	श्रुतं हरति पापानि	२५८
४७३.	श्रुतानुभावो व्यसनं हि पुंसाम्	२५९
४७४.	षट्कर्णो भिद्यते मन्त्रः	२५९
४७५.	षड्विधं प्रीतिलक्षणम्	२६०
४७६.	स बाह्याभ्यन्तरः शुचिः	२६१
४७७.	सजीवं दहते चिन्ता	२६२
४७८.	सतां हि संदेहपदेषु वस्तुषु	२६२
४७९.	सत्यं वद । धर्मं चर	२६३
४८०.	सत्यमेव जयते नानृतम्	२६३
४८१.	सत्ये सर्वं प्रतिष्ठितम्	२६४
४८२.	सत्संगात् भवति हि साधुता खलानां	२६४
४८३.	सन्तः चारित्रभूषणाः	२६५
४८४.	समरे चापलायनम्	२६५
४८५.	समलोष्टाश्मकांचनः	२६६
४८६.	समानशीलव्यसनेषु सख्यम्	२६७
४८७.	सर्वदेवनमस्कारः . .	२६८
४८८.	सर्वं धर्मान् परित्यज्य	२६८
४८९.	सर्वं खल्विदं ब्रह्म	२६९
४९०.	सर्वं दुःखं सर्वं क्षणिकम्	२७०
४९१.	सर्वमात्मवशं सुखम्	२७०
४९२.	सर्वं विष्णुमयं जगत्	२७१
४९३.	सर्वारम्भास्तण्डुलप्रस्थमूलाः	२७१
४९४.	सर्वेऽत्र सुखिनः सन्तु	२७२
४९५.	सर्वे गुणा काञ्चनमाश्रयन्ते	२७३
४९६.	सर्वोपनिषदो गावो	२७३
४९७.	सहनाववतु सह नौ भुनक्तु	२७४
४९८.	सहस्रशीर्षा पुरुषः	२७४
४९९.	सहसा विदधीत न क्रियाम्	२७४
५००.	साहसे श्रीः प्रतिवसति	२७४
५०१.	सिद्धिर्भवति तादृशी	२७५
५०२.	सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता	२७५
५०३.	सुखं हि दुःखान्यनुभूय शोभते	२७५
५०४.	सुखार्थिनः कुतो विद्या	२७६
५०५.	सूतोवाच	२७६
५०६.	सूत्रं सूत्रविदो विदुः	२७७
५०७.	सूत्रे मणिगणा इव	२७७
५०८.	सूत्रस्येवास्ति मे गतिः	२७८
५०९.	सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च	२७८
५१०.	सेवाधर्मः परमगहनो	२७९
५११.	सं गच्छध्वम्	२८०
५१२.	संभवामि युगे युगे	२८०
५१३.	संशयात्मा विनश्यति	२८१
५१४.	संसारविषवृक्षस्य द्वे फले ह्यमृतोपमे	२८१
५१५.	संस्काराः प्राक्तना इव	२८२
५१६.	संस्कारात् द्विज उच्यते	२८२
५१७.	संस्कृतिः संस्कृताश्रिता	२८३
५१८.	संहतिः कार्यसाधिका	२८३

अ.	उक्तिविशेष	पृ.
५१९.	स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः	२८४
५२०.	स्वदेशे पूज्यते राजा	२८४
५२१.	स्वभावो दुरतिक्रमः	२८४
५२२.	स्वयमेव मृगेन्द्रता	२८४
५२३.	स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयति	२८५
५२४.	स्वयं हि तीर्थानि पुनन्ति सन्तः	२८६
५२५.	स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्	२८६
५२६.	स्थानभ्रष्टाः न शोभन्ते	२८७
५२७.	स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यम्	२८७
५२८.	स्थितः पृथिव्या इव मानदण्डः	२८७
५२९.	स्थितस्य गतिः चिन्तनीया	२८८
५३०.	स्थितिं नो रे दध्याः	२८८
५३१.	स्निग्धजनसंविभक्तं हि दुःखम्	२८९
५३२.	स्वे स्वे कर्मण्यभिरतः	२९०
५३३.	हरेर्नामैव नामैव नामैव मम जीवनम्	२९०
५३४.	हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्	२९१
५३५.	हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम्	२९१

राष्ट्रीय ज्ञानकोश : भाग पहिला

उक्तिविशेष-संस्कृत

(अ)

न हि नहि रक्षति डुकृञ् करणे

१. अङगं गलितं पलितं मुण्डम्

सं.– चर्पट ३. श्रीमत् आद्य शंकराचार्य काशीस गंगास्नानास जात होते. वाटेत त्यांना एक वृद्ध ब्राह्मण व्याकरणाचा पाठ घोकीत बसलेला आढळला. त्याची ती शोचनीय स्थिती पाहून आचार्यांनी त्याला व त्याच्या निमित्ताने सर्व संसारी माणसांना 'भज गोविन्दं भज गोविन्दं' असा उपदेश केला. आचार्यकृत 'चर्पटपञ्जरिका' स्तोत्रातील वृद्धावस्थेचे हे वर्णन प्रसिद्ध आहे.

मू. – अङगं गलितं पलितं मुण्डं दशनविहीनं जातं तुण्डम् ।
वृद्धो याति गृहीत्वा दण्डं तदपि न मुञ्चत्याशापिंडम् ॥

अ.– 'अवयव लुळे पडले, केस पांढरे झाले, तोंडातील दात पडून गेले, हातात काठी धरून (कष्टाने) चालतो, पण तरीही म्हाताऱ्या माणसाची (प्रपंचाची) आशा सुटत नाही.'
व्य. – काम करण्याची, सुखोपभोग घेण्याची इन्द्रियांची शक्ती नष्ट झाली तरी माणसाच्या आशा, वासना प्रबल असतात. त्यामुळे शेकडो वेळा दुःखाचा अनुभव घेऊनही मनुष्याला प्रपंचाचा कंटाळा येत नाही. संसाराचे नाशिवन्त स्वरूप जाणून घेऊन, त्यातून तरण्याचा उपाय शास्त्रामधून समजावून घ्यावा व भगवन्ताचे भजन करावे असा आचार्यांचा उपदेश आहे.

२. अंगुष्ठमात्रः पुरुषः

सं. – कठ. २. १. १२, १३; २. ३. १७. मृत्यूच्या पलीकडचे तत्त्व समजावून देताना यमधर्माने नचिकेत्याला प्रत्येकाच्या शरीरामध्ये असलेल्या जीवचैतन्याचे स्वरूप सांगितले.

मू. – अंगुष्ठमात्रः पुरुषो मध्य आत्मनि तिष्ठति ।
ईशानो भूतभव्यस्य न ततो विजुगुप्सते । एतद्वैतत् ॥

अ. – 'आंगठ्याच्या परिमाणाचा पुरुष शरीराच्या मध्यभागी राहातो. भूतकाल व भविष्यकालाचा (या कालातील सर्व वस्तूंचा) तो स्वामी आहे. (त्याला जाणून)

आपले रक्षण करण्याची इच्छा करीत नाही (नचिकेत्याने विचारलेले) ते हेच आहे.
व्य. – आत्मचैतन्य सर्व ठिकाणी आहे. पण त्याला जाणण्यासाठी विशिष्ट असे त्याचे स्थान सांगणे आवश्यक आहे. हृदयामध्ये त्याचे ध्यान करावे. तेथे प्रकाशरूपाने त्याचा अनुभव येऊ शकतो असे उपनिषद्कारांनी सांगितले आहे.

हृदयातील ते चैतन्य अगदी छोटचा आकाराचे, सूक्ष्म आहे तरीही ते सर्वांवर सत्ता चालविणारे तत्त्व आहे. एखादी वस्तू, व्यक्ती अगदी छोटी दिसत असूनही शक्तिमान्, प्रभावी असेल तर या शब्दांनी तिचा निर्देश केला जातो.

३. अग्निमीळे पुरोहितं

सं. – ऋग्. १. १. १. आर्यांना पूज्य असणाऱ्या अग्निदेवाच्या स्तुतीच्या या ऋचेने ऋग्वेदाचा प्रारंभ झाला.

मू. – **ॐ अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् । होतारं रत्नधातमम् ।।**

अ. –'यज्ञाचा (मुख्य) देव, अग्रभागी स्थापिलेला, ऋत्विज व होता (देवतांना आवाहन करणारा) व रत्नांचा साठा असलेल्या अग्नीचे मी स्तवन करतो.'
व्य. – अग्निपूजा अनादिकालापासून प्रचलित आहे. वैदिक आर्यांची ती मुख्य देवता होय. ऋग्वेदात इन्द्राखालोखाल अग्निविषयक सूक्ते आली आहेत. यज्ञात अग्नीमध्ये अर्पण केलेल्या आहुती तो देवांना पोचवितो; म्हणून त्याला 'दूत', 'देवांचे मुख,' 'पहिला देव' अशी सार्थ विशेषणे दिली आहेत. मानवी जीवनाशी व गृहसंस्थेशी त्याचा निकटचा संबंध आहे. म्हणून त्याला 'गृहपति' असेही म्हटले आहे; अग्नीच्या व्यापक स्वरूपाचे वर्णन वेदांत व उपनिषदांत सर्वत्र आढळते.

४. अग्ने नय सुपथा

सं. – ऋग्. १.१८९.१. अग्नि ही यज्ञाची मुख्य देवता. अग्नि प्रकाश आणि उष्णता देऊन रक्षण करणारा, समृद्धी देणारा आहे. अगस्त्य ऋषींची त्रिष्टुप् छंदातील ही ऋचा अग्निदेवाचे वर्णन करणारी व त्याचे स्तवन करणारी आहे.

मू. – **अग्ने नय सुपथा राये अस्मान्विश्वानि देव वयुनानि विद्वान् ।**
युयोध्य स्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठां ते नमउक्तिं विधेम ।।

अ. – 'हे अग्निदेवा,धनसंपत्ती मिळण्यासाठी आम्हाला योग्य मार्गाने ने. तू सर्व कर्मांचे रहस्य जाणणारा आहेस. आमच्या यज्ञानुष्ठानाला विघ्न आणणारे जे पाप असेल ते आम्हांपासून दूर कर. आम्ही तुझे, पुष्कळ मंत्ररूप नमस्कारांनी पूजन करतो.'
व्य. – अग्निपूजा हे वैदिक आर्य संस्कृतीचे वैशिष्टच आहे. यज्ञसंस्थेची उभारणी त्यावरच झालेली आहे. अग्नीचे आपल्याला दिसू शकणारे भौतिक स्वरूप, त्याचप्रमाणे

त्याचे दैवी स्वरूप, त्याची सर्वव्यापकता वैदिक ऋषींच्या चिंतनाचा विषय होती. अग्नीच्या कृपेने यज्ञाचे फल प्राप्त होईल असा त्यांचा विश्वास आहे. आज वरील शब्द आपल्याला तितके परिचित नसले तरी, वेगळ्या शब्दात आपण देवाची याच प्रकारे प्रार्थना करतो.

५. अतिपरिचयादवज्ञा

सं.–सुर. ३ सामान्यनीती ७२३. व्यवहारात संतोषाने, सन्मानाने जगता यावे यासाठी, वागणुकीचे अनेक नियम संस्कृत सुभाषितकारांनी सांगितले आहेत. त्यांतील व्यावहारिक शिकवण आचरणात आणणाऱ्याला त्यापासून निश्चित लाभ होईल.

मू. – अतिपरिचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति ।
मलये भिल्लपुरंध्री चन्दनतरुकाष्ठमिन्धनं कुरुते ॥

अ.– 'अतिपरिचयामुळे अपमान होतो. वारंवार एखाद्याकडे जाण्यामुळे अनादर होतो. मलय पर्वतावर राहाणाऱ्या भिल्ल स्त्रिया चंदनाच्या वृक्षाची लाकडे जळण म्हणून वापरतात.'

व्य. – एखादी वस्तू सतत उपलब्ध असली म्हणजे तिची किंमत वाटेनाशी होते; मग ती कितीही महत्त्वाची, मोलाची असो. असे होणे ही स्वाभाविक, नैसर्गिक गोष्ट आहे. स्वतःची किंमत राखावयाची असेल तर माणसाने दुसऱ्याशी अतिसंबंध टाळावा असे सुभाषितकारांना सुचवावयाचे आहे.

६. अतीयात्सागरो वेलाम्

सं. – वारा. २.११२.१८. रामाने राज्याचा स्वीकार करावा म्हणून आग्रह करणाऱ्या भरत, वसिष्ठ, जाबालि यांचा कोणताही युक्तिवाद रामाला स्वतःच्या प्रतिज्ञेपासून भ्रष्ट करू शकला नाही. रामाच्या भेटीसाठी भरत वनात आला तेव्हाचा हा प्रसंग आहे. राम म्हणाला :

मू. – लक्ष्मीश्चन्द्रादपेयाद्वा हिमवान्वा हिमं त्यजेत् ।
अतीयात्सागरो वेलां न प्रतिज्ञामहं पितुः ॥

अ. – 'एखादे वेळी चांदणे चंद्राला सोडून जाईल, हिमालय पर्वतावरचे बर्फ नाहीसे होईल किंवा समुद्र आपली मर्यादा उल्लंघून जाईल, पण मी आपल्या पित्याच्या वचनाचा त्याग करणार नाही.'

व्य. – रामाच्या रूपाने भारतीय संस्कृतीने निर्माण केलेला सत्यपालनाचा हा महान् आदर्श सर्व मानवजातीला सर्व कालांत मार्गदर्शक आहे.

७. अति सर्वत्र वर्जयेत्

सं. – सुर. ३. सामान्यनीती २०. व्यवहारात यशस्वी व्हावयाचे असेल, मानाने जगावयाचे असेल तर कसे वागावे याचे सोप्या आणि थोडक्या शब्दांत, पण प्रभावीपणे मार्गदर्शन करणारे हे सुभाषित आहे.

मू. – **अतिदानात् बलिर्बद्धः अतिमानात् सुयोधनः ।**
विनष्टो रावणो लौल्यात् अति सर्वत्र वर्जयेत् ॥

अ. – 'दानाच्या अतिरेकामुळे बली बंधनात पडला. (त्याला पाताळात जावे लागले.) अति गर्वामुळे दुर्योधन (मारला गेला.) फार लोभ धरल्यामुळे रावणाचा नाश झाला. म्हणून कोणत्याही बाबतीत अतिरेक टाळावा.'

व्य. – मनुष्याच्या प्रकृतीमध्ये गुण आणि दोष यांचे मिश्रण असते. त्यांपैकी एखाद्याचाच अतिरेक झाला, मनुष्य एका टोकाला गेला म्हणजे त्याचा तोल सुटतो, त्याचा सारासार विवेक नाहीसा होतो व त्याला खाली पडण्याची वेळ येते. व्यवहारात वागताना अनेक वेळा अतिरेकी माणसांना हा इशारा देण्याची वेळ येते.

८. अतिस्नेहः पापशङ्की

सं. – शाकुं. ४. दुष्यंताकडे निघालेल्या शकुंतलेला निरोप देताना तिच्या सख्या प्रियंवदा आणि अनसूया, तिला राजाने दिलेली आंगठी जपण्यास सांगतात. 'राजाला ओळख पटली नाही तर ही आंगठी त्याला दाखव' असे बजावतात. दुर्वासांचा शाप शकुंतलेला माहीत नसल्यामुळे मैत्रिणींच्या शंकेमुळे तिला भीती वाटते. सख्या तिची समजूत घालतात.

मू. – **मा भैषीः । अतिस्नेहः पापशङ्की ॥**

अ. – 'भिऊ नकोस. अति प्रेम असले म्हणजे नको त्या कल्पना मनात येतात.'

व्य. – बाहेर गेलेल्या मुलाला घरी परतायला थोडासा जरी उशीर झाला तरी आईच्या मनात नाना शंका उत्पन्न होतात. प्रेमाच्या, जिव्हाळ्याच्या माणसाला सुखी ठेवण्याची, जपण्याची जी स्वाभाविक वृत्ती असते, तिच्या पोटी हळव्या झालेल्या मनाची अशी अवस्था होते. सर्वांच्याच अनुभवाला येणारी ही भावनेची छटा कालिदासाने अगदी थोडक्या पण रेखीव शब्दांत प्रकट केली आहे.

९. अन्ते मतिः सा गतिः

सं. – लोकोक्ती. मरणकाळी अखेरच्या क्षणी मनुष्याच्या मनात जी इच्छा उत्पन्न होते त्याप्रमाणे त्याला पुढील जन्म प्राप्त होतो, अशी समजूत आहे. ही समजूत दृढमूल होण्यास गीता (८.५) कारण आहे.

मू. – अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ।।

अ. – 'मृत्युसमयी माझेच स्मरण करीत जो देह सोडतो तो निश्चितच मला येऊन मिळतो, यात शंका नाही.'

व्य. – मृत्यू ही आयुष्याची अखेर आहे. आयुष्यभर केलेल्या कर्माचीच मनुष्याला अन्तकाळीही आठवण होणार. या अखेरच्या इच्छेवरून त्याचा पुढील जन्म ठरवला जातो असे मानतात. म्हणून श्रीकृष्णाने अंतकाळी त्याचे स्मरण होण्यासाठी आयुष्यभर तशी उपासना करण्यास गीतेद्वारा सांगितले आहे.

१०. अथातो ब्रह्मजिज्ञासा

सं. – ब्रसू. १.१.१. बादरायण व्यासांनी रचलेल्या वेदान्तशास्त्राच्या मुख्य, आधारभूत ग्रंथातील हे पहिलेच सूत्र. ज्ञानकांडाचा प्रारंभ ब्रह्मविषयक जिज्ञासेने झाला.

मू. – अथातो ब्रह्मजिज्ञासा ।

अ. – 'आता, या कारणास्तव, 'ब्रह्म' जाणून घेण्याची इच्छा (करावी).'

व्य. – कमीत कमी शब्दांत अधिकात अधिक अर्थ सूचित करणे हे सूत्राचे स्वरूप आहे. प्रत्येक शब्दामागे अर्थाचा विशाल पार्श्व उभा असतो. वरील सूत्रात 'अथ' – आता यानंतर – या शब्दांनी ब्रह्मजिज्ञासा कोणी करावी हे सुचविले आहे. विवेक, वैराग्य, शमदमादी षट्संपत्ती व मुमुक्षा ही चार साधने आचरणात आणल्यानंतर, मनुष्य ब्रह्मजिज्ञासेचा अधिकारी होतो. 'अत:'– म्हणून, या कारणासाठी--या शब्दाने ब्रह्मजिज्ञासेचा हेतू दाखविला आहे. कर्माने प्राप्त होणारे फल नाशिवंत आहे व ब्रह्मज्ञानाशिवाय शाश्वत आनंदाचा लाभ होणार नाही म्हणून, ब्रह्म जाणून घ्यावे, असे म्हटले आहे. एखाद्या नवीन, महत्त्वाच्या कार्याला प्रारंभ करताना किंवा महत्त्वाच्या विषयाच्या चर्चेची, शास्त्राभ्यासाची सुरुवात करताना 'अथातो . . . जिज्ञासा' असे म्हणण्याची पद्धत पडून गेली आहे ती या सूत्रावरून.

११. अर्थस्य पुरुषो दासः

सं. –महा. ६. ४१. ३६, ५१, ७७. युद्धाला प्रारंभ होण्यापूर्वी गुरूंना वंदन करण्यासाठी युधिष्ठिर गेला असता भीष्मांनी त्याला सुयश चिंतिले. तसेच आपण स्वत: दुर्योधनाच्या बाजूने का लढणार त्याचे कारण सांगितले.

मू. – अर्थस्य पुरुषो दासो दासस्त्वर्थो न कस्यचित् ।
इति सत्यं महाराज बद्धोऽस्म्यर्थेन कौरवैः ।।

अ. – 'मनुष्य अर्थाचा गुलाम असतो, पण द्रव्य कोणाचाच दास होत नाही. हे महाराजा, हे सारे सत्य आहे. कौरवांनी मला द्रव्य देऊन बांधून टाकले आहे.'

व्य. – द्रव्याने कोणालाही वश करून घेता येते. आजही द्रव्याने वाटेल ती गोष्ट आपल्या बाजूला वळवून घेतल्याचे व्यवहारात दृष्टोत्पत्तीस पडते. सत्यापेक्षा ज्याच्या-जवळ पैसा असेल त्याला सारे काही जिंकता येईल. महाभारतकाळीही भीष्मद्रोणा-सारख्या नि:स्पृह, वृद्ध व थोर विचारवंतांना पण निष्णात लढवय्यांना पैसे देऊन दुर्योधनाने आपलेसे करून घेतल्याने द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळीही या गुरुवर्यांना मौन पत्करण्याशिवाय पर्याय उरला नाही. आजही द्रव्याच्या बळावरच सगळी कामे उरकता येतात. म्हणूनच भीष्मादिकांची ही उक्ती म्हणजे एक त्रिकालाबाधित सत्य आहे.

१२. अर्थातुराणां न गुरुर्न बन्धुः

सं.–सुर. ३. सामान्यनीती ८४५० मनुष्यस्वभावाच्या विविध छटांचे व त्याच्या इतरांशी होणाऱ्या व्यवहाराचे बारीक निरीक्षण सुभाषितकारांनी केलेले आहे. त्याविषयीचे सिद्धांत त्यांनी अगदी सोप्या व सुटसुटीत शब्दांत मांडले आहेत.

मू. – अर्थातुराणां न गुरुर्न बन्धुः कामातुराणां न भयं न लज्जा ।
विद्यातुराणां न सुखं न निद्रा क्षुधातुराणां न रुचिर्न वेला ।।

अ.– 'पैशाच्या लोभा ने अधीर झालेल्यांना, गुरू (दिसत) नाही की बंधूही नाही. काम-विकाराच्या तृप्तीसाठी आतुर झालेल्यांना, कोणाची भीती वाटत नाही की कशाची लाज वाटत नाही. विद्या प्राप्त करून घेण्यासाठी तळमळणाऱ्याला सुखाची पर्वा नसते की झोपेची नसते. भुकेने व्याकुळ झालेल्यांना चव किंवा वेळ (यांचा विचार) नसतो.'
व्य.– काम आणि पैशाचा लोभ यांचा पगडा मनावर बसला की पाप-पुण्याचा विचार, आदर, आपुलकी या सर्वांचा क्षणार्धात विसर पडतो.

१३. अद्वेष्टा सर्वभूतानाम्

सं.– भगी. १२. १३. समत्व पावलेला, भक्तिमान, ज्ञानी पुरुषाचा 'आचार' श्रीकृष्णाने या श्लोकापासून सांगितला आहे.

मू. – अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ।।

अ. – 'कोणाचाही द्वेष न करणारा, सर्व प्राणिमात्रांशी मित्रत्वाने वागणारा, तसाच कृपाळू, ज्याची ममत्वबुद्धी व अहंकार सुटला, ज्याला सुख व दु:ख समान वाटली. (सुखाने अति हर्ष झाला नाही वा दु:खाने खचला नाही असा क्षमाशील भक्त मला प्रिय होय).'

व्य. – निष्कामबुद्धीने कर्माचरण करणाराच भक्त श्रेष्ठ होतो. विरागी वृत्तीने फलाशा सोडून प्राणिमात्राशी आत्मीयतेने वागणारा भक्तच भगवंताला प्रिय असतो.

सर्वसामान्यांना आचार शिकविणारी गीता असल्याने, लोकांनी निरपेक्षबुद्धीने व्यवहार करावा अशी श्रीकृष्णाची इच्छाच यात व्यक्त होते. रागद्वेषरहित अशा थोर पुरुषाचे आजही या शब्दांत वर्णन केले जाते.

१४. अधिकस्याधिकं फलम्

सं. – लोकोक्ती. जितके प्रयत्न अधिक कसोशीने केले जातील तितके यश निश्चित असा जगाचा न्यायच आहे.

मू. – लेखनी सर्ववर्णेषु विधिना निर्मिता पुरा ।
नवांगुलप्रमाणेन अधिकस्याधिकं फलम् ।।

अ.– 'पूर्वी ब्रह्मदेवाने सर्व लोकांसाठी नऊ बोटे लांब लेखणी निर्माण केली. अधिक लांब असली तर अधिक फलदायी होईल.' (या शब्दशः अर्थापेक्षा 'नवांगुलप्रमाण असलेल्या लेखणीचा जितका उपयोग साहित्यनिर्मितीकरिता करावा तितकी अधिक फलदायी' हा अर्थ उचित वाटतो).

व्य. – एखादी गोष्ट मिळविण्याकरिता किंवा एखादे कार्य पूर्ण करण्यासाठी जितक्या हिरीरीने प्रयत्न करता येतील तितके करावेत. त्यामुळे इच्छित प्राप्त होण्यात सफलता येते. व्यवहारातही 'दुधात साखर' पडल्यास त्याची गोडी अवीट असते. तद्वत कार्यसिद्धीसाठी नेहमीच्या साधनांसह इतरही उपलब्ध साधनांचाही उपयोग केल्यास कार्य लवकर सिद्धीस जाते. म्हणून अधिक कार्य करण्यास प्रेरणा देणारा हा मंत्र आहे.

१५. अर्धं त्यजति पण्डितः

सं. – पंच. ४.२८. लब्धप्रणाश तंत्रात गंगदत्त नामक बेडकाने आपल्या शत्रूंचा नाश करण्यासाठी हाडवैर असलेल्या सर्पाची मदत घेतली. तो सर्पच गंगदत्ताच्या कुलनाशाला कारणीभूत झाला.

पंच. ५.४२. विद्याभ्यास पूर्ण केल्यावर घराकडे परतणाऱ्या चार ब्राह्मणपुत्रांपैकी एकजण नदीत वाहून जाऊ लागला. त्या वेळी इतर तिघा मूर्ख ब्राह्मणपुत्रांनी म्हटले. :

मू. –सर्वनाशे समुत्पन्ने अर्धं त्यजति पण्डितः ।
अर्धेन कुरुते कार्यं सर्वनाशो हि दुस्तरः ।।

(दोन्ही ठिकाणी श्लोक सारखेच,)

अ. –'शहाणी व्यक्ती संपूर्ण नाश ओढवला असता अर्धा (लाभ) सोडून देते. उरलेल्या अर्ध्या (लाभावरच समाधान मानते). फलानेच आपला कार्यभाग साधते. कारण सर्वस्वनाश सहन करणे असह्य असते.'

१८. अनामिका सार्थवती बभूव

सं. – सुर. २. विशिष्टकविप्रशंसा ७. कालिदासाचे श्रेष्ठत्व वर्णिताना या पद्यपंक्ती दिलेल्या आहेत. कुवलयानंदकार अप्पय दीक्षितांनी 'कुवलयानंदा'तही (१६४) याचा उल्लेख केला आहे.

मू. – पुरा कवीनां गणनाप्रसङ्गे कनिष्ठिकाधिष्ठित कालिदासः।
अद्यापि तत्तुल्यकवेरभावात् अनामिका सार्थवती बभूव ।।

अ. – 'पूर्वी एकदा कवींची गणना करताना (क्रम लावताना) कालिदासाच्या नावाने करंगळी घातली (वळवली). अजून त्याच्या तोडीचा कवीच झाला नसल्याने (करंगळीशेजारच्या) बोटाला अनामिका हे नाव (नाव नसलेली) यथार्थ ठरले'.

व्य. – सर्वश्रेष्ठ व्यक्ती एखादीच असते. दुसरीला तिची बरोबरी करता येत नाही. म्हणून ज्ञानाच्या विविध विषयांतील तज्ञ व्यक्तींचा क्रम ठरविताना अनामिकेची यथार्थता जाणवते. व्यवहारात एखाद्याची अनुपमेयता वर्णिताना ही पदावली योजिली जाते.

१९. अनायासेन मरणम्

सं. – लोकोक्ती. मनुष्य वृद्ध झाल्यावर त्रास न होता त्याला मरण यावे अशी प्रत्येकाची इच्छा असते. खितपत पडल्याशिवाय सहजी मरण यावे असे वाटत असते. तसेच जोवर जगायचे तोवर याचना करावी लागू नये एवढेच मागणे असते.

मू. – अनायासेन मरणं विना दैन्येन जीवनं ।
देहि मे कृपया देव त्वयि भक्ति निरन्तरम् ।।

अ. – 'कष्ट न होता मृत्यू व्हावा. जीवनात याचना करण्याची वेळ येऊ नये. तसेच देवा, तुझ्या ठायी माझी दृढ भक्ती नित्य राहावी.'

व्य. – सर्वसामान्य माणसाची किमान सुखाची ही कल्पना आहे. मानी व्यक्तीला याचनेचे दु:ख मोठे वाटते. तसेच परावलंबी होऊन दुसऱ्याकडून सेवा करून घेण्यातही त्यांना कमीपणा वाटतो. म्हणूनच व्यवहारात प्रत्येकजण परमेश्वराजवळ विनासायासाचे मरण यावे अशीच प्रार्थना करतो. भीष्माचार्यांनीही हाच वर मागितला होता.

२०. अनिर्वेदः श्रियो मूलम्

सं. – वारा. ५.१२.१०. लंकेत गेल्यानंतर बराच वेळ शोध करूनही सीता मारुतीच्या दृष्टीस पडेना. मारुतीच्या मनात अनेक अशुभ शंका येऊ लागल्या. समुद्रोल्लंघनाचे आपले श्रम व्यर्थ गेले की काय असे वाटून तो हताश झाला. पण पुन: धीर बांधून सीतेचा शोध करण्यास सिद्ध झाला.

व्य. – सर्वच हातचे जाण्यापेक्षा थोडक्यात निभावल्यास बरे होईल. याच विचाराने सामान्य माणसेही वेळप्रसंगी थोडी हानी सोसून आपले रक्षण करतात.

१६. अनन्तानीह दुःखानि

सं. – योवा. २.१३.२३. 'मुमुक्षुव्यवहार' प्रकरणात 'शमनिरूपण' करताना वसिष्ठांनी रामाला संसाराच्या स्वरूपाचा विचार करण्यास सांगितले.

मू. – अनन्तानीह दुःखानि सुखं तृणलवोपमम् ।
नातः सुखेषु बध्नीयात् दृष्टिं दुःखानुबन्धिषु ॥

अ.– 'या जगात दुःखे अगणित आहेत आणि सुख गवताच्या लहानशा काडीएवढे आहे. म्हणून परिणामी दुःखरूप असणाऱ्या सुखाकडे माणसाने दृष्टी लावू नये. (सुखाची आशा करू नये.)'

व्य. – 'सुख पाहता जवापाडे दुःख पर्वताएवढे' असा या जगातील सुखदुःखांचा हिशेब आहे. हा अनुभव सुखासाठी धडपडणाऱ्या माणसाला क्षणाक्षणाला येत असतो. तरीही दुःखाचा नाश करण्याचा खरा उपाय कोणता याचा विचार तो करीत नाही. शास्त्र आणि गुरुजन त्याला जाग आणण्याचा निरंतर प्रयत्न करीत असतात.

१७. अनन्तपारं किल शब्दशास्त्रम्

सं. – पंच. ९. कथामुख प्रकरणात 'पंचतंत्र'कार विष्णुशर्म्याने आपल्या ग्रंथाचे प्रयोजन सांगितले आहे. थोडक्या काळात पुष्कळ गोष्टींचे ज्ञान व्हावे हेच 'पंचतंत्रा'चे उद्दिष्ट मानले आहे. कारण....

मू. – अनन्तपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथाऽऽयुर्बहवश्च विघ्नाः ।
सारं ततो ग्राह्यमपास्य फल्गु हंसैर्यथा क्षीरमिवाम्बुमध्यात् ॥

अ.– 'शब्दशास्त्राला मर्यादा नाही, ते अपार आहे. आयुष्य कमी आहे. (त्यातही) अनेक प्रकारची विघ्ने येतात. म्हणून ज्यात काही तथ्य (सार) असेल तेवढेच स्वीकारावे, बाकीचे सोडून द्यावे. जसे (विवेकी) हंस जलमिश्रित दुधातून केवळ दूध घेऊन पाणी तसेच ठेवतो, तद्वत सारवाङ्मयाचेच ग्रहण करावे.'

व्य. – मानवी जीवन फार थोड्या वर्षांचे असते. त्या मानाने संपूर्ण शब्दशास्त्र वा अनेक शास्त्रांचे ग्रहण करणे अशक्य आहे. म्हणून हंसक्षीरन्यायाने सार असेल तेवढेच घ्यावे. कारण तेच करणे शक्य होईल व उचितही ठरेल. किंबहुना तत्त्वाचाच स्वीकार करण्याने अध्ययनाचा हेतू सफल होईल.

महा. ५.३९.४४. 'विदुरनीती' या नावाने प्रसिद्ध असलेला विदुराचा धृतराष्ट्राला उपदेश 'आत्मकल्याणाची इच्छा करणाऱ्याने अखंड, न कंटाळता उद्योग करावा' अशाच प्रकारचा आहे.

पंच. १.३५९. टिटव्याच्या जोडप्याची अंडी समुद्राने वुडविली तेव्हा ती परत मिळविण्यासाठी, चोचीनें पाणी काढून समुद्र सुकवून टाकण्याची प्रतिज्ञा टिटव्याने केली. ही अशक्य गोष्ट उत्साह व परिश्रम यांच्या योगाने मी साध्य करीन, असे त्याने सांगितले.

मू. – अनिर्वेदः श्रियो मूलमनिर्वेदः परं सुखम् ।
भूयस्तत्र विचेष्यामि न यत्र विचयः कृतः ।। वारा. ५. १२. १०.

अ.–'उत्साह हे ऐश्वर्याचे कारण आहे. अंगी उत्साह असणे हे उत्कृष्ट सुखाचे मूळ आहे; म्हणून आतापर्यंत ज्या ठिकाणी मी शोध केला नाही त्या ठिकाणी पुन्हा शोधून पाहीन.'

मू. – अनिर्वेदः श्रियो मूलं दुःखनाशे सुखस्य च ।
महान्भवत्यनिर्विण्णः सुखं चात्यन्तमश्नुते ।। महा. ५.३९.४४.

अ. – 'उत्साह ऐश्वर्याचे मूळ कारण आहे. दुःखाचा शेवट होऊन (उत्साहामुळेच) सुखप्राप्ती होते. श्रेष्ठ (लोक) निराश न होता (प्रयत्न करीत राहिल्याने) अत्यंत सुखाचा उपभोग घेतात.'

मू. – अनिर्वेदः श्रियो मूलं चञ्चुर्मे लोहसंनिभा ।
अहोरात्राणि दीर्घाणि समुद्रः किं न शुष्यति ।। पंच. १.३५९.

अ. – 'उत्साह हेच ऐश्वर्याचे कारण आहे. माझी चोच लोखंडासारखी कठीण आहे. दिवस व रात्र मोठे आहेत (पुष्कळ वेळ आहे). येवढ्यात समुद्र सुकणार नाही काय ?'

व्य. – बाहेरच्या साधनसामुग्रीपेक्षा उत्साह, चिकाटी हे व्यक्तिगत गुण माणसाच्या उत्कर्षाला कारण होतात. समाजात थोरपदी चढलेल्या, वैभवसंपन्न व्यक्तींच्या उदाहरणावरून, अनेक अडचणींवर मात करणारा त्यांचा अमाप उत्साह व चिकाटी, हेच त्यांचे मूळ भांडवल होते, असे दिसून येते.

वरील वचन अनेक ग्रंथांतील श्लोकांत आले आहे. तेथील संदर्भाला अनुसरून श्लोकाच्या उरलेल्या चरणात फरक आढळतो.

२१. अनुद्वेगः श्रियो मूलम्

सं. – योवा. ३.१११.२२. चित्ताचे स्वरूप व त्याला जिंकण्याचे उपाय सांगताना वसिष्ठांनी रामाला विवेक व स्थैर्य इत्यादींच्या साहाय्याने सतत प्रयत्न करण्याचा उपदेश केला.

मू. – अनुद्वेगः श्रियो मूलमनुद्वेगात्प्रवर्तते ।
जन्तो मनोजयो येन त्रिलोकीविजयस्तृणम् ।।

अ. – 'उत्साह हे संपदेचे कारण आहे. अनुद्वेगामुळे—उत्साहामुळे मनुष्याला मनोविजय साधता येतो की ज्यामुळे (मनोविजयामुळे) त्रैलोक्यावर मिळविलेला विजय म्हणजे गवताची काडी होय. (गवताच्या काडीसारखा क्षुद्र आहे.)'

व्य. – वायूसारखे चंचल मन जिंकणे अत्यंत कठीण आहे. 'चंचलं हि मनः कृष्ण . . . वायोरिव सुदुष्करम्' ही अर्जुनाने केलेली तक्रार (भगी. ६ . ३४) रास्त आहे, असा सर्वांचा अनुभव आहे. व्यवहारातही एखादी गोष्ट साध्य करून घेण्यासाठी, न कंटाळता परिश्रम करावे लागतात. तसे करताना निराश होऊन प्रयत्न सोडून द्यावेत असे माणसाला अनेक वेळा वाटते. नशिबाकडेही तो बोट दाखवितो. वसिष्ठांनी येथे प्रयत्नवादाला विशेष महत्त्व दिले आहे.

२२. अनृणी चाप्रवासी च

सं.– महा. ३. प्रवि. ३२.६२. यक्षप्रश्न नावाने प्रसिद्ध असलेल्या यक्ष-युधिष्ठिर संवादात 'सुखी कोण ?' या यक्षाच्या प्रश्नावर युधिष्ठिराने उत्तर दिले. निष्कर्जी व प्रवास ज्याला करावा लागत नाही, तो सुखी मानला आहे.

मू. – पञ्चमेऽहनि षष्ठे वा शाकं पचति स्वे गृहे ।
अनृणी चाप्रवासी च स वारिचर मोदते ।।

अ. – 'प्रत्येक (सप्ताहात) पाचव्या किंवा सहाव्या दिवशी (का होईना पण) स्वतःच्या घरी असेल तो भाजीपाला शिजवून त्यावरच निर्वाह करतो, जो कधी ऋण काढीत नाही आणि कधी प्रवास करीत नाही तो सदा आनंदी असतो.'

व्य.– ज्याला कर्जाची विवंचना नसते, तसेच प्रवास करण्याची वेळ ज्याच्यावर येत नाही तो सुखी असतो. कर्ज असणे हा सामाजिक दृष्टचा कमीपणा मानला जातो. त्यामुळे ज्याच्यामागे कर्जदाराचा तगादा नसेल त्याला साहजिकच सुखी समजतात. त्याचप्रमाणे पूर्वी प्रवासाची साधने फारशी नसल्याने प्रवास अत्यंत त्रासाचा, प्रसंगी धोकादायक होत असे. हल्ली प्रवासाच्या सोई पुष्कळच वाढल्या तरी आजही प्रवासात गैरसोय होण्याचा वा संकटात सापडण्याचा धोका टळलेला नाही. म्हणूनच सध्याच्या काळातही व्यवहारात निष्कर्जी आणि प्रवासाचे प्रसंग न येणाऱ्या माणसाला सुखीच मानले पाहिजे.

२३. अन्नदाता (अन्नदातः) सुखी भव

सं. – लोकोक्ती. पूर्वीपासूनच अन्नदानाला विशेष महत्त्व दिलेले आहे. अन्न हे पूर्णब्रह्म. अन्नापासूनच सर्व प्राणिमात्रांचे पोषण होत असल्याने ते देणाऱ्या यजमानाला सुख-

प्राप्तीचा आशीर्वाद साहजिकच दिला जातो. लोकांच्या तोंडी 'अन्नदाता सुखी भव' असेच आहे; परंतु व्याकरणदृष्टचा 'अन्नदातः' हवे.

मू. – अन्नदातः सुखी भव ।।

अ.– 'हे अन्न देणाऱ्या (यजमाना) तू सुखी हो.'

व्य.– गुन्हेगार माणूसही खाल्ल्या अन्नाला जागतो; मग जो सज्जन आहे त्याने जर यजमानाचे भले चिंतिले तर नवल नाही. ज्याने वैश्वानर तृप्त केला त्याला सुख लाभावे अशी कृतज्ञतेची भावना यातून प्रकट होते. अन्नदात्याप्रमाणेच स्वयंपाक करणारा (पाककर्ता) व जेवणारा (तथा भोक्ता सुखी भव) यांनाही सुख लाभावे, असे म्हणण्याचा प्रघात आहे.

२४. अप्रियस्य च पथ्यस्य

सं. – वारा. ३.३७.२. रामाशी कपट करून सीतेला पळवून नेण्याच्या योजनेत रावणाने मारीच राक्षसाचे साहाय्य घेतले. मारीचाने त्याला हिताचे शब्द ऐकवून, अविचारापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला, तो प्रसंग. त्या वेळी मारीच हे बोलला.

महा. ५.३७.१५. प्रजागरपर्वात विदुर धृतराष्ट्राला सल्ला देत असताना त्याने हे उद्गार काढले आहेत.

सप. अ. ६५.

मू. – सुलभाः पुरुषा राजन् सततं प्रियवादिनः ।
अप्रियस्य च पथ्यस्य वक्ता श्रोता च दुर्लभः ।।

अ. – 'नेहमी गोड बोलणारी माणसे सहज भेटतात. मात्र कटु परंतु हितकारक सत्य गोष्ट सांगणारा व ती ऐकून घेणारा मनुष्य आढळणे कठीण.'

अप्रियस्यापि पथ्यस्य परिणामः सुखावहः ।
वक्ता श्रोता च यत्रास्ति रमन्ते तत्र संपदः ।।

(दोन्ही ठिकाणी श्लोक सारखाच.)

अ.–'कटू (ऐकायला) परंतु हितकारी बोलणे शेवटी सुखदायक होते. (असे हितावह) बोलणारा व ऐकणारा (त्यापासूय बोध घेणारा) जेथे असेल तेथे लक्ष्मी स्थिर राहाते.'

व्य. – स्तुती, गोड बोलणे, माणसाला नेहमीच प्रिय असते. 'न ब्रूयात् सत्यमप्रियम्' असा सर्वसाधारण नियमही मनूने सांगितला आहे. व्यवहारात माणसे हाच नियम ध्यानात घेऊन वागतात. परंतु दुसऱ्याच्या हिताची खरी तळमळ ज्याला असेल आणि

जो भीती व स्वार्थ यापासून मुक्त असेल तोच कटु सत्य बोलून दाखवितो, दुसऱ्याची चूक त्याच्या दृष्टीपुढे आणतो; आणि स्वहिताची तळमळ ज्याला असेल तोच ते सत्य ऐकून योग्य तो बोध घेतो.

२५. अबला यत्र प्रबला

सं. –सुर. ३. सामान्यनीती ७४७. योग्य व्यक्ती योग्य ठिकाणी नसेल तर सर्वच कारभार विस्कळित व बेशिस्त होतो. हे व्यवहारात दिसणारे चित्र सुभाषितकारांनी येथे दाखविले आहे.

मू. – अबला यत्र प्रबला शिशुर्विनीतो§ निरक्षरो मन्त्री ।
नहि नहि तत्र धनाशा जीवितआशापि दुर्लभा भवति।।

§ **बालो राजा** (पाठभेद).

अ. – स्त्रिया जेथे अधिकार गाजवतात, लहान पोरे उद्धट असतात, ज्या (राज्यातील) मन्त्री अशिक्षित असतो, त्या ठिकाणी धन मिळण्याची आशा नाही, इतकेच नाही तर जगण्याची आशा (धरणेही) कठीण आहे.'

§'बालो राजा' हाच पाठ अधिक सुसंगत व सयुक्तिक वाटतो. कारण ज्या राज्याचा धनी वयाने लहान किंवा दुसऱ्या अर्थाने बाल म्हणजे अनभिज्ञ व न शिकलेला, संस्कार न झालेला असेल ते राज्य कोणाला सुखावह होणार ? बाल राजाचा अधिकार नाममात्र आणि त्याच्या नावाने अज्ञानपालक म्हणून सत्ता गाजविणारी राजस्त्री अथवा मंत्री यांच्याच हाती सारा कारभार. तो अनियंत्रित व जुलमी होणे हेच अधिक संभवनीय.

व्य. – अराजकाला आमंत्रण करणाऱ्या परिस्थितीची जी लक्षणे आहेत, त्यात वरील सुभाषितात वर्णन केलेली सर्व लक्षणे येतात. अहिल्याबाई होळकर, थोरले माधवराव पेशवे, शिवाजी राजे यांची नावे या दृष्टीने अपवाद म्हणून घ्यावी लागतील. बाकी इतिहास पाहिला तर सुभाषितकाराने सांगितलेलीच वस्तुस्थिती प्रत्ययाला येते. आणि ती पाहूनच वरील सुभाषित माणसाच्या तोंडून बाहेर पडते.

२६. अरसिकेषु कवित्वनिवेदनम्

सं. – सुर. २. कुपण्डितनिन्दा ४७. बुद्धी ही पशूहून माणसांना वेगळे करणारी विशेष देणगी आहे. तिचा उपयोग न करणाऱ्या माणसांची सुभाषितकारांनी निंदा केली आहे. कारण अशा माणसांच्या संगतीत सुबुद्ध माणसांना उद्वेग व दुःख करण्याची वेळ येते.

मू. – इतरकर्मफलानि यदृच्छया§ विलिख तानि सहे चतुरानन ।
अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख ।।

§ **निजेच्छया, स्वेच्छया** (पाठभेद)

अ. –'हे ब्रह्मदेवा, तुझ्या इच्छेप्रमाणे शेकडो इतर कर्मांची फळे लिही, ती मी सहन करीन. पण अरसिक मनुष्यापुढे काव्य वाचण्याच्या (कर्माचे फळ) माझ्या कपाळी लिहू नकोस, अशी तुला त्रिवार प्रार्थना आहे.'

व्य. –'वक्ता तो नोहे श्रोतेविण' असे म्हणून ज्ञानेश्वरांनी श्रोत्यांची भलावण केली आहे. कवीला रसिक श्रोता मिळणे हेच त्याच्या कवित्वाचे सार्थक आहे. जाणकार, मार्मिक श्रोत्यांमुळे कविप्रतिभेला बहर येतो. भवभूतीसारखा श्रेष्ठ नाटककार रसिक श्रोत्यांची वर्षानुवर्षे वाट पाहात थांबायला तयार झाला. आपल्या कलेचे मर्म जाणणारा रसिक भेटणे ही सर्वोत्तम भाग्याची गोष्ट; तर निर्बुद्ध, गुणांची पारख नसलेल्या माणसापुढे आपली कलाकृती ठेवण्याची वेळ येणे, हे आपले मोठे दुर्भाग्य असे कलावंताला वाटते. एखाद्या अडाण्यापुढे बोलायचा प्रसंग आला म्हणजे कपाळावर हात मारून सामान्य माणसालाही 'अरसिकेषु. . .' असे म्हणावेसे वाटते. 'गाढवापुढे वाचली गीता नि कालचा गोंधळ बरा होता' ही मराठी म्हण याच अर्थाने पडलेली असावी.

२७. अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छन्

सं. – रघु. २.४७. कुलगुरू वसिष्ठांची नंदिनी नामक गाय सिंहमुखातून सोडविण्यासाठी दिलीप राजाने सिंहाला स्वदेह अर्पण केला. त्या वेळी सिंहाने त्याचा उपहास केला, तो या शब्दांत :

मू.– **एकातपत्रं जगतः प्रभुत्वं नवं वयः कान्तमिदं वपुश्च ।**
अल्पस्य हेतोर्बहुहातुमिच्छन्विचारमूढः प्रतिभासि मे त्वम् ॥

अ. – 'अरे, सर्व जगावर एकछत्री साम्राज्य, तरुण वय आणि रूपसंपन्न देह या सर्व गोष्टींचा एका (क्षुद्र) गोष्टीकरिता त्याग करण्यास तू सिद्ध झालास, हे तुझे करणे मला खरोखर मूर्खपणाचे वाटते.'

व्य. – सिंहाचा हा युक्तिवाद राजाला पटला नाही. कारण देहापेक्षाही लौकिकाला अधिक महत्त्व देणारा तो दिलीप राजा होता. सर्वसामान्यांना प्रिय वाटणारा प्राण, धीरोदात्त व्यक्ती आपल्या तत्त्वापेक्षा महत्त्वाचा मानीत नाहीत. तत्त्वापेक्षा प्राण प्रिय मानणाऱ्या सर्वसामान्यांची वृत्तीच सिंहमुखाने प्रगट झाली आहे.

२८. अविद्यया मृत्युं तीर्त्वा

(पाहा : विद्ययाऽमृतमश्नुते)

सं.– ईश. ११. कर्म व उपासना या दोन्हींच्या अनुष्ठानाने मानवाला अमृतत्व प्राप्त होते. विद्या व अविद्या दोहोंचा योग झाल्यास मृत्यूचे उल्लंघन व अमृतत्व प्राप्ती दोन्ही साधतात.

मू.– विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह ।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥

अ.–'विद्या (देवताज्ञान) आणि अविद्या (कर्म) या दोन्हींचे एकाच वेळी आचरण केले पाहिजे असे जो जाणतो तो कर्माच्या द्वारा मरणाच्या पलिकडे (जन्ममृत्यूचा फेरा चुकवून) जातो व देवताज्ञानाने (देवतेचे खरे स्वरूप ओळखल्याने) अमृतत्व प्राप्त करून घेतो (देवस्वरूप होतो).'

व्य.– कर्मविपाक ही भारतीय तत्त्वज्ञानातील महत्त्वपूर्ण कल्पना आहे. कृतकर्माचा भोग निष्कामबुद्धीने 'ठेविले अनंते' वृत्तीने स्वीकारल्यास या जन्मी केली जाणारी कर्मे बंधक होत नाही. पर्यायाने मनुष्य संसारचक्रातून सुटतो. त्यासाठी उपासनेचीही आवश्यकता आहे. मनाची निर्लेप अवस्था राहाण्यासाठी परमेश्वराचे चिंतन उपयुक्त होते. त्याद्वारा मानवास आपले मूळ स्वरूप कळून तो त्यात एकरूप होतो. व्यवहारातील नेहमीचे विद्या-अविद्या हे विरुद्धार्थी शब्द नसून तत्त्वज्ञानात विद्या म्हणजे आत्मज्ञान व अविद्या म्हणजे कर्म होत. त्या पारिभाषिक अर्थाने येथे विद्या व अविद्या यांचे अर्थ लक्षात घेतले पाहिजेत.

२९. अविवेकः परमापदां पदम्

(पाहा : गुणलुब्धाः स्वयमेव संपदः)

सं.– किरा. २. ३०. द्यूतात हरलेले पांडव वनवासाला गेले. तेथे कौरवांबद्दल उफाळणारा भीमाचा क्रोध शांत करण्याचा प्रयत्न युधिष्ठिराने केला. क्रोधाच्या आहारी जाऊन कोणतीही अनुचित गोष्ट पांडवांकडून घडू नये यासाठी भीमाची त्याने समजूत घातली.

मू.– सहसा विदधीत न क्रियां अविवेकः परमापदां पदम् ।
वृणुते हि विमृश्यकारिणं गुणलुब्धाः स्वयमेव सम्पदः ॥

अ. – 'अविचाराने कोणतेही काम करू नये, कारण अविचार हा अनेक संकटांना कारणीभूत होतो. विवेकाने वागणाऱ्याच्या गुणांवर लुब्ध होऊन लक्ष्मी त्याला आपण होऊनच वरते.'

व्य. – या श्लोकातील उपदेशाचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणून भारवीच्याच संदर्भात एक कथा सांगितली जाते. भारवीने लिहिलेला हा श्लोक एका राजाला अतिशय आवडला. त्याने आपल्या अन्तर्गृहात तो सुवर्णाक्षरात लिहून ठेवला. एकदा राजा शिकारीहून परत आला असताना, त्याला आपल्या पलंगावर एक परका पुरुष निजला आहे असे दिसले. संतापाने, तलवार उपसून त्याच्यावर राजा वार करणार, इतक्यात राजाचे लक्ष 'सहसा विदधीत न क्रियां' या वर लिहिलेल्या ओळींकडे गेले आणि त्याने तलवार मागे घेतली. सर्व चौकशी केल्यावर लहानपणी घरातून पळविला गेलेला

स्वत:चा मुलगा परत आला होता व त्याच्या पलंगावर झोपला होता, हे त्याला समजले. अविचाराने मागचा-पुढचा परिस्थिती-परिणामांचा विचार न करता क्रोधाच्या आहारी जाऊन केलेल्या कृतीमुळे काही वेळा जन्मभर पश्चात्ताप करण्याची वेळ येते. म्हणून दहा अंक मोजण्याचा उपदेश जुन्या पाठ्यपुस्तकातील मुंगसाच्या धड्यातही केलेला आहे.

३०. अव्यवस्थितचित्तस्य प्रसादोऽपि भयङ्करः

सं.– लोकोक्ती. एखाद्या चंचल माणसाची मैत्री वा प्रेमही घातक ठरते. सारासार-विचार करता न येणाऱ्यांशी मैत्री प्रसंगी हितावह होत नाही; उलट त्यामुळे हानी होण्याचाच संभव अधिक.

सप. अ. १९.

मू. – **क्षणे तुष्टाः क्षणे रुष्टास्तुष्टा रुष्टाः क्षणेक्षणे ।**
अव्यवस्थितचित्तस्य प्रसादोऽपि भयङ्करः ।। लोकोक्ती

अ. – 'क्षणात समाधान पावणारा तर क्षणात रागावणारा, क्षणाक्षणात (कधी) रागावणारा तर (कधी) हसणारा (अशा) अस्थिर चित्ताच्या माणसाची कृपाही भयंकर हानिकारक (भयावह) असते.'

मू. – **व्यवस्थितः प्रशान्तात्मा कुपितोऽप्यभयंकरः ।**
अव्यवस्थितचित्तस्य प्रसादोऽपि भयंकरः ।। सप अ १९

'शान्त वृत्तीचा' स्थिर मनाचा (मनुष्य) रागावला तरी हानी होत नाही (सकारण रागावतो). परंतु चंचल चित्ताच्या माणसाची कृपाही भयावह असते.'

व्य.– क्षणोक्षणी विकारांच्या आहारी जाणाऱ्या माणसाचे प्रेमही लाभदायक होत नाही. म्हणून अशा माणसापासून चार हात दूर राहाण्याचा उपदेश करणारी ही पदावली मार्गदर्शक होते. त्याच दृष्टीने एखाद्याला धोक्याची सूचना देताना तिचा उपयोग केला जातो. चित्ताचे संतुलन, मनाचा समतोल बिघडला की त्या चित्ताचे किंवा मनाचे नियंत्रण ज्या देहावर असावयाचे त्यावरील ताबा सुटतो. मग हा तोल बिघडण्याला लहानशीही गोष्ट कारणीभूत होऊ शकते. लहरी श्रीमंत, सत्ताधारी किंवा राजे यांच्या हाती सत्ता अमर्याद; तिचा वापरही ते मर्यादा सोडून करतात. कोणावर प्रसन्न झाले तर गळ्यातला कंठाही देतील आणि त्यांच्या मनाविरुद्ध कोणी वागला तर त्याचा कंठ चिरायलाही ते मागेपुढे पाहाणार नाहीत. म्हणजे चित्त थाऱ्यावर नसल्याचेच हे लक्षण. त्यामुळे अशा माणसावर विसंबून राहाणे फार धोक्याचे. त्याने एखाद्यावर लुब्ध होऊन एखादी मोठी कृपा त्याच्यावर केली तरी त्याचे मन बदलल्यावर तो त्याचा सूडही तसाच भीषण घेईल ही भीती.

३१. अव्यापारेषु व्यापारः

सं.– पंच. १. २१. मित्रभेद प्रकरणातील ही पहिलीच कथा आहे. महिलारोप्य गावातील वर्धमानक नावाचा व्यापारी व्यापारासाठी निघाला असताना वाटेतच संजीवक नावाचा त्याचा बैल आजारी पडला. नाइलाजाने त्याला तसेच तेथे सोडून वर्धमानक निघून गेला. संजीवक बरा होऊन तेथेच राहात असताना पिंगलक नांवाचा सिंह सर्व परिवारासह पाणी पिण्यास तेथे आला. संजीवकाचा आवाज ऐकून घाबरून जाऊन तो मागे सरकला. दमनक नावाच्या पिंगलकाच्या मंत्र्याला तो असे का करतो हे समजेना. तो पिंगलकाला काही विचारणार इतक्यात करटक नावाच्या मंत्री कोल्हयाने त्याला 'हा विचार' सोडून देण्यास सांगितले. त्यासाठी दोन लाकडांत बसविलेली पाचर उपटून त्यात शेपटी अडकल्यामुळे मृत्यू पावलेल्या वानराची गोष्ट त्याने त्याला सांगितली. तो हा 'अव्यापारेषु व्यापार.'

मू. – अव्यापारेषु व्यापारं यो नरः कर्तुमिच्छति ।
स एव निधनं याति कीलोत्पाटीव वानरः ॥

अ.– 'जिच्याशी आपला संबंध नाही ती गोष्ट करण्याची जो माणूस इच्छा करतो तो (विनाकारण) खुंटी उपटणाऱ्या वानराप्रमाणे मृत्यू पावतो (त्याचा विनाश होतो).'

व्य.– विनाकारण एखाद्या गोष्टीत आपले लक्ष गुंतविल्यास किंवा नको त्या गोष्टींची चर्चा कोणी करू लागल्यास कोणीही चटकन 'नसती उठाठेव' करू नकोस असेच म्हणेल. या मराठी म्हणीचे 'अव्यापारेषु' हे संस्कृत रूप आहे. आपला प्रांत न ओळखणाऱ्या माणसाला व्यवहारात प्रत्यही याच शब्दांत इशारा दिला जातो.

३२. अहं ब्रह्मास्मि

सं.– बृहद. १.४.१०. यजुर्वेदाच्या वाजसनेयि शाखेच्या बृहदारण्यक ग्रंथाच्या तत्त्वज्ञानात्मक भागात हे महावाक्य आले आहे. ब्रह्मजिज्ञासु ब्राह्मणांनी प्रश्न केला की, 'जर ते ब्रह्म काहीतरी जाणूनच सर्व झाले तर त्याने असे काय जाणले की ज्यामुळे ते सर्व झाले?' त्या प्रश्नाला पुढील उत्तर दिलेले आहे.

मू. – ब्रह्म वा इदमग्रे आसीत्तदात्मानमेवावेत् । अहं ब्रह्मास्मीति . .
तस्मात्तत्सर्वमभवत् । . . . . तदिदमप्येतर्हि य एवं वेदाहं
ब्रह्मास्मीति स इदँ सर्वं भवति तस्य ह न देवाश्चनाभूत्या
ईशते । आत्मा ह्येषाँ स भवति ।।

अ.– 'पूर्वी हे सर्व ब्रह्मच होते. ते स्वतःलाच जाणते झाले, की मी ब्रह्म आहे, त्या ज्ञानामुळेच ते सर्व झाले. . .या वर्तमानकालीही जो या ब्रह्माला 'मी ब्रह्म आहे'

असे जाणतो, तो हे सर्व होतो. देवही त्या ब्रह्मवेत्त्याचा नाश करू शकत नाहीत. (मग दुसरे कोण समर्थ होणार ?) कारण तो त्यांचा आत्माच होतो.'

व्य. – आत्म्याच्या श्रवण - मनन - निदिध्यासन या उपासनेने आपण एक मर्यादित शरीर नसून 'आत्मा'–म्हणजे ब्रह्म आहोत याचा साक्षात्कार होतो. आत्मा सच्चिदानंद-स्वरूप आहे. सर्व भूतांच्या अन्तर्यामी, सर्वव्यापी आत्म्याच्या साक्षात्काराने द्वैत नष्ट होते व सर्वत्र मीच आहे असा अनुभव येतो.

३३. अहिंसा परमो धर्मः

सं.– महा. १३.११६.२५. भीष्मांनी युधिष्ठिराला मांसाशन अनिष्ट असल्याचे सांगून दया, अहिंसा यांची प्रशंसा केली आहे. अहिंसा हेच धर्माचे लक्षण मानले आहे.

मू. – अहिंसा परमो धर्म तथाऽहिंसा परो दमः ।
अहिंसा परमं दानं अहिंसा परमं तपः ।।

अ.–' अहिंसा हाच सर्वश्रेष्ठ धर्म (कर्तव्य) आहे. अहिंसाचरण हेच दमन होय. दानात अहिंसाच श्रेष्ठ आहे. सर्व तपांत अहिंसा हेच मोठे तप आहे.'

व्य.– मनुष्याच्या हातून जे व्यवहार घडतात त्या सर्वांचा संबंध मन, वाचा व शरीर या तिन्हीशी येत असतो. या तिन्हीच्या द्वारे केवळ मानवांनाच नव्हे तर मानवेतर प्राण्यांनाही दुःख होणार नाही अशा प्रकारच्या आचरणानेच अहिंसेचे पालन होते. भारतीय आर्यधर्माच्या अनेक उदात्त तत्त्वांपैकी अहिंसा हे एक प्रमुख तत्त्व आहे. मनुष्य कोणत्याही मोक्ष-साधनाचा अवलंब करो, त्याने अहिंसातत्त्व मान्य केले पाहिजे, हा सिद्धान्त भारतीय तत्त्ववेत्त्यांनी पुरातन काळीच प्रतिपादिला आहे. कोणत्याही प्रकारची हिंसा करणे हे पाप आहे, असे मत महाभारतकाळी लोकसमाजात प्रस्थापित झाले असावे, असे अनुमान महाभारतातील अनेक पर्वांत आलेल्या अहिंसाप्रशंसे-वरून काढण्यात येते. किंबहुना तत्पूर्वी रामायणकालीही सीतेने रामाला वनवासात असताना अहिंसोपदेश केलेला आहे. (वा. रा. ३. ९. पू. स.)

३४. अहिंसा सत्यमक्रोधः

सं.– भगी. १६. २. दैवी संपत् सांगताना ह्या श्लोकात अशा मनुष्याच्या अंगी कोणते गुण असतात ते सांगितले आहे.

मू. – अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शान्तिरपैशुनम् ।
दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं ह्रीरचापलम् ।।

अ.–' अहिंसा, सत्य, क्रोध नसणे, त्याग म्हणजे कर्मफलत्याग, शांती, अपैशुन्य म्हणजे क्षुद्र दृष्टी सुटून उदारबुद्धी असणे, सर्व प्राणिमात्रांठायी दया, निर्लोभीपणा, मृदुता, (वाईट कृत्यांची) लाज (हे गुण दैवी संपत्तीत जन्मलेल्या पुरुषांना प्राप्त होतात).'

व्य.– दैवी संपत्तीच्या सात्त्विक रूपाची पूर्ण कल्पना देण्याचा उद्देश हाच की,

परमेश्वराचे अव्यक्त व श्रेष्ठ स्वरूप दैवी संपत्तिमान पुरुष ओळखतात. त्या पुरुषांची वृत्ती व गुण ज्ञात व्हावेत. हीच कल्पना १८ व्या अध्यायात सात्त्विक गुणवर्णनात स्पष्ट केली आहे.

३५. अहो रूपमहो ध्वनिः

सं.– लोकोक्ती. मिथ्यास्तुतीचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

मू. – उष्ट्राणां च विवाहेषु गीतं गायन्ति गर्दभाः ।
परस्परं प्रशंसंति अहो रूपमहो ध्वनिः ॥

अ.–'उंटांच्या विवाहसमारंभात गाढवांनी गाणे म्हटले. त्या वेळी (दोघेही) परस्परांची स्तुती करू लागले. गाढव उंटाला म्हणाले, " काय हो तुमचे रूप ! " उलट उंट गाढवाला वाखाणू लागला, " काय हो तुमचा गोड गळा ! ".

व्य.– कोणाचीच पात्रता नसताना ज्या वेळी लोक उगाचच एकमेकांची प्रशंसा करू लागतात तेव्हा प्रत्येकालाच या प्रसिद्ध दृष्टान्ताचे स्मरण होते. वरील लोकोक्तीत उंटाचे रूप व गाढवाचा आवाज यांचा विडंबनात्मक उपयोग करून घेतला आहे, तसाच आजही ही लोकोक्ती वापरताना लोक करतात.

(आ)

३६. आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः

सं. – ऋग्. १.८९.१. बल– धनसंपत्ती देण्यासाठी, रक्षण करण्यासाठी विश्वातील शुभ शक्तींना आवाहन करणारी ही ऋचा आहे. जगती छंदात लिहिलेल्या मूळ सूक्ताचा द्रष्टा ऋषी गोतम राहूगण असून देवता विश्वेदेव आहेत.

मू.– आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतोऽदब्धासो अपरीतास उद्भिदः ।
देवा नो यथा सदमिद्वृधे असन्नप्रायुवो रक्षितारो दिवे दिवे ॥

अ.–' शुभ, विघ्नरहित, अपराजित, शत्रूचा भेद करणारे विचार सर्व दिशांतून आमच्याकडे येवोत. ज्यांच्यामुळे, आमची अभिवृद्धी होण्यासाठी, देव आमच्याजवळ सदैव राहातील; ते आम्हापासून विन्मुख न होता, दिवसेंदिवस आमचे रक्षण करणारे असे होतील. '

व्य.– विश्व आणि मानव यांच्यामधील निकटच्या नात्याची जाणीव वैदिक आर्यांच्या जीवनात व साहित्यात जितकी प्रकट झालेली दिसते तितकी इतर कोणत्याही संस्कृतीत झालेली दिसत नाही. भेदभाव न करता, मनाची दारे खुली करून, शुभ प्रवृत्तींचे स्वागत करण्याचा उदारपणा हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्टच आहे. त्यामुळेच ती सर्वसमावेशक झाली, अनेक आघात सहन करून जिवंत राहू शकली, ' सनातन ' ठरली.

३७. आचारप्रभवो धर्मः

सं.–महा. १३.१०७.१४७. युधिष्ठिराला भीष्मांनी उपदेश केला आहे.

महा. १३.१३५.१३७. युधिष्ठिराला भीष्माने विष्णुसहस्रनाम सांगितले; तसेच या स्तोत्रपठनाचे फळही वर्णिले.

सप. आ ९.

मू.– **आगमानां हि सर्वेषां आचारः श्रेष्ठ उच्यते ।**

आचारप्रभवो धर्मो धर्मादायुर्विवर्धते ।। महा. १३.१०७.१४७.

अ.– ‘ सर्व शास्त्रांत आचार हाच श्रेष्ठ म्हटला (मानला) आहे. आचारापासून धर्माची उत्पत्ती होते. धार्मिक आचरणानेच आयुष्य वाढते. ’

मू.–**सर्वागमानामाचारः प्रथमं परिकल्प्यते ।**

आचारप्रभवो धर्मो धर्मस्य प्रभुरच्युतः ।। महा. १३.१३५.१३७.

अ.– ‘ सर्व शास्त्रांत आचारच सर्वश्रेष्ठ मानला आहे. आचारापासून धर्माची उत्पत्ती होते. या धर्माचा प्रभु अच्युत म्हणजे श्रीविष्णु आहे.’

मू.– **आचारप्रभवो धर्मो नृणां श्रेयस्करो महान् ।**

इहलोके परा कीर्तिः परत्र परमं सुखम् ।। सप. आ ९.

अ.–‘आचारापासूनच धर्माची उत्पत्ती होते. धर्माचरण हे मनुष्यांना श्रेयस्कर (हितावह) होते. (त्यामुळे) भूलोकी कीर्ती मिळते (तसेच) परलोकात अत्यंत सुख प्राप्त होते.’

व्य.– मनुष्य प्रत्यक्ष व्यवहारात कसा वागतो यावरूनच त्याचा बरेवाईटपणा ठरविला जातो. ‘धमस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पन्थाः ।’ धर्म काही आकाशातून अवतरला नाही की तो अधांतरी राहात नाही. भूमीवर निवसणाऱ्या माणसांनी आपसातल्या सुकर व्यवहारासाठी, परस्परांच्या सौख्यासाठी नि तत्त्वज्ञानानुसार अनुमानिल्या जाणाऱ्या अंतिम कल्याणासाठी काही नियम केले. त्याप्रमाणे माणसे वागू लागली. तोच आचार. त्यातून धर्माचे नियम बनले आणि अशा तऱ्हेने धर्माची चौकट उभी राहिली. सनातन वैदिक धर्माचे वैशिष्टच म्हणजे हा कोणी एका व्यक्तीने सांगितलेला धर्म नव्हे. ईश्वरी प्रतिभेतून स्फुरलेल्या वेदांनुसार तो व्यक्त झाला. श्रुतिस्मृतींनी त्याची पहिली पायवाट घालून दिली. म्हणूनच तो देवप्रणित धर्म, यास्तव जगत्पालक विष्णु त्या धर्माचा प्रभु. परमेश्वर सर्वसद्‌गुणसंपन्न आहे. त्याचा धर्म पाळणारा मनुष्यही तसाच असावा, सदाचारसंपन्न असावा अशी रास्त अपेक्षा. सदाचाराने शुद्ध होत होत मनुष्य खरा धार्मिक होतो, ही धारणा. आचारावरूनच माणसाची धार्मिकता ओळखली पाहिजे हा व्यवहार.

३८. आततायिनमायान्तम्

स.–मनु. ८.३५०. समाजात घडणारे वेगवेगळे अपराध, कायद्याचा भंग आणि त्यांना राजाने द्यावयाच्या शिक्षा यांची गणना मनूने केली आहे.

महा. ४. प्रवि. ६५१. गोग्रहणपर्वात अर्जुन उत्तराला (विराटपुत्र) लढण्यासाठी प्रवृत्त करतो. त्या वेळी त्याने गाई हरण करून नेणारे जरी ज्येष्ठ असले तरी त्यांच्याशी युद्ध करण्यात व त्यांचा वध करण्यात दोष नाही असे उत्तराला सांगितले.

मू.– गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम् ।
आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन् ।। मनु. ८.३५०.

अ.– ‘गुरु, लहान मूल, म्हातारा मनुष्य किंवा शास्त्राभ्यास केलेला ब्राह्मण, यांच्यापैकी कोणीही, (शस्त्र घेऊन) मारण्यासाठी अंगावर धावून आला तर, (त्याचे वय, शिक्षण इ. याचा) काहीही विचार न करता, त्याला ठार मारावे.’

मू.– आततायिनमायान्तमपि वेदाङ्गपारगम् ।
जिघांसन्तं जिघांसीयान्न नरो ब्रह्महा भवेत् ।। महा. ४ प्रवि. ६५१.

अ.– ‘वेदांगतज्ञ असूनही (जर) आततायीप्रमाणे (विनाकारण) मारण्यासाठी अंगावर धावून आलेल्याला ठार मारण्यात मनुष्याला ब्रह्महत्येचे पाप लागत नाही.’

व्य.– अहिंसेच्या अतिरेक्यांना यात उत्तर आहे. सद्गुणांचा अतिरेक हा हिंदूंचा दुर्गुण राष्ट्रघाताला कारणीभूत झालेला आहे. जगात कोणतीच गोष्ट निरपेक्ष नाही, सर्व सापेक्ष आहे. सद्गुण सुद्धा – विशेषतः राष्ट्रीय दृष्टीने विचार करताना–सदैव सापेक्षच असला पाहिजे. या आदेशाकडे डोळेझाक केल्यामुळे भारतीय समाजाची अतोनात हानी झालेली आहे. ज्याला समाज स्वाभिमानाने जगवावयाचा आहे, राष्ट्र सुरक्षित ठेवावयाचे आहे, त्याला हा आदेश मानावाच लागेल.

उन्मत्त, माथेफिरू मनुष्य त्या अवस्थेत कोणती हानी करील, ह्याची कल्पना करता येत नाही. निरपराध माणसांना त्याच्यामुळे जो उपद्रव होतो त्याचा प्रतिकार करणे न्यायाला धरूनच आहे. अशा उन्मत्त माणसाचे वय, जात, समाजातले त्याचे स्थान यांचा अशा वेळी मुळीच विचार करू नये, असे मनूला सुचवावयाचे आहे.

३९. आन्तरः कोऽपि हेतुः

सं.–उरा. ६.१२. शम्बूकाला मारून परतलेला राम वाल्मीकिआश्रमात येताच त्याची व लवाची भेट होते. लवाला पाहताच रामाच्या मनात वात्सल्य उफाळून येते. परस्परपरिचय नसताना अचानक एकमेकांविषयी अंतःकरणापासून स्नेह वाटल्याचे पाहून रामाला आश्चर्य वाटते.

मू.– व्यतिषजति पदार्थानान्तरः कोऽपि हेतुः न खलु बहिरुपाधीन्प्रीतयः संश्रयन्ते ।
विकसति हि पतङ्गस्योदये पुण्डरीकं द्रवति च हिमरश्मावुद्गते चन्द्रकान्तः ।।

अ.– ‘काही (अवर्णनीय) अंतःस्थ कारण वस्तूंना एकत्र बांधून टाकते. (परस्पराविषयी अंतःप्रेरणेने प्रेमबंध निर्माण होतात.) बाह्य उपाधीची प्रेमाला (प्रेम उत्पन्न होण्याला) आवश्यकता नसते. सूर्य उगवल्यावर श्वेतकमल उमलते किंवा चंद्र उगवला असता

चंद्रकांत मणी पाझरू लागतो (तसे लवाला पाहताच रामाला त्याच्याविषयी आत्मीयता वाटू वागली.) '

व्य.– एखाद्या व्यक्तीला पाहताच त्याच्याविषयी आपल्याला आपलेपणा वाटतो तर कोणाकडे पाहून विनाकारण त्याचा रागही येतो. वस्तुतः तसा राग वा प्रेम वाटण्यास काहीच कारण घडलेले नसते. अशा वेळी सहजच अंतरातील पूर्वीचे लागेबांधे पूर्वऋणानुबंध असावेत असे वाटते. म्हणूनच या अचानक उत्पन्न होणाऱ्या प्रेमाला वा द्वेषाला अंतःस्थ हेतू कारण मानला जातो.

आपण व्यवहारात मात्र याचा वापर अगदी विपरीत अर्थाने करतो आणि तो बहुधा कुचेष्टेने केला जातो. एखाद्या माणसाने एखादी चांगली गोष्ट केली, समजा एखाद्या संस्थेला दान दिले, तर त्या दानामागे त्या संस्थेत आपला शिरकाव करून घेऊन स्वार्थ साधण्याचा त्या माणसाचा डाव असल्याची शंका कोणाच्या मनात येते आणि तो म्हणतो, 'आन्तरः कोऽपि हेतुः'– 'आतला, गुप्त, मनातला हेतू काही वेगळाच आहे बरं का या माणसाचा!' परंतु वास्तविक मुळात याहून अगदी भिन्न पण उदात्त अर्थाने हा शब्दप्रयोग आलेला आहे.

४०. आत्मा वा अरे द्रष्टव्यः

सं.–बृहद. २.४.५. संन्यास घेण्यापूर्वी याज्ञवल्क्याने आपल्या पत्नीला–मैत्रेयीला आत्म्याचे स्वरूप सांगून, त्याचे ज्ञान करून घेण्याचा उपाय सांगितला आहे.

मू.– आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यो मैत्रेय्यात्मनो वा अरे दर्शनेन श्रवणेन मत्या विज्ञानेनेदं सर्वं विदितम्।।

अ. –'हे मैत्रेयी, आत्म्याला पाहावे, त्याच्याविषयी ऐकावे, तोच मनन करण्यास योग्य आहे व त्याचेच निश्चयाने ध्यान करावे. आत्म्याच्या दर्शनाने, श्रवणाने, मननाने व प्रत्यक्ष जाणून घेण्याने ह्या (जगातील) सर्वांचे ज्ञान होते.'

व्य. – संसारातील वस्तूंचे चिंतन म्हणजे विषयचिंतन मनुष्य अखंड करीत असतो. पण या वस्तू नाश पावणाऱ्या–मरणधर्मी असतात. त्यांच्या चिंतनाने शेवटी दुःखच उत्पन्न होते. ज्याला सांसारिक सुखदुःखांच्या द्वंद्वामुळे होणारी ओढाताण नष्ट करून 'स्थिरमती' व्हावयाचे असेल, शाश्वत आनंद मिळवावयाचा असेल त्याने आत्म्याचे स्वरूप जाणून घेऊन त्याचेच अनुसंधान ठेवावे. आत्म्याचे स्वरूप जाणण्याची श्रवण, मनन व निदिध्यासन ही मुख्य साधने आहेत. भारतीय अध्यात्मशास्त्रात याज्ञवल्क्याचे हे वचन सुप्रसिद्ध आहे.

४१. आत्मनः प्रतिकूलानि

सं.–पंच. ३.१०४. कपिंजल नावाचा पक्षी काही दिवस बाहेर राहून परत आपल्या जुन्या वृक्षाच्या ढोलीत आला. तेवढ्यात एका सशाने ढोलीतील त्याची जागा

पटकावली. आपली जागा परत द्यावी असे सांगताना कपिंजलाने त्याला धर्माला अनुसरून वागण्याचा उपदेश केला.

मू.– श्रूयतां धर्मसर्वस्वं श्रुत्वा चैवावधार्यताम् ।
आत्मनः प्रतिकूलानि परेषां न समाचरेत् ।।

अ.– 'धर्माचे रहस्य ऐक आणि ऐकून मनावर ठसवून घे. जी गोष्ट स्वतःला अहितकारक आहे ती दुसऱ्यांशी वागताना करण्याचे टाळावे.'

व्य.– धर्माचे रहस्य अतिशय साधे व सरळ आहे. पण मनुष्याचा स्वार्थ, लोभ जेव्हा त्याच्या व्यवहारात शिरतो तेव्हा त्याचे वागणे बदलते. तो धर्माच्या साध्या व हितकारक नियमांकडे दुर्लक्ष करतो. दुसऱ्याने स्वतःला दुखापत करू नये, स्वतःचा अपमान करू नये, असे वाटत असेल, तर दुसऱ्यालाही आपण मारू नये, त्याचा अपमान करू नये, हे पथ्य मनुष्याने पाळले पाहिजे; म्हणजे दुसराही त्याची हानी करीत नाही. स्वतःचे रक्षण करण्याचा उपाय हाच आहे. जुन्या ऋषि-मुनींनी सांगितलेले हे अनुभवसिद्ध सत्य म्हणजेच धर्म होय.

४२. आत्मानं रथिनं विद्धि

सं.–कठ. १.३.३. एका रूपकाद्वारे इंद्रियांच्या साहाय्याने मोक्ष कसा प्राप्त करून घेता येतो ते सांगितले आहे. कठोपनिषदातील रथाचे हे रूपक अत्यंत प्रसिद्ध आहे. यमाने नचिकेत्याला आत्मविद्या दिली त्यातील हे संभाषण आहे. यम म्हणाला :

मू.– आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु ।
बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ।।

अ.–(यम नचिकेत्याला म्हणाला)–'संसारी आत्मा हा रथाचा स्वामी समज. त्याचा रथ शरीर आहे. (कारण ते रथास जोडलेल्या घोड्याप्रमाणे असलेल्या इंद्रियांकडून कार्य-प्रवृत्त होते.) निश्चय हेच स्वरूप असणाऱ्या बुद्धीला तू सारथी मान. मन हा लगाम आहे.

व्य.– रथाचे संपूर्ण रूपक योजताना बुद्धीला सारथी म्हटले आहे. सारथी जसा इच्छित दिशेला रथ वळवून कार्यभाग साधतो तद्वत बुद्धी शरीराला इष्ट कार्यासाठी प्रवृत्त करते. संकल्पविकल्पात्मक मनरूपी लगामाने इंद्रियांच्या गतीवर (विषयाकडे) नियंत्रण ठेवता येते. या सर्व घटकांचा स्वामी आत्मा आहे. आत्म्याला ज्याने ओळखले तो आपला हा रथ मोक्षाच्या दिशेने नेऊ शकतो. सर्वसामान्यांकरिता मनोरंजक रीतीने सत्यज्ञान कठाने येथे घडविले आहे.

४३. आत्मानं सततं रक्षेत्

सं.– महा ५.३७.१७. विदुरनीतीमुळे प्रसिद्ध असलेल्या उद्योगपर्वात माणूस शतायुषी कसा होतो या धृतराष्ट्राच्या प्रश्नाला उत्तर देताना विदुराने म्हटले आहे की, खरा साहाय्यकर्ता 'आपले आपण' हे माणसाने ओळखायला हवे.

सप. आ ४.

मू.– आपदर्थे धनं रक्षेत् दारान्रक्षेद्धनैरपि ।
आत्मानं सततं रक्षेत् दारैरपि धनैरपि ।। महा. ५.३७.१७.

अ.– 'संकटकाळात उपयोग व्हावा यासाठी धनाचे रक्षण करावे. धनाच्या योगे (वा प्रसंगी त्याग करूनही) पत्नीचे रक्षण करावे. धन आणि पत्नी या दोहोंचाही (प्रसंगी) त्याग करून आत्म्याचे रक्षण करावे (आत्मकल्याण साधावे)'.

आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि ।
पुनर्दाराः पुनर्वित्तं न शरीरं पुनःपुनः ।। सप. आ. ४

अ.– 'आपले (आत्म्याचे) रक्षण करावे. धनाचे आणि पत्नीचेही रक्षण करावे. (कदाचित) पुन्हा पत्नी मिळेल, द्रव्यही मिळेल (पण) पुन्हा पुन्हा हा देह लाभणार नाही (म्हणून आत्मकल्याण साधावे.)'
(परिशिष्ट पाहा)

व्य.– आत्म्याचे स्वरूप ओळखून असक्त वृत्तीने वागून आत्महित साधण्यातच पुरुषार्थ आहे. संसारात आवश्यकता असेल तितक्याच प्रमाणात ऐहिक वस्तूंचा संग्रह करावा. ऐहिक जीवनात उपयुक्त होणाऱ्या वस्तूंचे रक्षणही करावे. परंतु आत्मज्ञानाच्या मार्गात त्यांचा मोह पडल्याने अडथळा होत असेल तर त्यांचा त्यागही करता आला पाहिजे. आत्मज्ञान हाच सर्वश्रेष्ठ लाभ असल्याने माणसाने स्वतः निर्लेप राहण्यासाठी जागरूकतेने वागले पाहिजे.

असा वास्तविक अर्थ असला तरी व्यवहारात कित्येकदा चुकीने किंवा हेतुतः सुद्धा या वचनाचा वापर स्वार्थसाधनाच्या समर्थनासाठी केला जातो. 'आत्मा' याचा या वाक्यातील अर्थ स्वतःचे शरीर, स्वतःचे सुखोपभोग, स्वतःचे रक्षण असा नसून, पारमार्थिक अर्थाने अध्यात्माच्या परिभाषेत 'आत्म्या'चा अर्थ घेतला पाहिजे.

४४. आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्

सं.– महा. ५.३७.१६. प्रजागर पर्वात विदुराने धृतराष्ट्राला केलेल्या उपदेशातील हा श्लोक आहे. 'विदुरनीती' या नावाने प्रसिद्ध असलेल्या या उपदेशात विदुराने नीती–धर्म–व्यवहार यांचे हितकारक नियम सांगितले.

पंच १.३८६. कुलरक्षणासाठी गरुडाला भगवानाने हाच उपदेश केला आहे.

मू.– त्यजेदेकं कुलस्यार्थे ग्रामस्यार्थे कुलं त्यजेत् ।
ग्रामं जनपदस्यार्थे आत्मार्थे पृथिवीं त्यजेत् ।।

अ.– 'कुटुंबाचे रक्षण करण्यासाठी एकाचा (व्यक्तीचा) त्याग करावा. गावाच्या रक्षणासाठी कुटुंबाचा त्याग पत्करावा. देशाच्या रक्षणासाठी गावाचा त्याग करावा व आत्म-प्राप्तीसाठी (आत्मज्ञान करून घेण्यासाठी) पृथ्वीचा (जीविताचाही) त्याग करावा,
(पंचतंत्रातही हाच श्लोक आहे.)

व्य.– अनेकांचे हित होत असेल, रक्षण होत असेल तर एका व्यक्तीच्या रक्षणाकडे पाहू नये. एखाद्या महत्त्वाच्या गोष्टीसाठी यापेक्षा गौण गोष्टीचा लोभ सोडून द्यावा

लागतो. भारतीय संस्कृतीने सर्वांत श्रेष्ठ, मिळविण्याजोगी सर्वोत्तम वस्तू ' आत्म-ज्ञान ' ही मानली आहे.

आत्मज्ञानासाठी प्रयत्न करणारा मनुष्य विरळाच. व्यवहारात स्वतःला पूज्य, मूल्यवान व जपण्यासारखी अशी जी वस्तू किंवा तत्त्व असते, त्याच्यासाठी देहत्याग करण्यासही मनुष्य तयार होतो. स्वतःचे शील, धर्म, देशाचे स्वातंत्र्य यांना पूज्य मानून यांच्यासाठी प्राण देणारे हुतात्मे ठरतात.

४५. आत्मवत् सर्वभूतानि

सं.– योवा. ५.५६.४९.' निर्मल आकाशाप्रमाणे ज्याचे अंतःकरण स्वच्छ झालेले असते, त्याच्या ठिकाणी बाह्य वस्तू पाहून कोणताही विकार उत्पन्न होत नाही. '– हीच समाधी अवस्था होय असे वसिष्ठांनी रामाला सांगितले.

मू.– आत्मवत् सर्वभूतानि परद्रव्याणि लोष्ठवत् ।
स्वभावादेव न भयात् यः पश्यति स पश्यति ।।

अ.– ' भीतीमुळे नव्हे तर स्वभावतःच जो सर्व जीवांना स्वतःसारखे मानतो आणि दुसऱ्याचे धन मातीच्या ढेकळाप्रमाणे पाहतो, तो समदर्शी पुरुष होय.'

व्य.– सामान्य मनुष्य परद्रव्याचा अपहार करीत नाही, दुसऱ्याबद्दल दुर्भावना असली तरी ती प्रकट करीत नाही, सरळ वागतो. या त्याच्या वर्तनामागे आपल्याला शिक्षा होईल ही भीती असते. समबुद्धी झालेल्या महात्म्यांच्या ठिकाणी मात्र आपपरभाव नसतो; ('आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ।' -गीता) बाह्य वस्तूंच्या बाबतीत भेददृष्टी नसते. त्यामुळे त्यांचे आचरण सहज व सरळ असते. सद्वर्तनासाठी त्यांना शासनाची भीती किंवा सुखाचे आमिष – दोन्हींचीही गरज नसते.

४६. आपत्काले तु सम्प्राप्ते यन्मित्रम्

सं. – पंच. २.११६. 'परीक्षा करून योग्य माणसाशी मैत्री करावी. कोणत्याही परिस्थितीत जो सारखा वागतो अशाचीच मैत्री हितकारक होय,' असे मन्थरकाने हिरण्यकाला म्हटले.

मू. – आपत्काले तु सम्प्राप्ते यन्मित्रं मित्रमेव तत् ।
वृद्धिकाले तु सम्प्राप्ते दुर्जनोऽपि सुहृद्भवेत् ।।

अ.– 'संकट आले असतानाही जो मैत्री राखतो, तोच खरा मित्र. वैभव प्राप्त झाले असताना दुर्जनही मैत्री जोडतो. (मित्राची परीक्षा संकटकालीच होते.)'

व्य.– समाजामध्ये मानमान्यता, पैसा जवळ असताना त्याच्या लोभाने अनेक लोक भोवती जमा होतात, मैत्रीचा देखावा करतात. पण ज्याप्रमाणे पर्णहीन वृक्षाला पक्षी सोडून जातात, त्याप्रमाणे धनसंपत्तीचा नाश झाल्यावर ते मनुष्याला सोडून जातात. संकटकाळातही जो साथ करतो तोच खरा मित्र.

४७. आ परितोषात् विदुषाम्

सं. – शाकुं. १.२. नाटकाची प्रस्तावना करताना सूत्रधाराच्या तोंडी कालिदासाने या ओळी घातल्या आहेत. विद्वानांनी संतोषाने मान डोलवली तरच ती साहित्य-कृती श्रेष्ठ दर्जाची ठरते, असा त्याचा अभिप्राय आहे.

मू. – **आ परितोषाद्विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम् ।**
बलवदपि शिक्षितानामात्मन्यप्रत्ययं चेतः ॥

अ.– 'पंडिताचे समाधान होईपर्यंत नाटचकलेचे माझे ज्ञान पूर्ण झाले असे मी मानीत नाही. भरपूर शिक्षण प्राप्त करून घेतले असले तरी माणसाच्या मनाला स्वतःच्या बाबतीत विश्वास वाटत नाही.'

व्य. – सामान्य प्रेक्षकांना रंजविणे एवढाच कालिदासासारख्या श्रेष्ठ साहित्यिकाचा हेतू नसतो. 'जाणकार, मार्मिक रसिकांची मान्यता मिळाली तरच ती उच्च दर्जाची कलाकृती होय,' असे त्याचे मत आहे. स्वतः कितीही विद्वान असला तरी शास्त्र जाणणाऱ्या पंडितांकडून प्रशंसा झाली तरच त्याच्या विद्वत्तेला समाजाकडून मान्यता मिळते व त्याला आत्मविश्वास वाटू लागतो. त्यामुळे सामान्य व्यवहारातही विद्वानांच्या किंवा जाणत्यांच्या मान्यतेचा निकष कोणत्याही कलाकृतीचा किंवा कामगिरीचा श्रेष्ठपणा सिद्ध होण्यासाठी मानला जातो.

४८. आये दुःखं व्यये दुःखम्

सं. – पंच. १.१७४. 'देवशर्मा ब्राह्मणाला वस्त्रे विकून पुष्कळ पैसे मिळाले, तेव्हा त्याला त्या पैशांच्या रक्षणाची चिंता उत्पन्न झाली. एक डाकू चोरी करण्यासाठी त्याच्याजवळ आला.' ही कथा मित्रभेद या तंत्रात दमनकाने करटकाला सांगितली.

पंच. २.१२२. मंथरक कासव, लघुपतनक कावळा आणि हिरण्यक उंदीर एकमेकांचे मित्र होते. शत्रूंनी सर्वस्व लुटून नेलेल्या हिरण्यकाला घेऊन लघुपतनक मंथरकाकडे आला. मंथरकाने लघुपतनकाची मित्रप्रेमाबद्दल प्रशंसा करून हिरण्यकाचे सांत्वन केले.

मू. – **अर्थानामर्जने दुःखमर्जितानां च रक्षणे ।**
आये दुःखं व्यये दुःखं धिगर्थाः कष्टसंश्रयाः ॥ पंच १.१७४.

अ.–'धन मिळविताना कष्ट होतात, मिळविलेल्या संपत्तीचे रक्षण करण्यासही आयास पडतात; प्राप्तीमध्ये आणि खर्च होत असताना धन हे दुःखकारकच होते. खरोखर सर्वप्रकारे दुःख देणाऱ्या धनाचा धिक्कार असो!'

पंच. २.१२२. येथे 'आये' शब्दाऐवजी मंथरकाने 'नाशे दुःखं' असे म्हटले.

व्य. – दरिद्री मनुष्य पैसा नाही, संसार कसा चालवावा, म्हणून चिंता करीत असतो, तर श्रीमंत मनुष्य जवळ असलेली संपत्ती दूर जाऊ नये म्हणून तिचे रक्षण करण्याच्या

प्रयत्नात असतो. आयुष्यातले पुष्कळसे श्रम, बुद्धी पैशासाठी खर्ची पडतात. हे माहीत असूनही एका मुक्त, निरिच्छ माणसांखेरीज प्रत्येकजण लक्ष्मीच्या चंचल पावला पाठीमागे अगतिक होऊन धावत असतो.

४९. आराधनाय लोकानाम्

सं.– उरा. १.१२. वसिष्ठांचा आदेश अष्टावक्राने रामाला सांगितला. प्रजानुरंजन करण्याचा वसिष्ठांचा उपदेश रामाला शिरोधार्य वाटला. म्हणून तेच व्रत अंगीकारिलेला राम म्हणाला :

मू.– स्नेहं दयां च सौख्यं च यदि वा जानकीमपि ।
आराधनाय लोकानां मुञ्चतो नास्ति मे व्यथा ।।

अ.–' प्रजेला संतुष्ट ठेवण्यासाठी प्रेम, दया, सुख यांचाच नव्हे तर (प्रसंग पडल्यास) सीतेचा त्याग करतानाही मला खेद होणार नाही (त्याग करायला मी कचरणार नाही)'

व्य.– राजा असो वा आधुनिक शासनाचा प्रमुख असो. जनतेचे कल्याण वा समाधान करणे हेच त्यांचे कर्तव्य मानले आहे. किंबहुना आपल्याला सुखात जीवन जगता यावे यासाठीच जनता सत्ता आपल्या प्रतिनिधींकडे देते. या कर्तव्याची जाणीव असलेल्या प्रतिनिधींचे प्रजानुरंजन हे ब्रीद होते. रघुवंशाचीही या व्रताबद्दल ख्याती होती. भारतीय राजसत्तेचा हा खरा आदर्श आहे.

५०. आशा नाम मनुष्याणाम्

सं.–सुर. २. तृष्णानिंदा १०. तृष्णा ही दुःखपर्यवसायी असते. तिचा त्याग करणेच उचित. म्हणून त्या लोभाचे दुष्परिणाम वर्णन करून निंदा केली आहे.

मू.– आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्यशृंखला ।
यया बद्धाः प्रधावन्ति मुक्तास्तिष्ठन्ति पङ्गुवत् ।।

अ.–' मानवांची (मानवातील) आशा ही एक आश्चर्यकारक बेडी आहे, जिने बांधले गेलेले (मानव) धावत असतात, तर (तिच्यापासून) सुटका मिळविलेले पंगु माणसाप्रमाणे स्थिर उभे राहातात. '

व्य.–आशेवरच माणूस जगतो. ज्याच्या मनातील आशानिराशेचे द्वन्द्व संपते, मनातील आसक्ती जाऊन शांती प्राप्त होते तो जीवन्मुक्त होतो. सर्वसामान्य माणसाची मात्र आशा सुटत नाही. त्यामुळे आशेच्या बंधनात अडकलेला माणूस आशेने पुढे पुढे जात असतो, तर ज्याला काही मिळवायचे राहिले नाही तो स्थितप्रज्ञ होतो. आपाततः विरोधाचा आभास निर्माण करणारे हे सुभाषित व्यवहारात अनेकदा प्रत्ययाला येते.

५१. आशा हि परमं दुःखम्

सं.–भाग. ११.८.४४. आसक्तीने अन्ती दुःखाशिवाय कुठलाच पर्याय उरत नाही. भोगेच्छेनेच सुखाला पारखे व्हावे लागते, हे आयुष्याचा बहुतांश काळ वेश्याजीवनात घालविलेल्या पिंगलेला पटले. त्यामुळे तिला वैराग्य उत्पन्न झाले. आशा हेच दुःखाचे मूळ आहे. ज्याची आशा सुटली त्यालाच देव भेटेल असे या उपाख्यानाचे रहस्य आहे.

सू.–आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ।
यथा संछिद्य कान्ताशां सुखं सुस्वाप पिङ्गला ।।

अ.– 'दुःखाचे कारण आशाच आहे. (आशेमुळेच दुःख प्राप्त होते). आशा ठेवली नाही तरच जीवन सुखकर होते. जसे कान्ताची आशा सोडून दिलेली पिंगला सुखाने झोपली. (आशा नष्ट झाल्याबरोबर तिचे मन शांत झाले).'

व्य.– कोणत्याही गोष्टीविषयी आशा वाटू लागली असता ती गोष्ट स्वतःची असावी अशी स्वामित्वाची भावना होते. अर्थात एकाच गोष्टीविषयी अनेकांना इच्छा झाल्यास बऱ्याच वेळा तिची प्राप्ती न झाल्याने तिचे पर्यवसान दुःखात होते. म्हणून अनासक्त राहाण्याचा गीतेचा संदेशच पिंगला वेश्येच्या दृष्टान्ताने भागवताने येथे दिला आहे. ईशावास्योपनिषदाचा पहिला मंत्रही हेच सांगतो.

५२. आहारनिद्राभयमैथुनं च

सं. – लोकोक्ती. पशु आणि मनुष्य – एकाच सृष्टीचे दोन अवयव. त्यांच्यामध्ये सारख्या असलेल्या चार गोष्टींची गणना सुभाषितकारांनी केली आहे. मनुष्याचे मनुष्यपण कशात आहे याकडे आपले विशेष लक्ष वेधले आहे.

सप. आ. २०.

मू. – आहार निद्राभयमैथुनं च सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम्।
धर्मो हि तेषामधिको विशेषो धर्मेण हीनाः पशुभिः समानाः ।। लोकोक्ती

अ.– 'खाणेपिणे, झोप, भीती आणि मैथुन (प्रजोत्पत्ती) या चारी गोष्टी पशू आणि मनुष्य यांच्या बाबतीत सारख्या आहेत. परंतु मनुष्यामध्ये (पशूहून) 'धर्म' हा एक विशेष आहे, धर्महीन मनुष्य पशूसमान होय.'

सू.– आहारनिद्राभयमैथुनानि समानतेतत्पशुभिर्नराणाम् ।
एको विवेको ह्यधिको मनुष्ये तेनैव हीनाः पशुभिः समानः ।। सप. आ. २०.

अ.– 'भोजन, झोप. भीती आणि मैथुन या चारी गोष्टी पशू आणि यनुष्य यांत सारख्या आहेत. फक्त विवेक (सारासारविचारक्षमता) हाच मनुष्यात अधिक आहे. विवेकहीन मनुष्य पशुसमान (मानावा.)'

व्य. – मानव आणि पशू यांच्यात प्रामुख्याने भेद आचारावरून केला जातो. म्हणूनच ज्या वेळी मनुष्य पशूसारखा वागतो त्या वेळी 'साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः' असे

त्याच्याबद्दल म्हटले जाते. आचारातूनच धर्माची निर्मिती होते. धर्माचरणी मनुष्यालाच आत्मकल्याण साधता येते. किंबहुना तीच मानवी जीवनाची इतिकर्तव्यता आहे.

देहधारी प्राण्याला निसर्गतः ज्या गोष्टी आवश्यक तेवढ्या माणूस जन्माला आल्यापासून मरेपर्यंत करीतच असतो. परंतु धर्म म्हणजे मानवी जीवनात तो ज्या भूमिकेवर असेल त्या भूमिकेला अनुसरूनच आवश्यक ते कर्तव्याचरण करणे म्हणजे ते त्याचे धर्माचरण. असे धर्माचरण केले तरच त्याला माणूस म्हणवून घेण्याचा अधिकार. मानवी समाजात राहाण्याचाही अधिकार तरच त्याला प्राप्त होईल. अन्यथा तो पशूसारखा अरण्यात जाऊन राहाण्याच्याच योग्यतेचा. पशूहून विशेष असे जे मानवी धर्माचरण ते प्रयत्नपूर्वक करावयास हवे हा इत्यर्थ.

(इ)

५३. इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः

सं. – लोकोक्ती. एकाच वेळी दोन गोष्टी साधण्याचा प्रयत्न केल्यास प्रसंगी दोन्हीही हातचे गमावले जाते. दोन्हीकडे नुकसान होते. अत्र ना परत्र अशी अवस्था होते.

सू. – इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः परमेकांतिवेषभाक् ।
न संसारसुखं तस्य नैव मुक्तिसुखं भवेत् ।।

अ.–' (धड) इकडेही नाही (धड) तिकडेही स्थान राहात नाही. केवळ वेष तसा (संन्याशासारखा वा संसारी माणसाप्रमाणे) करणारा मनुष्य संसाराचे सुखही भोगू शकत नाही आणि मोक्षाचे सुखही (प्राप्ती) मिळवीत नाही.'

व्य. – ऐहिक जीवनात आसक्ती ठेवून मोक्षाची इच्छा करणाऱ्या व्यक्तीची त्रिशंकूसारखी अवस्था होते. कोठेच पूर्णपणे सुख त्याला लाभत नाही. समर्थांनी प्रपंचात राहून परमार्थ करण्यास सांगितले असले तरी त्यांची रीत वेगळी आहे. दोन्हींचा लोभ धरणारी माणसे संसारात रंगून मुक्ती अपेक्षितात. समर्थांनी वा इतर संतांनीही ऐहिकासह पारमार्थिक कल्याण साधायला सांगितले ते संसारात विरक्त व हरिचिंतनी आसक्त राहूनच. दोन्हीकडे तितकाच ओढा असल्यास काहीच हातात पडत नाही. तसेच केवळ वेष तसे करूनही सुखप्राप्ती होत नाही. त्यासाठी निश्चित काय मिळवायचे याचा निश्चय पक्का पाहिजे. त्या दृष्टीने संसारात राहून मुक्ती मिळविता येते किंवा संसार तरी पूर्ण सुखाचा करता येतो. दोन्ही साधू इच्छिणाऱ्या लोकांना व्यवहारात 'इतो भ्रष्टः' याच शब्दांत इशारा दिला जातो.

५४. इन्द्रो वृत्रवधेनैव

सं.– महा. १२.१५.१५. भीष्मांनी युधिष्ठिराला राजधर्म सांगावा अशी श्रीकृष्णाची इच्छा होती. तीन पिढ्या राज्यशकट चालविणाऱ्या भीष्मांनीच उपदेश करावा असा श्रीकृष्णानेच आग्रह धरल्यावर भीष्मांनी धर्माला राजधर्म सांगितला.

मू. – नाघ्नतः कीर्तिरस्तीह न वित्तं न पुनः प्रजा ।
इन्द्रो वृत्रवधेनैव महेंद्रं समपद्यत ।।

अ.– 'शत्रूला पूर्णपणे धुळीला मिळविल्याशिवाय राजाला या जगात कीर्ती मिळत नाही, द्रव्य मिळत नाही आणि त्याची प्रजा (सुरक्षित) राहात नाही. सर्व देवांचा राजा इन्द्र त्यालाही वृत्रासुराला ठार मारल्यावरच महेंद्रपद प्राप्त झाले.'

व्य.– राजसत्ता स्वीकारल्यानंतर राजाला शत्रूवर दया दाखवून चालत नाही. त्याचा पूर्ण निःपात केल्याशिवाय राजसत्ताही स्थिर राहात नाही व कीर्तीही मिळत नाही. या सिद्धांतातून इन्द्रही –अमरावतीचा शास्ताही सुटला नाही. दैत्यवंशीय विश्वरूपाला इन्द्राने एकदा देवगुरू केले होते. विश्वरूप हा दैत्यांचा पक्षपाती असल्याने त्याने देवांप्रमाणे दैत्यांनाही हविर्भाग देण्यास प्रारंभ केला. त्यामुळे क्रुद्ध होऊन इंद्राने त्याला मारले. विश्वरूपाचा पिता त्वष्टृ याने पुत्रवधाचा सूड घेण्यासाठी वृत्र नावाच्या असुराला इंद्रावर सोडले. वृत्रासुराच्या अत्याचाराने इंद्राचे केवळ राज्यच नव्हे तर इंद्रपदही धोक्यात आले. त्या वेळी इन्द्राने वृत्राचा वध करूनच आपले राज्य, आपले स्वामीत्व टिकविले.

why dative

५५. इन्द्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा

सं. – महा. १.४६.११. जनमेजयाने पिता परीक्षित राजाच्या मृत्यूचा सूड उगविण्यासाठी सर्पसत्र केले. यच्चयावत सर्पांची यज्ञात आहुती पडत असताना इंद्राच्या आश्रयाने राहिलेला तक्षक जिवंत राहिलेला पाहून जनमेजयाला राग आला. तक्षकाच्या दंशानेच परीक्षिताचा मृत्यू झाला असताना अशा तक्षकाला आधार देणाऱ्या इंद्राचीही आहुती देण्यास त्याने ऋत्विजांना सांगितले. या कथेवरूनच 'इन्द्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' अशी उक्ती प्रचलित झाली.

✓ **मू. – इन्द्रस्य भवने विप्रा यदि नागः स तक्षकः ।**
तमिन्द्रेणैव सहितं पातयध्वं विभावसौ ।।

अ.– 'ब्राह्मणांनो, इंद्राच्या घरी जर तो तक्षक नाग असेल तर इंद्रासह त्याला अग्नीत पाडा (त्याचीही आहुती द्या)'

व्य.– गुन्हेगार तक्षकाचे संरक्षण करणाऱ्या इन्द्रालाही शिक्षा करण्यास ब्राह्मण कचरले नाहीत.आजच्या काळातही एखादा सज्जन दयेपोटी दुर्जनाला पाठीशी घालतो,त्या वेळी समाज त्याला क्षमा करीत नाही. दुर्जनासह त्यालाही हकनाक शिक्षा भोगावी लागते. पुराणातील या गोष्टीचा व्यवहारात प्रत्यय येत असल्याने जनमेजयाचे हे उद्‌गार वाक्प्रचार बनले आहेत. आजही समाजात दुर्जनांना पाठीशी घालणाऱ्या सज्जनाला इंद्राची उपमा दिली जाते.

५६. इष्टं धर्मेण योजयेत्

सं. – पंच.५.४१. कान्यकुब्ज देशात विद्याप्राप्ती करून चार ब्राह्मण स्वदेशाकडे निघाले. नुकतीच शिकलेली शास्त्रवचने व्यवहारात आणताना सारासारविचार न केल्याने त्यांची फजिती झाली. इष्ट वस्तू धर्मानुकूल असावी किंबहुना धर्माला अनुकूल असेल त्याचीच इच्छा करावी अशी लोकोक्तीही आहे.

सप. इ ३, ४.

मू. – **सत्कुले योजयेत्कन्यां पुत्रं विद्यासु योजयेत् ।**
व्यसने योजयेच्छत्रुमिष्टं धर्मेण योजयेत् ।। **पंच.** ५.४१; सप. इ. ३.

अ.– 'कुलीन घराण्याशी कन्यासंबंध जोडावा. पुत्राला विद्येची आवड लावावी. शत्रूवर संकट आणावे. धर्माला अनुसरून इच्छित कर्म करावे.'

मू. – **उत्तमं प्रणिपातेन शूरं भेदेन योजयेत् ।**
नीचमल्पप्रदानेन इष्टं धर्मेण योजयेत् ।। सप. इ. ४.

अ. – 'श्रेष्ठाला वंदन करून, तर शूराला भेदनीतीने जोडावे (मैत्री करावी). कनिष्ठाला थोडेसे देऊन आणि आपले इच्छित धर्माला अनुसरून प्राप्त करावे.

व्य. – धर्माने विहित असेल तेवढेच स्वीकारावे. किंबहुना आपली इच्छित (इष्ट) गोष्ट प्राप्त करून घेताना धर्माला अनुसरून असलेल्या मार्गाचाच अवलंब करावा. धर्माच्या साहाय्यानेच सर्व प्राप्त करावे, असा शास्त्राचा आदेश आहे. मुळात मात्र (पंचतंत्रात) धर्मादेश नीट न समजलेल्या मूर्ख ब्राह्मणाने शब्दशः अर्थ घेऊन वेगाने जाणाऱ्या उंटाला धर्माची त्वरित गती समजून त्याच्याशी गाढवाला बांधले. त्यांच्या या शास्त्रार्थाचा अजब अर्थ लावण्यामुळे ब्राह्मणाचे लोकांत हसे झाले. पढतमूर्ख असलेल्या चौघा ब्राह्मणांनी स्मशानात असलेल्या गाढवालाच आपला मित्र मानला जो राजद्वारीही असतो व स्मशानतही असतो तोच आपला मित्र मानावा या शास्त्रातील वचनाला अनुसरून त्यांनी त्याला मित्र मानले. त्याच वेळी वेगाने जाणाऱ्या उंटाला पाहून, धर्माची गती त्वरित असते असे मनाशी म्हटले. जे आपले इष्ट असेल ते धर्मासह असले पाहिजे हा शास्त्रार्थ आठवून इष्ट असलेल्या मित्र गाढवाला उंटाच्या गळयात बांधले. अशा तऱ्हेने शास्त्रवचनाचा आशय ध्यानात न घेता कृती करणारे ते ब्राह्मण हास्यास्पद ठरले.

५७. इहैव फलमश्नुते

सं. – सप. अ. ४९.

मू. – **त्रिभिर्वर्षैस्त्रिभिर्मासैस्त्रिभिः पक्षैस्त्रिभिर्दिनैः ।**
अत्युत्कटैः पुण्यपापैरिहैव फलमश्नुते ।।

अ. – 'तीव्र अशा पुण्याचे अथवा पापाचे फल येथेच (इहलोकीच) भोगावे लागते. मग ते तीन वर्षांनी, तीन महिन्यांनी, तीन पंधरवड्यांनी किंवा तीन दिवसांनी का भोगावे लागेना (पण येथेच भोगावे लागते).

व्य. – सामान्यत: कर्माचे फल तात्काल मिळत नाही. क्रियमाण (चालू कर्माचे) कर्माचे संचित बनते आणि संचितच प्रारब्धरूपाने भोगावे लागते अशी कर्मपरंपरा आहे. परंतु पापाची परिसीमा गाठल्यावर त्याचे फल तात्काल मिळते. शिशुपालाचे शंभर अपराध पूर्ण होताच कृष्णाने क्षणात त्याचा वध केला. तसेच उत्कृष्ट पुण्याचरण घडल्यास त्याचेही फल लगेच लाभते, क्षणात उद्धार होतो. म्हणूनच अत्यंत तळमळीने दिलेली आशीर्वचने किंवा तळतळाट होऊन दिलेले शाप जेव्हा फळाला येतात तेव्हा या उक्तीची प्रचिती येते.

अन्याय, जुलूम, अत्याचार मग तो व्यक्तिगत असो की सार्वजनिक असो, सामाजिक असो की राजकीय असो त्याचा अंत कधी ना कधी होतच असतो. प्रत्येक कंसाला त्याचा कृष्ण भेटतच असतो. या दृष्टीने हिंदीतील म्हण लक्षात घेण्यासारखी आहे; 'भगवानके दरबारमें देर है लेकिन अंधेर नहीं' – म्हणजे परमेश्वरी योजनेत एखाद्या बऱ्या-वाईट गोष्टीचा निवाडा होण्यास (देर) विलंब लागत असेल, परंतु (अंधेर) त्यावर कायमचा पडदा कधीच पडत नाही; कधी ना कधी तो उजेडात येऊन त्याचा न्याय होतच असतो. याचे कारण एका व्यक्तीची अथवा असंख्य व्यक्तींची, समूहाची, समाजाची इच्छाशक्ती अती तीव्र असेल, त्या तीव्र इच्छाशक्तीने त्या व्यक्तीने अथवा समाजाने एखादी वाईट अथवा चांगली पराकोटीची क्रिया केली अथवा एखाद्या वाईट अथवा चांगल्या पराकोटीच्या क्रियेविरुद्ध प्रतिक्रिया केली तर ती फळास येतेच, असा इतिहासाचाही दाखला आहे. या संदर्भात वरील सुभाषित लक्षात घेतले पाहिजे. 'याचि देही याचि डोळां' व्यक्तिगत किंवा सामूहिक, सामाजिक अथवा राजकीय तीव्र पाप-पुण्याचे बरे-वाईट फळ मिळालेले पाहता येते, अशी तीव्र तळमळ असेल तर ती फलद्रूप होते, असे सुभाषितकाराला आवर्जून सांगावयाचे आहे.

(ई)

५८. ईशा वास्यमिदँसर्वम्

(पाहा : तेन त्यक्तेन भुंजीथा)

सं. – ईश. १. यजुर्वेदाच्या वाजसनेयी संहितेचा भाग असलेल्या ईशोपनिषदाचा हा पहिला मंत्र आहे.

मू. – ॐ ईशा वास्यमिदं सर्वं यत्किञ्च जगत्यां जगत् ।
तेन त्यक्तेन भुञ्जीथा मा गृधः कस्य स्विद्धनम् ।।

अ. – 'या पृथ्वीवर जे काही चराचर वस्तुजात आहे ते हे सर्व ईश्वराने आच्छादिलेले आहे (व्यापलेले आहे). त्याच्याप्रित्यर्थ काही करून, त्याग करून मग उपभोग घे. कोणाच्याही धनाचा अपहार करू नकोस.'

व्य. – मंत्राच्या पहिल्या भागात 'चराचर ब्रह्मरूप आहे' - असा तत्त्वोपदेश केला आहे. हा उपदेश ध्यानात ठेवूनच सर्व वस्तूंचा वापर करावा व उपभोग घ्यावा. त्यामुळे हळूहळू अंगी विरक्ती बाणत जाईल. आत्मज्ञानाची इच्छा करणाऱ्या पुरुषाने दुसऱ्याच्या धनाची यत्किंचितही अभिलाषा धरू नये. समाजवादाची शिकवण तरी यापेक्षा वेगळी काय आहे? आहे ते सर्व समाजाचे, त्यातले गरजेपुरते, त्या समाजपुरुषाच्या गरजा भागविल्यानंतर उरेल ते आपण घ्यावे, त्यातच निर्वाह करावा, असा हा समष्टीजीवनाचा उदात्त उपदेश आहे.

५९. ईश्वरेच्छा बलीयसी

सं. – सप. ब २, ३.

सं.– सुर. २. दैवाख्यानम् ५२. प्रयत्न व दैवी कृपा या दोहोंवर माणसाचे यशापयश अवलंबून असते. किंबहुना दोन्हींची साथ असेल तर साफल्य सुलभतेने मिळते. परंतु परमेश्वराची इच्छा नसेल तर 'करायला गेलो एक आणि झाले भलतेच' अशी अवस्था होते.

मू. – भ्रमन्वनान्ते नवमंजरीषु न षट्पदो गन्धफलीमजिघ्रत् ।
सा किं न रम्या स च किं न रन्ता बलीयसी केवलमीश्वरेच्छा ।। सप. ब २.

अ.– वनात हिंडताना भ्रमर चाफ्याच्या फुलाचा आस्वाद घेत नाही तर आम्रमंजिरीचा (घेतो). ती (फुले) काय रमणीय नसतात की तो भुंगा रसिक नाही? ईश्वराची इच्छाच श्रेष्ठ आहे. (दुसरे कारण नाही).'

म.– वह्नौ विशुद्धामपि जानकीं तां जहौ वनान्ते किल रामचन्द्रः ।
सा किं न शुद्धा स च किं न वेत्ता बलीयसी केवलमीश्वरेच्छा ।। सप. ब ३.

अ.–'अग्नीत शुद्धता (सिद्ध) झालेल्या जानकीला रामाने वनात सोडून दिले. ती काय शुद्ध (जात्याच पवित्र) नव्हती की तो (राम) ते (पावित्र्य) जाणत नव्हता? ईश्वरेच्छाच याला कारण आहे.'

मू. – स्वयं महेशः श्वशुरो नगेशः सखा धनेशस्तनयो गणेशः ।
तथापि भिक्षाटनमेव शंभोर्बलीयसी केवलमीश्वरेच्छा ।। सुर. २. दैव. ५२.

अ. – 'स्वतः महान् देव असून (ज्याचा) सासरा नगाधिपती आहे, मित्र कुबेर आहे आणि पुत्र गणांचा प्रमुख गजानन आहे, तरी देखील शंकराला भिक्षेसाठी हिंडावे लागते. याला कारण (एकच) ईश्वराची इच्छाच बलवान आहे.'

व्य.– ईश्वरेच्छा हा जगातील सर्वश्रेष्ठ न्याय आहे. तिच्यापुढे कोणाचेही चालत नाही. परमेश्वराच्या इच्छेप्रमाणेच सर्व गोष्टी घडून येतात. जगातील सारी घडामोड परमेश्वरी प्रेरणेनुसार–संकेताप्रमाणे होत असते. त्यात बदल घडविण्याचे सामर्थ्य कोणाच्यातही नाही. हेच पटवून देण्यासाठी आदिदेव महादेवाचा दृष्टान्त दिला आहे.

महादेवाचे आप्तेष्ट सुखात असूनही शंकराला भिक्षाटनाचाच वर लाभला. तद्वत सर्व तऱ्हेचे प्रयत्न करूनही अपेक्षित हेतू साध्य न झाल्यास त्याचे कारण ईश्वरेच्छाच मानले जाते. विशेषत: एखादी व्यक्ती निधन पावली तर तिच्या नातेवाइकांचे सांत्वन करण्यासाठी ही उक्ती वापरण्याचा पूर्वापार प्रघात आहे.

(उ)

६०. उत्तिष्ठत! जाग्रत ! प्राप्य वरान्निबोधत !

(पाहा : क्षुरस्य धारा)

सं.– कठ १.३.१४. यमाकडे अतिथी म्हणून राहिलेल्या नचिकेत्याला यमधर्माने अमर आत्म्याचे स्वरूप सांगितले. जगातल्या नाशिवंत वस्तूंचे अंतरंगही त्याने स्पष्ट करून दाखविले. आत्मज्ञान करून घेण्याचा उपाय येथे त्याने नचिकेत्याला सांगितला.

मू. – उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत ।
क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्गं पथस्तत्कवयो वदन्ति ।।

अ. – 'उठा, (अज्ञाननिद्रेतून) जागे व्हा. श्रेष्ठ आत्मज्ञानी आचार्यांजवळ जाऊन आत्म्याला जाणून घ्या. वस्तऱ्याच्या पाजळलेल्या धारेवरून चालत (ओलांडून) जाणे जसे कठीण आहे तसा हा आत्मज्ञानाचा मार्ग (चालून जाणे) फार कठीण आहे, असे विद्वान लोक म्हणतात.'

व्य.– आत्मज्ञानासाठी प्रयत्न करावा, अशी जाग येणेही फार कठीण असते. जाग आल्यानंतर वाटचाल करणे खडतर असते. त्यासाठी विचार–विवेक–वैराग्य–उपासना, शमदमांचे पालन, अशी कठोर आत्मसंयमाची साधने दीर्घकाल, सतत व दक्षतेने आचरावी लागतात. ज्यांनी पूर्वी आत्मज्ञान करून घेतले आहे असे श्रेष्ठ पुरुष या वाटचालीतले मार्गदर्शक होत. ग्लानी आलेल्या, कर्तव्य विसरून झोपी गेलेल्या माणसांना उद्देशून वैदिक द्रष्टयांनी दिलेली ही हाक आहे. युगायुगात लोकमान्यासारखे जे द्रष्टे मार्गदर्शक जन्म घेतात, ते याच शब्दांत स्वत:च्या किंकर्तव्यमूढ झालेल्या बांधवांना आवाहन करतात. स्वामी विवेकानंदांनी याच प्रबोधक वचनांचा उपयोग जनजागृतीसाठी–विशेषत युवकांना कार्योद्युक्त होण्यासाठी दिलेल्या हाकेत केलेला आहे, त्यामुळेच तो विशेष प्रसिद्ध आहे.

६१. उत्साहो बलवानार्य

सं.– वारा. ४.१.१२१. उत्साह ही एक मानवाच्या शरिरातील विलक्षण शक्ती आहे. उत्साहासारखे दुसरे बल नाही, असे लक्ष्मणाने श्रीरामाला सांगितले. प्रसंग असा आहे की, सीता नाहीशी झाल्यामुळे तिच्या विरहाने राम विव्हळ व हताश झाला आहे. अशा वेळी उत्साहाचे माहात्म्य सांगून लक्ष्मण त्याला धीर देत आहे.

मू.– उत्साहो बलवानार्य नास्त्युत्साहात् परं बलम् ।
सोत्साहस्य हि लोकेषु न किंचिदपि दुर्लभम् ।।

अ.– 'उत्साहशील मानवाला अशक्य असे काहीच नाही. (कोणत्याही गोष्टीची प्राप्ती करण्यास) उत्साहासारखे दुसरे श्रेष्ठ बल नाही. जीवनात उत्साही व्यक्तीला दुर्लभ असे काही नाही.'

व्य. – दुर्दम्य उत्साहाच्या जोरावर प्रयत्नांची पराकाष्ठा करून माणसाला इच्छित साध्य करता येते. उत्साहाने सर्व कार्ये पार पाडता येतात. म्हणूनच उत्साहापेक्षा श्रेष्ठ बल नाही, असे लक्ष्मणाने हतोत्साह झालेल्या रामाला निक्षून सांगितले. पुढे तर रामाने सतत उत्साहाने सर्वांच्या अंतःकरणात चैतन्य निर्माण करून, लंकेवर स्वारी करून रावणवध केला. स्वतःच्याच उदाहरणाने हा सिद्धान्त पटवून दिला.

६२. उदारचरितानां तु

(पाहा : गणना लघुचेतसाम्; वसुधैव कुटुम्बकम्)

सं.–योवा. ५.१८.६१. वासनेचा नाश करणाऱ्या विचाराचा उदय झाला म्हणजे क्रमाने जीवन्मुक्ताची अवस्था प्राप्त होते. अशा जीवन्मुक्ताचा व्यवहार कसा असतो हे वसिष्ठांनी रामाला सांगितले आहे.

मू. – अयं बन्धुरयं नेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु विगतावरणैव धीः ॥

अ. – 'हा माझा बंधू आहे, हा नाही (हा परका आहे), असे संकुचित बुद्धीच्या लोकांचे विचार असतात; तर थोर पुरुषांच्या बुद्धीवरील (तुझे – माझे असा भेद करणाऱ्या अज्ञानाचे) पटल दूर झालेले असते.'

व्य. – मी–माझे व तू–तुझे असा भेद करणारी बुद्धी व त्याला अनुसरून आचरण हा सामान्य माणसांचा नेहमी अनुभवाला येणारा व्यवहार आहे. पण ज्याच्या अन्तः-करणातून द्वैतभाव मावळला व सर्वत्र एकच तत्त्व भरून राहिले आहे असा साक्षात्कार ज्याला झाला, त्याच्या ठिकाणी आपपर भाव कसा राहील? 'हे विश्वचि माझे घर' या वृत्तीने प्राणिमात्रांना तो आपले बंधू मानतो.

६३. उद्धरेदात्मनात्मानम्

सं.– भगी. ६.५. आत्मस्वातंत्र्याचे वर्णन करताना प्रकृती कितीही बलवत्तर झाली तरी ज्याने त्याने आपला उद्धार करून आत्मोन्नती केली पाहिजे, असे गीताकारांनी प्रतिपादले आहे.

मू.–उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥

अ. – '(मनुष्याने) आपणच आपला उद्धार करावा. आपणच आपल्या स्वतःला (कधीही) खचू देऊ नये. कारण (प्रत्येकजण) आपणच आपल्या स्वतःचा बंधू (उद्धारास कारण) किंवा आपणच आपला शत्रू (विनाशाला कारण) म्हटला आहे.'

व्य.–आत्मतत्त्वाचे महत्त्व मनात ठसविण्याकरिता अन्वय (आपणच आपला मित्र)-व्यतिरेकाने (आपणच तत्त्व न जाणल्याने शत्रू) सांगितले आहे. आत्मोन्नती ही गोष्ट स्वाधीनची आहे. आत्मज्ञानाने देहेंद्रियांस मोक्षानुकूल कर्मे करावयास लावण्याची जी ही शक्ती तिलाच (आत्मस्वातंत्र्य) म्हणून गीतेने गौरविले आहे. हा श्लोक आजच्या काळातही प्रेरक मंत्र म्हणून प्रसिद्ध आहे. समाजाला, राष्ट्राला स्वावलंबी बनविण्यासाठी या मंत्राचा उपयोग नेत्यांनी व उपदेशकांनी वारंवार केलेला आहे.

६४. उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मी

(पाहा : यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः।)

सं.– पंच. १.३९२. विवेकी व्यक्तीने दैव प्रतिकूल असले तरी प्रयत्नांची पराकाष्ठा करायला हवी. दैवावर सर्वस्वी हवाला ठेवून राहाणे ही कर्तव्यच्युती आहे, हेच मित्रभेद प्रकरणात करटकाने दमनकाला सांगितले.

मू. – उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मी दैवं हि दैवमिति कापुरुषा वदन्ति।
दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ॥

अ.–'उद्योगी नरश्रेष्ठाकडे लक्ष्मी स्वतः येते. भीरु पुरुषच दैव दैव असे म्हणत स्वस्थ बसतात. (दैवावर अवलंबून निष्क्रिय राहातात). आपल्या हिंमतीने दैवावर मात करून पौरुष गाजवावे (यशस्वी व्हावे). प्रयत्न करूनही जर इष्टप्राप्ती होत नसेल तर तेथे दोष तो कोणता ? (अर्थात यात कोणाचाच दोष नाही.)'

व्य.– दैववादी आणि प्रयत्नवादी यांच्यांत पूर्वीपासूनच वाद चालू आहे. कर्तव्य-पराङ्मुख माणसे दैवाचा आश्रय घेतात तर आत्मविश्वास असलेले प्रयत्नवादी प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. दैवाची फिकिर न करता 'मदायत्तं पौरुषं' दाखविण्यासाठी त्यांची धडपड चालू असते. म्हणून एखादे वेळी अपयश आले तरी प्रयत्न पूर्ण केल्याचे त्यांना समाधान असते व यशाच्या वेळी श्रमसाफल्य वाटते. विलक्षण यजद्दीच्या जोरावर दैव बदलण्याची त्यांची हिंमत असते. लोकांनी प्रयत्नवादी बनावे ासाठी या सुभाषिताचा उपयोग केला जातो; तसाच यत्न करूनही एखादे वेळी-यश न आल्यास निराश होऊ नये असेही सांगण्यासाठी या सुभाषिताचा उपयोग केला जातो.

६५. उद्यमेन हि सिध्यन्ति

सं.– पंच. २.१३६. सोमिलक या कपड्यांच्या व्यापाऱ्याला पैसे कमी मिळत. अधिक धन मिळविण्यासाठी अधिक श्रम करण्याचा उपदेश त्याला त्याच्या पत्नीने केला, तो असा :

मू.– उद्यमेन हि सिध्यन्ति कार्याणि न मनोरथैः।
न हि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः ॥

अ.–'उद्योग केल्यानेच कामे यशस्वी होतात, केवळ मनोराज्य केल्याने होत नाहीत. झोपलेल्या सिंहाच्या तोंडात (शिकार) पशू (आपोआप) प्रवेश करीत नाहीत.'
व्य.– ऐहिक किंवा पारमार्थिक कल्याणासाठी सतत प्रयत्नांची आवश्यकता असते. आळशी मनुष्य योग्य ते प्रयत्न करीत नाही व अपयश आले की दैवाला दोष देतो, दैववादाच्या पांघरुणाखाली स्वतःचे दोष लपवितो. लोकांना उद्योगाला प्रवृत्त करण्यासाठीच या सुभाषिताचा उपयोग नित्य केला जातो.

६६. उपमा कालिदासस्य

(पाहा : माघे सन्ति त्रयो गुणाः)

सं. – सुर. २. विशिष्ट कविप्रशंसा ६३. संस्कृत साहित्यातील कविवरांची कीर्ती वर्णन करून सांगितल्यावर प्रत्येकाचे वैशिष्टच सांगणारा कविवृंदाचा एकत्रित उल्लेख.

मू. – उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम् ।
दण्डिनः पदलालित्यं माघे सन्ति त्रयो गुणाः॥

अ.–' उपमा कालिदासाची (वैविध्यपूर्ण,रम्य),भारवीची अर्थघनता (अर्थगौरव) आणि दण्डीची लालित्यपूर्ण शब्दयोजना हे तिन्ही गुण एका माघात (एकवटले) आहेत.'
व्य. – व्यक्ती तितक्या प्रकृती या न्यायाने प्रत्येक कलाकाराचे वेगळे वैशिष्टच असते. केवळ कलाकारच नव्हे तर प्रत्येक माणसातही काही वैशिष्टच असते. अशा वैशिष्टयाचा व्यवहारात जेव्हा उल्लेख केला जातो तेव्हा उपमा अलंकारावरील कालिदासाच्या प्रभुत्वाचा निर्देश दृष्टांताप्रमाणे केला जातो.

(ऊ)

६७. ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष

सं. – महा. १८.५.४९. अधिकारी व्यक्ती हितकारक गोष्टींसाठी इतक्या कळकळीने आवाहन करीत असताना त्याचे कोणीच ऐकत नाही याची प्रचीती वेदव्यासांनी एवढे महाभारत सांगून संपत आल्यावर आपल्या शब्दांत दिली आहे.
योवा. ६.१२६.९४. वसिष्ठांचेही हेच सांगणे आहे.

मू. –ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चित् शृणोति मे (माम्) ।
धर्मादर्थश्च कामश्च स किमर्थं न सेव्यते ॥ महा. १८.५.४९.

अ.–'हात उभारून, मोठ्याने ओरडून मी सांगतो आहे, पण माझे कोणीही ऐकत नाही. धर्मापासून अर्थ (धन) आणि उपभोग प्राप्त होतात, (असे असूनही) त्या धर्माचे आचरण का बरे केले जात नाही '?

मू. – ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष न च कश्चिच्छृणोति तत्।
असंकल्पः परं श्रेयः स किमन्तर्न भाव्यते ।। योवा. ६. १२६.९४.

अ.–'हात वर करून (मी) मोठ्याने ओरडतो आहे पण माझे (म्हणणे) कोणीच (लक्ष देऊन) ऐकत नाही. संकल्परहित होणे हेच श्रेयस्कर (संकल्पराहित्याने मुक्ती)

असताना (ही गोष्ट लोक) अंतःकरणात ठसवून का घेत नाहीत (आचरणात का आणीत नाहीत) माझे हे कळकळीचे सांगणे?'

व्य. – पैसा आणि विषयोपभोग यांचा पाठलाग करीत असताना मनुष्य धर्म गुंडाळून ठेवतो. धर्माचे नियम ही त्याला अडगळ वाटते. धनाच्या आणि सुखाच्या अनिर्बंध इच्छेची परिणती दुःखातच होते याचा त्याला शेवटी अनुभव येतो.

सरळ वागून, धर्माचरण करून, धन व सुखे मिळणार नाहीत अशी जी सर्वसाधारण माणसांची समजूत असते त्यामुळे त्यांना धर्म ही अडगळ वाटते. परंतु व्यासांनी येथे आग्रहाने कंठरवाने सांगितले आहे की, धर्माचरणामुळे संपत्ती आणि सुखेही प्राप्त होतात, म्हणून तरी माणसांनी धर्माचे आचरण करावे. धर्माचा संबंध केवळ परलोकाशी नाही तर ऐहिक जीवन सुखी करण्याशी आहे. वास्तविक समाजाच्या कल्याणासाठीच, त्याच्या हिताचाच उपदेश विचारवंत करीत असता समाज त्याकडे दुर्लक्ष करतो, त्याला उद्देशून वरील उक्ती वापरली जाते.

(ऋ)

६८. ऋणं कृत्वा घृतं पिबेत्

सं. – सदसं. चार्वाक. लोकांना चटकन पसंत पडेल अशा म्हणजे 'लोकायतिक' चार्वाकांच्या तत्त्वज्ञानाचा सारांश या श्लोकामध्ये सांगितला गेला आहे.

मू. – यावज्जीवेत् सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः ।

अ.–'आयुष्य आहे तोपर्यंत सुखाने जगावे, कर्ज काढून तूप प्यावे, (कारण) जळून भस्मसात झालेला देह पुन्हा कोठून जन्माला येणार आहे!'

व्य. – पूर्व-पुनर्जन्माची कल्पना चार्वाकवाद्यांना मान्य नाही. मेल्यानंतर स्वर्ग मिळावा म्हणून येथे इहलोकी खडतर व्रते, तप, यज्ञादी कर्मे करून शरिराला कष्ट द्यावेत, हे त्यांच्या मते मूर्खपणाचे आहे. मरणाबरोबरच माणसाचा शेवट होतो, तर मग, जिवंत असेपर्यंत भोगता येईल तितके सुख भोगावे व त्यासाठी आवश्यक ती साधने प्राप्त करून घ्यावीत. 'खा – प्या – मजा करा' या सुखवादाचा चार्वाकांनी पाठपुरावा केला. उपभोग आणि चैन हेच आयुष्याचे सर्वस्व मानणारे लोक या तत्त्वज्ञानाचा (?) आधार घेत असतात. चार्वाकांच्या वरील शब्दांनी ते स्वतःचे समर्थन करतात. आधुनिक जडवादाचा हा मोठा आधार आहे.

६९. ऋणानि त्रीण्यपाकृत्य

सं. – मनु ६.३५. संन्यास घेऊन मोक्ष मिळविण्याचा प्रयत्न करण्याचा योग्य काल कोणता हे मनूने सांगितले आहे.

मू. – ऋणानि त्रीण्यपाकृत्य मनो मोक्षे निवेशयेत् ।
अनपाकृत्य मोक्षं तु सेवमानो व्रजत्यधः ।।

अ.–'तीन प्रकारच्या ऋणांची फेड करून, मग मन मोक्षाकडे लावावे. अशा प्रकारे ऋणांची फेड न करता, मोक्षासाठी (संन्यास घेणाऱ्याचा) प्रयत्न करणाऱ्याचा अधःपात होतो.'

व्य. – मनुष्य जन्माला आल्यानंतर त्याच्यावर तीन प्रकारचे ऋण फेडण्याची जबाबदारी येते - देवऋण, पितृऋण व ऋषिऋण. यज्ञात आहुती देऊन देवांना संतुष्ट केल्याने देवांचे, विवाह करून पुत्राला जन्म दिला म्हणजे वाडवडिलांचे (पितृऋण) व विद्याभ्यास करून ऋषींचे ऋण फेडले जाते.

मोक्ष मिळविण्यासाठी संन्यास घेणे ही जीवनातली शेवटची म्हणजे चौथी अवस्था किंवा चौथा आश्रम आहे. मोक्षासाठी सर्व वस्तूंबद्दलची आसक्ती नष्ट व्हावी लागते. ब्रह्मचर्याश्रमात विद्याध्ययन, गृहस्थाश्रमात घर चालविण्यासाठी योग्य ती कर्तव्ये करीत असताना हळूहळू सांसारिक गोष्टींचे, विषयोपभोगांचे स्वरूप समजून येते; व मनुष्याला त्यांचा कंटाळा येतो आणि त्यांच्या पलीकडील तत्त्व समजावून घ्यावे अशी त्याला इच्छा होते. तो संसारातून अंग काढून घेतो. ही संन्यास घेण्याची योग्य वेळ होय. ज्यांच्या सांसारिक इच्छा पूर्ण झालेल्या नसतात, त्यांनी संन्यास घेतल्यास त्यांच्या अतृप्त इच्छा मोक्षमार्गात अडथळा करीत राहातात व त्यामुळे तो अधोगतीला जातो. संन्यास घेण्यापूर्वीच्या कर्तव्यांशी मनूने ऋणत्रयाची कल्पना जोडली आहे. पण त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे व्यक्ती ही समष्टीहून स्वतंत्र नाही, व्यक्तीचे अस्तित्व समाजावर अवलंबून आहे. आणि म्हणून मानवी जीवनात सामाजिक कर्तव्याची जाणीव या आदेशाने येथे मनूने स्पष्टपणे करून दिली आहे.

(ए)

७०. एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति

सं. – ऋग्. १.१६४.४६. सूक्तकर्ता दीर्घतमा औचथ्य ऋषी. जगताच्या आरंभी सत् अस्तित्वात असून त्याची जशी प्रतीति येईल, त्याप्रमाणे त्या एकमेवाद्वितीय सत्‌ला संबोधिले जाते.

मू. – इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुः अथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् ।
एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ।।

अ. – '(मूलतः एकच असलेल्याला) कोणी इंद्र,मित्र,वरुण किंवा अग्नि म्हणतात (संबोधतात). हाच वेगवान दिव्य सुपर्ण (पंखयुक्त) गरुड होय. हा एकच असून शहाणे लोक ह्याला अनेक नावांनी संबोधितात. अग्नि, यम अथवा मातरिश्वनही म्हणतात.'

व्य. – जगताचे आरंभी एक सत् तत्त्वच असून त्यालाच ज्ञानी लोक आपापल्या अनुभूतीप्रमाणे विविध नामांनी ओळखतात. जे मुळात एक व नित्य (सत्) त्यालाच

निरनिराळी नावे दिली जातात. अद्वैत तत्त्वज्ञानाचा हा बीजमंत्र आहे. व्यवहारात एकदेवत्वाची कल्पना या सूक्ताने मांडली जाते. विविधतेतून एकता हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्टय यातून व्यक्तविले जाते.

७१. एका भार्या सुंदरी वा दरी वा

(पाहा : एको देव: केशवो वा शिवो)

सं.– भृंश. ६५. *वृत्तीत पूर्णता असावी, मिळमिळीत मध्यम मार्ग स्वीकारल्याने काहीच लाभ होत नाही, हे पटवून देताना भर्तृहरीने योजलेली ही पदावली प्रसिद्ध आहे.

मू. – एको देव: केशवो वा शिवो वा । ह्येकं मित्रं भूपतिर्वा यतिर्वा ।
एको वास पत्तने वा वने वा । ह्येका भार्या सुंदरी वा दरी वा ।। *

अ. – 'एका शंकराला तरी देव मान अथवा विष्णु तरी आराध्य दैवत मान. मित्र संन्याशाला तरी कर किंवा राजाशी तरी मैत्री जोड.रानात तरी राहा वा नगरात राहा. (निश्चितपणे) सुंदरी स्त्रीचा तरी स्वीकार कर किंवा (रानातील) दरीचा तरी आश्रय घे.'

---

*हा श्लोक निर्णयसागर–सुभाषितत्रिशतीत नाही. भर्तृहरीच्या शतकत्रयाचा अनुवाद करणाऱ्या ल. गो. विंझे यांच्या (१९६९) प्रतीवरून घेतला आहे.

व्य. – कोणतीही एक गोष्ट स्वीकारता येते. पूर्णपणे भिन्न असणाऱ्या वा काही अंशी विरोधात्मक अशा दोन वस्तू एकाच वेळी प्राप्त होऊ शकत नाहीत. म्हणून शहाण्या माणसाने कोणत्या तरी एकाच मार्गाचा अवलंब करावा; त्यातूनच इच्छित ईप्सित साध्य होईल, असा या उक्तीचा अभिप्राय आहे. एकनिष्ठा दर्शविण्यासाठी, कोठेतरी एकाच ठिकाणी, एकाच ध्येयावर किंवा एकाच व्यक्तीवर अनन्य श्रद्धा असली पाहिजे हे सांगण्यासाठी या उक्तीचा वापर होतो.

७२. एको देव: सर्वभूतेषु गूढ:

सं.–श्वेताश्वतर. ६. ११. कोळी ज्याप्रमाणे स्वत:पासून उत्पन्न केलेल्या तंतूंनी जाळे विणून त्यात अडकून राहातो त्याप्रमाणे अद्वितीय व स्वयंप्रकाश आत्मा, स्वत:च्या मायेने उत्पन्न झालेल्या नामरूपात्मक जगत्स्वरूपाने स्वत:ला आच्छादित करून घेतो. त्यामुळे सर्वव्यापी असूनही तो अनाकलनीय आहे. अशा आत्म्याचे स्वरूप श्वेताश्वतर मुनींनी येथे सांगितले आहे.

मू.–एको देव: सर्वभूतेषु गूढ: सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा ।
कर्माध्यक्ष: सर्वभूताधिवास: साक्षी चेता केवलो निर्गुणश्च ।।

अ. – 'सर्व प्राणिमात्रांच्या अन्तरंगात गुप्त–आच्छादित असलेला परमात्मा एकच आहे. तो सर्व जगाला व्यापून राहाणारा आहे, सर्व प्राण्यांचा अन्तर्यामी आहे. (शुभाशुभ

फल देणाऱ्या) कर्मांचा नियंता, सर्व भूतांच्या ठिकाणी साक्षी (उदासीन) रूपाने राहणारा केवल ज्ञानरूप आणि त्रिगुणातीत आहे.'

व्य.– आत्म्याच्या व्यापक पण सूक्ष्म स्वरूपाचे शब्द-ज्ञान उपनिषदांतील अशा प्रकारच्या श्रुतिवचनांवरूनच आपल्याला मिळू शकते. त्यानंतर त्याचे मनन व निदिध्यासन केल्याने त्याचा प्रत्यक्ष अनुभव येऊ शकतो व निरतिशय आनंदाचा लाभ होतो. साऱ्या चराचरात एकच परमेश्वर भरलेला आहे हे सत्य प्रतिपादन करण्यासाठी व्यवहारात या उक्तीचा अवलंब केला जातो.

७३. एको देवः केशवो वा शिवो वा

(पाहा : एका भार्या सुंदरी वा)

७४. एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः

सं.–मनु. २. २०. धर्मानुष्ठानाला योग्य असे प्रदेश सांगून तेथे राहाणाऱ्या 'शिष्ट' लोकांनी परंपरेने आचरिलेला जो धर्म तोच सदाचार होय व त्याचे सर्वांनी अनुकरण करावे असे मनूने सांगितले आहे.

मू.–एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन्पृथिव्यां सर्वमानवाः ।।

अ.– 'या प्रदेशात (भरतभूमीवर) जन्मलेल्या श्रेष्ठ वर्णाच्या पुरुषांकडून पृथ्वीवरील सर्व मानवांनी स्वतःच्या आचरणाचे धडे घ्यावेत.'

व्य.– भारत ही प्राचीन धर्मभूमी आहे. धर्म-तत्त्वज्ञान किंबहुना सर्व शास्त्रांचा मूल-स्रोत भरतभूमी आहे. भारतीय विद्यांच्या अभ्यासकांनी त्याचे श्रेष्ठत्व मान्य केले आहे. भारत जगाच्या गुरुस्थानी असल्याचे, इसवी सनाच्या सुरुवातीपूर्वीच मनूने लिहून ठेवले आहे. आधुनिक भारतीयांचा आचार मनूच्या उक्तीला साजेसा नसला तरी, प्राचीन भारताची आदर्श स्थिती मनूने येथे जी वर्णिली आहे ती भारतवासियांना, भारतीयांना निःसंशय अभिमानास्पद वाटते. आणि सत्य इतिहासाचे पुरेसे आकलन आज आपल्याला झालेले नसले तरी ही स्थिती असण्याइतकी योग्यता या भारतवर्षाची– आपल्या देशाची, एके काळी होती हे सांगता येते.

७५. एरण्डोऽपि द्रुमायते

सं.– हित. १. ६७. 'अरण्यात कोणी मित्र मिळत नाही म्हणून कावळ्याला देखील मित्र मानायला मी तयार आहे.' हरिणाच्या मांसाच्या लोभाने कावळ्याशी मैत्री करण्याला तयार झालेल्या कोल्हयाच्या तोंडून हे वचन आले आहे.

मू.–यत्र विद्वज्जनो नास्ति श्लाघ्यस्तत्राल्पधीरपि ।
निरस्तपादपे देशे एरण्डोऽपि द्रुमायते ।।

अ.–'ज्या ठिकाणी विद्वान् लोक नसतील, त्या ठिकाणी बेताच्या बुद्धीच्या माणसाचाही गौरव होतो. झाडांचा जेथे अभाव असतो, तेथे एरंड देखील 'द्रुम'–मोठा वृक्ष ठरतो.'
व्य.– छाया, पाना-फुलांचे सौंदर्य, रसाळ फळे यांचा अभाव असलेले एरंडासारखे शोभाहीन झाडही वैराण प्रदेशात सुंदर वाटते. अडाणी माणसांच्या समाजात सामान्य बुद्धीच्या, कमी शिकलेल्या माणसाला विद्वान् म्हणून मान्यता मिळालेली दिसली म्हणजे वाळवंटातल्या एरंडाचे स्मरण होते. समाजातील एक विदारक सत्यच या श्लोकाने सांगितले आहे. लब्धप्रतिष्ठित म्हणून वावरणाऱ्या कित्येक माणसांची खरी योग्यता तशी नसते. परंतु त्याहून श्रेष्ठ प्रतीचा माणूस त्या परिसरात नसला किंवा असूनही तो प्रकट झाला नाही किंवा पुढे आला नाही म्हणजे अपात्र माणसे सुद्धा प्रतिष्ठा पावतात. त्या परिस्थितीला हे उदाहरण चपखल लागू पडते.

७६. एष धर्मः सनातनः

(पाहा : कृते च प्रतिकर्तव्यम्; न ब्रूयात्सत्यमप्रियम् ।)

सं.–वारा. ५.१.१०६. मारुति उड्डाण घेऊन सीताशोधासाठी सागरोल्लंघन करीत असताना, रामाच्या पूर्वजांनी–सगरांनी केलेल्या उपकारांची फेड करण्याच्या इच्छेने, सागराने मैनाक पर्वतावर विश्रांती घेण्याची मारुतीला विनंती केली.

सप. ए ५.

मू. – स त्वां रामहिते युक्तं प्रत्यर्चयति सागरः।
कृते च प्रतिकर्तव्यमेष धर्मः सनातनः ।। वारा. ५.१.१०६.

अ.–'रामकार्याविषयी तत्पर असलेल्या तुझा आदर-सत्कार करण्यासाठी सागर उत्सुक आहे. कारण उपकारांची फेड प्रत्युपकाराने करावी, हा सनातन धर्म आहे.'

मू. – सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयान्न ब्रूयात्सत्यमप्रियम् ।
नासत्यं च प्रियं ब्रूयात् एष धर्मः सनातनः ।। सप. ए ५.

अ.–'सत्य (असेल तेच) बोलावे. प्रिय (होईल) असे बोलावे. सत्य असेल परंतु अप्रिय असेल तर ते बोलू नये. (तसेच) खोटे असेल पण प्रिय वाटेल असेही बोलू नये. हाच पूर्वापार (चालत आलेला) धर्म आहे.'

व्य.–दुसऱ्याने केलेला थोडाही उपकार स्मरून योग्य वेळी त्याला साहाय्य करणे हे धर्माचे लक्षण आहे. कृतज्ञता व्यक्त करण्याची हीच पूर्वापार रीत आहे. असा या श्लोकांचा भावार्थ असला तरी सर्वसामान्यपणे 'धर्माचे असे सांगणे आहे' अशा अर्थाने ही उक्ती संदर्भरहितही अनेकदा वापरली जाते.

(औ)

७७. औषधं जान्हवीतोयम्

सं. – सप. औ. १.

मू. – **शरीरे जर्जरीभूते व्याधिग्रस्ते कलेवरे ।**
औषधं जाह्नवीतोयं वैद्यो नारायणो हरिः ॥

अ.– 'म्हातारपण आले असताना, शरीर रोगांनी व्यापून निर्जीव झाले असताना, भगवान नारायण हाच वैद्य आणि गंगाजल हेच औषध.'

व्य. – मोरोपंतांनी वर्णन केलेली 'कृतान्तकटकामलध्वजजरा दिसो लागली। पुरस्सरगदांसवे झगडता तनू भागली'–ही आयुष्याच्या अखेरची अवस्था आली म्हणजे जीर्ण झालेल्या शरिरावर कोणत्याच औषधाचा परिणाम होत नाही. अशा वेळी धन्वन्तरी आला तरी मनुष्याला तो बरे करू शकत नाही. अशा वेळेला सर्वांचा तारक भगवन्त. त्याचे स्मरण आणि सर्वांत पवित्र अशा गंगेचे पाणी हेच औषध अशी स्थिती होते.

भगवन्तावरच ज्यांचा विश्वास असतो असे लोक वैद्यांना मानीत नाहीत आणि त्यांचे औषधही घेत नाहीत. त्यांच्या तोंडी याच पंक्ती असतात.

गरिबीमुळे ज्यांना वैद्याकडे जाता येत नाही व औषध घेता येत नाही तेही याच उक्तीने स्वतःचे समाधान करून घेतात.

(क)

७८. कण्टकेनैव कण्टकम्

सं. – पंच. ४.१९. 'लब्धप्रणाश' तन्त्रात गंगदत्त नावाचा बेडूक भाऊबंदकीला कंटाळून कुटुंबातून बाहेर पडला व सूडाच्या भावनेने बांधवांचा नाश करण्यासाठी, बेडकांना खाणाऱ्या सर्पाला त्याने बोलावून आणले.

मू. – **शत्रुमुन्मूलयेत्प्राज्ञस्तीक्ष्णं तीक्ष्णेन शत्रुणा ।**
व्यथाकरं सुखार्थाय कण्टकेनैव कण्टकम् ॥

अ.– '(शरिरात घुसलेला, टोकदार आणि वेदना देणारा) काटा जसा दुसऱ्या (टोकदार) काटयाने काढावा, तसा शहाण्या पुरुषाने स्वतःच्या सुखासाठी, त्रास देणाऱ्या बलवान शत्रूचा नाश दुसऱ्या बलवान शत्रूकडून करावा.'

व्य. – शत्रूचा शत्रू तो आपला मित्र हे राजनीतीतील एक महत्त्वाचे तत्त्व आहे. दोघांना एकमेकांशी लढत ठेवून त्यांना दुर्बल करावयाचे व स्वतःचे बल वाढवावयाचे, हा वर्चस्व मिळविण्याचा, तसेच स्वतःच्या रक्षणाचा उपयुक्त मार्ग आहे. 'काटयाने काटा काढणे' हा मराठी वाक्प्रचार वरील संस्कृत सुभाषितावरूनच आला आहे.

७९. करतलामलक(फल)वत्

सं. – का. ४०. जाबालि मुनींच्या आश्रमात जाबालीचे दर्शन होताच पोपट झालेल्या वैशंपायनाला कृतार्थ वाटले. महाश्वेतेच्या शापामुळेच त्याला पोपटाचे स्वरूप प्राप्त झाले होते. जाबालिशिष्य हारिताने त्याला आश्रमात आणले. त्या वेळी महर्षींच्या तप:प्रभावाने तो भारावून गेला.

मू. – **सकलभुवनतलवन्दितचरणनामनवरततप:क्षपितमलानां करतलामलकफलवत् अखिलं जगदालोकयतां दिव्येन चक्षुषा भगवतामेवंविधानामघक्षयकारिणाम् ॥**

अ– 'ज्यांना सर्व चराचर वंदन करते आणि एका दृष्टिक्षेपात सर्व पाप नाहीसे करणाऱ्या, अशा आपल्या दिव्य दृष्टीने सर्व जगत् तळहातावरील आवळ्याप्रमाणे जे पाहतात (अशा महात्म्यांबद्दल काय बोलावे !) '

व्य. – तळहातावर ठेवलेला आवळा जितका स्पष्टपणे आपण पाहू शकतो तद्वत जाबालि आपल्या दिव्य दृष्टीने सर्व भुवने पाहू शकत. नित्याच्या व्यवहारातही एखाद्या गोष्टीचे पूर्ण ज्ञान झाले असता किंवा अगदी जवळून एखादी वस्तू पाहिली असता हीच उक्ती योजिली जाते. जवळून पाहाण्याचा अर्थ एवढाच की, सर्व बाजूंनी त्या वस्तूचे निरीक्षण करता येते. त्यासाठी अन्य साधनांची गरज नसते. ती प्रत्यक्षच पाहाता येते. हाच आशय व्यक्त करणारी ही शब्दसंहती.

८०. करिष्ये वचनं तव

सं. – भगी. १८.७३. धर्मक्षेत्र असलेल्या कुरुक्षेत्रावर भगवंताच्या गीताप्रसादाने अर्जुनाने आपला तोल राखला, त्यामुळेच कर्तव्यबुद्धी भावनेपेक्षा विजयी ठरली. सारी गीता सांगून झाल्यावर गुरूचा उपदेश ऐकून शंकारहित झालेल्या शिष्याप्रमाणे अर्जुनाने मोकळेपणाने भगवन्तांना सांगून टाकले की, 'आता चर्चा–वादविवाद संपला, मी आता तुम्ही सांगाल तसे करतो.'

मू. – **नष्टो मोहः स्मृतिर्लब्ध्वा त्वत्प्रसादान् मयाऽच्युत ।**
स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव ।।

अ.–' हे अच्युता, तुझ्या कृपेमुळे माझा मोह(अज्ञान) नष्ट झाला. (कर्तव्यकर्माची) जाणीव मला झाली. आता (मनात) कसलाही संशय राहिला नसल्याने तुझ्या म्हणण्याप्रमाणे मी करतो (युद्ध करतो).'

व्य. – स्वधर्माने प्राप्त झालेले कर्तव्य करीत राहण्याचा संदेश देणाऱ्या गीतेचा हा उपसंहार आहे. गीतेनेही संसार सोडण्यासच सांगितले आहे अशी संन्यासमार्गीयांची सांप्रदायिक समजूत निराधार ठरविण्याच्या दृष्टीनेही या श्लोकाला महत्त्व आहे.

व्यवहारात एखाद्या व्यक्तीचे सांगणे पूर्णतः पटले असता अर्जुनाच्या या शब्दसंहतीनेच कबुली दिली जाते.

८१. कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्

सं. – सप. क १६.

मू. – कर्तुमकर्तुं शक्तः सकलं जगदेतदन्यथाकर्तुम् ।
यस्तं विहाय रामं कामं मा धेहि मानसान्यस्मिन् ।।

अ.–' अशक्य ते शक्य करण्यास समर्थ, हे विश्व संपूर्णपणे वेगळ्या रीतीने निर्माण करण्याची शक्ती असलेल्या त्या रामाला सोडून माझे मन इतरत्र कुठेही जाऊ देवू नकोस. '

व्य. – ईश्वरी शक्तीला अशक्य अशी कोणतीच गोष्ट नाही. सर्व काही आपल्या मनाप्रमाणे–इच्छेप्रमाणे घडविण्याचे सामर्थ्य भगवंताजवळ असते. अशाच दैवी संपत्तीने युक्त असलेल्या मानवालाही आपल्या इच्छेप्रमाणे हवे ते बदल घडवून आणता येतात. बोलल्याप्रमाणे कृती करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते. अशा अतिमानवी कृती घडविण्याचे सामर्थ्य असलेल्या माणसाबद्दल हे उद्‌गार काढले जातात.

८२. कर्तव्यो धर्मसंग्रहः

(पाहा : विभवो नैव शाश्वतः)

सं. – सप. क १२.

मू. – अनित्यानि शरीराणि विभवो नैव शाश्वतः ।
नित्यं सन्निहितो मृत्युः कर्तव्यो धर्मसंग्रहः ।।

अ.–' देह नाशिवंत, ऐश्वर्यही अविनाशी नाही, मुत्यू (तर) दररोज जवळ येणारा (मरणकाळ समीप येतो) हे सतत लक्षात ठेवून धर्माचरण करीत राहिले पाहिजे. '

व्य. – या जगात जे जे अस्तित्वात आले ते ते नाशिवंत आहे. आज ना उद्या सर्व प्राणिमात्र कालाच्या मुखात पडणारच. अशा क्षणभंगुर जगात शाश्वत, चिरस्थायी जर काही असेल तर तो धर्म. धर्म म्हणजेच नित्य शास्त्रविहित कर्तव्य (आणि तद्वारा प्राप्त होणारे पुण्य–ज्याचा परिणाम उन्नत जीवन.) शास्त्राने ठरवून दिलेल्या गोष्टी कर्तव्यबुद्धीने आचरणात आणणे याचेच नाव धर्म. धर्मानेच क्षणिक देही जीवाला अमरत्व प्राप्त होऊ शकते; तसेच समाजव्यवहारही सुरळीत चालतात. आणि शेवटी धर्मच बरोबर येणार असतो.

८३. कर्मण्येवाधिकारस्ते

सं. – भगी. २. ४७. 'कर्मयोगाचे रहस्य सांगणारा ' या शब्दांत ह्या श्लोकाचे वर्णन करता येईल. ध्यानयोग, ज्ञानयोग जरी जमला नाही तरी फलाच्या इच्छेने कर्मे

करू नयेत, एवढेच पथ्य पाळायला हवे असे श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले आहे.

मू.– कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।

मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ।।

अ.–' कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे. फलाशा (फळ मिळेल वा मिळणार नाही) कधीही धरू नको. फल मिळावे असा (लोभ) हेतू (मनात) ठेवून काम करणारा होऊ नकोस; तसेच त्या कर्माशी तू लिप्तही होऊ नकोस (म्हणजे त्याचे पापपुण्य तुला बंधक होणार नाही).'

व्य. – कर्मयोगाची चतुःसूत्री नावाने हा श्लोक प्रसिद्ध आहे. ज्ञात्याने शास्त्रविहित कर्तव्ये निष्कामबुद्धीने केली पाहिजेत, असे कर्मयोगाचे तत्त्व आहे. हे तत्त्वच या श्लोकात मोजक्या शब्दांत मांडले आहे. अनासक्त राहून कर्म करण्यातच साक्षीत्वाने असणाऱ्या ईश्वराशी मनुष्याचे भावबंध जुळतात. ध्येयासक्त माणूस नफ्यातोटयाचा विचार न करता आपले कार्य करीत राहातो. साधुसंतांचीही हीच विचारसरणी असते. समाजात लाभहानीची पर्वा न करता कर्तव्यरत राहाणाऱ्या माणसाचे हेच जीवनसूत्र असते. अशा व्यक्तींशी जेव्हा गाठ पडते त्या वेळी श्रीकृष्णाच्या या आदेशाचे पालन करणारे मूर्तिमंत प्रतीक पाहून हेच शब्द उच्चारले जातात.

व्यक्तिगत सांसारिक अथवा राजकीय, सामाजिक सार्वजनिक क्षेत्रात कित्येकदा विषम संघर्ष करावा लागतो. प्रतिपक्षी बलाढ्य असल्यामुळे त्याच्या विरोधात उभे राहिल्यास यश पदरात पडेल अशी खात्री नसते; उलट अपयशाचे धनी व्हावे लागल्यास सर्वस्वाला मुकण्याची भीती असते. तरी सुद्धा स्वकर्तव्य म्हणून, अशा संघर्षात पडावे लागते आणि त्यावेळी खऱ्या मानसिक धैर्याची कसोटी लागते. अशा प्रसंगात 'कर्तव्यकर्म करणे हेच तुझे काम, त्याच्या यशापयशाची चिंता तुला करण्याचे कारण नाही' ही वृत्ती खरोखरीच अंतःकरणात ठसली तर निराशा त्या माणसाला स्पर्श करू शकत नाही आणि अपयशाने तो खचून जात नाही व कर्तव्यकर्म सोडून पलायन करीत नाही. भारतीय तत्त्वज्ञानात ही उक्ती अमर संजीवनी ठरलेली आहे.

८४. कलां नार्हन्ति षोडशीम् ।

सं.–शिम. ३६. महिम्नस्तोत्राचे पठण ही शिवाची सर्वश्रेष्ठ उपासना आहे, हे पुष्पदन्ताने येथे आग्रहपूर्वक सांगितले आहे. (परिशिष्ट पाहा)

मू.– दीक्षा दानं तपस्तीर्थं ज्ञानं यागादिकाः क्रियाः ।

महिम्नः स्तवपाठस्य कलां नार्हन्ति षोडशीम् ।।

अ. - 'अध्यात्म-दीक्षा, दान, तप, तीर्थयात्रा, शास्त्रांचे ज्ञान, यज्ञयागादी कर्मे ही सर्व मिळून, (हे शिवा!) तुझ्या महिम्याच्या या स्तोत्रपठणाच्या सोळाव्या भागाचीही बरोबरी करू शकत नाहीत.'

व्य.– परमेश्वराजवळ सोळा कलारूप शक्ती वास करीत असतात. भागवत

ग्रंथामध्ये परमेश्वराचे षोडशकलासंपन्न पुरुष असे वर्णन आले आहे. सोळाही कलांनी युक्त ते परिपूर्ण. आणि त्यांपैकी काही कला-शक्ती ज्यामध्ये कमी ते अपूर्ण-कनिष्ठ मानले जाते. एखाद्या विशिष्ट साधनाचे, उपासनेचे महत्त्व–श्रेष्ठता वर्णन करून सांगताना त्याच्या तुलनेने इतर साधनांचे, उपासनांचे त्याच्या सोळाव्या अंशानेही फल नाही असे म्हटले जाते.

८५. कल्याणी बत गाथेयम्

सं. – वारा. ६.१२६.२. हनुमानाकरवी ‘ राम येणार ’ हे शुभ वर्तमान ऐकताच ‘कधीतरी आपली इच्छा पूर्ण होईलच ’ अशी आशा धरून चौदा वर्षे जिवंत राहिलेल्या भरताला ‘ ती शुभ घटिका आज आली ’ असा अनुभव आला.

सू. – **कल्याणी बत गाथेयं लौकिकी प्रतिभाति माम् ।**
एति जीवन्तमानन्दो नरं वर्षशतादपि ।।

अ.–‘ माणूस जर शंभर वर्षे जगला तर शंभर वर्षांनी तरी त्याला आयुष्यात सुखाचे दिवस येतात ही व्यवहारात प्रचलित असलेली म्हण आज मला सत्य वाटते आहे. ’

व्य. – संकटांची परंपरा कोसळलेल्या व्यक्तीला दिलासा देणारी ही पदावली आहे. आज जरी दुःख भोगावे लागत असले तरी कधीतरी आपणही सुखात राहू शकू अशी माणसाची पूर्वापार श्रद्धाच या शब्दांत व्यक्त झाली आहे.

८६. कविताकामिनी कौतुकाय

सं. – प्ररा. १.२२. नाटकाच्या प्रस्तावनेत एकाहून एक सरस आणि आल्हाददायक काव्यरचना करणाऱ्यांची नावे कवितारूपी सुंदर स्त्रीच्या रूपकात गुंफली आहेत. (चोर : एक मध्ययुगीन कवी; मयूर : ‘ मयूराष्टक’, ‘सूर्यशतक’ इ. काव्यांचा कर्ता)

सू.– **यस्याश्चोरश्चिकुरनिकरः कर्णपूरो मयूरो**
भासो हासः कविकुलगुरुः कालिदासो विलासः ।
हर्षो हर्षो हृदयवसतिः पञ्चबाणस्तु बाणः
केषां नैषा कथय कविताकामिनी कौतुकाय ।।

अ.– ‘चोर कवी हा जिचा केशसंभार, मयूर कवी जिची कर्णभूषणे, भास कवी जिच्या मुखावरचे हास्य, तर कवीच्या समुदायातील श्रेष्ठ कवी कालिदास हा जिचा विलास आहे, हर्ष कवी जिच्या हृदयात वास करणारा उल्हास व बाण कवी जिच्या हृदयातला मदन आहे, अशी ही कवितारूपी सुंदरी कोणाच्या कौतुकाचा विषय होणार नाही ?’

व्य.– कवींच्या वैशिष्ट्यपूर्ण प्रतिभेचा आविष्कार करणारे काव्य ही सुसंस्कृत मनाला आनंद देणारी अपूर्व वस्तू आहे. ‘कविताकामिनी’च्या सौंदर्याचे व अलंकारांचे वर्णन करणारा हा श्लोक जयदेव कवीच्या प्रतिभेचा विलास आहे.

८७. कस्मै देवाय हविषा विधेम

सं – ऋग्. १०. १२१. ५. ईश्वराच्या विराट् स्वरूपाची प्रतीती शब्दबद्ध करणारे हे सूक्त आहे. (परिशिष्ट पाहा)

मू. – येन द्यौरुग्रा पृथिवी च दृळ्हा येन स्वः स्तभितं येन नाकः ।
यो अन्तरिक्षे रजसो विमानः कस्मै देवाय हविषा विधेम ।।

अ–' ज्याच्यामुळे द्युलोक उग्र झाला, पृथ्वी स्थिर होऊन स्वर्ग स्तंभित झाला, आदित्य-लोक सावरून धरला गेला आणि जो आकाशात मेघ निर्माण करतो अशा (प्रजापति) देवतेला सोडून आम्ही अन्य कोणत्या देवतेला हविर्भाग अर्पण करावा ? (म्हणून प्रजापति देवतेचीच उपासना आम्ही करतो).'

व्य. – विश्वव्यापी आधाराचे चिंतन असे या सूक्ताचे स्वरूप आहे. यात सर्व-व्यापी ईश्वराच्या विराट स्वरूपाची प्रतीती वर्णिली आहे. ऋग्वेदातील तात्त्विक सूक्तांतील हे प्रसिद्ध सूक्त आहे.

याचा अर्थ जो वर दिलेला आहे त्यापेक्षा वेगळ्याच अर्थाने याचा चौथा चरण व्यवहारात वापरला जाताना कित्येकदा दिसतो; तो म्हणजे ' कस्मै देवाय ' या-बाबतची अनिश्चितता. परमेश्वर इतक्या विराट स्वरूपाने सर्वत्र भरलेला आहे की, त्यामुळे त्याच्या नेमक्या कोणत्या व्यक्ताव्यक्त स्वरूपाची उपासना करावी या बाब-तीत सामान्य उपासकाच्या मनात संदेह निर्माण होतो आणि तो विचारतो, ' तू सर्वव्यापी आहेस हे खरे, पण मग, तुझ्या निश्चित अशा कोणत्या स्वरूपाची उपासना मी करू ते मला समजत नाही.' (या दृष्टीने परिशिष्टातील इतर मंत्र व विवरण लक्षात घेण्यासारखे आहे.)

८८. क्रमशः पूर्यते घटः

सं. – हित. २.१०. ' सुहृद्भेद ' या प्रकरणात, पैसे मिळवायला निघालेल्या वर्धमान नावाच्या वाण्याची ही कथा आहे. धनाचे उपयोग लक्षात घेऊन ते अधिका-धिक मिळवीत राहिले पाहिजे या विचाराने त्याने हे उद्गार काढले.

मू. – जलबिन्दुनिपातेन क्रमशः पूर्यते घटः ।
स हेतुः सर्वविद्यानां धर्मस्य च धनस्य च ।।

अ.–' पाण्याच्या एकेका थेंबाने हळूहळू घडा भरतो. सर्व विद्या, पुण्य आणि धनाच्या संग्रहाचे हेच (थोडे थोडे मिळवीत राहणे) कारण आहे.'

व्य. – ' थेंबे थेंबे तळे साचे. ' थेंब अगदी छोटा, क्षुद्र पण असे अनेक थेंब एकत्र झाले म्हणजे मोठा जलाशय तयार होतो. म्हणून जे अल्प असेल ते तसे आहे म्हणून त्याची किंमत कमी मानू नये. धन, विद्या कणाकणांनी जमवावी लागते. अशाच अर्थाचे–' क्षणशः कणशः चैव विद्यामर्थं च साधयेत् । क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम् ।।' हे सुभाषित प्रसिद्ध आहे. याचा व्यवहारात उपयोग

दीर्घोद्योगाची महती सांगण्यासाठीही केला जातो. जशी ' रोम एका दिवसात बांधले गेले नाही ' अशी इंग्रजीत म्हण आहे त्याच अर्थाने थोडे थोडे काम नित्य करीत राहिल्याने केव्हातरी तरी ते पुरे होणारच हा विश्वास यातून दर्शविला जातो.

८९. क्वचिदपि कुमाता न भवति

सं. – श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या ' देव्यपराधक्षमापनस्तोत्रां 'तील २, ३, ४ या श्लोकांचा हा शेवटचा चरण आहे. त्यांपैकी हा चौथा श्लोक आहे. (परिशिष्ट पाहा)

मू. – जगन्मातर्मातस्तव चरणसेवा न रचिता
न वा दत्तं देवि द्रविणमपि भूयस्तव मया ।
तथापि त्वं स्नेहं मयि निरुपमं यत्प्रकुरुषे
कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ।।

अ.–' हे जगन्माते, आई, मी तुझ्या चरणांची सेवा केली नाही; हे देवी, मी तुला (नैवेद्य, उपहार म्हणून) काही धनसंपत्तीही दिली नाही. तरी सुद्धा, माझ्यावर तू जी माया करतेस, ती अनुपम आहे. खरोखर, वाईट (दुष्ट) मुलगा निपजेल; पण आई कधी सुद्धा (मुलाशी वाईट) दुष्ट झाली असे घडणार नाही. '

व्य. – मुलाच्या सुखासाठी आई स्वतः वाटेल तितके हाल सोसते. त्याचे अपराध पोटात घालून त्याच्यावर मायाच करते. तो दुर्वर्तनी निघाला, सगळ्या जगाने त्याचा तिरस्कार केला, तरी आईच्या त्याच्यावरच्या प्रेमाला ओहोटी लागत नाही, उलट ते अधिक ओसंडून वाहते. निरपेक्ष प्रेम करण्याच्या मातेच्या स्वभावधर्माच्या विरुद्ध ती कधीच वागू शकत नाही. तरीही एखाद्याला आईच्या प्रेमाची शंका आली तर ती कशी निराधार आहे हे श्रीशंकराचार्यांनी जगन्मातेसंबंधीच्या प्रेमाने व तळमळीने काढलेल्या या उद्‌गारांवरून कळून येते. आईशी दुष्टपणाने वागणारी मुले अनेक दिसतात. त्यांना कुपुत्र म्हणणे भाग आहे. पण मुलाशी दुष्टाव्याने वागणारी आई–कुमाता श्रीमत् आचार्यांच्या मते कधी जन्मालाच आलेली नाही.

९०. क्वचिदपि च हा हेति रुदितम्

सं.– वैश. ५. * संसाराचे वैविध्य हेच वैशिष्ट्य आहे. सुखदुःखात्मक अनुभव जीवनात सतत रोज येत असल्याने संसार विषामृतमय वाटतो असे भर्तृहरीचे म्हणणे आहे.

मू. – क्वचिद्विद्वद्गोष्ठी क्वचिदपि सुरामत्तकलहः
क्वचिद्वीणावाद्यं क्वचिदपि च हा हेति रुदितम् ।
क्वचिद्रामा रम्या क्वचिदपि जराजर्जरतनुः
न जाने संसारः किममृतमयः किं विषमयः ।। *

अ.–एका ठिकाणी विद्वानांची आपसांत ज्ञानचर्चा चालली आहे, तर दुसऱ्या कोठेतरी

राज्ञा. १ उविसं. ४

मद्यपानाने झिंगलेले मद्यपी परस्परांत भांडत आहेत. कोठे सुस्वर वीणावादन ऐकू येते आहे, तर रडण्याचा करुण स्वर दुसरीकडे कानी पडतो आहे. इथे जशी सुंदर रमणी दृष्टीस पडते आहे, तशीच तिथे जख्ख म्हातारीही नजरेस येते आहे. त्यामुळे खरोखर हा संसार अमृतमय आहे की विषमय आहे हेच कळत नाही.'*

*हा श्लोक निर्णयसागर-सुभाषितत्रिशतीत नाही. भर्तृहरीच्या शतकत्रयाचा अनुवाद करणाऱ्या ल. गो. विंझे यांच्या (१९६९) प्रतीवरून हा घेतला आहे.

व्य. – संसाराचे स्वरूप संमिश्र आहे, त्यामुळे त्याचा अनुभवही एकमेकाविरुद्ध प्रकारचा-भिन्न भिन्न प्रकारांनी येतो. एकाच वेळी दुःख आणि सुख यांची अनुभूती मानवी जीवनात नित्य येत असते. हसू आणि आसू एकाच वेळी वेगवेगळ्या मानवी चेहऱ्यांवर उमटलेले दिसतात. याचेच नाव जीवन. ज्या वेळी सुखाचा अनुभव येतो तेव्हा जीवन अमृतमय वाटते तर दुःखाचा चटका बसतो तेव्हा जीवन विषासारखे दुःसह होते. व्यवहारात अशा प्रकारचा संमिश्र अनुभव नित्य येत असल्यामुळे कवीच्या मनात या संसाराच्या सत्य स्वरूपाविषयी संदेह उत्पन्न झालेला आहे.

९१. क्व सूर्यप्रभवो वंशः

(पाहा : तितीर्षुर्दुस्तरं मोहात्)

सं.– रघु १.२. पंचमहाकाव्यापैकी ' रघुवंश ' हे एक महाकाव्य आहे. सूर्यकुलातील प्रतापी राजांचे वर्णन करण्यास प्रारंभ करताना सरस्वतीचा वरदहस्त लाभलेल्या कविकुलगुरू कालिदासानेही आपल्या काव्यसामर्थ्याविषयी साशंकता दर्शविली आहे. अर्थात हा त्याचा विनय मानला पाहिजे.

मू.– क्व सूर्यप्रभवो वंशः क्व चाल्पविषया मतिः ।
तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ॥

अ.– 'सूर्यापासून उत्पन्न झालेला (हा) वंश कोणीकडे आणि कुठे लहान लहान विषयच जाणणारी माझी बुद्धी ! (या महान वंशाचे मोठेपण माझ्या बुद्धीला आकलन होणारे नाही.) अज्ञानामुळेच मी लहानशा होडक्याच्या साहाय्याने (मंद बुद्धीने) तरून जाण्यास कठीण असा हा सागर (रघुकुल) तरून जाण्याची (जाणून घेण्याची) इच्छा करीत आहे. '

व्य.– वर वर पाहता अशक्य वाटणारे शक्य करण्याचा प्रयत्न जेव्हा चाललेला दिसतो त्या वेळी कालिदासाच्या ' होडक्याने समुद्र तरून जाण्याच्या ' कल्पनेचे स्मरण होते. किंबहुना ' क्व सूर्यप्रभवो 'नेच व्यवहारात नेहमी कार्याचे काठिण्य वर्णिले जाते.

९२. काकः काकः पिकः पिकः

सं. – सुर. ५. व्योमचरान्योक्ति १२०. पक्ष्यांची उदाहरणे घेऊन व्यवहारात

प्रत्यही प्रत्ययाला येणाऱ्या अनुभवाचेच वर्णन येथे केले आहे. त्याच दृष्टीने अन्योक्ती हा प्रकार प्रसिद्ध आहे. आपापतः एकाचे वाटणारे वर्णन दुसऱ्यालाच उद्देशून असते. त्याचाच हा नमुना.

मू. – काकः कृष्णः पिकः कृष्णः को भेदो पिककाकयोः ।

वसन्तसमये प्राप्ते काकः काकः पिकः पिकः ।।

अ.–' कावळा काळा, कोकिळही काळा. कोकिळ आणि कावळा यांत (मग) फरक (तो) काय ? वसन्त (ऋतू) येताच कावळा तो कावळा (आणि) कोकिळ तो कोकिळ. (कोकिळाचे स्वरमाधुर्य व्यक्त होताच भेद स्पष्ट होतो).'

व्य. – व्यक्तीची श्रेष्ठकनिष्ठता तिच्या रंगरूपावरून किंवा जातीपातीवरून ठरत नाही. व्यवहारात जातीवरून श्रेष्ठता मानत असल्याचा जरी अनुभव येत असला तरी तो उचित नाही. एवढेच नव्हे तर साऱ्याच जाणत्यांनी जातीवरून श्रेष्ठता ठरविण्याविषयी आपला विरोध प्रकट केला आहे. अधिक सूक्ष्मपणे विचार करता असे आढळेल की, विशिष्ट जातींना मिळालेले श्रेष्ठत्वाचे त्या त्या जातीचे मानले गेलेले गुणसंस्कारच मूळ कारण आहे. कावळा आणि कोकिळ स्वरूपतः जरी सारखे असले तरी कोकिळाचे गानपटुत्व कावळ्याजवळ नाही. म्हणूनच रसिकांनी, गुणज्ञांनी कोकिळाला 'वसंतदूत' नावाने गौरविले आहे. या दृष्टान्ताद्वारे श्रेष्ठकनिष्ठतेचे गमकच सुभाषितकाराने ठरविले आहे.

परंतु व्यवहाराला मात्र ही उक्ती यापेक्षा अगदी वेगळ्या अर्थाने वापरली जाते. कावळा तो कावळा नि कोकिळ ती कोकिळ. कावळा नि कोकिळ यांचा रंग सारखा असला, ते दिसायला सारखे आणि म्हणजेच समान दर्जाचे, एकाच जातीचे वरून वाटत असले तरी परीक्षेची वेळ येते तेव्हा प्रत्येकाचे वैशिष्टच वेगळे दिसून येते; प्रत्येकाची खरी पात्रता नि श्रेष्ठता प्रत्ययाला येते. मुख्यतः याच अर्थाने ही उक्ती व्यवहारात उपयोजिली जाते.

९३. काकतालीयवत् प्राप्तम्

सं.–हित.प्रस्ताविका.३६ भागीरथीच्या तीरावर पाटलिपुत्र नगरी होती. त्या नगरीच्या सुदर्शन राजाने एकदा शास्त्रविहित माणसाचे वर्णन ऐकले. सुदर्शन आपल्या मुलांचे अज्ञान जाणून उद्विग्न झाला. आपल्या मुलांचेही असेच वर्णन केले जावू नये यासाठी तो विचार करू लागताच शास्त्र न जाणण्याऱ्यांची किती दुर्दशा होते हे त्याला प्रकर्षाने जाणवले. त्याचेच त्याने हे वर्णन केले आहे.

मू. – काकतालीयवत् प्राप्तं दृष्ट्वापि निधिमग्रतः ।

न स्वयं दैवमादत्ते पुरुषार्थमपेक्षते ।।

अ.–'कावळा बसायला नि ढापी मोडायला गाठ पडावी तसा (आकस्मिकरीत्या) प्राप्त झालेला द्रव्यसंचय समोर दिसत असला तरी (तो हस्तगत करण्यासाठी) प्रयत्नांची

आवश्यकता आहे. दैवाने किंवा नशिबाने आपोआप तो हातात पडणार नाही.'

व्य. – कोणत्याही गोष्टीची प्राप्ती होण्यासाठी केवळ इच्छा असून भागत नाही. तसेच 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' असा देवावर हवाला टाकूनही चालत नाही. त्यासाठी प्रयत्नच करावे लागतात. याच्या पुष्टीसाठीच सिंहाचा दृष्टान्त नेहमी दिला जातो. झोपलेल्या सिंहाच्या मुखात आपोआप हरिण शिरत नाही. त्यासाठी सिंहाला प्रयत्न करावे लागतात. त्याचप्रमाणे जरी अचानक द्रव्य-साठा समोर दिसत असला तरी प्रयत्न न केल्यास ते द्रव्य तिथेच राहील. प्रत्येक गोष्टीचेच असे आहे. व्यवहारात ती ती वस्तू अस्तित्वात असते, पण तिला आपल्यापर्यंत आणण्यासाठी स्वतःला धडपड करावी लागते.

९४. काकोऽपि जीवति चिराय

सं. – पंच. १.२४, २५. मानवजन्माची इतिकर्तव्यता साररूपाने सांगणारे हे श्लोक आहेत. दुर्लभ असलेल्या मानवजन्माचे सार्थक करणे हेच मनुष्यमात्राचे कर्तव्य आहे. हे कर्तव्य पार न पाडणारा 'माणूस' या संज्ञेलाही पात्र नाही, हेच यातून कवीला सुचवावयाचे आहे.

मू. – **यज्जीव्यते क्षणमपि प्रथितं मनुष्यैः विज्ञानशौर्यविभवार्यगुणैः समेतम् ।**
तन्नाम जीवितमिह प्रवदन्ति तज्ज्ञाः काकोऽपि जीवति चिराय बलिं च भुङ्क्ते ॥
पंच. १. २४.

अ.– 'मानवात जो ज्ञानी, पराक्रमी (तेजस्वी), सद्‌गुणी असून धनसंपन्न, प्रतिष्ठित जीवन जगतो– मग ते क्षणिक का ठरेना– तेच खरे जगणे असे जाणते लोक मानतात. (केवळ जिवंत राहाणे म्हणजे जगणे नव्हे; तेवढेच मानवी जीवनाचे उद्दिष्ट नसते; कारण) कावळाही काकबली खाऊन पुष्कळ वर्षे जगत असतो. (मानवी जीवनात प्रतिष्ठेने जगण्याला महत्त्व आहे.)'

मू. –**यो नात्मना न च परेण च बन्धुवर्गे दीने दयां न कुरुते न च मर्त्यवर्गे ।***
किं तस्य जीवितफलं हि मनुष्यलोके काकोऽपि जिवति चिराय बलिं च भुङ्क्ते ॥
पंच १.२५.

---

* **भृत्यवर्गे** : (पाठभेद)

अ. – 'जो स्वतः किंवा दुसऱ्याकडून नातेवाइकांवर, दीनदुबळ्यावर किंवा कोणत्याही माणसावर दया करीत नाही किंवा करवून घेत नाही. (प्रेमाने स्वतःही वागत नसेल तर तो दुसऱ्याला प्रेमाने वागावे असे सांगू शकणार नाही.) तो मनुष्य जिवंत असण्याचा काय लाभ ? (जो इतरांना साहाय्यकारी होऊ शकत नाही त्याच्या जगण्यामरण्याविषयी लोक उदासीनच असतात.)तसा काय कावळाही काकबली खाऊन दीर्घकाळ जगतो !'

व्य. – 'प्रत्येक प्राणिमात्राशी प्रेमाने वागणाराच लोकमान्यता (प्रतिष्ठा) पावतो. दयेची भाषा जो जाणेल तोच खरा माणूस. माणुसकी ज्याचा अविभाज्य घटक आहे

तोच मानव. केवळ उदरणभरण करून दीर्घकाळ जिवंत राहाणे हे मानवाचे लक्षण नाही. केवळ स्वत:साठी अन्न शिजविणारा भारतीय संस्कृतीने पापी मानलेला आहे. अशा माणसात आणि कावळ्यात काहीच फरक नाही. किंबहुना केवळ उदरभरण करून जीव जगविणे, आयुष्य कंठणे कावळ्यासारखे पक्षीही करतात. त्यासाठी मानवी जन्म नाही. पण अशीच माणसे समाजात बहुसंख्य दिसतात. त्यांना उद्देशून हे धिक्काराचे शब्द आहेत. ' दुसऱ्यासाठी मेलास तर जगलास आणि स्वत:साठी जगलास तर मेलास ' हा खरा मानवी आदर्श आहे. या मनुष्यत्वाच्या खाणाखुणा समाजात ज्या माणसांच्यात आढळत नाहीत अशी माणसे म्हणजे विष्णुशर्म्याच्या या त्रिकालाबाधीत सत्य ठरणाऱ्या उक्तीची मूर्तिमंत प्रतीके होत.

९५. कामये दुःखतप्तानाम्

(पाहा : न त्वहं कामये राज्यम्)

सं. – भाग. ९.२१.७–१८. शुकदेवांनी परीक्षिताला भरतवंशाचे वर्णन सांगताना रन्तिदेवाची थोरवी प्रकट करणारी कथा सांगितली. रन्तिदेव उदार असल्याने याचकांना दान देताना एक दिवस त्यालाच उपवास पडला. अशा रीतीने सतत एकूणपन्नास दिवस घडलेल्या उपवासाचे पारणे तो करणार एवढ्यात अतिथी आले. त्यांना आपल्याजवळचे सर्व अन्न रन्तिदेवाने देऊन टाकताच ते अतिथी देवरूपात प्रगटले. वरप्रदानास सर्व देव सिद्ध झाले असता रन्तिदेवाने ज्या श्लोकात आपली इच्छा प्रकट केली तो असा :

मू. – न त्वहं कामये राज्यं न स्वर्गं नापुनर्भवम् ।
कामये दुःखतप्तानां प्राणिनां आर्तिनाशनम् ।।

अ.–(' रन्तिदेव म्हणाला)' मला राज्याची इच्छा नाही. मला स्वर्ग वा मोक्षही नको. माझी एकच इच्छा आहे– दु:खाने त्रस्त झालेल्या प्राणिमात्रांचे दु:ख नाहीसे करण्याचे सामर्थ्य मला द्या. '

व्य. – रन्तिदेवाची इच्छा ही सर्वच संतसज्जनांच्या इच्छेचे प्रतीक आहे. भूतदया हे तर संतांचे सर्वस्व आहे. 'जे कां रंजले गांजले' त्यांना सुखी करण्यातच साधू आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता मानीत आले आहेत. हा वरील उक्तीचा सहज सरळ अर्थ झाला. आणि तो भारतीय तत्त्वज्ञानाची जी उच्चतम बैठक 'सर्वेऽत्र सुखिन: सन्तु सर्वे सन्तु निरामया: '–तिला धरूनच आहे. परंतु प्रत्येक शिकवणीला भूमिकाभेद हा असतोच. तो लक्षात न घेता यातील ' न त्वहं कामये राज्यं ' याचा सर्वस्वी व सरसकट निवृत्तीपर अर्थ लावून काही तत्त्वोपदेशक सामान्य संसारी, व्यवहारी माणसालाही असला उपदेश करताना आढळतात. वास्तविक रन्तिदेवाने राज्य नको म्हणणे आणि त्यावरून द्रव्य नि

सत्ता (म्हणजेच राज्यसत्ता) यांच्याशिवाय जेथे क्षणमात्र चालत नाही त्या प्रापंचिक व्यवहारातही त्यांची आकांक्षा करू नये म्हणून प्रापंचिक माणसाला सांगून त्याला सरसकट त्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करणे हे या कथेचे नि त्यातील चिरस्मरणीय उद्‌गाराचे मर्म न समजल्यासारखे आहे.

९६. कारणेन विना कार्यम्

सं. – योवा. निर्वाण. ५७.१३. 'ज्ञानी पुरुषालाही अहंकार कसा होतो ?' या श्रीरामाच्या प्रश्नावर वसिष्ठांनी अविद्यास्वरूप समजावून सांगितले आहे. अविद्येमुळेच अहंकार उत्पन्न होतो. अर्थात हा सर्व भ्रम आहे हेही ज्ञानी पुरुषाला कळलेले असते. परंतु जशी ही सृष्टी काल्पनिक असून वास्तव वाटते त्याचप्रमाणे अविद्येने अहंकार आला तरी त्याचे स्वरूप कळलेल्या ज्ञानी माणसाची त्यामुळे काहीच हानी होत नाही; चित्रातील अग्नीप्रमाणे तो निष्प्रभ होतो, हे येथे सांगितले आहे

मू. – कारणेन विना कार्यं न च नामोपपद्यते ।
कदा क इव खे केन दृष्टो लब्धः स्फुटो द्रुमः ।।

अ.–' कारणावाचून कार्य उत्पन्न होत नाही. जसे (निराकार) आकाशात पृथ्वीप्रमाणे वृक्ष उगवलेला कोणी पाहिला आहे काय ? (अर्थातच नाही. बीजाशिवाय अंकुरोत्पत्ती अशक्य).'

व्य. – अविद्येमुळेच भ्रम उत्पन्न होतो. भ्रमामुळे चंद्रावर ससा दिसतो आणि एकच चंद्र दोन असल्यासारखे भासतात. वस्तुतः हा सर्व कल्पनेचा खेळ असतो. आत्मज्ञान झाल्यावर भ्रमाचे निरसन होते आणि निराकार परब्रह्माचे सत्यस्वरूप समजते. ज्ञानात कारणावाचून कार्याची कल्पना केलीच जात नाही. अविद्येतच हे सर्व संभवते. अर्थात भ्रमामुळेच हे घडते. एरवी व्यवहारातही कार्य पाहिल्यावर कारण शोधलेच जाते किंवा कारण-कार्य यांचे नियत साहचर्य माहीत असल्याने कार्याच्या उद्देशाने कारणाची योजना केली जाते. सर्वसामान्य शेतकरीही धान्योत्पत्तीसाठी बीजांची पेरणी करतोच.

ही कारण-कार्यपरंपरा अनादी आहे. वैदिक तत्त्वज्ञानाच्या परिभाषेत त्याला विशिष्ट अर्थही प्राप्त झालेला आहे. परंतु व्यवहारात प्रत्यक्ष बोलताना आपण 'कार्य-कारणपरंपरा' असे म्हणतो; वास्तविक ती 'कारण-कार्यपरंपरा' असते. याचे कारण कार्य हे व्यवहारात दृष्ट, व्यक्त असते; उलट कारण बहुतांशी अदृष्ट व अव्यक्त असते. त्यामुळे व्यवहारी माणसाच्या दृष्टीने कार्य हेच महत्त्वाचे ठरते व तेच त्याच्यासमोर प्रथम येते, म्हणूनच बहुधा व्यवहारात 'कार्यकारणपरंपरा' असे म्हणण्याची पद्धत रूढ झाली असावी.

९७. कार्यं भवति शासनम्

सं. – वारा. २.२१.१३. रामासारख्या पुत्राचा निष्कारण त्याग करणारा विवेकभ्रष्ट म्हणून लक्ष्मणाने दशरथाची निंदा केली. अशा पित्याची अवज्ञा करण्यात किंवा त्याला शिक्षा करण्यात दोष नाही, असे त्याने बजावले.

महा. १. प्रवि. ८१.११०. कुटिल नीती जाणणारा कणिक नावाचा मंत्री शत्रूचा नाश करण्याच्या युक्त्या धृतराष्ट्राला सांगतो. ' न्याय्यं भवति शासनं ' असे शब्द तेथे कणिकाच्या तोंडून आले आहेत. कणिकाच्या या उपदेशाला ' कणिकनीति ' म्हटले आहे.

महा. ५.१७८.२४. अम्बोपाख्यानपर्वात भीष्मांचे गुरु परशुराम भीष्मांना काशीराजपुत्री अम्बेशी विवाह करण्यास सांगतात. त्या वेळी भीष्म लक्ष्मणाच्या शब्दांतच आज्ञा नाकारतात.

मू. – गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः ।
उत्पथं प्रतिपन्नस्य कार्यं भवति शासनम् ॥

(तीन्ही ठिकाणी हाच श्लोक आहे.)

अ.–' काय करावे आणि काय करू नये हे न जाणणाऱ्या गर्विष्ठ व दुर्मार्गाला लागलेल्या अशा गुरूलाही (श्रेष्ठ माणसालाही) शासन करणे योग्य आहे.'

व्य. – ज्याच्या वागण्यावरून धर्म-नीतीचे धडे घ्यावयाचे, त्या गुरुजनांचा अधःपात होऊन ते धर्माविरुद्ध वागू लागले तर त्यांची आज्ञा धुडकावणे, प्रसंगी त्यांना शासन करणे. यातच धर्माचे रक्षण आहे. वेळ पडल्यास असे वागण्यात दोष नाही.

९८. कालाय तस्मैः नमः

सं. – वैश. ४१. काल सर्वभक्षक असूनही जीवनाविषयी सर्वांनाच आसक्ती वाटते. एकेका काळाचे भूषण ठरलेल्या गोष्टी, स्थळे आदी सर्व काळाच्या ओघात लयाला गेलेले आढळते. उज्जयिनी या प्राचीन वैभवसंपन्न नगरीच्या संदर्भात हे उद्गार आलेले आहेत.

मू. – सा रम्या नगरी महान्स नृपतिः सामन्तचक्रं च तत् ।
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत्ताश्चन्द्रबिम्बाननाः ।
उद्वृत्तः स च राजपुत्रनिवहस्ते बन्दिनस्ताः कथाः ।
सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ॥

अ.–' ती रमणीय (उज्जयिनी) नगरी, तो महान राजा (पराक्रमी विक्रमादित्य) त्याचे मांडलिक राजे, ती विद्वानांची सभा, त्या चंद्रमुखी स्त्रिया, ते उच्छृंखल राजपुत्र, बन्दी-स्तुतिपाठकांनी गाइलेल्या त्या (गौरव) कथा हे सर्व ज्याने आपल्या सामर्थ्याने आता केवळ स्मरणमात्र अस्तित्वात ठेवले (प्रत्यक्षात सर्व नामशेष करून टाकले, लयाला नेले) त्या कालाला नमस्कार असो.'

व्य. – कालाचे हे विलक्षण सामर्थ्य वर्णन करून सांगण्याचा भर्तृहरीचा हेतू हाच आहे की, मनुष्याची ऐहिक बाबतीतील ममत्वाची भावना नष्ट व्हावी, स्वामित्वाची कल्पना वा इच्छा शिल्लक राहू नये. यच्चयावत् वैभव, ऐहिक गोष्टी कालाच्या प्रवाहात विलीन होतात याची व्यवहारात जेव्हा जेव्हा प्रचीती येते तेव्हा तेव्हा प्रत्येकजण 'कालाय तस्मै नमः' हेच उद्‌गार काढतो. त्याचबरोबर 'ते हि नो दिवसाः गताः' याचीही आठवण होते.

सर्वच बरे नि वाईट कालाच्या उदरात समाविष्ट होत असल्यामुळे त्याची जाणीव ठेवून किंवा त्याची अपरिहार्यता ओळखून माणसाच्या मनातली गत-वैभवाबद्दलची रुखरुख, हळहळ, दुःख हलके करण्याचा प्रयत्न या सुभाषिताने केलेला आहे. तथापि सर्वसामान्य व्यवहारात मात्र या उक्तीचा उपयोग पुष्कळदा वेगळ्या अर्थाने केला जातो. जो काल राज्यावर होता तो आज भिकारी बनून रस्त्यावर आला, अथवा काल ज्याची स्तुतिस्तोत्रे गायिली जात होती त्याच्यावर आज शिव्यांची लाखोली वाहिली जात आहे; एके काळी ज्या व्यक्तीचा किंवा राजवटीचा अथवा तत्त्वज्ञानाचा उदोउदो करण्यात, त्याच्याभोवती आरत्या ओवाळण्यात अहमहमिका लागत होती, त्यात प्रतिष्ठा मानली जात होती तीच व्यक्ती, तीच राजवट, तेच तत्त्वज्ञान आज जनता पायदळी तुडवीत असलेली दिसते. तसेच काल जी व्यक्ती, जी सत्ता, जी तत्त्वप्रणाली, जे जे विधिनिर्बंध त्याज्य नि निषेधार्ह मानले जाऊन त्याची ससेहोलपट होत होती तीच व्यक्ती, तीच सत्ता, तेच तत्त्वज्ञान नि तेच विधिनिर्बंध आज लोकगंगेत पावन होऊन शिरोधार्य मानले जात आहेत, असे आढळते, तेव्हा खरोखरच कालाच्या कर्तुमकर्तुमन्यथा कर्तृत्वाचा विस्मय वाटून त्याला आपोआपच हात जोडले जातात. त्यातून उन्मत्तांना धाक आणि पराभूतांना दिलासा दोन्ही मिळतात. तसेच जे समचित्त झाले आहेत त्यांना समाधान व जे विचलित झाले आहेत त्यांना चित्ताचा समतोल ठेवण्यासाठी आधार या लहानशा उक्तीतून मिळतो.

९९. कालो गच्छति धीमताम्

सं. – हित. १.१. आपल्या मूर्ख पुत्रांना शहाणे करण्यासाठी सुदर्शन नावाच्या राजाने विष्णुशर्मा या विद्वान् ब्राह्मणाची योजना केली. या श्लोकाने विष्णुशर्म्याने राजपुत्रांना शिकविण्यास प्रारंभ केला.

सप. क ५०.

मू.–काव्यशास्त्रविनोदेन कालो गच्छति धीमताम् ।
व्यसनेन च मूर्खाणां निद्रया कलहेन वा ।। हित. १·१.

अ.– 'शहाण्या लोकांचा वेळ काव्याचा आस्वाद घेण्यात, शास्त्रचर्चा करण्यात व

बुद्धिचातुर्याने करमणूक करण्यात जातो. मूर्ख लोक व्यसनीपणात, झोपेत किंवा भांडणे करण्यात वेळ (आयुष्य) घालवितात.'

मू.–देवताराधनैः शास्त्रैः कालो गच्छति धीमताम् ।

मूर्खाणां तु दिवारात्रं द्यूतेन कलहेन वा ।। सप. क ५०.

अ.–' बुद्धिमान् लोकांचा वेळ ईश्वरोपासनेत किंवा शास्त्रचर्चा करण्यात जातो, तर मूर्ख लोक दिवस-रात्री जुगार खेळण्यात किंवा भांडणे करण्यात घालवितात.'

व्य.–मनुष्य आपले नित्याचे काम करून उरलेला वेळ कसा घालवतो यावर त्याचे व्यक्तिमत्व अवलंबून असते. वेळेचा जो सदुपयोग करतो त्यालाच धन-मान प्राप्त होतात. वेळ फुकट घालवणे म्हणजे स्वतःच्या आयुष्याचा नाश करून घेण्यासारखे आहे. हे माहीत नसणारे आणि माहीत असणारे बहुसंख्य लोक याप्रमाणेच वागत असतात. म्हणून शिक्षण, सुसंस्कार, चांगल्या प्रवृत्ती यांच्या जोपासनेची गरज समाजात निरंतर राहाते.

१००. कालो हि दुरतिक्रमः

सं. – वारा. ३.६८.२१. ' रावणाने सीता नेली ' एवढे राम-लक्ष्मणांना सांगून रावणाशी केलेल्या झटापटीत जखमी झालेल्या जटायूने प्राण सोडला. त्याच्या मरणाने दुःखी झालेल्या रामाने काळाच्या गतीबद्दल उद्वेग प्रकट केला.

महा. ११.९.२. भारतीय युद्धानंतर, युद्धात मारल्या गेलेल्या आपल्या पुत्रांसाठी धृतराष्ट्र शोक करू लागला तेव्हा विदुराने त्याचे सांत्वन केले. कालगतीचा विचार करून, शोक आवरण्याचा उपदेश त्याने धृतराष्ट्राला केला.

मू.–अनेकवार्षिको यस्तु चिरकालसमुत्थितः ।

सोऽयमद्य हतः शेते कालो हि दुरतिक्रमः ।। वारा. ३. ६८. २१.

अ.– ' पुष्कळ काळापर्यंत (आपल्याबरोबर) राहिलेला हा वृद्ध ('अनेकवार्षिक') पक्षी ज्याअर्थी आज मरण पावला त्याअर्थी काल अनुल्लंघनीय आहे, हेच खरे.'

मू. – कालः पचति भूतानि कालः संहरते प्रजाः ।

कालः सुप्तेषु जागर्ति कालो हि दुरतिक्रमः ॥ महा. ११. ९.२.

अ.–' काल प्राण्यांना पचवून टाकतो, काल प्रजांचा नाश करतो. सर्व प्राणी झोपी गेले असतानाही काल जागा असतो. खरोखर कालाला ओलांडून जाणे कठीण आहे.'

व्य. – ' समय,' ' मृत्यू,' ' नशीब ', ' संहारक तत्त्व ' अशा अनेक अर्थांनी काल हा शब्द वापरला जातो. कालाला थांबविणे कोणालाच शक्य नाही. त्याची गती टाळणे अशक्य आहे. जन्माला आलेला मनुष्य कालक्रमानुसार तरुण-वृद्ध होणार व शेवटी मरणार, हे ठरलेलेच. मग तो कितीही थोर असो, गुणी असो. लोकांना प्रिय असो, कोणत्याही परिस्थितीत असो. दुःखाच्या प्रसंगी माणसाचे कालाच्या या प्रभावाकडे विशेष लक्ष जाते. मृत्यूची अपरिहार्यता आणि जगरहाटीची

सर्वसामान्यता या दोन्ही गोष्टी या उक्तीतून सुचविल्या गेल्या आहेत. मृत्यूवर मात करता येत नाही, आणि जगरहाटीतील व्यवहार टाळता येत नाही, म्हणून माणसाने त्याबद्दल शोक करण्यात अर्थ नाही, हाच याचा व्यावहारिक निष्कर्ष काढलेला आहे.

१०१. कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी

(पाहा : तान् प्रति नैष यत्नः)

सं. – मामा. १. ४. आपल्या कलाकृतीला लोकांकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही असे लक्षात येताच भवभूती स्वतःच आपली योग्यता जाणवून देत आहे. भवभूतीचा आत्मविश्वास शब्दाशब्दातून येथे प्रगटला आहे.

**मू. – ये नाम केचिदिह न प्रथयन्त्यवज्ञां जानन्तु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ।।**

अ.–'जे लोक (माझी) अवज्ञा करीत आहेत, त्यांच्यासाठी हा (नाटकाचा) प्रयास नाही. माझ्यासारखाच स्वभावधर्म असलेला रसिक कदाचित आताही कोठे तरी असेल; (तसेच) पुढेही उत्पन्न होईल (अशी खात्री वाटते). कारण काल अनंत आहे आणि पृथ्वीही विशाल आहे. (त्यामुळे कोणी तरी समानधर्मा रसिक केव्हा तरी क्वचित भेटेलच.)'

व्य. – कलेसाठी कला जशी असते तशीच ती रसिकासाठीही असते. आपल्या आपल्या कलाकृतीचे रसिकांकडून स्वागत झाल्यावरच कलाकाराला परिश्रमांचे चीज झाल्यासारखे वाटते. कलाकारच काय पण सर्वसाधारण माणूसही लोकांनी आपल्या कृतीला चांगले म्हणावे यासाठी धडपडत असतो. कलाकाराचीही तीच इच्छा असते. त्याची कला जशी स्वान्तःसुखाय असते तशीच परहितार्थही असते. लोकांचे अनुरंजन करता करता सदाचाराची मात्रा देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्याचबरोबर लोकांना नित्याच्या कटकटीतून थोडा वेळ का होईना मुक्तता मिळून नवी उमेद यावी यासाठी विविध कथानके रचिली जातात. कवी, कलाकार राजाश्रयाप्रमाणे लोकाश्रयाचाही भोक्ता असतो. अशा वेळी एखाद्या कलाकाराची उपेक्षा केली गेली, त्याच्या कलाकृतीला योग्य तो मान मिळाला नाही तर असा कवी भवभूतीच्या शब्दांतच आपले समाधान करून घेतो, आपली योग्यता जाणवून घेतो. जरी लोकाश्रय इच्छित असला आणि दुर्दैवाने तो न लाभला तरी कलाकाराचा आपल्या प्रतिभेवर दृढ विश्वास असतो. म्हणूनच उपेक्षा करणाऱ्या लोकांची पर्वा न करता समानधर्मी रसिकाची वाट पाहात अनंत कालापर्यंत थांबायची त्याची तयारी असते. आजच्या काळातही ध्येयवेडे महत्त्वाकांक्षी भवभूतीच्या शब्दांतच आपला आत्मविश्वास बोलून दाखवितात.

'उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा' ही शब्दसंहती केवळ साहित्याच्या किंवा कलेच्याच क्षेत्रात नव्हे तर इतरही अन्य दीर्घकालीन तपश्चर्येवर चालणाऱ्या लोकसंबंधी क्षेत्रात उपेक्षा पावलेल्या व्यक्तींच्या तोंडून बाहेर पडते.

१०२. काव्येषु नाटकं रम्यम्

सं. – सप. क ५७.

मू.–काव्येषु नाटकं रम्यं तत्रापि च शकुन्तला ।
तत्रापि च चतुर्थोऽङ्कस्तत्र श्लोकचतुष्टयम् ॥

अ.–'काव्यामध्ये (साहित्यामध्ये) नाटक सौंदर्यपूर्ण, नाटकातही (कालिदासाचे) 'शाकुन्तल,' त्यातही त्याचा चौथा अंक व व त्या चौथ्या अंकातलेही चार श्लोक (रम्य आहेत).'

व्य. – संस्कृत वाङमयामध्ये कालिदासाचे 'शाकुन्तल' हे साहित्याच्या सर्व गुणांनी युक्त व निर्दोष असे नाटक आहे. जर्मन महाकवी गटे याला ते वाचून एवढा हर्ष झाला की तो ते डोक्यावर घेऊन नाचला. शकुन्तलेची सासरी पाठवणी करताना, शकुन्तलेच्या स्वतःच्या, तिच्या मैत्रिणींच्या, गौतमी, कण्व या सर्वांच्याच अन्तःकरणात उचंबळून येणाऱ्या संमिश्र भावनांचे कालिदासाने अत्यंत हळुवार व कलात्मक शैलीत चित्रण केले आहे ते चौथ्या अंकात. त्या चौथ्या अंकातले कण्वांचे पुढील चार श्लोक 'अस्मान्साधु विचिन्त्य. . . .' (१७) 'शुश्रूषस्व गुरून् . . . . । (१८) 'अभिजनवतो भर्तुः श्लाघ्ये. . . . ।' (१९) 'अर्थो हि कन्या परकीय एव. . . .' (२२) (परिशिष्ट पाहा) त्यातील भावाचा उत्कर्ष, अर्थघनता, सूचक –कलात्मक शैली यामुळे सहृदय वाङमयरसिकांना अत्यंत प्रिय झाले आहेत.

एकाहून एक अधिक मोलाचा व सारभूत गुण सांगून शेवटी सर्वोत्कृष्ट गुणाचा–वस्तूचा निर्देश ज्यामध्ये केला जातो, अशा 'सार' ह्या संस्कृत भाषेतील अलंकाराचे वरील श्लोक हे उत्तम उदाहरण आहे.

१०३. काश्यां तु मरणान्मुक्तिः

सं. – स्कंपु. ४.९६.१२१. काशीखंडात 'मुक्तिक्षेत्र' म्हणून काशीचे माहात्म्य वर्णन करून सांगितले आहे. 'काश्यां मरणमुक्ति-वर्णनम्' असा स्वतंत्र भागही स्कंदपुराणात आहे. त्यावरून ही उक्ती विशेष प्रचलित झाली असावी. खालील श्लोक व्यासांच्या शिष्याने केलेल्या काशीवर्णनाचा आहे.

सप. क ५४.

मू.–विद्यानां सदनं काशी काशी लक्ष्म्याः परालयः ।
मुक्तिक्षेत्रमिदं काशी काशी सर्वा त्रयीमयी ॥ स्कंपु. ४.९६.१२१.

अ.–‘ काशी हे विद्येचे माहेरघर आहे. काशी लक्ष्मीचे श्रेष्ठ निवासस्थान आहे. काशी हे मुक्ती देणारे क्षेत्र आहे. काशी या तीनही गोष्टींनी व्यापिलेली आहे. ’

सू.–काश्यां तु मरणान्मुक्तिर्जननात्कमलालये ।
दर्शनादभ्रसरसः स्मरणादरुणाचले ।। सप. क ५४.

अ.–‘काशीमध्ये केवळ मरण आले तरी मनुष्याला मुक्ती मिळते, तर कमलालय क्षेत्रात जन्म झाला, (किंवा) अभ्र सरोवराचे दर्शन केले, (किंवा) अरुणाचलाचे नुसते स्मरण केले (तरी मुक्ती मिळते.)’ (परिशिष्ट पाहा)

व्य.–‘ काशीस जावे नित्य वदावे.’ काशी हे हिंदूंचे अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र आहे. जन्मात एकदा तरी काशीला जावे अशी प्रत्येक भाविक हिंदूची इच्छा असते. काशी-मध्ये पवित्र गंगा नदी, विश्वेश्वर व अन्नपूर्णा या मुख्य देवतांचे वास्तव्य आहे.

काशीत मृत्यू आला तर, मरणाऱ्या व्यक्तीच्या उजव्या कानात साक्षात् शिव मंत्रोपदेश करतात. ‘ तारक मंत्र ’ या नावाने तो प्रसिद्ध आहे. या मंत्रामुळे जीवाचे सर्व पाप नष्ट होते व तो मुक्त होतो, असा भाविकांचा विश्वास आहे. जुन्या पिढीतील लोक आपल्या घरादाराची व्यवस्था करून काशीस जात, तेथेच राहात व तेथे मृत्यू आला तर आनंद मानीत. किंबहुना तेथेच मृत्यू यावा या हेतूने काशीला जाऊन राहात. आजही भाविक हिंदुमात्राची ही श्रद्धा कायम आहे.

१०४. काष्ठघण्टाविडम्बना

सं.–सप. क ५३.

सू.–असङ्गसङ्गदोषेण सत्यश्च मतिविभ्रमः ।
एकरात्रप्रसङ्गेन काष्ठघण्टाविडम्बना ।।

अ.–(ज्याची संगत करू नये अशा) कुसंगतीच्या दोषामुळे खरोखर बुद्धी भ्रष्ट होते. (केवळ) एका रात्रीच्या वाईट संगतीमुळे (गाईला) लोढणे आणि घंटा गळ्यात अडकवून घेण्याची वेळ आली.’

व्य.–एक गुणी, गरीब गाय इतर गायींबरोबर रोज चरून सायंकाळी निमूट-पणे गोठ्यात येई. एके रात्री एका नाठाळ गाईच्या नादाने, गोठ्यात परत न येता एका शेतात शिरून तिने पिकांची नासाडी केली. त्याबद्दल शेतमालकाकडून तिला मार तर मिळालाच; शिवाय तिच्या धन्याने, तिला मन मानेल तसे फिरता येः नये म्हणून तिच्या गळ्यात लाकडाचे लोढणे आणि घंटा (ती कोठे चरते आहे हे समजावे म्हणून) बांधली. एकाच रात्रीच्या वाईट संगतीमुळे ती कायमची बंधनात पडली. दुर्जनाच्या संगतीने सज्जनाला शिक्षा भोगण्याची व पश्चाताप करण्याची वेळ येते; क्वचित् प्राणही गमवावे लागतात. ‘ असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ ’ ही म्हण याच अर्थाने रूढ झाली आहे.

१०५. किं चित्रं यदि ...

सं. – सुर. ३. सामान्यनीती १०२९. जगात आढळणाऱ्या दुर्मिळ आणि अति दुर्मिळ गोष्टी सुभाषितकाराने येथे सांगितल्या आहेत.
(परिशिष्ट पाहा)

मू. – किं चित्रं यदि राजनीतिकुशलो राजा भवेद्धार्मिकः ।
किं चित्रं यदि वेदशास्त्रनिपुणो विप्रो भवेत्पण्डितः ।
तच्चित्रं यदि रूपयौवनवती साध्वी भवेत् कामिनी ।
तच्चित्रं यदि निर्धनोऽपि पुरुषः पापं न कुर्यात् क्वचित् ।।

अ.–' राजनीतीमध्ये प्रवीण असून धार्मिक वृत्तीने वागणारा राजा असला तरी त्यात विशेष काय आहे ! वेदाध्ययन करणारा ब्राह्मण (ज्ञानी) पंडित आढळला तर त्यात आगळे असे काय ! परंतु तरुण, सौंदर्यशालिनी असून देखील पतिव्रताधर्माने वागणारी स्त्री असेल तर ती आश्चर्यकारक गोष्ट आहे; दरिद्री असूनही (पोट भरण्यासाठी) पाप करीत नाही, असा पुरुष आढळणे ही विस्मयकारक घटना आहे. '

व्य. – सुखोपभोगाची विपुल साधनसामग्री जवळ असताना मनुष्याचा अधःपात होण्याची शक्यता असते. तसेच अशा साधनसामग्रीचा अभाव असेल तरीही मनुष्य पापमार्गाकडे वळतो. ' बुभुक्षितः किं न करोति पापम् । ' –भुकेलेला मनुष्य कोणते पाप करणार नाही ! ही सर्वसाधारण परिस्थिती जगात आढळते. याहून वेगळे काही-तरी दिसले तर ते विशेष मानले पाहिजे, असा सुभाषितकाराच्या म्हणण्याचा भावार्थ आहे.

१०६. किमिव हि मधुराणाम्

सं. – शाकुं. १.१०. निसर्गकन्या शकुन्तलेला पाहून दुष्यंताने रसिक व मार्मिक शब्दांत तिचे वर्णन केले.

मू. – सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यं मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति ।
इयमधिकमनोज्ञा वल्कलेनापि तन्वी किमिव हि मधुराणां मंडनं नाकृतीनाम् ।।

अ.– 'कमळ शेवाळाने वेढलेले असले तरी रमणीयच दिसते. चंद्रावरचा धूसर डागही त्याची शोभा वाढवितो. ही कृश सुंदरी वल्कलांच्या वेशातही अधिक मनोहर दिसते. मुळातच सुंदर असलेल्या आकृतींना अलंकार (आणखी) काय शोभा आणणार ! '

व्य.– असलेले सौंदर्य वाढविणे व क्वचित नसलेल्याचा आभास निर्माण करणे, हे वस्त्रे आणि अलंकार यांचे काम. पण जेथे निर्दोष आणि परिपूर्ण सौंदर्य असेल तेथे भूषणे न वापरली तरी त्या वस्तूच्या सौंदर्यात उणेपणा भासत नाही. उलट तिचे निसर्गदत्त वैशिष्ट्य साध्या रूपात अधिक खुलून दिसते. कालिदासाच्या या ललितमधुर पंक्तीने सहजसौंदर्याचे वर्णन केले जाते.

१०७. किमु यत्र चतुष्टयम्

सं.– हित. प्रस्ताविका ११. पाटलिपुत्र नगरीच्या सुदर्शन राजाच्या कानावर हा श्लोक पडला. त्याच्या पुत्रांना श्लोकातील वर्णन बरोबर लावता येत होते. त्यामुळे त्यांच्या भविष्याविषयी त्याला चिंता वाटू लागली.

मू. – यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वमविवेकिता ।
एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम् ।।

अ. – 'तारुण्य, पैसा, सत्ता आणि अविचारीपणा, यांपैकी एक–एकही अनर्थाला कारण होते, तर मग जेथे या चारही गोष्टी एकत्र झालेल्या असतील तेथे काय (अनर्थ) होईल !'

व्य. – तारुण्यात मनुष्याची वृत्ती चंचल बनते, तर हाती पैसा खेळायला लागला म्हणजे सहजच माणसाला मद चढतो, इतरांना तो तुच्छ लेखायला लागतो. सत्तेच्या धुंदीमुळे तर माणसाला आपण ईश्वरासमान 'कर्तुम् अकर्तुम् समर्थ' आहोत असे वाटते आणि या सगळ्यांचा परिणाम म्हणून माणसाचे पतन होते; त्याच्या अनिर्बंध वागण्यामुळे त्याचे स्वतःचे आणि इतरांचेही नुकसान होते. व्यवहारात अनेक वेळा या चारही गोष्टी एकत्र आलेल्या दिसतात व अशा माणसाकडे पाहून हा आता अनर्थाची कोणती मर्यादा गाठणार याची कल्पना करता येईनाशी झाली म्हणजे तोंडून हे उद्गार येतात.

१०८. क्रियासिद्धिः सत्त्वे

सं. – भोज. १६८ ते १७१. धारानगरीचा भोज राजा पराक्रमी, दानशूर व विद्वानांचा विशेष चहाता होता. एकदा त्याच्याकडे, आपल्या कुटुंबाला घेऊन एक ब्राह्मण आला. त्यांच्याकडे पाहून राजाने 'क्रियासिद्धिः सत्त्वे...।' हा एक चरण, म्हटला. त्याबरोबर उरलेले तीन चरण म्हणून ब्राह्मणाने श्लोक पूर्ण केला. नंतर राजाच्या त्याच एका चरणावरून ब्राह्मणाची बायको, मुलगा व सून यांनी वेगवेगळ्या प्रकारे श्लोक पूर्ण करून दाखविले. आश्चर्यचकित झालेल्या राजाने हत्ती, रत्ने व सोने देऊन त्यांचा सत्कार केला. त्या पाच श्लोकांपैकी एक श्लोक येथे दिला आहे (बाकीच्या चार श्लोकांसाठी परिशिष्ट पाहा).

मू.–विजेतव्या लङ्का चरणतरणीयो जलनिधि–
***विपक्षः पौलस्त्यो रणभुवि सहायाः कपयः ।**
तथाप्येको रामः सकलमवधीद्राक्षसकुलं
क्रियासिद्धिः सत्त्वे वसति महतां नोपकरणे ।। भोज. १७०

***भवतिः** पाठभेद

अ.–(दुर्जय) लंका जिंकायची होती, सागर पायांनी चालत ओलांडायचा होता,

(महाबलाढ्य) रावण शत्रू होता, रणांगणावर साहाय्य करणारे सैनिक म्हणजे माकडे होती, तरी सुद्धा एकट्या रामाने सगळ्या राक्षसकुलाचा संहार केला. खरोखर थोर लोकांचे कार्य सिद्धीला जाणे हे त्यांच्या पराक्रमावर अवलंबून असते, साधनसामग्रीवर नव्हे !'

व्य. – पराक्रम आणि आत्मविश्वास असलेला मनुष्य कार्याचा प्रारंभ करताना साधनसामग्रीविषयी चिंता करीत बसत नाही. जी साधने असतील त्यांचा उपयोग करून घेऊन व नसतील ती निर्माण करून घेऊन स्वतःच्या बळावर महत्कार्य करून दाखवितो. मातीतही तो चैतन्य निर्माण करतो. आधुनिक कालात अशिक्षित, गरीब मावळ्यांच्या मदतीने हिंदुपदपातशाहीचे स्वप्न शिवाजी महाराजांनी साकार करून दाखविले.

अंगात तेज नसलेला मनुष्य, एखादी गोष्ट साधता आली नाही म्हणजे साधन-सामग्रीवर आपल्या अपयशाचे खापर फोडतो. पण, मनुष्याला अशक्य वाटणाऱ्या गोष्टी थोर माणसे आपल्या बुद्धिसामर्थ्यावर करू शकतात, तेच त्यांचे मुख्य भांडवल असते हे अनेक उदाहरणांवरून ध्यानात येते.

१०९. कृतघ्ने नास्ति निष्कृतिः

सं.–वारा. ४. ३४. १२. सीताशोधासाठी प्रयत्न करण्याची वेळ आली असतानाही (रामाला तसा शब्द दिलेला असताना) सुखोपभोगात रममाण होणाऱ्या सुग्रीवाचा लक्ष्मणाला राग आला. क्रोधावेशातच लक्ष्मणाने सुग्रीवाला कृतघ्न ठरविले.

पंच. ४. ११. एका वानराने मगराला ही उक्ती ऐकविली. (पंचतंत्रातील श्लोक वा. रा. प्रमाणे)

एका वानराची आणि मगराची मैत्री होती. आपली वानराशी मैत्री जमल्याचे मगराने पत्नीला सांगताच तिला वानराचे मांस खाण्याची इच्छा झाली. पण तसे न दाखवता ती पतीला म्हणाली 'रोज तू त्याने दिलेली फळे खातोस. एकदा त्याला आपल्या घरी घेऊन ये ना. एरवी तू कृतघ्न ठरशील. कृतघ्नाला तर प्रायश्चित्तच सांगितलेले नाही.'

महा १२.१६७. १९. कृतघ्नतेसारखे घोर पातक नाही. कृतघ्न माणूस मेला असता, पशुपक्षीही त्याचे मांस खाण्यास भितात. कृतघ्न गौतम ब्राह्मण व राजधर्मा पक्षी यांची कथा या संदर्भात भीष्मांनी युधिष्ठिराला सांगितली. राजधर्म्याने अतिथी म्हणून गौतमाचे स्वागत केले, पण त्यालाच खाऊन गौतमाने आपली भूक भागविली. महाभारतातील ही एक उपकथा आहे.

मू.–गोघ्ने चैव सुरापे च चौरे भग्नव्रते तथा ।
निष्कृतिर्विहिता सद्भिः कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ।। वारा. ४. ३४. १२.

अ.– 'गाईची हत्या करणाऱ्याला, मद्यपान करणाऱ्याला, चोराला आणि व्रत मोडणाऱ्याला सज्जनांनी (धर्मशास्त्रकारांनी) प्रायश्चित्त सांगितले आहे, परंतु कृतघ्नाला मात्र प्रायश्चित्त नाही.'

मू.– **कुतः कृतघ्नस्य यशः कुतः स्थानं कुतः सुखम् ।**
अश्रद्धेयः कृतघ्नो हि कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ॥ महा. १२. १६७. १९,

अ.– 'कृतघ्न माणसाला कोठले यश आणि कोठली प्रतिष्ठा ! त्याला सुखही मिळणार कसे ? कारण कृतघ्नावर कोणाचाच विश्वास नसतो. कृतघ्न माणसाला प्रायश्चित्तही सांगितलेले नाही.'

व्य.– चूक होणे हा काही अपराध नाही. झालेल्या चुकीचे परिमार्जन प्रायश्चित घेऊन करता येते. प्रायश्चित्ताची कल्पनाच अशी आहे, की, घडलेल्या चुकीबद्दल एक प्रकारची शिक्षा भोगून पावन होणे. धर्मशास्त्रात विविध अपराधांबद्दल वेगवेगळे प्रायश्चित्तविधी सांगितलेले आहेत, पण कृतघ्न माणसाला प्रायश्चित्त नाही. कारण जो दुसऱ्याने केलेले काहीच स्मरत नाही त्याला प्रायश्चित्ताचे महत्त्व ते काय वाटणार ? आणि स्वत: केलेल्या कृत्याबद्दल ज्याला पश्चात्तापच होत नाही त्याला प्रायश्चित्त सांगून तरी उपयोग काय ? 'कृतघ्न' या शब्दातच अपराधाची–त्याच्या पापाची परिसीमा व्यक्त होते. जो पूर्णपणे व जाणूनबुजून दुष्ट बनला त्याला सुधारता येत नाही. म्हणूनच धर्मशास्त्रात कृतघ्नाला प्रायश्चित्त सांगितलेले नाही. जशी धर्मशास्त्रांनी याबाबत माघार घेतली तद्वत व्यवहारातही कृतघ्न माणसापुढे सर्वांनाच हात टेकावे लागतात. त्याच्यापुढे काही बोलण्याचे वा सांगण्याचे उरत नाही, याची व्यवहारात प्रचीती येते म्हणून कृतघ्नतेचा धिक्कार केलेला आहे.

११०. कृते च प्रतिकर्तव्यम्

(पाहा : एष धर्म सनातन:)

१११. कृण्वन्तो विश्वमार्यम्

सं.– ऋग्. ९. ६३. ५. ऋग्वेदाचे नववे मंडल सोमदेवतेला उद्देशून म्हटले गेले आहे. सोमाचे वर्णन करणाऱ्या या सूक्ताचा ऋषी निध्रुवि काश्यप हा असून, ते गायत्री छंदात आहे.

मू.– **इन्द्रं वर्धन्तो अप्तुरः कृण्वन्तो विश्वमार्यम् ।**
अपघ्नन्तो अराव्णः ॥

अ.– 'इन्द्राचे बल वाढविणारा, उदकांचा प्रेरक, सर्वांचे कल्याण करणारा आणि कंजुष लोकांना नष्ट करणारा असा सोम आहे.'

व्य. – आर्य म्हणजे कल्याण, मंगल, असा मूळ अर्थ. सभ्य, उच्चकुलीन व सद्‌गुण-संपन्न व्यक्तींना 'आर्य' असे सन्मानबोधक वचन संस्कृत वाङमयात वापरलेले आहे. वैदिक संस्कृतीला उद्देशून 'आर्य' संस्कृती हे नाव प्रचलित आहे. सर्व जगामध्ये शुभ वृत्तींचा, कल्याणकारक धर्माचा, श्रेष्ठ मूल्यांचा–म्हणजेच आर्य संस्कृतीचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्यांना उद्देशून हा उक्तिविशेष आता रूढ झाला आहे. आर्य संस्कृतीची सनातन तत्त्वे, भारताची बाह्य स्थिती बदलली म्हणून, बदललेली नाहीत, मूलत: नष्ट झालेली नाहीत. जगाला उच्चतर भूमिकेवर नेण्याची प्रेरक शक्ती अद्यापिही भारतीय तत्त्वज्ञानात आहे. राजकारणाचे रंग बदलत गेले, तसा मूळ शुद्ध संजीवक भारतीय तत्त्वज्ञानाच्या बैठकीपासून देश दूर गेल्यामुळे या उक्तीचा गर्भितार्थ लुप्त झाल्यासारखा आहे. तथापि स्वामी विवेकानंदांनी अलीकडच्या काळात ही गर्जना पुन्हा प्रकटपणे केली. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' याचा मूळ शब्दश: अर्थ 'सर्वांचे कल्याण करणारा' असा असला तरी 'आम्ही सारे जग आर्य करून सोडू' ही यातून उत्पन्न झालेली प्रतिज्ञा आहे. मात्र हा अर्थ या शब्दसंहतीला नेमका केव्हा प्राप्त झाला हा संशोधनाचा विषय होईल. या प्रेरणेने भारतभूमीतून अनेक प्रभावी प्रचारक भारताबाहेरच्या विश्वात गेले व त्यांनी केवळ लाक्षणिक अर्थाने नव्हे तर वाच्यार्थानेही जगात अनेक ठिकाणी भारतीय आर्य संस्कृतीची स्थापना केली. तेथील जनता नि राजसत्ताही आर्य बनविली. परंतु नंतरच्या अंधकारयुगात हा प्रत्यक्षात घडलेला इतिहास जणू न घडल्यातच जमा झाल्यासारखा झाला. पुनरपि या प्रेरणेने आधुनिक पद्धतीने काही कार्य सुरू झालेले दिसत आहे.

११२. कृष्णं वन्दे जगद्‌गुरुम्

सं.– भगी. गीतामाहात्म्य. ५. गीता सांगणाऱ्या श्रीकृष्णाचे वर्णन करणारा हा श्लोक व्यासांनी लिहिला आहे.

मू.– **वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।**
देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्‌गुरुम् ॥

अ.– 'वसुदेवाचा पुत्र, कंस आणि चाणुर यांना ठार मारणारा, देवकीमातेला अत्यंत आनंद देणारा, अखिल जगाचा गुरु असलेला अशा श्रीकृष्ण देवाला मी नमस्कार करतो.'

व्य.– कारागृहात जन्मलेल्या, गोकुळात वाढलेल्या व बालपणीच कंसासारख्या अनेक अत्याचारी, राक्षसी प्रवृत्तीच्या सत्ताधीशांचा आपल्या पराक्रमाने नाश करणाऱ्या श्रीकृष्णाचे अद्‌भुत चरित्र त्याचे विभूतिमत्व सिद्ध करणारे आहे. त्याच्या अवतार-कार्यातील सर्वश्रेष्ठ कार्य म्हणजे गीतेची रचना. अर्जुनाला निमित्त करून, जगातील प्रत्येक माणसाला हरघडी होणारा मोह नष्ट व्हावा, या हेतूने श्रीकृष्णाने गीता

सांगितली. भिन्न भिन्न विचारप्रवाहांचा समन्वय करणारी गीता धर्म-तत्त्वज्ञानाचा कोश म्हणून मान्यता पावली आहे. सर्व स्थळी व सर्व काळी मानवजातीला मार्गदर्शक असणारी गीता श्रीकृष्णांनी सांगितली म्हणून तो महाभारतकाली जसा वंद्य, तसाच आता व भविष्यकाली सर्व जगाला मार्गदर्शन करण्यास समर्थ आहे. साऱ्या जगाला, विशिष्ट अशा कोणत्याही धर्ममताच्या कक्षेपलीकडे जाऊन, समतोल, उत्कट मानवी जीवनाचा आदर्श शिकविण्याचा त्याची पात्रता आहे. तो खराखुरा गुरु–म्हणजे श्रेष्ठ आणि गुरु म्हणजे–उपदेशकही आहे.

११३. कृष्णस्तु भगवान् स्वयम्

सं.–भाग. १. ३. २८. परमेश्वराच्या–ब्रह्मदेवापासून कल्कीपर्यंतच्या अनेक अवतारांचे वर्णन केल्यानंतर, भगवान श्रीकृष्णावताराचे वैशिष्टय भागवतकारांनी सांगितले आहे.

सप. क २५.

मू.–एते चांशकलाः पुंसः कृष्णस्तु भगवान्स्वयम् ।
इन्द्रारिव्याकुलं लोकं मृडयन्ति युगे युगे ।। भाग १.३.२८.

अ.–' (ऋषि, मनु, देव, प्रजापति इत्यादी) हे सर्व परमेश्वराचे अंश होत; मात्र श्रीकृष्ण हा स्वतः परमेश्वरच आहे. अंशावतार दैत्यांनी त्रस्त केलेल्या जगाचे युगायुगात रक्षण करीत असतात.'

मू.–वनजौ वनजौ खर्वो रामौ कृष्णः कृपोऽकृपः ।
अवतारा दशैते स्युः कृष्णस्तु भगवान्स्वयम् ।। सप. क २५.

अ.–'मत्स्य, कूर्म, वामन, परशुराम आणि दाशरथी राम, कृष्ण, (कृपा-करुणा हेच ज्याचे ब्रीद तो) बौद्ध आणि (कृपेचा अभाव म्हणून संहार हे ज्याचे कार्य असा) कल्की हे (विष्णूचे) दहा अवतार आहेत. परंतु कृष्ण प्रत्यक्ष (भगवान) परमेश्वर (पूर्णावतार) आहे.'

व्य.–भगवान विष्णूचे मत्स्य-कूर्म-वराहादी दशावतार प्रसिद्ध आहेत. गीतेच्या दहाव्या अध्यायात जे जे–'विभूतिमत्सत्त्वं श्रीमद् ऊर्जितमेव वा'–'भव्य आणि दिव्य आहे ते माझेच रूप आहे असे जाण,' असे भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला सांगितले आहे. 'साधूंचे परित्राण आणि दुष्टांचे निर्दालन' हे अवतारांचे मुख्य कार्य. प्रत्येक अवतारात ते कार्य घडलेले आहे. तथापि श्रीकृष्ण पूर्णावतार मानला जातो. कृष्णजन्माचे वेळी कंसादी दुष्ट राजांच्या अन्यायाची परिसीमा झाली होती. कृष्णाने त्या सर्वांचा संहार केला . त्याचे जन्म-कर्म सर्वच अद्भुत व अतर्क्य आहे. त्याच्या बाललीला, त्यातून त्याने केलेले राक्षसांचे निर्दालन, गोपींबरोबरची त्याची रासक्रीडा, यशोदेला दाखविलेले विश्वरूप दर्शन, पुढे अर्जुनाला दाखविलेले विराट स्वरूप, गीतेचा तत्त्वोपदेश, अशा अनेक अंगांनी प्रकट झालेल्या त्याच्या चरित्रावरून तो साक्षात् परमेश्वरच अशी त्याची

प्रतिमा भागवतकारांनी उभी केली आहे. पण काही ठिकाणी राम व कृष्ण हे दोन्ही पूर्णावतार मानलेले आहेत. भागवत हा ग्रंथ कृष्णमहतीसाठीच असल्यामुळे श्रीकृष्णाला त्यांनी पूर्णावतार मानावे हे साहजिकच आहे. मानवदेहधारी होऊन मनुष्यजीवन परिपूर्ण जगणारा या दृष्टीने त्याची ही महती मानवी दृष्टिकोनातून योग्यही वाटते.

११४. केवलाघो भवति केवलादी

सं. – ऋग्. १०. ११७. ६. अन्नदान करतो तोच खरा दाता होय. अन्नदानासारखे पुण्य नाही. तेच सर्वश्रेष्ठ व्रत आहे. दारी आलेल्या अतिथीला भोजन देऊन तृप्त करण्यातच खरा धर्म आहे.

मू. – **मोघमन्नं विन्दते अप्रचेताः सत्यं ब्रवीमि वध इव स (इत्स्य) तस्य ।**
नार्यमणं पुष्यति नो सखायं केवलाघो भवति केवलादी ॥

अ. – 'कृपण स्वभावाच्या माणसाला संपत्ती मिळणे व्यर्थ आहे, हे सत्यच मी सांगतो आहे. जो देवांचे व अर्यमा किंवा सखा यांचे पोषण करीत नाही, एकटाच भोजन करतो, तो केवळ पापरूप होय. (त्याचे ते अन्नही विषासारखेच जाणावे)'.

व्य. – केवळ स्वतःकरिताच अन्न शिजविणारा पापी समजावा ही ऋग्वेदातील कल्पना गीता (३.१३) व मनुस्मृति (३.११८) या ग्रंथांतही आढळते. इतर सर्व जेवून जे शेष राहील (भुक्तशेष) तेच अन्न विहित आहे. यज्ञादि कर्मे केवळ स्वर्गप्राप्तीसाठी नसून जगाचे धारणपोषण होण्यास त्याची आवश्यकता असते हेच या ऋचेचे सारभूत तत्त्व आहे. स्वतः परिश्रम न करता केवळ वाडवडिलांनी मिळविलेल्या संपत्तीचा उपभोग घेत बसणारा, त्यावरच जगणारा, तेच आयते अन्न खाणारा असा नुसता ठोंब्या मेलेले जिणेच जगत असतो. तसेच दुसऱ्याच्या धनादीचा अपहार करून जगणाराही त्याच कोटीत मोडतो. समाजकल्याणासाठी कष्टत असलेले ज्येष्ठ, श्रेष्ठ कार्यकर्ते किंवा आपल्या हिताविषयी तत्पर असलेले आपले स्नेहीसोबती यांच्यासाठीही जो आपले धन-अन्न खर्च करीत नाही, अशा माणसांना प्राचीन वैदिक साहित्यात स्वार्थी, आप्पलपोटा, पापी ठरविलेला आहे. 'न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः' (ऋग्. ४.३३.११.) किंवा 'मागृधः कस्य स्विद्धनम्' (यजु. ४०.१) ही वचने या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहेत. श्रमप्रतिष्ठा आणि समाजवाद या आधुनिक कल्पनांशी ही प्राचीन काळात या देशात प्रचलित झालेली विचारधारा ताडून पाहण्यासारखी आहे.

११५. केवलं बध्यते शिखा

सं. – मुद्रा. ७. १७. आर्य चाणक्याने बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर अमात्य राक्षसाला पराभूत करून चन्द्रगुप्ताला निर्वैर केले. त्या वेळी अत्यंत समाधानाने चाणक्यांनी हा श्लोक उच्चारला.

मू. – विना वाजिनहस्तिभ्यो मुच्यतां सर्वबन्धनम् ।
पूर्णप्रतिज्ञेन मया केवलं बध्यते शिखा ।।

अ. – 'हत्ती आणि घोडे यांच्याखेरीज बाकी साऱ्यांना सर्व बंधनातून मुक्त करा. माझी प्रतिज्ञा पूर्ण झालेली असल्यामुळे मी तेवढा माझी शिखा बांधणार आहे.'

व्य. – नंदवंशातील धनानंद हा जुलमी राजा होता. या राजाने विद्वान चाणक्याचा भर राजसभेत अपमान केला तेव्हा त्याचा सूड घेण्यासाठी चाणक्याने धनानंदाचा वध करीपर्यंत आपले केस न बांधण्याची (शेंडीला गाठ न मारण्याची) प्रतिज्ञा केली. राजकारणकौशल्याने धनानंदाचा पराभव करून चाणक्याने चन्द्रगुप्ताला राज्यावर बसविले. धनानंदवधाची प्रतिज्ञा पूर्ण करून कृतार्थ झालेल्या चाणक्याच्या या उद्गारांनी आजही शिखाबंधन पूर्णप्रतिज्ञेचे द्योतक झाले आहे.

११६. क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते

(पाहा : तवाऽस्मि दासः)

सं.– कुसं. ५.८६. पार्वतीची परीक्षा घेण्यासाठी शंकराने बटुवेष धारण करून शिवाची निंदा केली. शिवनिंदकाशी बोलणेही उचित नाही, असा विचार करून तेथून निघून जाणाऱ्या पार्वतीसमोर शंकर आपल्या मूळ स्वरूपात प्रकटले आणि तिची तपश्चर्या सफल झाली. त्याप्रसंगी शंकरांनी काढलेले हे उद्गार आहेत.

मू.– अद्य प्रभृत्यवनताऽङ्ग ! तवाऽस्मि दासः क्रीतस्तपोभिरिति वादिनि चन्द्रमौलौ ।
अह्नाय सा नियमजं क्लममुत्ससर्ज क्लेशः फलेन हि पुनर्नवतां विधत्ते ।।

अ.– 'शंकराचे "हे विनम्र पार्वती, आजपासून मी तुझा दास झालो; तुझ्या तपाने तू मला विकत घेतलेस," असे उद्गार ऐकताच पार्वतीचे सर्व श्रम नाहीसे झाले. फलप्राप्ती होताच कष्टाची जाणीव न राहाता (माणसाला) नवा उत्साह प्राप्त होतो.'

व्य.– शिवाची पती म्हणून प्राप्ती होण्यासाठी पार्वतीने खडतर तपश्चर्या केली. तिची ही इच्छा पूर्ण होताच तपाच्या सर्व कष्टांनी आलेला तिचा शीण गेला. त्याप्रमाणेच एखाद्याचे श्रम सार्थकी लागताच पुनश्च नव्या हुरुपाने, जोमाने, नव्या उत्साहाने तो कामाला लागतो. नित्याच्या व्यवहारातही हाती घेतलेले काम यशस्वीरीत्या शेवटास गेले म्हणजे माणसाला केल्या श्रमाचे चीज झाले असे वाटते, हा सर्वांचाच अनुभव आहे. श्रमसाफल्याच्या आनंदात झालेल्या परिश्रमांचा थकवा न वाटता उलट नवा उत्साह येतो, त्या वेळी समाधानाने हेच उद्गार माणसाच्या तोंडून बाहेर पडतात.

११७. क्लैब्यं मा स्म गमः

सं.–भगी. २.३. कुरुक्षेत्राच्या रणांगणावर कौरव व पांडव युद्धार्थ एकमेकांसमोर उभे ठाकले तेव्हा अर्जुन गुरुबांधवादिकांच्या हत्येच्या पापाच्या भीतीने हातपाय

गाळून बसला. त्या वीर पुरुषाचे पौरुष जागे करून त्याला युद्धप्रवृत्त करण्यासाठी श्रीकृष्ण त्या वेळी त्याला फार कठोर भाषेत बोलले तो हा प्रसंग.

मू.– क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ।।

अ.– 'अर्जुना, षंढ (नामर्द) होऊ नकोस, तुला हे शोभत नाही. शत्रूंना (त्राही भगवान करून सोडणारा) ताप देणारा, तू हा अंतःकरणाचा दुबळेपणा टाकून (युद्धासाठी) उभा राहा.'

व्य.– भगवद्‌गीतेतली जी काही निवडक संजीवक वचने आहेत, त्यात या वचनाचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. अर्जुनाला उद्देशून श्रीकृष्णाने साऱ्या जगाला उपयोगी पडेल असे तत्त्वज्ञान नि व्यावहारिक उपदेश गीतेत सांगितला आहे, असे म्हटले जाते. पण गीता ज्या भारतात जन्माला आली आणि ज्या भारतीय समाजाच्या जीवनधारेचा ती महत्त्वाचा भाग बनली त्या राष्ट्राला नि समाजाला तर या वचनसंजीवनीत मृतावस्थेतून जिवंत, जागृत करण्याचे सामर्थ्य आहे. वीरपुरुषाला 'षंढ' म्हणणे यापरती त्याला डिवचण्याची सीमाच नाही. त्यावरून दोन गोष्टी लक्षात येतात की, आपल्या सान्निध्यात असलेला, आपला मित्र–भक्त इतका बावळट कसा बनला याचा श्रीकृष्णाला भयंकर संताप आला असला पाहिजे. आणि दुसरे मानसशास्त्र उत्कृष्ट जाणणाऱ्या या तत्त्ववेत्त्याला अर्जुनाच्या अंगचे पौरुष जागृत करण्यासाठी कोणत्या टोकाला गेले पाहिजे (म्हणजे अर्जुन किती किंकर्तव्यमूढ झाला होता, त्यामुळे काय परिस्थिती उत्पन्न होणार होती) याची स्पष्ट जाणीव श्रीकृष्णाला होती. या दृष्टीने या देशातील भारतीय समाजाला जागृत करण्यासाठी या वचनाचा वापर वारंवार केला गेलेला आहे. आज वर्तमानात व भविष्यकाळातही तो उपयोगी पडणारा आहे. सार्वजनिक, सामूहिक दृष्टया सामाजिक, राजकीय इत्यादी क्षेत्रात तो जसा संजीवक मंत्र आहे तसाच व्यक्तिगत, सांसारिक, प्रापंचिक बाबतीतही किंकर्तव्यमूढ बनलेल्या माणसाला धैर्याने उठून जीवनसंग्रामार्थ सज्ज होण्याची, संकटांशी दोन हात करण्याची प्रेरणा देण्याची शक्ती या अमर वचनात आहे. स्वामी विवेकानंदांनी याचा उपयोग करून घेतलेला आहे. ज्ञानेश्वरांची या श्लोकावरील टीका भीरू माणसालाही वीर बनविणारी आहे.

११८. कोऽर्थवान् को दरिद्रः

सं.– वैश. ५३. राजा आणि यती यांच्या संवादात यतीने राजाला श्रीमंतीचे आणि गरिबीचे रहस्य सांगितले.

मू.–वयमिह परितुष्टा वल्कलैस्त्वं दुकूलैः सम इव परितोषो निर्विशेषो विशेषः ।
स तु भवतु दरिद्रो यस्य तृष्णा विशाला मनसि च परितुष्टे कोऽर्थवान् को दरिद्रः ।।

अ. – 'हे राजा, आम्ही या वल्कलांनी संतुष्ट आहोत, तर तू रेशमी वस्त्रे धारण

केल्याने संतुष्ट आहेस. दोघांचा संतोष सारखाच आहे. त्यात वेगळेपणा नाही. खरोखर ज्याची हाव संपत नाही तोच दरिद्री असतो. मन संतुष्ट असेल तर कोण श्रीमंत आणि कोण दरिद्री ?'

व्य.– मनाचे समाधान, संतोष हा बाह्य वस्तूंच्या संग्रहामध्ये किंवा मालकीमध्ये नसतो. ती मनाची एक वृत्ती आहे. म्हणून सुखाच्या साधनांचा संग्रह वाढवीत राहाण्यापेक्षा विवेकाने, जे प्राप्त असेल त्यात संतोष मानण्याची वृत्ती ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

११९. कोऽहं कस्त्वं कुत आयातः

सं.– चर्पट १२. श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या सुप्रसिद्ध 'चर्पटपञ्जरिका' स्तोत्रातील हा श्लोक आहे. जगमिथ्यात्व सिद्ध करण्यासाठी त्यांनी येथे काही मूलभूत प्रश्न विचारलेले आहेत.

मू.– कस्त्वं कोऽहं कुत आयातः का मे जननी को मे तातः ।
इति परिभावय सर्वमसारं विश्वं त्यक्त्वा स्वप्नविचारम् ॥

अ.– 'तू कोण, मी कोण, कोठून आलो, माझी आई कोण आहे आणि वडील म्हणजे कोण याच्या (सूक्ष्म विचाराने) सर्व जग मिथ्या आहे, स्वप्नासारखे क्षणभंगुर आहे, असे निश्चयाने जाणून घे.' (प्रचलित 'कोऽहं कस्त्वं' आहे, परंतु मुळात 'कस्त्वं कोऽहं' असे आहे).

व्य.– मी कोण आहे, कोठून आलो, कोठे जाणार, जगाशी माझा संबंध काय, याचा विचार अध्यात्मशास्त्रामध्ये प्रामुख्याने केलेला आहे. तो प्रत्येक साधकाने करणे आवश्यक आहे. त्यामुळे स्वतःचे व जगाचे खरे स्वरूप त्याला समजते. आद्य शंकराचार्यांसारख्या मुक्त पुरुषांनी, जिज्ञासू लोकांसाठी, आत्मचिंतन कसे करावे याचे मार्गदर्शन येथे केले आहे. कोणत्याही गोष्टीचा मुळापर्यंत जाऊन विचार करण्याच्या संदर्भातही या उक्तीचा वापर केला जातो.

१२०. कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः

सं.– श्रीमत आद्य शंकराचार्यांच्या 'कौपीनपञ्चक' या वेदान्तस्तोत्रातील प्रत्येक श्लोकाचा चौथा चरण–ध्रुवपद म्हणून हे वचन आले आहे. स्तोत्रातील तिसरा श्लोक येथे दिलेला आहे. (बाकीचे चार श्लोक परिशिष्टात पाहा)

मू.– वेदान्तवाक्येषु सदा रमन्तो भिक्षान्नमात्रेण च तुष्टिमन्तः ।
अशोकवन्तः करुणैकवन्तः कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः ॥

अ.– 'उपनिषदादि आध्यात्मिक वाङमयाच्या चर्चेमध्ये सदैव रंगून जाणारे, भिक्षा मागून आणलेल्या अन्नावरच तृप्त राहाणारे, शोकरहित, केवळ दयाळू वृत्तीचे, लंगोटी (एवढेच वस्त्र) धारण करणारे, खरोखर भाग्यवान पुरुष होत.'

व्य.– नेहमीच्या व्यवहारात, ऐहिक सुखाची साधनसंपत्ती पाहून माणसाच्या भाग्याची गणना केली जाते. परंतु ते भाग्य टिकावू नसते हे विचारी माणसाला कळू शकते. सुखाचे कोणतेही बाह्य साधन नसतानांही, नित्य आनंदात असणाऱ्या मुक्त पुरुषाचे वर्णन श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी येथे केलेले आहे व खरे भाग्य कोणते याकडे आपले लक्ष वेधलेले आहे. त्यागवृत्तीवर आधारलेल्या भारतीय संस्कृतीचे हे वैशिष्टच मानावे लागेल.

१२१. क्षणशः कणशश्चैव

सं.– सप. क ३०.

मू.– क्षणशः कणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत् ।
क्षणत्यागे कुतो विद्या कणत्यागे कुतो धनम् ।।

अ.– '(प्रत्येक) क्षणाक्षणाला ज्ञान आणि कणाकणाने धनाची प्राप्ती करावी (धन मिळवावे). एक क्षण (जरी) गमावला (तरी) ज्ञान कसे प्राप्त होईल ? (तसेच) कण (कण) सोडून दिला (तरी) द्रव्य कुठून मिळणार ?'

व्य.– द्रव्यसंचय करावयाचा असो वा ज्ञान मिळवावयाचे असो, एकदम साठा होणार नाही. कण कण साठवूनच द्रव्य साठविता येईल, कण क्षुल्लक म्हणून सोडून चालणार नाही. हाच आशय व्यक्त करणारी मराठीत 'थेंबे थेंबे तळे साचे' ही म्हण प्रसिद्ध आहे. जसे धनाचे तसेच ज्ञानाचे. काळ वेगाने चालला असता एक क्षण जरी फुकट– ज्ञानार्जनाशिवाय घालविला तरी पुन्हा ती चूक सुधारता येणार नाही. कारण गेलेला काळ परत येणे शक्य नसते. आयुष्यातील प्रत्येक क्षण जर ज्ञानप्राप्तीसाठी वेचला तरच काही ज्ञान गाठीला पडते. मानवी आयुष्य फार थोडे आहे, तर ज्ञान–शब्द-शास्त्र अमर्याद आहे. अशा वेळी थोडक्या कालमर्यादेत अपरंपार ज्ञान मिळवायचे झाल्यास, क्षण क्षण जाणीवपूर्वक ज्ञानार्जनासाठी योजला पाहिजे. धन वा ज्ञान अचानक प्राप्त होणार नाही, त्यासाठी सातत्याने प्रयत्न हवेत हेच सुभाषितकाराने आवर्जून सांगितले आहे. सामान्य व्यवहारातही सतत दीर्घोद्योगाची प्रेरणा या उक्तीने दिली जाते.

१२२. क्षारं जलं कापुरुषाः पिबन्ति

सं.– भोज १३५. कालिदासाशी वैमनस्य येऊन भोजराजा त्याला पूर्वीप्रमाणे मान देईनासा झाला. अनेकांनी त्याची समजूत घातली. पण कालिदासाविषयीचे त्याचे प्रेम कमी झाले. ही गोष्ट कालिदासाच्या लक्षात येताच राजाचा निरोप घेऊन निघून जाताना त्याने हा श्लोक म्हटला.

मू.– यस्यास्ति सर्वत्र गतिः स कस्मात् स्वदेशरागेण हि याति नाशम् ।
तातस्य कूपोऽयमिति ब्रुवाणा क्षारं जलं कापुरुषाः पिबन्ति ।।

अ.– 'जो कोठेही जाऊ शकतो (जाऊन स्वतःचा पराक्रम दाखवू शकतो) तो स्वतःच्या भोवतालच्या परिसराच्या आसक्तीने कशाला स्वतःचा नाश करून घेईल. 'ही आमच्या वडिलांची विहीर आहे' असे म्हणणारे भित्रे पुरुष (त्याच कूपातील साठलेले) रुचिहीन, खारट पाणी पीत राहातात. (मुळात 'केपुरुषाः' आहे, ते योग्य वाटत नाही.)

व्य.– माणसांच्या कूपमंडुक वृत्तीवर या शब्दांत टीका केली जाते. घरातून बाहेर पडून स्वकर्तृत्वाने धन व कीर्ती मिळविण्याचे सामर्थ्य ज्याच्या अंगी असते तो वाडवडिलांनी मिळविलेल्या धनमानाच्या जुन्या साठ्यावर समाधान मानीत नाही. नवीन काही करण्याची हिंमत ज्यांच्यामध्ये नसते ते साठवून ठेवलेल्या धनावर निर्वाह करून हळूहळू स्वतःचा नाश करून घेतात. काहीतरी नवेच करून दाखविण्याची प्रवृत्ती शिवछत्रपतींसारख्या असामान्य पुरुषात आढळते आणि ते आपल्या वडिलोपार्जित जहागिरीवर संतुष्ट न राहाता स्वतःच्या देशधर्मसंस्कृतीचे स्वतंत्र सार्वभौम स्वराज्य प्रस्थापित करतात. परंतु सामान्य माणसातही त्याच्या त्याच्या कार्यकर्तृत्वापुरती, कार्यक्षेत्रापुरती अशी महत्त्वाकांक्षा असली पाहिजे. अल्पसंतुष्ट, कूपमंडुकवृत्तीने आळसात घरात स्वस्थ न राहाता 'काहीतरी नवीन' साधण्याची त्याची धडपड चालू राहावी म्हणून त्याला उत्तेजन देण्यासाठी या उक्तीचा उपयोग केला जातो.

१२३. क्षुरस्य धारा निशिता

(पाहा : उत्तिष्ठत । जाग्रत ।)

(ख)

१२४. खटाटोपो भयंकरः

सं.–पंच. १.२२५. 'मित्रभेद' तन्त्रात, विष्णूचे रूप घेऊन रोज रात्री एका राजकन्येकडे जाणाऱ्या एका साध्या विणकरावर एकदा राजाच्या बाजूने लढाई करण्याचा प्रसंग आला,तेव्हा जिवावर उदार होऊन शंख,चक्र, गदा,पद्म घेऊन लाकडाच्या-कळ दाबली की उडणाऱ्या-गरुडावर बसून आकाशातून लढाई करण्याचे त्या विणकराने ठरविले. 'त्या रूपाच्या प्रभावाने भगवान नारायणच लढण्यासाठी आला' असे समजून सर्वजण भयभीत होतील व मग लढाई सहज जिंकता येईल' असा त्या विणकराने विचार केला.

मू.– निर्विषेणापि सर्पेण कर्तव्या महती फणा ।
विषं भवतु वा माभूत्फणाटोपो(खटाटोपो) भयंकरः ।।

अ.– 'विषारी नसलेल्या सर्पाने देखील मोठी फणा काढून फुसकारावे. विष असो किंवा नसो, त्याने फणा पसरून भीती उत्पन्न करावी.'

व्य.– स्वत:जवळ सामर्थ्य नसले तरी प्रसंगी मोठा आव आणून, शत्रूला भिववून पळवून लावण्याजोगी युक्ती किंवा स्वत:चे तशा प्रकारचे रूप असले म्हणजे प्रसंग निभावून नेता येतो. अशा वेळी शत्रू लढण्यासाठी पुढे न येता लांबूनच भिऊन पळून जातो व आपला बचाव होतो.

वर सांगितलेला हा या श्लोकाचा भावार्थ आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात मात्र 'खटाटोपो भयंकर:' अशी शब्दसंहती रूढ आहे. 'फणाटोपो'चा 'खटाटोपो' कसा व केव्हा झाला हे सांगता येत नाही. शिवाय व्यवहारात त्याचा अर्थही अगदी बदललेला आहे. एखादी गोष्ट साध्य करून घेण्यासाठी भयंकर, अतिशय परिश्रम करावे लागतात तेव्हा त्याला 'केवढा खटाटोप' असे म्हटले जाते.

१२५. खल्वाटो निर्धन: क्वचित्

सं. – सप. क २७.

मू. – **क्वचिद्दन्तालको* मूर्ख: क्वचिद्गानवती सती ।**
क्वचित्काणो भवेत्साधु: खल्वाटो निर्धन: क्वचित् ॥

* **दन्तान्तरो** : पाठभेद

अ. – 'विरळ दात असलेला मनुष्य क्वचितच मूर्ख असतो, गाणारी स्त्री पतिव्रता असणे कठीण, तिरळी नजर असणारा मनुष्य क्वचित सज्जन असतो, डोक्याला टक्कल पडलेला मनुष्य क्वचितच दरिद्री आढळतो'.

व्य. – व्यवहारात एकाच प्रकारची अनेक उदाहरणे दृष्टीस पडली म्हणजे मनुष्य काही आडाखे बांधतो. काही वेळा त्यात तथ्य असते तर काही वेळा त्यात योगायोगाचा भाग असतो. याकरिताच ते सिद्धान्त म्हणून घेता येत नाहीत. गाणाऱ्या स्त्रीचा गाण्याच्या निमित्ताने अनेकांशी संबंध येतो, म्हणून तिच्या पातिव्रत्याबद्दल, शीलाबद्दल शंका घेतली जाते. सरळ न पाहाता तिरकस दृष्टीने पाहाणारा मनुष्य धूर्त असतो, याचा अनुभव बहुतेक वेळा येतो. तसेच टक्कल पडलेला माणूस हा स्वास्थ्य लाभलेला असावा अशा समजुतीने तो धनसंपन्नही असला पाहिजे असा आडाखा बांधला जातो.

(ग)

१२६. गच्छ तात यथासुखम्

सं. – वारा. २. ४०. ९. राम व सीता यांच्याबरोबर अरण्यात निघालेल्या लक्ष्मणाला निरोप देताना सुमित्रेने मातेला उचित असा उपदेश केला.

सू. – रामं दशरथं विद्धि मां विद्धि जनकात्मजाम् ।
अयोध्यामटवीं विद्धि गच्छ तात यथासुखम् ।।

अ. – 'बाळा, (लक्ष्मणा) रामालाच दशरथासारखा मान, सीतेला माझ्या जागी समज, आणि अरण्य हीच अयोध्या आहे असे मानून तू खुशाल (वनात) जा.'

व्य. – 'ज्येष्ठो भ्राता पितु: सम:' 'मोठ्या भावाला पित्याप्रमाणे मानावे व त्याच्या पत्नीचा मातेसारखा आदर करावा.' धाकट्या भावाने थोरल्या भाऊ-भावजयीशी कसे वागावे याचा सर्वश्रेष्ठ आदर्श सुमित्रेच्या शब्दांत व्यक्त झालेला आहे. स्वत:च्या पुत्राला हा उपदेश करणारी सुमित्रा, भारतीय संस्कृतीतील आदर्श मातेची मूर्ती आहे. रामाची सावत्र व लक्ष्मणाची प्रत्यक्ष माता आणि दशरथाची पत्नी, हे माता व पत्नी असे दोन्ही आदर्श सुमित्रेच्या रूपाने येथे साक्षात झालेले आहेत.

१२७. गजस्तत्र न हन्यते

सं. – पंच. ४.३९. प्रत्येक मनुष्यात तो ज्या कुलात जन्मला असेल त्या कुलाचे गुणधर्म उतरतात हे 'लब्धप्रणाश' तंत्रात एका कथेतून सांगितले आहे. एका कुंभाराने युद्धाच्या इच्छेने एका राजाकडे रणांगणावर जाण्याची इच्छा प्रकट केली तेव्हा राजाने त्याला नकार दिला.

सू. – शूरश्च कृतविद्यश्च दर्शनीयोऽसि पुत्रक ।
यस्मिन्कुले त्वमुत्पन्नो गजस्तत्र न हन्यते ।।

अ. – 'हे मुला! तू शूरवीर आहेस, शिकलेला आहेस, दिसायलाही देखणा आहेस. पण ज्या कुळात तू जन्माला आला आहेस त्या कुळातील लोकांकडून कधी हत्ती मारला जात नाही.'

व्य. – 'सर्वच गोष्टी शिकवून येत नाहीत; काही वृत्ती नि वैशिष्ट्ये मुळातच असावी लागतात' असे उद्गार व्यवहारात अनेकदा ऐकू येतात. त्याचा आशय हाच असतो. प्रत्येक घराण्याचे काही वैशिष्ट्य असते आणि हे वैशिष्ट्य वंशपरंपरेने प्रत्येक पिढीत उतरलेले दृष्टोत्पत्तीस येते. पंचतंत्रातील या कथेतही राजा सैनिक झालेल्या कुंभाराला हेच सांगत आहे की, लढणे हे क्षत्रियाचे काम असते, लढाऊ वृत्ती क्षत्रियातच असू शकते. एखाद्या दुबळ्या, भेकड माणसाने शौर्याची, पराक्रमाची ऐट आणली, शत्रूवर मात करण्याची बढाई मारली की, त्याच्या हातून ते घडण्यासारखे नाही, असे त्याला तुच्छतापूर्वक, हेटाळणीने सांगण्यासाठी या उक्तीचा वापर केला जातो. 'बाबारे! तुझे ते काम नव्हे, नसत्या फंदात पडू नकोस' असे या उक्तीने सुचविले जाते.

१२८. गणना लघुचेतसाम्

(पाहा : उदार चरितानां तु)

१२९. गतानुगतिको लोकः

सं. – पंच. १.३७३. टिटव्याची अंडी समुद्राने बुडविली, तेव्हां सर्व पक्ष्यांना त्याने एकत्र केले. समुद्राविरुद्ध गाऱ्हाणे सांगण्यासाठी ते सर्वजण गरुडाकडे गेले. 'समुद्राने माझी हानी केली, असेच तो दुसऱ्या निरपराध पक्ष्यांनाही विचार न करता मारून टाकील,' असे टिटवा गरुडाला म्हणाला.

लोकोक्ती : काशीयात्रेला गेलेला एक तरुण गंगेवर स्नानाला गेला. तेथे गर्दी होती, म्हणून त्याने आपल्याजवळचा तांब्या तीरावरच्या वाळूत पुरून ठेवला. खुणेसाठी त्याने त्यावर वाळूचे एक शिवलिंग करून ठेवले व तो पाण्यात शिरला. तीरावर फिरणाऱ्या अनेक यात्रेकरूंनी ते शिवलिंग पाहिले. काशीतली ही एक प्रथा आहे असे त्यांना वाटले आणि त्यांनीही तेथे वाळूची शिवलिंगे करून ठेवली. स्नान करून तीरावर परत आलेला तरुण आपला तांब्या शोधण्यासाठी शिवलिंगाची खूण पाहू लागला, तो सगळीकडे त्याला शिवलिंगेच दिसू लागली. तांब्या शोधता शोधता तो कंटाळला. लोकांच्या आंधळ्या अनुकरणाला उद्देशून त्याच्या तोंडून हे उद्गार बाहेर पडले.

मू. – **एकस्य कर्म संवीक्ष्य करोत्यन्योऽपि गर्हितम् ।**
गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः ॥ पंच. १.३७३.

अ. – 'एकाने केलेले वाईट कर्म पाहून दुसराही तसेच काम करण्यास प्रवृत्त होतो. एक गेला म्हणून त्याच्या मागोमाग दुसरा गेला अशी लोकांची रीत असते. स्वतःच्या कल्याणाकडे लोक पाहात नाहीत.'

मू. – **गतानुगतिको लोकः न लोकः पारमार्थिकः ।**
वालुकालिङ्गमात्रेण गतं मे ताम्रभाजनम् ॥ लोकोक्ती

अ. – 'लोक एका मागोमाग एक जाणारे आणि खऱ्या गोष्टीचा विचार न करता चालणारे असतात. वाळूचे लिंग करून ठेवल्यामुळे मी माझा तांब्या गमावला.'

व्य. – विचारपूर्वक कृती करण्याची प्रवृत्ती फार थोड्या माणसांमध्ये आढळते. आपले वाडवडील ज्या गोष्टी करीत, त्या कालबाह्य झाल्या तरी जुन्याच पद्धतीने मनुष्य करीत राहातो. आधुनिक जीवनातल्या वेशभूषेच्या पद्धतीत हाच प्रकार दिसतो. एकाने केले म्हणून दुसऱ्याने केले. स्वतःला तो वेश शोभतो की नाही याचा विचार कोणी करीत नाही.

अशिक्षित लोकांच्या समुदायात तर या आंधळ्या अनुकरण प्रवृत्तीचे हानीकारक स्वरूप दृष्टीस पडते. एकाने सहज झाडावर घाव घातला म्हणजे दुसराही घाव घालतो आणि व्यर्थ नुकसान करतो. अन्धेन नीयमानाः यथा अन्धाः । (कठ १.२.५) हे उपनिषद्वचन 'आंधळ्यांना घेऊन जाणारे आंधळे' याच अर्थाचे आहे. 'अन्धपरम्परा न्याय' किंवा 'गतानुगतिक न्याय' हे उक्तिविशेष वरील वचनांवरून रूढ झाले आहेत.

१३०. गतिरेका पतिर्नार्या

सं. – वारा. २.६१.२४. राम वनवासाला गेल्यानंतर पुत्रशोकाने दु:खी झालेल्या कौसल्येने 'धर्मनिष्ठ पुत्राला हाकून दिल्यामुळे धर्माविरुद्ध आचरण करून तुम्ही मलाही सर्व प्रकारे निराधार केले आहे' असे कठोर भाषण करून दशरथाची निर्भर्त्सना केली.

मू.– **गतिरेका पतिर्नार्या द्वितीया गतिरात्मजः ।**
तृतीया ज्ञातयो राजंश्चतुर्थी नैव विद्यते ।।

अ. –'स्त्रीला पती पहिली, पुत्र दुसरी आणि बांधव तिसरी अशा तीन गती शास्त्राने सांगितल्या आहेत. याशिवाय चौथी गती (आधार) म्हणून तिला नाही.'

व्य. –निसर्गप्राप्त दुर्बलतेमुळे स्त्रीला योग्य आश्रयाने राहाणे श्रेयस्कर असते. त्यात तिचे रक्षण व प्रतिष्ठा आहे. नाही तर तिचे व पर्यायाने समाजाचे पतन अपरिहार्य आहे. रामायणकालीन संस्कृतीचे प्रतिबिंब या उक्तीत पडलेले आहे हे खरेच; परंतु आजची सद्य:कालीन भारतीय समाजातील सर्वसामान्य स्त्रीची स्थिती पाहूनही हेच उद्‌गार काढले जातात. कित्येकदा अगतिकतेनेही असे उद्‌गार निघतात.

१३१. गतोदके सेतुबन्धो

सं.–वारा. २.९.५४. 'पूर्वी मिळालेल्या वरांच्या जोरावर रामाला वनवास व भरताला राज्य मागून, स्वत:चे कल्याण करून घेण्याची हीच योग्य वेळ आहे' असे मन्थरेने कैकेयीच्या मनावर ठसविले.

मू. – **गतोदके सेतुबन्धो न कल्याणी विधीयते ।**
उत्तिष्ठ कुरु कल्याणं राजानमनुदर्शय ।।

अ. –'हे कल्याणी, पाणी वाहून गेल्यावर कोणी बांध घालीत नाहीत. म्हणून तू आता ऊठ, आपले कल्याण करून घे. तू रागावली आहेस असे राजाला दाखव.'

व्य. – कार्य सिद्ध होण्यासाठी योग्य वेळी सावध होऊन प्रयत्न करण्यात मनुष्याने तत्पर राहिले पाहिजे. नाहीतर 'जो सोवत है वो खोवत है, वो रोवत है।' या कबिराच्या उक्तीप्रमाणे सर्वस्व गमावून बसण्याची वेळ येते. 'बैल गेला नि झोपा केला' ही त्याच अर्थाची मराठी म्हण.

१३२. गते शोको न कर्तव्यः

सं.–सुर. ३. सामान्यनीती २७७. मानवी स्वभावातील दोष बरोबर जाणून घेऊन ते दूर व्हावेत यासाठी शास्त्रकारांनी योग्य विचाराची दिशा येथे दाखविली आहे.

मू. – **गते शोको न कर्तव्यो भविष्यं नैव चिंतयेत् ।**
वर्तमानेन कालेन वर्तयन्ति विचक्षणाः ।।

अ. – ' होऊन गेलेल्या गोष्टीबद्दल शोक करू नये; भावी काळात काय होईल याचा विचार करू नये. सूज्ञ लोक चालू काळाला योग्य असे आचरण करतात. '

व्य. – माणसाच्या मनाची पुष्कळशी शक्ती, पूर्वी काय घडले याचे पुनः पुन्हा स्मरण करण्यात, त्याबद्दल हळहळण्यात आणि भविष्यकाळाची स्वप्ने रंगविण्यात जाते. तो जणू भुतकाळात आणि भविष्यकाळात जगत असतो. जो वर्तमानकाळाचा क्षण ' काय करा, ते आता करा' म्हणून आवाहन करीत असतो तो फुकटच जातो. वर्तमान चालू क्षणाच्या कर्तव्याबद्दल जागृत राहून योग्य ती कृती करणे हेच मानवी जीवनाचे सार्थक आहे. ' गतं न शोच्यम् ' असेही म्हणण्याची प्रथा आहे. या सर्वांचा अर्थ जे घडून गेले ते वाईट असेल याबद्दल रडत बसण्यात अर्थ नाही, त्याचा काही उपयोग नाही. आत्ता, आज व पुढे काय करता येईल याचाच विचार केला तर तो उपयुक्त ठरेल, त्यातून काही हाती लागेल हे सांगण्यासाठी ही उक्ती.

१३३. गर्जन्ति न वृथा शूराः

सं.– वारा. ६ . ६५ . ३. कुंभकर्णाला झोपेतून उठवून त्याचा अभिमान डिवचून, त्याला युद्धाला प्रवृत्त केले असता रणभूमीवर जाताना कुंभकर्णाने स्वतःच्या पराक्रमाचा सार्थ अभिमान व्यक्त केला.

मू.–गर्जन्ति न वृथा शूरा निर्जला इव तोयदाः ।
पश्य संपद्यमानं तु गर्जितं युधि कर्मणा ।।

अ. –' शूर पुरुष पाणी नसलेल्या ढगाप्रमाणे व्यर्थ गर्जना करीत नाहीत. माझी गर्जना प्रत्यक्षात तू युद्धामध्ये अवलोकन कर. '

व्य. – पराक्रमी पुरुषांचे अंगी उक्तीप्रमाणे कृती करण्याचे सामर्थ्य असते. बढाईखोर मनुष्य प्रत्यक्ष कृतीचे वेळी माघार घेतो. याच अर्थाची ' गर्जेल तो पडेल काय ' ही उक्ती प्रसिद्ध आहे.

१३४. गहना कर्मणो गतिः

(पाहा : भवितव्यं भवत्येव)

सं. – भगी. ४ . १७ . ' करून न करणारा ' असे स्वतःच्या कर्म करण्याच्या पद्धतीचे वर्णन केल्यानंतर भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला कर्माचे रहस्य समजावून घेण्यास सांगितले.

सप. क ६.

सुर. २. दैवाख्यानम् १४.

मू. – कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ।
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ।। भगी. ४.१७.

अ. – 'कर्म म्हणजे काय हेही जाणून घेतले पाहिजे. विकर्म (विपरीत कर्म) कोणते हे सुद्धा समजावून घेतले पाहिजे. तसेच अकर्म कशाला म्हणावे याचेही ज्ञान करून घ्यायला हवे. कारण कर्माची गती कळणे कठीण आहे.'

सू. – विपत्तौ किं विषादेन सम्पत्तौ हर्षणेन किम् ।
भवितव्यं भवत्येव कर्मणो गहना गतिः ।। सप. क ६.; सुर. २ दैवा. १४

*** कर्मणामीदृशी गति :** पाठभेद : ।।

अ. – 'संकट आले असता खेद करून काय उपयोग आणि सुस्थिती प्राप्त झाली असताना हुरळून जाण्यात काय अर्थ? जे व्हायचे ते होणारच. कर्माची गती अनाकलनीय आहे.'

व्य. – 'कर्माची गती गहन आहे!' सुखी मनुष्यावर अचानक दारिद्र्य किंवा मृत्यू यासारखी आपत्ती आली किंवा एखादी अनपेक्षित, कल्पनेबाहेरची घटना घडली, म्हणजे माणसाच्या तोंडून वरील उद्‌गार बाहेर पडतात. एखाद्या गोष्टीचा परिणाम भविष्यकाळात काय होईल याचा अंदाज करता येईनासा झाला म्हणजेही आपण असे म्हणतो. तत्त्वज्ञानात केलेली कर्माची चिकित्सा वाचूनही कर्माची गती गहन आहे असे ध्यानात येते.

येथे श्रीकृष्णांनी सांगितलेले कर्माचे स्वरूप समजावून घेणे व त्याप्रमाणे कर्म करणे प्रत्येकाच्या हिताचे आहे. कारण कोणते ना कोणते कर्म केल्याखेरीज आपण क्षणभरही राहू शकत नाही. कर्म करण्यामागील भूमिकेवर व कुशलतेवर माणसाचे सुख, दुःख, व्यावहारिक व पारमार्थिक यश अवलंबून आहे.

वर्णाश्रमधर्मानुसार आपल्या वाट्याला आलेले ते 'कर्म' होय. ते करीत असताना काम, लोभ इ. प्रवृत्तींच्या आहारी गेल्यामुळे होणारे ते 'विकर्म' होय. कोणतेही कर्म करताना फलाची हाव सोडून, 'मी' पणाचा अभिमान सोडून केलेले ते 'अकर्म' होय. अशा प्रकारे केलेल्या कर्माचे बंधकत्व नष्ट होते. कर्माचे अकर्म करण्यात माणसाचे कौशल्य आहे. कर्म - विकर्म - अकर्म या शब्दांच्या अर्थाबद्दल अनेक वाद आहेत. 'गहना कर्मणो गतिः।' स्वतः भगवानही हेच म्हणतात. पूर्वीच्या कोणत्या कर्माचे फल म्हणून आपण सुस्थिती भोगीत आहोत किंवा आपल्याला दुःख सहन करावे लागत आहे हे आपल्याला कळू शकत नाही. आपली इच्छा असो वा नसो त्याचा स्वीकार आपल्याला करावाच लागतो; मग त्या बाबतीत हर्ष किंवा खेद वाटून तरी काय उपयोग? शांत मनाने आपले कर्तव्य करीत राहाणे हीच याबाबतीतली उचित भूमिका होय.

१३५. गीता सुगीता कर्तव्या

सं. – महा. ६. प्रवि. ३. १०४. गीता सांगून झाल्यानंतर, भीष्मपर्वात वैशंपायनांनी गीतेचे माहात्म्य सांगितले आहे.

मू. – **गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रसंग्रहैः ।**
या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनिःसृता ।।

अ. – ‘एका गीतेचे चांगले अध्ययन करावे, मग इतर शास्त्रांचा संग्रह करण्याची गरज नाही. गीता स्वतः भगवान श्रीकृष्णाच्या मुखकमलातून बाहेर पडलेली आहे.’

व्य. – गीतेमध्ये सर्व तत्त्व-विचारांचा समन्वय केला आहे, ती सर्व शास्त्रांचे सार आहे, आणि ती पूर्णावतार भगवान् श्रीकृष्णांच्या तोंडून सांगितली गेली आहे. तेवढी मुखोद्गत केली, तिच्या अर्थाचे मनन व आचरण केले, म्हणजे जीवनाचे सार्थक होईल. मग नाना शास्त्रे वाचून बुद्धीला शीण देण्याचे कारणच नाही. एखादाच महत्त्वाचा, कल्याणाचा विचार धरून त्याचा पाठपुरावा करावा, असे सांगताना हा शब्दसमूह वापरला जातो.

१३६. गुणाः पूजास्थानम्

सं. – उरा. ४.११. वाल्मीकींच्या आश्रमात जनक राजा, कौसल्या, वसिष्ठ व अरुंधती यांची भेट होते. रामाने केलेल्या सीतेच्या त्यागामुळे सर्वजण अतिशय दुःखी असतात. वृद्ध अरुंधतीने त्या वेळी सीतेचे गुणवर्णन केले आहे.

मू. – **शिशुर्वा शिष्या वा यदसि मम तत्तिष्ठतु तथा**
विशुद्धेरुत्कर्षस्त्वयि तु मम भक्तिं जनयति ।।
शिशुत्वं स्त्रैणं वा भवतु ननु वन्द्यासि जगतां
गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः ।।

अ. – ‘तू माझी छोटी मुलगी किंवा शिष्या, कोणीही अस, पण तुझ्या पावित्र्याचा उत्कर्ष माझ्या मनात तुझ्याविषयी भक्तिभाव जागा करीत आहे. तुझे बालपण असो की स्त्रीत्व असो, तू खरोखर जगाला वंदनीय आहेस. गुण पूजा करण्यास योग्य आहेत. गुणी व्यक्तींच्या बाबतीत लिंगाचा (ती स्त्री आहे की पुरुष) किंवा वयाचा विचार अनाठायी आहे.’

व्य. – सिंहाचा छावा छोटा असला तरी तो हत्तीच्या गंडस्थळावर झेप घेतो. तेज, पराक्रम, विद्वत्ता, दृष्टीस पडली असताना, त्याच्या बाबतीत वयाचा व स्त्री-पुरुष भेदाचा विचार बाजूला ठेवून गुणांचे कौतुक केले पाहिजे. पराक्रम वयावर अवलंबून नसतो. लव-कुश, अभिमन्यू यांची उदाहरणे इतिहासात प्रसिद्ध आहेत. जगाच्या गुरुस्थानी असणारे शंकराचार्य व ज्ञानेश्वर यांनी लहान वयातच आश्चर्यकारक अशी विद्वत्ता प्रकट केली व सर्वांना मार्गदर्शक अशी ग्रंथरचना केली. सावित्रीने यम-धर्मालाही परतविले, तर गार्गी-मैत्रेयी यांनी श्रेष्ठ असे आत्मज्ञान प्राप्त करून घेतले. अशा प्रकारे गुणवत्ता जेथे जेथे असेल ती ती व्यक्ती निःसंशय पूजेला म्हणजे आदर-सत्कार करण्याला, मानसन्मान करण्याला पात्र आहे.

१३७. गुणाः सर्वत्र पूज्यन्ते

सं. – सुर. २. गुणप्रशंसा ५. गुणी मनुष्य कोठेही गेला तरी सहृदय लोक त्याचा गुण जाणून गौरव करतात.

सप. ग २०. (परिशिष्ट पाहा).

मू. – **गुणाः सर्वत्र पूज्यन्ते पितृवंशो निरर्थकः ।**
वासुदेवं नमस्यन्ति वसुदेवं न मानवाः ।। सुर. २. गुण. ५.

अ. – 'जगात सर्व ठिकाणी गुणांचा आदर केला जातो. वडिलांचा वंश (सांगणे) व्यर्थ आहे. लोक वसुदेवाला बाजूला ठेवून वासुदेवाची–कृष्णाची पूजा करतात.

मू. – **गुणाः सर्वत्र पूज्यन्ते दूरेऽपि वसतां सताम्**
केतकीगन्धमाघ्रातुं स्वयं गच्छन्ति षट्पदाः ।। सप. ग २०.

अ. – 'गुणांची सर्वांकडून पूजा होते, (मग ते) दूर असणाऱ्या सज्जनांचे असोत. भृंगे केतकीचा सुवास घेण्यासाठी स्वतःहून (धावत) जातात.'

व्य. – गुणी मनुष्य कोणत्याही देशात, अनोळखी लोकांमध्ये गेला तरी त्याचे गुण झाकून राहात नाहीत. लोक त्याची पारख करून अवश्य त्याचा आदर करतात. हे सत्य सर्वांच्या परिचयाचे आहे.

१३८. गुणलुब्धाः स्वयमेव संपदः

(पाहा : अविवेकः परमापदां पदम्)

१३९. गुणी गुणं वेत्ति

सं. – सुर. ३.सामान्यनीती ९१७. प्रत्यही प्रत्ययास येणाऱ्या विविध अनुभूती, ज्यांना वाक्प्रचारांचे स्वरूप प्राप्त झाले अशा सुभाषितांचे संकलन या सामान्यनीतीत केले आहे. त्यापैकीच नित्याचा परिचयातील हा एक प्रत्यय–अनुभव.

मू. – **गुणी गुणं वेत्ति न वेत्ति निर्गुणो बली बलं वेत्ति न वेत्ति निर्बलः ।**
पिको वसन्तस्य गुणं न वायसः करी च सिंहस्य बलं न मूषकः ।।

अ. – 'गुणी व्यक्तीच गुण जाणू शकते, गुणांची पारख करू शकते. ज्याच्यापाशी स्वतःची गुणवत्ता नाही, तो दुसऱ्याच्या गुणाचे आकलन करू शकत नाही. निर्गुणाला ते समजत नाही. बलाचे महत्त्व बलवानच ओळखतो; निर्बलाला त्याची कल्पना येत नाही. वसन्ताचे गुण (सौंदर्य) कोकिळच उमगतो; कावळ्याला ते कळत नाही. त्याचप्रमाणे सिंहाचे बळ जोखण्यासाठी हत्तीच हवा, उंदराच्या ठिकाणी ती शक्ती संभवत नाही.'

व्य. – रत्नाची पारख करण्याला जसा रत्नपारखीच हवा असतो, त्याचप्रमाणे गुणांचे मोल करायला गुणी माणूसच पाहिजे. कोणत्याही गोष्टीचे मूल्यमापन करण्याला तिचे पूर्ण ज्ञान असणाऱ्या माणसालाच ते करता येते. म्हणून कोणताही कलाकार आपल्या कलाकृतीचे गुणग्रहण रसिकाकडूनच अपेक्षितो.

१४०. गृहं तु गृहिणीहीनम्

सं. – पंच. ४.५८. मगर आणि वानर यांच्या कथेत, वानराला घरी नेऊन त्याचे हृदय बायकोला खायला द्यायचा मगराचा बेत फसला. तेव्हा तिने दुराग्रहाने अन्नत्याग करून प्राण सोडला. त्या वेळी मगराने आपल्या बायकोसाठी शोक केला.

मू. – न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ।
गृहं तु गृहिणीहीनं कान्तारादतिरिच्यते ॥

अ. – '(चार भिंतींच्या) घराला घर म्हणत नाहीत, तर गृहिणी म्हणजेच घर होय. पत्नीशिवाय घर - अरण्यापेक्षा भयंकर आहे.'

व्य. – घराची टापटीप, मुलांचे संगोपन, पाहुण्यांचे आदरातिथ्य, वडील मंडळींची सेवा, पतीची प्रसन्नता या सर्व गोष्टी सांभाळणे जिला साधते ती गृहिणी होय. गृहिणी नसलेल्या एखाद्या घरात पाऊल टाकले म्हणजे या सगळ्या गोष्टींचा अभाव आपल्याला जाणवतो आणि तिच्यावाचून घर अरण्यासारखे आहे हे म्हणणे तात्काळ पटते. व्यवहारात या सुभाषिताच्या अर्थाची पातळी, प्रसंगाने माहेरी गेलेल्या पत्नीमुळे अल्पकाळ 'गृहिणीहीन' झालेल्या घराला 'कान्तारा'ची उपमा देण्यापर्यंतही खाली खेचली जाते !

१४१. गृहीत इव केशेषु

सं. – सुर. ३. सामान्यनीती ४२७. विद्या, पैसा मिळविताना व धर्माचरण करताना आपली मनोभूमिका कशी असावी हे सुभाषितकारांनी येथे सांगितले आहे.

मू. – अजरामरवत्प्राज्ञो विद्यामर्थं च साधयेत् ।*
गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत् ॥

* **चिन्तयेत्** : पाठभेद

अ. – 'आपण जणू कधी म्हातारे होणार नाही व कधी मरणार नाही (असे मानून) ज्ञान आणि धन मिळवावे आणि मृत्यू जणू आपले केस धरून ओढीत आहे असे समजून धर्माचरण करीत राहावे.'

व्य. – आपल्या वयाचा, अवस्थेचा विचार न करता तरुणाच्या तडफेने विद्या आणि धनाचा संग्रह करावा. हा देह, सगळी संपत्ती नाशिवंत आहे असा विचार करून स्वस्थ बसणे म्हणजे आत्महत्याच होय असे सुचवून सुभाषितकारांनी धर्माचरणाचे रहस्यही अत्यंत प्रभावी, परिणामकारक शब्दांत सांगितले आहे. धर्माचा आचार सांभाळताना, आजचे उद्यावर टाकणे, दुर्लक्ष करणे किती धोक्याचे आहे हे दुसऱ्या ओळीत सांगितले

आहे. मृत्यू केव्हा ओढवेल याचा नेम सांगता येत नाही, म्हणून धर्माचरण सततच करीत राहा, असा हेतू. 'गृहीत इव केशेषु' ही उपमा हत्याऱ्याने एखाद्याची हत्या करण्याच्या ईर्षेने त्याचे केस एका हाती धरून दुसऱ्या हाताने त्याला मारण्यासाठी तलवार उगारली आहे ही कल्पना करून दिलेली आहे.

(च)

१४२. चक्रं भ्रमति मस्तके

सं. – पंच. ५.२२. 'अपरीक्षितकारक' नामक पाचव्या तंत्रात एक ब्राह्मणी आपल्या पतीला अतिलोभीपणा योग्य नव्हे हे समजावून सांगताना चार ब्राह्मणपुत्रांची कथा सांगते. धनप्राप्तीच्या इच्छेने मार्गक्रमण करणाऱ्या चार ब्राह्मणपुत्रांना वाटेत एक साधू भेटला. साधूच्या वरप्रसादाने त्या चौघांपैकी एकेकाला अनुक्रमे तांबे, चांदी, सोने यांची खाण मिळाली. तिघे ब्राह्मणपुत्र आपल्याला मिळालेल्या द्रव्यावर संतुष्ट होऊन तेथेच राहू लागले. चौथा मात्र हिऱ्याची खाण मिळेल या आशेने पुढे पुढे जात राहिला. त्याला पुढे प्रवास करताना अरण्यात मस्तकावर चक्र (चाक) फिरत असलेला एक मनुष्य दिसला. त्याने त्या माणसाला 'कशाने असे झाले' असा प्रश्न विचारताच ते चक्र या ब्राह्मणपुत्राच्या डोक्यावर येऊन बसले. कारण, त्याला तसा वरच होता. चक्रापासून सुटका झालेला तो माणूस 'अतिलोभाचा हा परिणाम' असे म्हणून निघून गेला आणि अति लोभी ब्राह्मणपुत्राच्या मस्तकावर ते चक्र कायम फिरतच राहिले.

सू. – अतिलोभो न कर्तव्यो लोभं नैव परित्यजेत् ।
अति लोभाभिभूतस्य चक्रं भ्रमति मस्तके ।।

अ. – 'अति लोभी वृत्ती असू नये, तसेच लोभ नसावाच असेही नाही. अतिलोभानेच लोभी मनुष्याच्या मस्तकावर चक्र फिरत राहिले.' (तांबे, चांदी, सोने मिळूनही तृप्ती न झाल्याने लोभाने पुढे पुढे जाणाऱ्या माणसाला अशी शिक्षा भोगावी लागते).

व्य. – लोभी वृत्ती ही घातक होते हे दाखविण्याकरिता एक कथा सांगितली आहे. सर्वसामान्यपणे जरी विचार केला तरी लोभी माणसाचा लोभ त्याला स्वस्थ बसू देत नाही. दु:खपर्यवसायी हाव वाढतच जात असल्याने ती ती वस्तू मिळविण्यासाठी मस्तकात विचारचक्र फिरत असते. त्यातूनच काहीतरी उपाय निघून पायांनाही चक्राची गती घ्यावी लागते हेच यातून सुचवावयाचे आहे की काय नकळे! प्रत्यक्ष व्यवहारात मात्र ही उक्ती वेगळयाच अर्थाने उपयोजिली जाते. एखाद्या चक्रम डोक्याच्या माणसाबद्दल व्यवहारात थट्टेने 'चक्रं भ्रमति मस्तके' असे हेटाळणीने म्हटले जाते. वास्तविक या चक्रमपणाचा नि मूळ 'चक्रा'चा काहीही संबंध नाही. परंतु

मूळ संदर्भ माहीत नसल्यामुळे किंवा लक्षात न घेतल्यामुळे संस्कृत उक्तीचा मराठीत विपरीत अर्थाने वापर होत असल्याची आणखी काही उदाहरणे सांगता येतील.

१४३. चक्षुर्वै सत्यम्

सं. – ऐब्रा. १. यज्ञाची दीक्षा घेणाऱ्याने सत्य बोलावे असा उपदेश आहे. त्याचवेळी सत्याची कसोटी कोणती हे ब्राह्मणकारांनी सांगितले आहे. (परिशिष्ट पाहा).

मू. – चक्षुर्वै सत्यम् ।

अ. – ' डोळ्यांनी पाहिलेले ते सत्य होय. '

व्य. – इंद्रिये ही प्रत्यक्षज्ञान करून घेण्याची साधने आहेत. त्यांपैकी डोळा हे मुख्य इंद्रिय आहे. ऐकीव बातमी अविश्वसनीय आहे असे जेव्हा आपल्याला वाटते, तेव्हा स्वतःच्या डोळ्यांनी पाहून आपण त्याविषयी खात्री करून घेतो. दुसऱ्याला एखाद्या गोष्टीची सत्यता त्याच्या दृष्टीसमोर आणून ' चक्षुर्वै सत्यम् ' या न्यायाने पटवून दिली जाते, त्या वेळी या उक्तीचा वापर केला जातो.

१४४. चञ्चुप्रवेशात् मुसलप्रवेशः

सं.– लोकोक्ती. स्वतःची हानी करणाऱ्या छोट्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले तर मोठे नुकसान होण्याची शक्यता असते, असा सावधगिरीचा इशारा या उक्तिविशेषात दिला आहे.

मू. – चञ्चुप्रवेशात् मुसलप्रवेशः ।

अ.– ' चोच शिरण्याइतकी जागा दिली म्हणजे (हळूहळू) मुसळ जाईल इतकी जागा निर्माण होते. '

व्य. – आरंभी लहानशा व निरुपद्रवी वाटणाऱ्या शत्रूचा प्रवेश झाला व त्याकडे दुर्लक्ष केले तर इतरही शत्रू आत प्रवेश करून सर्वनाश करू शकतात. माणसांच्या एकजुटीमध्ये लहानशीही फट पडली तरी ती वाढत जाऊन दुही माजते. केवळ दया म्हणून उंटाला थोडी जागा दिल्याबरोबर हळूहळू हातपाय पसरून उंटाने सर्वच जागा बळकावली आणि तंबूच्या मालकालाच बाहेर घालवून दिले, ही गोष्ट प्रसिद्ध आहे. – ' भटाला दिली ओसरी आणि भट हातपाय पसरी ' या मराठी म्हणीचा आशय वरील लोकोक्तीच्या अर्थाचाच आहे.

१४५. चतुर्थे किं करिष्यति

सं. – सुर.७. संकीर्ण ६१. आयुष्यात योग्य वेळी योग्य कर्म केले नाही तर पश्चात्ताप करण्याची वेळ येते. म्हणून सावधानपणे कर्तव्य जाणून घेऊन त्याप्रमाणे आचरण करावे, हे सुभाषितकारांनी सांगितले आहे.

मू.– प्रथमे नार्जिता विद्या द्वितीये नार्जितं धनम् ।
तृतीये नार्जितो धर्मश्चतुर्थे किं करिष्यति ।।

अ. – ' मनुष्याने (आयुष्याच्या) पहिल्या भागात विद्या मिळविली नाही; दुसऱ्या भागात पैसा मिळविला नाही; तिसऱ्यात धर्मानुष्ठान केले नाही; तर तो चौथ्या (शेवटच्या) भागात काय (कपाळ) करणार ! (काही करू शकणार नाही). '

व्य.–मनुष्याच्या जीवनाची विभागणी सर्वसाधारणपणे चार टप्प्यांत केली जाते. शास्त्रकारांनी त्यांना अनुक्रमे ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम अशी नावे दिलेली आहेत व त्या त्या कालात करावयाच्या योग्य गोष्टीही सांगितलेल्या आहेत. ब्रह्मचर्याश्रमात विद्याभ्यास करून जीवनाला आवश्यक अशा उपजीविकेची, संस्कारांची व ज्ञानाची तयारी करावी. गृहस्थाश्रम स्वीकारून घर-संसारासाठी धनसंपत्ती मिळवावी. त्यानंतर काही अंशी संसारातले लक्ष काढून घेऊन व्रतवैकल्यांनी मन व शरीर परमार्थाकडे लावावे. आणि शेवटी म्हातारपणी निवांतपणे ईश्वरचिंतन करावे. हा कालक्रम सांभाळला नाही तर म्हातारपणी स्वास्थ्य तरी कुठले आणि निवांतपणा तरी कुठला ? शरीर दुर्बळ, जवळ धन नाही, बांधव नाहीत, संसारातील चिंता संपलेल्या नाहीत, अशी स्थिती आली म्हणजे आपण पूर्वी ज्या वयात जे करावयाला हवे होते ते केले नाही, ही खंत जीवाला टोचीत राहाते.

१४६. चंदनं न वने वने

सं.–सुर. ३. सामान्यनीती १८३. माणसांमध्ये साधुता, सज्जनपणा दुर्मिळ आहे हे येथे अनेक दृष्टान्त देऊन सांगितले आहे.

मू.– शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।
साधवो नहि सर्वत्र चंदनं न वने वने ।।

अ.– 'प्रत्येक पर्वतावर (पर्वतावरील खाणीत) रत्न सापडत नाही. प्रत्येक हत्तीच्या (गंडस्थळावर) मोती आढळत नाही. प्रत्येक वनात चंदनाचा वृक्ष वाढत नाही. (त्याप्रमाणे) सर्व ठिकाणी काही साधुपुरुष आढळत नाहीत.'

व्य. – सृष्टीतील मूल्यवान् वस्तू व उत्कृष्ट गुणांची तेजस्वी माणसे नेहमीच दुर्मिळ असतात. अर्थात् त्यामुळेच त्यांना विशेष मोल असते.

१४७. चराति चरतो भगः । चरैवेति

सं.– ऐब्रा. ७. ३. इक्ष्वाकु वंशातील हरिश्चंद्र राजाला वरुणाच्या प्रसादाने पुत्र झाला. यज्ञात त्या पुत्राचाच बळी वरुणाच्या नावे द्यावयाचा होता. वरुणाने अनेकवार मागणी करूनही राजाने मुलाला बळी देण्याचे टाळले. मोठा झाल्यावर मुलगा – रोहित अरण्यात निघून गेला. इकडे वरुणाच्या कोपामुळे राजाला जलोदर झाला. ते ऐकून

रोहित घरी परत येऊ लागला. वाटेत ब्राह्मणाचा वेश घेतलेला इन्द्र त्याला भेटला व त्याने रोहिताला उपदेश केला, " फिरत राहा बाबा, फिरत राहा. " हे इंद्राच्या उपदेशाचे पालुपद आहे. (परिशिष्ट पाहा)

मू. – आस्ते भग आसीनस्योर्ध्वस्तिष्ठति तिष्ठतः ।
शेते निपद्यमानस्य चराति चरतो भगः । चरैवेति चरैवेति ।।

अ.–' जो बसून राहातो त्याचे भाग्यही बसून जाते, जो उभा राहातो त्याचे नशीब खडे–उभे राहाते, जो झोपून राहातो त्याचे भाग्य आडवे होते–झोपी जाते. जो (उठून) चालू लागतो (एखाद्या कामासाठी प्रयत्न करू लागतो) त्या वेळी त्याचे दैव गतिमान होते. (म्हणून एके जागी न बसता प्रयत्न कर).'

व्य.– दैव ही कर्माची छाया आहे. मनुष्य आळस झाडून निश्चयाने एखादे काम करायला उभा राहिला की त्याचे भाग्य त्याच्याबरोबरच उभे राहाते व त्याला यश देते. आळशीपणाने बसून राहणाऱ्याला नशिबाची साथ कशी मिळणार ? तेही बसून राहाते – हे सत्य इन्द्राच्या उपदेशात मार्मिक शब्दांत प्रकट झालेले आहे. आळशी, घरकोंबड्या, आपल्या मर्यादित जगाला सर्वस्व मानणाऱ्या व बाहेरच्या विशाल जगात जायला भिणाऱ्या माणसांना प्रेरणा देण्यासाठी या उक्तीचा वापर केला जातो. ' साधु चलता भला नदी बहती भली ' ही हिंदीतील म्हण किंवा ' ब्राह्मणु हिंडतां बरा ' ही समर्थोक्ती या ठिकाणी सहज स्मरणात येते. ' जो थांबला तो संपला ' हे याच अर्थी.

१४८. चातुर्वर्ण्यं मया सृष्टम्

सं.–भगी ४.१३. ' स्वतःच्या मायेच्या दिव्य शक्तीच्या योगाने मी अवतार धारण करतो. साधूंचे रक्षण आणि दुर्जनांचे निर्दालन करून धर्माचा पाया दृढ करणे हे माझे कार्य आहे.' हे अर्जुनाला सांगितल्यानंतर भगवान श्रीकृष्ण ' चातुर्वर्ण्याचा जनक मीच आहे ' असे सांगतात.

मू.– चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः।
तस्य कर्तारमपि मां विद्ध्यकर्तारमव्ययम् ।।

अ.– 'गुण आणि कर्म यांच्या वेगवेगळेपणाला अनुसरून मी (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र) चार वर्णांची व्यवस्था निर्माण केली आहे. मी तिचा कर्ता आहे आणि अकर्ता म्हणजे न करणाराही (किंवा विलीन करून टाकणाराही) आहे, हे तू जाणून घे.'

व्य.– मूळ चातुर्वर्ण्यकल्पनेच्या मुळाशी, मनुष्याच्या स्वाभाविक गुणांमध्ये व कार्यामध्ये असणारे भेद व त्याला अनुसरून समाजधारणेला आवश्यक अशी श्रमविभागणी ही मुख्य तत्त्वे आहेत. सृष्टी निर्माण करणारा परमेश्वरच या चातुर्वर्ण्यसंस्थेचा निर्माता होय. परमेश्वराने निर्माण केलेल्या या व्यवस्थेला पुढे ' जाति 'संस्थेचे स्वरूप आले. ' गुण-कर्म ' यांच्याऐवजी विशिष्ट जातीत जन्म झाला म्हणून तो त्या विशिष्ट जातीचा

किंवा वर्णाचा अशी विचारसरणी रूढ झाली आणि त्यापुढेही ‘जातीयवादा’चे जाती-जातीतील संघर्षाचे, ईर्षेचे स्वरूप चातुर्वर्ण्यसंस्थेला आले व सर्व समाजाला त्याचे परिणाम भोगावे लागले.

चातुर्वर्ण्यसंस्थेचा निर्माता करूनही अकर्ता आहे. अहंता व ममता यांपासून मुक्त असल्यामुळे कोणत्याही कर्मापासून तो अलिप्त आहे. या चातुर्वर्ण्याचे समर्थक आणि विरोधक दोघेही या उक्तीचा सतत उपयोग करीत आलेले आहेत.

१४९. चिन्तासमं नास्ति शरीरशोषणम्

सं.– सुर. ३. सामान्यनीती ९१६. मनुष्याचे व मनाचे स्वास्थ्य टिकवायला आवश्यक असणाऱ्या गोष्टींची गणना येथे सुभाषितकारांनी केली आहे.

मू.– मात्रासमं नास्ति शरीरपोषणं चिंतासमं नास्ति शरीरशोषणम् ।
भार्यासमं नास्ति शरीरतोषणं विद्यासमं नास्ति शरीरभूषणम् ।।

अ. – ‘शरिराचे पोषण करणारे आईसारखे दुसरे कोणी नाही. शरिराला वाळविणारे चितेसारखे दुसरे काही नाही. शरिराला संतुष्ट करणारी पत्नीसमान कोणी नाही. आणि शरिराला शोभा आणणारा विद्येसारखा दुसरा अलंकार नाही.’

व्य. – मनुष्यजन्माला आल्यानंतर त्याच्या शरिराला योग्य वळण असणे, ते सुस्थितीत असणे, त्याच्या व इतरांच्याही सुखाच्या दृष्टीने आवश्यक असते. माणसाच्या शरिराची सर्वाधिक हानी करणारा, त्याच्याच ठिकाणचा महत्त्वाचा दोष म्हणजे काळजी करण्याचा स्वभाव होय. कोणतीही परिस्थिती आली असताना ‘आता माझे कसे होईल,’ अशी काळजी, बहुतेक वेळा अनाठायीच असते. तिचा प्रत्यक्ष उपयोग काहीच होत नाही. मात्र त्या मानसिक अवस्थेचा शरिरावर वाईट परिणाम होऊन ते पोखरून निघते. चिंता हा एक असा रोग आहे हे वैज्ञानिकांचे मत प्रसिद्ध आहे. कोणी अशक्त, वाळका मनुष्य दिसला तर ‘कसली चिंता करतो आहेस’ असे सहज त्याला विचारले जाते.

(छ)

१५०. छिन्नोऽपि रोहति तरुः

सं. – नीश. ७९. सज्जनांच्या एका स्वभावविशेषाचे भर्तृहरीने येथे वर्णन केले आहे.

मू. – छिन्नोऽपि रोहति तरुः क्षीणोऽप्युपचीयते पुनश्चंद्रः ।
इति विमृशन्तः सन्तः सन्तप्यते न लोकेषु ।।

अ. – ‘झाड तोडले तरी पुन्हा वाढते, चंद्र बारीक झाला तरी पुन्हा मोठा होतो, असा विचार करून सज्जन लोक (चुका करणाऱ्या) लोकांवर चिडून निराश होत नाहीत.

व्य. – साधारण लोक एखाद्या कार्यात अडथळा-अपयश आल्याबरोबर प्रयत्न सोडून देतात. निराशेमुळे त्यांच्या वागण्यात संताप व कडवटपणा येतो. पण मोठ्या मनाचे सच्छील लोक सर्व अपयशाच्या प्रसंगीही शांत राहातात, पुनः प्रयत्न करतात व इतरांना प्रयत्न करण्यास उत्साह देतात.

१५१. छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति

सं. – पंच. २. १८३. लघुपतनक नावाचा कावळा, मंथरक कासव, हिरण्यक उंदीर आणि चित्राङ्ग नावाचे हरीण अशी ही चौघे परस्परांची मित्र होती. एकदा शिकाऱ्याच्या जाळ्यात अडकलेल्या चित्राङ्गाला शोधण्यासाठी लघुपतनक व हिरण्यक दाट जंगलात गेले. चित्राङ्गाला जाळ्यातून सोडवून ते तिघेही परतणार इतक्यात मंथरक कासव तेथे आले. मंथरकाला पाहून चित्राङ्गाला काळजी वाटून तो म्हणाला की, आपण तिघेही शिकाऱ्याच्या तावडीतून सुटू; पण मंथरक निष्कारण अडकेल. चित्राङ्गाचे हे बोलणे पुरे व्हायच्या आत शिकारी तेथे आला आणि संथपणे जाणाऱ्या मंथरकाला पकडून घेऊन गेला. एक मित्र सुटतोय तोच दुसरा अडकलेला पाहून तिघांना वाईट वाटले.

पंच. २. १८९. हिरण्यकाला मित्रवियोगाचे फार दुःख झाले.

मू. – **एकस्य दुःखस्य न यावदन्तं गच्छाम्यहं पारमिवार्णवस्य ।**
तावद्द्वितीयं समुपस्थितं मे छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति ।। पंच. २. १८३.

अ.– 'जोपर्यंत समुद्राप्रमाणे पार करण्यास कठीण अशा एका दुःखातून मी पलीकडे जातो तोच दुसरे दुःख उत्पन्न झाले. (खरोखर) एखादे न्यून उत्पन्न झाले की त्यातून अनेक अनर्थ उद्‌भवतात.'

मू. – **क्षते प्रहारा निपतन्त्यभीक्ष्णं धनक्षये दीप्यति जाठराग्निः ।**
आपत्सु वैराणि समुल्लसन्ति छिद्रेष्वनर्था बहुलीभवन्ति ।। पंच. २. १८९.

अ.– 'जेथे जखम झाली असेल तेथेच वारंवार आघात होतात. धन संपल्यावर भूकही वाढू लागते (जास्त लागते). संकटात सापडल्यावर शत्रुत्वच (सर्वजण) धरतात. (आपत्तीत सापडलेल्या मनुष्याशी कोणीच मैत्री करीत नाही.) एकदा एखादी उणीव निर्माण झाली की त्यातूनच अनेक अनर्थ उत्पन्न होतात.'

व्य. – मनुष्यावर संकटे यायला लागली की ती कधी एकएकटी येत नाहीत, एकामागून एक त्यांची परंपराच सुरू होते, असा नेहमीचा अनुभव आहे अशा संकटकाळी क्षुल्लक कारणही शत्रुत्वाला पुरेसे होते. आपत्तीत सापडलेल्या माणसाशी कोणी मैत्री ठेवीत नाही. त्यामुळे साध्या साध्या कामातही अनंत अडचणी येतात. लहानसे काम पूर्ण करायलाही फार श्रम पडतात. एरवी फारशी त्रासदायक न होणारी अडचण अशा वेळी तापदायक होते. हा अनुभव

ध्यानात घेऊन आपल्या वागण्यात, जीवनात लहानसाही दोष राहू देऊ नये, अशी दक्षता घेण्यासाठी इशारा देण्याकरिता, तसेच विरोधकांकडून, शत्रुपक्षाकडून आपल्या बाबतीत कोठे बोट शिरकवायलाही जागा न ठेवण्याबाबत सूचना देण्यासाठी या उक्तीचा उपयोग केला जातो. लहानशा जखमेतून मोठे रोग शरिरात शिरण्याची शक्यताही या उक्तिविशेषाने व्यक्त केली जाते.

(ज)

१५२. जननी जन्मभूमिश्च

सं.– स्वतःची माता व मातृभूमी यांच्याबद्दलचे रामाचे हे भावपूर्ण उद्गार आहेत. मात्र त्यांचा मूळ संदर्भ वाल्मीकि किंवा इतर कोणत्याही रामायणामध्ये आढळत नाही.

मू. – अपि स्वर्णमयी लंका न मे लक्ष्मण रोचते ।
जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।।

अ. – ‘ हे लक्ष्मणा, लंका जरी सोन्याची असली तरी ती मला आवडत नाही. स्वतःची आई आणि मायभूमी या स्वर्गाहूनही श्रेष्ठ आहेत.’

व्य. – बलाढ्य रावणाचा नाश करून रामाने लंकेचे वैभवशाली राज्य जिंकून घेतले. लंका सोन्याची, सर्व सुखसाधनांनी परिपूर्ण, पण रामाला तिचा उपभोग घेत राहाणे रुचत नाही. मायभूमीचे प्रेम, तेथील लोकांना सुखी ठेवण्याची इच्छा, सर्वपराक्रमी रामाच्या अंतःकरणात जागृत आहे. पारतंत्र्याच्या काळात, स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला या पंक्ती प्रेरणा देणाऱ्या होत्या, आजही आहेत.

१५३. जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु

सं. – स्नानविधीचे वेळी म्हणावयाच्या श्लोकातील हा पहिला श्लोक आहे.

मू.– गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति ।
नर्मदे सिंधु कावेरि जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु ।।

अ.– ‘ हे (पवित्र) गंगे, यमुने आणि गोदावरी, सरस्वती, हे नर्मदे, सिंधु आणि कावेरी नद्यांनो, या पाण्यामध्ये तुमचा अधिवास असो. ’

व्य.– दैनंदिन आवश्यक कर्मेही कशी करावीत याचा आदर्श आपल्या धार्मिक आचारांमधून दिसतो. कर्म तेच पण भावनेमुळे त्यात केवढा फरक पडतो. स्नानाला तीर्थक्षेत्री जाणे सर्वांना शक्य होत नाही. ज्या पाण्याने आपण स्नान करतो तेच सर्व पवित्र नद्यांचे पाणी आहे, अशी भावना करून स्नान केल्याने शरीराबरोबर मनही पवित्र होते. या उक्तीत तर साऱ्या भारतवर्षाच्या एकात्मभावनेचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. त्या दृष्टीने राष्ट्रीय ऐक्यभावनेलाही ही पोषक ठरते.

१५४. जातस्य हि ध्रुवो मृत्यु:

सं. – भगी २. २७. 'फाटलेल्या वस्त्राप्रमाणे, जीर्ण झालेले शरीर सोडून, आत्मा दुसरे नवे शरीर धारण करतो. तो स्वत: कधीच नष्ट होत नाही' असे आत्म्याचे स्वरूप स्पष्ट केल्यानंतर श्रीकृष्ण भगवानांनी, नाशिवंत वस्तूंचे स्वरूप अर्जुनाला समजावून सांगितले.

मू. – **जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।**
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥

अ. – 'जो जन्माला आला तो निश्चित मरतो आणि ज्याला मरण आले त्याचा जन्म निश्चित होतो, म्हणून ज्या गोष्टी अटळ आहेत, त्यांच्याबद्दल तू शोक करणे योग्य नाही.'

व्य.– 'जे उपजे ते नासे' हा सृष्टीचा नियम आहे. जन्म आणि मृत्यू या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. सृष्टीच्या घडामोडीत आपल्याला याचा अनुभव सारखा येत असतो. एकापाठोपाठ येणाऱ्या या दोन अवस्था आहेत. जन्माला आला आणि मेला नाही असा एकही मनुष्य आतापर्यंत पृथ्वीच्या पाठीवर झाला नाही; हे प्रत्येकाला कळते. तरीही मनुष्य जन्माबद्दल आनंद मानतो आणि मृत्यूबद्दल शोक करतो! मृत मनुष्याच्या, मागे राहिलेल्या माणसांचे दु:ख 'जातस्य . . .' हा विचार कमी करतो.

१५५. जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः

सं. – पांडवगीता ५७. महाभारतात पांडव व कौरव यांच्या पक्षांतील अनेक प्रमुख व्यक्तींनी श्रीकृष्णाला परमेश्वर मानून त्याची स्तुती गायिली आहे. दुर्योधनाने येथे स्वत:च्या स्वभावानुसार स्वत:च्या हृदयातील परमेश्वराचे वर्णन केले आहे.

मू. – **जानामि धर्मं न च मे प्रवृत्तिः जानाम्यधर्मं न च मे निवृत्तिः ।**
केनापि देवेन हृदि स्थितेन यथा नियुक्तोस्मि तथा करोमि ॥

अ. – 'धर्माला अनुसरून आचरण कोणते हे मला कळते; पण मला ते करावेसे वाटत नाही. अधर्म कोणता हेही मला कळते, तरीपण मी त्यापासून परावृत्त होऊ शकत नाही. माझ्या हृदयात बसलेल्या कोण्या देवाकडून जशी प्रेरणा होईल तसे मी करतो आहे.'

व्य. – चांगले वाईट जाणण्याची बुद्धी सर्वसाधारण अशिक्षित माणसामध्येही असते. परंतु स्वार्थ, लोभ या प्रवृत्ती बलवत्तर असतील तर तो आपल्या अंत:करणातील सदसद्विवेकबुद्धीच्या सांगण्याकडे दुर्लक्ष करतो; धर्म व नीती यांच्या नियमांना धाब्यावर बसवितो. पापाकडे तो इतका ओढला जातो की, पापाची प्रेरणा देणारा तोच परमेश्वर अशी समजूत तो करून घेतो. दुर्योधन हे त्याचे ठळक उदाहरण आहे. राजकारणात किंवा समाजकारणातही स्वार्थासाठी वा भीतीमुळे विशिष्ट पक्षाला चिकटून राहाणारांना राष्ट्रीय व सामाजिक धर्म कोणता आणि अधर्म कोणता हे कळत

असते; परंतु ते धर्माचा स्वीकार करू शकत नाहीत, अधर्माला विरोध करू शकत नाहीत. त्यांच्या बाबतीतही या उक्तीचा वापर केला जातो. याशिवाय त्या त्या माणसांचा स्वभावच तसा, तो बदलू शकणार नाही ते यापेक्षा निराळे (मनात येऊनही) वागू शकणार नाहीत, हे सांगण्यासाठी हे वचन उपयोगात आणले जाते.

१५६. जामाता दशमो ग्रहः

सं. – मुर. ६. हास्यरस १५. जावयाला कितीही दिले तरी त्याची कधी तृप्ती होत नाही. सासऱ्याकडून सतत काहीतरी प्राप्ती व्हावी अशी त्याची इच्छा असते. म्हणून थट्टेने त्याला 'दहावा ग्रह' म्हटले जाते. नऊ ग्रहांप्रमाणे त्याचीही फळे भोगावी लागतात. त्याच्या मागण्या पूर्ण करून त्याला संतुष्ट राखावे लागते.

सप. ज ७.
लोकोक्ती.

मू. – सदा वक्रः सदा क्रूरः सदा पूजामपेक्षते ।
कन्याराशिस्थितो नित्यं जामाता दशमो ग्रहः ॥ मुर. ६. हास्य. १५.

अ. – 'नेहमी असंतुष्ट (त्यामुळे दुर्मुखलेला), सतत चिडलेला, आदरसत्काराची इच्छा असणारा हा जावई (म्हणजे) कन्याराशीत असलेला (लग्नामुळे जावई म्हणून स्वतःच्या मुलीच्याही राशीला आलेला) दहावा ग्रहच होय.'

मू. – आदित्याद्या ग्रहाः सर्वे यथा तुष्यन्ति दानतः ।
सर्वस्वेऽपि न तुष्येत जामाता दशमो ग्रहः ॥ सप. ज ७.

अ. – 'सूर्यादी सर्व ग्रह त्यांच्यासाठी काही ना काही दान दिले असता संतुष्ट होतात (साहाय्यकारी अनुकूल होतात); परंतु कितीही दिले तरी जावईबुवा तृप्त होत नाहीत (त्याला काहीतरी सतत हवेच असते).'

मू. – भारतः पंचमो वेदः सुपुत्रः सप्तमो रसः ।
दाता पंचदशं रत्नं जामाता दशमो ग्रहः ॥ लोकोक्ती.

अ. – 'महाभारताला पाचवा वेद म्हटले जाते. (गुणी) पुत्र हा सातवा रस होय. (षड्रस भोजनाने जशी आनंदप्राप्ती होते, तद्वत् पुत्रस्पर्शाने आनंद होतो.) दानी व्यक्ती हे पंधरावे रत्न मानले आहे. (चौदा रत्ने जशी दुर्लभ तसाच दाताही दुर्लभ). (तसा चांगल्या अर्थाने गौरवास्पद) जावई दहावा ग्रहच आहे.'

व्य. – जावई हा इतर नऊ ग्रहांव्यतिरिक्त दहावा ग्रहच आहे. ग्रहांची बरीवाईट फळे आपल्याला भोगावी लागतात. शनीसारखा ग्रह एकदा आपल्या राशीला लागला म्हणजे तो क्रूरपणे छळतो. हे ग्रह काही काळानंतर तरी आपल्या राशीतून जातात; पण हा कन्याराशीत असणारा ग्रह कायमचा मागे लागतो. सर्वस्व दिले तरी त्याला कधी पुरे पडत नाही. सासऱ्याकडून नेहमीच आदरसत्कार अपेक्षिणारा कन्या राशीत

असलेला हा ग्रह सासऱ्याच्या राशीला लागतो. पहिल्या दोन श्लोकांत जावयाची थट्टा-हेटाळणी केली आहे. तर तिसऱ्या श्लोकात त्याचा गौरव केला आहे.

१५७. जाया त्वर्धं शरीरस्य

सं. – भविष्यपुराण १.८.३७. व्यासांनी गृहस्थधर्म सांगताना या श्लोकात पतिव्रतेचे माहात्म्य कथन केले आहे.

मू. – **जाया त्वर्धं शरीरस्य नृणां धर्मादिसाधने ।**
नातस्तासु व्यथां काञ्चित् प्रतिकूलं समाचरेत् ॥

अ. – 'धर्म–अर्थ–काम या पुरुषार्थांची प्राप्ती करताना पत्नी ही पुरुषाचा अर्धा भाग आहे. म्हणून तिला पीडा होईल असे, तिच्याविरुद्ध वागू नये.'

व्य. – 'अर्धो वा एष आत्मनो यत्पत्नी' (तै. सं. ६.१.८.५) अर्धांगी, सहधर्मचारिणी, या शब्दात पत्नीचे संसारातले स्थान आणि महत्त्व वर्णन करून सांगितले जाते. गृहस्थ आपल्या अर्धांगीचे मन आणि मान राखून वागला तर त्याला व त्याच्या सर्व परिवाराला सुख मिळू शकते.

१५८. जीर्णमङ्गे सुभाषितम्

(पाहा : बोद्धारो मत्सरग्रस्ताः)

सं. – वैश. २. भर्तृहरीने वैराग्यशतकाच्या प्रारंभालाच वैराग्य येण्याचे, जगव्यवहाराबद्दल उदासीनता निर्माण होण्याचे पहिले कारण दिले आहे. त्याबद्दलचा हा श्लोक

मू. – **बोद्धारो मत्सरग्रस्ताः प्रभवः स्मयदूषिताः ।**
अबोधोपहताश्चान्ये जीर्णमङ्गे सुभाषितम् ॥

अ. – 'विद्वान लोकांची मने हेव्यादाव्यांनी भरलेली आहेत, तर सत्ताधारी लोक आपल्याच तोऱ्यात आहेत. इतर लोक अडाणी आहेत. खरोखर सुभाषित जेथल्या तेथेच जिरून गेले.'

व्य. – वाहवा करणाऱ्या, आदराने श्रवण करणाऱ्या, रसिक जाणकार सहृदय श्रोत्यांसमोर पंडितांच्या पांडित्याला आणि कवींच्या कवित्वाला बहर येतो. पण असा आदर किंवा कौतुक एखाद्याच पंडिताच्या किंवा कवीच्या वाटचाला येते. बहुतेक सर्वांना मत्सर, गर्व, अडाणीपणा यांनाच तोंड द्यावे लागते आणि त्यांच्या प्रतिभेचा बहर जागच्याजागीच सुकून जातो. अशा प्रकारच्या कटु अनुभवांमुळे निराश झालेल्यांच्या तोंडून हे उद्गार बाहेर पडतात. तसेच बुद्धिमान म्हणविणाऱ्या (विशेषतः साहित्यक्षेत्रातील) मंडळींचा आपापसातला द्वेष-मत्सरपूर्ण व्यवहार बघूनही, असे म्हटले जाते. 'जीर्णमङ्गे सुभाषितम्' हा शब्दप्रयोग या बाबतीतल्या उपदेशाचे निरर्थकत्व सांगणारा, निराशा प्रकट करणारा आहे.

१५९. जीवो जीवस्य जीवनम्

सं. – भाग. १.१३.४६. भारतीय युद्ध संपल्यानंतर धृतराष्ट्र व गांधारी ही दोघे युधिष्ठिराजवळ राहिली होती. विदुराने त्यांना हिमालययात्रेला जाण्याचा उपदेश केला. ते निघून गेले असता युधिष्ठिर शोक करू लागला. तेव्हा तेथे आलेल्या नारदांनी, जगाचा न्याय सांगून त्याचे सांत्वन केले.

मू. – **अहस्तानि सहस्तानामपदानि चतुष्पदाम् ।**
फल्गूनि तत्र महतां जीवो जीवस्य जीवनम् ॥

अ. – 'हात नसलेले प्राणी हात असलेल्या प्राण्यांचे, पाय नसलेले प्राणी चार पायांच्या प्राण्यांचे आणि दुबळे छोटे प्राणी मोठ्या प्राण्यांचे भक्ष्य बनतात.'

व्य. – दुर्बल आणि असाहाय्य प्राण्याला खाऊन त्याच्यापेक्षा बलवान प्राणी आपली उपजीविका करतो, व एका जीवावर दुसरा जीव जगतो, हा सृष्टिक्रमातील एक अटळ न्याय आहे. बीजातही जीवन आहे असे मानले जाते. म्हणजे शाकाहारी मनुष्यही दुसऱ्या जीवनाचाच उपयोग आपल्या आहारासाठी करीत असतो. हे सर्व ध्यानात घेऊन जीवनाचा नाश झाला तर मनुष्याने खेद करीत बसणे योग्य नाही, हे सांगण्यासाठी या उक्तीचा उपयोग केला जातो. समर्थ असेल तो जगेल अथवा जंगलचा न्याय किंवा मात्स्यन्याय ज्याला म्हणतात, तो कितीही वाईट असला तरी व्यवहारी जगात ते कठोर सत्य म्हणून स्वीकारले पाहिजे हेच याचे सार आहे.

१६०. ज्येष्ठो भ्राता पितृसमः

सं. – महा. १३.१०८.१६. अनुशासनपर्वात, भीष्मांशी बोलताना, युधिष्ठिराने 'लहान भावाची मोठ्या भावाशी व मोठ्याची धाकट्या भावाशी आदर्श वागणूक कशी असावी' हे जाणून घेण्याच्या इच्छेने प्रश्न विचारला. त्याला भीष्मांनी या श्लोकात उत्तर दिले. याच अर्थाची पुढील वचनेही आणखी आहेत.

वारा. २.७२.३३. भरत कैकेयीजवळ रामाविषयीची आपली भावना सांगतो.

वारा. ६.१६.१९. बिभीषण लहान असूनही आपला मोठा भाऊ रावण याला सुबुद्धी सुचविण्याचा प्रयत्न करतो.

मू. – **ज्येष्ठो भ्राता पितृसमो मृते पितरि भारत ।**
सहचैषां वृत्तिदाता स्यात्स चैतान्परिपालयेत् ॥ महा. १३.१०८.१६.

अ. – 'वडिलांच्या निधनानंतर, मोठा भाऊ हा वडिलांच्या जागी असतो. त्याने धाकट्यांचे पालनपोषण करावे व त्यांची उपजीविका चालवावी.'

मू. :– **पिता हि भवति ज्येष्ठो धर्ममार्यस्य जानतः ।**
तस्य पादौ ग्रहीष्यामि स हीदानीं गतिर्मम ॥ वारा. २.७२.३३.

अ. – 'आर्य धर्म जाणणाऱ्याला वडील भाऊ पित्यासारखाच असतो. मी आता त्याचेच (रामाचेच) चरणी लागतो. आता माझे श्रेय त्याच्या ठिकाणी आहे.'

मू. – स त्वं भ्रान्तोऽसि मे राजन्ब्रूहि मां यद्यदिच्छसि ।
ज्येष्ठो मान्यः पितृसमो न च धर्मपथे स्थितः ।
इदं हि परुषं वाक्यं न क्षमाम्यग्रजस्य ते ।। वारा. ६.१६.१९.

अ. – 'हे राजा तुझी बुद्धी भ्रष्ट झाली आहे; (तरीही) ज्या ज्या गोष्टींची इच्छा असेल ती ती तू मला सांग. थोरला भाऊ (म्हणून तू) मला पित्यासारखा आदरणीय आहेस. परंतु तू धर्मानुसार वागणारा नाहीस. तू मोठा भाऊ असलास तरी तुझ्या कठोर दुर्भाषणाबद्दल मी तुला क्षमा करणार नाही.'

व्य. – कुटुंबाची घडी नीट राहावी, विसकटू नये व समाजात शांतता नांदावी यासाठी कौटुंबिक नात्यांचे आदर्श स्वरूप भारतीय संस्कृतीने सांगितले आहे. येथे वडिलांच्या पश्चात् मोठ्या भावाची जबाबदारी व धाकट्यांची मोठ्या भावाशी वागण्याची रीत कशी असावी याचे दिग्दर्शन केले आहे. रामायण व महाभारत या ग्रंथांत या नात्याचे स्वरूप विविध प्रसंगांतून वर्णिले आहे. आजही कुटुंबातील शांतता व एकोपा कायम राहाण्यासाठी वरील श्लोकाचा आशय ध्यानात ठेवणे उपयुक्त होईल.

१६१. ज्ञानाग्निः सर्वकर्माणि

सं. – भगी. ४.३७. परमेश्वराच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान करून घेणे हेच मोक्षाला कारण होते. कर्माचा बंध ज्ञानाने कसा नष्ट होतो हे श्रीकृष्णाने, ज्ञानाला अग्नीची उपमा देऊन, स्पष्ट केले आहे.

मू. – यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ।
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ।।

अ. – 'पेटलेला अग्नी ज्याप्रमाणे लाकडे जाळून भस्मसात् करून टाकतो त्याप्रमाणे ज्ञानरूपी अग्नी सर्व कर्मे भस्म करतो.'

व्य. – स्वतःच्या स्वरूपाचे ज्ञान, कर्माच्या स्वरूपाचे ज्ञान झाले की माणसाची आसक्ती-मीपणा आणि माझेपणा सुटतो. हीच मुक्ती. मी-माझे या भावनेने केलेली कर्मे दुःखाला कारण होतात. ती भावना सुटली की, कर्मातील दुःख व बंधकता नष्ट होते. ज्ञान हे अग्नीसारखे आहे. त्याच्यात तेज आणि सामर्थ्य-दाहकता आहे. अग्नीत टाकलेली लाकडे जशी स्वतःचे रूप टाकून अग्नीच बनतात त्याप्रमाणे ज्ञान झालेल्या मनुष्याची कर्मे स्वतःचे बंधकत्व-स्वतःचा स्वभाव टाकून ज्ञानरूप बनतात. श्रीकृष्णाने ज्ञानाला दिलेली अग्नीची उपमा ज्ञानाचे स्वरूप प्रभावीपणे प्रकट करते.

१६२. ज्ञानादेव तु कैवल्यम्

सं. – 'सर्व धर्मान् परित्यज्य...। (गी. १८.६६.) या श्लोकाच्या भाष्यात श्रीमत् शंकराचार्यांनी वरील वाक्य उद्धृत करून 'इति पुराणस्मृतेः' असे म्हटले आहे. विविध वेदान्तग्रंथांत या वाक्याचा आधार देताना 'इति श्रुतेः', असे श्रुतीत सांगितले आहे, असा उल्लेख आहे, पण उपलब्ध श्रुतींत हे वाक्य आढळत नाही.

मू. – ज्ञानादेव तु कैवल्यम् ।

अ. – ' ज्ञानामुळेच मोक्षाची प्राप्ती होते. '

व्य. – ' मोक्ष ' ' कैवल्य ' हे आध्यात्मिक वाटचालीचे अंतिम ध्येय, शिखर आहे. मोक्ष म्हणजे स्वत:च्याच ठिकाणी असलेल्या शुद्ध-बुद्ध-मुक्त, अशा स्व-स्वरूपाचे ज्ञान होणे व ज्ञान झाल्यानंतर ती स्थिती अखंड टिकणे. निरतिशय आनंदस्वरूप अशी ही स्थिती केवळ ज्ञानमार्गाचा अवलंब केल्याने साध्य होते, असा आद्य श्रीशंकराचार्यांसारख्या वेदान्तशास्त्राच्या मुख्य आचार्यांचा आग्रह आहे. कर्म-मार्ग, भक्ति-मार्ग हे अंतिम ध्येयापर्यंत पोचवू शकत नाहीत. या मार्गांचा अवलंब केल्याने ज्ञानाचा उदय होतो व ज्ञानामुळेच मोक्ष मिळतो; हा आचार्यांचा अभिप्राय आहे. आधुनिक काळात अनेक शिक्षणसंस्थांनी, ज्ञानपीठांनी हे आपले ध्येयवाक्य म्हणून स्वीकारले आहे. कोणत्याही प्रकारची प्रगती, उन्नती ज्ञानाखेरीज होणार नाही अशी आधुनिक विचारवंतांची धारणा या ध्येयवाक्यामागे आहे.

(त)

१६३. तक्रं शक्रस्य दुर्लभम्

सं. – सुर. ४. अन्तरालापा: ५. चित्र प्रकरणात संस्कृत भाषेतील चमत्कृतिपूर्ण व रंजक रचनेचे विविध प्रकार आहेत. त्यापैकी प्रश्न आणि त्यांची उत्तरे यांच्या वेगळ्या प्रकारच्या मांडणीमुळे घडणारा हा एक प्रकार.

मू. – भोजनान्ते च किं पेयं जयन्त: कस्य वै सुत: ।
कथं विष्णुपदं प्रोक्तं तक्रं शक्रस्य दुर्लभम् ।।

अ. – ' जेवणाच्या शेवटी कोणते पेय घेतात ? जयन्त कोणाचा मुलगा ? विष्णुपद कसे सांगितले आहे ? ताक, इंद्राचा, दुर्लभ..'

व्य. – एकामागोमाग विचारलेले तीन प्रश्न आणि त्याच्या एकदम सांगितलेल्या तीन उत्तरांची शेवटची तीन पदे अशी या सुभाषिताची कोडेवजा रचना आहे. प्रश्नांच्या नंतर काही अंतराने त्यांची उत्तरे म्हणून 'ताक इंद्राला . दुर्लभ ' असे शेवटचे तीन संदर्भरहित शब्द ऐकून संस्कृत जाणणारा मनुष्यही क्षणभर गोंधळात पडतो. व्यवहारात मात्र इन्द्रालाही मिळायला कठीण असे ताकाचे माहात्म्य यावरून सांगितले जाते. तो अर्थातच विपरीतार्थ आहे.

१६४. ततो युद्धाय युज्यस्व

सं. – भगी. २.३८. लढाई सोडून अर्जुन ज्या सांख्यमार्गाचा अवलंब करण्यासाठी भिक्षाटन करण्यास तयार झाला, त्या मार्गातील तत्त्वज्ञानाप्रमाणे आत्म्याचा वा देहाचा शोक करणे योग्य नाही, असे श्रीकृष्णाने सांगितले.

मू. – सुखदु:खे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ।।

अ. – 'सुख किंवा दु:ख, फायदा-तोटा, विजय वा पराजय (दोन्ही) सारखीच मानून (समभावनेने स्वीकार कर आणि खेद वा हर्ष न मानता) लढण्यास प्रारंभ कर. यामुळे तुला पाप लागणार नाही. (कारण कर्तव्यबुद्धीने केलेल्या कर्मात मन न गुंतविल्यामुळे त्याचा परिणाम भोगावा लागत नाही.) म्हणून तू युद्ध कर.'

व्य. – सुखदु:खे समबुद्धीने सोसून स्वधर्माचरण करणेच श्रेयस्कर ठरते. कर्तव्य-पालनाच्या हेतूने केलेल्या कृत्यांचे परिणाम कर्त्याला भोगावे लागत नाहीत. कारण कर्त्याचा मीपणा त्यात नसल्याने त्यासंबंधी काहीशी उदासीन (अनासक्त) वृत्ती असते. अर्थात ही उदासीनता कर्माविषयी नसून फलाविषयी आहे. हीच मुक्तीची युक्ती श्रीकृष्णाने स्वधर्मे निधनं श्रेय. (३.३५) यातही सांगून अर्जुनाला स्वधर्मानुसरणास – क्षत्रियोचित युद्धास प्रवृत्त केले.

'ततो युद्धाय युज्यस्व'–'म्हणून युद्धाला सज्ज हो, सिद्ध हो' हा तर राष्ट्राला रणादेश आहे. निकटचे नातेवाईक, भाऊबंद नि जिवलग मित्र मारले जातील त्यामुळे अधर्म घडेल, त्यातून पाप लागेल आणि अशा प्रकारे आपल्या प्रतिष्ठेला उणीव येईल, अशा विचाराने भ्रांतचित्त झालेला अर्जुन आपल्या गुरुतुल्य मार्गदर्शकापुढे उभा होता. राष्ट्राची नि समाजाची म्हणजेच राष्ट्रातील नेतृत्व करणाऱ्या वर्गाची नि त्यांच्या-मागून चालणाऱ्या सर्वसामान्य माणसांची स्थिती वरीलप्रमाणे अर्जुनासारखी होते. तेव्हा याच अजरामर उक्तीने त्याला चेतना देऊन कर्तव्याच्या रणक्षेत्रावर समयोचित झुंजीसाठी आवाहन केले जाते, उत्साहित केले जाते. सामान्य व्यवहारात सुद्धा किंकर्तव्यमूढ झालेल्या माणसाला जीवनसंग्रामार्थ स्थिरचित्ताने उभे ठाकण्यासाठी या संयोजक संदेशाचा उपयोग होतो.

१६५. तत्र श्रीर्विजयो भूतिः

सं. – भगी. १८.७८. जेथे शक्ती व युक्ती एकत्र झाली तेथे ऋद्धि सिद्धि निश्चित असतात. नुसत्या शक्तीने अगर केवळ युक्ती असून चालत नाही. हाच सिद्धान्त गीताकारांनी मांडला आहे. संजयाने आपले हे मत स्पष्ट केले आहे.

मू. – यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।।

अ. – 'जिकडे योगेश्वर श्रीकृष्ण व जिकडे धनुर्धर अर्जुन तिकडेच श्री, विजय, शाश्वत, ऐश्वर्य व नीती (असते) असे माझे (संजयाचे) मत आहे.'

व्य. – श्रीकृष्णार्जुनसंवादानंतर संजयाने उपसंहार करताना हा सिद्धांत मांडला आहे. जेथे शक्तियुक्ती एकवटते तेथेच विजय प्राप्त होतो, हा अनुभवसिद्ध विचारच या

श्लोकरूपात सांगितला आहे. श्रीकृष्ण हे युक्तीचे प्रतीक असून, अर्जुन शक्तीचा द्योतक आहे. 'शक्ति युक्ति जये ठायी । तेथे श्रीमंत धावती ।' ही समर्थोक्ती याच अर्थाची आहे. किंबहुना वैदिक विचारधारेला अभिप्रेत असलेली परिपूर्ण जीवनप्रणालीच यातून व्यक्त झालेली आहे. श्रीकृष्ण - अर्जुन, चाणक्य - चंद्रगुप्त, विद्यारण्य - हरिहर बुक्क, समर्थ - शिवाजी ही आपली परंपरा याचीच द्योतक आहे. आपला देश हा संदेशी जेव्हा जेव्हा विसरला, ज्या ज्या वेळी राष्ट्राचा हा समतोल ढळला त्या त्या काळ देश - राष्ट्र - समाज विजय-वैभवाला पारखा झाला. म्हणून या उक्तीचे स्मरण सदैव आवश्यक.

१६६. तत्त्वमसि

सं. – छांदोग्य ६.८.७. श्वेतकेतु वेदविद्येचे अध्ययन करून गुरुकुलातून परत आल्यानंतर, त्याच्या पित्याने – आरुणीने त्याला तत्त्वज्ञानातील मुख्य सिद्धांताची ओळख करून दिली.

मू. – **स य एषोऽणिमैतदात्म्यमिदं सर्वं तत्सत्यं स आत्मा तत्त्वमसि श्वेतकेतो इति, भूय एव मा भगवान्विज्ञापयत्विति, तथा सोम्येति होवाच ॥**

अ. – 'ते जे हे सूक्ष्म - सारभूत (तत्त्व), त्याने हे सर्व व्याप्त आहे. ते सत्य, तोच आत्मा. हे श्वेतकेतु, ते सत्य (तो आत्मा) तू आहेस. (श्वेतकेतु म्हणतो) मला पुनः हे समजावून सांगावे. तेव्हा, 'पुत्रा, होय' असे (पिता) म्हणाला.'

व्य. – चार वेदशाखांची चार महावाक्ये आहेत. त्यांपैकी 'तत्त्वमसि' हे सामवेदशाखेचे महावाक्य आहे. जीव आणि ब्रह्म यांचे ऐक्य प्रतिपादन करणाऱ्या या वाक्याचा गुरु शिष्याला उपदेश करतात. 'तत्'पदाने सच्चिदानंदस्वरूप ब्रह्म लक्षित होते तर 'त्वं' पदाने - उपाधीने आच्छादित झालेला आत्मा–'जीव' लक्षित होतो. 'असि' पदाने ब्रह्म व निरुपाधिक आत्म्याचे ऐक्य आहे, असे दाखविले जाते.

तत्त्वज्ञानातला हा अंतिम सिद्धांत आहे. पाणी आणि पाण्यावरची लाट – दोन्ही वस्तुतः अभिन्न आहेत. सर्व वस्तूंचे सारभूत - मूलस्वरूप एकच आत्मतत्त्व आहे व तेच आपल्या ठिकाणी आहे, हे निरनिराळ्या दृष्टान्ताद्वारे सांगितले आहे. साधकाने महावाक्याचे श्रवण, मनन व निदिध्यासन करणे हे वेदान्तात आत्मसाक्षात्काराचे मुख्य साधन मानले जाते. (परिशिष्ट पाहा).

'तत्त्वमसि' – 'तेच तू आहेस' हा वैदिक भारतीय तत्त्वज्ञानाचा गाभा. त्या सच्चिदानंद परब्रह्मापासून तू जीव वेगळा नाहीस, तो तूच आहेस, ही जीवाच्या उन्नतीची परमसीमा. इतर धर्म-तत्त्वज्ञानांपेक्षा हिंदु धर्म-तत्त्वज्ञानाचे हे लक्षणीय वैशिष्टच. ही बैठक समजली नि आत्मसात् करता आली तर माणसाचे जीवनच पालटून जाईल.

१६७. तथा चतुर्भिः पुरुषः परीक्ष्यते

सं. – सुर. ३. सामान्यनीती ९१४. मनुष्याची योग्यता ठरविण्यासाठी कसोटीची कोणती विशिष्ट तत्त्वे आहेत हे सुभाषितकाराने येथे सांगितले आहे.

मू. – यथा चतुर्भिः कनकं परीक्ष्यते निघर्षणच्छेदनतापताडनैः ।
तथा चतुर्भिः पुरुषः परीक्ष्यते श्रुतेन शीलेन कुलेन कर्मणा ।।

अ. – 'जसे सुवर्णाची परीक्षा घासून, तुकडे करून, तापवून आणि ठोकून केली जाते (या चार कसोट्यांनी सुवर्णाचा कस जोखला जातो); तसे मनुष्याची पारख नावलौकिक (अथवा बहुश्रुतत्व), शील, कुल व कार्य या चार कसोट्यांद्वारा केली जाते (मनुष्याची पारख म्हणजेच त्याची योग्यता ठरविली जाते).'

व्य. – परीक्षा केल्यानंतरच एखाद्या वस्तूची योग्यता, उपयुक्तता ठरते; माणसाची परीक्षा तर प्रत्येक प्रसंगी, प्रत्येक क्षणी होत असते; पण संकटकाळी ती विशेष होते. अनेक प्रकारच्या आपत्ती माणसावर येत असतात, त्या वेळी आपला दुर्लौकिक होऊ नये, शील बिघडू नये, कुळाला कलंक लागू नये व कोणतेही हीन दर्जाचे कर्म हातून होऊ नये, यासाठी दक्ष राहिला तर तो उत्तम पुरुष होय. अशा वेळी त्याचे धैर्य, त्याग, शान्ती, सदाचरणाविषयीची तत्परता या गुणांची परीक्षा होते.

कठीण कालातही शांतपणे कर्तव्य बजावणाऱ्या श्रेष्ठ पुरुषांकडे पाहून या उक्तीतील मर्म ध्यानी येते.

१६८. तदेव लग्नम्

सं. – विवाहविधीतील मंगलाष्टकांचा अखेरचा श्लोक. वधूवरांना सर्व प्रकारची अनुकूलता लाभावी अशी प्रार्थना यात केली आहे.

मू. – तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चन्द्रबलं तदेव ।
विद्याबलं दैवबलं तदेव लक्ष्मीपते तेंऽघ्रियुगं स्मरामि ।।

अ. – 'तोच उत्तम लग्नमुहूर्त होय, तोच शुभ दिवस आणि ग्रह, नक्षत्र, चंद्र, विद्या आणि दैव यांची तीच अनुकूलता होय; (की जेव्हा) हे लक्ष्मीपती! मी तुझ्या चरणकमलांचे स्मरण करतो.'

व्य. – हा श्लोक म्हटल्याबरोबर वधूवरांच्या मध्ये धरलेला अंतरपाट दूर होतो, मंगलवाद्ये वाजू लागतात आणि उपस्थितांच्या टाळ्यांच्या निनादात वधूवर परस्परांच्या गळ्यात हार घालतात. या क्षणाला जी धांदल आणि गडबड उडते तिच्यावरून 'तारांबळ' (तारा+बलं) हा शब्द रूढ झाला आहे. लग्नाचा मुहूर्त साधण्यासाठी अगोदरची जी धावपळ ती 'तदेव लग्नं' म्हटल्याबरोबर दृष्टीसमोर येते आणि कोणत्याही घरच्या कार्याची किंवा सभा-संमेलनाची ठरलेली वेळ सांभाळण्याची व सर्व बारीकसारीक पूर्वतयारी पूर्ण करण्याची धडपड पाहिली म्हणजे 'तदेव लग्नं' चे स्मरण होते.

राज्ञा. १ उविसं. ७

१६९. तद्वनं भविता राष्ट्रम्

सं. – वारा. २.३७.२९. रामाबरोबर सीतेलाही वनवासात जाण्यास संमती देणाऱ्या कैकेयीची वसिष्ठांनी निर्भर्त्सना केली. 'राम नसेल तर सीता तरी राज्यावर बसेल, परंतु दोघांना वनवासी करणाऱ्या तुझ्या दुराग्रहाचा विचार न करता आम्ही सारेच त्यांच्या मागोमाग जावू ' असे त्यांनी तिला बजावले.

मू. – नहि तद्भविता राष्ट्रं यत्र रामो न भूपतिः ।
तद्वनं भविता राष्ट्रं यत्र रामो निवत्स्यति ।।

अ. – 'ते राष्ट्र होणार (असणार) नाही - जेथे राम राजा नसेल. (याउलट) तो वनप्रदेशही राष्ट्र होईल - जेथे राम राहात असेल.'

व्य. – सुव्यवस्थित शासन करणारा समर्थ शासक असेल तर राष्ट्र उत्कर्ष साधू शकेल, कारण राष्ट्र म्हणजे भौगोलिक सीमारेषांनी निश्चित केलेला भूप्रदेश नव्हे, तर जेथे लोकसमुदाय सुखासमाधानाने जगतो ते स्थल राष्ट्र. किंबहुना शांती व समाधान लाभून एक प्रकारचे स्थैर्य जीवनाला मिळावे यासाठीच राज्यसंस्था अस्तित्वात आली. आजच्या काळातही उत्तम प्रशासक असणारे राष्ट्रच स्वतंत्रपणे स्वाभिमानाने राहू शकते, नाहीतर राष्ट्राला - समाजाला पारतंत्र्य अनुभवावे लागते. वसिष्ठांची ही उक्ती स्थलकालाने मर्यादित नाही. भारतीय जनमानसात श्रीरामाचे जे अनुपमेय, अपरिहार्य नि अपरिमित असे पूज्य, आदरणीय नि विश्वसनीय स्थान आहे त्याची निदर्शक अशी ही उक्ती आजही स्मरणीय आहे.' एखाद्या गोष्टीत राम नाही ' म्हणजेच ती निरर्थक, निरुपयोगी, निर्माल्यवत् आहे असे आपण दर्शवितो. त्याच अर्थाने वरील उक्ती राष्ट्राला लागू होते.

१७०. तद्विद्धि प्रणिपातेन

सं. – भगी. ४.३४. द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ, इत्यादी अनेक प्रकारचे यज्ञ आहेत. या सर्व यज्ञांत ज्ञानयज्ञच श्रेष्ठ आहे. मोक्षप्रद असा ज्ञानयज्ञ आचरण्यासाठी लागणारे ज्ञान कसे प्राप्त करावे ते श्रीकृष्णाने या श्लोकाद्वारे अर्जुनाला सांगितले.

मू. – तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ।।

अ. – '(हे अर्जुना) तत्त्वज्ञ, जाणत्या विद्वानांकडून ज्ञान मिळविण्यासाठी (त्यांना) नम्रतेने वंदन करणे, प्रश्नोपप्रश्न विचारणे आणि त्यांची सेवा करणे यानेच ते तुला उपदेश करतील.'

व्य. – ज्ञानप्राप्तीची एक सर्वमान्य रीत श्रीकृष्णाने येथे सांगितली आहे. पूर्वीच्या काळी गुरुकुलपद्धती जेव्हा अस्तित्वात होती त्या वेळी हीच पद्धती अवलंबिली जात होती. आचार्यांकडे ज्ञानप्राप्तीसाठी राहिलेले विद्यार्थी सेवाभावाने वागून त्यांची

सेवाशुश्रूषा करून, प्रसंगविशेषी प्रश्न विचारून ज्ञानार्जन करीत असल्याचे आपल्याला उपनिषदांतही आढळते. पूर्वापार चालत आलेली ही रीत आजच्या काळातही अनुकरणीय आहे. नम्र झाल्याशिवाय, शरणागती पत्करल्याशिवाय, सेवावृत्तीने शारीरिक कष्ट घेऊन गुरूची सेवा करून त्याला आपलेसे केल्याशिवाय गुरु प्रसन्न होत नाही; आणि गुरु प्रसन्न झाल्याशिवाय तो आपल्याजवळची विद्या किंवा ज्ञान (त्याचे रहस्य) शिष्याला मनापासून देत नाही. यानंतरही शिष्याने, विद्यार्थ्याने स्वतः विचार करून, स्वतः अभ्यास, मननचिंतन करून अनेक शंका व प्रश्न उपस्थित करावेत आणि आपले ज्ञान पारखून, तपासून पक्के करून घ्यावे, हीही अपेक्षा असते. ही खरीखुरी, शुद्ध ज्ञानार्जनाची भूमिका आहे आणि ती वरील उक्तीत स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेली आहे.

१७१. तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु

सं.– ऋग्. १०.१६६ खिल ३३.३. शिवसंकल्प ऋषी व मन ही देवता असलेल्या या सूक्ताची रचना त्रिष्टुप छंदात आहे. मनाचे स्वरूप व कार्य कोणते आहे हे ६ ऋचांच्या या सूक्तावरून कळून येते. सूक्ताचे धृवपद म्हणून 'तन्मे मनः' ही पंक्ती प्रत्येक ऋचेच्या अखेर आली आहे. (परिशिष्ट पाहा)

मू. – **यज्जाग्रतो दूर मुदैति दैवं तदु सुप्तस्य तथैवेति ।**
दूरंगमं ज्योतिषां ज्योतिरेकं तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ॥

अ.– 'जागृतावस्थेत जे वाटेल तितके दूर जाऊ शकते, जे ईश्वराला ओळखण्यास समर्थ आहे; झोपेच्या अवस्थेत ते जवळ येते; जे त्रिकालातील दूरची व झाकलेली वस्तू जाणू शकते; जे सर्व इंद्रियांचे प्रेरक आहे; ते माझे मन शुभ विचारांमध्ये मग्न असो.'

व्य.– माणसाचे मन ही एक आश्चर्यकारक वस्तू आहे. त्याच्या स्वरूपाचा, शक्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न ऋग्वेदीय द्रष्ट्यापासून अत्याधुनिक मानसशास्त्रज्ञांपर्यंत सर्वजण करीत आले आहेत. षड्रिपू त्यात राहातात; शुभ भावनाही त्यातच निवसतात. ते ताब्यात असेल तर मनुष्य सुखासमाधानाने जगू शकेल; दुष्प्रवृत्तींच्या मागोमाग गेले तर त्याच्या अधःपाताला–दुःखाला कारण होईल. म्हणून, स्वतःची उन्नती इच्छिणारा, आपले मन नेहमी चांगल्या विचारांत मग्न असावे अशी, वरील उक्तीप्रमाणे प्रार्थना करतो व तो त्या बाबतीत प्रयत्नशील असतो.

१७२. तपो मानसमुच्यते

सं.– भगी. १७.१६. श्रीकृष्णांनी शारीरिक, मानसिक व वाचिक असे तपाचे तीन प्रकार सांगितले आहेत. 'तप' शब्दाचा अर्थ त्यावरून स्पष्ट होतो.

मू.– **मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ।**
भावसंशुद्धिरित्येतत् तपो मानसमुच्यते ॥

अ.– 'मन प्रसन्न ठेवणे, सौम्यपणा, मुनीप्रमाणे वृत्ती ठेवणे, मनाचा निग्रह करणे, शुद्ध भावना यास मानसिक तप असे म्हणतात.'

व्य.– 'तप' 'तपश्चर्या' म्हटले की, सर्व सोडून अरण्यात जाऊन, मांडी घालून, जटा वाढवून एकेजागी दीर्घकाळ बसणे – हा अर्थ एकदम आपल्या मनात येतो. परंतु 'तप म्हणजे स्व-कर्तव्य पुरे करण्यासाठी जी दक्षता, चिकाटी, धीर ठेवून प्रयत्न केले जातात तेच तप होय' असे मनु आदि शास्त्रकारांनी सांगितले आहे. आपल्या गाठी असलेल्या सर्व शक्ती आणि साधनसामग्रीनिशी एखाद्या कार्यसिद्धीसाठी प्रयत्न करावा लागतो. त्यापैकी 'मानसिक' अवस्था कशी ठेवण्याची दक्षता घ्यावी, याचे येथे दिग्दर्शन केले आहे. तेच मानसिक तप होय.

१७३. तपो हि दुरतिक्रमः

सं.– महा. १२.१५९.५. आपद्धर्मपर्वात, युधिष्ठिराने, तपाचे स्वरूप व महत्त्व भीष्मांना विचारले; तेव्हा भीष्मांनी अनेक प्रकारे तपाचे वर्णन केले. तपाने कोणतीही कठीण गोष्ट साधता येते हे त्यांच्या उपदेशाचे सार आहे. (परिशिष्ट पाहा.)

मू.– यद्दुरापं दुराराध्यं दुराधर्षं दुरुत्सहम् ।
तत्सर्वं तपसा शक्यं तपो हि दुरतिक्रमः ।।

अ.– 'मिळविण्यास, उपासना करण्यास जे जे खडतर आहे, धारण करण्यास, सहन करण्यास जे जे कठीण आहे ते ते सर्व तप केल्याने साध्य होते. खरोखर तपाचा प्रभाव नष्ट करणे अशक्य आहे.'

व्य.– एखाद्या कार्यासाठी दृढ निश्चय, परिश्रम आणि त्रास सहन करण्याची तयारी हेच तप होय. अशा तपाने विधिलिखितही बदलता येते. अपयशामुळे निराश होणाऱ्या माणसांना पुन्हा प्रयत्नांच्या मार्गावर आणून ठेवणारा हा भीष्मांचा उपदेश आहे.

१७४. तमसो मा ज्योतिर्गमय

सं. – बृहदा. १.३.२८. यज्ञात सामगायन करताना प्रास्ताविक भागात ही पवित्र मंत्ररूप प्रार्थना उद्गाता म्हणतो. प्राणोपासनेची फलश्रुती सांगताना ही प्रार्थना केली आहे.

मू. – असतो मा सद्गमय । तमसो मा ज्योतिर्गमय ।
मृत्योर्माऽमृतं गमय ।

अ. – '(हे प्रभु) मला असत्यापासून सत्याकडे ने. मला अंधारापासून प्रकाशाकडे व मृत्यूपासून अमरत्वाकडे घेऊन चल.'

व्य. – नाशिवंत व अज्ञानमय असे मृत्यूचे स्वरूप असून अविनाशी व प्रकाशमय असे अमृताचे स्वरूप होय. अशी अविनाशी तेजोरूप अमृतस्थिती मला प्राप्त होवो; ही

वैदिक ऋषींची प्रार्थना म्हणजे सर्व काली व सर्व स्थळी मानवजातीचीच प्रार्थना होय. नित्य व्यवहारात या उक्तीचा वापर ज्ञानसाधनेसाठी पुढील मार्ग स्पष्ट दिसत नसेल अशा वेळी मार्गदर्शनासाठी प्रार्थना करण्याकरिता केला जातो.

मनुष्य संकटात सापडला, निराशेने त्याला पुढचा मार्ग सुचेनासा झाला म्हणजे हृदयातला अंधार, निराशा नाहीशी होऊन आशेचा किरण दिसावा म्हणून तो आर्त होऊन परमेश्वराची प्रार्थना करतो 'Lead kindly light' ही सुप्रसिद्ध इंग्लिश कविता जणू ऋग्वेदीय प्रार्थनेचा अनुवादच होय.

१७५. तवाऽस्मि दासः

(पाहा : क्लेशः फलेन)

१७६. तस्य जन्म निरर्थकम्

सं.– हित. प्रस्ताविका २७. कोणतीच गोष्ट शिकण्याकडे लक्ष नसलेल्या आपल्या उनाड मुलांकडे पाहून, त्यांचे आयुष्य फुकट जाईल अशी भीती सुदर्शन राजाला वाटू लागली.

मू. – **धर्मार्थकाममोक्षाणां यस्यैकोऽपि न विद्यते ।**
अजागलस्तनस्येव तस्य जन्म निरर्थकम् ।।

अ. – 'धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांपैकी एकही पुरुषार्थ ज्याने साधला नाही, त्याचा जन्म, शेळीच्या गळयाखाली लोंबणाऱ्या स्तनासारखा निरुपयोगी आहे.'

व्य. – 'अजागळ' हा गैरशिस्त आणि मंदबुद्धीच्या माणसाबद्दल वापरण्यात येणारा मराठी शब्द वरील श्लोकातील 'अजागल. . .' शब्दावरून प्रचलित झाला आहे. शेळीच्या मानेखाली लोंबणाऱ्या अवयवाचा, दुधाच्या किंवा कोणत्याच दृष्टीने उपयोग नसतो. तसेच मनुष्याच्या जन्माला येऊन विद्या, पैसा, घरदार, प्रतिष्ठा यापैकी काही साधले नाही, परमार्थासाठीही काही खटपट केली नाही, तर त्या माणसाने जीवन व्यर्थच घालविले असेच म्हणावे लागते. 'अरे, तू फुकट जन्माला आलास !' असे म्हटले जाते ते या उक्तीच्याच संदर्भाने.

१७७. तस्मात् पुत्र इति प्रोक्तः

सं. – वारा. २.१०७.१२. भरताने राज्याभिषेक करून घेऊन मातेची इच्छा पूर्ण करावी, तसेच पितृऋणातून मुक्त व्हावे यासाठी रामाने उपदेश केला. रामामागोमाग वनात आलेल्या भरताची समजूत घालताना ज्ञानी गयाचे हे वचन सांगितले.

महा. १.६८.३८. शकुंतलोपाख्यानात शकुंतला दुष्यंताला भरत हा त्याचाच पुत्र असल्याचे पटवून देण्याचा प्रयत्न करते, त्या वेळी ती पुत्राचे महत्त्व वर्णन करते.

मनु. ९.१३८. मनुष्य मेल्यानंतर त्याचे श्राद्ध करण्याचा व त्याच्या संपत्तीत मुख्य वाटणीचा अधिकार मुलाचा असतो. हे सांगून मनूने पुत्राचे महत्त्व सांगितले आहे.

मू. – पुन्नाम्नो नरकाद्यस्मात्पितरं त्रायते सुतः ।
तस्मात्पुत्र इति प्रोक्तः पितॄन्यः पाति सर्वतः ।। वारा. २.१०७.१२.

अ. – 'ज्याअर्थी पुत् नामक नरकापासून पित्याचे मुलगा रक्षण करतो (त्याच्यामुळे पित्याला पुत् नरकात जावे लागत नाही) म्हणून तो पुत्र म्हटला जातो. (त्यालाच पुत्र असे म्हणतात). सर्व पितरांचेही (तर्पणादी विधी करून स्वर्गप्राप्ती करवून दिल्याने नरकापासून) रक्षण तो करतो.'

महा. व मनु. यात तीन्ही चरण वरीलप्रमाणे असून फक्त चवथ्या चरणात बदल आहे तो असा : **स्वयमेव स्वयंभुवा ।।**

अ. – ' – असे प्रत्यक्ष ब्रह्मदेवानेच सांगितले आहे.'

व्य. – पुत्र हा कुलाचे सातत्य टिकवून पितृऋणातून मुक्त होण्याचे साधन आहे. म्हणूनच पूर्वीपासून आपल्या समाजात पुत्राला विशेष महत्त्व आहे. कुलाप्रमाणे पितरांसाठी धर्मकार्ये करणारा पुत्र संस्कृतीचे एक प्रकारे रक्षणच करतो. अशा प्रकारे कुलपरंपरा आणि संस्कृती याचे तो रक्षण करतो म्हणूनच त्याला पुत्र असे म्हणतात.

१७८. तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते

सं. – भगी. १६. २४. काम-क्रोध-लोभ यांच्या आहारी गेलेल्या माणसाची कशी दुर्गती होते हे सांगितल्यानंतर, त्यापासून सुटण्याचा उपाय श्रीकृष्णांनी येथे सांगितला आहे.

मू. – तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ।।

अ. – 'म्हणून कर्तव्य कोणते व अ-कर्तव्य (करू नये असे काम) कोणते ह्या बाबतीत तुला शास्त्राचा निर्णय प्रमाण मानला पाहिजे; शास्त्रात काय सांगितले आहे हे जाणून घेऊन त्याप्रमाणे तू या लोकी कर्म करावेस.'

व्य. – निष्कामबुद्धीच्या, रागद्वेषरहित, आपपरभावरहित असलेल्या व केवळ माणसाच्या कल्याणाची इच्छा करणाऱ्या द्रष्टया ऋषींनी मनुष्यजीविताचा विचार करून, अंतिम हितासाठी जे आचारविचारांचे नियम आवश्यक म्हणून सांगितले त्यांचा संग्रह म्हणजे शास्त्रे होत. सामान्य माणसाचे मन त्याला वेगवेगळ्या प्रलोभनांकडे ओढीत असते, त्या वेळी त्याला योग्य मार्गदर्शन करण्यास दिव्या-प्रमाणे, शास्त्रच उपयुक्त ठरते, याकडे श्रीकृष्णांनी लक्ष वेधले आहे. शास्त्र म्हणजे प्राचीन संस्कृत भाषेत लिहिली तीच केवळ पोथी अशी समजूत करून घेणे चुकीचे आहे. विज्ञानसिद्ध शास्त्रेही शास्त्रेच आहेत. शास्त्र मग ते प्राचीन असो अथवा

आधुनिक. शास्त्रनियमांना सोडून वागणे म्हणजे माणसाने आपले अनहित करून घेणे. यास्तव शास्त्राचे नियम प्रमाण मानलेच पाहिजेत हा आग्रह या उक्ति-विशेषातून प्रकट केला जातो.

१७९. तस्मै श्रीगुरवे नमः

सं. – गुरुगीता ३२, ३४, ७६. स्कंदपुराणाच्या उत्तरखंडात 'गुरुगीता' या नावाने अखिल भारतात प्रसिद्ध असलेल्या व लोकांच्या नित्यपाठात असलेल्या गुरूचे माहात्म्य वर्णन करून सांगणाऱ्या स्तोत्रातील हे निवडक श्लोक आहेत. 'तस्मै श्रीगुरवे नमः' हा चरण शेवटी असलेले, क्र. ३१ ते ४२ व ६७ ते ७५ व ७७ एवढे श्लोक गुरुगीतेत आहेत. (गुरुचरित्रान्तर्गत गुरुगीता)

मू.– गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुरेव* परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ३२ ॥

* **गुरुः साक्षात्** : पाठभेद

अ. – 'गुरू हा (जग निर्माण करणारा) ब्रह्मदेव, (जगाचा पालनकर्ता) विष्णु व (जगाचा संहार करणारा) शंकर–स्वरूप आहे. गुरू म्हणजे (सर्वव्यापी व अद्वितीय) परब्रह्मच होय, त्या श्रीगुरूला नमस्कार असो.'

मू.– अज्ञानतिमिरान्धस्य ज्ञानाञ्जनशलाकया ।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ३४ ॥

अ.– 'अज्ञानरूपी अंधारामुळे आंधळ्या झालेल्याचे (शिष्याचे) डोळे ज्याने ज्ञानरूपी अंजनाच्या काडीने उघडले त्या श्रीगुरूला नमस्कार असो.'

मू.– अखंडं मण्डलाकारं व्याप्तं येन चराचरम् ।
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ६७ ॥

अ. – 'स्थिर-चर अशा अखिल ब्रह्माण्डाला ज्याने व्यापले आहे आणि ज्याने ते ब्रह्मपद दाखविले आहे अशा त्या श्रीगुरूला नमस्कार असो.'

व्य.– भारतीय परंपरेत ज्ञानदात्या गुरूंना असाधारण महत्त्व आहे. स्वतःच्या प्रयत्नाने कितीही विद्यार्जन केले, पांडित्य मिळविले तरी गुरू म्हणून योग्य व्यक्तीच्या जवळ जाऊन निरहंकार व नम्रवृत्तीने त्यांचा उपदेश घेतल्यावाचून खरे ज्ञान प्राप्त होऊ शकत नाही, अशी प्राचीन ऋषीमुनींची व अनुभवी साधु-संतांची धारणा आहे. गीतेत 'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया..' अशी गुरूंजवळून ज्ञान प्राप्त करून घेण्याची रीत सांगितली आहे. त्यामुळे गुरूंचा महिमा सांगाणारे अनेक ग्रंथ निर्माण झाले. 'गुरुचरित्र' या सरस्वती गंगाधर यांनी लिहिलेल्या मराठी गुरुचरित्रामध्ये गुरुगीता एक स्वतंत्र अध्याय म्हणून समाविष्ट केली आहे.

१८०. त्वमसि पयसामर्णव इव

(पाहा : रुचीनां वैचित्र्यात्)

सं. – शिम. ७. ज्या स्तोत्रगानाने पुष्पदंत नावाचा शापित गंधर्व शापमुक्त होऊन पुनश्च गंधर्वराज झाला ते हे मधुर स्तोत्र. या स्तोत्रात परब्रह्मरूप शिवाची स्तुती आहे.

मू.– **त्रयी सांख्यं योगः पशुपतिमतं वैष्णवमिति**
प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति च ।
रुचीनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषां
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥

अ. – 'भिन्न भिन्न प्रकृतीची माणसे आपापल्या आवडीप्रमाणे सरळ किंवा वाकडचा मार्गाने तीन वेद, सांख्य तत्त्वज्ञान, योगशास्त्र, शैव व वैष्णव ह्यांपैकी (कोणत्या तरी) एका मार्गाचा स्वीकार करून तो तो मार्गच सर्वश्रेष्ठ आणि हितकर आहे असे सांगत असतात. तरीही जसे नद्यांचे पाणी शेवटी समुद्रालाच जाऊन मिळते तद्वत् हे सारे मार्ग शेवटी तुझ्यातच एकरूप होतात.'

व्य. – शिकागो येथील सर्वधर्म परिषदेत विवेकानंदांनी याच श्लोकातील शेवटच्या दोन चरणांचा उल्लेख करून सनातन वैदिक धर्माची विशालता व उदार वृत्ती सर्व जगापुढे मांडली. शापविमोचनासाठी या स्तोत्राची निर्मिती झाली आहे. त्यामुळे आजच्या काळातही अधोगती प्राप्त झालेल्या कोणाही मनुष्यमात्राला आपली पूर्वस्थिती वा उन्नतावस्था प्राप्त करून घेण्यास प्रेरणा देणारे स्फूर्तिप्रद असे हे स्तोत्र आहे. दीडशे वर्षे गुलामगिरीत खितपत पडल्याने स्वातंत्र्य मिळूनही अद्यापी स्वत्व हरवून बसलेल्या आम्हा भारतीयांना तर हे स्तोत्र विशेष स्मरणीय आहे – अशा दृष्टीने की, शेकडो पंथोपपंथ, समुदाय–संप्रदाय, जाती–जमाती, उपासनांचे विविध नि परस्परविरोधीही प्रकार, विभिन्न चालिरीती नि आचार–विचार यांमुळे समाजाच्या एकतेला जे तडे गेले आहेत, परस्परप्रेमाऐवजी विद्वेषाचीच धुंदी ज्याला चढली आहे त्या भारतीय समाजाला, एकत्वाचे पाठ देण्याचे सामर्थ्य या उक्तीत आहे. आम्ही या समाजसागराला मिळणारे भिन्न भिन्न दिसणारे प्रवाह असलो तरी साऱ्यांना त्या एकाच सागराला जाऊन मिळावयाचे आहे, त्या एकाच सागराचे पाणी आपण आहोत, एवढी भावना समाजघटकांत या उक्तीने दृढतर करता येण्यासारखी आहे. किंबहुना सारा मानवसमाजही या एका सूत्रा तया भारतीय उक्तिविशेषाने एकत्र बांधता येण्यासारखा आहे.

१८१. त्वमेव सर्वं मम देवदेव

सं. – पांडवगीता २८. महाभारतातील पांडव-कौरवांतील प्रमुख व्यक्तींपैकी गांधारी -धृतराष्ट्राची पत्नी–हिने श्रीकृष्णाला उद्देशून म्हटलेला हा श्लोक आहे.

मू. – त्वमेव माता च पिता त्वमेव, त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव ।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव, त्वमेव सर्वं मम देवदेव ।।

अ. – 'हे भगवंता ! तूच माझी माता, तूच माझा पिता. माझा नातलग आणि जिवलग (सखा) तूच. माझी विद्या आणि धन म्हणजे तूच आहेस. जे जे म्हणून माझे आहे ते ते सर्व मी तुझेच स्वरूप मानते.'

व्य. – परमेश्वरावर आत्यंतिक प्रेम करणाऱ्या भक्ताच्या मनोवृत्तीचे स्वरूप या श्लोकात दिसून येते. पूजेच्या शेवटी आरती झाल्यानंतर ही प्रार्थना केली जात असते.

१८२. ताडयेन्न तु लालयेत् ।

सं. – सुर. ३. सामान्यनीती ३४३. संसारात मुलांशी, शिष्यांबरोबर कसे वागल्याने त्यांना योग्य वळण लागते, यावद्दल सुभाषितकारांनी येथे स्वतःचे मत दिले आहे.

मू. – लालने बहवो दोषास्ताडने बहवो गुणाः ।
तस्मात्पुत्रं च शिष्यं च ताडयेन्न तु लालयेत् ।।

अ. – 'लाड करण्याने दोष उत्पन्न होतात, तर मारण्यामुळे गुण वाढतात. मुलाला आणि शिष्याला मार द्यावा; त्यांचे लाड करू नयेत.'

व्य. – लहान मुले बहुधा हट्टी, नादिष्ट, चंचल व खेळात रमणारी असतात. पहाटे उठणे, पाठान्तर – अभ्यास करणे त्यांना कटकटीचे वाटते. पण विद्येचा प्रारंभ करण्याला तसेच मनाला आणि शरिराला वळण लावण्याला हाच योग्य काळ असतो. म्हणून सरळ गोडीने सांगूनही न ऐकल्यास मुलांना धाकात ठेवणे, चार तडाखे देऊनही त्यांच्याकडून योग्य गोष्ट करून घेणे हिताचे असते. आधुनिक बाल-मानसशास्त्र याबाबतीत याच्या नेमके विरुद्ध मत देते. 'मुलांच्या कलाने घ्या' असे ते आग्रहाने प्रतिपादिते. तथापि प्रत्यक्ष व्यवहारात मात्र ही प्राचीन अनुभवावर आधारित उक्तीच प्रचलित आहे.

१८३. तान्प्रति नैष यत्नः

(पाहा : कालो ह्ययं)

१८४. त्यागात् शान्तिरनन्तरम्

सं. – भगी. १२.१२. प्रत्येकाच्या स्वभावयोग्यतेनुसार भगवन्तांनी मोक्षप्राप्तीसाठी विविध उपाय सुचविले आहेत व शेवटी कर्मफलाचा त्याग हा अन्तिम उपाय सांगितला आहे.

मू. – श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।
ध्यानात् कर्मफलत्यागस्त्यागात् शान्तिरनन्तरम् ॥

अ. – 'अभ्यासापेक्षा ज्ञान अधिक महत्त्वाचे, ज्ञानापेक्षा ध्यान अधिक योग्यतेचे तर ध्यानाहून कर्मफलाचा त्याग श्रेष्ठ; त्यागापासून पुढे शान्ती प्राप्त होते.'

व्य. – सर्व भूमिकांमध्ये त्यागाची, अलिप्ततेची भूमिका श्रेष्ठ होय. रागद्वेषांमुळे सुखदु:ख उत्पन्न होते व मनुष्य त्यांत गरफटला जातो. त्याला मन:शांती कधीच मिळू शकत नाही. अर्थात् कर्माचा स्वरूपत: त्याग करणे कधी शक्य नसते; पण त्या बाबतीतली अलिप्ततेची भावना शक्य असते. तीच येथे अभिप्रेत आहे. पण अनेक वेळा त्याग याचा अर्थ कर्माचा त्याग – आवश्यक कर्मेच सोडून देणे, संन्यासी बनणे असा अर्थ केला जातो; व अनधिकारी माणसेही संन्यास घेतात. त्यामुळे त्यांची व समाजाचीही हानी होते.

१८५. तितीर्षुर्दुस्तरं मोहात्

(पाहा : क्व सूर्यप्रभवो)

१८६. तेऽपि यान्ति परां गतिम्

सं. – भगी. ९.३२. मी आपल्या भक्ताला कधीच अंतर देत नाही, त्याचे सर्वतोपरी रक्षण करतो, असे प्रतिज्ञेवर सांगून श्रीकृष्णाने, भक्ती हा सर्वांना सुलभ व सहज असा राजमार्ग आहे, हे स्पष्ट करून सांगितले.

मू. – मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ॥

अ. – 'हे अर्जुना, मला शरण आल्याने स्त्रिया, वैश्य व शूद्र, तसेच (अंत्यजादी) अधम कुलात जन्मलेली माणसेही परमश्रेष्ठ गतीला जातात.'

व्य. – 'ज्ञानमार्ग, योगमार्ग या मोक्षाकडे नेणाऱ्या साधनभूत मार्गांचे आचरण करीत असताना जे तप, मनाची एकाग्रता, अलिप्तता आवश्यक असते ते करणे सर्वांनाच शक्य होत नाही. प्रेम करणे हा जीवाचा सहजधर्म आहे, त्याला अनुसरून भगवन्ताला आपल्या प्रेमाचा विषय करणे, त्याला आपली सर्व कर्मे अर्पण करणे, निरहंकार मनाने त्याला शरण जाणे हे सर्वांना, विशेषत: विद्याभ्यास न झालेल्या, भावनाशील, नम्रवृत्तीच्या माणसांनाही शक्य आहे. परमेश्वराला काही विशेष विद्या, धनसंपत्ती, उपचार यांची गरज नसते. त्याला पाहिजे असतो, मनाचा निर्मळ, प्रेमळ भाव. तो ज्याच्याजवळ आहे त्याची जात-पात, श्रीमंती-गरिबी परमेश्वर पाहात नाही. आपल्या भक्ताला तो आवश्यक ते ज्ञान देऊन मोक्षमार्गावरून घेऊन जातो, अन्तिम गती प्राप्त करून देतो. येथे श्रीकृष्णाने सर्व मानवजातीला, विशेषत: पतितांना दिलेले उद्धाराचे आश्वासन हा स्वत:ची उन्नती करून घेण्याची

इच्छा करणाऱ्या प्रत्येकाला एक महान आशादीप आहे; आणि म्हणूनच ही उक्ती सर्वसामान्यप्रिय ठरलेली आहे.

१८७. ते केन जानीमहे

सं. – नीश. ६४. भर्तृहरीने माणसाच्या आचरणावरून त्याची 'जात' ओळखण्याचा प्रयत्न केला आहे.

मू. – **एते सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थान्परित्यज्य ये ।**
सामान्यास्तु परार्थमुद्यमभृतः स्वार्थाविरोधेन ये ।।
तेऽमी मानुषराक्षसाः परहितं स्वार्थाय निघ्नन्ति ये ।
ये तु घ्नन्ति निरर्थकं परहितं ते केन जानीमहे ।।

अ. – 'सत्पुरुष स्वार्थ सोडून दुसऱ्याचे कार्य पूर्ण करण्यासाठी झटतात. सामान्य माणसे स्वार्थाची हानी न होईल अशा प्रकारे दुसऱ्याच्या कामात मदत करतात. (उलट) स्वार्थ साधण्यासाठी दुसऱ्याच्या कार्याचा नाश करतात ते मनुष्यरूपी राक्षस होत. मात्र, जे दुसऱ्याच्या कार्याचा निष्कारण नाश करतात त्यांना कोण म्हणावे हे कळत नाही.'

व्य. – तीन प्रकारच्या पुरुषांची लक्षणे सांगण्यासारखी आहेत. चौथ्या आणि अति नीच वृत्तीच्या पुरुषाची गणना कोणत्या प्रकारात करावी हे भर्तृहरीसारख्या नीतिविशारदालाही सुचत नाही. ज्या कामापासून स्वतःचे किंवा दुसऱ्याचे कोणत्याही प्रकारे कल्याण नाही, लाभ नाही, उलट अकल्याण आणि हानीच अपेक्षित आहे, असे काम करणाऱ्याकडे पाहून आजही आपल्या तोंडून हे उद्‌गार बाहेर पडतात 'ते कोण की दुर्मती!' अशाच शब्दांत त्यांची संभावना केली जाते.

१८८. तेजस्तेजसि शाम्यतु

सं. – उरा. ५.७. रामाच्या अश्वमेध यज्ञाचा घोडा महर्षी वाल्मीकींच्या आश्रमात शिरताच रामपुत्र लवाने त्याला अडविले. आपल्या धनुष्यबाणाने हजारो सैनिकांना पळवून लावणाऱ्या लवाकडे पाहून लक्ष्मणपुत्र चंद्रकेतूने त्याला स्वतःशी लढण्याचे आव्हान दिले, ते या शब्दांत :

मू. – **भो भो लव महाबाहो किमेभिस्तव सैनिकैः ।**
एषोऽहमेहि मामेव तेजस्तेजसि शाम्यतु ।।

अ. – 'अरे हे लवा, या सैनिकांशी तुला काय करायचे आहे? (त्यांच्याशी कशाला लढतोस?) हा मी येथे आहे. ये (लढायला) माझ्याकडे. तेज तेजानेच शांत होऊ दे.'

व्य. – ज्याप्रमाणे साधू ओळखण्यासाठी स्वतःही सज्जन निर्मळ अंतःकरणाचे असावे लागते, त्याप्रमाणे पराक्रमीचे सामर्थ्य वीर्यशालीच जाणू शकतो. किंबहुना

तुल्यबल योद्धयांतच युद्ध होते. सामान्य भीरू किंवा नेभळटाशी लढण्यात वीराला स्वारस्य वाटत नाही. वीराग्रणी शूराला प्रतिस्पर्धीही समानपराक्रमी हवा असतो. अशा वीरांशी लढण्यातच त्याला आनंद वाटतो. चंद्रकेतूच्या या उद्गारात तुल्यबलाशी स्पर्धा करण्याची वृत्ती आहे, तसेच 'तू केवढाही तेजस्वी असलास तरी तुझी रग जिरविण्याचे सामर्थ्य, तेवढी तेजस्विता माझ्याही ठिकाणी आहे' असेही चंद्रकेतूला सुचवावयाचे आहे. दुसऱ्याच्या तेजस्वीपणाची जाणीव आणि त्याचबरोबर स्वतःचा आत्मविश्वास या दोन्ही गोष्टी व्यवहारात या उक्तीतून व्यक्तविल्या जातात.

१८९. तेजसां हि न वयः समीक्ष्यते

सं. – रघु. ११.१. यज्ञ निर्विघ्न व्हावा याकरिता विश्वामित्रांनी दशरथाकडे रामाची मागणी केली. रामाला मागताना त्याचा पराक्रम विश्वामित्रांना आधार वाटत होता.

मू.– कौशिकेन स किल क्षितीश्वरो राममध्वरविघातशान्तये ।
काकपक्षधरमेत्य याचितस्तेजसां हि न वयः समीक्ष्यते ॥

अ. – 'त्या दशरथ राजाजवळ येऊन विश्वामित्राने यज्ञयागात विघ्ने येऊ नयेत म्हणून कानावर केसाची झुलपे असणाऱ्या रामाला मागितले. जे तेजस्वी असतात त्यांच्याविषयी वयाचा प्रश्न उद्‌भवत नाही.'

व्य. – तेजस्वी व्यक्तींचा पराक्रम वयावर अवलंबून नसतो. त्यांचे तेज, पराक्रम बाल्यावस्थेतही प्रगट झाल्यावाचून राहात नाही. सामान्यांपेक्षा त्यांच्या अंगी असामान्य कर्तृत्व असल्याने त्याला वयोमर्यादा पडत नाही. रामाला उद्देशून असलेली ही शब्दावली आजही व्यवहारात असामान्यांचे तेज वर्णिताना योजली जाते.

१९०. तेन त्यक्तेन भुञ्जीथाः

(पाहा : ईशावास्यमिदं सर्वम्)

१९१. ते महामहिमशालिनः

सं. – सुर. २. सज्जनप्रशंसा ५३. सज्जन कोणाला म्हणावे याविषयी वेगवेगळे निकष लावले जातात. सज्जनांचे मोठेपण, हृदयाची मृदुता जेथे विशेषत्वाने जाणवते अशा तीन अवस्थांचे वर्णन करणारा पर्यायाने संतगौरव करणारा हा श्लोक आहे.

मू.– धनिनोऽपि निरुन्मादा युवानोऽपि न चञ्चलाः ।
प्रभवोऽप्यप्रमत्तास्ते महामहिमशालिनः ॥

अ. – 'धनिक असूनही उन्मत्त नसलेले, तरुण असून अस्थिर वृत्ती नसलेले (शांत, स्थिरचित्ताने विचार करणारे), सत्ता हाती असतानाही धुंदीत न राहाणारे (निगर्वी) असे असतील तेच महान श्रेष्ठ पुरुष होत.'

व्य. – धन-यौवन-सत्ता या विविध गोष्टी मनाचे चांचल्य वाढविणाऱ्या, काहीसा बेमुर्वतखोरपणा वर्तनात आणणाऱ्या आहेत. हे तीन्ही असूनही जो निरभिमानीपणाने व विचारपूर्वक वागतो तोच खरा सज्जन होय. या तीन्हींपैकी एकेक गोष्टही उद्दामपणा आणण्यास समर्थ आहेत. एकप्रकारे सज्जनांच्या सज्जनतेची परीक्षा घेणाऱ्या या कसोटयाच आहेत. यांतून जो यशस्वी होतो त्यांनाच श्रेष्ठ मानले जाते.

१९२. ते हि नो दिवसा गताः

सं. – उरा. १.१९. नवपरिणीत पत्नीसह अयोध्येला येऊन पोचल्याचे चित्र पाहाताच रामाला त्या रम्य काळाचे स्मरण झाले. चित्रकाराने काढलेली चित्रे लक्ष्मण दाखवीत असताना रामाला पुनश्च त्या काळातील सुखाची आठवण झाली.

मू. – **जीवत्सु तातपादेषु नवे दारपरिग्रहे ।**
मातृभिश्चिन्त्यमानानां ते हि नो दिवसा गताः ॥

अ. – 'वडील असताना नुकतेच विवाह झाले असून माता सर्व तऱ्हेची काळजी घेत होत्या तो (रम्य सुखद) काळ गेला आता.'

व्य. – सर्वसामान्यपणे बालपणाचा काळ हा सुखाचा असतो. स्वतःवर कसलीच जबाबदारी नसते. मनावर दडपण नसते. काहीसे स्वच्छंदी, आनंदी जीवन असते. अशा काळातील सुखद स्मृती प्रत्येकाला आयुष्यभर वारंवार स्मरत असतात. प्रत्येकाच्या आयुष्यात सुखाचा-चिरस्मरणीय सुखाचा काही काळ आलेला असतोच. अर्थातच तो चिरकाल टिकत नाही ; नंतर त्याच्या केवळ स्मृतीच उरतात. अशा अवस्थेत त्या सुखद काळाचे – बहुधा हृदयाला विषण्णता आणणारेही – स्मरण रामाच्या वरील शब्दांनी व्यक्तविले जाते.

१९३. तैलबिन्दुरिवाम्भसि

सं.– सुर. २. प्रवास. २. इतर प्राण्यांपेक्षा बुद्धी ही माणसाला मिळालेली विशेष देणगी आहे. तिची वाढ कशा प्रकारे होऊ शकते हे सुभाषितकाराने सांगितले आहे.

मू. – **यस्तु संचरते देशान्यस्तु सेवेत पण्डितान् ।**
तस्य विस्तारिता बुद्धिस्तैलबिन्दुरिवाम्भसि ॥

अ. – 'जो देशोदेशी प्रवास करतो व जो पंडितांच्या सान्निध्यात राहातो, त्याची बुद्धी पाण्यात पडलेल्या तेलाच्या थेंबासारखी पसरते (विशाल होते).

व्य. –घृतबुद्धी म्हणजे मंदबुद्धी आणि तैलबुद्धी म्हणजे तीव्रबुद्धी असे माणसांचे बुद्धीनुरूप केलेले दोन प्रकार प्रसिद्ध आहेत. तुपाचा थेंब पाण्यात टाकल्याबरोबर जेथल्या तेथेच थिजल्यासारखा होऊन बसतो; तर तेलाचा थेंब टाकल्यावर तो पसरत मोठा मोठा होत जातो. बुद्धी विशाल होत जाणे हे उत्तम लक्षण आहे व त्यालाच उद्देशून 'तैलबुद्धी' हा शब्द वापरला जातो.' केल्याने देशाटन पंडितमैत्री

सभेत संचार 'ही तैलबुद्धी बनण्याची साधने 'सांगणारी मराठी उक्ती वरील सुभाषिताच्या अर्थाचीच आहे.

१९४. तं देवाः स्थविरं विदुः

सं. – मनु. २.१५६. ' आचार्य, ' ' गुरू ' कोणाला म्हणावे हे सांगताना मनूने वाढत्या वयापेक्षा अध्ययनावर, शहाणपणावर भर दिला आहे.

महा. ३.१३३.११.जनकाच्या राजसभेत दहा वर्षांचा अष्टावक्र मुनी पंडितांशी वाद करण्यासाठी आला असताना द्वारपालाने त्याला अडविले. अष्टावक्राने त्याला खालील उत्तर दिले :

मू. – न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः ।
यो वै युवाप्यधीयानस्तं देवाः स्थविरं विदुः ॥

अ – ' (केवळ) डोक्यावरचे केस पांढरे झाले म्हणून कोणी वृद्ध होत नाही. तरुण असूनही जो विद्वान् आहे त्यालाच देव वृद्ध मानतात. '

' वृद्ध ' शब्दाचे जागी ' स्थविर ' व ' युवा'चे जागी ' बाल ' एवढाच बदल महाभारतातील श्लोकात आहे. आशय तोच आहे.

व्य. – शहाणपण वयावर अवलंबून नसते. वयाने वाढलेली माणसेही बुद्धीने बाल (बाल याचा पारिभाषिक अर्थ अनधीत असाच आहे) असू शकतात. तर ज्ञानेश्वरांसारख्या लहान वयाची व्यक्ती, म्हाताऱ्या माणसांनाही जिचे आकलन होणे कठीण आहे अशी ' ज्ञानेश्वरी ' लिहितात. लहान वयाचा शिक्षक आणि त्याचे वयस्कर विद्यार्थी कधी कधी दृष्टीस पडतात तेव्हा सहजच या उक्तिविशेषाचे स्मरण होते.

(द)

१९५. दण्ड एव परो लोके

सं. – वारा. ६.२२.४५. तीन दिवस प्रार्थना करूनही तरून जाण्याचा कोणताही मार्ग सागराने सुचविला नाही, तेव्हा एक उग्र बाण सज्ज करून रामाने सागराला वठणीवर आणले. त्या वेळी नल वानर म्हणाला :

मू. – दण्ड एव परो लोके पुरुषस्येति मे मतिः ।
धिक् क्षमामकृतज्ञेषु सान्त्वं दानमथापि वा ॥

अ. – ' शिक्षा करणे हाच या जगात कार्य सिद्ध करून घेण्याचा उपाय आहे. अकृतज्ञ पुरुषांबरोबर सामोपचाराने वागणे, त्यांना क्षमा करणे किंवा दान करणे व्यर्थ आहे. '

व्य. – लोकांच्या अधार्मिक व अनैतिक वर्तनाला आळा घालण्यासाठी दण्डाचाच अवलंब करावा लागतो. त्यामुळेच सर्वांना सुखाने जगणे शक्य आहे. हे कायद्याचे

मूळ तत्त्व आहे. 'सर्वोदण्डजितो लोको' ... (मनु. ७. २२) यासारख्या वचनात ह्याच नियमाचा उच्चार केला आहे.

१९६. दण्डस्य हि भयात्

सं. – मनु. ७.२२. राजाने समाजातील सुव्यवस्था व शांतता राखण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी केली नाही तर राज्यात अंदाधुंदी माजेल, कोणीच सुखाने जगू शकणार नाही. यासाठी मनूने कायद्याची आवश्यकता येथे आग्रह-पूर्वक सांगितली आहे.

मू. – **सर्वो दण्डजितो लोको दुर्लभो हि शुचिर्नरः ।**
दण्डस्य हि भयात्सर्वं जगद्भोगाय कल्पते ॥

अ. –' कायद्याच्या नियंत्रणांखाली असल्यामुळेच माणसे सरळ वागतात. खरोखर स्वभावतःच निर्दोष आचरणाचा मनुष्य दुर्मिळ आहे. शिक्षेच्या भीतीमुळेच सर्वांना आपल्या वाट्याच्या सुखसंपत्तीचा उपभोग घेता येतो.'

व्य. – स्वार्थ साधण्याची प्रवृत्ती बहुतेक सर्वच माणसांमध्ये प्रबळ असते. त्यासाठी तो दुसऱ्यांच्या न्याय हक्कांवर गदा आणण्यास मागेपुढे पाहात नाही. दुसऱ्यांच्या संपत्तीचा या ना त्या निमित्ताने अपहार करण्याची संधी तो शोधीत असतो. पण आपण असे वागलो तर कायद्याने दिलेली शिक्षा भोगावी लागेल या भीतीने तो तसे करीत नाही व त्यामुळेच साध्या पापभीरू माणसांचे रक्षण होते. हृदय-परिवर्तनादी साधनांनी, तत्त्वज्ञानाच्या उपदेशाने किंवा नुसत्या मोठमोठ्या आदर्शवादाच्या गोष्टी सांगून सन्मार्गाकडे कोणी वळत नाही. सर्वसामान्य माणसाला सदाचाराच्या लोभापेक्षा कायद्याच्या किंवा तत्सम वडग्याची भीतीच दुसऱ्याच्या बाबतीत आक्रमणकारी कृत्ये करण्यापासून थांबविते. मग ते वैयक्तिक बाबतीत असो नाहीतर सामाजिक, राष्ट्रीय, कोणत्याही.

१९७. दर्वी पाकरसानिव

सं. – महा. २.४१.२७. पांडवांचे हक्काचे अर्धे राज्य त्यांना उपभोगू द्यावे, त्यांचा द्वेष करू नये, असे सांगणाऱ्या धृतराष्ट्राची – आपल्या पित्याची संतापाने दुर्योधनाने निर्भर्त्सना केली. ' शास्त्रे जाणून त्यांचे मर्म न जाणणारा पढीक, ' अशी त्याने आपल्या पित्याची संभावना केली.

सुर.२. कुपंडितनिंदा ८. वर्षानुवर्षे शास्त्रांचे श्रवण-अध्ययन करूनही त्यांचे रहस्य ध्यानात येत नाही अशा पंडितांची बुद्धी व श्रम व्यर्थ होत, हे सुभाषित-कारांनी लक्षात आणून दिले आहे.

सप. द ९.

यस्य नास्ति स्वयं प्रज्ञा शास्त्रं ॥ ...

मू. – यस्य नास्ति निजा प्रज्ञा केवलं तु बहुश्रुतः ।
न स जानाति शास्त्रार्थं दर्वी सूपरसानिव ॥ महा. २.४१.२७.

अ. – 'ज्याने पुष्कळ शास्त्रे श्रवण केली परंतु ज्याला स्वत:ची बुद्धी नाही, त्याला शास्त्रांचा अर्थ कळत नाही; जशी, पळी स्वयंपाकातील पदार्थांचा आस्वाद घेऊ शकत नाही.'

मू. – यस्य नास्ति विवेकस्तु केवलं यो बहुश्रुतः ।
स न जानाति शास्त्रार्थान् दर्वी पाकरसानिव ।। सुर. २ कुपंडितनिंदा ८.

अ. – 'पळीला जशी स्वयंपाकाची चव कळत नाही, त्याप्रमाणे, पुष्कळ शास्त्रचर्चा ऐकलेली असूनही ज्याच्या ठिकाणी विवेक नसतो, त्याला शास्त्राचे अन्तरंग कळत नाही.'

मू. – अधीत्य चतुरो वेदान्धर्मशास्त्राण्यनेकशः ।
परं तत्त्वं न जानाति दर्वी पाकरसानिव ।। सप. द ९

अ. – 'चारी वेदांचे अध्ययन, धर्म आदी अनेक शास्त्रांचा अभ्यास करूनही, जो अंतिम – श्रेष्ठ तत्त्व जाणत नाही, त्याची स्थिती स्वयंपाकातील पदार्थांची चव न जाणणाऱ्या पळीसारखी असते.'

व्य. – शास्त्र वाचणे, त्याचा शब्दार्थ लावणे, त्याची चर्चा करणे, या गोष्टी स्वयंपाकात वेगवेगळ्या पदार्थांतून पळी फिरविण्यासारखे आहे. स्वत:च्या ठिकाणी योग्य-अयोग्य ओळखण्याचा विवेक नसेल तर त्या शब्दांचे खरे मर्म कधीच हाती लागू शकत नाही. पदार्थांचा स्वाद, गोडी अनुभवणारा जसा वेगळाच असतो, तसा शास्त्रांचे मर्म जाणणारा मनुष्य केवळ शास्त्र श्रवण करणाऱ्यांहून वेगळा असतो. तत्त्व जाणण्याची बुद्धी जागृत नसेल तर त्याचे अध्ययन फुकटच होय.

१९८. द्रव्येण सर्वे वशाः

सं. – सुर. २. धनप्रशंसा १६. जगातल्या सर्व व्यवहारासाठी मुख्यत: धनाची गरज असते. जीवन सुरळीत चालावे यासाठी धनाचे महत्त्व नेहमी ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. सुभाषितकाराने संसाराचे चित्र काढून याकडे लक्ष वेधले आहे.

मू. – माता निन्दति नाभिनन्दति पिता भ्राता न संभाषते ।
भृत्यः कुप्यति नानुगच्छति सुतः कान्ताच नालिङ्गते ।।
अर्थप्रार्थनशङ्कया न कुरुते संभाषणं वै सुहृद् ।
तस्माद् द्रव्यमुपार्जयस्व सुमते द्रव्येण सर्वे वशाः ।।

अ. – 'आई नावे ठेवते, वडील तिरस्कार करतात, भाऊ बोलत नाही, नोकर रागावतात, मुलगा ऐकत नाही, पत्नी जवळ येत नाही; हा पैसा मागेल या भीतीने मित्रही संभाषण टाळतात; म्हणून शहाण्या माणसा, पैसे मिळव. धन जवळ असले की सर्वजण वश होतात.'

व्य. – व्यवहारातले सगळे संबंध नीट राहण्यासाठी, सर्व माणसे अनुकूल राहाण्यासाठी पैसा हेच मुख्य साधन आहे. याच अर्थाच्या ' यस्यास्ति वित्तं ... सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते ' या प्रसिद्ध सुभाषितातील सत्याचा प्रत्यय जगात वागताना प्रत्येकाला पावलोपावली येत असतो.

१९९. दाता भवति वा न वा

सं. – सुर. २. उदारप्रशंसा १. विद्यार्जन करून विद्वान होता येते. वक्तृत्व वा शौर्य ही जरी कला असली तरी प्रयत्नाने ते सारे साधता येते. फक्त दानत हीच गोष्ट अशी आहे की ती सांगून शिकवून येत नाही. हेच यातून सुचवावयाचे आहे.

मू. – **शतेषु जायते शूरः सहस्रेषु च पण्डितः ।**
वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ॥

अ. – ' शंभर माणसांत (एखादा तरी) शूर निर्माण होतो. हजारोंत एखादा विद्वान असतो. दहा हजारांत एखादा खरा वक्ता मिळतो. परंतु दाता होईलच (आढळेल) किंवा होणारही नाही. (एखादा तरी खरा दातृत्ववान निर्माण होईल की नाही शंकाच !) '

व्य. – दातृत्व अंगी उपजतच असावे लागते. पैसा हाती असो वा नसो जर देण्याची प्रवृत्ती असेल तर असेल तेवढ्या द्रव्यातूनही तो यथाशक्ती दान करीत असल्याचे व्यवहारात अनेकदा आढळते. संपत्तिमान असूनही तो दाता असेलच असे नाही. त्यासाठी तशी दानाची वृत्तीच असावी लागते. दानामागे असलेल्या त्याग भावनेची महती यात अध्याहृत आहे.

२००. दानेन पाणिर्न तु कङ्कणेन

सं. – सुर. २. परोपकारप्रशंसा १२. परोपकाराची सारेच प्रशंसा करतात. ज्याच्यावर उपकार केला जातो त्याला तर दुःखमुक्त झाल्याने आनंद वाटतोच पण उपकार करणाऱ्यालाही विलक्षण समाधान लाभते. दोघांनाही सुखद होणारा हा अनुभव सर्वांनाच प्रिय असल्यास नवल नाही.

मू. – **श्रोत्रं श्रुतेनैव न कुण्डलेन दानेन पाणिर्न तु कङ्कणेन ।**
विभाति कायः खलु सज्जनानां परोपकारेण न चन्दनेन ॥

अ. – ' कान बहुश्रुत होण्याने शोभून दिसतात; कर्णभूषणांनी नाही. हात दान करण्याने (दानाचे उदक सोडण्यात व्यग्र असलेले) शोभतात; सोन्याच्या कंकणाने नव्हे. (तसेच) सज्जनांचे देह दुसऱ्यावर उपकार करण्याने शोभतात; केवळ चंदनाच्या (उटचा) लावल्याने त्यांना शोभा येत नाही. '

राज्ञा. १ उविसं. ८

व्य. – बाह्य अलंकारांनी आपले शरीर सजविण्याची, देहाचे सौंदर्य वाढविण्याची राज्ञा. १ उविसं. ८

प्रत्येकाची धडपड असते. वस्तुतः आंतरिक पावित्र्याने माणसाचे सौंदर्य वृद्धिंगत होत असते, आनंददायी होत असते. कारण सौंदर्यसंपन्न दिसण्याचा मूळ हेतू आपल्याकडे पाहणाऱ्याला सुख व्हावे, आनंद वाटावा हाच आहे. म्हणूनच बाह्य सौंदर्यवर्धक साधनांचा फोलपणा सांगून आंतरिक सौंदर्यावर येथे भर दिला आहे.

२०१. दारिद्र्यमेकं गुणराशिनाशि

सं. – सुर. २. दरिद्रनिंदा ४३. कालिदासाने कुमारसंभवात हिमालयाचे वर्णन करताना त्याच्या बर्फाच्या साठ्यामुळे हिमालयाचे सौंदर्य कमी होत नाही, कारण अनेक रत्नांचे आगर असलेल्या या नगाधिराजाचा हा एकमेव दोष झाकला जातो असे म्हटले आहे. त्याला उद्देशून दारिद्र्याने गांजलेल्या कवीने दारिद्र्याचे अनर्थकारी सामर्थ्य येथे स्पष्ट केले आहे. (परिशिष्ट पाहा)

मू. – एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोरिति यो बभाषे ।
नूनं न दृष्टं कविनापि तेन दारिद्र्यमेकं गुणराशिनाशि ।।

अ. – ' पुष्कळ गुणांच्या समुच्चयात (बहुगुणी व्यक्तीचा) एखादाच दोष चंद्राच्या असंख्य किरणांत लोपल्या (झाकल्या) जाणाऱ्या त्याच्या कलङ्काप्रमाणे झाकला जातो, असे ज्या (कालिदासाने हिमालयाचे वर्णन करताना कुमारसंभवात (१.३) म्हटले आहे,) त्या कवीने हे जे प्रतिपादन केले त्याला अनेक गुणांचा नाश करणारे एक दारिद्र्यच दिसले नाही असे वाटते. (नाहीतर त्याने असे विधान केले नसते.)

व्य. – दारिद्र्य हे सर्वतोपरी दुःखद, दुःसह असते. केवळ गरजेच्या वस्तूंचा अभाव एवढेच दारिद्र्यात दुःख नसून मानहानी, गुणांची परवड हेच मोठे तापदायक होते. कारण केवळ दारिद्र्यामुळे गुणांना योग्य तो वाव मिळत नसल्याची अनेक उदाहरणे अनुभवास मिळतात.

२०२. दारिद्र्यान्मरणाद्वापि

सं. – हित. १.१२८. हिरण्यक नावाच्या उंदराला त्याच्या मित्राने वनात जाऊन राहाण्याचे कारण विचारले. हिरण्यकाने साठविलेले धन चोरीला गेल्यामुळे त्याला दारिद्र्य आले होते. मित्राच्या प्रश्नाला उत्तर देताना त्याने दारिद्र्याच्या दुःखाचे वर्णन केले आहे.

मृच्छ १.११. दान हा स्वभावधर्म बनलेल्या चारुदत्ताला दानाने आलेल्या दारिद्र्यातही खेद होतो तो द्रव्य गेल्याचा नाही तर आता दान करता येणार नाही म्हणून. याचकाला विन्मुख पाठविण्यापेक्षा मरणाशी जवळीक साधणे चारुदत्ताला श्रेयस्कर वाटते.

मू. –' दारिद्र्यान्मरणाद्वापि दारिद्र्यमवरं स्मृतम् ।
अल्पक्लेशेन मरणं दारिद्र्यमतिदुःसहम् ।। हित. १.१२८.

अ. – ' दारिद्र्य आणि मरण, दोन्हीत दारिद्र्य हीन सांगितले आहे. मरणात क्लेश थोडे आहेत तर दारिद्र्याचे दुःख खरोखरी असह्य आहे.'

मू.– दारिद्र्यात् मरणात् वा मरणं मे रोचते न दारिद्र्यम् ।
अल्पक्लेशं मरणं दारिद्र्यमनन्तकं दुःखम् ।। मृच्छ. १.११.

अ. – 'दारिद्र्य आणि मरण या दोन्हीत (दरिद्री राहण्यापेक्षा) मरणेच मला अधिक आवडेल; दारिद्र्य नाही. (कारण) मृत्यूने होणाऱ्या यातना (दारिद्र्यात जिवंत राहण्यापेक्षा) कमी आहेत. दारिद्र्यात मात्र दुःखाचा शेवट नसतो. (किंबहुना ज्या दुःखाचा कधीच शेवट होत नाही तेच दारिद्र्य होय.) '

व्य. – मरण एकदाच येते पण दारिद्र्य पुनःपुन्हा मरणप्राय दुःख देते. निकडीच्या वस्तूंचा अभाव, अपमान, कुटुंबियांचे हाल, अशा अनेक रूपांनी दारिद्र्य जीवंतपणीच अनेक मरणे सोसायला लावते. ' दारिद्र्यापेक्षा मरण बरे ' असे वैतागाने काढलेले उद्गार दरिद्री माणसाच्या दुःखाची कल्पना देतात.

२०३. द्वा सुपर्णा सयुजा सखाया

सं. – मुंडक. ३. १. नित्य-शुद्ध-बुद्ध-मुक्त सर्वव्यापी आत्माचे स्वरूपलक्षण शब्दांनी सांगितले तरी त्याविषयी मनाचा निश्चय होणे अतिशय कठीण असते. त्यासाठी अनेक उपाय योजावे लागतात. येथे पक्ष्यांच्या रूपकाच्या द्वारे, उपनिषदकारांनी आत्मचिंतनाची दिशा दाखविली आहे.

मू. – द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति ।।

अ. – ' नेहमी एकत्र राहाणारे, ज्यांच्या अभिव्यक्तीचे कारण समान आहे असे दोन पक्षी, एका वृक्षाच्या आश्रयाने राहातात. त्या दोघांपैकी एक गोड फळ खातो आणि दुसरा स्वतः फळ न खाताच केवळ पाहातो. '

व्य. – वेदान्तशास्त्रातील हे एक प्रसिद्ध रूपक आहे. शरीर हाच जणू एक वृक्ष आहे. या वृक्षावर नित्य एकत्र राहाणारे दोन पक्षी–एक जीव व दुसरा नित्य-शुद्धमुक्तस्वभाव आत्मा. सुखदुःखांचे अनुभव ही शरीरवृक्षावरील फळे होत. ती कर्मामुळे उत्पन्न होतात. जीव सुखदुःखरूपी फळे खातो, पण शरीररूपी वृक्षाचा आश्रय करणारा शुद्ध आत्मा सर्व अनुभवांचा केवळ साक्षी असतो. हेच परमात्म्याचे निर्लेप, सुखदुःखातीत ज्ञानस्वरूप होय.

२०४. दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा

(पाहा : शाकाय वा स्यात् लवणाय)

सं. – कवी जगन्नाथ पंडिताला एका दाक्षिणात्य राजाने आपल्या राजसभेत राजकवी म्हणून आश्रयाला येण्याचे पाचारण केले. तेव्हा त्याच्याविषयी तुच्छतादर्शक उद्गार जगन्नाथ पंडिताच्या तोंडून निघाले ते हे, असे म्हटले जाते. पण याला प्रत्यक्ष आधार मिळत नाही.

मू. – दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा मनोरथान् पूरयितुं समर्थः ।

अन्यैर्नृपालैः परिदीयमानं शाकाय वा स्यात् लवणाय वा स्यात् ।।

अ. – ‘ (पंडित जगन्नाथ कवी म्हणतो) माझ्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यास एक तर दिल्लीपती (दिल्लीचा तत्कालीन मोगल बादशाहा) समर्थ आहे किंवा (प्रत्यक्ष) परमेश्वरातच ते सामर्थ्य आहे. इतर राजांनी दिलेले (द्रव्य) मला भाजीला होईल किंवा मिठालाच होईल. (भाजी वा मीठच त्यातून आणता येईल). (इतर खर्च त्यांना झेपणारच नाही).’

व्य. – जगन्नाथ पंडिताच्या काळात दिल्लीच्या मोगल बादशाहीच्या प्रभुत्वाचा पगडा हिंदुस्थानावर किती विपरीत व विलक्षण होता हे ही उक्ती स्पष्ट करते. हिंदूंच्या पारंपारिक दुबळ्या दास्यवृत्तीचा हा हीन नमुना आहे. कविराज भूषणाच्या निःस्पृह वृत्तीच्या संदर्भात जगन्नाथ पंडिताची ही परकीय आक्रमकाच्या अधिसत्तेवर लुब्ध होणारी वृत्ती विशेष चिंतनीय वाटेल. परमेश्वरासारखे कर्तुमकर्तुं अन्यथा कर्तुम् सामर्थ्य या इस्लामी सत्ताधाऱ्यांच्या ठिकाणीच असणार, हिंदू राजांच्या ठिकाणी ते संभवतच नाही, अशी दास्यवृत्तीची, दुबळी भावना जगन्नाथ पंडिताने यातून व्यक्त केली आहे. इतिहासात याची री अनेकांनी ओढली आहे. मात्र ही उक्ती खरोखरी जगन्नाथ पंडितांची असल्याचा मात्र सबळ पुरावा नाही.

२०५. दिव्या गीर्वाणभारती

सं. – सुर. २. सुभाषितप्रशंसा १. मनातील विचार व भावना कमीत कमी पण अचूक शब्दात व्यक्तविण्याचे सामर्थ्य संस्कृत सुभाषितात असते. त्यामुळेच ही सुभाषिते प्रत्येकजण येता जाता उपयोजित असतो. या विशेष गुणधर्मानेच ती लोकप्रिय व प्रशंसनीय ठरली. त्या अर्थानेच हा श्लोक रूढ झालेला आहे.

मू. – भाषासु मुख्या मधुरा दिव्या गीर्वाणभारती ।

तस्माद्धि काव्यं मधुरं तस्मादपि सुभाषितम् ।।

अ. – ‘सर्व भाषांत प्रधान (असून) माधुर्यमयी व अलौकिक अशी ही देववाणी आहे. त्यातील काव्य अधिक मधुर आहे तर सुभाषित हे त्याहूनही रसमय आहे.’

व्य. – संस्कृत भाषा ही सर्व भाषांची जननी आहे. त्यामुळेच संस्कृतमध्ये एकाच अर्थाचे अनेक शब्द आढळतात. अत्यंत संपन्न व माधुर्यव्यञ्जक अशी ही भाषा असल्याने तिच्या अनुपम सौष्ठवाने तिला देववाणी म्हणतात. एखादा विदग्ध रसिक ज्या

वेळी संस्कृतच्या शब्दसौंदर्याने मोहित होतो त्या वेळी साहजिकच संस्कृतच्या प्रशंसेचे हे उद्‌गार त्याच्या तोंडून बाहेर पडतात.

२०६. दीर्घसूत्री विनश्यति

सं. – महा. १२.१३५ प्रवि. ३.३०७. आपद्धर्मपर्वात भीष्मांनी युधिष्ठिराला केलेल्या उपदेशात यशापयशाचे मर्म थोडक्यात सांगितले आहे.

मू. – अनागतविधाता च प्रत्युत्पन्नमतिश्च यः ।
द्वावेव सुखमेधेते दीर्घसूत्री विनश्यति ॥

अ. – 'भावी कालात होणाऱ्या घटनांची व्यवस्था करून ठेवणारा व प्रसंगावधानी अशा दोन प्रकारच्या माणसांना सुख प्राप्त होते. दिरंगाईमुळे मनुष्याचा नाश होतो.'

व्य. – एखादे काम वेळेवर उरकले गेले नाही, रेंगाळत राहिले म्हणजे साहजिक त्यातला उत्साह नष्ट होतो, त्यातले साहाय्यक घटकही विखरून जातात व कार्याचा नाश होतो. हाती घेतलेले काम झपाट्याने न उरकता दिरंगाई करणारा मनुष्य पाहिला की, त्या कामाचा शेवट काय होणार हे या शब्दविशेषाच्या उच्चाराने कोणीही सहज सांगतो.

२०७. दुर्जनं प्रथमं वन्दे

सं. – सुर. २. दुर्जननिंदा ३४. दुर्जनांची सहसा कोणीच प्रशंसा करीत नाही. त्यांना वंदन केले जाते ते केवळ भयानेच. म्हणूनच दुर्जननिंदा या प्रकरणातच दुर्जनवंदनाची महती सांगितली आहे.

मू. – दुर्जनं प्रथमं वन्दे सज्जनं तदनन्तरम् ।
मुखप्रक्षालनात्पूर्वं गुदप्रक्षालनं यथा ॥

अ. – 'दुर्जनाला (नेहमी) प्रथम वन्दन करावे. सज्जनाला त्यानंतर केले तरी चालते. (साधुत्व हा त्याचा स्थायी भाव असल्याने तो राग मानत नाही). जसे तोंड धुण्यापूर्वी प्रातर्विधी उरकला जातो.'

व्य. – दुर्जन किंवा दुष्ट हा जात्याच विघ्नसंतोषी असल्याने कोणत्याही कार्याचा विनाश करण्यास तो मागेपुढे पाहात नाही. याकरिताच त्याला संतुष्ट राखून आपले काम साधून घेण्यातच शहाणपणा मानला आहे.

२०८. दूरस्थाः पर्वता रम्या

(पाहा: युद्धस्य वार्ता रम्या)

सं. – सुर. ३. सामान्यनीती २१८. काही वस्तूंचा संबंध लांबूनच असलेला बरा; त्यांच्या फार जवळ जाण्याने अपेक्षाभंगाचे दुःख, पदरी येते – असा इषारा सुभाषितकाराने येथे दिला आहे.

मू. – दूरस्थाः पर्वता रम्या वेश्या च मुखमण्डनें ।
युध्दस्य वार्ता रम्या च त्रीणि रम्याणि दूरतः ।

अ. – ' पर्वत लांबून सुंदर दिसतात, रंगविल्यानंतर वेश्येचा चेहेरा सुंदर दिसतो, युद्धाची हकीकत ऐकण्यास मौज वाटते; या तीनही गोष्टी दूरच्या अंतरावरूनच रमणीय असतात. '

व्य. – ' दुरून डोंगर साजरे ' ही प्रसिद्ध मराठी उक्ती वरील संस्कृत सुभाषितावरून प्रचलित झाली आहे. पर्वत लांबून हिरवेगार दिसतात, चढायलाही सोपे दिसतात; पण जवळ गेले म्हणजे खडक–अवघड चढण प्रत्यक्ष कळते. युद्धात प्रत्यक्ष भाग घेणे, युद्धभूमीच्या जवळ जाणे, धोक्याचे; जीवाशीच खेळ. लांबूनच, घरात बसून युद्धाच्या रोमहर्षक वार्ता ऐकण्यात किंवा वाचण्यात आनंद वाटतो. काही गोष्टी जवळ जाऊन अनुभवायच्या असतात तर काही लांबून नुसत्या पाहायच्या. काही माणसे ही दुरूनच ठीक दिसतात. त्यांच्या जवळ गेले म्हणजे अपेक्षाभंग होतो आणि पश्चात्ताप करण्याची पाळी येते. लांबून सुंदर दिसणाऱ्या गोष्टींची सुभाषितकारांनी चतुराईने गणना केली आहे.

२०९. देवा विश्वस्य भुवनस्य गोपाः

सं – ऋग्. २. २७. ४. अदितीचे पुत्र जे देव यांना उद्देशून गृत्समद ऋषींनी त्रिष्टुप छंदात केलेल्या स्तोत्रातील देवांच्या विश्वरक्षणाच्या कार्याचे वर्णन करणारी ही ऋचा आहे.

मू. – धारयन्त आदित्यासो जगत् स्था देवा विश्वस्य भुवनस्य गोपाः ।
दीर्घाधियो रक्षमाणा असुर्यमृतावानश्चयमाना ऋणानि ॥

अ. – ' हे अत्यन्त दीप्तिमान आदित्य सर्व स्थिरचराला धारण करून सर्व भुवनांचे पालन करीत असतात. ह्यांची बुद्धी अपार आहे. दैवी सामर्थ्याचेही रक्षण करणारे सत्यधर्मस्वरूप असे ते आदित्य भक्तांचे सर्व ऋण फेडून टाकतात. '

व्य. – स्थिरचराला व्यापून राहिलेली व सर्व सृष्टिचक्र नियमितपणे चालविणारी अशी जी दिव्य शक्ती आहे तिचे रूप मुख्यतः सूर्याच्या ठिकाणी दिसून येते. विश्वाची उत्पती-स्थिती-लय करणाऱ्या या शक्तीची जाणीव आर्यांना होती व ते तिला आवाहन करून आपल्या रक्षणाची, कल्याणाची प्रार्थना करीत हे वैदिक ऋचांवरून स्पष्ट होते.

२१०. देवो दुर्बलघातकः

सं. – सुर. ३. सामान्यनीती १३६. यज्ञयागात किंवा देवतातृप्तीसाठी बळी द्यावयाचा तो कोणी हत्ती-वाघासारख्या बलाढ्य प्राण्यांचा देत नाही; तर निरुपद्रवी

परंतु दुर्बल अशा बोकडाचाच दिला जातो. हे सत्य सुभाषितकाराने येथे विदारकपणे सांगितले आहे.

मू. – अश्वं नैव गजं नैव व्याघ्रं नैव च नैव च ।
अजापुत्रं बलिं दद्यात् देवो दुर्बलघातकः ।।

अ. – '(यज्ञामध्ये) घोडा नाही, हत्ती नाही, वाघ तर नाहीच नाही, पण बकरा बळी द्यावा (असा विधी आहे). खरोखर देव दुबळ्याचाच घात करतो.'

व्य. – दुबळेपणा हा व्यक्तिगत आणि सामाजिक दृष्ट्याही संकटाला व आत्मनाशाला निमंत्रण देणारा ठरतो, या सार्वत्रिक अनुभवाचा आविष्कार या उद्‌गारांतून प्रकट होत असतो. वास्तविक देवाकडून अपेक्षा दुबळ्याच्या रक्षणाची; परंतु येथे तर त्याच्याचसाठी या दुबळ्याचा बळी जातो. म्हणून दुबळेपणाची निर्भर्त्सना करणारे हे वचन त्याच अर्थाने उपयोगात आणले जाते. व्यवहारात 'देवो' ऐवजी 'दैवो' असा शब्द कित्येकदा वापरला जातो.

२११. देवो न जानाति कुतो मनुष्यः

(पाहा : स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यम्)

सं – भोज. १४३. राजा भोजाकडे होत असलेला कालिदासाचा विशेष मानसन्मान सहन न होऊन एकदा इतर कवींनी कुटिल कारस्थान रचले. अंतःपुरातील एका दासीला हारादी अलंकार देवून तिला वश करून राजा अर्धवट जागा असताना 'कालिदास दासीरूपाने राणी लीलावतीजवळ राहातो' असे बडबडायला सांगितले. त्याप्रमाणे ती बोलताच राजाला कालिदासाप्रमाणेच राणीचाही संशय आला. तोच त्याने या श्लोकात व्यक्त केला.

सुर. ३. सामान्यनीती ८२९. सर्वसामान्य व्यवहारात येणारे अनुभव आणि त्यांना अनुसरून रूढ झालेल्या शब्दसंहती या सामान्यनीतीत संग्रहीत केल्या आहेत.

मू. – अश्वप्लुतं वासवगर्जितं च स्त्रीणां च चित्तं पुरुषस्य भाग्यम् ।
अवर्षणं चाप्यतिवर्षणं च देवो न जानाति कुतो मनुष्यः ।। भोज. १४३.

अ. – 'घोडा उडी कशी मारील? मेघगर्जना केव्हा होईल? कोणत्या काळी पाऊस न पडल्याने (दुष्काळ) पडेल तर केव्हा अतिवृष्टी (फार पाऊस) होईल? (तसेच) स्त्रीचे चारित्र्य आणि पुरुषाचे भाग्य केव्हा उदयास येईल? हे देवालाही सांगता येत नाही तर माणसाला काय समजणार!'

मू. – भूपस्य§ चित्तं कृपणस्य वित्तं मनोरथं दुर्जनमानुषाणाम् ।
स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः ।।

सुर. ३. सामान्य ८२९.

§ **राष्ट्रस्य** : पाठभेद

अ.– ' राजाचे मन (राजाचे मत तेच राष्ट्राचे मत मानले जात असल्याने हा पाठभेद स्वीकारला आहे), कंजुषाचे द्रव्य आणि दुष्ट माणसाच्या आकांक्षा, त्याचप्रमाणे स्त्रीचे चारित्र्य व पुरुषाचा भाग्योदय याबद्दल देवालाही सांगता येत नाही तर माणूस त्यासंबंधी काय सांगणार ! '

व्य. – काही काही वेळा सत्य हे कल्पनेपेक्षाही अद्‌भुत असते. ज्याची कल्पनाही करता येणार नाही अशा घटना अनुभवल्या म्हणजे साहजिकच माणसाला त्याच्या ज्ञानाच्या मर्यादा जाणवतात आणि सर्वव्यापी ईश्वरालाच ते समजेल असा विश्वास 'देव जाणे'सारख्या शब्दांतून प्रगट होतो. परंतु एखाद्या वेळेला मात्र अगदी अतर्क्य गोष्टी प्रत्यक्षात आलेल्या पाहून देवाला तरी हे समजेल की नाही अशी शंका प्रदर्शित केली जाते. स्त्रीचे चारित्र्य ही सुभाषितकाराच्या दृष्टीने अशीच गोष्ट आहे की, ज्याविषयी कोणीच भरवसा देवू शकत नाही; स्त्रीचे चारित्र्य हे नेहमीच शंकनीय ठरले आहे. अर्थात याबद्दल स्त्रियांना राग आहे; परंतु योग्यता ठरविताना स्त्रीच्या चारित्र्याची चिकित्सा केली जाते तर पुरुषाचे कर्तृत्व जोखले जाते, हे खरे. समाजाने स्त्रीकडून कर्तृत्वाची अपेक्षा ठेवली नाही; तिला देवता मानल्याने तिच्या पावित्र्याची, शुद्धतेची त्याला अपेक्षा आहे. याउलट पुरुषाचे कर्तृत्व, धडाडी राष्ट्राच्या उन्नतीला आवश्यक आहे. मात्र याचा अर्थ असा नव्हे की, पुरुष चारित्र्यसंपन्न नसला तरी चालेल. तो चारित्र्यसंपन्न असेल तर त्याचे श्रेष्ठत्व अवश्य वाढेल. पण कर्तृत्ववान माणसाच्या चारित्र्याची चर्चा कोणी फारशी करीत नाही. हा तात्त्विक भाग बाजूला ठेवला तरी एखादा सामान्य माणूस जेव्हा अकस्मात वैभवाच्या शिखरावर जाऊन पोचलेला दिसतो अथवा ज्या स्त्रीच्या जीवनाबद्दल समाजाच्या काही विशिष्ट अपेक्षा असतात पण त्या आकस्मिकपणे भंग पावून स्त्रीचे वेगळेच ' चारित्र्य ' समाजासमोर येते तेव्हा वरील उक्ती सार्थ होते.

२१२. दैवं चैवात्र पंचमम्

सं. – भगी. १८.१४. सर्व कर्मे घडून येण्यास सांख्यांनी जी पाच कारणे सांगितली, तीच येथे वर्णिली आहेत.

मू. – **अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ।**
विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ।।

अ. – ' अधिष्ठान (आधारस्थान), कर्ता, निरनिराळी साधने आणि (कर्त्याच्या) पृथक् पृथक् चेष्टा म्हणजे क्रिया – उद्योग – प्रयत्न व पाचवे दैव (कर्मे घडण्यास कारण) होय. '

व्य. – शरिराने, वाचेने किंवा मनाने मनुष्य जे जे कर्म करतो त्याला ही पाच कारणे कारणीभूत होतात. असाच श्लोक नारायणीय धर्मात (महा. १२. ३४७.

८७) आला आहे. मी करतो असा अहंकार असू नये, हा विचार कर्माचे फळ घडण्यास मनुष्य हा एकटाच कारण नाही असे सांगून, दृढ केला आहे.

२१३. दैवं पुरुषकारेण

सं. – वारा. २.२३.१७. कसलाही अपराध नसताना रामाला वनवासी करणाऱ्या दशरथाचा लक्ष्मणाला अत्यंत राग आला. पित्याचा वध करायलाही तो तयार झाला. रामाने समजूत घातली तरी लक्ष्मणाचा संताप शमला नाही. रामासारख्या वीराने दैवाला महत्त्व देऊ नये असे त्याने स्पष्टपणे सांगितले.

मू. – दैवं पुरुषकारेण यः समर्थः प्रबाधितुम् ।
न दैवेन विपन्नार्थः पुरुषः सोऽवसीदति ।।

अ. – ' स्वपराक्रमाने जो दैवावर मात करण्यास समर्थ असतो असा पुरुष दैवामुळे विपन्नावस्था आली तरी खचत नाही (निराश होत नाही)'.

व्य. – स्वतःच्या पौरुषावर विश्वास असणारे पराक्रमी पुरुष दैवाची चिंता करीत बसत नाहीत. तो त्यांचा स्वभावच नसतो. पौरुषाच्या बळावर इच्छित गोष्ट प्राप्त करून घेण्याची त्यांची हिंमत शब्दाशब्दांतून व्यक्त होते. ही हिंमत ' मदायत्तं तु पौरुषं ' या सारख्या चिरंतन उक्तीने अजरामर झाली आहे. लक्ष्मण रामाला तिचेच स्मरण करून देत आहे, पुरुषार्थाची जाणीव करून देत आहे.

२१४. दैवायत्तं कुले जन्म

(पाहा : मदायत्तं तु पौरुषम्)

सं. – वेसं ३. ३७. द्रोणवधाने शोकसंतप्त झालेला अश्वत्थामा पांडवांचा सूड घेण्याच्या हेतूने सेनापतीपदासाठी दुर्योधनाजवळ इच्छा व्यक्त करीत असताना कर्णाला ते सहन होत नाही. अश्वत्थामा – कर्ण कलहात अश्वत्थाम्याने कर्णाच्या जातीचा उल्लेख करताच कर्णाने दिलेले उत्तर शूराला साजेसेच आहे.

मू.– सूतो वा सूतपुत्रो वा यो वा को वा भवाम्यहम् ।
दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ।।

अ. – ' मी सारथी असेन वा सारथीपुत्र असेन. जो कोणी (कोणत्याही कुलातील) मी असेन तो असू दे. (उच्च) कुलात जन्म होणे हे दैवाधीन असते; परंतु माझ्या हाती पराक्रम (गाजविणे) अवश्य आहे. '

व्य. – व्यक्तीचे महत्त्व हे कुलावरून ठरत नसते. किंबहुना महान व्यक्तींमुळे कुलाला प्रतिष्ठा प्राप्त होते. म्हणूनच कुलाच्या श्रेष्ठ – कनिष्ठत्वाचा विचार न करता गुणांवरूनच माणसाची पारख केली जाते. याच अभिप्रायाने ही कर्णोक्ती लोकव्यवहारात प्रचलित आहे.

२१५. दोग्ध्री धेनुर्वोढा

(पाहा : निकामे निकामे नः पर्जन्यः)

सं. – यजु. २२. २२. यज्ञामध्ये राष्ट्रातील सर्व प्रजेच्या कल्याणासाठी केली जाणारी ही प्रार्थना आहे.

मू. – **आ ब्रह्मन् ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायताम् ।**
आ राष्ट्रे राजन्युः शूर इषव्योऽतिव्याधी महारथो जायताम् ।
दोग्ध्री धेनुर्वोढानड्वानाशुः सप्तिः पुरन्धिर्योषा जिष्णू रथेष्ठा ।
सभेयो युवास्य यजमानस्य वीरो जायताम् ।
निकामे निकामे नः पर्जन्यो वर्षतु फलवत्यो न ओषधयः पच्यन्तां
योगक्षेमो नः कल्पताम् ।।

अ. – ' राष्ट्रात जितके ब्राह्मण आहेत तितके सर्व ब्रह्मतेजाने युक्त होवोत; सर्व क्षत्रिय पराक्रमी, उत्कृष्ट धनुर्धर, रोगरहित व महारथी–योद्धे होवोत; सर्व गायी भरपूर दूध देणाऱ्या, बैल भार वाहण्यास समर्थ, घोडे वेगाने धावणारे असोत; स्त्रिया शोभणाऱ्या, रथी विजयशाली होवोत; तरुण सभा जिंकणारे असोत, यजमानाला वीरपुत्र होवोत. योग्य काली पाऊस पडो; वनस्पती (शेती–बागा) वाढोत व त्यांना विपुल फळे येवोत; व आमची उपजीविका सुलभतेने चालो. '

व्य.– प्राचीन काली होणारे यज्ञ केवळ वैयक्तिक उत्कर्षासाठी, स्वर्गप्राप्तीसाठी नसत. अनेक प्रकारची सामग्री, विविध व्यवसाय करणारे समाजातील घटक, या सर्वांना यज्ञसंस्थेत स्थान असे. अश्वमेध यज्ञाच्या संदर्भात, ब्राह्मण ग्रंथांत, सुमारे ऐंशी प्रकारचे वेगवेगळे उद्योग करणाऱ्या व्यावसायिकांचा उल्लेख आहे. त्या कालातील समाजाच्या सर्व थरांचा यज्ञाशी संबंध येई. सर्वांच्या सहकार्याने चालणारे एक सामुदायिक कार्य असे त्याचे स्वरूप होते. अर्थात् त्यात, केवळ यजमानाच्या स्वर्गसुखासाठी प्रार्थना केली जात नसे तर सर्व राष्ट्राची समृद्धी, कल्याण यांच्यासाठी प्रार्थना करीत असत. सर्व महत्त्वाच्या धार्मिक समारंभांच्या वेळी ही वैदिक प्रार्थना म्हटली जाते. राष्ट्रीय प्रार्थनेचे स्थान तिला प्राप्त झाले आहे.

२१६. दृष्टा देवी

सं. – वारा. ५.६४.४३. लंकेत सीतेचा शोध लावून ती कुशल असल्याची वार्ता घेऊन हनुमान रामाच्या भेटीस आला, तेव्हा त्याने जे पहिले शब्द उचारले ते असे :

मू. – **दृष्टा देवीति हनुमद्वदनादमृतोपमम् ।**
आकर्ण्य वचनं रामो हर्षमाप सलक्ष्मणः ।।

अ. – ' (मी) 'सीतादेवीला पाहिले' असे अमृतासारखे शब्द हनुमंताच्या तोंडून ऐकताक्षणी राम व लक्ष्मण यांना हर्ष झाला.'

व्य. – प्रियजनांसाठी चिंतेत पडलेल्या माणसाला कुशलवार्ता ऐकताना जी स्वाभाविक उत्सुकता असते व तेवढा एक शब्द ऐकल्यावरोवर जो आनंद होतो त्याचे यथातथ्य वर्णन वाल्मीकींनी येथे मोठ्या मार्मिकपणाने केले आहे.

(ध)

२१७. धनानि भूमौ

सं. – सुर. २. दैवाख्यानम् ५५. मरण आले म्हणजे ही भूमी सोडून जाताना आपण काहीच बरोबर नेऊ शकत नाही. आपण केलेले कर्म फक्त सूक्ष्म संस्कारांच्या रूपाने जीवाबरोबरच जाते. आपल्या शास्त्रकारांनी मान्य केलेली ही भूमिका आहे.

सू. – धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे भार्या गृहद्वारि जनः श्मशाने ।

देहश्चितायां परलोकमार्गे कर्मानुगो गच्छति जीव एकः ॥

अ. – ' (पुरून ठेवलेला) पैसा जमिनीतच असतो (राहतो). पाळलेली गुरे गोठ्यात, पत्नी घराच्या दारात, नातेवाईक स्मशानात (स्मशानापर्यंत), शरीर चितेवर राहाते; परलोकाच्या रस्त्यावर जीव एकटाच केलेल्या कर्माच्या पाठोपाठ जातो.'

व्य. – जन्मभर कष्टाने जमविलेली संपत्ती, जोडलेले स्नेहसंबंध, कितीही प्रिय असले तरी, शेवटी मरताना सर्व येथेच सोडून द्यावे लागतात. सर्वांत जवळचा आपला देहही पृथ्वीवरच पडतो– हे कठोर सत्य मनुष्य वारंवार विसरत असतो व सगळ्या गोष्टींचा हव्यास करून दुःखात पडतो. येथे सुभाषितकाराने माणसाच्या मरणकाळचे चित्र मोजक्या शब्दांत काढून सत्याची जाणीव करून दिली आहे.

२१८. धन्यो गृहस्थाश्रमः

सं. – सुर. २. गृहस्थाश्रमप्रशंसा ४. विवाह करून संसार थाटणाऱ्या नवपरिणीत वधूवरांना 'गृहस्थाश्रम कसा असावा' याचे या सुभाषितातील वर्णन मार्गदर्शक ठरणारे आहे.

सू. – सानन्दं सदनं सुताश्च सुधियः कान्ता न दुर्भाषिणी

सन्मित्रं सुधनं स्वयोषिति रतिश्चाज्ञापराः सेवकाः ।

आतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपानं गृहे

साधोः सङ्गमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥

अ. – ' आनंदाने ओसंडणारे घर, बुद्धिमान मुले, उलट उत्तरे न देणारी पत्नी, प्रेमळ स्नेही, स्वतःच्या पत्नीवर एकनिष्ठ प्रेम, आज्ञापालन करणारे नोकर, पाहुण्यांचे

स्वागत, शिवाची नित्य उपासना, घरात नेहमी पक्वान्नांचे भोजन, सत्संग या सर्व गोष्टींनी युक्त असलेला गृहस्थाश्रम सदैव गौरवास्पद आहे.'

व्य. – ब्रह्मचर्य, वानप्रस्थ व संन्यास हे तीनही आश्रम गृहस्थाश्रमावर अवलंबून आहेत. म्हणून धर्म व समाजशास्त्रकारांनी गृहस्थाश्रमाला मोठे महत्त्व दिले आहे. गृहस्थाश्रमातील कर्तव्यांचे सविस्तर येथे विवेचन केलेले आहे. गृहस्थाश्रमाचे आदर्श चित्र या सुभाषितात रेखाटले आहे. भारतीय कुटुंबसंस्थेचा हा आदर्श सतत डोळ्यापुढे ठेवण्यासारखा आहे.

२१९. धर्मसारमिदं जगत्

सं. – वारा. ३.९.३०. वनवासात असताना राक्षसांची हिंसा करण्यात रामाकडून अधर्म होईल की काय या भीतीने सीतेने रामाला धर्माचे स्मरण करून दिले.

मू. – धर्मादर्थः प्रभवति धर्मात्प्रभवते सुखम् ।
धर्मेण लभते सर्वं धर्मसारमिदं जगत् ।।

अ. – 'धर्मापासून संपत्ती प्राप्त होते, धर्मापासून सुखाचा लाभ होतो. धर्माचरणामुळेच सर्व काही प्राप्त होते. धर्म हेच या जगात सारभूत म्हणून ग्रहण करण्याजोगे तत्त्व आहे.'

व्य. – स्वकर्तव्यरूप धर्माचे पालन करणे हे सर्व प्रकारच्या सुखप्राप्तीला कारण आहे. मोक्षाचे ते द्वार आहे. म्हणून दक्षतेने व नेटाने धर्माचरण करणे आवश्यक आहे. 'धर्मादर्थश्च कामश्च' हे व्यासवचन सुप्रसिद्ध आहे.

२२०. धर्मश्च जानाति नरस्य वृत्तम्

सं. – महा. १. ६८.२९. कण्वाश्रमातील प्रतिज्ञेचे स्मरण देवूनही दुष्यन्ताला काही आठवले नाही. त्यामुळे शकुंतलेशी आपला काहीच संबंध नाही असे त्याने म्हणताच शकुंतलेला संताप आला. तरीही शांत राहून दुष्यन्ताच्या प्रतिज्ञेचे साक्षीदार कोण होते ते पुढील श्लोकात ती सांगते.

मू. – आदित्यचन्द्रावनिलानलौ च द्यौर्भूमिरापो हृदयं यमश्च ।
अहश्च रात्रिश्च उभे च संध्ये धर्मश्च जानाति नरस्य वृत्तम् ।।

अ. – 'सूर्य, चंद्र, वायु, अग्नि, स्वर्ग, पृथ्वी, जल, स्वतःचे अंतःकरण, यम आणि दिवस-रात्र व सकाळ-संध्याकाळचा संधिकाल आणि धर्म या साऱ्यांना मानवाचे (बरे-वाईट जे घडेल ते) कृत्य समजत असते.'

व्य. – मनुष्य इतरांना फसवू शकेल, पण स्वतःला–स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला फसवू शकत नाही. त्याचे स्वतःचे अंतःकरण, तसेच सर्व सृष्टी त्याच्या कर्माची साक्षी असते. धर्म हेही एक सर्व ठिकाणी, सर्व काळी उपस्थित असणारे साक्षीभूत

तत्त्व आहे. पुण्य आणि पाप - त्याचे फल हे धर्माचे स्वरूप आहे. पाप करताना आपल्याला कोणी पाहात नाही, शिक्षा होण्याची शक्यता नाही एवढाच विचार करून कोणी जगाला फसवू पाहील तर त्याला त्याच्या कर्माचे फळ द्यायला धर्माच्या रूपाने ईश्वरी शक्ती जागृत आहे, असा इशारा या उक्तिविशेषाच्या उच्चाराने दिला जातो.

२२१. धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां

(पाहा : महाजनो येन गतः स पन्थाः
नैको ऋषिर्यस्य वचः प्रमाणम् ।)

सं. – महा. ३. प्रवि. ३२.६८. ज्ञानी धर्माला यक्षाने 'श्रेष्ठ मार्ग कोणता ?' असा प्रश्न विचारला. तसेच या प्रश्नाचे उत्तर दिल्यास मृत भ्राते जिवंत होतील असा वरही दिला. यक्षाला उत्तम मार्ग सांगताना युधिष्ठिराने 'श्रेष्ठ सत्पुरुषांनी आचरलेला पंथच अनुसरणीय आहे' असे म्हटले. (परिशिष्ट पाहा)

मू. – **तर्कोऽप्रतिष्ठः श्रुतयो विभिन्ना नैको ऋषिर्यस्य मतं ☐प्रमाणम् ।**
धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां महाजनो येन गतः स पन्था: ॥

☐ **वचः** – पाठभेद

अ. – '(धर्माधर्माचा विचार करताना) तर्क लंगडा पडतो (तर्काने निश्चय करता येत नाही). श्रुति (अर्थदृष्टया) परस्परांहून भिन्न (प्रसंगी विरुद्ध) आढळतात. असा एकही ऋषी नाही की ज्याचे मत (किंवा सांगणे=वचन) सर्वांनी प्रमाण मानले आहे. धर्माचे तत्त्व गुहेत दडलेले आहे (म्हणजे अत्यंत गूढ आहे). म्हणून थोर (श्रेष्ठ) पुरुष (विभूतिमान), ज्या मार्गाने गेले तोच मार्ग (आचरावा, चोखाळावा.)' (परिशिष्ट पाहा)

व्य. – धर्म ही मानवी जीवनातली आवश्यक गोष्ट आहे. धर्मविचाराला–आचाराला डावलून कोणत्याही सुबुद्ध मनुष्याला आपले जीवन सुखी करता येणार नाही; जीवनाची सार्थकता अनुभविता येणार नाही. म्हणूनच अनेक प्राचीन ऋषींनी व आधुनिक विचारवंतांनी धर्माच्या स्वरूपाबद्दल, जीवनातील धर्माच्या स्थानाबद्दल चिंतन करून, त्याचे सार लिहून ठेवले आहे. त्यात गूढता व स्थलकालाला अनुसरून त्यांच्यांत मतभिन्नता आढळते. ते वाचून, विचार करून त्यानुसार वागणे रोजच्या व्यवहारात गढलेल्या सामान्य मनुष्याला अशक्य आहे. पण धर्मानुसार वागले तर आत्मकल्याणाच्या दृष्टीने आवश्यक म्हणून येथे युधिष्ठिराने धर्माचरणाचा, सर्वांना उपलब्ध असणारा मार्ग सांगितला आहे. थोर व्यक्तींचे आचरण नेहमी धर्मरूपच असते. त्याचे अनुकरण करावे, त्यांचे आज्ञापालन करावे

म्हणजे आपोआपच आपल्याकडून धर्म पाळला जातो. त्यासाठी वेगळा विचार करावा लागत नाही.

'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां ' या उक्तीचा व्यवहारात अनेकदा अशा अर्थाने वापर केला जातो की, धर्मशास्त्रात सांगितल्याप्रमाणे वागणे शक्य नसते, पुराणातली वांगी पुराणात राहातात, प्रत्यक्ष जीवन–व्यवसाय त्यापेक्षा वेगळा असतो. आणि म्हणून तत्त्वज्ञानातल्या नियमांप्रमाणें प्रत्यक्ष वागणे शक्य नाही व इष्टही नाही, असे हा उक्तिविशेष वापरून सुचविले जाते.

२२२. धर्मे सत्यं प्रतिष्ठितम्

सं. – वारा. २. २१. ४१. पित्याच्या आज्ञेनुसार रामाचा वनात जाण्याचा निश्चय झालेला पाहून कौसल्या दैवाला बोल लावते. शोकाकुल मातेची समजूत घालताना रामाने लक्ष्मणालाही 'आपला मार्गच – वनगमन धर्म्य आहे,' असे पटवून दिले. एवढेच नव्हे तर 'शोकामुळे माझी माता सत्याचे महत्त्व जाणू शकत नाही; तर तू तिला ते समजावून सांग,' असेही तो म्हणाला.

मू. – धर्मो हि परमो लोके धर्मे सत्यं प्रतिष्ठितम् ।
धर्मसंश्रितमप्येतत्पितृर्वचनमुत्तमम् ॥

अ. – 'लोकात (मानव समाजात) धर्म हाच श्रेष्ठ आहे. धर्मातच (धर्माचरणात) सत्य असते. (धर्म म्हणजे कर्तव्य. हे कर्तव्य करण्यातच, आपण बोलू त्याप्रमाणे वागण्यात अर्थ असतो). पित्याचे वचनही धर्माला विहित असेच आहे.'

व्य. – प्रत्येकाच्या अन्त:करणात स्फुरणारी सदसद्‌विवेकबुद्धी त्याला नेहमी सत्याची प्रेरणा देत असते. त्या प्रेरणेप्रमाणे बोलणे, कृती करणे हेच धर्माचरण होय. ऋषिप्रणीत धर्म या तत्त्वावर आधारलेला आहे; म्हणून धर्मपालन म्हणजेच सत्यपालन अशी जाणत्यांची धारणा आहे.

२२३. धर्मो रक्षति रक्षितः

सं. – महा. ३. ३१. ७. बारा वर्षांचा वनवास भोगीत असताना एकदा द्रौपदी व युधिष्ठिर बोलत बसली होती. कौरवांच्या अन्याय्य वागण्याने चिडलेल्या द्रौपदीची युधिष्ठिर समजूत घालीत होता. धर्माने वागणाऱ्यालाही दु:ख भोगावे लागते; त्या वेळी धर्म त्याचे रक्षण करीत नाही हे तिला पटत नाही; तेच ती युधिष्ठिराला सांगत आहे.

महा. ३. ३१२. १२६. युधिष्ठिराच्या उत्तराने संतुष्ट झालेल्या यक्षाने पांडवांपैकी कोणताही एक जिवंत करण्याचा वर धर्माला दिला. धर्माने नकुलाची मागणी करताच यक्ष आश्चर्यचकित झाला. यक्षाने धर्माला त्याचे कारण

विचारताच 'दोन्ही मातांना सुख होईल असे वागणे हा माझा धर्म आहे' असे धर्माने सांगितले.

मू. – राजानं धर्मगोप्तारं धर्मो रक्षति रक्षितः ।

इति मे श्रुतमार्याणां त्वां तु मन्ये न रक्षति ॥ महा. ३.३१.७.

अ. – 'आर्य (श्रेष्ठ, श्रद्धेय) पुरुषांकडून असे ऐकले होते की, धर्मरक्षक राजाचे रक्षण, (राजाकडून) रक्षण केला गेलेला धर्म करतो. परंतु तो धर्म आपले मात्र रक्षण करीत नाही असे वाटते.'

मू. – धर्म एव हतो हन्ति धर्मो रक्षति रक्षितः ।

तस्माद्धर्मं न त्यजामि मा नो धर्मो हतोऽवधीत् ॥ महा. ३.३१२.१२६.

अ. – (धर्म यक्षाला म्हणाला) 'आपण जर धर्माचा नाश केला (त्याचे पालन केले नाही) तर धर्मच आपला घात करतो. (पर्यायाने धर्म सोडल्याने स्वतःचाच विनाश ओढवतो). आपण जर धर्माचे रक्षण केले (धर्माप्रमाणे कर्मे केली) तर धर्माकडूनही (धर्माने) आपले रक्षण केले जाते. म्हणून मी धर्म सोडणार नाही, की ज्यामुळे माझा घात होणार नाही.'

व्य. – व्यवहारात ही उक्ती 'धर्मो रक्षति रक्षितः' म्हणजे धर्माचे रक्षण (पालन) करणाराचे रक्षण स्वतः धर्म करीत असतो अशा सरधोपट अर्थानेच उपयोजिली जाते.

२२४. धारणात् धर्ममित्याहुः

सं. – वारा. ७.५९. प्र. २.७. धर्मासनावर बसून राजसभेचे काम चालविणाऱ्या रामाने लक्ष्मणाला द्वारावर उभे राहून, 'कोणी तक्रार घेऊन आल्यास त्याला सभेत घेऊन यावे' अशी आज्ञा केली. दारावर ओरडत उभ्या असलेल्या कुत्र्याला घेऊन लक्ष्मण आत आला. कुत्र्याने रामाला धर्माची महती सांगितली.

महा. ८.४९.५०. धर्माचे ज्ञान होण्यासाठी कृष्णाने अर्जुनाला कौशिक ब्राह्मणाची कथा सांगितली. कौशिक तपस्वी होता. सत्य बोलण्याची त्याची प्रतिज्ञा होती. एकदा एक मनुष्य चोरांच्या भीतीने झाडाआड लपला असता चोरांनी कौशिकाला विचारताच त्याने तो माणूस दाखविला. चोरांनी त्या मनुष्याला ठार मारले. त्याचे पाप मात्र कौशिकाला लागले. कारण खरा धर्म त्याला कळलेला नव्हता. कौशिकाचा दृष्टांत देऊन कृष्णाने धर्माची व्याख्या अर्जुनाला सांगितली.

महा. १२.११०.११. तर्काने धर्माचा निश्चय करता येणार नाही. धर्माचे सत्य स्वरूप कळावे याकरिता भीष्मांनी युधिष्ठिराला उपदेश केला. श्रीकृष्णाच्या शब्दांतच धर्माचे लक्षण सांगताना 'धर्मेण विधृताः प्रजाः' असे शब्द भीष्मांनी उच्चारले. आशय तोच आहे.

मू. – धारणाद्धर्ममित्याहुर्धर्मेण विधृताः प्रजाः ।

'यस्माद्धारयते सर्वं त्रैलोक्यं सचराचरम् ॥ वारा. ७.५९ प्र. २.७.

अ. – 'धारण करतो तो 'धर्म' असे म्हणतात. धर्मानेच प्रजेचे धारण होते. ह्याच कारणाने सर्व स्थावर जंगम त्रैलोक्याचे धारण धर्म करीत असतो.'

मू. – धारणाद्धर्ममित्याहुः धर्मो धारयति (ते) प्रजाः ।

यत्स्याद्धारणसंयुक्तः स धर्म इति निश्चयः ॥ महा. ८.४९.५०.

'धर्मेण विधृताः प्रजाः' – पहिल्या ओळीतील हा दुसरा चरण वगळता बाकी श्लोक वरीलप्रमाणेच आहे. महा. १२.११०.११.

अ. – 'धारण करण्यामुळे 'धर्म' असे नाव प्राप्त झाले आहे. धारण करण्याच्या शक्तीने युक्त असेल तोच खरा धर्म हे सत्य आहे.'

व्य. – माणसाच्या नैसर्गिक प्रवृत्तींना वळण देऊन योग्य मार्गांनी त्याची प्रगती होईल अशा आचारविचाराची दिशा दाखविणे हे धर्माचे कार्य आहे. धर्म हे संस्कृतीचे उत्तमांग आहे. पुरुषार्थांची गणना करताना धर्माला पहिले स्थान दिले आहे. अर्थ आणि काम हे धर्माचा आधार घेऊन, धर्माच्या पायावर उभे राहिले तर ते व्यक्तीच्या आणि समाजाच्या संघटनेला व स्वास्थ्याला अनुकूल होतात. व्यक्ती आणि समाज यांचे संबंधही धर्माच्या व्यवस्थेमुळे नियमित होतात; म्हणून मानवी जीवनात धर्माचे स्थान अपरिहार्य आहे. धर्माचरणाचा आदर्श म्हणून प्रभू रामचंद्राचे जीवन सर्व लोकांना सर्व काळी मार्गदर्शक होऊ शकते. सामान्य माणसांना केवळ तत्त्वे सांगण्यापेक्षा प्रत्यक्ष उदाहरण-आचरण समोर असणे आवश्यक असते. महाभारतातही भगवान श्रीकृष्ण, भीष्म, युधिष्ठिर यांचे आदर्श व्यासांनी समोर ठेविले आहेत.

२२५. धिगस्तु परवश्यताम्

सं. – वारा. ५. २५. २०. अशोकवनात रावणाने आणून ठेवलेल्या सीतेने दुःखावेगाने आपल्या परस्वाधीन जिण्याचा धिक्कार केला आहे.

मू. – धिगस्तु खलु मानुष्यं धिगस्तु परवश्यताम् ।

न शक्यं यत्परित्यक्तुमात्मच्छन्देन जीवितम् ॥

अ. – 'जगणे असह्य झाले म्हणून ज्याचा शेवट करता येत नाही; त्या मनुष्यपणाला व त्या परवशतेला धिक्कार असो!'

व्य. – माणुसकीला काळिमा आणणाऱ्या दुष्टांची हीन कृत्ये व अवमान सहन करण्यापेक्षा मृत्यूलाही कवटाळणे स्वाभिमानी माणसे अधिक पसंत करतात. पण काही वेळा तसे करणेही त्यांना अशक्य असते. मग स्वतःच्या असहाय्यतेचा व मानवी मर्यादांविषयीचा त्यांचा शोक–संताप आत्मनिर्भत्सनेच्या रूपात बाहेर पडतो. कोणत्याही प्रकारच्या परवशतेबद्दल, पराधीनतेबद्दल, पारतंत्र्याबद्दल याच शब्दाने चीड व्यक्त केली जाते.

२२६. धियो यो नः प्रचोदयात्

सं. – ऋग्. ३. ६२. ११. विश्वामित्रांना स्फुरलेली सूर्याच्या ध्यानाची ही ऋचा गायत्री मंत्र म्हणून वैदिक वाङ्मयात प्रसिद्ध आहे. या मंत्राचा प्रत्यक्ष विनियोग करताना त्याला 'भूः, भुवः, स्वः' या तीन व्याहृति जोडल्या जातात.

मू. – तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

अ. – 'त्या (अखिल चराचराला प्रेरणा देणाऱ्या) सवितृदेवाच्या (सूर्याच्या) सर्वश्रेष्ठ तेजाचे आम्ही ध्यान करतो. आमच्या बुद्धीला ते (तेज) शुभ प्रेरणा देवो.'

व्य. – भारतीय संस्कृतीतील मंत्रवाङ्मयात सर्वश्रेष्ठ व सर्वांना म्हणण्यासारखा मंत्र म्हणून 'गायत्री' मंत्र प्रसिद्ध आहे. सूर्य हा सर्व स्थिरचर सृष्टीला जीवन देणारा आत्मा होय. त्याचे भौतिक स्वरूप आपल्या दृष्टीपुढे असतेच. आपल्या बुध्दीला प्रेरणा, ज्ञान देणारा सूर्यच होय. आर्यांनी सूर्याला उपास्य देवता मानली आहे. त्याच्या तेजाच्या ध्यानाने अज्ञानरूपी अंधकार दूर व्हावा ही प्रार्थना येथे केलेली आहे.

(न)

२२७. न ऋते श्रान्तस्य

सं. – ऋग्. ४. ३३. ११. देवांचे कुशल कारागीर, विविध विद्या जाणणाऱ्या 'ऋभु' देवांना उद्देशून असलेल्या सूक्तातील ही ऋचा प्रसिद्ध आहे. त्रिष्टुप् छंदातील या ऋचेचा द्रष्टा ऋषी वामदेव आहे.

मू. – इदाह्नः पीतिमुत वो मदं धुर्न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः ।
ते नूनमस्मे ऋभवो वसूनि तृतीये अस्मिन् त्सवने दधात ॥

अ. – 'आज तुमच्याकरिता हे आनंदाचे सार, हे सोमरसाचे पेय तुमच्यापुढे सादर केले आहे. खरोखर श्रम केल्याशिवाय देवांची मैत्री प्राप्त होत नाही. हे ऋभु-देवांनो, अत्यंत अभिलषणीय अशी जी संपत्ती असेल ती या तिसऱ्या सवनाचे वेळी आमच्यासाठी घेऊन या.'

व्य. – ऋभूंनी जलद चालणारा व योद्ध्यांना आरोहण करण्यास योग्य असा रथ तयार केला व तो इन्द्राला दिला, स्वतःच्या मातापित्यांना आजारातून मुक्त केले, सोमपानासाठी शोभिवंत व चमत्कृतीपूर्ण अशी पेयपात्रे (पेले) बनविली. त्यांच्या या चातुर्यामुळे व कार्यकौशल्यामुळे त्यांना देवांप्रमाणेच सोमपान करण्याचा अधिकार प्राप्त झाला. 'देवांकडून सन्मानाचा व प्रेमाचा लाभ झाला' – अशा प्रकारच्या

वर्णनाच्या या सूक्तातील वरील ऋचा वैदिक काळापासून प्रयत्न, कार्यकुशलता यांचे महत्त्व आपल्या भारतीय संस्कृतीत किती ठळकपणे, आग्रहाने सांगितले आहे, याचे उदाहरण म्हणून प्रसिद्ध आहे. संन्यासाचे आणि त्यागाचे महत्त्व सांगणाऱ्या आध्यात्मिक परंपरेत ऐहिक कर्मकुशलतेला योग्य व महत्त्वाचे स्थान आहे, हे या वैदिक वचनावरून स्पष्ट होते. अध्यात्म म्हणजे आळस, निष्क्रियता नव्हे; तर डोळस, योग्य दिशेने प्रयत्न करणे होय, याचे स्मरण देणारा हा उक्तिविशेष आहे.

२२८. न कश्चिदतिवर्तते

सं. – वारा. ४. २५. ६. वालीच्या मृत्यूनंतर, 'कालगतीकडे पाहून शोक आवरावा' असे सांगून तारा, सुग्रीव आदींचे रामाने सांत्वन केले.

महा. ९.६३.९. धृतराष्ट्राने संजयाला विचारले, 'मांड्या तुटल्याने भूमीवर पडलेला माझा पुत्र दुर्योधन काय म्हणाला?' संजयाने धृतराष्ट्राला दुर्योधनाची व्यथा दुर्योधनाच्या शब्दांतच सांगितली.

महा. ११.२.५. भारतीय युद्धात कौरवांचा नाश झालेला पाहून धृतराष्ट्राला शोक अनावर झाला. शोकाकुल धृतराष्ट्राचे विदुराने शास्त्रार्थ सांगून सांत्वन केले.

महा. १२. ५९. १३७. भीष्मांनी युधिष्ठिराला राजधर्माचा उपदेश केला.

मू. – न कालः कालमत्येति न कालः परिहीयते ।
स्वभावं च समासाद्य न किंचिदतिवर्तते ॥ वारा. ४. २५. ६.

अ. – 'परमेश्वरस्वरूप असलेला काळ, क्रमाला अनुसरून आलेल्या गोष्टीचे अतिक्रमण करीत नाही किंवा मागेही येत नाही. सृष्टीत उत्पन्न झालेली जी जी वस्तू आहे ती ती (नाश) टाळू शकत नाही.'

मू. -- एकादशचमूभर्ता सोऽहमेतां दशां गतः ।
कालं प्राप्य महाबाहो न कश्चिदतिवर्तते ॥ महा. ९. ६३. ९.

अ. – 'अकरा अक्षौहिणी सैन्याचा स्वामी असलेला मी आज या दशेला पोचलो. खरोखर, मृत्यू जवळ आला असताना त्याला कोणीही थोपवू शकत नाही.'

मू. – अयुध्यमानो म्रियते युध्यमानश्च जीवति ।
कालं प्राप्य महाराज न कश्चिदतिवर्तते ॥ महा. ११. २. ५.

अ. – 'लढाईत भाग न घेणारा मरतो आणि लढाई करणारा जिवंत राहतो. मृत्यूची वेळ आली असताना कोणीही ती टाळू शकत नाही. (जिवंत राहू शकत नाही.)'

मू. -- बुद्ध्या भवति संयुक्तो माहात्म्यं चाधिगच्छति
स्थापितं च ततो देवैः न कश्चिदतिवर्तते
तिष्ठत्येकस्य च वशे तं चेदं न विधीयते ॥ महा. १२. ५९. १३७.

अ. -- ' (आपल्या पूर्वजन्मीच्या) कल्याणकारक बुध्दीचा उदय होतो आणि तो आपल्या थोरवीला प्राप्त होतो. देवतांकडून अभिषिक्त अशा त्या राजाच्या आज्ञेचे कोणीही उल्लंघन करीत नाही, सर्व जग त्याच्या शासनाखाली राहाते. परंतु तो (जगत्कर्ता) परमेश्वर आहे असे मात्र कोणी मानू नये.'

व्य. – कालक्रमानुसार प्राप्त होणारी स्थिती कोणीही टाळू शकत नाही. बाल्य, तारुण्य, सुख, वैभव एवढेच भोगू आणि वृद्धावस्था, मरण, विपत्ती टाळू म्हटल्याने टळणार नाही. मनुष्य कोठेही असो, मरण हे त्याला गाठतेच. त्याला चुकविण्याचे सामर्थ्य माणसाला कोठून असणार? कालगतीमुळे अगतिक झालेल्या माणसांकडे पाहून या उक्तीचा सहज उच्चार होतो. कल्याणाच्या बुद्धीने, धर्माला प्रमाण मानून राज्य करणाऱ्या राजाच्या आज्ञेचे उल्लंघन प्रजा करू शकत नाही, अशा अर्थानेही हा उक्तिविशेष वापरला जातो. जगात मृत्यूसारख्या काही गोष्टी अटळ आहेत, हेच या उक्तिविशेषाने सिद्धान्त म्हणून सांगितले जाते.

२२९. न कालः खड्गमुद्यम्य

सं. – सुर. ३. सामान्यनीती ३३४. मनुष्याचा नाश करणाऱ्या शक्तीचे कार्य कशा प्रकारे होते, हे सुभाषितकारांनी येथे उचित शब्दांत सांगून जीवनातील एका सत्याचे स्वरूप प्रकट केले आहे.

मू. – न कालः खड्गमुद्यम्य卐 शिरः कृन्तति कस्यचित् ।
कालस्य 卐बलमेतावद्विपरीतार्थदर्शनम् ।।

卐 **मादाय** : पाठभेद; 卐**लक्षणं**: पाठभेद

अ. – ' (नाश करणारा) काल (प्रत्यक्ष) तलवार उगारून कोणाचा शिरच्छेद करीत नाही. काळाचा प्रभाव हा आहे की, (माणसाला त्याच्या हिताच्या) विरुद्ध गोष्टी योग्य वाटू लागतात.'

व्य. – ' विनाशकाले विपरीतबुद्धिः ' हा प्रसिद्ध उक्तिविशेष वरील अर्थाचाच आहे. काळ म्हणजे मृत्यू किंवा नाश करणारी शक्ती ही कोणा माणसाचे, व्यक्तीचे रूप घेऊन येत नाही; तर नाशाची वेळ आली म्हणजे बुद्धिभ्रंश होतो व त्यामुळे शत्रू मित्र वाटू लागतात, दुसऱ्याचे धन बळकावावे, अकारण वैर करावे अशी बुद्धी उत्पन्न होते; व त्याप्रमाणे कर्मही होते. त्यामुळे स्वतःचा नाश स्वतःच ओढवून घेतला असे होते. काळ ही कोठे बाहेर राहाणारी शक्ती नाही, तर प्रत्येकाच्या अंतरंगातच ती गुप्त आहे व त्याच्याच कर्मामुळे सृष्टिक्रमाने ती प्रकट होते. रावणाला सीतेला पळवून न्यायची बुद्धी झाली, पांडवांचे हक्काचे राज्य त्यांना देऊ नये; आपणच उपभोगावे अशी बुद्धी दुर्योधनाला झाली. यातच त्यांच्या नाशाची बीजे होती. ही काळाच्या प्रभावाची प्राचीन उदाहरणे आहेत. आजही अशा

घटना होत असताना दिसतात व या उक्तिविशेषाचे महत्त्व ध्यानी येते. सत्य वस्तुस्थिती असते त्यापेक्षा वेगळे दिसणे हे विपरीतपणाचे लक्षण आहे, आत्महिताचे, समाजाच्या चिरकल्याणाचे असेल ते आत्मघाताचे व समाजाच्या अकल्याणाचे वागणे किंवा त्याविरुद्ध वागणे व तसे वर्तन घडणे यालाच 'काळ फिरला' असे मराठीत म्हणतात. विनाशाची वाटचाल अशा विपरीत बुद्धीतूनच होत असते, असा या उक्तिविशेषाचा सिद्धान्त.

२३०. न जातु कामः

सं. – महा. १.१३. प्रउ ४२६.१; १.१३. प्रउ ६९३.६; १.१३. प्रउ ८४०.१.

नहुष राजाचा पुत्र ययाती याला त्याच्या सासऱ्याच्या म्हणजे दैत्यांचे गुरु शुक्राचार्य यांच्या शापामुळे तरुणपणीच म्हातारपण आले. त्याचे शरीर जीर्ण झाले. तारुण्यातील उपभोग घेण्याची त्याची इच्छा अतृप्त राहू नये म्हणून त्याचा सर्वांत धाकटा मुलगा पुरू याने स्वतःचे तारुण्य ययातीला दिले व त्याचे म्हातारपण स्वतःकडे घेतले. ठरलेला काळ संपल्यानंतर ययातीने पुरूचे तारुण्य परत दिले व वृद्धावस्था स्वतःकडे घेतली. त्यावेळी उपभोगांचे स्वरूप कसे आहे याविषयीचा आपला अनुभव त्याने बोलून दाखविला.

महा. १२ प्रवि. १८.९८. भीष्मांनी युधिष्ठिराला ऐहिक उपभोगांचे स्वरूप सांगितले.

भाग. ९.१९.१४. कामोपभोगासाठी आतुर होऊन शेळ्यांच्या मागे फिरणाऱ्या व कितीही कष्ट झाले तरी त्यांचा नाद न सोडणाऱ्या लोचट बकऱ्याची गोष्ट ययातीने देवयानीला सांगितली.

(सर्व ठिकाणी श्लोक सारखाच आहे.)

मू. – **न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।**
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाऽभिवर्धते ॥

अ. – 'अग्नीत टाकलेल्या आहुतींमुळे तो पुनःपुन्हा अधिकच प्रदीप्त होतो (तृप्त होऊन शांत होत नाही); त्याप्रमाणे विषयांच्या उपभोगाने, विषयवासना कधीही शांत न होता अधिकाधिक वाढत जातात.'

व्य. – वासनांची पूर्ती केल्याने त्या शांत होतील व आपल्याला सुख मिळेल ही माणसाची सहज समजूत असते. परंतु एकामधून दुसरी, अशी कधीही शांत न होणारी उपभोगेच्छांची साखळी त्याला बांधून अधिकाधिक उपभोगांकडे व उपभोग-साधनांकडे ओढून नेत असते. शरीर व्याधिग्रस्त, उपभोगाला असमर्थ झाले तरीही वासना क्षीण होत नाहीत, हे विदारक सत्य अग्नीची अत्यंत उचित उपमा देऊन येथे प्रभावीपणे सांगितले आहे. वासनेचे हे स्वरूप ध्यानात न घेता, शांती व तृप्ती मिळविण्याच्या इच्छेने कामोपभोगांच्या मागे लागलेल्या माणसाकडे पाहून

या उक्तिविशेषाचा सहज उच्चार होतो. ययातीची गोष्ट व त्याचे हे उद्‌गार जागतिक वाङ्मयात प्रसिद्ध आहेत.

२३१. न जानपदिकं दुःखम्

सं. – महा. ११.२..१६. भारतीय युद्धात कौरवांचा नाश झालेला पाहून धृतराष्ट्राला दुःख झाले. शोकमग्न झालेल्या धृतराष्ट्राचे शास्त्रार्थ सांगून विदुराने सांत्वन केले.

महा. १२. ३१७. १५. मोक्षधर्मपर्वात भीष्मांनी युधिष्ठिराला उपदेश केला. नारद व शुक एकदा व्यासांकडे आले असताना नारदाने सांगितलेला मोक्षधर्मच भीष्मांनी युधिष्ठिराला सांगितला.

मू. – न जानपदिकं दुःखमेकः शोचितुमर्हसि ।
अप्यभावेन युज्येत तच्चास्य न निवर्तते ।। महा. ११.२.१६.

अ. – सर्व जनसमुदायावर आलेल्या दुःखाबद्दल (दुःखदायक संकटाबद्दल) तू एकट्याने शोक करणे योग्य नाही. जरी तू स्वतःचा नाश करून घेतलास, तरी ते दुःख दूर होणार नाही.

मू. – न जानपदिकं दुःखमेकः शोचितुमर्हसि ।
अशोच्यान्प्रतिकुर्वीत यदि पश्येदुपक्रमम् ।। महा. १२.३१७.१५.

अ. – 'सर्व प्रजेवर कोसळलेल्या (आपत्तीचा) दुःखासाठी शोक न करता प्रतिकाराचा काही उपाय सुचला तर तो कार्यवाहीत आणावा.'

व्य. – दुष्काळ किंवा भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे होणारा नाश, लढाईत होणारी प्राणहानी ही सामुदायिक दुःखे होत. त्यासाठी आपण एकटयाने काय करू शकणार? म्हणून निराशेने कपाळाला हात लावून न बसता किंवा वैफल्याने स्वतःचा नाश न करून घेता 'आपण एवढे तरी करू शकतो,' म्हणून आपल्या कुवतीप्रमाणे लोकांना त्या दुःखातून बाहेर काढण्याचा उपाय करावा. जनतेच्या सुख-दुःखाशी समरस झालेल्या व्यक्तीला अनेक वेळा या उक्तिविशेषाचे स्मरण करणे उपकारक वाटेल. तसेच राष्ट्रावर–देशावर लादले जाणारे पारतंत्र्य, समाजावर होत असणारे कोणत्याही प्रकारचे सामूहिक, सार्वजनिक आक्रमण आणि त्याला बळी पडणारे सबंध राष्ट्र अथवा देश किंवा भरडला जाणारा समाज याबद्दल एक घटक म्हणून दुःख वाहणे साहजिक आहे; पण त्या दुःखातच चूर होऊन स्वस्थ बसणे किंवा हतबुद्ध, निराश होऊन आत्मघात करून घेणे हा त्यावर उपाय नव्हे. यथाशक्य प्रतिकार हा खरा मार्ग. त्याचाच निर्देश या उक्तिविशेषात आहे.

२३२. न तत्र दिवसं वसेत्

सं. – सप. न १२-१६. जेथे मनुष्याचे जीवन सुखी होण्यासाठी आवश्यक व अनुकूल

गोष्टींचा अभाव असेल तेथे राहू नये, असे सांगून सुभाषितकारांनी अशा गोष्टींची गणना येथे केली आहे. (परिशिष्ट पाहा.)

मू. – **यस्मिन्देशे न सम्मानो न प्रीतिर्न च बान्धवाः ।**
न च विद्यागमः कश्चिन्न तत्र दिवसं वसेत् ।। १५ ।।

अ. – ' ज्या ठिकाणी आदरातिथ्य होत नाही, प्रेम व स्नेहीजन मिळत नाहीत, आणि जेथे ज्ञानातही भर पडत नाही, तेथे एक दिवसही राहू नये. '

व्य. – मनुष्याची प्रगती होण्यास अन्न–वस्त्र–निवारा तसेच स्वतःचे गुण प्रकट करण्याची, वाढविण्याची संधी, आप्त-स्वकीयांचे प्रेम अशा अनेक प्रमुख घटकांची आवश्यकता असते. पण सर्वच अनुकूल गोष्टी एखाद्यालाच प्राप्त होतात. त्यातील अत्यावश्यक घटकांनाही जर तो पारखा होत असेल, तर त्याने त्या जागेला चिकटून न राहता तो प्रदेश, ती जागा सोडून दुसरीकडे जावे व स्वतःचे नशीब काढावे. अडचणी, अपमान सहन करून, आहे त्यातच खितपत पडण्याची वृत्ती असलेल्या माणसांना जागे करणारा हा उक्तिविशेष आहे.

२३३. न देवचरितं चरेत्

सं. – सप. न ३५.

मू. – **भार्गवेण हता माता एकजायांश्च पाण्डवाः ।**
परदाररतः कृष्णो न देवचरितं चरेत्□ **।।**

□ **देवचरितमाचरेत्** : पाठभेद ।

अ. – ' परशुरामाने आपल्या आईचा वध केला, पाच पांडवांनी एकाच पत्नीला वरले, श्रीकृष्णाने परस्त्रीशी शृंगार केला; (पण या) देवांच्या कृतीसारखे आचरण (माणसांनी) करू नये. '

व्य. – वडिलांच्या आज्ञेने परशुरामाने आईला मारले खरे; पण तिला जिवंत करण्याची युक्ती आणि शक्ती त्याच्याजवळ होती स्वतः केलेल्या कृतीचे परिणाम पेलण्याचे सामर्थ्य व तेज त्याच्यात होते.दैवी विभूतींच्या चरित्रातील घटना सामान्य माणसाला अद्भुत वाटतात. क्वचित तसे करण्याचा मोहही त्याला उत्पन्न होईल. त्यासाठी ' मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ।' (भगी); ' महाजनो येन गतः स पन्थाः ।' (महा.) यासारखी वचनेही, त्यांचा अर्थ नीट जाणून न घेता सांगून स्वतःचे समर्थन करण्याचा तो प्रयत्न करील. 'देवांनीही असे केले, आम्हाला करायला काय हरकत आहे, ' असा प्रतिवाद करणाऱ्या मनुष्याला या सुभाषितात एक प्रकारे सावधगिरीची सूचना दिली आहे. अल्पबुद्धीने, स्वतःची शक्ती ओळखण्याचे तारतम्य नसताना मनुष्य देवांसारखे वागू लागला तर त्याचे पतन झाल्याशिवाय राहाणार नाही, हे परशुराम, पांडव, श्रीकृष्ण या देवतास्वरूप विभूतींच्या

उदाहरणाने येथे सांगितले आहे. ऋषींनी देखील विद्यार्थ्यांना ‘ यानि अस्माकं सुचरितानि तानि एव आचारितव्यानि, नो इतराणि ’ असे बजावून सांगितले आहे. व्यवहारात एका विपरीत अर्थाने या उक्तिविशेषाचा उपयोग होताना दिसतो. ‘अहो, ते देव होते. त्यांचे काय सांगता ? आम्हाला तसे वागणे शक्य नाही, ’ असे म्हणून थोर पुरुषांनी पुरुषप्रयत्नांनी पराकाष्ठेच्या हालअपेष्टा सोसून जे पराक्रम केले, जी महत्कार्ये घडविली आणि जीवनात त्यासाठी जे कठोर तपाचरण इत्यादी केले,त्याचा आदर्श कोणापुढे ठेवला तर तो म्हणतो, ‘छे! छे! हे आम्हांला जमण्यासारखे नाही ’ आणि या सबबीवर तो काहीच न करता स्वस्थ बसतो आणि आपल्या नैष्कर्म्याच्या समर्थनार्थ वरील उक्तिविशेषाची ढाल पुढे करतो. पण हे वर्तन मुळात ती उक्ती ज्या अर्थाने आलेली आहे त्याच्याशी विसंगत व विपरीत म्हटले पाहिजे.

२३४. न देवा दण्डमादाय

सं. – महा. ५. ३५. ३३. पुत्रलोभाने पांडवांचे हक्काचे राज्य त्यांना देण्याचे धृतराष्ट्राने नाकारले. परंतु या निर्णयाने त्याला सदसद्विवेकबुद्धीची टोचणी लागली व तो अस्वस्थ झाला. त्याची सद्बुद्धी जागृत व्हावी यासाठी विदुराने त्याला उपदेश केला.

मू. – न देवा दण्डमादाय रक्षन्ति पशुपालवत् ।
यं तु रक्षितुमिच्छन्ति बुद्धया संविभजन्ति तम् ।।

अ. – ‘ देव काही गुराख्यासारखे हातात काठी घेऊन कोणाचेच रक्षण करीत नाहीत. ज्याचे रक्षण करण्याची त्यांची इच्छा असते, त्याला ते योग्य (काम करण्याची) बुद्धी देतात.’

व्य. – आपले हित व्हावे; पापाचरण आपल्या हातून घडू नये याची तळमळ असलेल्या माणसावर देवाची कृपा होते; त्या कृपेचे रहस्य विदुराने येथे बोलून दाखविले आहे. मनात शुभ संकल्प निर्माण होणे, परोपकार करण्याची बुद्धी होणे हीच देवाची देणगी आहे. देव देतो, रक्षण करतो म्हणजे योग्य दिशेने प्रयत्न करण्याची माणसाला बुद्धी देतो. आळशी, सदसद्विवेकबुध्दीकडे डोळेझाक करून देवाला दोष देणाऱ्या, किंवा ‘ देव आहे तर मग त्याने आम्हांला प्रत्यक्ष येऊन का सांगू नये – अमुक कर आणि अमुक करूं नकोस !’ असा हास्यास्पद युक्तिवाद करणाऱ्यांना विदुराने दिलेले उत्तर अर्थपूर्ण आहे.

२३५. न देवाय न धर्माय

सं. –सुर. २. दुर्जननिंदा ५७. दुष्ट,लोभी माणसाची सर्वच कृती दुसऱ्यांना त्रासदायक असते. धन ही सुखोपभोगदायक वस्तू; पण ती त्याच्या बाबतीत व्यर्थ होते, त्रासदायक होते.

मू. – न देवाय न धर्माय न बन्धुभ्यो न चार्थिने ।
दुर्जनेनार्जितं द्रव्यं भुज्यते राजतस्करैः ।।

अ. – 'दुर्जनाने मिळविलेल्या धनाचा विनियोग ना देवकार्यासाठी, ना दानधर्मात, न आप्तस्वकीयांना, न याचकाला देण्यात. राजाच्या नोकरांना किंवा चोरांना मात्र ते उपभोगायला मिळते.'

व्य. – दान आणि भोग हे आपण मिळविलेल्या धनाचे मुख्य उपयोग. मिळवलेल्या संपत्तीचा विनियोग स्वतःचे रक्षण आणि सुखवर्धन करण्यासाठी करावा; तसेच त्यातला काही भाग इतरांना द्यावा, देवकार्यासाठी अर्पण करावा, असे धर्मनीतिशास्त्रात सांगितले आहे. असे वापरलेले धन स्वतःचे व इतरांचे सुख वाढविते. परंतु अतिलोभी, श्रद्धाशून्य व दुसऱ्यांबद्दल सहानुभूती नसणाऱ्या मनुष्याने मिळविलेल्या धनाचा विनियोग यापैकी कोणत्याच प्रकारे होत नाही. ते चोरापोरी तरी जाते, नाहीतर राजाच्या सेवकांकडून जप्त तरी केले जाते. ज्या गोष्टीचा कोणालाच कशालाच उपयोग होत नाही, ती व्यर्थ होते तेव्हा हा उक्तिविशेष वापरला जातो. 'ना तुला ना मला, घाल कुत्र्याला !' हा मराठी उक्तिविशेष याच अर्थाचा आहे.

२३६. न दैवं पर्युपासते

सं. – वारा. २.२३.१६. पित्याची आज्ञा शिरोधार्य मानून रामाने वनात जाण्याचे ठरविले व हीच दैवगती आहे, हा निर्णय धर्माला अनुसरून आहे, असे लक्ष्मणाला पटविण्याचा त्याने प्रयत्न केला. परंतु लक्ष्मणाने संतापाच्या भरात 'दैववादी' म्हणून रामाला दूषण दिले व 'दैव ही दुर्बलांची सबब आहे; तू त्याचा आश्रय करू नकोस,' असा उपदेश केला.

मू. – विक्लवो वीर्यहीनो यः स दैवमनुवर्तते ।
वीराः संभावितात्मानो न दैवं पर्युपासते ।।

अ. – 'कमकुवत, अंगी पराक्रम नसलेला जो मनुष्य असेल तो दैव मानून त्यानुसार वागतो. सन्मानाला पात्र असे वीरपुरुष दैवापुढे नमत नाहीत.'

व्य. – मनगटात जोर असलेला आणि मनात उमेद असलेला मनुष्य दैवाचा विचार करीत नाही; तसा त्याने करू नये. तो स्वपराक्रमाने आपले ध्येय साध्य करून घेतो. त्यासाठी सर्वस्व पणाला लावतो. दैवगतीचा विचार दुर्बल माणसे करतात. प्रयत्न करण्यास प्रोत्साहन देणारा म्हणून हा उक्तिविशेष प्रसिद्ध आहे.

२३७. न पापानां वधे पापम्

सं. – वारा. ५.५२.११. रामाचा दूत म्हणून आलेल्या मारुतीला मारणे योग्य नाही, असे बिभीषणाने रावणाला समजाविले. तेव्हा क्रुद्ध झालेल्या रावणाने स्वतःचे समर्थन केले.

मू. – न पापानां वधे पापं विद्यते शत्रुसूदन ।
तस्मात् इमं वधिष्यामि वानरं पापकारिणम् ॥

अ. – 'हे शत्रुनाशका, अपराध्याचा वध करण्यात पाप नाही. म्हणून या पापी, द्रोह करणाऱ्या वानराचा मी वध करतो.'

व्य. – स्त्री, दूत म्हणून आलेली व्यक्ती यांना मारणे हे राजनीतीच्या नियमांविरुद्ध आहे. परंतु काही वेळा या नियमांना अपवाद करावा लागतो. दुष्ट, अनेकांचा घात करणारा असेल तर त्याच्या बाबतीत कोणत्याही नियमाचा विचार करू नये, असे येथे सुचवायचे आहे. पण हे वचन रावणाच्या तोंडून आलेले पाहून 'सैतानाच्या तोंडी बायबल' या पाश्चात्य म्हणीचे स्मरण होते.

२३८. न ब्रूयात् सत्यमप्रियम्

(पाहा : एष धर्मः सनातनः)

२३९. नभः स्पृशम्

सं. – भगी. ११.२४. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनापुढे 'विश्वरूपदर्शन' प्रकट केले. ते विराट रूप पाहून अर्जुन विस्मयचकित झाला, घाबरला. हात जोडून त्याने भगवंताची स्तुती केली, त्याच्या दिव्य स्वरूपाचे वर्णन केले.

मू. – नभः स्पृशं दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं दीप्तविशाल नेत्रम् ।
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितान्तरात्मा धृतिं न विन्दामि शमं च विष्णो ॥

अ. – 'आकाशाला भिडणारे, तेजस्वी, चित्रविचित्र रंगांचे, जबडा पसरलेले, विशाल आणि प्रकाशमान डोळ्यांनी युक्त अशा तुम्हाला पाहून माझे अन्तःकरण व्याकुळ झाले आहे. हे विष्णो, माझे धैर्य गळून गेले आणि (भयाने कापरे भरल्यामुळे) माझी शांतीही नाहीशी झाली आहे.'

व्य. – परमेश्वराच्या विराट स्वरूपाचा, विश्वरूपी देहाचा शिरोभाग आकाशात आहे व त्याच्या देहाने सर्व जग व्यापून टाकले आहे असे अर्जुनाला दर्शन झाले. उंचउंच जाणारी, आकाशाला भिडण्याची आकांक्षा ही मानवाला नित्य आकर्षित करीत असते. विमानविद्येच्या शोधामध्ये हीच आकांक्षा प्रतिबिंबित झाली आहे. भारतीय विमानदलाने हा उचित उक्तिविशेष आपले ध्येयवाक्य म्हणून स्वीकारला आहे.

२४०. न भीतो मरणादस्मि

सं. – मृच्छ. २.१४. 'धनाच्या लोभाने वसंतसेनेचा घात केला' हा आरोप ठेवून चारुदत्ताला सुळी देण्यासाठी वधस्तंभाकडे नेले जात असताना चारुदत्तासारख्या

उदारात्म्याला आपल्यावर ठेवलेल्या खोट्या आरोपामुळे अत्यंत दु:ख झाले व त्याच्या तोंडून हे उद्गार बाहेर पडले.

मू. – न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः ।
विशुद्धस्य हि मे मृत्युः पुत्रजन्मसमः किल ॥

अ. – ‘मरणाचे भय मला वाटत नाही; परंतु (या आरोपामुळे) माझ्या कीर्तीला कलंक लागला (याचे मला दु:ख होते). निर्दोष ठरून मला मृत्यू आला असता तर तो मृत्यू खरोखर पुत्रजन्मोत्सवासारखा (आनंददायक) वाटला असता.’

व्य. – आपल्या शीलाला, नावलौकिकाला जपणाऱ्या थोर पुरुषांना आपल्या प्राणांचीही पर्वा वाटत नाही. अशा पुरुषांची व्यथा चारुदत्ताच्या मुखाने येथे प्रकट झाली आहे.

२४१. न भूतो न भविष्यति

सं. – महा. १.१५०.१६. बकवधपर्वात, बकासुराचा आहार घेऊन ब्राह्मणपुत्राऐवजी भीमाने जावे व सर्वांच्या हितासाठी बकासुराला मारावे, असे कुंतीने ठरविले. युधिष्ठिराला भीमाने हे साहस करू नये असे वाटले; तेव्हा कुंतीने भीमाच्या बळाबद्दल व पराक्रमाबद्दल युधिष्ठिराला या शब्दांत खात्री दिली.

हित ३.१०१. विग्रह या विभागात, आगन्तुक - अचानक आलेली व्यक्ती कधीकधी मोठा उपकार करून जाते, हे पटवून देण्यासाठी आलेल्या कथेतील हा उक्तिविशेष आहे. शूद्रक नावाच्या राजाने परदेशातून आलेल्या वीरवर नावाच्या राजपुत्राला आपल्या पदरी ठेवून घेतले. शूद्रकाची राजलक्ष्मी जाऊ नये म्हणून वीरवराने देवीपुढे आपल्या मुलाचा बळी दिला व स्वत: पत्नीसह आत्मत्याग केला. हे पाहून आश्चर्यचकित झालेल्या राजाने या उक्तिविशेषाने त्याचा गौरव केला.

सुर. २. कृपणनिंदा १. पैसा पैसा करून प्राण टाकणाऱ्या चिक्कू माणसाच्या वृत्तीचे विडंबन या श्लोकात केले आहे.

मू. – वृकोदरबलो नान्यो न भूतो न भविष्यति ।
योऽभ्युदीयाद्युधि श्रेष्ठमपि वज्राधरं स्वयम् ॥ महा. १.१५०.१६.

अ. – ‘भीमासारखा बलवान् पूर्वी कोणी झाला नाही आणि पुढे होणार नाही. कितीही बलवान्, वज्रासारखे शस्त्र धारण करणाऱ्याचाही युद्धात तो पाडाव करील.’

मू. – जीवन्ति च म्रियन्ते च मद्विधाः क्षुद्रजन्तवः ।
अनेन सदृशो लोके न भूतो न भविष्यति ॥ हित. ३.१०१.

अ. – ‘माझ्यासारखे अनेक क्षुद्र प्राणी जन्माला येतात आणि मरतात; पण याच्यासारखा (थोर, स्वामिभक्त) पुरुष पूर्वी झाला नाही व पुढे होणार नाही.’

मू. – कृपणेन समो दाता न भूतो न भविष्यति ।
अस्पृशन्नेव वित्तानि यः परेभ्यः प्रयच्छति ॥ सुर. २. कृपणनिंदा १.

अ. – ' कंजूष माणसासारखा दानशूर खरोखर पूर्वी झाला नाही व पुढे होणार नाही की, (स्वत: मिळविलेल्या) धनाला स्पर्शही न करता (उपभोग न घेता) जो दुसऱ्याला देतो' (म्हणजे दुसरा ते लुबाडून घेतो किंवा याच्या पश्चात् ते त्याला अनायास मिळते).
व्य. – एखादी, नित्याच्या व्यवहारात न आढळणारी, विलक्षण घटना घडलेली पाहिली; तिला द्यायला उपमा, वर्णन करायला शब्दही सापडेनासे झाले म्हणजे हा उक्तिविशेष सहज उच्चारला जातो. अतिशय, अपरंपार या अर्थानेही हा उक्ति-विशेष वापरतात.

२४२. नमः शिवाय

सं. – शैव संप्रदायाचा मुख्य मंत्र.
आद्य श्रीशंकराचार्यांनी रचिलेल्या शिवपञ्चाक्षरस्तोत्रामध्ये या मंत्राच्या प्रत्येक अक्षराला धरून एकेक श्लोक केलेला आहे व त्या श्लोकाच्या शेवटी ' नमः शिवाय ' हा मंत्र आला आहे. पाचपैकी येथे पहिला श्लोक घेतला आहे.
मू. – **नागेन्द्रहाराय त्रिलोचनाय भस्माङ्गरागाय महेश्वराय ।**
नित्याय शुद्धाय दिगंबराय तस्मै नकाराय नमः शिवाय ॥
अ. – ' नागराज ज्याने हारासारखा गळ्यात घातलेला आहे अशा, तीन नेत्र असलेल्या, शरिरावर भस्म धारण केलेल्या अविनाशी, शुद्धस्वरूप, दिशा हेच वस्त्र धारण केलेल्या महेश्वराला, ' न 'काररूपी शिवाला नमस्कार असो. '
व्य. – अनिष्टाचे निवारण करणारी, त्यागाची, तपाची, योगादी गूढ विद्यांची व अध्यात्मज्ञानाची देवता म्हणून शिव – म्हणजेच शंकर – हे भारतीय संस्कृतीतील श्रेष्ठ दैवत आहे. या देवतेचा हा सिद्धमंत्र अनेक साधक व सिद्ध सर्वकाळी जपत असलेला एक प्रमुख मंत्र आहे. यांतील आद्याक्षरे धरून एकेक श्लोक लिहिलेली अशी मुख्यत: रुद्रयामल तंत्रातील शिवषडक्षरस्तोत्र (ॐसह नमः शिवाय), तसेच श्रीमत् वासुदेवानन्द सरस्वती यांच्यासारख्या सिद्ध पुरुषांनी लिहिलेले स्तोत्र इ. स्तोत्रे प्रसिद्ध आहेत.

२४३. (ॐ) नमः सिद्धम्

सं. – जैनांच्या नित्य जपनीय मंत्रातील एक मंत्र. (भा. सं. को. ३. ६६४)
मू. – **ॐ नमः सिद्धम् ।**
अ. – ' सिद्धांना नमस्कार असो. ' (सिद्धांना म्हणजे महावीरांना नमस्कार असो)
ओं नमः सिद्धेभ्यः । नमः सिद्धाय । : पाठभेद (याचेच सिद्धं असे चुकीचे रूप रूढ झाले.)

अव्य. – शिक्षणाला प्रारंभ करताना 'श्रीगणेशाय नमः ।' 'ॐ नमः सिद्धाय ।' असे मुलांना म्हणावयास सांगत. केवळ शिक्षणच नव्हे तर कोणत्याही महत्त्वाच्या कार्याचा आरंभ 'ॐ नमः' ने केला जातो. याचेच अपभ्रष्ट रूप 'ओनामासिधम्' हे प्रचलित आहे. व्यवहारात कोणत्याही गोष्टीला प्रारंभ करणे किंवा शिक्षणात पहिला पाठ गिरविणे ह्या दोन्हींचे वर्णन 'ओनामा केला' अशा शब्दांत केले जाते.

२४४. न मातुः परदैवतम्

सं. – सप. न ४.

मू. – नान्नोदकसमं दानं न तिथिर्द्वादशीसमा ।
न गायत्र्याः परो मन्त्रो न मातुः परदैवतम् ।।

अ.– 'अन्न-पाणी देणे यासारखे (श्रेष्ठ) दान नाही, द्वादशीसारखा (पवित्र) दिवस नाही, गायत्रीहून श्रेष्ठ मंत्र नाही, आईहून मोठी देवता नाही.'

व्य. – जन्माला आल्यापासून भरणपोषण करणारी, स्वतःच्या जीवापलीकडे प्रयत्न करून रक्षण करणारी, सदैव प्रेमाची पाखर घालणारी व्यक्ती आईशिवाय दुसरी कोणी नाही. तिच्याबद्दलचा सर्वाधिक पूज्यभाव व्यक्त करण्यासाठी ही शब्द-संहती वापरली जाते. आईविषयीच्या सर्व भावना तिच्यात एकवटल्या आहेत. ज्ञानेश्वरांसारखे संतश्रेष्ठ, लहान वयाचे असूनही 'ज्ञानेश्वरमाउली' म्हणून त्यांच्याविषयीचे प्रेम व पूज्यभाव व्यक्त केला जातो.

२४५. न मूर्खजनचित्तमाराधयेत्

(पाहा : लभेत सिकतासु तैलम्)

सं. – नीश. ४. नीतिशतकात मूर्खाचे वर्णन करणारे श्लोक अनेक आहेत. येथे अशक्य वाटणारे, अत्यंत दुष्कर कार्य देखील करता येईल; परंतु मूर्ख माणसाचे समाधान करणे किंवा मन वळविणे शक्य नाही, हे भर्तृहरीला सुचवावयाचे आहे.

मू.: – लभेत सिकतासु तैलमपि यत्नतः पीडयन्
पिबेच्च मृगतृष्णिकासु सलिलं पिपासार्दितः ।
कदाचिदपि पर्यटञ्शशविषाणमासादयेत्
न तु प्रतिनिर्विष्टमूर्खजनचित्तमाराधयेत् ।।

अ. – 'प्रयत्न करून, पिळून वाळूपासून तेलही मिळू शकेल. तहानेने व्याकुळ झालेला मनुष्य मृगजळातील पाणी पिऊ शकेल. शोध करीत फिरताना एखादे वेळी सशाचे शिंगही मिळेल; परंतु दुराग्रही असलेल्या मूर्ख माणसाची समजूत पटविणे शक्य नाही.'

व्य. – 'परंतु मूर्खाचे हृदय धरवेना क्षणभरी' हे वरील सुभाषिताचे मराठी भाषांतर किंवा 'शहाण्याचा व्हावे चाकर पण मूर्खाचे होऊ नये धनी' ही नेहमी वापरली जाणारी प्रसिद्ध मराठी म्हण आडमुठ्या आणि दुराग्रही माणसाचे मन वळविणे, त्याला प्रसन्न करणे किती त्रासदायक आहे हे सुचविण्यासाठी वापरली जाते. 'लभेत सिकतासु तैलम्' हा श्लोकाचा पूर्वार्धही 'प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलही गळे' या त्याच्या मराठी भाषांतरासह प्रसिद्ध आहे. 'प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यास कोणतीच गोष्ट असाध्य नाही.' या अर्थानेही हा उक्तिविशेष वापरला जातो.

२४६. न मे दह्यति किञ्चन

सं. – महा. १२.१७.१८. राजधर्म पर्वात, द्रौपदीसह पाच पांडव बसून युद्धाविषयी बोलत असताना, युधिष्ठिर त्यांना जनकाने सांगितलेल्या मोक्षधर्माची 'गीता' सांगतो.

महा. १२.१७१.५६. युधिष्ठिराला मोक्षधर्माचा उपदेश करताना भीष्मांनी जीवन्मुक्त जनक राजाच्या निर्विकार वृत्तीचे वर्णन केले आहे.

(दोन्ही ठिकाणी एकच श्लोक आहे.)

सू. – **अनन्तं बत मे वित्तं यस्य मे नास्ति किञ्चन ।**
मिथिलायां प्रदीप्तायां● न मे दह्यति किञ्चन ॥

● प्रदग्धायां : पाठभेद

अ. – 'ज्या माझे येथे काहीच नाही, त्या माझे 'अनंत' धन आहे. मिथिला–नगरी जळू लागली तरी माझे काही जळत नाही.'

व्य. – अग्नी ज्याला जाळू शकत नाही अशा आत्मस्वरूपाचे ज्ञान झालेल्या जनक राजाच्या अन्तःकरणात अहं – मम हा भाव उरला नाही. सर्वत्र एकच ब्रह्म भरून राहिले आहे; त्यावेगळे काहीच उरले नाही, असा साक्षात्कार झाल्यानंतर सृष्टीतील कोणत्याही घटनेमुळे मनाचा क्षोभ होत नाही. या शांत व निस्संग अवस्थेचा निदर्शक म्हणून वरील उक्तिविशेष प्रसिद्ध आहे.

२४७. न मे भक्तः प्रणश्यति

सं. – भगी. ९.३१. भक्तियोगाचे महत्त्व सांगणाऱ्या अध्यायात श्रीकृष्णाने आपल्या भक्तांना कायमचे आश्वासन दिले आहे व त्यांच्या रक्षणाची प्रतिज्ञाच येथे केली आहे.

सू. – **क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छान्तिं निगच्छति ।**
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥

अ. – '(माझी भक्ती करणारा) तो लवकर धर्मात्मा होतो व त्याला अखंड शांती प्राप्त होते. हे अर्जुना, तू हें निश्चित समज की, माझा भक्त (कधीही) नाश पावत नाही.'

व्य. – भक्तीला कोणत्याही बाह्य साधनसामग्रीची आवश्यकता नसते. तसेच, भक्ताचे पूर्वचरित्र शुद्ध नसले तरी शुद्ध–बुद्ध–मुक्त अशा परमेश्वरावर दृढ श्रद्धा ठेवून तो त्याचे भजन, स्मरण करू लागला की त्याचे पाप धुवून जाते, त्याचे सर्व जीवनच बदलून जाते. दृढ श्रद्धेने सर्व समर्थ परमेश्वराचा आश्रय करणारा मनुष्यच नव्हे, तर इतर कमी बुद्धीचे प्राणीही मोठ्या आपत्तीतून तरून जातात. 'माझा भक्त – मग तो स्त्री असो अगर पुरुष असो, तो पूर्वायुष्यातील गुन्हेगार असो किंवा सज्जन असो, भक्त म्हणून मला तो अत्यंत प्रिय आहे व त्याचे पतन कधीही होणार नाही याची मी काळजी घेतो'– ही भगवंताची प्रतिज्ञा अध्यात्ममार्गाची वाटचाल करणाऱ्या सर्वच साधकांना ध्रुवताऱ्यासारखी दिलासा देणारी आहे. काही धार्मिक संस्थांनी ध्येयवाक्य म्हणून या उक्तिविशेषाचा स्वीकार केलेला आढळतो.

२४८. न मे स्तेनो जनपदे

सं. – महा. २.७८.८. युधिष्ठिराला राजधर्माचा उपदेश करताना भीष्मांनी केकय राजाचे आख्यान सांगून आदर्श राज्याचे वर्णन केले. वनात तपस्या करणाऱ्या केकयाला राक्षसाने पकडताच त्याने 'माझ्या राज्यात कोणीही पातकी नसल्याने तू मला पकडू शकणार नाहीस,' असे राक्षसाला सांगितले. राज्यात पापी कोणीच नसल्याने केकय राजाला राक्षसाची भीती वाटली नाही.

मू. – **न मे स्तेनो जनपदे न कदर्यो न मद्यपः ।**
नानाहिताग्निर्नायज्वा मामकान्तरमाविशः ॥

अ. – 'माझ्या राज्यात कोणी चोर नाही, कंजुष नाही आणि कोणी दारूबाज नाही; अग्नीमध्ये आहुती न देणारा व यज्ञ न करणारा मनुष्य माझ्या राज्यात नाही; मग तू माझ्या ठिकाणी काय म्हणून प्रवेश केलास ?'

व्य. – केकय राजाने आपल्या राज्याचे केलेले वर्णन इतिहासामध्ये आदर्श राज्याचे प्रमाणभूत वर्णन मानले जाते, असे भीष्मांनी महाभारतकाली म्हटले आहे.आजच्याही काळात हा आदर्श राज्यकर्त्यांना प्रमाणभूत ठरेल; व त्या आदर्शापासून आपण किती दूर आहोत किंवा जवळ आहोत हे कळेल.

२४९. न रत्नमन्विष्यते मृग्यते हि तत्

सं. – कुसं. ५.४५. शंकराची पती म्हणून प्राप्ती व्हावी या इच्छेने वनामध्ये राहून कठोर तपश्चर्या करणाऱ्या पार्वतीची परीक्षा घेण्यासाठी, ब्रह्मचारी वेशामध्ये तेथे आलेल्या शंकराने तिच्या तपस्येचे कारण तिला विचारले.

मू. – दिवं यदि प्रार्थयसे वृथा श्रमः पितुः प्रदेशास्तव देवभूमयः ।
अथोपयन्तारमलं समाधिना न रत्नमन्विष्यते मृग्यते हि तत् ।।

अ. – 'स्वर्गप्राप्तीच्या इच्छेने तू तप करीत असशील तर तुझे श्रम व्यर्थ आहेत. (कारण) स्वर्ग तुझ्या वडिलांच्या प्रदेशातच अंतर्भूत आहे. योग्य पतीच्या प्राप्तीकरिता तपस्या करीत असशील तरी तुझ्या तपाचा उपयोग नाही. खरोखर, रत्न हे (आपला ग्राहक) शोधीत नाही; तर लोकांकडून रत्नाचा शोध केला जातो.'

व्य. – स्वतःच्या तेजाने चमकणाऱ्या व आसमंतालाही प्रकाशित करणाऱ्या बहुमोल वस्तूला किंवा व्यक्तीला चाहणारे लोक तिच्या तेजाने आकर्षित होऊन तिचा सन्मान करतात. त्यासाठी वेगळी खटपट करण्याची आवश्यकता नसते. गुणी माणसांच्या बाबतीतले हे सत्य कालिदासाने आपल्या ललितमधुर भाषेत सांगितले आहे.

२५०. न वा अरे पत्युः कामाय

सं. – बृहदा. २.४.५. संन्यास घेण्यापूर्वी याज्ञवल्क्यांनी आपल्या धनसंपत्तीची आपल्या दोन्ही पत्न्या – कात्यायनी व मैत्रेयी – यांच्यामध्ये वाटणी केली. पण ती संपत्ती नाकारून, शाश्वत सुख ज्याने मिळेल अशा मोक्षाचा उपदेश करण्याविषयी याज्ञवल्क्यांची प्रार्थना मैत्रेयीने केली. याज्ञवल्क्यांनी तिला आत्मतत्त्वाविषयी उपदेश केला.

मू. – सहोवाच न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति ।
आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति ।।

अ. – याज्ञवल्क्य म्हणाले, 'पतीकरिता पत्नीला पती प्रिय वाटत नाही; तर स्वतःच्या कामनेकरिता तिला पती प्रिय होतो.'

व्य. – ज्याच्या सुखाची साधने मिळविण्याचा व ती टिकविण्याचा आटापिटा मनुष्य करतो, त्यासाठी प्रसंगी नीतिधर्म डावलतो, दुसऱ्याच्या सुखदुःखाची पर्वा करीत नाही, तो 'मी' खरोखर कोण आहे– हा अध्यात्मशास्त्रातील प्रधान विचार आहे. त्याच्याकडे याज्ञवल्क्यांनी येथे जिज्ञासूंचे लक्ष वेधले आहे. बाह्य वस्तूवरील प्रेम हे खरोखर स्वतःबद्दलच्या म्हणजे आत्म्याच्याच प्रेमाचे व्यक्त स्वरूप होय. मात्र व्यवहारात माणसाच्या निव्वळ स्वार्थाला कठोर व्यावहारिक सत्याला उद्देशून हा उक्तिविशेष वापरला जातो.

२५१. न वैद्यः प्रभुरायुषः

सं. – सप. न ४३.

मू. – व्याधेस्तत्त्वपरिज्ञानं वेदनायाश्च निग्रहः ।
एतद्वैद्यस्य वैद्यत्वं न वैद्यः प्रभुरायुषः ।।

अ. – 'रोगाच्या स्वरूपाचे व मूळ कारणाचे ज्ञान आणि वेदना थांबविणे हे वैद्याचे कार्य आहे (त्यामुळे त्याला वैद्य म्हटले जाते.) वैद्य आयुष्याचे नियंत्रण करू शकत नाही. (आयुष्य वाढवू शकत नाही.)'

व्य. – वैद्याचे योग्य कार्य आणि त्याच्या मर्यादा या सुभाषितात मोजक्या शब्दात सांगितल्या आहेत. म्हाताऱ्या किंवा मृत्युपंथाला लागलेल्या माणसाचे आयुष्य वाढविण्याचे सामर्थ्य त्याच्या औषधोपचारात नसते. ज्या वेळी मनुष्य अशा प्रकारची आशा करतो त्या वेळी लवकरच त्याला हे सत्य कळून येते.

२५२. न त्वहं कामये राज्यं

(पाहा : कामये दुःखतप्तानां)

२५३. न शोभार्थाविमौ बाहू

सं. – वारा. २.२३.३०.३१. रामाने राज्यावर बसावे असा लक्ष्मणाने आग्रह धरला. रामाच्या शत्रूंना शासन करण्याचे सामर्थ्य आपल्या बाहूंत आहे असा विश्वास त्याने प्रकट केला.

सू. – **न शोभार्थाविमौ बाहू न धनूर्भुषणाय मे ।**
नासिराबन्धनार्थाय न शराः स्तम्भहेतवः ॥ वारा. २.२३.३०.
अमित्रमथनार्थाय सर्वमेतच्चतुष्टयम् ।
न चाहं कामयेऽत्यर्थं यः स्याच्छत्रुर्मतो मम ॥ वारा. २.२३.३१.

अ. – लक्ष्मण म्हणाला ' हे माझे बाहू काही शोभेकरिता नाहीत. हे धनुष्य मी अलंकार म्हणून धारण केलेले नाही. ही तलवार मी केवळ कमरेला लटकविण्यासाठी घेतलेली नाही व हे बाण भात्यात नुसते पडून राहण्यासाठी मी बाळगलेले नाहीत. या चारही वस्तू शत्रूचा नाश करण्यासाठी आहेत. जो वैरी मानला त्याला जिवंत पाहणे मला शक्य नाही. '

व्य. – आपले बल ज्यात आहे असा आपला विशेष गुण किंवा वस्तू नेहमी पाजळलेली, जागृत ठेवावी लागते; नाहीतर ती निस्तेज, केवळ देखाव्याची वस्तू होते. व्यवहारात हा उक्तिविशेष एखाद्याचा धाक किंवा पराक्रम प्रकट करण्यासाठी वापरला जातो.

२५४. न सा सभा

सं. – वारा. ७.५९. प्र. ३.३३. राम अयोध्येत राज्य करीत असताना अरण्यात एका उलूक (घुबड) आणि गिधाड यांचे राहण्याच्या जागेवरून भांडण उत्पन्न झाले. ते दोघे रामाच्या राजसभेत आले. सभासदांना उद्देशून, त्यांनी सत्य बोलावे म्हणून या शब्दांत रामाने त्यांना आवाहन केले.

महा. २. प्रउ. ५४०.१. द्यूतपर्वात, कौरवांच्या राजसभेत बसून द्यूतात द्रौपदीला पणाला लावून तिला कौरवांची दासी बनवून दरबारात ओढून आणले असता, द्रौपदीने स्वस्थ बसलेल्या भीष्मादी वृद्धांना या तीव्र शब्दांत धर्माचे, सत्याचे स्मरण करून दिले.

महा. ५.३५.४९. प्रजागरपर्वात, विदुराने भीष्माला धर्मोपदेश करताना वृद्ध, धर्म, सत्य इत्यादींची लक्षणे सांगितली.

(श्लोक सर्व ठिकाणी एकच आहे.)

मू. – न सा सभा यत्र न सन्ति वृद्धाः न ते वृध्दा ये न वदन्ति धर्मम् ।
नासौ धर्मो यत्र न सत्यमस्ति न तत्सत्यं यच्छलेनानुविद्धम् ।।

अ. – 'ज्यामध्ये परिपक्व अशी वृद्ध माणसे नाहीत ती सभाच नव्हे; जे धर्माला अनुसरून बोलत नाहीत ते वृद्ध नव्हेत; ज्याच्यामध्ये सत्य आढळत नाही तो धर्म नव्हे; आणि जे कपटाने दूषित झाले आहे ते सत्य नव्हे.'

व्य. – द्रौपदीने केलेल्या–सभा, वृद्ध, धर्म, सत्य यांच्या उत्स्फूर्त व्याख्या किंवा लक्षणे मोजक्या आणि परिणामकारक शब्दांत येथे सांगितल्या आहेत. कौरवसभेतील वयोवृद्धांच्या स्थितीचे विदारक चित्र तिने या शब्दांत उभे केले आहे. विद्वान आणि वयोवृद्ध म्हणविणाऱ्यांच्या सभेत आजही असे अन्याय्य निर्णय ज्या वेळी घेतले जातात त्या वेळी द्रौपदीची ही उक्ती स्मरते; तसेच धर्माचे रहस्य जे सत्य त्याचा अपलाप जेव्हा धर्माच्या नावाखाली होतो तेव्हा या उक्तीची सार्थकता पटते.

२५५. न स्त्री स्वातंत्र्यमर्हति

सं. – मनु. ९.३. स्त्रियांनी व पुरुषांनी पाळावयाचे धर्माचे नियम सांगताना मनूने वेगवेगळ्या अवस्थेत स्त्रियांचे रक्षण कोणी व कसे करावे याचे विवेचन केले आहे.

महा. १३.४६.१३. दानधर्मपर्वात, स्त्रीप्रशंसा करताना स्त्रियांचे संसारातील बहुमानाचे स्थान सांगताना भीष्मांनी युधिष्ठिराला स्त्रीच्या रक्षणाची व्यवस्था सांगितली.

महा. १. प्रउ. ६०५.४. शकुन्तलोपाख्यानात, दुष्यन्ताने शकुंतलेला विवाहाविषयी विचारले असता तिने 'मी पित्याच्या आधीन आहे; तो ज्याला देईल त्याला मी वरीन, मी स्वतंत्र नाही' असे सांगितले.

मू. – पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
□ रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।।

□ पुत्रास्तु स्थविरीभावे : पाठभेद
(या दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे.)
राज्ञा. १ उविसं. १०

अ.–' बालवयात वडील सांभाळतात तर तारुण्यात पती रक्षण करतो. म्हातारपणी मुलगे काळजी घेतात; स्त्रीला स्वतंत्रपणे राहू देणे योग्य नाही.'

व्य. – मनूचे हे वचन जगप्रसिद्ध आहे; व त्याच्यावरून सनातनी आणि आधुनिक मताच्या लोकांमध्ये वादंग माजले आहे. स्त्रियांना घरात डांबून ठेवून पुरुषांचे वर्चस्व त्यांच्या डोक्यावर कायम राहील, पुरुषांच्या मर्जीप्रमाणे वागण्यातच त्यांच्या जीवनाचे सार्थक आहे, अशी पुरुषांची आणि स्त्रियांची समजूत ठाम होईल असे मनूचे धोरण आहे व तेच समाजाने स्वीकारले आहे, त्यामुळे स्त्रियांवर अन्याय झाला व एकंदर सामाजिक हानी झाली– असे आधुनिक विचारक मानतात. स्त्रीदास्यविमोचनाची चळवळही, मनूच्या या अशा तऱ्हेने समजूत करून घेतलेल्या धोरणाचा प्रतिकार म्हणून सुरू झाली.

परंतु मनूच्या वचनाचा हा विपर्यास हेतुतः वा अज्ञानाने झालेला दिसतो. मनूच्या वचनाचा विपरीत अर्थ लावून काहींनी मनूला धारेवर धरले तर काहींनी त्यातून आपल्याला सोयीस्कर अर्थ काढून स्त्रीवर बंधने लादली. वास्तविक स्त्रीच्या विशिष्ट नैसर्गिक परिस्थितीमुळे तिला वाऱ्यावर सोडून देणे अनिष्ट आहे, (स्वातंत्र्यं न अर्हति) असा याचा अर्थ लावावा लागेल.

स्त्रीच्या नैसर्गिक जबाबदारीमुळे आणि दुर्बलतेमुळे तिच्यावर येणाऱ्या मर्यादा सांभाळल्या जाव्यात यासाठी तिला कोणाचे ना कोणाचे संरक्षण आवश्यक असते; पण त्यामुळे तिच्या विकासाला अडथळा होऊ नये, तिच्यावर अन्याय होऊ नये एवढी दक्षता समाजधुरीणांनी घ्यावी हा या वादातला सुवर्णमध्य ठरावा.

२५६. न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति

सं. – भगी. ६.४०. योगसाधनेचा, मनोनिग्रहाचा प्रयत्न करणारा एखादा साधक त्या मार्गापासून चळला तर त्याची अवस्था कशी होते, या अर्जुनाच्या प्रश्नाला भगवान् श्रीकृष्णांनी दिलेले हे आश्वासनवजा उत्तर आहे.

मू. – पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।

न हि कल्याणकृत् कश्चित् दुर्गतिं तात गच्छति ।।

अ. – 'अर्जुना, इहलोकी किंवा परलोकी त्याचा नाश होत नाही. हितकारक कर्म करणारा कोणीही वाईट गतीला जात नाही.'

व्य. – अध्यात्ममार्गावरची वाटचाल ही एकाच जन्माची नसते, अनेक जन्म उपासना, भक्तिद्वारा चित्तशुद्धी, आत्मज्ञान असा तो दीर्घकाळाचा प्रवास असतो. त्यामध्ये अडथळे अनेक असतात, पतनाचे भय असते; क्षणोक्षणी सावध असावे लागते. एखाद्या साधकाला काही विशिष्ट अवस्था गाठण्याकरिता काही काळ थांबावे लागते; मग त्याने पूर्वी केलेली तपस्या अर्धवट राहिल्यामुळे फुकट जाते की काय, हा

प्रत्येक साधकापुढे येणारा प्रश्न आहे. भगवंतांनी त्याला हे निश्चित उत्तर देऊन सर्वच सत्प्रवृत्त व्यक्तींना, त्यांचे कोणतेही हितकारक कृत्य वाया जात नाही, असा दिलासा दिला आहे.

२५७. न हि कस्तूरिकामोदः शपथेन विभाव्यते

सं. – सुर. २. गुणप्रशंसा ६. गुणांचे अस्तित्व आपोआप जाणवते. त्यासाठी त्याचा आवर्जून उल्लेख करावा लागत नाही. जसा कस्तुरीचा सुगंध वातावरणात पसरून आपले अस्तित्व जाणवून देतो, तिचा सुगंध लपत नाही, तद्वतच अंगीचे गुण सांगावे लागत नाहीत किंवा त्यासाठी कसला पुरावा वा साक्ष यांची गरज नसते.

सुर. १. सज्जनप्रशंसा २९. गुण काय किंवा सज्जनता काय जी आहे ती आहे हे पुनश्च सांगण्यात काही अर्थ नसतो. ती आपल्या तेजाने प्रकट होतेच. दूर रानात असलेल्या कस्तुरीमृगाचा शोध जसा वातावरणातील तिच्या सुगंधाने आपोआप लागतो, तद्वतच साधुता साध्या साध्या गोष्टींतही प्रत्ययाला येते.

सू. – **यदि सन्ति गुणाः पुंसां विकसन्त्येव ते स्वयम् ।**

नहि कस्तूरिकामोदः शपथेन° विभाव्यते ।। सुर. २. गुणप्रशंसा ६.

°**निवार्यते** : पाठभेद

अ. – 'पुरुषाच्या अंगी जर गुण असतील तर ते आपोआप वृद्धिंगत होतील (सर्वांना ज्ञात होतील). कस्तुरीला सुगंध असल्याचे शपथ घेऊन सांगावे लागत नाही (त्याचा तात्काळ प्रत्यय येतो).

सू. – **सन्तः स्वतः प्रकाशन्ते गुणा न परतो नृणाम् ।**

आमोदो न हि कस्तूर्याः शपथेन विभाव्यते ।। सुर. १. सज्जनप्रशंसा २९.

अ. – ' सज्जन माणसे सहजी ओळखता येतात. त्यांचे सौजन्य, साधुता (प्रत्येक कामात) उठून दिसते. (असे) गुण काही बाहेरून माणसात घालता येत नाहीत (ते मुळातच असावे लागतात). कस्तुरीचा सुगंध शपथ घेऊन सांगावा लागत नाही (तिचा सुवास सर्वांनाच येतो).

व्य. – कस्तुरीसारखा सुगंधी वस्तूचा दृष्टान्त देवून सुभाषितकाराने गुणप्रचीती-साठी इतर कशाचीही गरजच नसते हे मार्मिकपणे सुचविले आहे. व्यवहारात ज्या वेळी एखाद्या गोष्टीवर विश्वास बसत नाही त्या वेळी शपथेने निर्वाह केला जातो. शपथ घेण्याने विश्वास उत्पन्न केला जातो. तसा कस्तुरीच्या सुगंधाचा प्रश्न नसतो. निर्विवादपणे तो जाणवतो. माणसांच्या गुणांचेही असेच आहे. विश्वास असण्यानसण्याचा तेथे प्रश्न येत नाही. कारण गुणांचा अनुभव आल्याने त्याविषयी शंका राहात नाही. म्हणून एखाद्या गोष्टीची निर्विवाद सत्यता पटविण्यासाठी या उक्तिविशेषाचा उपयोग केला जातो.

२५८. न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते

सं. – भगी. ४.३८.सर्व यज्ञांत ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे. परमेश्वराच्या स्वरूपाचे ज्ञान करून घेऊन त्याला अनुरूप अशी कर्मे समत्वबुद्धीने करणे यालाच ज्ञानयज्ञ म्हणतात.समत्वाने पापपुण्याची बाधा कर्त्याला न लागता हा यज्ञ मोक्षप्रद होतो. ज्ञानाचे महत्त्व वर्णन करणारा हा श्लोक आहे.

मू. – न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ।।

अ. – ‘ज्ञानासारखे परम शुद्ध या जगात दुसरे काहीही नाही. ज्याला योग (निष्काम कर्मे करण्याची युक्ती) साधला त्याला काही काळानंतर ज्ञान आपोआप प्राप्त होते.’

व्य. – ज्ञानाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कोठलीही क्रिया ज्ञानपूर्वक केल्यासच श्रेयस्कर ठरते, असा अनुभव आहे. ज्ञान हे मोक्षाचे साक्षात् साधन आहे. (ज्ञानादेव तु कैवल्यम् ।) ज्ञान हे अग्नीसारखे आहे. ज्ञानी मनुष्याची कर्मे स्वतःचे बंधकत्व टाकून ज्ञानरूप होतात. म्हणून ज्ञान हे एकमेव मोक्षाचे साधन शंकराचार्यासारख्या वेदान्त्यांनी मानले आहे. कर्मयोग, भक्तियोग, ध्यानयोग या इतर मार्गांचा अवलंब केला तरी शेवटी त्यातून ज्ञानाचा उदय होतो आणि त्यामुळेच मोक्ष मिळतो, असा त्यांचा अभिप्राय आहे. म्हणूनच सर्व कर्म ज्ञानात लय पावते (भगी. ४.३३) असे भगवंतांनी स्पष्ट म्हटले आहे. केवळ मोक्षच नव्हे, तर कोणत्याही प्रकारची प्रगती, उन्नती ज्ञानाखेरीज होणार नाही, हे जाणूनच आधुनिक कालात अनेक शिक्षणसंस्थांनी, ज्ञानपीठांनी हे आपले ध्येयवाक्य म्हणून स्वीकारले आहे.

२५९. न हि वन्ध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनाम्

सं. – कुवलयानंद ५१. सुर. २. पंडितप्रशंसा ५. पांडित्य मिळवणे ही सुलभ गोष्ट नाही. अर्थात् केवळ पढिक पंडित येथे अपेक्षित नाही. ज्ञानी माणसांचे परिश्रम जाणण्याला जाणकारच हवा, हे सुभाषितकाराने ठासून सांगितले आहे.

मू. – विद्वानेव विजानाति विद्वज्जनपरिश्रमम् ।
न हि वन्ध्या विजानाति गुर्वीं प्रसववेदनाम् ।।

अ. – ‘(शास्त्राभ्यास करून त्यातील ज्ञान आत्मसात् केलेल्या) विद्वानालाच, (दुसऱ्या) विद्वानाने अध्ययनासाठी केलेल्या परिश्रमांची जाण असते. खरोखर, सोसण्यास सर्वांत कठीण अशी प्रसूतीच्या वेळची वेदना, वांझ स्त्रीला कशी कळणार?’

व्य. – ‘जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे’ हा मराठी उक्तिविशेष याच अर्थाचा आहे. कोणतेही कार्य यशस्वीपणे पुरे करण्याच्या परिश्रमांची व त्यातील अडथळ्यांना तोंड देऊन त्यावर मात करण्यासाठी लागणाऱ्या धैर्याची कल्पना, तशा

प्रकारचे काम करणाऱ्यालाच येऊ शकते. स्वतः काहीही न करता, कोणी दुसऱ्याने परिश्रमपूर्वक साधलेल्या कार्यावर टीका करतो त्या वेळी जाणत्या माणसाच्या तोंडून हा उक्तिविशेष सहज प्रगट होतो.

२६०. न हि स्त्रीवधकृते घृणा कार्या

सं. – वारा. १.२५.१७. यज्ञरक्षणासाठी वनात संचार करीत असताना, तपोभूमीचा विध्वंस करणाऱ्या ताटिकेचा वध करण्याची विश्वामित्रांनी रामाला आज्ञा केली.

मू. – **न हि ते स्त्रीवधकृते घृणा कार्या नरोत्तम ।**
चातुर्वर्ण्यहितार्थं हि कर्तव्यं राजसूनुना ।।

अ. – 'हे नरश्रेष्ठा, स्त्रीवध करावा लागत आहे म्हणून तुला लाज वाटायला नको. चारी वर्णांचे हित करण्यासाठी राजपुत्र म्हणून तू हे कर्म केले पाहिजेस.'

व्य. – प्रजाजनांचे रक्षण करणे हे राजाचे मुख्य कर्तव्य आहे. ते पार पाडीत असताना वैयक्तिक धर्माच्या दृष्टीने एखादे कृत्य दोषास्पद वाटले तरी ते केले पाहिजे. समाजाचा घात करणारी व्यक्ती मग ती एखादी स्त्री असली तरी ती वंध्यच होते, हे सांगण्यासाठी या उक्तिविशेषचा उपयोग केला जातो.

२६१. न हिंदुर्न यवनः

सं. – सप. न ४४.

मू. – **न संध्या संधत्ते नियमित नमाजं न कुरुते**
न वा मौंजीबन्धं कलयति न वा सुंनतविधिम् ।
न रोजां जानीते व्रतमपि हरेर्नैव कुरुते
न काशी मक्का वा शिव शिव न हिंदुर्न यवनः ।।

अ. – 'रोज संध्या करीत नाही आणि नियमाने नमाजही पढत नाही. मुंजीचा संस्कार नाही किंवा सुंताही केली नाही. रोजा (ठराविक दिवसांचा उपवास) पाळण्याचे ठाऊक नाही किंवा शिवरात्रीचे व्रतही करीत नाही. काशीयात्रा करीत नाही किंवा मक्केलाही जात नाही. हर ! हर ! (काय ही दुरवस्था !) ह्याला हिंदूही म्हणता येत नाही आणि मुसलमानही म्हणता येत नाही.'

व्य. – मुंज करून यज्ञोपवीत (जानवे) घालणे, रोज नियमाने संध्या करणे, उपवासादि व्रते, देवतांची उपासना व तीर्थयात्रा करणे ही हिंदू म्हणविणाऱ्या माणसाची लक्षणे होत; तर रोज नमाज पढणे, रोजाचे दिवस आले की उपवास करणे, इत्यादी मुसलमान म्हणविणाऱ्याची कर्तव्ये होत. पण धर्माचे संस्कार निष्प्रभ झाले म्हणजे निष्ठेने कोणतेच आचार पाळले जात नाहीत. जगण्यासाठी खाणेपिणे आणि खाण्यासाठी जगणे–येवढेच माणसे करू लागली म्हणजे त्यांच्या आचारभ्रष्टतेचे वर्णन वरील उक्तिविशेषाने केले जाते.

२६२. नातिचरामि

सं. – विवाहाच्या वेळी कन्यादानाचा विधी चालू असताना, वराने कन्येचा स्वीकार केल्यानंतर तिचा पिता वराला आपल्या जावयाला पत्नीशी एकनिष्ठ राहण्याचा उपदेश करतो, त्या वेळी वर त्याला या शब्दांत आश्वासन देतो :

मू. – **" धर्मे चार्थे च कामे च नातिचरितव्या त्वयेयम् । "**

" नातिचरामि । "

अ. – ' धर्म, अर्थ व काम या तीन्ही पुरुषार्थांच्या बाबतीत तू हिला बरोबरीने स्थान द्यावेस; हिला डावलून वागू नयेस.'

' मी हिची अवहेलना (करून दुसऱ्या स्त्रीकडे जाणार नाही.) करणार नाही.'

व्य. – पतिपत्नींनी परस्पर सहकार्याने, समजुतीने व प्रेमाने गृहस्थाश्रमातील सर्व कर्तव्ये करावीत, धर्माला अनुसरून प्राप्त झालेले सुखोपभोग घ्यावेत, असा हिंदू धर्माचा आदेश आहे. विवाह हा एक करार नसून संस्कार आहे या श्रद्धेला अनुसरून विवाहाच्या वेळी ' नातिचरामि ' असे एक प्रकारे प्रतिज्ञारूप वचन वर आपल्या सासऱ्याला देतो. हल्ली विवाहसंस्कारातील पावित्र्य व गांभीर्य बरेचसे नष्ट झाले असल्यामुळे आपण कोणते मंत्र ऐकतो, म्हणतो आहोत, त्यांचा अर्थ काय व त्यामुळे आपल्यावर कोणती जबाबदारी येते, या सर्व गोष्टींकडे वधू-वरांचे लक्ष नसते. परंतु ही प्रतिज्ञा वधूवरांनी भावी आयुष्यात ध्यानात ठेवणे आवश्यक आहे. हिंदू समाजात स्त्रीला–विवाहित स्त्रीला, पत्नीला केवढे महत्त्वाचे स्थान पूर्वाचार्यांनी देऊन ठेवलेले आहे हे यावरून लक्षात येईल.

२६३. नादत्तमुपतिष्ठते

सं. – सुर. ३. सामान्यनीति ५७२. केलेल्या कर्मांचेच फळ आपल्याला मिळते, हा सृष्टीतला महत्त्वाचा नियम किंवा न्याय या सुभाषितात सांगितला गेला आहे.

सप. न ५६.

मू. – **सत्यं सत्यं मुनेर्वाक्यं नादत्तमुपतिष्ठते ।**

अम्बुभिः पूरिता पृथ्वी चातकस्य मरुस्थली ॥ सुर. ३. सामान्यनीति ५७२.

अ. – ' जे दिलेले नाही ते प्राप्त होत नाही, हे मुनींचे वचन खरोखर पूर्ण सत्य आहे. भूमी जलाने पूर्ण भरलेली असूनही चातकाला (मात्र) ती वाळवंटासारखी निर्जल आहे. '

मू. – **पिता रत्नाकरो यस्य लक्ष्मीर्यस्य सहोदरी ।**

शङ्खो भिक्षाटनं कुर्यान्नादत्तमुपतिष्ठते ॥ सप. न ५६

अ. – ' रत्नांचे आगर असलेला समुद्र ज्याचा पिता व लक्ष्मी ज्याची बहीण आहे, अशा शंखाने भिक्षा मागत फिरावे ! खरोखर स्वतः दिल्याशिवाय प्राप्त होत नाही.

व्य. – सुखाची सर्व साधनसामग्री जवळ असूनही एखादा मनुष्य दुःख भोगतो; अंगी अनेक गुण, बुद्धिमत्ता असूनही एखादा मनुष्य उपेक्षित राहातो; त्याचे कारण आपल्याला समजू शकत नाही. अशा वेळी पूर्वकर्म, नशीब याशिवाय दुसरे काय कारण सांगणार? तेच या उक्तिविशेषात कर्माचा नियम म्हणून सांगितले गेले आहे. याशिवाय पेरल्याशिवाय उगवत नाही, स्वतः श्रम केल्याशिवाय फल-प्राप्ती होत नाही, असाही पर्याय यातून निघतो.

२६४. नादत्ते कस्यचित्पापम्

सं. – भगी. ५.१५. प्राणिमात्राला आपापल्या कर्मानुरूप फळे भोगावी लागतात; त्यात परमेश्वराचा काहीही संबंध नसतो. कारण परमेश्वर अकर्ता असून हा सर्व मायेचा खेळ आहे. सांख्य तत्त्वज्ञानात पुरुष उदासीन मानतात. वेदान्ती त्यालाच परमेश्वर म्हणतात. म्हणून सुखदुःखांचा संबंध कर्माशी असल्याने ते कर्म युक्तीने करण्याची कशी आवश्यकता आहे हे पटविण्यासाठी श्रीकृष्णांनी आत्म्याचे अकर्तृत्व आवर्जून विशद केले.

मू. – नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ।
अज्ञानेनावृत्तं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ।।

अ. – 'सर्वव्यापी असा आत्मा (किंवा परमेश्वर) कोणाचे पापही घेत नाही आणि पुण्यही घेत नाही. (पापपुण्याचा संबंध कर्माशी; परमेश्वरअलिप्त राहातो.) या ज्ञानावर अज्ञानाचे आवरण पडल्याने (मायेत गुरफटून) प्राणिमात्र मोहवश होतात (बंधनात अडकतात).'

व्य. – अध्यात्मशास्त्राच्या दृष्टीने आत्मा किंवा परमेश्वर अकर्ता आहे. पापपुण्य हे कर्माचे फल आहे. त्यामुळे या कर्मफलाशी जसा ईश्वराचा संबंध नाही तसा दुसऱ्या कोणत्या व्यक्तीचाही कर्मफलाशी संबंध असू शकत नाही. 'अमक्यातमक्या-मुळे माझे नुकसान झाले' किंवा 'अमक्याने मला दुःखी केले' असे उद्गार व्यवहारात नेहमी ऐकावयास मिळतात. आपल्या सुखदुःखाचा असा दुसऱ्याशी संबंध जोडणाऱ्यांनाच जणू श्रीकृष्णाने येथे उत्तर दिले आहे. श्रीकृष्णाच्या या उद्-गारांशी मिळताजुळता असा एक संस्कृत श्लोक प्रचलित आहे तो असा–'सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता परो ददातीति कुबुद्धिरेषा । अहं करोमीति वृथाभिमानः स्वकर्मसूत्रग्रथितो एव लोके ।।' थोडक्यात, प्रत्येक जीव हा आपल्या हातून घड-णाऱ्या कर्मानुसारच बरेवाईट फळ भोगीत असतो; त्याला दुसरा कोणीही कारणीभूत होऊ शकत नाही. हे ज्ञान जेव्हा अज्ञानामुळे लुप्त होते त्या वेळी प्राणी मोहवश होऊन परस्परांना दूषणे लावतात. यासाठीच 'कोणीही कोणाचेही पाप-पुण्य घेऊ शकत नाही' याची जाणीव या उक्तिविशेषाने करून दिली जाते

२६५. नान्ऋषिः कुरुते काव्यम् ।

(पाहा : नाविष्णुः पृथिवीपतिः)

सं. – सुर. ३. सामान्यनीति ३०३. मनुष्य जे कर्म करीत असतो किंवा ज्या स्थानावर असतो, त्याचा जो विशिष्ट गुण तो त्याच्या ठिकाणी असतोच हे सुभाषितकारांनी येथे सांगितले आहे.

मू. – **नान्ऋषिः कुरुते काव्यं नारुद्रः क्रमपाठकः ।**
नादेवांशो ददात्यन्नं नाविष्णुः पृथिवीपतिः ।।

अ. – ‘जो प्रतिभावान् द्रष्टा ऋषी नाही तो काव्य करीत नाही (करू शकत नाही). जो रुद्रस्वरूप नाही तो (वेदांचा) क्रमपाठ करणारा असत नाही. जो सत्त्वगुणी नाही तो अन्न देणारा नसतो. जो पृथ्वीचे पालन (किंवा शासन) करतो तो विष्णूचा (अंश) असल्याशिवाय राहाणार नाही.’

व्य. – प्रत्येक कामासाठी काही विशिष्ट पात्रता अंगी असावी लागते. ही पात्रता तपस्येने, प्रदीर्घ परिश्रमाने किंवा पूर्वपुण्याईने प्राप्त झालेली असते. द्रष्टेपणाशिवाय विचार सांगणे, प्रतिभा असल्याशिवाय काव्य करणे हे अनधिकाराचे अतएव समाजाच्या दृष्टीने हानिकारक ठरेल, असे येथे सुचवावयाचे आहे. त्याच अर्थाने हा उक्तिविशेष व्यवहारात उपयोजिला जातो.

या श्लोकाचा उत्तरार्ध ‘ ना विष्णुः पृथिवीपतिः ’ हा मुळात कितीही उदात्त अर्थाने योजिलेला असला तरी हिंदू समाजाच्या व आपल्या भारतीय राष्ट्राच्या दृष्टीने त्याचा व्यवहारातला उपयोग भयावह ठरलेला आहे. व्यक्तिपूजेच्या चटकन आहारी जाणे हा या समाजाचा, राष्ट्राचा सहजविशेष आहे. ग्रीक-हूणांपासून इस्लाम-इंग्रजांपर्यंत साऱ्या परकीय आक्रमकांना या दुर्गुणविशेषाचा भरपूर लाभ मिळालेला आहे. हिंदुस्थानातील, भारतातील अलीकडची राजकीय स्थित्यंतरे पाहिली तरी याचा प्रत्यय येऊ शकेल. त्यामुळे राजसत्ता कशीही असो, कोणाचीही असो तिच्या अधिसत्तेपुढे आणि अन्यायापुढेही मान तुकविणे आणि त्याला ‘धर्मपालना’चा, ‘धर्माचरणा’चा साज चढविणे हे या समाजाच्या नि राष्ट्राच्या अंगवळणी पडले आहे. त्याचे कारण हा उक्तिविशेष अगदी विपरीत अर्थाने उपयोगात आणला गेला हे असावे. वास्तविक असायला हवे होते ते असे की, पृथ्वीचा पालनकर्ता म्हणजेच राज्याधिकारी राजा, शासक हा विष्णूच्या गुणांना उतरणार नसेल, विष्णूच्या म्हणजे देवतेच्या पात्रतेचा नसेल, तर त्याला सिंहासनावरून फेकून देण्याचा, अधिसत्तेवरून खाली खेचण्याचा आदेश या उक्तिविशेषातून लोकांनी समजून घ्यायला हवा होता. परंतु रूढ आहे ते मात्र वेगळेच.

विष्णु हा पृथ्वीचा पालनकर्ता आहे. पृथ्वीवरील प्रजेचे भरणपोषण व रक्षण करणारी ही मुख्य देवता–दिव्य शक्ती आहे. तीच शक्ती वेगवेगळ्या लहान-

मोठ्या जनसमूहांचे नियमन करणाऱ्या प्रमुख व्यक्तीच्या रूपाने काम करीत असते. हे काम करणारी, राजाच्या सिंहासनावर वसणारी व्यक्ती कोणतीही असो, ती विष्णूच्याच शक्तीने युक्त असते, हे तिने कर्तव्याच्या दृष्टीने ध्यानात ठेवले पाहिजे. प्रजेनेही राजाचे महत्त्व ध्यानी घेऊन त्याच्या शासनाचा आदर केला पाहिजे – विशेषतः याच अर्थाने हा उक्तिविशेष प्रसिद्ध आहे.

२६६. नान्यतः शुद्धिमर्हतः

सं. – उरा. १.१३. सीतेचे मन रमविण्यासाठी चित्रकाराने सीताशुद्धीपर्यंतची काढलेली चित्रे दाखविण्यास लक्ष्मणाला रामाने सांगितले. या निमित्ताने शुद्धीचा विषय निघताच सीता पवित्र असल्याचा विश्वास रामाने बोलून दाखविला.

मू. – उत्पत्तिपरिपूतायाः किमस्याः पावनान्तरैः ।
तीर्थोदकं च वन्हिश्च नान्यतः शुद्धिमर्हतः ।।

अ. – (राम म्हणाला) 'जन्मतःच जी पवित्र आहे तिला पावन करण्यासाठी इतर पावन वस्तूंची आवश्यकताच काय ? तीर्थातील जल वा अग्नी काय (दोन्ही जात्याच पवित्र असताना) त्यांना दुसऱ्याकडून शुद्ध करून घेण्याची गरजच नसते !

व्य. – जी वस्तू मुळातच शुद्ध आहे तिच्या शुद्धीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही. अशुद्ध वा अपवित्र असेल त्याला शुद्ध, पवित्र केले जाते. याच अर्थाने व्यवहारात ज्या वेळी एखाद्या चारित्र्यसंपन्न व्यक्तीचे निष्कलंकत्व सिद्ध करण्यासाठी पावन वस्तूचा आश्रय घेतला जातो त्या वेळी रामाप्रमाणेच उद्गार काढले जातात.

२६७. नापृष्टः कस्यचित् ब्रूयात्

सं. – महा. १२.२७६.३४. मोक्षधर्मपर्वात, युधिष्ठिराने भीष्मांना सर्वांना आचरण्याजोगा कल्याणकारक धर्म कोणता, असे विचारल्यावरून भीष्मांनी त्याला नारद–गालव संवादातील महत्त्वाचा भाग सांगितला.

मू. – नापृष्टः कस्यचित् ब्रूयात् न चान्यायेन पृच्छतः ।
ज्ञानवानपि मेधावी जडवल्लोकमाचरेत् ।।

अ. – 'विचारले नसताना कोणालाही काही सांगू नये; तसेच जबरदस्ती केली असताही भाषण करू नये. सर्व गोष्टींचे ज्ञान असूनही बुद्धिमान माणसाने समाजात अडाणी माणसाप्रमाणे वागावे.'

व्य. – समाजात, कुटुंबात बोलावे कसे याचेही काही नियम सांगितले गेले आहेत. शहाणा, ज्ञाता मनुष्य असला, त्याला एखाद्या प्रसंगाचा तपशील, त्यातला निर्णय, यांचे ज्ञान असले तरी काही वेळा त्याने मौन धारण करणे श्रेयस्कर असते. अशा वेळी

बोलण्याने हानी होण्याचीच शक्यता ! ज्ञानी माणसाने सामान्य माणसांसारखेच वागावे; आपले ज्ञान सहसा प्रकट करू नये, हे विशेषतः आध्यात्मिक ज्ञानाच्या, अनुभवाच्या बाबतीत म्हटले जात असले तरी व्यावहारिक बाबतीतही ही सूचना उपकारक म्हटली पाहिजे. आपला आब राखण्यासाठी, तसेच आपले शब्द योग्य, उपकारक, परिणामकारक ठरावेत म्हणूनही विचारले नसताना एखाद्या गोष्टीत तोंड खुपसणे अनिष्ट, असेच हा उक्तिविशेष सुचवितो.

२६८. नायमात्मा प्रवचनेन लभ्यः

सं. – कठ. १. २. २३. आत्मज्ञानाची ओढ लागलेल्या नचिकेत्याने यमधर्माला ते आत्मतत्त्वच शिकविण्यास सांगितले. 'सर्व प्रकारची तपश्चर्या ज्याच्या प्राप्तीसाठी केली जाते ते आत्मस्वरूपच मला समजावून सांगावे' अशी मागणी तिसऱ्या वराच्या निमित्ताने नचिकेत्याने केली. ज्ञानप्राप्तीची त्याची कळकळ पाहून संतुष्ट झालेल्या यमाने शब्दांनी व्यक्त करण्यास कठीण असे आत्मतत्त्वाचे स्वरूप सांगण्यासाठी आत्मज्ञान इतर कोणत्याही उपायाने मिळत नाही, हेच प्रारंभी सांगितले.

मू. – नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन ।

यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनूँ स्वाम् ।।

अ. – 'हा आत्मा (केवळ) शाब्दिक (अनुभूतीरहित) विवेचनाने प्राप्त होत नाही. स्वबुद्धीच्या जोरावर किंवा (आत्म्याविषयी) पुष्कळ श्रवण केल्यानेही हा ज्ञात होत नाही. ज्याची (आत्मतत्त्वाचे ज्ञान होण्यासाठी) हा (देहबद्ध आत्मा) अपेक्षा करतो त्यालाच तो प्राप्त होतो (त्याच्याकडूनच जाणला जातो.) त्याच्यासाठी (आत्मज्ञानाच्या जिज्ञासूसाठी) हा आत्मा स्वतःचे खरे स्वरूप प्रगट करतो. (किंवा ज्या अन्तर्मुख मुमुक्षूची हा आत्मा निवड करतो त्यालाच तो आपल्या खऱ्या स्वरूपाचा साक्षात्कार घडवितो, असे 'वृणुते' या पदावरून द्विविध अर्थ केले जातात).'

व्य. – आत्मज्ञानाच्या दुर्विज्ञेयत्वाची जाणीव देणारा हा श्लोक आहे. कोणत्याही बाह्य साधनांनी याचे ज्ञान होणार नाही. अर्थात् बाह्य साधने ही विनाशी, अन्तवान् असताना त्याकरवी अविनाशी आत्मतत्त्वाचे आकलन होऊ शकत नाही. याचसाठी यमधर्माने दुर्घट आत्मज्ञानाची प्राप्ती कोणाला होईल हे सांगताना 'यमेवैष वृणुते' असे मार्मिक शब्द उच्चारले. ज्याला आत्मज्ञानाची खरी ओढ लागेल त्यालाच–पर्यायाने अन्तर्मुख बनलेल्या जिज्ञासूलाच ते ज्ञान आपोआप प्राप्त होईल. किंबहुना अशा व्यक्तीपुढेच आत्मा आपले मूळ रूप प्रकट करील. यावरून यथार्थ आत्मज्ञान होणे किती दुष्कर आहे ते जाणवते.

२६९. नाराजके जनपदे योगक्षेमः प्रवर्तते

सं. – वारा. २.६७.२४. राजा नसेल तर राज्यात अराजक निर्माण होईल; म्हणून दशरथाच्या मृत्यूनंतर कोणाची तरी राजसिंहासनावर त्वरित स्थापना करण्याची सूचना मौद्गल्य, वामदेव आदि ऋषिवर्यांनी व कारभारी मंडळींनी वसिष्ठांना केली. त्या वेळी त्यांनी २८ श्लोकांत (वारा. २.६७.८ ते २.६७.३१) अराजकाचे भयावह वर्णन केले आहे. त्यांपैकी अराजकाचे अचूक वर्णन करणारा हा एक श्लोक. (परिशिष्ट पाहा)

महा. १२.६७.५. राजधर्मपर्वात भीष्म, युधिष्ठिराला राष्ट्राचे स्वरूप, राजाची कर्तव्ये समजावून सांगतात. त्या वेळी अराजकाचाही विचार त्यांनी केला. एवढेच नव्हे, तर देशाच्या अशा हलाखीच्या अवस्थेचे वर्णन करून तशी वेळ येऊ नये याकरता शासन करणाऱ्या राजाचे महत्त्व प्रतिपादन केले.

मू. – **नाराजके जनपदे योगक्षेमः प्रवर्तते ।**
न चाप्यराजके सेना शत्रून्विषहते युधि ।। वारा. २.६७.२४.

अ. – ' अराजक (माजलेल्या किंवा राजा नसलेल्या) देशात लोकांचे रक्षण व पालनपोषण होऊ शकत नाही. (पर्यायाने) सैन्यही युद्धात शत्रूचा पराभव करीलच असे नाही. '

मू. – **नाराजकेषु राष्ट्रेषु वस्तव्यमिति वैदिकम् ।**
नाराजकेषु राष्ट्रेषु हव्यमग्निर्वहत्यपि ।। महा. १२.६७.५.

अ. – ' अराजक (माजलेल्या) देशात राहू नये (वस्ती करू नये), असे वेदात सांगितले आहे. (कारण) राष्ट्रात अराजक असेल तर अग्नी देखील अर्पण केलेला हवी वाहून नेत नाही (देवांपर्यंत पोचवीत नाही.) '

व्य. – अराजक म्हणजे अंदाधुंदी. जेथे कशाविषयीही कसलाही नियम पाळला जात नाही अशी देशाची अवस्था म्हणजे अराजक. रामायणात वर्णिलेली ही अराजकता जगात आजवर घडलेल्या अनेक राजकीय क्रान्त्यांच्या वेळी उद्भवल्याची इतिहासात नोंद आढळते. सुव्यवस्था आणि सुरक्षितता असेल तेच राष्ट्र वा राज्य या संज्ञेला पात्र होते. पूर्वीच्या काळी राजा हाच सर्व राज्ययंत्रणेचा प्रमुख व सर्वसत्ताधारी असल्यामुळे त्याच्या अभावी सारी राज्यव्यवस्था व त्यामुळे लोकजीवन कोलमडून पडत असते. आधुनिक लोकशाही राजव्यवस्थेत परिस्थिती वेगळी झालेली आहे. तथापि लोकशाही असली तरी त्यातही निर्नायकी होणे याचाच अर्थ लोकहिताला, धर्म-संस्कृतीला, निःस्वार्थ कारभाराला विन्मुख झालेल्या अरेरावांच्या हाती सत्ता येणे म्हणजे अराजकाला बोलावणेच. अशा अराजकात पूर्वीच्या राजाविहीन प्रजेप्रमाणेच आधुनिक काळातही जनता नि देश यांचा योगक्षेम चालणे दुर्घट होऊन बसते. त्या संदर्भात हा उक्तिविशेष उपयोजिला जातो.

२७०. ना विष्णुः पृथिवीपतिः

(पाहा : नान्ऋषिः कुरुते काव्यं)

२७१. नासतो विद्यते भावः

सं. – योवा. ३. ७. ३८. उत्पत्ति प्रकरणात वसिष्ठांनी परमेश्वरी सत्तेचे शाश्वत स्वरूप व जगातील वस्तूंचे नाशिवंत स्वरूप रामाला समजावून सांगितले.

भगी. २. १६. अर्जुनाला ज्ञानयोग सांगताना सत् आणि असत् वस्तूंचे लक्षण केले व दोन्हीतील फरक जाणून घेण्यास सांगितले.

मू. – **नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।**

यत्तु नास्ति स्वभावेन कः क्लेशस्तस्य मार्जने ।। योवा. ३.७.३८.

अ. – ‘ जे असत् आहे त्याचे अस्तित्व कधी असू शकत नाही; जे सत् आहे त्याचा अभाव कधीही असू शकत नाही. खरोखर मुळातच जे नाही ते नाहीसे करण्यात कष्ट कसले ! ’

मू. – **नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ।**

उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ।। भगी २.१६.

अ. – ‘ जे नाही (असत्) ते आहे आहे असे होत नाही; व जे आहे (सत्) ते कधीही नाहीसे होत नाही. सत् आणि असत् या दोन्हीच्या स्वरूपाबद्दलचा निर्णय तत्त्वज्ञानी लोकांनी केलेला आहे.’

व्य. – विचारी माणसाला जीवनात दोन तत्त्वे अनुभवाला येतात. दररोज नवीन उत्पन्न होणाऱ्या, बदलणाऱ्या व नाश पावणाऱ्या वस्तू व त्यांना आधारभूत असे एक सत् नित्य – अनन्त तत्त्व. तत्त्वज्ञानी पुरुषांनी त्याबद्दलचा पूर्ण विचार करून दोन्हीचे स्वरूप निश्चयात्मक रीतीने सांगितले आहे. जे मुळातच नाही त्याच्या मानीव अस्तित्वाने मनुष्य सुखी–दुःखी होतो. ज्याबद्दल शोक करू नये त्याबद्दल वृथा शोक करतो. सत् – अविनाशी तत्त्वाचे भान त्याला राहात नाही. जगत्-वस्तूंच्या स्वभावाबद्दल पक्का निश्चय झाल्याने त्याचे दुःख नष्ट होते. तसा निश्चित निर्णय सांगणारा हा उक्तिविशेष तत्त्वज्ञानातील महत्त्वाचा सिद्धान्त म्हणून प्रसिद्ध आहे.

२७२. नासदासीत् नो सदासीत्

सं. – ऋग्. १०.१२९.१. परमेष्ठी प्रजापतीच्या तोंडून प्रकट झालेला त्रिष्टुप् छंदातील, परमात्मा देवतेला उद्देशून असलेल्या, प्रसिद्ध ‘ नासदीय ’ सूक्तातील

ही पहिली ऋचा आहे. उपनिषदातील ब्रह्मविद्येला आधारभूत ठरलेल्या या सूक्तातील 'नासदासीत्' या पहिल्या शब्दावरून त्याला 'नासदीय सूक्त' हे नाव मिळाले आहे.

मू. – नासदासीन्नो सदासीत्तदानीं नासीद्रजो नो व्योमा परो यत् ।
किमावरीवः कुह कस्य शर्मन्नम्भः किमासीद् गहनं गभीरम् ॥

अ. – 'तेव्हा (म्हणजे मुळारंभी) असत् नव्हते आणि सत् ही नव्हते. अन्तरिक्ष नव्हते आणि त्यापलीकडचे जे आकाश, तेही नव्हते. (अशा स्थितीत) कोणी (कोणाला) आवरण घातले (म्हणावे)? कुठे ? कोणाच्या सुखासाठी ? अगाध, गहन पाणी (तरी) होते काय ? '

व्य. – 'नासदीय सूक्त' म्हणून प्रसिद्ध असलेले, गूढ अध्यात्मज्ञान, सृष्टयुत्पत्ती यांच्याविषयी तत्त्वज्ञानातील अन्तिम सिद्धान्त असलेले हे सूक्त सर्व जगातील विचारवन्तांच्या, थोर तत्त्वज्ञान्यांच्या चिन्तनाचा विषय बनलेले आहे. ऋषींना स्फुरलेल्या या सूक्तातील सिद्धान्ताच्या आधारेच पुढे अद्वैतवाद मांडला गेला. ऋग्वेदासारख्या अतिप्राचीन ग्रंथात तत्त्वज्ञानाचा सर्वोच्च बिंदू गाठला गेला; यावरून तत्कालीन ऋषींच्या ज्ञानाची कक्षा केवढी विशाल व अतर्क्य, मूलतत्त्वांना स्पर्श करणारी होती हे कळून येते.

२७३. न्याय्यात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः

(पाहा : निन्दन्तु नीतिनिपुणा)

२७४. निकामे निकामे पर्जन्यो भवतु

(पाहा : दोग्ध्री धेनुर्वोढा)

२७५. निन्दन्तु नीतिनिपुणाः

(पाहा : न्याय्यात्पथः प्रविचलन्ति पदं)

सं – नीश. ७४. धैर्यशाली व्यक्तींचे वर्तन लोकांच्या मतानुसार चालत नाही. कार्यसिद्धीसाठी स्वतःच्या सुखदुःखाचा विचार न करता ते अविश्रांत प्रयत्नरत असतात.

मू. – निन्दन्तु नीतिनिपुणा यदि वा स्तुवन्तु लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् ।
अद्यैव वा मरणमस्तु युगान्तरे वा न्याय्यात्पथः प्रविचलन्ति पदं न धीराः ॥

अ. – 'नीतिविशारद निन्दा करोत अथवा प्रशंसा करोत; लक्ष्मी येवो वा जावो; आजच मरण येवो किंवा युगानंतर येवो. (काही असले तरी) थोर वृत्तीचे लोक न्याय्य मार्गापासून एक पाऊलही बाजूला जात नाहीत. '

व्य. – ज्यांना काही काम करावयाचे आहे ते लोक मतमतांतराची पर्वा न करता सारासारविचाराने न्याय्य वाटलेली बाजू स्वीकारतात. न्याय्य मार्गाचे अनुसरण हेच त्यांच्या दृष्टीने परम कर्तव्य असून याच भावनेने लोकाग्रणीने वा कार्यकर्त्याने वागावे हे सुचविण्यासाठी या उक्तिविशेषाचा उपयोग केला जातो.

२७६. निमित्तमात्रं भव सव्यसाचिन्

सं. – भगी. ११.३३. श्रीकृष्णाने अर्जुनाला आपले विराट स्वरूप दाखवून जगातील यच्चयावत् गोष्टींचा व घटनांचा कर्ता परमेश्वर असतो, हे तत्त्वच साररूपाने या श्लोकात सांगितले.

मू. – **तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून्भुंक्ष्व राज्यं समृद्धम् ।**
मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ।।

अ. – ' हे सव्यसाची अर्जुना, म्हणून तू ऊठ. यश प्राप्त कर आणि शत्रूंना जिंकून समृद्ध राज्याचा उपभोग घे. (अरे) मी यांना पूर्वीच मारले आहे. (तेव्हा आता त्याच्या वधासाठी) तू फक्त निमित्ताला कारण हो. '

व्य. – प्रत्येक मनुष्य हा आपापल्या कर्मांनीच मरत असतो. त्यांना मारणारा हे केवळ दृश्य कारण असते. केवळ मृत्यूचीच गोष्ट नव्हे, तर कोठल्याही घडामोडींचा कर्ताकरविता परमेश्वर असतो. या अभिप्रायानेच श्रीकृष्णांचे हे वचन सर्व चालू व्यवहारासाठी घेतले जाते.

२७७. निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु

सं. – मुद्रा. २.१८. नंदांच्या स्वामिनिष्ठ अमात्य राक्षसाने चंद्रगुप्ताच्या नाशासाठी योजलेले सर्व प्रयोग निष्फळ ठरलेले पाहून कष्टी झालेल्या राक्षसाला त्याचा गुप्तहेर विराध याचा खालील शब्दांत त्याने घेतलेल्या व्रताचे, स्वतःच्या थोरवीचे स्मरण करून दिले.

नीश. ६८. * सज्जनांचे माहात्म्य अर्थात् साधुत्व विविध श्लोकांत भर्तृहरीने नेमक्या शब्दांत वर्णिले आहे. स्वतःला त्रास झाला तरी तो सहन करून सर्वांशी सौजन्याने वागण्याचे संतांचे ब्रीदच असते. जे काम ते स्वीकारतात ते कितीही कष्ट पडले तरी पूर्ण करण्यातच त्यांचे श्रेष्ठत्व असते.

मू. – **किं कूर्मस्य भरव्यथा न वपुषि क्ष्मां न क्षिपत्येष यत्**
किं वा नास्ति परिश्रमो दिनमणेरास्ते न यन्निश्चलः ।
किं नाङ्गीकृतमुत्सृजन्हि मनसा श्लाघ्यो जनो लज्जते
निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु सतामेतद्धि गोत्रव्रतम् ।। मुद्रा. २.१८.

अ. – ' पृथ्वीला हे (कासव) खाली फेकून देत नाही म्हणून काय त्याच्या शरिरावर भार पडत नाही का ? (त्याला ओझ्याचे दुःख वाटत नाही का ?) सूर्य (दिवसभरात) थांबत नाही म्हणजे त्याला (आकाश) परिभ्रमणाचे श्रम होतच नाहीत काय ? जे काम एकदा स्वीकारले ते तसेच (अर्धवट) सोडून देण्याला श्रेष्ठ माणसांना कमीपणा वाटत नाही काय ? (अर्थात् वाटतोच). म्हणून हाती घेतलेले कार्य पूर्ण करण्याचे श्रेष्ठांचे व्रतच असते. '

मू. – किं शेषस्य भरव्यथा न वपुषि क्ष्मां न क्षिपत्येष यत्
किं वा नास्ति परिश्रमो दिनमणेरास्ते न यन्निश्चलः ।
किन्त्वङ्गीकृतमुत्सृजन्कृपणवच्छ्लाघ्यो जनो लज्जते
निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु सतामेतद्धि गोत्रव्रतम् ।। नीश. ६८.

अ. – ' सर्प (वासुकि) भूमीला (माथ्यावरून) खाली टाकीत नाही म्हणून काय त्याला तिचे ओझे होत नाही ? अथवा (आकाश) ओलांडताना (मधेच) सूर्य थांबत नाही ते काय त्याला श्रम होत नाही म्हणून ? (असे नाही) तर कंजुष माणसाला धन सोडून देण्यात जशी लाज वाटते (जिवावर येते म्हणून तो धन देतच नाही) तसेच जे एकदा हाती (कर्तव्यभावनेने) घेतले ते कार्य तडीस नेणे हा श्रेष्ठांचा कुलधर्मच आहे. '

व्य. – अंगीकृत किंवा मनापासून स्वीकारलेले कार्य चिकाटीने पूर्ण करणे हा सज्जनांचा स्वभाव आहे. अनेक अडीअडचणी येऊनही जिद्दीने आपले कार्य पुरे करणाऱ्या स्वाभिमानी व्यक्तींचे हे ब्रीद आहे. पण व्यवहारात कित्येकदा ' कसातरी उदरनिर्वाह करणे, ' अथवा ' हाती असेल तेवढ्या साधनसामग्रीत भागवावे– तेवढ्यातच कार्य तडीला न्यावे ' असा या उक्तीचा अर्थ केला जातो. पण ' हाती घ्याल ते तडीस न्या ' हाच त्याचा अर्थ आहे. अनेक शिक्षणसंस्थांचे ही उक्ती ब्रीदवाक्य आहे.

---

* हा श्लोक निर्णयसागर–सुभाषितत्रिशतीत नाही. भर्तृहरीच्या शतकत्रयाचा अनुवाद करणाऱ्या ल. गो. विंझे यांच्या (१९६९) प्रतीवरून हा घेतला आहे.

२७८. निर्वीरमुर्वीतलम्

सं. – सप. न ७७. राजकन्येच्या स्वयंवरामध्ये ठरविलेला ' पण ' पुरा करण्याचे– धनुष्याला दोरी लावण्याचे–सामर्थ्य एकाही राजामध्ये नाही असे पाहून जनक राजाने काढलेले हे उद्गार आहेत.

मू. – आद्वीपात्परतोऽप्यमी नृपतयः सर्वे समभ्यागताः
कन्येयं कलधौतकोमलरुचिः कीर्तेश्च लाभः परः ।
नाकृष्टं न च टङ्कितं न नमितं नोत्थापितं स्थानतः
केनापीदमहो महद्धनुरिदं निर्वीरमुर्वीतलम् ।।

अ. – ‘समुद्राच्या मर्यादेच्या भूमीपर्यंतचे (राज्य करणारे) हे सर्व राजे येथे उपस्थित झाले आहेत. रुप्याप्रमाणे अंगकांती असलेली ही कन्या सुंदर आहे; श्रेष्ठ कीर्तीचा लाभ होणार आहे. पण खरोखर ह्या प्रचंड धनुष्याला दोरी लावून ते एकानेही ओढले नाही, वाकविले नाही किंवा त्याचा टणत्कार केला नाही. किंबहुना ते ठेवलेल्या जागेवरून उचलले सुद्धा नाही. काय, ह्या पृथ्वीवर वीरच उरला नाही ?’

व्य. – माणसाच्या पराक्रमाला, धाडसाला आव्हान देणारा एखादा प्रसंग निर्माण झाला आणि त्या वेळी त्याला उत्तर देणारा, त्यावर मात करणारा कोणी मनुष्य आढळला नाही, म्हणजे सहजच ‘ या पृथ्वीवर कोणी पराक्रमी, वीर पुरुष उरलाच नाही काय,’ असे उद्‌गार ऐकू येतात. एखाद्या वीराचे युद्धाचे आव्हान स्वीकारणारा दुसरा पुरुष पुढे आला नाही म्हणजे या एका वीरावाचून अन्य शूर पुरुष पृथ्वीवर राहिलाच नाही का – या अर्थाने हा उक्तिविशेष वापरला जातो. सामान्यतः स्वतःला अजिंक्य समजणारा माणूसही तुच्छतेने या उक्तीचा उपयोग करतो.

२७९. निस्त्रैगुण्ये पथि विचरतः को विधिः को निषेधः

सं. – सुर ६. शान्तरसनिर्देश ६६. मोक्ष म्हणजे काय व तो प्राप्त झालेल्या माणसाची अवस्था कशी असते याचे वर्णन या श्लोकात केले आहे.

मू. – **भेदाभेदौ सपदि गलितौ पुण्यपापे विशीर्णे**
मायामोहौ क्षयमुपगतौ नष्टसंदेहवृत्तेः ।
शब्दातीतं त्रिगुणरहितं प्राप्य तत्त्वावबोधं
निस्त्रैगुण्ये पथि विचरतः को विधिः को निषेधः ॥

अ. – ‘दुजेपणा आणि आत्मीयतेचा भाव गळून गेल्यावरोबर, पुण्य आणि पाप नष्ट झाल्यावर, माया आणि मोह यांचा नाश झाल्यावेळी, (तत्त्वाविषयी) संशयाची वृत्ती नाहीशी झाल्यावर, वाणीच्या सामर्थ्यापलीकडील, (सत्त्व – रज – तम) या त्रिगुणातीत अशा प्रकारच्या (अन्तिम) तत्त्वाचे ज्ञान झाल्यानंतर, त्रिगुण-रहित अशा अवस्थेत संचार करीत असताना, विधी (धर्माला अनुसरून कर्म) तरी कोणता आणि निषेध (धर्माने करू नये म्हणून सांगितलेले) तरी कसला !’

व्य. – ‘ मोक्ष’ – ‘ ब्रह्मज्ञान ’ हे धार्मिक आचारविचारांचे ध्येय आहे. मोक्षाची पूर्वतयारी म्हणून जे निर्मल आचरण, निष्कपट भाव, चित्तशुद्धी व शांत वृत्ती आवश्यक असते ती निर्माण करणे हा धर्माचरणाचा हेतू आहे. तो हेतू पुरा होऊन तत्त्वज्ञान आत्मसात झाले, सर्व ब्रह्म आहे असा साक्षात्कार झाला की मग त्याच्या हातून धर्माविरुद्ध वर्तन घडण्याची शक्यताच उरत नाही; किंबहुना अशा व्यक्तीला धर्माचे बारीकसारीक नियम पाळण्याची गरज राहात नाही, अशा

व्यक्तींकडून इतरांनीही काटेकोर नियम पालनाची अपेक्षा करू नये. मुक्तावस्थेचे वर्णन या उक्तिविशेषाने केले जाते.

२८०. निःस्पृहस्य तृणं जगत्

सं. – सुर. ३. सामान्यनीती १४७,६३२. जगात सर्व प्रकारची माणसे आढळतात. लोभी–निर्लोभी, कंजुष–दानी, क्रोधी–शांत असे मनुष्यस्वभावाचे विविध नमुने प्रत्यही अनुभवावयाला मिळतात. या मानवी भावभावनांचे श्लोकरूपाने एकत्रित असे वर्णन सामान्यनीति प्रकरणात केलेले आहे. त्यापैकी आत्मसंतुष्ट समाधानी माणसांचे मोजक्या शब्दांत येथे वैशिष्टय सांगितले आहे.

मू. – **उदारस्य तृणं वित्तं शूरस्य मरणं तृणम् ।**

विरक्तस्य तृणं भार्या निःस्पृहस्य तृणं जगत् ॥ सुर. ३. सामान्यनीति १४७.

अ. – 'दानी (व्यक्ती) द्रव्य तृणवत् (तुच्छ) मानतो, तर शूराला मृत्यू गवताप्रमाणे (अतिसामान्य) वाटतो. वैराग्यसंपन्नाला पत्नीचा लोभ वाटत नाही (व) जो निर्लोभी (सर्वच बाबतींत) आहे त्याला सारे जगच तृण भासते.' (गवताला जशी कवडीमोलाचीही किंमत नसते तद्वत. अत्यंत क्षुद्र वस्तू म्हणून गवताचा निर्देश केला आहे.)

मू. – **तृणं ब्रह्मविदः स्वर्गस्तृणं शूरस्य जीवनम् ।**

जिताक्षस्य तृणं नारी निःस्पृहस्य तृणं जगत् ॥ सुर. ३. सामान्यनीति ६३२.

अ. – 'ब्रह्मज्ञान्याला स्वर्ग तृणवत् वाटतो (स्वर्गप्राप्तीची त्याला कांक्षा नसते). शूराला (पराभूत होऊन) जगणे, जिवंत राहाणे म्हणजे क्षुद्रता वाटते (मरण्यातच त्याला धन्यता वाटते). संयमी (ज्याने इंद्रियांवर विशेषतः नेत्रांवर विजय मिळविला अशा) माणसाला स्त्रीविषयी अभिलाषा नसते. जशी गवताविषयी अभिलाषा उत्पन्न होत नाही तद्वतच निःस्पृहाला–कशाचीही इच्छा नसलेल्या माणसाला–सारे जग तुच्छ वाटते.'

व्य. – निरिच्छ मनुष्याला सारे जग तृणासमान तुच्छ वाटते. ज्याला कोठलाच स्वार्थ साधावयाचा नसतो त्याला कशाचाही लोभ होत नाही, मोह पडत नाही, पर्यायाने ममत्व वाटत नाही. त्यामुळे गवताला जितकी किंमत, जितके महत्त्व आपण देतो तशीच निःस्पृहाची जगाविषयी भावना असते. कवडीइतकेही मोल नाही ते गवत जितके क्षुल्लक तितकीच आस्था साऱ्या जगाविषयी निःस्पृहाला असते. अशा निःस्पृह माणसाचे वर्णन या उक्तिविशेषाने केले जाते.

२८१. नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण

सं. – मेघ. २.४६. कुबेराच्या शापामुळे अलका नगरी सोडून रामगिरी पर्वतावर

वास करणाऱ्या यक्षाने विरहाने व्याकुळ होऊन आपल्या प्रिय पत्नीला आपली अवस्था कळविण्यासाठी आकाशातल्या मेघाला ' दूत ' बनविले. पत्नीने धीर सोडू नये म्हणून या श्लोकात त्याने सान्त्वनाचा संदेश तिला दिला आहे.

मू. – नन्वात्मानं बहु विगणयन्नात्मनैवावलम्बे
तत्कल्याणि त्वमपि नितरां मागमः कातरत्वम् ।
कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण ।।

अ. – ' खरोखर, अनेक मनोरथ करीत मी स्वतःच स्वतःला धीर देत असतो; म्हणून हे सुभगे, तू देखील अगदी भिऊन जाऊ नकोस. कारण, शेवटपर्यंत सुख किंवा सर्वच दुःख कोणाला प्राप्त झाले आहे ? चाकाच्या धावेप्रमाणे कोणतीही अवस्था क्रमाने वर किंवा खाली जात असते.'

व्य. – कधी उच्च स्थानी तर कधी अगदी हीन अवस्थेत, कधी सुखी तर कधी दुःखी – अशा मानवाच्या अवस्था एकाच जीवनक्रमात दिसून येतात. ' सुखामागून दुःख आणि दुःखामागोमाग सुख ' अशा या चक्राला विहिरीवरच्या रहाटगाडग्याची उपमा देतात. जीवनाचे यथार्थ दर्शन घडविणारा हा उक्तिविशेष आहे. दुःखी माणसाला सुखाची आशा, सुखी माणसाला सुखाच्या धुंदीतून सावधानी आणि विचारी माणसाला सुखदुःखांपासून अलिप्त राहण्याचा इशारा देण्यासाठी या प्रसिद्ध उक्तिविशेषाचा उपयोग करतात.

२८२. नूपुरे त्वभिजानामि

सं. – वारा. ४.६.२२-२३. रावण पळवून नेत असताना सीतेने खाली टाकलेले उत्तरीय व अलंकार सुग्रीवाने रामासमोर आणून ठेवले. रामाने ते लक्ष्मणापुढे ठेवून त्याला ' ओळखीचे वाटतात का ? ते सीतेचेच आहेत का ?' हे पाहण्यास सांगितले. तेव्हा लक्ष्मणाने दिलेले हे उत्तर चिरस्मरणीय ठरले. अर्थाच्या सुकरतेसाठी दोन श्लोक येथे घेतले आहेत.

मू. – एवमुक्तस्तु रामेण लक्ष्मणो वाक्यमब्रवीत् ।
नाहं जानामि केयूरे नाहं जानामि कुण्डले ।। वारा. ४.६.२२.
नूपुरे त्वभिजानामि नित्यं पादाभिवन्दनात्
ततस्तु राघवो वाक्यं सुग्रीवमिदमब्रवीत् ।। वारा. ४.६.२३.

अ. – ' (हे अलंकार तू पाहा) असे राम म्हणाल्यावर लक्ष्मण बोलला, ' मी तिची बाहुभूषणेही ओळखत नाही किंवा कर्णभूषणेही मला माहीत नाहीत. मात्र तिचे (पायातील) नूपुर तेवढे मी ओळखतो, कारण रोज तिच्या पायांना मी वंदन करीत होतो.' त्यानंतर राम सुग्रीवाला असे म्हणाला.

व्य. – भारतीय संस्कृतीतील नैतिक मूल्यांचा परमोच्च बिंदू गाठणारा हा अविस्मरणीय प्रसंग. लक्ष्मण आणि त्याच्या थोरल्या भावाची पत्नी–असा दीर-भावजयीमधील नात्याचा हा अत्यंत नाजुक पण तितक्याच विलक्षण संयमाचे दर्शन घडविणारा प्रसंग म्हणजे अनेक वर्षांच्या वनवासाच्या इतिहासातले एक अति तरल व सूक्ष्म भावदर्शन आहे. या भावक्षितिजापर्यंत झेप घेण्याचे सामर्थ्य ज्या पवित्र, विशुद्ध व सरल अंतःकरणात असेल त्यालाच या प्रसंगातील, या उक्तीतील मर्म जाणता येईल. जगाच्या इतिहासात एक अद्वितीय असेच याचे वर्णन करावे लागेल. सामान्य माणसांच्या व्यवहारात या आदर्शापर्यंत दृष्टी पोचणेही कठीण; मग ह्याचा व्यवहारात उपयोग करणे तर दूरच.

२८३. नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभम्

सं. – भाग. ११.२०.१७. भगवान श्रीकृष्णांनी उद्धवाला उपदेश करताना मुक्ती मिळविण्याच्या प्रयत्नातही देह कसा उपयुक्त ठरतो हे विशद केले आहे.

मू. – नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ।
मयानुकूलेन नभस्वतेरितं पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ।।

अ. – 'सर्व फलप्राप्तीचे साधन मानवी देह आहे. (अनेक तऱ्हेचे प्रयत्न करूनही) प्राप्त न होणारा हा देह सहजी प्राप्त झाला आहे. देहरूपी उत्तम नावेचा गुरु हा नावाडी होय. वारा अनुकूल असताना नाव जशी जोसात चालते तसेच माझे (परमेश्वराचे) स्मरण केल्यास मी अनुकूल होतो. ही नरदेहरूपी नौका प्राप्त झाली असूनही जो संसाररूपी सागर तरून जात नाही तो आत्मघातकी मानावा.'

व्य. – देह हाही योग्य तऱ्हेने उपयोग केला तर परमार्थाला मारक न होता परमार्थाचे साधन होऊ शकतो. मुमुक्षूला किंवा साधकाला तर परमार्थाचे हे साधनच आहे, पण विदेही अवस्था प्राप्त झालेला जीवन्मुक्तसुद्धा देह असेतोपर्यंतच लोकसंग्रह करू शकतो. म्हणून देहाचा तिरस्कार न करता वा त्याला क्षुद्र न मानता त्याचाही उपयोग परमार्थसाधनासाठी करावा असे येथे सुचविले आहे.

२८४ नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता

सं. – पंच. १. १४२. वर्धमान नगरीचा प्रमुख धनाध्यक्ष दंतिल, राजासह प्रजेला संतुष्ट ठेवण्यात चतुर होता. राजाच्या मर्जीनुसार वागूनही जनतेचे हित साधणे मोठे अवघड काम असते. ते करण्यात कुशल असलेल्या दंतिलाची कथा दमनक नावाच्या कोल्ह्याला संजीवक बैलाने सांगितली.

मू. – नरपतिहितकर्ता द्वेष्यतां याति लोके जनपदहितकर्ता त्यज्यते पार्थिवेन्द्रैः ।
इति महति विरोधे वर्तमाने समाने नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता ।।

अ. – ' राजाचे हित करणारा (त्याच्या मनाप्रमाणे वागणारा) लोकांच्या द्वेषाला पात्र होतो. (तर) प्रजाजनांचे कल्याण करू इच्छिणाऱ्याचा राजा त्याग करतो. (त्याचे अधिकार काढून घेतले जातात.) अशा प्रकारे परस्परविरोध (कार्याविषयी) असतानाही दोन्ही कार्ये साधणारा कार्यकर्ता दुर्लभ असतो. '

व्य. – राजा आणि प्रजा या दोघांनाही खूष ठेवून यशस्वीपणे लोककल्याणाचे कार्य करणारा माणूस विरळा. आता राजाच उरला नसल्यामुळे ' नरपतिहितकर्ता ' हे पद तसे निरर्थक ठरत असले तरी शासन म्हणजे राजसत्ता ज्यांच्या हातात आहे अशा व्यक्तींचे हित पाहणारा व त्याचवेळी लोककल्याणही यशस्वीपणे साधणारा, असा अर्थ व्यवहारात करावा लागेल.

२८५. नेह नानास्ति किञ्चन

सं. – कठ. २.१.११. निर्गुण निराकार ब्रह्माचे स्वरूप नचिकेत्याला समजावून सांगताना यमाने संसारचक्राचे रहस्य प्रगट केले आहे. जो ब्रह्माचे यथार्थ स्वरूप जाणत नाही त्याची या मृत्युचक्रापासून सुटका होत नाही. म्हणून ब्रह्माचे खरे स्वरूप यमधर्माने नचिकेत्याला सांगितले.

बृहद. ४.४.१९. जे ब्रह्माला जाणतात तेच मोक्ष मिळवितात. ते ब्रह्म चक्षूचा चक्षू, मनाचेही मन असल्याचे जे ओळखतात तेच ब्रह्म जाणू शकतात. त्या ब्रह्मदर्शनाचे साधन गुरूपदेशाने सुसंस्कारित झालेले मन आहे. गुरूपदेशाने परमार्थातील विविध अनुभूती अनुभविलेल्या मनाच्या ठिकाणी ब्रह्म जाणण्याचे सामर्थ्य आहे, असे याज्ञवल्क्यांनी जनकाला पटवून दिले.

सू. – मनसैवेदमाप्तव्यं नेह नानाऽस्ति किञ्चन ।
मृत्योः स मृत्युं गच्छति य इह नानेव पश्यति ।। कठ. २.१.११.

अ. – ' (अन्तर्मुख मुमुक्षु) मनानेच हे (ब्रह्मात्मैक्य) जाणण्यास योग्य आहे. त्यात (ब्रह्मात) किंचितही वैविध्य (नानात्व) नाही. जो यात (ब्रह्मात) नानात्व (आत्मा व ब्रह्म वेगवेगळे) पाहातो तो मरणाकडून मरणाकडेच जातो. (संसारचक्रात सापडतो. त्याचा जन्ममरणाचा फेरा चालूच राहातो.)'

मू. – मनसैवानुद्रष्टव्यं नेह नानाऽस्ति किञ्चन ।
मृत्योः स मृत्युमाप्नोति य इह नानेव पश्यति ।। बृहद. ४.४.१९.

अ. – ' (आत्मजिज्ञासु) मनानेच हे (ब्रह्मैक्य) पाहावे. या ब्रह्मात भेदाभेद नाही. जो ब्रह्मात भेद पाहतो तो मरणापासून मरणास प्राप्त होतो.'

व्य. – परब्रह्माचे वर्णन नेहमीच ' नेति नेति ' अशा शब्दांत केले जाते. त्यामानाने या दोन्ही उपदेशांतील ब्रह्मवर्णन जीवाशिवाचे ऐक्य प्रतिपादन करणारे आहे. देहबद्ध आत्मा व ब्रह्म वस्तुतः एकच असून अज्ञानाने–मायेने ते वेगवेगळे भासते.

ब्रह्मात्मैक्य निश्चयपूर्वक सांगणाऱ्या याज्ञवल्क्यांचे हे उद्गार अद्वैतवादी वेदान्त्यांना आधारभूत होतात.

२८६. नैनं छिन्दन्ति शस्त्राणि

सं. – भगी. २. २३. अर्जुनाच्या चित्तातला विषाद कमी होऊन त्याच्या मनातील 'मी साऱ्यांच्या नाशाला कारण' असल्याची भावना नष्ट व्हावी याकरिता आत्म्याचे अविनाशित्व श्रीकृष्णाने वर्णन केले आहे.

मू. – नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।

अ. – 'याला (आत्म्याला) शस्त्रे तोडू शकत नाहीत की अग्नीला (याला) जाळता येत नाही. पाण्याने (हा) भिजत नाही की वायूने सुकविला जात नाही. (असा हा आत्मा अविकारी आहे.)'

व्य. – आत्मा हा नित्य, अविकार्य व निर्गुण आहे. आत्म्याचे हे वर्णन उपनिषदांधारे (कठ. १.२.१८,१९) केले आहे. सांख्य किंवा संन्यासमार्गीय तत्त्वज्ञानाप्रमाणे आत्मा अमर आहे व देह विनाशी आहे. स्वभावतःच आत्मा अविनाशी असल्यामुळे मरणे किंवा मारणे त्याच्याबाबतीत संभवत नाही. देह तर अनित्यच आहे. मारतो किंवा मरतो या लौकिक संज्ञा असून हा सर्व प्रकृतीचा खेळ आहे. हे सर्व ज्याने जाणले तो मृत्यूबद्दल शोक करणार नाही. आत्म्याचे हे अविनाशित्व आणि देहाहून तो निराळा, वेगळा आहे हा सिद्धान्त या देशातील थोर थोर विचारवंतांनी त्यांच्या त्यांच्या काळात राजकीय सामाजिक व अन्य कार्याच्या संदर्भातही भारतीय जनतेच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न प्रभावीपणे केलेला आहे. स्वामी विवेकानंदांनी यावर केलेले विवेचन परिणामकारक ठरले. बंगालमध्ये स्वातंत्र्यपूर्व राजकीय चळवळीत या वचनाच्या निरूपणावर ब्रिटिशांनी बंदी घातली होती, हे लक्षात घेतले म्हणजे याचा प्रभावीपणा ध्यानी येईल. केवळ एवढे हे एक वचनही जर योग्य तऱ्हेने भारतीय जनतेच्या मनाव र ठसविता आले व प्रत्यक्ष जीवन-व्यवहारात उतरविता आले तर ती पूर्णपणे निर्भय आणि त्यामुळेच स्वाभिमानी व अजिंक्य होऊन जाईल. आज केवळ पारमार्थिक अर्थाने या उक्तीचा वापर व्यवहारात केला जातो.

२८७. नैव स्त्री न पुनः पुमान्

सं. – महा. ५.७०. ३८. भगवद्यान पर्वात – 'तुझी इच्छा असेल त्याप्रमाणे करतो,' असे श्रीकृष्णाने शिष्टाईस कौरवसभेत जाण्यापूर्वी युधिष्ठिराला आश्वासन दिले, तेव्हा राज्य करण्यास कौरव कसे योग्य नाहीत हे युधिष्ठिराने श्रीकृष्णाला सांगितले.

महा. ५.१३१.२०,३०. सिंधुराजाने पराभव केल्यामुळे खिन्न होऊन बसलेल्या संजयाची, त्याची आई विदुला हिने निर्भर्त्सना केली; व रणांगणावर जाऊन पुन्हा युद्ध करण्याची प्रेरणा त्याला दिली. या ऐतिहासिक कथेत विदुलेने पुत्राला केलेला उपदेश, कुन्तीने युधिष्ठिराला स्वतःचा संदेश म्हणून सांगितला.

मू. – अन्हीको वा विमूढो वा नैव स्त्री न पुनः पुमान् ।
नास्याधिकारो धर्मेऽस्ति यथा शूद्रस्तथैव सः ॥ महा. ५.७०.३८.

अ. – ' जो निर्लज्ज व मूर्ख आहे तो पुरुषही नाही आणि स्त्रीही नाही. धर्मकृत्यात त्याला अधिकार नाही. तो शूद्रासारखाच (अनधिकारी) आहे. '

मू. – यस्य वृत्तं न जल्पन्ति मानवा महदद्भुतम् ।
राशिवर्धनमात्रं स नैव स्त्री न पुनः पुमान् ॥ महा. ५.१३१.२०.

अ – ' ज्याचा महान् अद्भुत पराक्रम लोक वर्णन करून सांगत नाहीत तो मनुष्य केवळ लोकसंख्येत भर घालणारा आहे. तो स्त्री नव्हे आणि पुरुषही नव्हे.'

मू. – एतावानेव पुरुषो यदमर्षी यदक्षमी ।
क्षमावान्निरमर्षश्च नैव स्त्री न पुनः पुमान् ॥ महा. ५.१३१.३०.

अ. – ' क्रोधी (तेजस्वी) व क्षमारहित (दुर्बलतारहित) असणारा तो खरा पुरुष होय. (दुसऱ्याकडून झालेल्या अपराधांच्या बाबतीत) क्षमाशील (शासन न करू शकणारा) व त्वेषरहित असलेला, खरोखर स्त्रीही नव्हे व पुरुषही नव्हे. '

व्य. – विदुलेने संजयाला, स्वकर्तव्याची व स्वसामर्थ्याची जाणीव देण्यासाठी केलेला उपदेश व युद्ध जिकण्यासाठी दिलेले प्रोत्साहन भारतीय इतिहासात प्रसिद्ध आहे. दुर्बल आणि परतंत्र झालेल्या राष्ट्रांतील प्रजेची अस्मिता फुलवून तिच्या पौरुषहीनतेचा किंवा नपूंसकत्वाचा धिक्कार करून तिला पुरुषार्थासाठी, पराक्रमासाठी जागृत करण्याचे सामर्थ्य या उक्तिविशेषात आहे. याच अर्थाने हा उक्तिविशेष वापरला जात असतो.

(प)

२८८. पञ्चैता मातरः स्मृताः

सं.– सुर. ३. सामान्यनीती ३२६. मातेसमान व्यवहार कोणाकोणाशी करावा याची गणना सुभाषितकारांनी येथे केली आहे.

मू. – राजपत्नी गुरोः पत्नी भ्रातृपत्नी तथैव च ।
पत्नीमाता स्वमाता च पञ्चैता मातरः स्मृताः ॥

अ.– ' राणी (प्रदेशाच्या शासनकर्त्याची पत्नी), गुरूंची पत्नी, भावजय, स्वतःच्या स्त्रीची आई आणि स्वतःची आई या पाच माता, असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. '

व्य. – पुरुषांसाठी जे आचाराचे नियम धर्मशास्त्राने घालून दिलेले आहेत त्यात, वेगवेगळ्या नात्यांनी संबंध येणाऱ्या स्त्रियांशी कसे वागावे, याचा हा महत्त्वाचा

नियम होय. या सुभाषितात स्त्रियांशी जी नाती, जे संबंध सांगितले आहेत त्यांच्याशी आईप्रमाणे पूज्यभाव ठेवावा, याचे स्मरण शास्त्रकारांनी दिले आहे.

२८९. पण्डिताः समदर्शिनः

(पाहा: विद्या विनयसंपन्ने । शुनि चैव श्वपाके च ।)

सं. – भगी. ५. १८. जीवन्मुक्त अवस्थेचे वर्णन या श्लोकात केले आहे. सर्वभूती परमेश्वर पाहणाऱ्या ज्ञानी साधकाचे आचरणच येथ सांगितले आहे.

मू. – **विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ।**
शुनि चैव श्वपाके च पण्डिताः समदर्शिनः ।।

अ. – 'ज्ञान्यांची दृष्टी विद्याविनययुक्त ब्राह्मण, गाय, हत्ती तसेच कुत्रा आणि चांडाळ या सर्वांच्या ठायी समान असते.'

व्य. – आत्मज्ञान झाल्यावर सर्वत्र ब्रह्मप्रतीती होत असल्याने आपपरभाव उरत नाही. यालाच जीवन्मुक्तावस्था म्हणतात. हीच अध्यात्मविद्येची पराकाष्ठा होय. सर्वभूतान्तर्गत परमेश्वर ओळखणे हेच परमसाध्य असावे असे श्रीकृष्ण सांगतात. परमार्थाप्रमाणे व्यवहारातही जाणत्या, ज्ञानी माणसालाच 'पंडित' समजतात; केवळ पढीक विद्वान म्हणजे पंडित नव्हे, तर ज्याला अक्षरांतून व्यक्त होणारा भावार्थ यथार्थत्वाने उमगतो तोच खरा पंडित–ज्ञाता–ज्ञानी. समत्वाचा उत्तम आदर्श व्यवहारात सांगणारा हा रूढ उक्तिविशेष आहे.

२९०. पतिरेको गतिः सदा

सं. – वारा. २.२७.६. वनात निघालेल्या रामाबरोबर जाण्याचा निश्चय सीतेने बोलून दाखविला.

मू. – **न पिता नात्मजो वात्मा न माता न सखीजनः ।**
इह प्रेत्य च नारीणां पतिरेको गतिः सदा ।।

अ. – 'इहलोकी आणि परलोकी स्त्रियांना पती हाच एक आश्रय आहे. पिता, पुत्र, स्वतः ती, आई किंवा मैत्रिणी यांपैकी कोणीही तिला आधार देऊ शकत नाहीत.'

व्य. – पत्नी ही पतीच्या दैवाची भागीदारीण आहे. त्याच्या सुखात स्वतःचे सुख व दुःखात स्वतःचे दुःख मानणाऱ्या पतिव्रतेचा आदर्श सीतेच्या रूपाने वाल्मीकींनी आपल्यासमोर ठेवला आहे.

२९१. पत्रं पुष्पं फलं तोयम्

सं. – भगी. ९.२६. या श्लोकात भगवान् केवळ भक्ताच्या भावाकडे पाहूनच त्याच्या भक्तीचा स्वीकार करीत असतात, हे भक्तिमार्गातील महत्त्वाचे तत्त्व सांगितले आहे.

भाग. १०.८१.४. ‘प्रेमाने दिलेले काहीही मला आवडते’ असे भेटीला आलेल्या सुदामदेवाला श्रीकृष्णाने म्हटले व भेटीची मागणी केली.

मू. – पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ।।

ङ. – ‘एखादे पान, फूल, फळ किंवा (यथाशक्ती) थोडे पाणीही जो मला भक्तीने अर्पण करतो त्या अनन्यभावी पुरुषाची ती भक्तीची भेट मी (आनंदाने) सेवन करतो.’

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे.)

व्य. – यथाशक्ती प्राप्त होणाऱ्या अल्प पूजाद्रव्यांनीच नव्हे तर शुद्ध भावाने समर्पण केलेल्या मानसिक पूजाद्रव्यांनीही भगवान् संतुष्ट होतात, असे शास्त्रात म्हटले आहे. बाह्य अवडंबरापेक्षा उपासकाच्या भक्तिभावाचे मोल अधिक आहे, हे सत्य या उक्तिविशेषात सांगितले आहे.

२९२. पदमेकं न गच्छति

सं. – लोकोक्ती. आपल्या अंगच्या सामर्थ्याच्या अवास्तव अभिमानाने प्रयत्नाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना सुभाषितकाराने मुंगी आणि गरुड यांचे उदाहरण देऊन जागे करण्याचा प्रयत्न केला आहे.

मू. – गच्छन् पिपीलिका याति योजनानां शतान्यपि ।
अगच्छन् वैनतेयोऽपि पदमेकं न गच्छति ।।

अ. – ‘चालत राहणारी मुंगी (सुद्धा) शंभर योजनांपर्यंत पोचेल; पण न चालणारा गरुड (सुद्धा) एक पाऊलभरही पुढे सरकणार नाही.’

व्य. – मनुष्य कितीही पराक्रमी, बुद्धिमान असला तरी तो घरात झोपून राहिला तर त्याची कार्यसिद्धी कशी होणार? एखाद्या कामासाठी ‘पहिले पाऊल’ उचलणे व त्यानंतर सतत चालत राहाणे महत्त्वाचे असते. मग ते एखाद्या अल्पशक्तीच्या माणसाने उचललेले पाऊल असो, तो मुक्काम गाठील याची खात्री देता येईल, याची जाणीव या उक्तिविशेषाने करून दिली जाते.

२९३. पद्मपत्रमिवाम्भसा

सं. – भगी. ५. १०. शरीरधारी म्हणून जन्म घेतल्याबरोबर कर्म अटळ आहे. त्या कर्माचा परिणाम म्हणून पाप-पुण्य उत्पन्न होते व त्यांच्यामुळे पुन्हा कर्म व त्यातील सुखदुःखे भोगावी लागतात. कर्माचा परिणाम नाहीसा करण्याची युक्ति–योग येथे श्रीकृष्णांनी सांगितला आहे. (परिशिष्ट पाहा)

मू. – ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः ।
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवाम्भसा ।।

अ. – ' जो आपली कर्मे आसक्ती सोडून, ब्रह्माच्या ठायी अर्पण करून करतो त्याल कमळाच्या पानाला जसे पाणी धरीत नाही त्याप्रमाणे पाप चिकटत नाही. '

व्य. – वस्तू भिजवणे, ओली करणे हा पाण्याचा स्वाभाविक परिणाम आहे. परंतु पाण्यातच उगवणाऱ्या व सतत पाण्यात राहणाऱ्या, वाढणाऱ्या कमळाच्या वेलीचे पान, पाण्याने भिजत नाही, ओले होत नाही, पाणी त्याला चिकटू शकत नाही. तसेच कर्मे करीत राहूनही अनासक्त वृत्ती कशी असावी व कर्माच्या पापपुण्यात्मक परिणामांपासून अलिप्त कसे व्हावे, हे समजावून देताना दृष्टान्त म्हणून या उक्ति-विशेषाचा उपयोग तत्त्वज्ञानी पुरुषांनी वारंवार केला आहे.

२९४. पयःपानं भुजङ्गानां केवलं विषवर्धनम्

सं. – पंच. १.४२०. वानरांचा एक कळप थंडीचे निवारण करण्यासाठी लाल गुंजा लाकडावर ठेवून विस्तव पेटविण्यासाठी फुंकर मारू लागला; तेव्हा सूचिमुख नावाचा पक्षी त्यांना सांगू लागला की, ' गुंजांनी विस्तव पेटणार नाही व थंडीपासून तुमचा बचाव होणार नाही. तुमचे श्रम व्यर्थ होतील. ' वानरांना त्याचा हा उपदेश पटला नाही. उलट त्याच्यावर चिडून जाऊन त्याला पकडून त्यांनी त्याला मारून टाकले.

हित. ३.४. ' आपल्या हातापायांचा उपयोग करून स्वतःसाठी घर बांधावे म्हणजे पावसात भिजत कुडकुडत बसावे लागणार नाही.' असा उपदेश करणाऱ्या पक्ष्यांना वानरांनी मारून टाकले – ही गोष्ट दीर्घमुख बगळ्याने आपल्या राजाला सांगून मूर्खाला उपदेश करणे व्यर्थ आहे, याचे स्पष्टीकरण केले.

सुर. २. दुर्जननिंदा १०. वाकडेपणाने वागणे, दुसऱ्याचा घात करणे हाच ज्यांचा स्वभाव आहे, त्यांच्याजवळ उपकार करण्यासाठीही जाऊ नये अशी सावधगिरीची सूचना येथे सुभाषितकाराने दिली आहे.

मू. – उपदेशो हि मूर्खाणां प्रकोपाय न शान्तये ।
पयःपानं भुजङ्गानां केवलं विषवर्धनम् ।। पंच. १.४२०; हित. ३.४.

अ. – ' मूर्खांना केलेला उपदेश त्यांचा राग वाढविण्याला कारण होतो; त्यामुळे ते शांत होत नाहीत. सापांना दूध पाजणे म्हणजे त्यांचे विष वाढविण्यासारखे आहे. '

(पंचतंत्र व हितोपदेश यांतील श्लोक सारखेच आहेत.)

मू. – उपकारोऽपि नीचानामपकारो हि जायते ।
पयःपानं भुजङ्गानां केवलं विषवर्धनम् ।। सुर. २. दुर्जननिंदा १०.

अ. – ' दुष्ट मनुष्यावर उपकार केला तरी तो (उलट) अपकारालाच कारण होतो. सापाला दूध पाजणे हे त्याच्या ठिकाणचे विष वाढविण्याला कारण आहे.'

व्य. – द्वेषाचे, दुष्टपणाचे बाळकडूच ज्यांना मिळाले आहे त्यांच्याजवळ जाऊन, भलेपणाने वागून त्यांना संकटकाळी मदत करण्याचा, त्यांचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला तरी तो व्यर्थ जातो; इतकेच नव्हे तर अनर्थकारक ठरतो. दुष्ट मनुष्य

उपकारकर्त्यावरच उलटून त्याचा नाश करू पाहातो. व्यक्तिगत, सामाजिक राजनैतिक सर्व प्रकारच्या व्यवहारात येणाऱ्या या अनुभवाचे वर्णन या उक्तिविशेषाने केले जाते.

२९५. परदुःखं शीतलम्

सं. – विक्र. ४. १४. उर्वशीच्या विरहाने व्याकुळ झालेला राजा पुरूरवा कुमारवनातील वृक्षवेलींना आणि पशुपक्ष्यांना, 'उर्वशी कुठे गेली' म्हणून विचारीत उन्माद झाल्यासारखा फिरत होता. कोकिळा आपल्या प्रश्नाला उत्तर देत नाही म्हणून त्याने निराश होऊन हे शब्द उच्चारले.

मू. – महदपि परदुःखं शीतलं सम्यगाहुः प्रणयमगणयित्वा यन्ममापद्गतस्य ।
अधरमिव मदान्धा पातुमेषा प्रवृत्ता फलमभिनवपाकं राजजम्बूद्रुमस्य ।।

अ. – 'दुसऱ्याचे दुःख कितीही मोठे असले तरी त्याचे कढ जाणवत नाहीत. संकटात सापडलेल्या माझ्या विनवणीकडे दुर्लक्ष करून ही (कोकिळा) धुंद होऊन अधरोष्ठाचे पान करावे त्याप्रमाणे (या) मोठ्या जांभूळ वृक्षाच्या फळाचा ताजा रस चाखू पाहात आहे.'

व्य. – मनुष्य स्वतःच दुःखाचे स्मरण करीत, ते कल्पनेने वाढवीत, त्यावर हळुवारपणे फुंकर घालीत बसतो; दुसऱ्याच्या दुःखाची तीव्रता त्याला तेवढी जाणवत नाही. क्षणभर हळहळ व्यक्त करून क्षणात तो ते विसरूनही जातो. हा माणसाचा सहजस्वभाव आहे. दुसऱ्याचा हा थंडपणा पाहून दुःखी माणसाच्या तोंडून सहजच हा उक्तिविशेष बाहेर पडतो. 'परदुःख शीतल' असे म्हणण्याचा मराठीतील वाक्प्रचार त्यावरूनच रूढ झाला असला पाहिजे.

२९६. परहस्तगतं धनम्

सं. – सुर. ३. सामान्यनीति २६९,४१३. कसोटीची वेळ आली, उपयोग करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली की जी वस्तू कामी येईल तीच आपली म्हणावी व त्या बाबतीत जागरूक राहावे हे सुभाषितकारानी येथे सुचविले आहे.

मू. – पुस्तकेषु च या विद्या परहस्तेषु यद्धनम् ।
संग्रामे च या गृहे सैन्यं तिस्रः पूंसां विडम्बना ।। सुर. सामान्य. २६९.

अ. – 'पुस्तकापुरतेच राहाणारे अध्ययन, दुसऱ्याच्या हाती गेलेला पैसा आणि लढाईच्या वेळेला घरी राहून गेलेले सैन्य या तीनही गोष्टींमुळे मनुष्य हास्यास्पद ठरतो.'

भू. – पुस्तकस्था तु या विद्या परहस्तगतं धनम् ।
कार्यकाले समुत्पन्ने न सा विद्या न तद्धनम् ।। सुर ३. सामान्यनीति ४१३.

अ. – 'पुस्तकापुरतेच राहाणारे ज्ञान आणि दुसऱ्याच्या हाती दिले गेलेले धन, यांचा उपयोग करण्याची वेळ आली असताना, ते ज्ञान आणि ते धन कामाला येत नाही.'

व्य. – प्रत्येक वस्तूचे, व्यक्तीचे जे जे ठरलेले कार्य असेल ते पार पाडायच्या वेळेला जर ती वस्तू किंवा व्यक्ती उपयोगी पडली नाही तर तिचे असणे निरर्थकच म्हटली पाहिजे. व्यवहारात मौल्यवान, उपयुक्त परंतु प्रत्यक्षात निरुपयोगी ठरणाऱ्या वस्तूबाबत, व्यवहाराबाबत हा उक्तिविशेष वापरला जातो.

२९७ परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम्

सं. – पंच. ३.१०३. कपिंजल नामक चिमण्याच्या ढोलीत एक ससा येऊन राहिला. कपिंजल फारा दिवसांनी घरी येताच आपल्या ढोलीत सशाला पाहून त्याने सशाला तेथून निघून जाण्यास सांगितले. दोघांची वादावादी होऊन शेवटी धर्मज्ञाचा न्याय प्रमाण मानायचे ठरवून ते धर्मज्ञाला शोधण्यासाठी बाहेर पडले. हा सारा संवाद ऐकणाऱ्या रानमांजराने लगेचच डोळे मिटून आपण महान तपस्वी असल्याच्या आविर्भावात धर्मतत्वे सांगण्यास प्रारंभ केला. त्या वेळी धर्माचे रहस्य थोडक्यात सांगण्यासाठी त्याने हा श्लोक म्हटला.

सुर. ७. संकीर्ण १३. विशेष वर्गीकरण करता येणार नाही अशा बहुविध श्लोकांचा समावेश संकीर्ण प्रकरणात केला आहे.

मू. – **संक्षेपात्कथ्यते धर्मो जनाः किं विस्तरेण वः ।**
परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ।।

अ. – 'हे मानवानो, (मी) तुम्हाला थोडक्यात धर्म (रहस्य) सांगतो. उगाच विस्ताराने सांगून काय उपयोग ? (थोडक्यात) दुसऱ्यावर उपकार करणे हे पुण्य असून दुसऱ्याला त्रास देणे हे पाप आहे.'

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे.)

व्य. – धर्म म्हणजे प्रत्येकाचा आचार किंवा कर्तव्य. अर्थात ते स्वतःप्रमाणेच इतरांनाही सुखकारक झाल्यास व्यष्टीबरोबरच समष्टीचाही उत्कर्ष साधते. म्हणून धर्मस्वरूपाचा सूक्ष्म विचार जरी सर्वसामान्यांनी केला नाही तरी कर्तव्याकर्तव्याचा पेच सोडविण्यासाठी मोजक्या शब्दांत मार्गदर्शन केले आहे. सर्व संतवचनांचे किंबहुना धर्मांचे सार सांगणारा असा उक्तिविशेष सर्वसामान्यांना प्रेरक होतो म्हणूनच व्यवहारात अनेकदा उपयोजिला जातो.

२९८. परोपकाराय सतां विभूतयः

सं. – सुर. २. सज्जनप्रशंसा १७०,१७१. परोपकार हाच ज्यांचा स्वभाव आहे अशा निसर्गघटकांसमवेत परोपकारी व्यक्तींची गणना या श्लोकात केली आहे. परोपकार हा पुण्यप्राप्तीसाठीही काहीजण करतात. अर्थात भलाई मिळावी असा त्यांचा उद्देश असतो. पण काही मात्र निष्काम वृत्तीने दुसऱ्याचे भले करण्यातच

आनंद मानणारे असतात. तेच खरे सज्जन होत. अशा निःस्पृह परोपकारकर्त्यांचे वर्णन येथे केले आहे.

मू. – पिबन्ति नद्यः स्वयमेव नाम्भः स्वयं न खादन्ति फलानि वृक्षाः ।
नादन्ति सस्यं खलु वारिवाहा : परोपकाराय सतां विभूतयः ।। सुर २.स. १७०.

अ. – ' नद्या स्वतःच पाणी पीत नाहीत. झाडावरची फळे वृक्ष भक्षीत नाहीत. मेघ स्वत.च बीज (पीक) खात नाहीत. दुसऱ्यावर उपकार करण्यासाठीच सज्जनांचा जन्म असतो. '

मू. – रत्नाकरः किं कुरुते स्वरत्नैर्विन्ध्याचलः किं करिभिः करोति ।
श्रीखण्डखण्डैर्मलयाचलः किं परोपकाराय सतां विभूतयः ।। सुर २. स. १७१.

अ. – ' विविध रत्नांचा साठा असलेल्या सागराला रत्नांचा काय उपयोग ! विंध्य पर्वतावर असणाऱ्या हत्तींशी विंध्याचा काहीच संबंध (कार्यदृष्ट्या) नसतो. तसेच मलयाचलावरील चंदनकाष्ठांचा मलयाला काय फायदा ? खरोखर सज्जन लोक परोपकारासाठीच असतात. '

व्य. – ' देह कष्टविती उपकारे ' किंवा ' भवो ही लोकाभ्युदयाय तादृशाम् ' असे ज्यांच्या बाबतीत म्हणता येईल तेच सज्जन होत. दुसऱ्याला साहाय्य करण्यातच सज्जनांच्या कार्याची इतिश्री होते. स्वार्थाचा लवलेशही नसलेली ही मंडळी चंदनाप्रमाणे परार्थसिद्धीसाठी देह झिजवितात, म्हणूनच त्यांचा उल्लेख किंवा वर्णन वरील उक्तिविशेषाने केले जाते.

२९९. परोपदेशे पाण्डित्यम्

सं. – हित. १.१०३. मित्रलाभ तंत्रात, लघुपतनक नावाच्या कावळ्याने हिरण्यकाला आपल्या दण्डकारण्यातील कासवमित्राचे गुणवैशिष्टच पुढील शब्दांत सांगितले.

सुर. ३. सामान्यनीति १५९. मनुष्यस्वभावाचा एक विशेष सुभाषितकाराने येथे सांगितला आहे.

सप. प ५.

मू. – परोपदेशे पाण्डित्यं सर्वेषां सुकरं नृणाम् ।
धर्मे स्वयमनुष्ठानं कस्यचित्तु महात्मनः ।। हित. १.१०३.

अ. – ' दुसऱ्याला उपदेश करण्याचे वेळी पांडित्य प्रकट करणे सर्व माणसांना सहज शक्य असते. स्वतः त्या धर्माचे आचरण करणारा मात्र एखादाच महात्मा असतो.'

मू. – परोपदेशवेलायां शिष्टाः सर्वे भवन्ति वै ।
विस्मरन्तीह शिष्टत्वं स्वकार्ये समुपस्थिते ।। सुर. सामान्य. १५९.

अ. – ' दुसऱ्याला उपदेश करण्याचे वेळी सर्वजण सज्जन बनतात आणि स्वतःवर वेळ आली म्हणजे (मात्र) सज्जनपणा विसरून जातात.'

मू. – परोपदेशसमये जना सर्वेऽपि पण्डिता ॥
तदनुष्ठानसमये मुनयोऽपि न पण्डिताः ॥ सप. प ५.

अ. – 'दुसऱ्याला उपदेश करण्याचे वेळी सर्वच लोक पण्डित बनतात (पण्डितासारखे बोलतात.) पण त्याचे स्वतः आचरण करण्याची वेळ आली म्हणजे (मात्र) थोर म्हणविणारे ऋषीमुनी सुद्धा पण्डितासारखे (उपदेशातील आचरण करणाऱ्या शहाण्यासारखे) वागत नाहीत.'

व्य. – आचारधर्म 'बोलायला सोपा आणि करायला कठीण.' दुसऱ्याला उपदेश करताना धर्माची आणि नीतीची तत्त्वे भराभर आठवतात, तर स्वतः वागताना त्यांचे पुसट स्मरणही होत नाही. त्या वेळी काम, क्रोध इत्यादींच्या आहारी जाऊन मनुष्य स्वतःच्या लहरीप्रमाणे व्यवहार करतो, त्याच्या बोलण्या-करण्यात मेळ राहात नाही; हा सार्वत्रिक अनुभव आहे. तत्त्वाप्रमाणे आचरण करणे कठीण असते तरीपण प्रत्येकाला, दुसऱ्याला उपदेश करण्यात हौस वाटते. मनुष्यस्वभावातला हा विशेष या उक्तिविशेषाने सांगितला जातो.

३००. पश्येम शरदः शतम् जीवेम शरदः शतम्

सं. – ऋग्. ७. ६६. १६. सूर्यदेवतेला उद्देशून गायत्री छंदातील वसिष्ठ मैत्रावरुणि ऋषींच्या सूक्तातील ही ऋचा म्हणजे दीर्घायुष्यासाठी प्रार्थना होय.

यजु. ३६. २४. २४. मानवाचे कल्याण, शांती, अभय यासाठी प्रार्थना असलेल्या सूक्तातील ही शेवटची ऋचा आहे. ऋग्वेदातील मूळ ऋचेतील प्रार्थनेचाच येथे अधिक विस्तार केला आहे.

अथर्व. १९. ६७. १–८. दीर्घायुष्य, इंद्रियांचे सामर्थ्य, समृद्धी, ज्ञान या सर्वांसाठी प्रार्थना या सूक्तात आहे.

मू. – तच्चक्षुर्देवहितं शुक्रमुच्चरत् ।
पश्येम शरदः शतं, जीवेम शरदः शतम् ॥ ऋग् ७.६६.१६.

अ. – 'ते विश्वाला प्रकाशित करणारे, देवांना कल्याणकारक, शुभ्र सूर्यमंडल वर आकाशात उदय पावत आहे. शंभर वर्षेपर्यंत आम्ही त्याचे दर्शन घेत राहावे (व त्यासाठी) आम्ही शंभर वर्षे जगावे.'

मू. – तच्चक्षुर्देवहितं पुरस्ताच्छुक्रमुच्चरत् ।
पश्येम शरदः शतं जीवेम शरदः शतं,
शृणुयाम शरदः शतं प्रब्रवाम शरदः शतमदीनाः स्याम
शरदः शतं, भूयश्च शरदः शतात् ॥ यजु. ३६.२४.२४.

अ. – 'ते विश्वाला प्रकाशित करणारे, देवांना कल्याणकारक, शुभ्र सूर्यमंडल आकाशात वर येत आहे. ते आम्ही शंभर वर्षेपर्यंत पाहावे, शंभर वर्षे जगावे,

शंभर वर्षेपर्यंत कानांनी ऐकावे, वाणीने शंभर वर्षे बोलावे, दुबळे न होता (सामर्थ्यसंपन्नतेने) शंभर वर्षे असावे, त्याहूनही अधिक काळ आम्ही जगावे.'

मू. – पश्येम शरदः शतम् । जीवेम शरदः शतम् ।
बुध्येम शरदः शतम् । रोहेम शरदः शतम् ।।
पूषेम शरदः शतम् । भवेम शरदः शतम् ।।
भूयेम शरदः शतम् । भूयसीः शरदः शतम् ।। अथर्व. १९.६७.१–८

अ. – 'आम्ही शंभर वर्षेपर्यंत जगावे, पाहाण्याला व ऐकण्याला समर्थ असावे, ज्ञानार्जन करावे, शंभर वर्षेपर्यंत उन्नती करीत राहावे, पुष्ट असावे, (शरिराने) स्वस्थ, आनंदी राहावे. शंभर वर्षेपर्यंत स्वतःला सुंदर, सुशोभित ठेवीत राहावे, शंभराहूनही अधिक वर्षे आम्ही असावे.'

व्य. – ऐहिक जीवनाविषयी वैदिक संस्कृतीची दृष्टी केवढी भव्य, व्यापक व आशावादी आहे हे वरील ऋचांवरून स्पष्ट होते. जीवनाबद्दल निराश होऊन पराङमुख होणे, औदासिन्य यांचा पुसटसा उच्चारही वैदिक वाङमयात आढळत नाही. सर्व इंद्रियांचे सामर्थ्य कायम राहून विविध उपभोग, ज्ञानार्जन, विविध अनुभव यांनी संपन्न व समृद्ध अशी शंभर वर्षांची आयुर्मर्यादा हे मनुष्यजीवनाचे ईप्सित असले पाहिजे. आर्यांची ही महत्त्वाकांक्षा व मानवी जीवनाबद्दलचा त्यांचा विधायक दृष्टिकोन या उक्तिविशेषाने प्रकट होतो. वाढदिवसाला, षष्ट्यब्धपूर्ती इ. समारंभासाठी या उक्तिविशेषाचा उपयोग केला जातो.

३०१. प्रजापुण्यैश्च जीवति

सं. – उरा. ७.७. रामाने सीतेचा त्याग केला तरी रामाला सीतेविषयी अपार प्रेम वाटत होते हे पृथ्वीनेही जाणले होते. रघुकुलाची देवता भागीरथी हिने रामाच्या वतीने पृथ्वीची क्षमा मागताच पृथ्वीने रामावरील आपला विश्वास बोलून दाखविला, तो या शब्दांत.

मू. – दह्यमानेन मानसः दैवाद्वत्सां विहाय सः ।
लोकोत्तरेण सत्त्वेन प्रजापुण्यैश्च जीवति ।।

अ. –(पृथ्वी म्हणते) 'दैवयोगामुळे (या) मुलीचा (सीतेचा) त्याग करावा लागलेला तो राजा जळत्या अंतःकरणाने आता अलौकिक आत्मबलावर आणि प्रजेच्या पुण्याईच्या बलावरच कसाबसा जीव धारण करून आहे.'

व्य. – राजसत्ता सर्वश्रेष्ठ मानली जात असली तरी या राजसत्तेला खरा आधार प्रजाजनांचा असेल तरच ती चिरकाल टिकते. तिचे स्थैर्य व कार्य लोकमान्यतेवरच बहुशः अवलंबून असते. म्हणूनच 'प्रजानुरंजनात् राजा' असे म्हटले जाते. प्रजेच्या म्हणजे जनतेच्या पुण्याईवरच शासन चालत असते. ती नष्ट झाली की ते क्षणा

र्धात कोलमडून पडते. हे जनतेने आणि शासकांनीही निरंतर लक्षात ठेवून वागावे, यासाठी या उक्तिविशेषाने इशारा दिला जात असतो.

३०२. प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः

सं. – भगी. गीतामाहात्म्य २. गीतेचा कर्ता, तिचे अठरा अध्यायात्मक स्वरूप, तिचे महाभारतातील स्थान सांगितल्यानंतर, गीतेला श्लोकबद्ध ग्रंथाचे स्वरूप देणाऱ्या व्यासाचे वर्णन या श्लोकात केले आहे.

मू. – नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविन्दायतपत्रनेत्रम् ।
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ।।

अ. – 'विशाल बुद्धीच्या, पूर्ण उमललेल्या कमलाप्रमाणे दीर्घ नेत्र असलेल्या हे व्यासमुने, तुला नमस्कार असो; तू असा की ज्या बुद्धीच्या प्रभावाने तू महाभारतरूपी तेलाने भरलेला (गीतारूपी) प्रकाशमान दीप उजळलास.'

व्य. – वेद, उपनिषदे यांतील तत्त्वज्ञान सुसूत्र करून जिज्ञासू व मुमुक्षू यांच्यासाठी त्याची व्यवस्थित रचना करण्याचे महान कार्य व्यासांनी केले. तसेच सामान्य माणसांसाठी त्यांनी कथा व तत्त्वज्ञान यांनी युक्त अशी अठरा पुराणे लिहिली असे मानले जाते. महाभारत हा त्यांचा ग्रंथ एवढा प्रचंड व सर्वस्पर्शी आहे की, 'महाभारतात जे नाही ते जगात अन्यत्र कोठेही असणार नाही, त्यात जे आहे तेच जगात, इतरत्र आढळेल' असे म्हटले जाते. महाभारताच्या भीष्मपर्वात युद्धाच्या प्रसंगी श्रीकृष्णांनी अर्जुनाला केलेला तत्त्वोपदेश गीतेच्या स्वरूपात श्लोकबद्ध करून भारतीयांनाच नव्हे तर सर्व मानवजातीला त्रिकालात अखंड प्रकाश देणारा असा दिव्य ज्ञानग्रंथ व्यासांनी निर्माण केला. या श्लोकाने व्यासांना वंदन केले आहे. जेथे जेथे ज्ञानाची उपासना केली जाते अशा अनेक संस्थांनी ह्या उक्तिविशेषाचा स्वीकार आपले ध्येयवाक्य म्हणून केलेला आहे. लोककल्याणासाठी, जनउद्‌बोधनासाठी किंवा कोणत्याही कल्याणकारी ज्ञानप्रसारासाठी सिद्ध झालेल्या ज्ञानसाधनाचा उल्लेख या उक्तिविशेषाने केला जातो.

३०३. प्रतिपच्चन्द्ररेखेव वर्धिष्णु विश्ववन्दिता

सं. – म. इ. सा. खं. १५.४३७. शिवाजी व जिजाबाई यांना पुण्यास ठेवताना शहाजी राजांनी स्वराज्यस्थापनेची सूत्रबद्ध व्यवस्था केली होती. शिवाजी स्वतंत्र हिंदू राजा म्हणून शासनकर्ता व्हावा या दृष्टीने त्याला 'छत्रपती' ही पदवी, प्रधानमंडळ, राज्यकारभारात वापरण्यासाठी त्याच्या नावाचा स्वतंत्र शिक्का (मुद्रा) करून दिलेला होता. राज्याभिषेकाचे वेळी हीच स्वराज्याची मुद्रा म्हणून शिवाजीमहाराजांनी कायम केली.

मू. – प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णु विश्ववन्दिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।

अ. – 'प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे (दिवसेदिवस) वाढणारी, सर्वांना पूज्य असणारी, शहाजी महाराजांचे पुत्र शिवाजी यांची ही मुद्रा (शासनाचे चिन्ह) कल्याणकारी म्हणून विराजमान होत आहे.'

व्य. – देव-देश-धर्म यांच्या रक्षणासाठी अवतरलेल्या स्वराज्यसंस्थापक शिवरायांची ही मुद्रा त्यांच्या तेजस्वी व सतत वर्धमान महत्त्वाकांक्षेची व लोककल्याणकारक बुद्धीची निदर्शक आहे. स्वतंत्र भारतातील आजच्या महाराष्ट्र राज्याने या श्लोकातील 'मुद्रा भद्राय राजते' एवढेच शब्द आपल्या शासनाचे चिन्ह म्हणून स्वीकारले आहेत.

३०४. प्रथमग्रासे मक्षिकापातः

सं. – लोकोक्ती.

मू. – प्रथमग्रासे मक्षिकापातः ।

अ. – 'पहिल्या घासातच माशी पडली.'

व्य. – भूक शमविण्यासाठी अन्न खावयास सुरुवात करताना पहिल्या घासातच माशी पडली म्हणजे सगळ्या जेवणाचा विरस होतो; एखाद्या कार्याला प्रारंभ करतानाच सुरुवातीलाच काही अडथळा आला म्हणजे ते पुढे चालू ठेवावे किंवा नाही याबद्दल शंका उत्पन्न होते. अशा वेळी या उक्तिविशेषाचे सहजच स्मरण होते.

३०५. प्रसादचिह्नानि पुरः फलानि

सं. – रघु. २.२२. पुत्रप्राप्तीच्या इच्छेने, वसिष्ठांच्या आज्ञेवरून दिलीप राजा व त्याची पत्नी सुदक्षिणा यांनी, कामधेनूची कन्या नंदिनी हिची सेवा केली. ती सेवा सफल होण्याची चिन्हे राजा-राणीला दिसू लागली.

मू. – वत्सोत्सुकापि स्तिमिता सपर्यां प्रत्यग्रहीत्सेति ननन्दतुस्तौ ।
भक्त्योपपन्नेषु हि तद्विधानां प्रसादचिह्नानि पुरः फलानि ।।

अ. – '(वनातून परत आल्यानंतर) आपल्या पाडसाकडे जायला उत्सुक असून देखील ती (नन्दिनी) निश्चल उभी राहून (राणीने) केलेल्या पूजेचा स्वीकार करी. भक्तिपूर्वक केलेल्या पूजेचा तिने अशा प्रकारे स्वीकार करणे हे तिच्या प्रसन्नतेने प्राप्त होणाऱ्या भावी (शुभ) फलाचे चिन्ह होते.'

व्य. – प्रयत्नपूर्वक आरंभिलेल्या एखाद्या कार्यात यशाची चाहूल देणाऱ्या खुणा दिसू लागतात व अडचणी, संकटे दूर होऊन आशादायक घटना घडू लागतात आणि उज्ज्वल भविष्यकालाची चिन्हे दिसू लागतात. या आनंददायक अनुभवाला कालिदासाने आपल्या शैलीत शब्दरूप दिले आहे.

३०६. प्राप्तं प्राप्तं उपासीत

सं. – महा. १२.२६.२६. राजधर्मपर्वात, युद्धाचा परिणाम पाहून शोकाने व्याकुळ झालेल्या युधिष्ठिराचे व्यासांनी या शब्दांत सांत्वन केले.

महा. १२.१६८.३०. मोक्षधर्मपर्वात भीष्मांनी युधिष्ठिराला, पुत्रशोकाने संतप्त झालेल्या सेनजित राजाला त्याच्या ब्राह्मण मित्राने केलेला उपदेश सांगितला.

मू. – सुखं वा यदि वा दुःखं प्रियं वा यदि वाऽप्रियम् ।
प्राप्तं प्राप्तमुपासीत हृदयेनापराजितः ।।

अ. – 'सुख मिळो किंवा दु:ख असो, प्रिय घडो किंवा अप्रिय गोष्ट घडो, जे जे म्हणून प्राप्त होईल ते ते अंत:करण खचू न देता स्वीकारावे.'

व्य. – सुखाने हुरळून जाणे आणि दु:खाने निराश होऊन हातपाय गाळणे ही सर्वसामान्य माणसांची प्रवृत्ती असते; पण जे समोर येईल त्याचा हसतमुखाने, मनाचा तोल ढळू न देता स्वीकार करणे यात माणसाचे मोठेपण आहे. कठीण परिस्थितीत मार्गदर्शक म्हणून या उक्तिविशेषाचा उपयोग केला जातो.

३०७. प्रारब्धमुत्तमजना न परित्यजन्ति

सं. – नीश. ७२. जगातल्या माणसांच्या उत्तम, मध्यम व कनिष्ठ या श्रेणी ठरविण्याची कसोटी भर्तृहरीने येथे सांगितली आहे.

मुद्रा. २.१७. चंद्रगुप्ताचा नाश करण्यासाठी योजलेले सर्व उपाय निष्फळ झालेले पाहून निराश झालेल्या अमात्य राक्षसाला त्याचा गुप्त हेर विराध या शब्दांत धीर देतो.

मू. – प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः प्रारभ्य विघ्ननिहता विरमन्ति मध्याः ।
विघ्नैर्मुहुर्मुहुरपि प्रतिहन्यमानाः प्रारब्धमुत्तम जना卐 न परित्यजन्ति ।।

卐 **उत्तमगुणा** : पाठभेद

अ. – 'अडथळे येतील या भीतीने क्षुद्र लोक एखाद्या कार्याचा प्रारंभच करीत नाहीत. मध्यम योग्यतेची माणसे कार्य हाती घेतल्यावर, विघ्न आले म्हणून ते मध्येच सोडून देतात परंतु धैर्य, शील आदी उत्तम गुणांचे श्रेष्ठ पुरुष, विघ्नांचे पुन: पुन: आघात झाले तरी आरंभिलेले कार्य (मध्ये–अर्धवट) सोडून देत नाहीत.'

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे.)

व्य. – अनंत अडचणींवर मात करण्याचे धैर्य व चिकाटी हे व्यक्तिगत गुण एखाद्या कार्यात यशाला कारण होतात. अशक्य वाटणारे कार्य या गुणांमुळे सिद्ध होते; तसे कार्य करणाऱ्या व्यक्ती लोकोत्तर गणल्या जातात. अशा व्यक्तींच्या कार्याकडे पाहून या उक्तिविशेषाने त्यांचा गौरव केला जातो.

राज्ञा. १ उविसं. १२

३०८. पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना

सं. – सुर. ३. सामान्यनीती २६२. ईश्वराने निर्माण केलेले जग किती विविध आहे हे अनेक उदाहरणे देऊन सुभाषितकाराने येथे सांगितले आहे.

मू. – पिण्डे पिण्डे मतिर्भिन्ना कुण्डे कुण्डे नवं पयः ।
जातौ जातौ नवाचारा नवा वाणी मुखे मुखे ।।

अ. – 'प्रत्येक व्यक्तीची बुद्धी वेगवेगळी, प्रत्येक जलाशयातले पाणी वेगळे, जाती-जातीचे आचार भिन्न भिन्न, प्रत्येकाची बोलण्याची धाटणीही वेगवेगळी आढळते.'

व्य. – व्यक्ती तितक्या प्रकृती. सर्व माणसांची इंद्रिये, आकृती सर्वसाधारणपणे सारखी असतात, तरी पण प्रत्येक मनुष्य आचारविचाराने दुसऱ्याहून भिन्न असतो. त्याची जाणीवही आपल्याला होते. एकासारखा दुसरा दिसत नाही. ही वस्तुस्थिती पाहिली म्हणजे या उक्तिविशेषाचे स्मरण होते.

३०९. पुत्रं मित्रवदाचरेत्

सं. – सुर. ३. सामान्यनीती ३०८. पित्या-पुत्राचे नाते कसे राखले जावे हे मार्मिकपणे सुभाषितकाराने येथे सांगितले आहे.

मू. – लालयेत् पञ्चवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत् ।
प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रं मित्रवदाचरेत् ।

अ. – 'पाच वर्षांपर्यंत मुलाचे लाड करावेत; (त्यानंतर) दहा वर्षे त्याला ताडन करावे (धाकात ठेवावे); आणि तो सोळा वर्षांचा झाला म्हणजे मात्र त्याच्याशी मित्राप्रमाणे वागावे.'

व्य. – मुलांशी कसे वागावे याचा आदर्श येथे दाखविला आहे. पाच वर्षेपर्यंत मुलांना प्रेम, लाड यांची जरुरी असते. त्या वयात ती स्वतःचे कोणतेच काम स्वतः करू शकत नाहीत. मुले थोडी मोठी होऊन त्यांची समजशक्ती वाढली की त्यांना वळण लावण्याचे काम आई-वडिलांकडे येत असते. प्रसंगी धाक दाखवून, मार देऊनही त्यांच्याकडून अभ्यास करून घ्यावा लागतो.

एकदा ती स्वतःची बुद्धी चालवून स्वतःचे काम करायला समर्थ झाली की, वडिलांचे काम नुसते सल्लागाराचे असते. मुले शिकली, वयात आली तरी देखील त्यांच्यावर अधिकार गाजविणाऱ्या, स्वतःचे निर्णय त्यांच्यावर लादणाऱ्या अविवेकी माता-पित्यांना उद्देशून या उक्तिविशेषाचा उच्चार होतो.

३१०. पुराणं पञ्चलक्षणम्

सं. – वराह पु. २. वराहरूप भगवान विष्णूने पृथ्वीला, सृष्टयुत्पत्ती, विश्वातील अनेक घडामोडी कशा झाल्या हे सांगण्याच्या पूर्वी, ज्या ग्रंथाच्या रूपाने हे सर्व कथन

केले गेले, त्या पुराणाचे लक्षण सांगितले. सर्व पुराण-ग्रंथांत हा लक्षण सांगणारा श्लोक आहे.

भाग. १२.७.९. येथे पुराणाची दहा लक्षणे दिली आहेत. पुराणांचे वर्ण्य विषय व त्यांचे महत्त्व या श्लोकावरून कळून येते.

मू. – सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणि च ।

वंशानुचरितं चेति पुराणं पञ्चलक्षणम् ॥ वराहपु. २.

अ. – ‘सृष्टिविस्तार, प्रलय, राजवंश, मन्वन्तरे आणि राजे व ऋषी यांच्या कुलांत जन्मलेले महापुरुष यांचे वर्णन करणे, असे पुराणाचे पाच प्रकारचे लक्षण आहे.’

मू. – सर्गश्चाथ विसर्गश्च वृत्ती रक्षान्तराणि च ।

वंशो वंशानुचरितं संस्था हेतुरपाश्रयः ॥ भाग. १२.७.९.

अ. – ‘सृष्टिवर्णन, जीवसृष्टी, प्राण्यांच्या उपजीविकेची सामग्री, भगवन्ताच्या विविध अवतारांकडून सज्जनांचे रक्षण व दुर्जनांचा संहार, मन्वन्तरे, वंश (सूर्य-सोमादी), त्या वंशांतील प्रमुख राजे, प्रलय, जीववर्णन, जागृती, स्वप्न व सुषुप्ती अशा तीन अवस्थांमध्ये साक्षी, आधार असा परमेश्वर. (या सर्वांचे वर्णन ज्या ग्रंथात असते ते पुराण होय.)’

व्य. – पुराणे हा भारताचा बहुमोल सांस्कृतिक ठेवा आहे. पुराणांच्या अभ्यासा-शिवाय वेदांचा अर्थ नीट कळू शकत नाही. मूळ वैदिक धर्माची परंपरा टिकवून धरण्याचे कार्य पुराणांइतके कोणत्याच ग्रंथांच्या योगे झाले नाही; कारण पुराणे वाचण्याचा व ऐकण्याचा अधिकार सर्व वर्णांना दिलेला आहे. किंबहुना वेदांमध्ये अडकून पडलेले धर्म व अध्यात्म यांविषयीचे ज्ञान बहुजन समाजाला उपलब्ध करून देण्यासाठी अठरा पुराणांची निर्मिती झाली. त्यांद्वारे सृष्टयुत्पत्ती, मन्वन्तरे-युगे ही कालगणना, राजवंशांची माहिती, थोर पुरुषांची चरित्रे, भूवर्णन, लोक-जीवन, नीती व धर्माची तत्त्वे, अध्यात्म हे सर्व ज्यांत विविध कथाभागांमध्ये गुंफलेले आहे, असे पुराणग्रंथ ऐतिहासिक-सांस्कृतिक दृष्टया अतीव महत्त्वाचे आहेत. सगुणोपासना, व्रत-वैकल्ये, तीर्थयात्रा, भक्तिमार्गाची महती, मंदिरांची शिल्पकला या सर्व पुराणांच्या देणग्या आहेत. पुढील काळात काही पुराणांत घुसडल्या गेलेल्या भरताडवजा मजकुरामुळे (विशेषतः भविष्यपुराण) ‘लांबलचक कंटाळवाणे चऱ्हाट’ या अर्थाने पुराण हा शब्द वापरला जाऊ लागला. तसेच ‘पुराणातली वांगी पुराणात’ – धर्माचा उपदेश देवळातल्या देवळात, व्यवहारात ती तत्त्वे अमलात आणून चालत नाहीत.अशा विपर्यस्त समजुतीने रूढ झालेल्या उक्तिविशेषाने पुराणां-बद्दलची अवहेलनेची दृष्टी प्रकट होऊ लागली. पुराण म्हटल्याबरोबर ‘म्हाताऱ्या बायकांनी दुपारच्या वेळी वाती वळता वळता ऐकायच्या कथा’ – हे चित्र आपल्या दृष्टीपुढे येते. अशा वेळी पुराणांच्या महत्त्वपूर्ण सांस्कृतिक वैशिष्टयांकडे आपले लक्ष वेधले जावे अशा प्रकारचा वरील ‘पुराणं पञ्चलक्षणम्’ हा उक्तिविशेष आहे.

३११. पुराणमित्येव न साधु सर्वम्
(पाहा : मूढः परप्रत्ययनेय बुद्धिः)

सं. – मात्र. १.२. भास, कविपुत्र, सौमिल्लक या जुन्या नाटककारांची नाटके बाजूला ठेवून, कालिदासासारख्या नव्या नाटककाराच्या नाटचरचनेचा गौरव विद्वद्जन का करीत आहेत, या पारिपार्श्वकाच्या प्रश्नाला सूत्रधाराचे उत्तर म्हणून 'मालविकाग्निमित्र' नाटकाच्या प्रस्तावनेत हा श्लोक कालिदासाने घातला आहे.

मू. – **पुराणमित्येव न साधु सर्वं न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ।**
सन्तः परीक्ष्यान्यतरद्भजन्ते मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः ।।

अ. – 'केवळ जुने आहे म्हणून ते सर्व चांगले, आणि केवळ नवे आहे म्हणून ते काव्य टाकाऊ नसते. विद्वान् लोक (जुन्या व नव्या साहित्यकृतींतील) गुण व दोष पाहून नव्या किंवा जुन्याचा स्वीकार करतात. अडाणी मनुष्य दुसऱ्याच्या मतावरून स्वतःचे मत बनवितो.'

व्य. – 'जुने ते सोने' म्हणून जुन्या गोष्टींचाच आदर करण्याची सामान्य लोकांची पद्धत असते. स्वतः गुणदोषांचा विचार करून एखाद्या कृतीचे मोल ठरविण्याइतकी त्यांची कुवत नसते, त्यामुळे एखाद्या नवीन कृतीविषयी ते साशंक असतात. शहाणे लोक केवळ नवे-जुनेपणावरून वस्तूची किंमत करीत नाहीत. ते स्वतंत्रबुद्धीने परीक्षा करून योग्य त्या गोष्टीचा स्वीकार-गौरव करतात; या अर्थाने या उक्तिविशेषाचा उपयोग केला जातो.

३१२. पृथिव्यां त्रीणि रत्नानि

सं. – सुर. २. सुभाषितप्रशंसा ६. मनाला आनंद आणि बोध देणाऱ्या सुभाषितांचे वैपुल्य हा संस्कृत भाषेतील एक महान ठेवा आहे. आपल्या अनुभवांचे, निरीक्षणाचे सार अगदी थोडक्या शब्दांत प्रकट करून, दीर्घकाळ विचार करायला ती प्रवृत्त करतात, स्फूर्ती देतात असा सुभाषितकाराचा आशय आहे.

मू. – **पृथिव्यां त्रीणि रत्नानि जलमन्नं सुभाषितम् ।**
मूढैः पाषाणखण्डेषु रत्नसंज्ञा विधीयते ।।

अ. – 'भूतलावर (खरोखरी) तीन रत्ने (मूल्यवान् वस्तू) आहेत–पाणी, अन्न आणि सुभाषित. मूर्ख लोक (मात्र) दगडाच्या तुकड्यांना रत्न म्हणतात.'

व्य. – तहान लागली म्हणजे पाण्याची आणि भुकेने जीव व्याकुळ झाला म्हणजे अन्नाची किंमत आपल्याला कळते. त्यांच्यावाचून आपण जगू शकत नाही. त्यासाठी वाटेल ते मोल द्यायला आपण तयार होतो. मग जगातील सर्वाधिक महत्त्व अन्नपाण्याला देणे साहजिक आहे. शरीराइतकेच किंबहुना त्याहून अधिक महत्त्व मनाच्या स्वास्थ्याला आहे. म्हणून मनाचे पोषण करणारे सुविचार जीवनाच्या

दृष्टीने तितकेच मोलाचे. सुविचार देणारे सुभाषित हा मनुष्याच्या मनाचा व वाक्शक्तीचा एक सुंदर संगम आहे. अर्थात सुभाषितांची गोडी विचारी माणसालाच असू शकेल. अविचारी, अज्ञानी लोकांचे चित्त चकाकणाऱ्या आणि सर्वांना उपयुक्त व उपलब्ध नसणाऱ्या खडयांकडे आकर्षित होणार. खऱ्या मूल्यवान वस्तूकडे लक्ष वेधण्यासाठी वास्तविक हा उक्तिविशेष वापरला जावयास हवा; परंतु व्यवहारात मात्र केवळ सुभाषिताची थोरवी सांगण्यासाठीच तो उपयोजिला जातो.

(फ)

३१३. फलानुमेयाः प्रारम्भाः

(पाहा : संस्काराः प्राक्तना इव)

सं. – रघु. १.२०. सूर्यवंशातील दिलीप राजाच्या सर्वगामी बुद्धीने कार्यसिद्धी होत असे. कार्याच्या फलागमावरून कार्याविषयी अनुमान केले जावे इतक्या गुप्तपणे व वेगाने कार्य करविण्याची त्याची रीत होती.

मू. – तस्य संवृतमन्त्रस्य गूढाकारेङ्गितस्य च ।

फलानुमेयाः प्रारम्भाः संस्काराः प्राक्तना इव ।।

अ. – 'त्या' (राजाचे) राजकारणातील सल्लामसलत (राजकीय धोरण) व मनोविकार (कधीही) प्रकट होत नसल्याने त्यांच्याविषयी परिणाम घडल्यानंतरच अनुमान केले जाई. जसे या जन्मातील कृतीवरून पूर्वजन्मातील संस्कारांविषयी तर्क केला जातो'.

व्य. – प्रत्यक्ष घडलेला परिणाम पाहिल्यावाचून कार्याची कल्पना येणार नाही, इतकी गुप्तता राजकीय धोरणाविषयी रघुवंशात राखली जात असे. राजनीतिज्ञ कौटिल्याचीही राजाकडून हीच अपेक्षा होती. अर्थात केवळ राजाचीच कार्यपद्धती अशी असावी असे नाही तर ज्यांना ज्यांना आपले ईप्सित साधायचे असेल त्यांनी गाजावाजा करण्यापेक्षा कृतिशीलता बाणवावी, असेही यातून सुचवावयाचे आहे. 'Result justifies the means' म्हणजे परिणाम चांगला घडला, कार्य उत्तम प्रकारे पार पडले तर त्यासाठी साधने कोणती वापरली याची पंचाईत करीत बसू नका, अशी पाश्चात्य नीती आहे. 'करणे असेल अपाये तरी बोलोन दाखवू नये' असा रोकडा सल्ला समर्थांनी राजकारण्यांना दिला आहे. प्रस्तुत उक्तिविशेषाची व्यापकता याहूनही मोठी व विशाल आहे. राजकारणाच्या संदर्भात तर ती विशेष लक्षात घेण्यासारखी आहे. व्यक्तिगत वर्तनाचा दाखला दिलेला आहे. माणसाच्या वागण्यावरून त्याचे पूर्वसंस्कार काय असतील याचे अनुमान केले जाते. समोर दिसत असलेल्या घटनेवरून त्यासंबंधी केवढी व्यूहरचना, खटाटोप केला गेला असेल

याची कल्पना करता येते. अशा वेळी या उक्तिविशेषाचा वापर होतो. बहुधा सत्कार्ये, शुभसंकल्प याच्या संदर्भातच याचा उपयोग केला जात असतो.

(ब)

३१४. बहुजनहिताय बहुजनसुखाय

सं. – दीघनिकाय १.१.६.६५. गौतम बुद्धाने आपल्या शिष्यसंघाला उद्देशून केलेल्या उपदेशातील या प्रसिद्ध पङ्क्ती आहेत.

मू. – चरत भिक्खवे चारिकं बहुजनहिताय बहुजनसुखाय ।
लोकानुकम्पाय अत्थाय हिताय सुखाय देवमनुस्सानं ।।

अ. – ' हे समुदायाने संचार करणाऱ्या भिक्षूंनो, तुम्ही सर्व लोकांचे कल्याण करण्याच्या, त्यांना सुख देण्याच्या इच्छेने (गमन करा); लोकांच्या बाबतीत दयेची भावना ठेवून, दैवी गुणांनी युक्त असलेल्या व इतर मनुष्यांचे हित करण्याचा उद्देश बाळगून तुम्ही फिरत राहा. '

व्य. – धर्म, नीती, अध्यात्म यांची शिकवण समाजाच्या सर्व थरांतील लोकांना समजावी व त्यायोगे त्यांचे जीवन सुखी व्हावे, यासाठी सर्वस्वाचा त्याग करून निरपेक्ष वृत्तीने सर्वत्र संचार करणाऱ्या बौद्ध भिक्षूंचे संघ भगवान बुद्धांनी तयार केले होते. बुद्धांनी त्यांना दिलेला वरील संदेश कोणत्याही लोकाभिमुख व लोकोपयोगी संस्थेला शिरोधार्य ठरण्याजोगा आहे. भारतीय शासनाने वरील उक्तिविशेष आपल्या माहिती व नभोवाणी खात्याचे तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाने स्वत:चे ध्येयवाक्य म्हणून स्वीकारला आहे.

३१५. बहुरत्ना वसुंधरा

सं. – सप. ब ९.

मू. – दाने तपसि शौर्ये वा विज्ञाने विनये नये ।
विस्मयो नहि कर्तव्यो बहुरत्ना वसुन्धरा ।।

अ. – ' दानशूरता, तप, शौर्य, विज्ञान, नम्रता, न्यायीपणा या कोणत्याही गुणांविषयी (वा गुणी लोकांविषयी) आश्चर्य करण्यासारखे काही नाही; ही पृथ्वी अशा असंख्य गुणरत्नांनी (खरोखरी) भरलेली आहे. '

व्य. – ' बहुरत्ना वसुंधरा । कोण खोटा कोण खरा । अवघे कळे विचारा-रूढ होता ' असे समर्थ रामदासांनी म्हटले आहे. ' बहुरत्ना वसुंधरा ' ही उक्ती बहुधा हे जग सर्व प्रकारचे लोक नि लोकविलक्षण गोष्टी यांनी भरलेले आहे, येथे कोणी कितीही बरा अथवा वाईट दिसला म्हणून आश्चर्य करण्याचे कारण नाही, असे सुचविण्यासाठी वापरली जाते.

३१६. बहूनां जन्मनामन्ते

सं. – भगी. ७.१९. ज्ञानी भक्ताविषयी आपल्याला विशेष प्रीती असल्याचे सांगून श्रीकृष्णांनी त्याला महात्मा मानले आहे.

मू. – बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ।।

अ. – 'अनेक जन्मांनंतर 'जे काही आहे ते वासुदेवच आहे' असे अनुभवास येऊन ज्ञानवान मला प्राप्त होतो; परंतु असा महात्मा अत्यंत दुर्मिळ होय.'

व्य. – अनन्यभावाने भक्ती करणारा, निष्कामबुद्धीने वागणारा असा जो ज्ञानी भक्त तो म्हणजे 'मीच' असे श्रीकृष्णांनी म्हटले आहे. ज्ञानी भक्ताची ही विशेष योग्यता आहे. अनेक वर्षे अनेक जन्म साधना केल्यानंतर भगवन्ताची प्राप्ती होते. भगवत्प्राप्तीसाठी लागणारा दीर्घ काल, त्यातील कठिणता व सतत प्रयत्नांची आवश्यकता या उक्तिविशेषाने सुचविली जाते. साधकाने निराश होऊ नये म्हणूनही त्याचे विशेष महत्त्व मानले जाते.

३१७. बादरायणसंबंधात्

सं. – सप. ब १६. कोठूनतरी कसातरी येनकेनप्रकारेण संबंध जेव्हा जोडला जातो त्या वेळी त्याला बादरायण संबंध म्हणतात. याविषयी एक कथा प्रसिद्ध आहे ती अशी : एक माणूस एकदा बैलगाडीने दुसऱ्या गावी गेला असता रात्रीची वसती करण्यास त्याला कोठे जागा मिळेना, तेव्हा त्याने एका श्रीमंताच्या वाड्यात जाऊन तेथील बोरीच्या झाडाला बैल बांधून ठेवून तो तेथे विश्रांती घेऊ लागला. इतक्यांत यजमानाने येऊन त्याची चौकशी केली तेव्हा त्याने 'तुमचा माझा संबंध' असल्याचे सांगताना म्हटले :

मू. – अस्माकं बदरीचक्रं युष्माकं बदरीतरुः ।
बादरायणसंबंधे● यूयं यूयं वयं वयम् ।।

● **बादरायणसंबंधात्** : पाठभेद

अ. – 'माझी ही गाडीची चाके बोरीच्या लाकडाचीच आहेत. तुमचाही हा बोरीचा वृक्ष आहे. त्यावरून तुमचे आणि आमचे नाते जुळते.'

व्य. – प्रत्यक्षात कोठलेही कसलेही नाते नसताना उगाचच काही हेतूने जवळीक साधण्यासाठी, स्वार्थ साधण्याकरितां जवळ जाऊन चिकटण्यासाठी जेव्हा नसती नाती शोधून जोडतात त्या वेळी ते हास्यास्पदही होते; आणि एखादा स्पष्टवक्ता असला हा 'बादरायण संबंध' झिडकारून टाकतानाही आढळतो.

३१८. बालादपि सुभाषितं ग्राह्यम्

सं. – मनु. २.२३९. देश-काल व वर्णाश्रमधर्माला अनुसरून योग्य आचारपद्धतीचे विवेचन करीत असताना, नीचाकडून, कनिष्ठाकडूनही सद्विद्या ग्रहण करावी, असे मनूने सांगितले आहे.

मू. – विषादप्यमृतं ग्राह्यं बालादपि सुभाषितम् ।
अमित्रादपि सद्वृत्तममेध्यादपि काञ्चनम् ।।

अ. – '(अमृत विषात मिसळलेले असेल तर) विष दूर करून अमृत ग्रहण करावे; लहान मुलाचेही हितकारक वचन ऐकावे; शत्रू असला तरी त्याच्या सद्वर्तनाची दखल घ्यावी; व अपवित्र पदार्थांत पडलेलेही सुवर्ण घ्यावे.'

व्य. – जगात सर्वत्र चांगले वाइटाबरोबर मिसळलेले दिसते. वाईट टाकून चांगले घेण्याची कला ज्याच्याजवळ असेल त्यालाच जीवनात सुख मिळण्याची शक्यता. उत्कृष्ट गुण, वस्तू किंवा विद्या ग्रहण करताना तिच्या आश्रयाकडे किंवा माध्यमाकडे पाहू नये. पुष्कळ वेळा अजाण, लहान मुलेही, त्यांच्या निर्मल बुद्धीमुळे, महत्त्वाची सत्य गोष्ट चटकन बोलून दाखवितात, त्याचाही विचार करावा, या अर्थाने हा उक्तिविशेष प्रचलित आहे.

३१९. बालानां रोदनं बलम्

सं. – सुर. ३. सामान्यनीती ३९३. प्रत्येकजण आपापले ईप्सित आपापल्या सामर्थ्यानुरूप साधतो. अर्थातच प्रत्येकाचे बल किंवा सामर्थ्य वेगवेगळ्या प्रकारचे असते. अशा विविध सामर्थ्यांना एकत्रित गुंफणारा हा श्लोक आहे.

सप. ब १३.

मू. – दुर्बलस्य बलं राजा बालानां रोदनं बलम् ।
बलं मूर्खस्य मौनित्वं चौराणामनृतं बलम् ।। सुर. ३. सामान्यनीती ३९३.

अ. – 'अशक्ताचे बल राजा असते (राजावर तो अवलंबून असतो). लहान मुलांचे सामर्थ्य रडण्यात असते (ती आपला हट्ट रडून पुरवून घेतात). गप्प राहण्यातच मूर्खाचे सामर्थ्य (शहाणपण) असते (कारण त्यामुळे त्याचे मूर्खत्व झाकून राहाते) तर, असत्य हे चोरांचे सामर्थ्य असते.'

मू. – पक्षिणां बलमाकाशो मत्स्यानामुदकं बलम् ।
दुर्बलस्य बलं राजा बालानां रोदनं बलम् ।। सप. ब १३.

अ. – 'पक्ष्याचे बळ (शौर्य) आकाशात (उडण्यातच) असते; तर माशांचा जोर पाण्यात असतो. दुबळ्याचा आधार राजा असतो. तसेच मुलांचे बळ रडण्यात असते.'

व्य. – आपल्याला हवे ते मिळवून घेण्यासाठी वेगवेगळ्या साधनांचा उपयोग केला जातो. जसे लहान मुले रडूनओरडून मोठ्यांचे लक्ष्य आपल्याकडे वेधून घेतात,

आपल्या मनाप्रमाणे त्यांना करायला लावतात, तद्वतच दुबळा निस्तेज माणूस राजाच्या किंवा एखाद्या आश्रयदात्याच्या आधारानेच आपल्या इच्छा पूर्ण करून घेतो. काही वेळा एखाद्याच्या दुबळेपणाबद्दल तुच्छतेने बोलताना ही उक्ती वापरली जाते.

३२०. बुद्धं सरणं गच्छामि

सं. – सदसं. बौद्धदर्शन. कपिलवस्तूच्या महानाम राजपुत्राने बौद्ध उपासनेविषयी गौतम बुद्धाला विचारले असता, बुद्धाने काही नियम सांगितले. 'ते नियम पाळणारी व्यक्ती कोणत्याही जातीची किंवा धर्माची असली तरी ती बौद्ध उपासक समजावी' असे म्हणून त्याने जे नेमधर्म सांगितले त्यांपैकी 'त्रिशरण' हा पहिला नियम होय. बौद्धांच्या दीक्षेच्या वेळी व विद्यारंभप्रसंगी या 'त्रिशरण' मंत्राचा त्रिवार उच्चार केला जातो.

मू. – बुद्धं सरणं गच्छामि । धम्मं सरणं गच्छामि ।
संघं सरणं गच्छामि ।

अ. – 'मी बुद्धाला शरण जातो. मी धर्माला शरण जातो. मी संघाचा आश्रय करतो.'

व्य. – बौद्ध धर्माला सफलता व लोकप्रियता मिळण्याचे कारण म्हणजे बुद्धाची बुद्ध, संघ व धर्म ही 'त्रिरत्न' कल्पना. पराकोटीचा त्याग, अहिंसा, शांती व माधुर्य यांनी युक्त असे बुद्धाचे लोकोत्तर व्यक्तिमत्व हे एक रत्न. पवित्र, नियमबद्ध जीवन जगणाऱ्या व लोकांना नैतिक मार्गदर्शन करणाऱ्या भिक्षूंची संघटना म्हणजे संघ हे दुसरे रत्न. समानता व बुद्धिप्रामाण्यावर आधारलेला धर्म हे तिसरे रत्न. त्यामुळेच त्या काळी बुद्धाचा व संघाचा आश्रय करू इच्छिणाऱ्या अनेक लोकांनी बौद्ध धर्मात प्रवेश केला.

३२१. बुद्धिः कर्मानुसारिणी

सं. – सुर. ३. सामान्यनीती १८८. नशिबात जसे घडायचे असेल तसेच वागायची बुद्धी माणसाला होत असते. या जन्मातील घडणाऱ्या घटनांना कारण दैव असते. दैव म्हणजे कर्मत्रिपुटीतील प्रारब्ध-कर्म होय. कर्मविपाकविषयक विविध संकल्पना सामान्यनीतीत संकलित केलेल्या आढळतात, त्यांपैकीच ही एक चिंतनीय विचारशलाका.

नीश. १२४ * प्रारब्ध अटळ आहे. त्यामुळे या जन्मीच्या फलभोगाची चिंता न करता पुढील जन्मासाठी तरी जाणीवपूर्वक प्रयत्न या जन्मी करावा हे भर्तृहरीला सुचवावयाचे आहे.

मू. – सत्यानुसारिणी लक्ष्मीः कीर्तिस्त्यागानुसारिणी ।
अभ्याससारिणी विद्या बुद्धिः कर्मानुसारिणी ।। सुर. ३. सामान्यनीति १८८.

अ. – 'जेथे सत्य असेल तेथे (लक्ष्मी) ऐश्वर्य नांदते. त्यागानेच कीर्ती लाभते सातत्याने अध्ययन केल्यासच विद्यावन्त होता येते. दैवात असेल तसेच (वागण्याची) बुद्धी माणसाला होते.'

मू. – **कर्मायत्तं फलं पुंसां बुद्धिः कर्मानुसारिणी ।**
तथापि सुधिया भाव्यं सुविचार्यैव कुर्वता ।। नीश. १२४.°

अ. – 'माणसाला जशी कर्मे घडतील तशी फले मिळतात. ती कर्मे करण्याची माणसाला जशी (प्रारब्धानुसार) बुद्धी होईल तशी कर्मे हातून घडतील. म्हणून जे काय करायचे असेल ते बुद्धीने सारासारविवेक करून पूर्ण विचारान्तीच करावे.'

व्य. – दैवात असेल तसेच होणार, माणूस पराधीन आहे, अशी ओरड दैववादी नेहमीच करत असतात. त्यांना चपखल उत्तर देणारा पहिल्या श्लोकाचा भावार्थ अधिक स्पष्ट करणारा हा दुसरा श्लोक आहे. एखाद्या कृतीचे फळ वाईट मिळाले, एखादे कार्य बिघडले, की पश्चात् बुद्धीने 'ते तसे व्हायचेच होते' अशा दैववादी विचारसरणीची द्योतक, ही उक्ती आहे.

° हा श्लोक निर्णयसागर सुभाषितत्रिशतीत नाही. भर्तृहरीच्या शतकत्रयाचा अनुवाद करणाऱ्या ल. गो. विंझे यांच्या (१९६९) प्रतीवरून घेतला आहे.

३२२. बुद्धिनाशात्प्रणश्यति

सं. – भगी. २.६३. विषयचिंतनाने मनुष्याचा कसा घात होतो हे भगवान श्रीकृष्ण वर्णन करीत आहेत.

मू. – **क्रोधाद्भवति सम्मोहः सम्मोहात्स्मृतिविभ्रमः ।**
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।।

अ. – 'क्रोधापासून संमोह म्हणजे अविवेक उत्पन्न होतो, संमोहापासून स्मृतिभ्रम, स्मृतिभ्रंशापासून बुद्धिनाश आणि बुद्धिनाशापासून (माणसाचा) सर्वस्वी घात होतो.'

व्य. – इंद्रिये विषयांत व्यग्र होऊन सैरावैरा धावत असली म्हणजे आत्मज्ञान प्राप्त करून घेण्याची बुद्धीच माणसाला होत नाही. पर्यायाने शांती व सुखही नाही. म्हणूनच निष्कामवृत्तीने कर्मे केल्यास कामक्रोधादी विकारांपासून मन विचलित न होता स्थितप्रज्ञ होता येते, ही गीतेची शिकवण उच्च भूमिकेची मानली तरी साध्या, नित्य दैनंदिन व्यवहारातही राग हा माणसाचा शत्रू आहे, हे अनुभवाला येते; आणि एका रागाच्या अनावरपणामुळे माणसाची अनेक प्रकारे हानी होताना प्रत्यक्ष दिसते तेव्हा वरील उक्तीची आठवण साहजिकपणे होते.

३२३. बुद्धिर्यस्य बलं तस्य

सं. – हित. २.१२२.एक कावळा आपल्या पत्नीला बुद्धीचे सामर्थ्य सांगून तिची भीती कमी करतो. ज्या वृक्षावर ती दोघे राहात होती त्याच वृक्षाच्या बुंध्याशी राहणारा

साप दरवेळी तिची अंडी खात असे. म्हणून ती कावळ्याला ' आपण येथून दुसरीकडे निघून जाऊ या ' अशी विनवणी करताना म्हणते की, या बलवानाशी टक्कर देणे आपल्याला शक्य नाही. त्यावर कावळ्याने तिला मूर्ख सिंहाची व चतुर सशाची कथा सांगितली. बलाढ्य अशा सिंहाच्या आहारासाठी बळी जाण्याच्या ठरविलेल्या क्रमानुसार या दुबळ्या सशाची सिंहाकडे जाण्याची वेळ येताच त्याने गोड गोड बोलून सिंहाला विहिरीत डोकावून बघण्यास सांगितले. त्या विहिरीतील (सिंहाच्या प्रतिबिंबामुळे) आपल्याकडे येण्यास उशीर झाला, असे सशाचे बोलणे ऐकून रागाने विहिरीत उडी घेणारा मूर्ख सिंह मरण पावला. म्हणून कावळा म्हणतो की, ज्याच्या-जवळ बुद्धी असते तो बलवान असतो. आणि बुद्धीच्या बळावरच अखेर त्या कावळ्याने सापाचा नाश करविला.

मू. – बुद्धि र्यस्य बलं तस्य निर्बुद्धेस्तु कुतो बलम् ।
पश्य सिंहो मदोन्मत्तः शशकेन निपातितः ।।

अ. – ' ज्याच्याजवळ बुद्धिमत्ता असेल तोच बलवान. निर्बुद्धाजवळ कुठून असणार बळ ? मदाने उन्मत्त झालेल्या सिंहाला (एवढ्याशा) सशाने ठार मारले, (कसे फशी) पाडले पाहा.'

व्य. – बुद्धिसामर्थ्याचे महत्त्व सांगणाऱ्या या उक्तिविशेषाचाच ' शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ ' हा मराठी वेष आहे. प्रत्येक वेळी शक्तीच्या जोरावर मनात असेल ते घडविता येईलच असे नाही. किंबहुना शक्ती जिथे चालत नाही अशा ठिकाणीही बुद्धी आपले कार्य साधते. इतिहासाची हीच साक्ष आहे. शिवाजी महाराजांच्या युक्ती-नेच अफजलखानासारख्या शक्तिवानाला मृत्यूशी जवळीक साधावी लागली. दर-रोजच्या पेचप्रसंगातही बुद्धीने मात करता येते, हेच अनुभवसिद्ध आहे. किंबहुना आपत्काळी किंवा कसोटीच्या वेळी बुद्धीचे साह्य लाभेल, तेच यशस्वी होतात.

३२४. बुद्धिस्तु मा गान्मम

सं. – मुद्रा. १.२७. अमात्य राक्षसाला राजनीतीच्या डावपेचांनी पराभूत करण्या-साठी चाणक्याने किंवा कौटिल्याने माणसे पाठविली, त्या वेळी ' कार्यतत्पर अशी सर्व माणसे जरी मला सोडून गेली तरी माझी बुद्धी तेवढी मला सोडून जाऊ नये ' अशी इच्छा त्याने शिष्य शाङर्गवाजवळ प्रकट केली.

मू. – एका केवलमर्थसाधनविधौ सेनाशतेभ्योऽधिका ।
नन्दोन्मूलनदृष्टवीर्यमहिमा बुद्धिस्तु मा गान्मम ।।

अ. – ' कार्याच्या सफलतेविषयी शेकडो सेनांपेक्षाही अधिक प्रभावी असलेली आणि नंदाची पाळेमुळे खणून काढल्यामुळे जिच्या कर्तबगारीची महती सिद्ध झालेली आहे, अशी एक बुद्धी तेवढी मला सोडून गेली नाही म्हणजे झाले.'

व्य. – बुद्धिवैभवाच्या जोरावर सामर्थ्यसंपन्न शत्रूलाही वठणीवर आणण्याचा निर्धार व स्वतःच्या बुद्धीवर नितांत विश्वास चाणक्याच्या या शब्दांतून व्यक्त होतो. अशा विशिष्ट प्रसंगात सापडलेली माणसे, जर त्यांच्या स्वतःच्या बुद्धीवर एवढा विश्वास असेल तर तो, या उक्तिविशेषाने बोलून दाखवितात.

३२५. बुभुक्षितः किं न करोति पापम्

सं. – पंच. ४.१६,३२ वानराचे हृदय खाण्याची मगराची दुष्ट इच्छा पूर्ण होण्यापूर्वीच वानराला कळल्याने मगराच्या गोड बोलण्याला तो भुलला नाही. एवढेच नव्हे तर गंगदत्त बेडूक व प्रियदर्शन सर्पाची कथा सांगून त्याला त्याने निघून जाण्यास सांगितले. आपल्या बांधवांतील यादवी नष्ट करण्याकरिता गंगदत्ताने प्रियदर्शन सर्पाला विहिरीत आणले. त्यामुळे त्याने स्वतःचाही नाश ओढवून घेतला. तसा मूर्खपणा मी करणार नाही, असे वानराने मगराला बजावले.

हित. ४.५५. मदोत्कट नामक सिंहाचे कावळा, वाघ आणि कोल्हा असे तीन सेवक होते. एके दिवशी त्यांनी एका उंटाला भक्ष्य म्हणून पकडून आपल्या स्वामीला अर्पण केला. सिंहाने त्यालाही आपला सेवक म्हणून स्वीकारला. त्याचे 'चित्रकर्ण' असे नाव ठेवले. कालांतराने शरीर थकल्यामुळे भक्ष्य मिळेनासे झाले, त्या वेळी कावळा 'चित्रकर्णालाच स्वामी खातील' असे वाघाला सांगतो. अभय दिलेल्या प्राण्यालाच राजा भक्ष्य बनवील हे ऐकून आश्चर्यचकित झालेल्या वाघाला कावळ्याने पुढील श्लोकात उत्तर दिले:

मू. – **बुभुक्षितः किं न करोति पापं क्षीणा नरा निष्करुणा भवन्ति ।**
आख्याहि भद्रे प्रियदर्शनस्य न गङ्गदत्तः पुनरेति कूपम् ॥ पंच. ४.१६,३२

अ. – 'भुकेलेला माणूस कोणते पाप करीत नाही? दरिद्री माणूस निर्दय होतो. (म्हटलेच आहे) 'हे सखी, प्रियदर्शनाला सांग की, गंगदत्त पुन्हा विहिरीत येणार नाही.'

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे).

मू. – **त्यजेत् क्षुधार्ता महिला स्वपुत्रं खादेत् क्षुधार्ता भुजगी स्वमण्डम् ।**
बुभुक्षितः किं न करोति पापं क्षीणा नरा निष्करुणा भवन्ति ॥ हित. ४.५५

अ. – 'भुकेने व्याकुळ झालेली स्त्री आपल्या मुलालाही खाईल. सर्पिणीही स्वतःचे अण्डे भुकेपोटी खाईल. (खरोखर) भुकेलेला माणूस कोणते पाप करणार नाही; दरिद्री माणूस (भुकेमुळेच) निर्दय होतो.'

व्य. – लोभी, भुकेला माणूस कोणतेच पाप करण्याला मागेपुढे पाहात नाही. पाप-पुण्य, सद्-असद् या साऱ्या कल्पना, जाणिवा क्षुधानलात जळून जातात. हाच आशय व्यक्त करणारी 'बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते' ही म्हणसदृश उक्तीही प्रसिद्ध आहे.

३२६. बोद्धारो मत्सरग्रस्ताः

(पाहा : जीर्णमङ्गे सुभाषितम्)

३२७. भवन्ति नम्रास्तरवः

सं. – नीश. ६१. सज्जनांचा परोपकार करण्याचा स्वभावच असतो. त्यासाठी त्यांना कोणी सांगावे लागत नाही. हे आपण होऊनच परहिताची कामे करण्यात प्रयत्न-शील असतात. परोपकारच स्वभावधर्म असलेल्या परोपकारी सज्जनांचा निसर्ग-घटकासमवेत केलेला हा अकृत्रिम समावेश आहे.

शाकुं. ५.१२. शकुंतलेला दुष्यन्ताकडे पोचविण्यासाठी गौतमी आणि शार्ङ्गरव राजगृही आले. त्यांच्या आगमनाची वार्ता कळताच त्यांना मान देण्यासाठी राजा आसनावरून खाली उतरला. राजाची ही नम्रता पाहून संतुष्ट झालेल्या शाङ्गर्-रवाने या शब्दांत त्याची स्तुती केली.

मू. – **भवन्ति नम्रास्तरवः फलागमैर्नवाम्बुभिर्दूरविलम्बिनो घनाः ।**
अनुद्धताः सत्पुरुषाः समृद्धिभिः स्वभाव एवैष परोपकारिणाम् ॥

अ. – ‘फलांचा बहर आला की वृक्ष अधिक खाली वाकतात. नव्या पाण्याने ओत-प्रोत भरलेले मेघही फार वर (आकाशात) न राहाता पुष्कळ खाली येतात. त्याचप्रमाणे सज्जनांना वैभव प्राप्त झाले तरी ते गर्व करीत नाहीत. परोपकारी माणसांचा हा स्वभावच आहे.’

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे.)

व्य. = नम्रता हा सत्प्रवृत्तीचा स्थायी भाव आहे. त्यामुळे धनमानादी क्षणिक अव-स्थांनी तो नष्ट होत नाही. किंबहुना विनय हेच त्यांचे भूषण असते. यासाठी ही उक्ती वापरली जाते.

३२८. भवति योजयितुर्वचनीयता

सं. – पंच. १.८१. पिंगलक राजा होता. राजा आणि सेवक यांच्या संबंधाविषयी बोलताना दमनक–त्याच्या मंत्र्याचा मुलगा म्हणाला की, उत्तम योग्यतेच्या पुरुषाला हलके काम देणे हे राजाच्या अज्ञानाचे लक्षण आहे; राजाला ते लांछनास्पद आहे.

सू. – **कनकभूषणसंग्रहणोचितो यदि मणिस्त्रपुणि प्रतिबध्यते□ ।**
न स विरौति न चापि स□ शोभते भवति योजयितुर्वचनीयता ॥

□ प्रणिधीयते : पाठभेद; □ हि : पाठभेद

अ. – ‘सोन्याच्या अलंकारामध्ये जडविण्याला योग्य असलेले एखादे रत्न शिशा-मध्ये बसविले, तर ते रत्न खेद करीत नाही की शोभतही नाही; पण त्याला (हीन धातूमध्ये) बसविणाऱ्याची (मात्र) निंदा होते.’

व्य. – उत्तम वस्तूचे मोल जाणता आले पाहिजे, गुणी माणसांना योग्य ते स्थान देता आले पाहिजे; तसे न करणाऱ्या संयोजकाची हीन बुद्धी लोकांच्या टीकेला पात्र होते.

३२९. भवितव्यं भवत्येव

(पाहा : गहना कर्मणो गतिः)

३३०. भावो हि कारणम्

सं. – सुर. ३. सामान्यनीती ५९६. मनुष्याची श्रद्धा हीच ईश्वरभाव निर्माण करते हे सत्य सुभाषितकाराने येथे सांगितले आहे.

मू. – न देवो विद्यते काष्ठे न पाषाणे न मृण्मये ।
भावेषु विद्यते देवस्तस्माद् भावो हि कारणम् ॥

अ. – ' देव लाकडात (लाकडी मूर्तीत), दगडात किंवा मातीत असत नाही; देव भावनेमध्ये असतो. म्हणून कोणत्याही ठिकाणी (देवत्व अनुभवण्यासाठी श्रद्धा) भाव हाच कारण असतो. '

व्य. – देवळातील किंवा घरातील लाकडाच्या, दगडाच्या मूर्ती म्हणजे परमेश्वरी शक्तीचेच रूप आहे असे आपण मानतो. संस्कारांमुळे तशा प्रकारची श्रद्धा निर्माण होते. श्रद्धेमध्ये म्हणजे ' भावा'मध्ये सामर्थ्य असते व त्यामुळे कोणतेही कार्य सिद्ध होते. ' भाव तोचि देव ' ही मराठी उक्ती याच अर्थाची.

३३१. भिद्यते हृदयग्रन्थिः

सं. – मुंडक २.८. वेगवेगळ्या उद्बोधक रूपकांच्या आणि प्रतीकांच्या द्वारे आत्मशक्तीचे वर्णन केल्यानंतर आत्म्याचे स्वरूप केवळ आनंदमय – अमृत आहे असे उपनिषत्कारांनी सांगितले आहे. आनंदरूप आत्म्याच्या ज्ञानाचे फल येथे सांगितले आहे.

मू. – भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥

अ. – ' त्या (कार्यरूप) अवर व (कारणरूप) पर अशा ब्रह्माचे दर्शन (ज्ञान) झाले असता, हृदयातील (अविद्येमुळे उत्पन्न होणाऱ्या वासनांच्या) गाठी तुटतात, (बुद्धीचा निश्चय न झाल्यामुळे सतत येणारे) सर्व संशय नष्ट होतात, आणि (प्रारब्ध व संचित) कर्मे क्षीण होतात. '

व्य. – भारतीय अध्यात्मशास्त्रात संपूर्ण दुःखनिवृत्ती व आनंदप्राप्ती हे मोक्षाचे स्वरूप मानले गेले आहे. माणसाला होणारे दुःख व त्या दुःखाचे कारण जे राग,

द्वेष, वासना-अज्ञान इ. सर्वांचाच नाश आत्मज्ञानाने होतो. त्याचा शोक व मोह नष्ट होतो. कर्माचे फल म्हणून सुखदुःखाचे भोग माणसाच्या वाट्याला येतात. आत्मज्ञान झाल्यावर ' मी कर्ता ' ही भावना नष्ट होते व त्यामुळे कर्माचे फळ उत्पन्न होऊ शकत नाही. अशा तऱ्हेने मनुष्य दुःखापासून संपूर्ण मुक्त होतो.

३३२. भिन्नरुचिर्हि लोकः

सं. – रघु. ६.३०. विदर्भाची राजकन्या इन्दुमती हिच्या स्वयंवराचे वेळी, तिची सखी सुनंदा, स्वयंवरासाठी आलेल्या राजांचे वर्णन क्रमाने तिला ऐकवीत होती. ते राजे पराक्रमी, रूपगुणांनी सुंदर असूनही त्यांच्यापैकी कोणाच्याही गळ्यात वर माला घालावी असे तिला वाटले नाही.

मू. – **अथाङ्गराजादवतार्य चक्षुर्याहीति जन्यामवदत्कुमारी ।**
नासौ न काम्यो न च वेद सम्यग्द्रष्टुं न सा भिन्नरुचिर्हि लोकः ।।

अ. – ' वर्णन ऐकल्यानंतर त्या अंगराजावरून आपली दृष्टी दूर करून, इन्दुमती आपल्या सखीला, ' चल पुढे ' असे म्हणाली. खरोखर तो (अंगराज) सुंदर नव्हता किंवा ती (इन्दुमती) योग्य (गुण) पारखण्याचे जाणत नव्हती असे नाही. माणसांची आवडनिवड वेगवेगळी असते हेच खरे. '

व्य. – एका कुटुंबात, सारख्या परिस्थितीत वाढलेल्या भावंडांचीही आवडनिवड वेगवेगळी असते हे नेहमीच आपल्या अनुभवाला येते. तसे असण्याचे कारण कोणी सांगू शकत नाही किंवा त्यावर नियंत्रणही कोणी ठेवू शकत नाही. एखाद्याच्या निवडीबद्दल आपल्याला आश्चर्य वाटले, प्रश्नचिन्ह उभे राहिले, म्हणजे साहजिकच या उक्तिविशेषाचा उच्चार होतो.

३३३. भूतानि कालः पचतीति वार्ता

सं. – महा. ३. प्र. उ. ३२.७२. यक्षप्रश्न नावाने प्रसिद्ध असलेल्या यक्ष-युधिष्ठिर संवादात यक्षाने (या विश्वाची) 'वार्ता (का च वार्तिका) काय ?' असे युधिष्ठिराला विचारले. त्यावर युधिष्ठिराने दिलेले उत्तर भारतीय तत्त्वज्ञानाचे सार सांगणारे आहे.

मू. – **अस्मिन्महामोहमये कटाहे सूर्याग्निना रात्रिदिवेन्धनेन ।**
मासर्तुदर्वीपरिघट्टनेन भूतानि कालः पचतीति वार्ता ।।

अ. – ' ह्या मोहमयी जगद्रूपी कढईच्या खाली सूर्यरूप अग्नीने प्रज्वलित केलेल्या दिवसरात्ररूप इंधनाने जाळ केला. हा काल महिने आणि ऋतू या पळ्यांच्या (साहाय्याने) यात (कढईत) सर्व प्राणिमात्र ढवळून शिजवीत आहे ही वार्ता.'

व्य. – वार्ता म्हणजे नवीन काहीतरी घडामोड–जिचे वृत्त ऐकण्यासाठी लोक उत्सुक असतात. म्हणजेच ती काहीतरी नव्या नवलाईची असणार ही अपेक्षा. अखिल

ब्रह्मांडाच्या संदर्भात तत्त्वज्ञानाच्या उच्च भूमिकेवर जी वार्ता म्हणून सांगितली जाते, ती तशी नवल वाटण्यासारखी वार्ता असली तरी वास्तविक ती नित्य चालू असलेली घडामोड आहे असे येथे सुचवावयाचे आहे.

३३४. भूमौ स्थितस्य पतनाद्भयमेव नास्ति

सं. – पंच. १.२६९. मित्रभेद करण्यासाठी दमनक पिंगलकाकडे आला असताना पिंगलकाने त्याला मैत्री कशी राखावी हे सांगितले. मैत्री सांभाळता येत नसेल तर मुळातच ती जोडू नये, असे पिंगलकाचे सांगणे होते.

मू. – आदौ न वा प्रणयिनां प्रणयो विधेयो दत्तोऽथवा प्रतिदिनं परिपोषणीयः ।

उत्क्षिप्य यत्क्षिपति तत्प्रकरोति लज्जा भूमौ स्थितस्य पतनाद्भयमेव नास्ति ॥

अ. – 'प्रथम प्रेमळ माणसांवर प्रेम करू नये. प्रेम केलेच तर नेहमी त्यातला आनंद वाढवून पालन केले पाहिजे. प्रेमाने उचलून घेऊन नंतर सोडून देतो तो (अनुचित) लज्जास्पद गोष्ट करतो. जमिनीवर बसलेल्याला पडण्याचे भयच नसते.'

व्य. – ही उक्ती प्रेमाच्या – मित्रत्वाच्या संदर्भात आलेली असली तरी वास्तविक व्यवहारात ती फारच वेगळ्या अर्थाने वापरली जाते. 'जमिनीवर बसलेल्याला खाली पडण्याचे भय नाही,' हा त्याचा खरा भावार्थ आहे. मेलेल्या कोंबडीला आगीचे भय कसले, असे म्हणतात त्याप्रमाणे जो खालीच पडलेला आहे, ज्याला अगोदरच पराकोटीची अवनतावस्था प्राप्त झालेली आहे त्या बिचाऱ्याला आणखी काही वाईट होण्याचे, त्याची परिस्थिती आणखी खालावण्याचे भय कसले, हे सुचविणारा हा उक्तिविशेष आहे.

३३५. भोगा न भुक्ता वयमेव भुक्ताः

सं. – वैशं. ७. मानवी जीवनाचे व जगातील वस्तूंचे, घटनांचे स्वरूप कसे आहे, त्यांच्या संबंधापासून काय निष्पन्न होते याचे विश्लेषण भर्तृहरीने या श्लोकात केले आहे.

मू. – भोगा न भुक्ता वयमेव भुक्तास्तपो न तप्तं वयमेव तप्ताः ।

कालो न यातो वयमेव यातास्तृष्णा न जीर्णा वयमेव जीर्णाः ॥

अ. – 'आम्ही उपभोग घेतले नाहीत तर आमचाच उपभोग घेतला गेला. आमच्याकडून तप घडले असे नाही, तर आम्ही तापून निघालो. काळ नष्ट झाला नाही तर आमचेच आयुष्य निघून गेले. वासना क्षीण झाली नाही, तर आम्हीच म्हातारे झालो.'

व्य. – उपभोग घेताना माणसाला इतर गोष्टींचे भान राहात नाही. ते अधिकाधिक मिळवावेत अशी हाव त्याला जीवनभर असते. पण त्याचे शरीर, इन्द्रिये क्षीण होत जातात व उपभोग घेण्याची त्याची शक्तीच नष्ट होत जाते. ' दिवस गेला ' असे आपण म्हणतो, पण त्याचा अर्थ खरोखर आयुष्य कमी झाले असा आहे. येथे या विदारक सत्याकडे भर्तृहरीने लक्ष वेधले आहे.

३३६. मदायत्तं तु पौरुषम्

(पाहा : दैवायत्तं कुले जन्म)

३३७. मधु तिष्ठति जिह्वाग्रे

सं. – हित. १.८२. अरण्यातील एका धष्टपुष्ट हरिणाला पाहून त्याचे मांस खाण्याच्या इच्छेने क्षुद्रबुद्धि नावाच्या कोल्ह्याने त्याच्याशी मैत्री केली व पीक खाण्याच्या आशेने शेतात नेऊन त्याला शेतकऱ्याच्या फासामध्ये गुंतविले. तेव्हा हरिणाच्या जुन्या मित्राने–कावळ्याने दुष्ट कोल्ह्याचा धिक्कार केला.

मू. – दुर्जनः प्रियवादी च नैतद्विश्वासकारणम् ।
मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम् ।।

अ. – 'गोड बोलणारा आहे म्हणून दुष्ट माणसावर विश्वास ठेवू नये. (त्याच्या) जिभेवर मध (मधासारखे गोड शब्द) आणि हृदयामध्ये मात्र विष भरलेले असते.'

व्य. – सरळ वृत्तीच्या, सज्जन माणसाच्या अंतःकरणातील भावांचे प्रतिबिंब त्याच्या चेहऱ्यावर पडते, वाणीतून प्रकट होते. दुष्टाची रीत याच्या उलट ! मनातले भाव लपवून गोड बोलून काम साधून घेऊन दुसऱ्याला संकटात लोटण्याइतका तो कृतघ्न, निर्दय असतो. व्यवहारात अनुभवाला येणाऱ्या या धोकादायक माणसांपासून सावध राहाण्याकरिता या उक्तिविशेषाचा उपयोग पुरातन कालापासून केला जात आहे.

३३८. मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः

सं. – मैत्रायणीउप. ६.३४. मोक्षाला आवश्यक असे प्रयत्न करताना मन हेच मुख्य साधन आहे हे द्रष्टया ऋषींनी पुन्हा पुन्हा ध्यानात आणून दिले आहे. मनाचे स्वरूप व कार्य येथे सांगितले आहे.

अमृतबिंदु उप. (किंवा ब्रह्मबिन्दूपनिषत) २. वेदान्ताचे रहस्य थोडक्यात सांगणाऱ्या, अथर्ववेदाच्या या उपनिषदातील मनाचे कार्य सांगणारा हा श्लोक आहे.

मू. – मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः ।
बन्धाय विषयासंगि卐 मोक्षे ◻ निर्विषयं स्मृतम् ।।

卐विषयासक्तं ◻मुक्त्यै : पाठभेद

अ. – ' माणसांच्या बंधनाला किंवा मुक्तीला त्याचे मन हेच कारण आहे. ते विषयांमध्ये रमले म्हणजे बंधनाला कारण होते, तर निष्काम झाले म्हणजे मोक्षाला कारण होते.'

व्य. – मन म्हणजेच संसार. मनाने निर्माण केलेली नाती, सुखदु:खे, रागलोभ ही माणसाला बंधनात ठेवतात, बरीवाईट कर्मे करायला लावतात, की ज्यापासून पुन्हा पुन्हा ते मनोविकार उत्पन्न होतात व माणसाला दु:ख देतात. याउलट जागृत झालेले विवेकी मन स्वत:च रागलोभांचा–म्हणजे विषयासक्तीचा त्याग करते व त्यांच्या मानीव बंधनापासून मुक्त होते. असे निर्मळ झालेले, सदा प्रसन्न असलेले मन आत्म्याचे सच्चिदानंदस्वरूप जाणून घेऊ शकते.

मुख्यत : पारमार्थिक संदर्भातच हा उक्तिविशेष वापरला जातो.

३३९. मनःपूतं समाचरेत्

सं. – भाग. ११.१८.१६. चारी आश्रमांची कर्तव्ये समजावून देत असताना श्रीकृष्णांनी उद्धवाला वानप्रस्थातील दिनचर्या सांगितली आहे. विविध व्रते करणाऱ्या व्रतीची वृत्ती कशी असावी ते सांगणारी ही उक्ती आहे.

मू. – दृष्टिपूतं न्यसेत्पादं वस्त्रपूतं पिबेज्जलम् ।
सत्यपूतां वदेद्वाचं मनःपूतं समाचरेत् ।।

अ. – ' डोळ्यांनी नीट पाहून, शुद्ध असल्याची खात्री करून घेऊनच (पुढले) पाऊल टाकावे. वस्त्राने गाळून शुद्ध झालेले पाणी प्यावे. सत्य बोलण्याने पवित्र झालेली वाणी बोलावी. मनाने (सारासारविचार करून) शुद्ध असेल तसेच आचरण करावे. '

व्य –माणसाने सर्व समाजाला फसविले तरी आपल्या मनाला तो कधीच फसवू शकणार नाही अशी पूर्वापार श्रद्धा आहे; म्हणूनच योग्यायोग्य ठरविताना मनाला विवेकाने वागण्याचे आवाहन केले जाते. किंबहुना उचितानुचित ठरविताना मनाचा आदेशच प्रमाण मानला जातो. पण व्यवहारात असा या वचनाचा अर्थ न लावता केवळ कसेही मनाला येईल तसे वागावे असा अर्थ लावला जाऊन स्वैराचाराला या विधानाने पुष्टी दिली जाते. अर्थातच हा विपरीतार्थ असून वास्तविक मनाचा तोल सावरण्याची जाणीव किंवा समतोल वृत्तीचे स्मरण करवून देणारा हा उक्तिविशेष आहे.

३४०. मनस्वी कार्यार्थी न गणयति दुःखं न च सुखम्

सं. – नीश. ७३. थोर पुरुषांची कार्य करण्याची रीत भर्तृहरीने या सुभाषितात सांगितली आहे.

मू. – क्वचित्पृथ्वीशय्यः क्वचिदपि च पर्यङ्कशयनः
क्वचिच्छाकाहारः क्वचिदपि च शाल्योदनरुचिः ।
क्वचित्कन्थाधारी क्वचिदपि च दिव्याम्बरधरो
मनस्वी कार्यार्थी न गणयति दुःखं न च सुखम् ।।

अ. – 'कधी जमिनीवर झोपणे तर कधी मऊ बिछान्याच्या पलंगावर झोपणे; कधी केवळ पालेभाजी खाऊन राहाणे तर कधी सुग्रास अन्नाचा स्वाद घेणे; कधी फाटके कपडे घालणे तर कधी उंची वस्त्र वापरणे. यापैकी कोणतीही परिस्थिती आली तरी एखादे कार्य पार पाडण्याची इच्छा करणारा मानी (दृढनिश्चयी) पुरुष त्यासंबंधी सुखदुःखाची तमा बाळगीत नाही.'

व्य. – परिस्थितीतील दोष दाखवून एखादा मनुष्य हाती घेतलेले काम टाकून देऊ लागला किंवा आपल्या अपयशाची कारणमीमांसा सांगू लागला तर त्या कार्याची फारशी तळमळ त्याला नाही असे अनुमान सहजच कोणीही काढतो. मनाने ठरविलेले कार्य निष्ठापूर्वक करणाऱ्याचे परिस्थितीकडे फारसे लक्षही जात नाही. अशा श्रेष्ठ मनोबल व धैर्य असलेल्या पुरुषांचे वर्णन भर्तृहरीच्या 'मनस्वी कार्यार्थी' या उक्तिविशेषाने केले जाते.

३४१. मनस्येकं वचस्येकम्

सं. – सुर. २. दुर्जननिंदा ५०. जेथे सज्जन असतात तेथे दुर्जनही असतात. वंद्य लोकांप्रमाणे निंद्य, दुष्ट वृत्तीची माणसेही व्यवहारात दृष्टोत्पत्तीस येतात. सुष्ट-दुष्ट, वंद्य-निंद्य अथवा श्रेष्ठ-कनिष्ठ ज्यामुळे मानले जाते त्याचे नेमके गमक या उक्तीत आढळते. किंबहुना श्रेष्ठकनिष्ठता किंवा सज्जनदुर्जनत्व यांची चटकन व अचूक पारख करणारा हा श्लोक आहे.

हित. १. १०१. मांसाशनाच्या इच्छेने एका लबाड कोल्ह्याने आपल्या हरीण-मित्राला शेतकऱ्याच्या पाशात अडकविलेले पाहून कावळ्याला वाईट वाटले, राग आला. आपल्या मित्राचे सान्त्वन करताना, 'दुष्ट याहून वेगळे वागत नाहीत' असे तो म्हणाला.

मू. – मनस्यन्यद्वचस्यन्यत्कार्यं चान्यद्दुरात्मनाम् ।
मनस्येकं वचस्येकं कर्मण्येकं महात्मनाम् ।।

अ. – 'मनात एक, बोलताना एक आणि करायचे एक असे वागण्याची दुर्जनांची रीत असते. तर मनात (असेल तेच) बोलताना (बोलतील) आणि प्रत्यक्ष कार्य करताना त्याच प्रकारचे कार्य करतील अशी श्रेष्ठांची वृत्ती असते.'

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे.)

व्य. – मनात एक आणि बोलायचे मात्र वेगळे अशी दुटप्पी वृत्ती सज्जनांची नसते. जे मनात असेल तेच ते बोलतील आणि तसेच करतील-वागतील. दुर्जनांना आपल्या वचनापेक्षा आपल्या हेतूची अधिक काळजी असते; आणि तो साध्य करण्याकरिता ते आपले वचन फिरवायलाही मागे पुढे पाहात नाहीत. व्यवहारातील कटु अनुभवच या उक्तीची सत्यता पटवून देतात. हाच आशय बोलका करणारी 'मधु तिष्ठति जिव्हाग्रे' ही उक्तीही प्रसिद्ध आहे.

३४२. मनसैव कृतं पापम्

सं. – सुर. ३. सामान्यनीति ६३५. मन इंद्रियांचे प्रेरक आहे. मनामध्ये प्रथम विचार आल्याशिवाय शरिराकडून कार्य घडत नाही. पाप-पुण्याची कल्पना मनात राहाते म्हणून मनातील हेतू पारखावा असा सुभाषितकाराचा अभिप्राय आहे.

मू. – मनसैव कृतं पापं न शरीरकृतं कृतम् ।
येनैवालिङ्गिता कान्ता तेनैवालिङ्गिता सुता ।।

अ. – 'पाप मनानेच केले जाते, शरिराकडून केले गेलेले ते (पाप) केले असे नव्हे. ज्याने (ज्या शरिराने) पत्नीला आलिगन दिले त्यानेच स्वतःच्या मुलीलाही जवळ घेतले.'

व्य. – कोणतीही कृती शरिराकडून बाह्यतः घडण्यापूर्वी तिच्याविषयी मनात विचार आलेला असतो. मनाचा तसे करण्याबद्दलचा संकल्प झालेला असतो. शरीर केवळ त्याची अंमलबजावणी करते. पाप घडते ते प्रथम मनात घडते. 'मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः' ही उक्ती मन हेच सर्व गोष्टींचे कारण आहे असे सुचविते. येथे व्यवहारातील साध्या उदाहरणाने, मनाच्या भूमिकेतील फरक स्पष्टपणे ध्यानात आणून दिला आहे. बाह्यतः साध्या, सरळ दिसणाऱ्या एखाद्या कृतीचा हेतू वाईट असेल तर ती वाईटच मानली पाहिजे, हे या उक्तिविशेषाने सुचविले जाते.

३४३. मनोरथानामगतिर्न विद्यते

सं. – कुसं ५.६४. बटुवेषधारी शंकराने शिवप्राप्तीसाठी पार्वती तपश्चर्या करीत आहे हे ऐकताच तिची थट्टा केली. एवढेच नव्हे तर 'तू ही थट्टा तर करीत नाहीस ना ?' असे तिलाच विचारले. त्या वेळी हातातील जपमाळ सावरीत अत्यंत मोजक्या शब्दांत पार्वतीने आपल्या मनीचा निर्धार प्रकट केला, तो याच तेजस्वी शब्दांत.

मू. – यदा श्रुतं वेदविदां वर त्वया जनोऽयमुच्चैःपदलङ्घनोत्सुकः ।
तपः किलेदं तदवाप्तिसाधनं मनोरथानामगतिर्न विद्यते ।।

अ. – 'हे वेदश्रेष्ठा, तू जे ऐकलेस ते सत्यच आहे. ही मी ते (शिवप्राप्तीचे) उच्च स्थान मिळविण्यास उत्सुक आहे. त्याच्या प्राप्तीसाठीच ही तपस्या आहे. मनाच्या संकल्पनांना कुठेच अटकाव (वा बंधन) असत नाही.'

व्य. – मनोरथ म्हणजे केवळ कल्पनाराज्य नव्हे. जे प्रत्यक्षात उतरू शकेल असा मनीचा निश्चय वा विचारही जोवर प्रत्यक्षात आला नाही, तोवर मनोरथाच्या स्वरूपातच असतो. पण अत्यंत परिश्रम घेतल्यास कोणतीच गोष्ट दुस्साध्य असली तरी असाध्य नाही, असा याचा भावार्थ आहे, परंतु व्यवहारात मात्र मनचे मांडे खात राहा, मनाच्या भराऱ्या मारीत राहा; मग तसे घडो वा न घडो, अशा अर्थाने या उक्तिविशेषाचा वापर केला जात असतो.

३४४. मरणादतिरिच्यते

सं – वारा. ४.१६.३. वालीची पत्नी तारा हिने त्याला सुग्रीवाशी युद्ध करण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला; पण पराक्रमी वालीने वीरोचित उत्तर देऊन तिला परत पाठविले.

भगी. २.३४. अर्जुनासारख्या वीर योद्धयाने धनुष्य टाकून देऊन युद्ध करण्याचे नाकारले, तेव्हा श्रीकृष्णाने त्याला या शब्दांत डिवचून त्याची अस्मिता जागृत केली.

मू. – **अधर्षितानां शूराणां समरेष्वनिवर्तिनाम् ।**
धर्षणामर्षणं भीरु मरणादतिरिच्यते ।। वारा. ४.१६.३.

अ. – 'हे भित्र्या स्त्रिये, ज्यांचा कोणी पराभव करू शकला नाही व ज्यांनी युद्धातून कधीही माघार घेतली नाही, अशा शूर पुरुषांना शत्रूंनी केलेला अपमान सहन करणे मरणाहूनही अधिक दु:खदायक वाटते.'

मू. – **अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम् ।**
सम्भावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ।। भगी. २.३४.

अ. – 'शिवाय, सर्व लोक नेहमी तुझी अपकीर्ती सांगत राहातील; आणि मानाने जगणाऱ्याला अपकीर्ती ही मरणाहूनही भयंकर वाटते.'

व्य. – मानभंग, अवहेलना सहन करण्यापेक्षा शूर वीरांना मरण पतकरणे श्रेयस्कर वाटते. अपमान झाला असताना 'यापेक्षा मरण आलेले बरे' असे उद्गार मानी माणसाच्या तोंडून येतात. त्याला उद्देशूनच ही उक्ती वापरली जाते.

३४५. मरणान्तानि वैराणि

सं. – वारा. ६.१०९.२५. रावणाचा वध केल्यानंतर त्याचे विधिपूर्वक व राजाला उचित अशा प्रकारे दहन करावे, अशी रामाने बिभीषणाला आज्ञा केली.

मू. – **मरणान्तानि वैराणि निवृत्तं नः प्रयोजनम् ।**
क्रियतामस्य संस्कारो ममाप्येष यथा तव ।।

अ. – 'मरेपर्यंतच शत्रुत्व राहात असते; आणि आता आपले कार्यही पुरे झाले आहे. म्हणून तू ह्याचा (अन्त्य–) संस्कार कर. हा जसा तुझा आहे तसाच माझाही आहे.'

व्य. – मैत्री किंवा शत्रुत्व काही कारणामुळे उत्पन्न होत असते. ते कारण नष्ट झाले तरी सामान्य माणसाची शत्रूबद्दलची द्वेषभावना नष्ट होत नाही. पिढ्यान्‌पिढ्या सूड घेणाऱ्या अनेक दीर्घद्वेषी व्यक्ती आढळतात. मृत्यूनंतरही शत्रुवीरांची विटंबना करणारे मुसलमान सत्ताधारी इतिहासात प्रसिद्ध आहेत. वैऱ्याबद्दलही द्वेषभावना नसणे व त्याचा यथोचित आदर करणे हे भारतीय संस्कृतीचे वैशिष्टय आदर्श पुरुष रामाच्या तोंडून व्यक्त झाले आहे.

३४६. महतो महीयान्

सं. – कठ. १.२.२०. मनुष्य मेल्यानंतर परलोकात त्याची कोणती गती होते, हे विचारणाऱ्या नचिकेत्याला यमाने माणसाच्या अंतःकरणात राहाणाऱ्या जन्म-मृत्यूच्या पलीकडे असलेल्या आत्म्याचे स्वरूप सांगितले

श्वेताश्वतर ३.२०. इंद्रियांना व मनाला प्रेरणा करणाऱ्या आत्मचैतन्याचे स्वरूप सांगून उपनिषत्कारांनी त्याच्या प्राप्तीच्या उपायाचा निर्देश केला आहे.

मू. – अणोरणीयान्महतो महीयानात्माऽस्य जन्तोर्निहितो गुहायाम् ।
तमक्रतुः पश्यति वीतशोको धातुः प्रसादान्महिमानमात्मनः ।। कठ. १.२.२०

अ. – 'अणूहूनही अधिक सूक्ष्म, (पृथ्वी आदी) मोठ्या परिमाणाच्या वस्तूहूनही मोठा असा आत्मा (सर्व) प्राण्यांच्या हृदयात (हृदयरूपी गुहेत) वास करतो. (इंद्रियांच्या कार्यावरून ज्या आत्म्याबद्दलचे अनुमान केले जाते) त्या आत्म्याला विषयांपासून विरक्त झालेला पुरुष, इंद्रियांच्या व चित्ताच्या प्रसन्नतेमुळे आत्म्याच्या महिम्यास पाहातो. (तो महिमावान् आत्मा मीच आहे असे जाणतो आणि त्यामुळे) शोकरहित होतो.'

मू. – अणोरणीयान्महतो महीयानात्मा गुहायां निहितोऽस्य जन्तोः ।
तमक्रतुं पश्यति वीतशोको धातुः प्रसादान्महिमानमीशम् ।। श्वेताश्वतर ३.२०.

अ. – 'अणूहूनही सूक्ष्म, महान् परिमाणाच्या वस्तूंहून अतिशय महान् असा आत्मा या प्राणिमात्राच्या हृदयरूपी गुहेमध्ये स्थित आहे. त्या सर्वसंकल्परहित (अक्रतुं) सर्वशक्तिमान् (ईश) आत्म्याच्या महिम्याला, ईश्वराच्या प्रसादामुळे (किंवा मन - इंद्रियांच्या प्रसन्नतेमुळे) तो पाहातो व शोकरहित होतो.'

व्य. – परमात्म्याचे वाणीने वर्णन करणे, त्याला उपमा देणे शक्य नाही. तरी जिज्ञासूंना मार्गदर्शक म्हणून त्याच्या स्वरूपाचा नुसता निर्देश करणे, एवढेच कार्य उपनिषदांना करता आले. 'अणोरणीया थोकडा तुका आकाशाएवढा' – हा

संत तुकारामांनी प्रकट केलेला स्वतःचा अनुभव, आत्म्याचे उपनिषदांतील परस्पर-विरुद्ध वर्णन सत्य आहे याची आधुनिकांना ग्वाही देणारा आहे. आत्म्याच्या किंवा कोणत्याही अगम्य विराट वस्तूच्या अनाकलनीय स्वरूपाचे वर्णन करण्यासाठी हा उक्तिविशेष वापरला जातो.

३४७. महाजनो येन गतः स पन्थाः

(पाहा : धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां;
नैको ऋषिर्यस्य वचः प्रमाणम्)

३४८. माघे सन्ति त्रयो गुणाः

(पाहा : उपमा कालिदासस्य)

३४९. मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः

सं. – वारा. १.२.१५. वाल्मीकि मुनी तमसा नदीच्या तीरावर स्नानासाठी जात असताना, वनात विहार करणाऱ्या क्रौंच पक्ष्यांच्या जोडप्यापैकी नर पक्ष्याला पारध्याने बाण मारून घायाळ केलेले त्यांनी पाहिले. त्यांचे मन कळवळले व पारध्याला उद्देशून हा शापमय छंदोबद्ध श्लोक वाल्मीकींच्या तोंडून बाहेर पडला. श्रीमद् वाल्मीकि रामायणाचा म्हणजेच जगातल्या आदि महाकाव्याचा हा प्रारंभ मानला जातो.

मू. – **मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।**
यत्क्रौञ्चमिथुनादेकमवधीः काममोहितम् ।।

अ. – 'हे पारध्या, ज्या अर्थी तू क्रौञ्च पक्ष्यांच्या जोडप्यातील काममोहित झालेल्या एकाचा वध केला आहेस, त्या अर्थी तुला येथे कधीही प्रतिष्ठा प्राप्त होणार नाही.'

व्य. – वाल्मीकींच्या तोंडून श्लोकाच्या रूपात बाहेर पडलेला त्यांचा शोक जगाच्या वाङ्मयात अमर झाला आहे. सबंध रामायणाची कथा या श्लोकाच्या अनुष्टुप् छंदात त्यांनी रचिली आहे. 'आदिकवी' हे बिरुद त्यांना रामायण महाकाव्याच्या रचनेमुळे प्राप्त झाले. काव्य किंवा कोणत्याही श्रेष्ठ कलाकृतीच्या निर्मितीचे गमक या घटनेमधून स्पष्ट होते. काव्यनिर्मितीविषयी विचार करताना या उक्तिविशेषाचा उल्लेख न चुकता केला जातो.

३५०. मा भेः

सं. – यजु. (वाजसनेयि माध्यंदिन शुक्ल) १.२३. उत्तम प्रजा, शारीरिक, मानसिक, विविध व उच्च प्रकारची सुखे प्राप्त व्हावीत यासाठी यज्ञ करावा; व तो निःशंक, निर्भय होऊन करावा असे सांगणारा हा मंत्र आहे.

मू. – **मा भेर्मा संविक्था अतमेरुर्यज्ञोऽतमेरुर्यजमानस्य प्रजा**
भूयात् त्रिताय त्वा द्विताय त्वैकताय त्वा ।।

अ. – 'हे विद्वान् पुरुषांनो, यजमानासाठी आरंभिलेल्या (या) यज्ञानुष्ठानात तुम्ही भिऊ नका; विचलित होऊ नका. ग्लानिरहित (अतमेरुः) होऊन यज्ञ करा. तुम्हाला बुद्धिमान् (ग्लानिरहित) संतती प्राप्त होवो. तुमच्या उत्तम सुखासाठी (एकताय) वायु व जलवृष्टीसाठी (द्विताय) तसेच अग्निकर्म व हवि-पदार्थांच्या प्राप्तीसाठी (त्रिताय) मी अग्नीला निश्चल करतो.'

व्य. – यज्ञ हे एक पवित्र सामुदायिक कर्म आहे. तपस्वी, विद्यावान् व कुलशील-वान् ऋत्विज त्यातील कर्मे करतात. त्यांच्या अध्ययनाचे, तपश्चर्येचे जणू ते एक प्रात्यक्षिकच असते. यज्ञ करताना ऋत्विजांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य, निर्भयता वाटत असेल तरच ते कर्म यथासांग व उत्कृष्ट होऊ शकते. कोणतीही विद्या ग्रहण करताना, शुभ, कल्याणकारक कर्म करीत असताना निर्भय असावे; मन विचलित होऊ देऊ नये, या अर्थाने हा उक्तिविशेष वापरला जातो.

३५१. माता गौरवेणातिरिच्यते

सं. – मनु, २.१४५. आचार्य, उपाध्याय, गुरू म्हणून कोणाकोणाचा आदर करावा, हे सांगितल्यानंतर मनूने, सर्वश्रेष्ठ विद्यादात्री म्हणून आईचा गौरव केला आहे.

मू. – **उपाध्यायान्दशाचार्य आचार्याणां शतं पिता ।**
सहस्रं तु पितॄन् माता गौरवेणातिरिच्यते ।।

अ. – दहा उपाध्यायांहून आचार्य श्रेष्ठ होय. शंभर आचार्यांइतका पिता (पित्याचे महत्त्व) आणि हजार पित्यांहूनही मातेचे महत्त्व अधिक आहे.'

व्य. – 'मातृदेवो भव' असे नमन करून सर्व तत्त्वज्ञांनी व धर्मज्ञांनी, पूज्य व्यक्ती-मध्ये आईला पहिले स्थान दिले आहे. आईचे महत्त्व आधुनिक विचारवंतांनी व शास्त्रज्ञांनीही मान्य केले आहे. लहान मुलाचे शिक्षण – संस्कार त्याच्या गर्भा-वस्थेपासून सुरू होतात. वयाच्या तिसऱ्या वर्षापर्यंत मूल जेवढ्या नवीन गोष्टी शिकते तेवढे, मोठे झाल्यानंतर, सर्व आयुष्यातही शिकू शकत नाही. शिक्षणाच्या दृष्टीने हा महत्त्वाचा काल; हा सर्व वेळ ते आईजवळच असते. मातेचा गौरव करताना मनूचा हा उक्तिविशेष आग्रहपूर्वक उच्चारला जातो.

३५२. माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः

सं. – अथर्व. १२. १. १२. पृथ्वीचे स्तवन करणाऱ्या ६३ ऋचांच्या या दीर्घ भूमि-सूक्ताचा ऋषी अथर्वा आहे. प्राणिमात्रांचा भार वाहाणारी व त्यांचे भरणपोषण करणारी सर्वांची जननी म्हणून, या ऋचेमध्ये ऋषीने तिची प्रार्थना केली आहे.

मू. – यत्ते मध्यं पृथिवि यच्च नभ्यं, यास्त ऊर्जस्तन्वः संबभुवुः ।
तासु नो धेहि अभि नः पवस्व, माता भूमिः पुत्रो अहं पृथिव्याः ।।

अ. – ' हे पृथ्वीमाते, तुझ्या उदरातून, तसेच नभातून (वरून तुझ्या ठिकाणी) अवतरणाऱ्या ज्या शक्ती आहेत त्या आमच्या शरिरामध्ये येवोत. त्यांच्यायोगे आम्हाला पावन कर. ही भूमी माझी माता आहे आणि मी तिचा पुत्र आहे.'

व्य. – सकाळी उठल्याबरोबर ' पादस्पर्शं क्षमस्व मे ' म्हणून पहिले वंदन भूमीला करण्याची भारतीय परंपरा आहे. आपल्याला उपयुक्त असणाऱ्या सर्वच सजीव व निर्जीव भासणाऱ्या वस्तूविषयी कृतज्ञतेचा भाव भारतीय संस्कृतीत दिसून येतो. भूमी ही तर सर्वांना धारण करणारी, पोषण करणारी, म्हणून तिच्याबद्दलचा जो जिव्हाळा व पूज्यभाव तो या उक्तिविशेषाने प्रकट झाला आहे. मातृभूमीवर उत्कट प्रेम करणाऱ्या, तिच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःचे बलिदान करणाऱ्या स्वातंत्र्यवीरांनी अत्यंत अभिमानाने व प्रेमाने उच्चारलेला हा उक्तिविशेष आहे.

३५३. माता रुद्राणां दुहिता वसूनाम्

सं. – ऋग्. ८.१०१.१५. मित्रावरुण, आदित्य, अश्विनीकुमार, वायु, सूर्य इत्यादी देवतांच्या स्तुतीपर असलेल्या या सूक्तात गोरूप देवतेचे वर्णन व तिच्या रक्षणाबद्दल लोकांना आवाहन करणारी ही ऋचा आहे.

मू. – माता रुद्राणां दुहिता वसूनां स्वसादित्यानाममृतस्य नाभिः ।
प्र नु वोचं चिकितुषे जनाय मा गामनागामदितिं वधिष्ट ।।

अ. – ' जी रुद्रांची माता, वसूंची कन्या, आदित्यांची भगिनी, अमृताचे (दुधाचे) निवासस्थान असलेल्या निष्पाप अदितीला, (तेजस्वी) गोरूप देवीला मारू नका असे मी लोकांना सांगतो (उपदेश करतो).

व्य. – यज्ञीय कर्मकांडापैकी काही भागात देवतांच्या नावे पशु बळी देण्याची प्रथा होती असे प्राचीन ग्रंथांवरून दिसून येते. मुख्यतः गाय-बैल, शेळी हे प्राणी बळी देत असावेत. परंतु अशा प्रकारच्या गोहिंसेचा निषेध करणारी वचने प्रत्यक्ष ऋग्वेदात आहेत. कोणत्याही निमित्ताने गाईची हत्या करू नये, हे अनेक महत्त्वाची कारणे देऊन, द्रष्टया थोर पुरुषांनी आतापर्यंत सांगितले आहे.

गाय ही सात्त्विक, निष्पाप असून तिच्या अमृततुल्य दुधापासून तशीच वृत्ती निर्माण होते. ' पंचगव्य '–गाईपासून प्राप्त होणाऱ्या तूप, दही, दूध, गोमूत्र, गोमय (शेण) या पाच गोष्टी रोगनाशक, शुद्ध करणाऱ्या व बल वाढविणाऱ्या आहेत हे शास्त्रीय संशोधनानेही सिद्ध झाले आहे. त्यामुळे गाय हा लौकिक दृष्टचाही अत्यंत उपयुक्त पशू आहे. शेतीच्या मशागतीमध्ये गाय-बैलांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे गाय ही लौकिक आणि अलौकिक अर्थाने गो-माता म्हणून

रक्षणीय तसेच पूजनीय आहे. गोवधबंदीच्या पुरस्कारादाखल वेदातील ही ऋचा सादर केली जाते.

३५४. मातेव रक्षति

सं. – भोज. ५. धारा नगरीच्या मुंज राजाच्या राजसभेत आलेल्या विद्वान ब्राह्मणाजवळ असलेली ज्योतिषविद्या पाहून राजा प्रसन्न झाला. ब्राह्मणाला विपुल धन देऊन राजाने त्याच्या विद्येबद्दल प्रशंसोद्गार काढले.

सुर. २. विद्याप्रशंसा १४. परिश्रम करून मिळविलेली विद्या कोणकोणती सुखे प्राप्त करून देते, हे येथे सांगितले आहे.

मू. – **मातेव रक्षति पितेव हिते नियुङ्क्ते कान्तेव चाभिरमयत्यपनीय खेदम् ।**
कीर्तिं च दिक्षु विमलां वितनोति लक्ष्मीं किं किं न साधयति कल्पलतेव विद्या ।।

अ. – 'आईप्रमाणे रक्षण करते, वडिलांप्रमाणे कल्याणकारक कामाकडे प्रेरणा करते, पत्नीप्रमाणे मनोरंजन करते आणि दुःख दूर करते. दशदिशांमध्ये कीर्ती पसरविते आणि भाग्य वाढविते. खरोखर ही विद्या, इच्छा पुरविणाऱ्या (कल्पलता) वेलीप्रमाणे, काय मिळवून देत नाही ! '

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे.)

व्य. – एखादे शास्त्र किंवा विद्या परिश्रमाने आत्मसात् करून घेतली म्हणजे सर्व ठिकाणी तिचा प्रभाव पडतो. सर्व प्रकारच्या हितकारक गोष्टी, ऐश्वर्य त्या व्यक्तीला प्राप्त होतात. विद्येचे महत्त्व वर्णन करण्यासाठी या उक्तिविशेषाचा नेहमी उच्चार केला जातो.

३५५. मातृदेवो भव

सं. – तैत्ति १.११.२. वेदाध्ययन करून गुरुकुलातून परत घरी जाणाऱ्या शिष्याला आचार्यांनी दिलेल्या सुप्रसिद्ध आदेशातील हा मंत्र आहे.

मू. – **देवपितृकार्याभ्यां न प्रमदितव्यम् । मातृदेवो भव ।**
पितृदेवो भव । आचार्यदेवो भव । अतिथिदेवो भव ।

अ. – 'देवांसाठी व पितरांसाठी करावयाच्या कर्मामध्ये चूक करू नये. माता हाच ज्याचा देव आहे, असा तू हो. (मातेची देवाप्रमाणे पूज्यभावनेने सेवा कर.) तसेच आचार्यांची व अतिथींची देवाप्रमाणे उपासना करणारा हो.'

व्य. – विद्याभ्यास पूर्ण करून गृहस्थाश्रमात प्रवेश करणाऱ्यासाठी आचरणाचे उत्कृष्ट नियम तैत्तिरीय उपनिषदाच्या शीक्षाध्यायात उपनिषत्कारांनी सांगितले आहेत. आदरणीय व पूज्य व्यक्तींमध्ये प्रथम मातेची गणना केली आहे; व नंतर पिता, गुरु, अतिथी यांचा क्रम आहे. विद्यार्थ्यांच्या प्रार्थनेमध्ये या उक्तिविशेषाचा

अन्तर्भाव केला जातो. तसेच विद्यार्थ्यांना उपदेश करताना या उक्तिविशेषाचा उच्चार केला जातो. भारतीय संस्कृतीचा आधार असलेली कुटुंबसंस्थेची इमारत या चार खांबांवर उभी आहे.

३५६. मातृवत् परदारेषु

सं. – पंच. १.४३५. धर्मबुद्धी आणि पापबुद्धी या दोघा मित्रांनी परदेशात जाऊन पुष्कळ धन कमावले. तेथून परत येताना त्यांनी त्यातील काही भाग गावाजवळच्या अरण्यात पुरून ठेवला. पापबुद्धीने ते धन चोरले व धर्मबुद्धीवर तो चोरीचा आरोप करू लागला, तेव्हा धर्मबुद्धीने स्वतःचा स्वभाव आणि कर्म सांगून चोरीचा आरोप नाकारला.

हित. १.१४. म्हातारपणामुळे शिकार मिळवायला असमर्थ झालेल्या वाघाने साधूचे सोंग घेऊन एका लोभी ब्राह्मणाला कंकणाच्या आशेने जवळ बोलावताना या शब्दांत स्वतःच्या धर्मबुद्धीची भलावण केली.

मू. – मातृवत्परदाराणि परद्रव्याणि लोष्ठवत् ।
आत्मवत्सर्वभूतानि वीक्षन्ते धर्मबुद्धयः ॥ पंच. १.४३५.

अ. – ‘धार्मिक (पापभीरू) वृत्तीचे लोक दुसऱ्यांच्या पत्नींना मातेसमान मानतात, दुसऱ्याचे धन मातीच्या ढेकळाप्रमाणे समजतात आणि सर्व जीव आपल्या स्वतःसारखेच आहेत असे मानतात.’

मू. – मातृवत्परदारेषु परद्रव्येषु लोष्ठवत् ।
आत्मवत्सर्वभूतेषु यः पश्यति स पण्डितः ॥ हित. १.१४.

अ. – ‘परस्त्रीला जो मातेप्रमाणे मानतो, परक्याचे धन मातीच्या ढेकळाप्रमाणे समजतो आणि सर्व प्राणिमात्रांना आपल्यासारखेच गणतो, तो खरा विद्वान होय.’

व्य. – एकाहून अधिक स्त्रियांबद्दल आकर्षण वाटणे या पुरुषस्वभावाला संयम घालण्यासाठी स्वतःच्या स्त्रीवाचून त्याने इतर कोणत्याही स्त्रीकडे अभिलाषेने पाहू नये, असा दंडक सांगण्यात आला, हा भारतीय संस्कृतीचा आदर्श आहे. त्या आदर्शाचा उच्चार या उक्तिविशेषाने केला जातो. मनोजय केलेल्या, तपस्वी, विशुद्ध चारित्र्याच्या पुरुषांच्या आचरणाचा उल्लेखही या उक्तिविशेषाने केला जात असतो.

३५७. मामनुस्मर युध्यच

सं. – भगी. ८.७. मरणकाली परमेश्वराचे स्मरण करण्याने जीव त्याच्याच स्वरूपात ‘मळून जातो. आयुष्यभर सतत तसे स्मरण केले तरच मरणकाळी ईश्वरचिंतन

करणे शक्य, असे तत्त्वज्ञान सांगूनही श्रीकृष्णांनी अखेर अर्जुनाला अगदी मुद्याची गोष्ट सांगितली. ती म्हणजे, बाकी सारे विसर आणि माझे नाव घेऊन युद्धाला प्रारंभ कर बघू.

मू. – तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ॥

अ. – 'म्हणून सदासर्वकाळ तू माझे स्मरण करीत जा; आणि युद्ध कर. माझ्या ठायी मनबुद्धीने शरण आलास म्हणजे (लढाई करूनही) तू माझ्याकडेच येऊन पोचशील यात संशय नाही.'

व्य. – रोखठोक व्यवहार सांगणारा हा उक्तिविशेष आहे; आणि तशा अर्थानेच तो व्यवहारात उपयोजिला जातो. कोणतेही महत्त्वाचे कार्य करावयाचे तर तो एक प्रकारचा युद्धप्रसंगच असतो. अनेक संकटांवर मात करून कार्य सिद्ध करावयाचे असते. मनात संशय उरू न देता, परमेश्वरावर हवाला ठेवून, त्याचे नाव घेऊन कार्यारंभ निःशंकपणाने करावा हे सांगण्यासाठी आणि आवश्यक असेल तेव्हा प्रत्यक्ष संघर्षासाठीही–दोन हात करण्यासाठीही हा आदेश आहे. अनेक राष्ट्रीय उत्कट प्रसंगात या उक्तिविशेषाचा वापर केला गेलेला आहे.

३५८. मामयं प्रहरिष्यति

सं. – महा. १.१.२०४. महाभारताचे श्रेष्ठत्व सांगताना वेदाध्ययनाला महाभारताच्या अध्ययनाचे साहाय्य होऊ शकते असे म्हणून, या श्रेष्ठ भारत ग्रंथाच्या अध्ययनाची इतरही व्यावहारिक फले वर्णिली आहेत.

मू. – इतिहासपुराणाभ्यां वेदं समुपबृंहयेत् ।
बिभेत्यल्पश्रुताद्वेदो मामयं प्रहरिष्यति ॥

अ. – 'इतिहास व पुराणे यांच्या साहाय्याने वेदाचा अर्थ लावावा; (नाहीतर) हा (माझा भलताच अर्थ लावील) मला मारील, अशी वेदाला कमी अध्ययन केलेल्या माणसाची भीती वाटत असते.'

व्य. – वेदाचे वैशिष्टच हे त्यांच्या अर्थसमृद्धीवर अवलंबून असते. अर्थसंपन्न ऋचेचा एखाद्या अज्ञ माणसाने अर्थ लावला तर द्रष्टच्या ऋषीच्या मनातील मूळचा आशय न जाणला गेल्याने त्याचा भलताच अर्थ त्याच्याकडून केला जाणे शक्य असते. म्हणून अर्थघनता हेच वैभव असलेल्या वेदाला सामान्यांची भीती वाटते. अर्थात् सामान्यांकरिता इतिहासपुराणे सांगितली आहेत. त्यांचे अर्थ स्पष्ट झाल्यावर वेदार्थाकडे वळावे हीच सूचना व्यासांनी केली आहे.

३५९. मिथ्याचारः स उच्यते

सं. – भगी. ३.६. मनःशुद्धीपेक्षा बाह्य अवडंबराकडेच लक्ष देणाऱ्या दांभिकांचा स्पष्ट निषेध श्रीकृष्णांनी केला आहे.

मू. – कर्मेन्द्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ।
इन्द्रियार्थान् विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ।।

अ. – ' (बाह्यतः) इंद्रियसंयमन करून मनाने (मात्र) जो मूर्ख विषयसेवनाचे चिंतन करीत राहातो त्याला दांभिक (ढोंगी) म्हटले जाते. '

व्य. – सदाचरण व सदाचरणाची केवळ नक्कल यातील भेद येथे स्पष्ट केला आहे. वस्तुतः कोठलीही बरीवाईट कृती करण्याची प्रेरणा मनच देते. पर्यायाने फलाविषयी मन जबाबदार राहाते. म्हणूनच ' मनसैव कृतं पापं न शरीरकृतं कृतम् ' असे मानले जाते. लोकांनी बरे म्हणावे यासाठीच सदाचाराचे सोंग आणणारा हा दुराचाऱ्यापेक्षाही पापी समजला पाहिजे. तो इतरांप्रमाणे स्वतःचीही फसवणूकच करतो. याकरिताच समाजात त्याला दांभिक, ढोंगी इत्यादी विशेषणे लावली जातात.

३६०. मिष्टान्नमितरे जनाः

सं. – पंच. ३.२१०. काकोलूकीय तंत्रात, मुनींनी स्त्रीचे रूप दिलेली उंदरी वयात आली, तेव्हा तिच्यासाठी योग्य वर शोधण्याची खटपट ते करू लागले.

मू. – * वरं वरयते कन्या माता वित्तं पिता श्रुतम् ।
बान्धवाः कुलमिच्छन्ति मिष्टान्नमितरे जनाः ।।

* **कन्या वरयते रूपम्** : पाठभेद

अ. – ' मुलगी (चांगल्या) वराची इच्छा करते; आई धन (धनवान् जावई) पसंत करते; तर वडील (वराचा) नांवलौकिक पाहातात; नातेवाईक (वर) उत्तम कुलातील असावा अशी इच्छा करतात; तर इतर लोकांचे लक्ष (मात्र चांगली) मेजवानी मिळावी याकडेच असते. '

व्य. – कसलाही लहान-मोठा, क्षुल्लक-महत्त्वाचा व्यवहार असो, माणूस त्याकडे केवळ आपल्या स्वतःच्या दृष्टीनेच बघत असतो. एखादे लग्न असले तरी नवरा कसा आहे, नवरी कशी आहे याकडे पाहण्याचा प्रत्येकाचा त्याच्या हितसंबंधाच्या दृष्टीने दृष्टिकोन कसा असतो याचे हे मार्मिक विश्लेषण आहे. जो तो प्रत्येक गोष्टीकडे स्वार्थी हेतूने पाहात असतो, हे सांगण्यासाठी हा उक्तिविशेष वापरला जातो.

३६१. मुहूर्तं ज्वलितं श्रेयः

सं. – महा. ५.१३१.१३. सिंधुराजाने पराभव केल्यामुळे खिन्न होऊन बसलेल्या संजयाची, त्याच्या आईने निर्भर्त्सना केली; व त्याला उपदेश करून पुन्हा लढाई

करण्यासाठी प्रेरणा दिली. विदुलेचे तेजस्वी शब्द स्वतःचा संदेश म्हणून कुंतीने धर्मराजाला कळविले.

मू. – मुहूर्तं ज्वलितं श्रेयो न च धूमायितं चिरम् ।
मा ह स्म कस्यचिद् गेहे जनि राज्ञः खरो मृदुः ।।

अ. – 'थोडा वेळ का होईना पण चमकून जाणे चांगले; दीर्घकाल धुमसत राहाण्यात अर्थ नाही. खरोखर कोणाही राजघराण्यात जन्म घेऊन अतिशय मृदु किंवा अतिशय कठोर (राजा) होऊ नकोस.'

व्य. – पौरुषहीन, निस्तेज मनुष्याचे जीवन म्हणजे भूमीला भार होऊन राहाणे होय; ते खरे जगणे नव्हे. शत्रूला मारता मारता मरण आले तर ते पत्करणे, यात जन्माचे सार्थक आहे. स्वतःचे बल विसरलेल्यांना जागे करण्यासाठी, त्यांना चेव आणण्यासाठी या उक्तिविशेषाचा उच्चार केला जातो.

३६२. मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः

(पाहा : पुराणमित्येव न साधु सर्वम्)

३६३. मूलच्छेदं न कारयेत्

सं. – महा. ५.३४.१८. 'सुखार्थी मनुष्याने दुसऱ्याला त्रास न देता त्याच्याकडून अर्थ संपादन करून घ्यावा' असा उपदेश प्रजागरपर्वात विदुराने धृतराष्ट्राला केला.

मू. – पुष्पं पुष्पं विचिन्वीत मूलच्छेदं न कारयेत् ।
मालाकार इवारण्ये न यथाङ्गारकारकः ।।

अ. – 'वनात, माळ्याप्रमाणे एकेक फूल वेचून घ्यावे; कोळसे बनविणाऱ्या लोणाऱ्याप्रमाणे झाडे मुळापासून तोडू नयेत.'

व्य. – आपल्याला हवीशी वाटेल ती वस्तू मागचापुढचा विचार न करता वाटेल तितक्या प्रमाणात ओरबाडून घेणे हे स्वार्थी, असंस्कृत माणसाचे लक्षण आहे. संधी सापडली की माणसामधला हा दुर्गुण वर येतो. त्याचे प्रात्यक्षिक दृष्टीस पडले म्हणजे सज्जन माणसांला जी हळहळ वाटते ती या उक्तिविशेषाने व्यक्त होते.

३६४. मूलान्यपि निकृन्तति

सं. – महा. ५.३८.९. विदुराने धृतराष्ट्राला केलेल्या उपदेशात नीतीचे व व्यवहाराचे त्रिकालाबाधित नियम सांगितले आहेत.

महा. १२.१३६.१३८. आपद्धर्मपर्वात भीष्मांनी युधिष्ठिराला उपयुक्त असे व्यवहारज्ञान सांगितले.

पंच. १.१४. लब्धप्रणाश या चौथ्या तंत्रात मगर आणि वानर यांच्या मैत्रीची गोष्ट आहे. मगर आपला मित्र आहे म्हणून त्याच्यावर विश्वास ठेवून

वानर त्याच्या पाठीवर बसून, त्याच्या पाण्यातल्या घराकडे निघाला. आपले हृदय काढण्याचा मगराचा हेतू कळल्याबरोबर, मगरावर विश्वास ठेवण्यात झालेली चूक वानराच्या ध्यानात आली.

मू. – **न विश्वसेदविश्वस्ते विश्वस्ते नातिविश्वसेत् ।**
विश्वासाद्भयमुत्पन्नं मूलान्यपि निकृन्तति ॥

अ. – ' अविश्वासू माणसावर विश्वास टाकू नये; विश्वास ठेवण्यास योग्य माणसावरही अतिविश्वास ठेवू नये; कारण विश्वास ठेवल्यामुळे उत्पन्न झालेले भय (संकट) पाळेमुळे खणून काढते (समूळ नाश करते).'

(सर्व ठिकाणी श्लोक सारखा आहे.)

व्य. – ' आपला मनुष्य म्हणून ज्याच्यावर विश्वास टाकला त्यानेच फसविले ' असे म्हणण्याचा प्रसंग माणसावर अनेक वेळा येतो. अंतरंगात शिरून लाभाची वस्तू हस्तगत करणे, हाच स्वार्थी लोकांच्या मैत्रीचा हेतू असतो. अशा माणसांच्या बाबतीत सावधगिरीचा इशारा या उक्तिविशेषाने देता येण्यासारखा असतो; परंतु व्यवहारात एखाद्याचा समूळ नाश होण्याचे भयच फक्त या उक्तिविशेषाने व्यक्त-विले जाते.

३६५. मृदुर्हि परिभूयते

सं. – वारा. २.२१.११. ' रामाच्या यौवराज्याभिषेकाच्या आड येणाऱ्या सर्वांचा विरोध मी मोडून काढीन ' अशी प्रतिज्ञा लक्ष्मणाने केली.

मू. – **भरतस्याथ पक्ष्यो वा यो वास्य हितमिच्छति ।**
सर्वास्तांश्च वधिष्यामि मृदुर्हि परिभूयते ॥

अ. – ' जो कोणी भरताच्या पक्षाचा किंवा त्याचे हित इच्छिणारा असेल, त्या सर्वांचा मी वध करीन. मृदुपणाने वागणाऱ्याचा पराभवच होतो.'

व्य. – आक्रमक पवित्रा घेण्याची वेळ आली असताना दया दाखविण्यामुळे, मृदुता धारण करण्याने पराभव होतो, मानहानी होते. ' मऊ सापडले म्हणजे लोक कोपराने खणू लागतात, ' हा मराठी उक्तिविशेष याच अर्थाचा आहे.

३६६. मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः

सं. – भाग. १०.१.३८. देवकीच्या विवाहोत्सवात तिच्या रथाचे सारथ्य करणाऱ्या कंसाने आपला मृत्यू सांगणारी आकाशवाणी ऐकली त्यामुळे ' देवकीच आपल्या नाशाला कारण होणार ' हे लक्षात घेऊन तो तिच्यावर धावून गेला. त्या वेळी देवकीपती वसुदेवाने त्याचे सांत्वन करताना त्याला एक चिरंतन सत्य सांगितले.

मू. – मृत्युर्जन्मवतां वीर देहेन सह जायते ।
अद्य वाऽब्दशतान्ते वा मृत्युर्वै प्राणिनां ध्रुवः ।।

अ. – '(वसुदेव कंसाला म्हणाला) हे पराक्रमी वीरा ! जन्माला येणाऱ्या प्रत्येक प्राणिमात्राचा मृत्यू त्याच्या देहाबरोबरच उत्पन्न होत असतो. आज किंवा आणखी शंभर वर्षांनी तरी प्राण्यांना मृत्यू हा येणारच.'

व्य. – मरण हे कोणत्याही उपायाने टाळले जाणार नाही; मरण ही अपरिहार्य घटना आहे. म्हणून 'तुझ्या मरणाला कारण होणाऱ्या देवकीची हत्या करून तू आपले मरण टाळू शकणार नाहीस,' असे वसुदेवाला कंसाला सुचवावयाचे आहे. उन्मत्त राज्यशासक, हुकूमशहा किंवा पाशवी बळावर स्वतःची अरेरावी अबाधित चालू राहाण्यासाठी अन्यायाने दुर्बलांना किंवा सज्जनांना चिरडू पाहाणारे अरेराव यांना या उक्तिविशेषाने इशारा दिला जातो. हिरण्यकश्यपूचे नि कंसाचे स्वतःचेच अशी दोन ठळक पौराणिक उदाहरणे यासाठी सांगता येण्यासारखी आहेत.

३६७. मौनं सर्वार्थसाधनम्

सं. – पंच. ४.४६. लब्धप्रणाश तंत्रात, आपल्या वानर मित्राला कपटाने फसवून पाण्यातून नेत असताना मगराने आपला दुष्ट हेतू वानराला बोलून दाखविला. त्यामुळे सावध झालेल्या वानराने आपल्या रक्षणाचा उपाय शोधून काढला व मगराचा बेत हाणून पाडला.

मू. – आत्मनो मुखदोषेण बध्यन्ते शुकसारिकाः ।
बकास्तत्र न बध्यन्ते मौनं सर्वार्थसाधनम् ।।

अ. – 'स्वतःच्या बोलण्याच्या दोषामुळे पोपट आणि मैना पिंजऱ्यात अडकतात. बगळे मात्र (चुपचाप बसल्यामुळे) बंधनात पडत नाहीत. खरोखर, मौन-न बोलणे हे सर्व काम साधून देणारे आहे.'

व्य. – वडवड करणाऱ्या माणसाचे बहुधा नुकसान होते. त्याचा स्वतःचा मूर्खपणा प्रकट होतो, दुसरी माणसे दुखावली जातात आणि त्या माणसाविषयी अनादर उत्पन्न होतो. याउलट योग्य गोष्ट बोलण्याचे न सुचल्यास किंवा बोलणे योग्य नसल्यास जिभेचा संयम करून गप्प बसण्याने सर्व सांभाळले जाते. स्वतःचा मान राहातो. व्यवहारात याचा अनुभव वेळोवेळी येतो. ज्या ज्या वेळी मौनाचे महत्त्व आपल्या ध्यानी येते त्या त्या वेळी हा प्रसिद्ध उक्तिविशेष बोलून दाखविला जातो. पण व्यवहारात हा उक्तिविशेष मुख्यतः जो वापरला जातो तो आपले मत आपल्या मनातला हेतू बाहेर कळू न देता गप्प राहून, मात्र जे साधावयाचे असेल, ते अचूक साधतो, अशा माणसाच्या वागण्याबद्दल.

३६८. यः क्रियावान् स पण्डितः

सं. – महा. ३. प्रवि. ३२.४८. वनात असताना एका यक्षाच्या सरोवरातील पाणी त्याच्या संमतीवाचून प्याल्यामुळे युधिष्ठिराखेरीज बाकीचे चारही पांडव मृत झाले. युधिष्ठिराला यक्षाने अनेक प्रश्न विचारले. त्यांपैकी 'खरा शहाणा किंवा ज्ञानी कोण' या प्रश्नाला युधिष्ठिराने दिलेले हे उत्तर :

मू. – पठकाः पाठकाश्चैव ये चान्ये शास्त्रचिन्तकाः ।
सर्वे व्यसनिनो मूर्खा यः क्रियावान्स पण्डितः ।।

अ. – 'शास्त्राचे अध्ययन करणारे, अध्यापन करणारे, तसेच शास्त्राचा विचार करणारे इतर विद्वान् हे सर्वजण नादिष्ट, मूर्ख असतात. जो (शास्त्राला अनुसरून) आचरण करतो तो खरा पंडित (शहाणा माणूस किंवा ज्ञानी) होय.'

व्य. – शास्त्रातील ज्ञान ग्रहण करून, त्यावर मनन करून त्यानुसार आचरण करण्याने खरा शास्त्राभ्यास होतो. मणभर बोलण्यापेक्षा कणभराच्या कृतीचा प्रभाव अधिक पडतो, ही व्यवहारात नित्य अनुभवाला येणारी गोष्ट आहे. या उक्तिविशेषाने प्रत्यक्ष आचरणाचे महत्त्व सांगितले जाते.

३६९. यततामपि सिद्धानाम्

सं. – भगी. ७.३. परमेश्वराचे यथार्थ ज्ञान होणे किती दुर्लभ आहे ते यात सांगितले आहे.

मू. – मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ।।

अ. – 'हजारो माणसांतून एखादाच (मला जाणून घेण्याचा) प्रयत्न करीत असतो आणि अशा प्रयत्नशीलांपैकी एखादाच केवळ मला यथार्थतेने जाणण्यात यशस्वी होत असतो.'

व्य. – परमेश्वराचे यथार्थ स्वरूप जाणणे, त्याचे खरेखुरे ज्ञान होणे ही अती दुर्लभ गोष्ट आहे. इतकी दुर्लभ की, ती अशक्य कोटीत जमा व्हावी. अशा अशक्य कोटीत जाऊ शकणाऱ्या गोष्टी सिद्ध करणारांचे वर्णन या उक्तिविशेषाने केले जाते.

३७०. यतो धर्मस्ततो जयः

सं. – महा. ५.१४१.३३. उद्योगपर्वात, कौरव व पांडव यांचा युद्धाविषयी विचार चालू असताना श्रीकृष्णाने कर्णाला त्याच्या जन्माचे रहस्य सांगून त्याला पांडवांकडे वळविण्याचा प्रयत्न केला. पांडवांचा पक्ष न्यायाचा आहे व त्यांचाच जय

होणार याची कर्णाला जाणीव होती. त्याने श्रीकृष्णाला तसे बोलून दाखविले; स्वतः मात्र कौरवांच्याच पक्षात राहिला.

महा. ५.१४६.१६. पांडवांच्या वतीने कौरवांशी बोलणी करण्यासाठी श्रीकृष्ण कौरवांच्या राजसभेत गेला असताना भीष्म व त्यांच्यानंतर द्रोणाचार्य पांडवांना अर्धे राज्य देणे धर्माला अनुसरून आहे, यशकारक आहे, असे दुर्योधनाला बजावून सांगतात.

महा. ६.२.१४. व्यासांनी संजयाला दिव्यदृष्टी दिली व आंधळ्या धृतराष्ट्राला युद्धाचा वृत्तान्त संजयाकरवी ऐकविण्याची व्यवस्था केली. युद्धाच्या परिणामाबद्दल शोक करू नये, कारण युद्ध होणे व युद्धात धर्माचा जय होणे अटळ आहे, असे व्यासांनी धृतराष्ट्राला सांगितले.

मू. – क्षपयिष्यति नः सर्वान्स सुव्यक्तं महारणे ।

विदितं मे हृषीकेश यतो धर्मस्ततो जयः ।। महा. ५.१४१.३३.

अ. – '(मी स्वप्नात पाहिले की तो भीम गदा घेऊन पर्वतावर चढला आहे,) या लढाईत तो आम्हा सर्वांचा नाश करील, हे मला स्पष्ट दिसते आहे. कृष्णा, ज्या ठिकाणी धर्म असतो त्याच ठिकाणी विजय प्राप्त होतो याची मला जाणीव आहे. (किंवा या ठिकाणी धर्म आहे म्हणून विजय तिकडेच जाणार याची मला जाणीव आहे.)'

मू. – अश्वत्थामा यथा मह्यं तथा श्वेतहयो मम ।

बहुना किं प्रलापेन यतो धर्मस्ततो जयः ।। महा. ५.१४६.१६.

अ. – 'मला जसा अश्वत्थामा (प्रिय) आहे तसाच अर्जुनही माझा लाडका आहे. पण अधिक बोलून काय लाभ ! ज्या बाजूला धर्म त्या बाजूचाच जय (हे ठरलेले आहे)'

मू – दिष्टमेतत् पुरा चैव नात्र शोचितुमर्हसि ।

न चैव शक्यं संयन्तुं यतो धर्मस्ततो जयः ।। महा. ६.२.१४.

अ. – 'हे तर पूर्वीच ठरलेले होते. आता या बाबतीत तू शोक करू नयेस; आणि हे थोपविणेही शक्य नाही. कारण जेथे धर्म आहे तेथे यश हे (ठेवलेलेच) आहे.'

व्य. – अधर्म-अन्याय करणाऱ्यांना तात्पुरते वैभव-सत्ता लाभल्यासारखी दिसते. पण ते वैभव व सत्ता ज्वालामुखीच्या शिखरावरच्या सिंहासनासारखी असते. तिचा नाश अटळ असतो. धर्माला, न्यायाला अनुसरून वागणाऱ्यांना हाल कष्ट सोसावे लागतात, परंतु अंती जय त्यांनाच मिळतो. प्राचीन काळापासून या सत्याचा प्रत्यय येत राहिलेला आहे. धर्माचरण करणाऱ्याचा या वचनावर दृढ विश्वास असतो. किंबहुना असा विश्वास हेच त्यांचे बल या उक्तिविशेषातून व्यक्त होत असते.

३७१. यतोऽभ्युदय निःश्रेयससिद्धिस्स धर्मः

सं. – वैद. १.१.२. प्रथमतः धर्माचे व्याख्यान करतो असे सांगून महर्षी कणादांनी धर्म म्हणजे काय याचे विवेचन केले आहे.

मू. – यतोऽभ्युदय निःश्रेयससिद्धिस्स धर्मः ।

अ. – ' ज्याच्यामुळे ऐहिक उन्नती होते व मोक्षाची प्राप्ती होते तो धर्म. '

व्य. – ' धर्माप्रमाणे वागा ' असे वडीलधारी मंडळी सांगतात तेव्हां बरेचदा प्रश्न निर्माण होतो – धर्म म्हणजे नेमके काय ? प्रत्येक वस्तूतील विशिष्ट गुण त्या वस्तूला इतरांपासून वेगळी करतो, त्यामुळेच इतर वस्तूपासून त्या वस्तूचा वेगळे-पणा ध्यानात येतो. धर्माचरणामुळे वस्तूजाताचे सत्यज्ञान होऊन मोक्ष मिळतो. सामान्य माणूस मधाचे बोट लावल्याशिवाय एखादी गोष्ट करण्यास प्रवृत्त होत नाही. म्हणूनच धर्मामुळे मोक्षाची प्राप्ती होते असे सांगितले. म्हणजेच धर्म हा प्रवृत्तिमूलक आहे; सामान्य मनुष्याला धर्माचरण करण्यास तो प्रवृत्त करतो. म्हणून प्रत्येक वस्तूचे सत्य ज्ञान होण्यासाठी व मोक्ष मिळविण्यासाठी धर्माचरण करावे असे कणादांनी सांगितले.

परंतु हा तात्त्विक अर्थ झाला; व्यवहारात मात्र ऐहिक ऐश्वर्यप्राप्ती, व्यावहारिक भरभराट, यश आणि अंतिम पारमार्थिक मुक्तीही ज्याच्यामुळे प्राप्त होते तो धर्म असाच अर्थ रूढ आहे. त्या अर्थानेच हा उक्तिविशेष वापरला जातो.

३७२. यंत्रारूढानि मायया

सं. – भगी. १८.६१. मनुष्याच्या पराधीनतेचे विवेचन श्रीकृष्णांनी येथे केले आहे.

मू. – ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ।।

अ. – ' हे अर्जुना, ईश्वर सर्व प्राण्यांच्या हृदयात राहून त्यांना आपल्या मायेने, यंत्रावर घातल्याप्रमाणे, फिरवीत असतो '

व्य. –अर्जुन तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगून युद्ध करण्याचे टाळीत होता. इतर अनेक अंगांनी त्याच्या मनातील समजुती किती चुकीच्या आहेत हे पटवून दिल्यावर शेवटी श्रीकृष्णाने त्याला स्वच्छ सांगून टाकले की, तू उगीच वायफळ बोलू नकोस आणि मी अमूक करीन, अमूक करणार नाही अशी प्रौढी पण सांगू नकोस. तुझ्या हातून काय घडायचे आहे हे अगोदरच ठरलेले आहे. तू क्षत्रिय आहेस, तुझा धर्म ठरलेला आहे. तुझ्या मनात असो-नसो नियती म्हणजेच ईश्वर, हे युद्ध तुझ्याकडून करविणार आहे. व्यवहारात याच अर्थाने हा उक्तिविशेष प्रचलित आहे.

३७३. यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः

(पाहा : उद्योगिनं पुरुषसिंह. . .)

३७४. यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः

सं. – महा. १३.३०७.१. कुटुंबामध्ये वधूशी कशा प्रकारे वागावे हे भीष्मांनी युधिष्ठिराला सांगितले.

मनु. ३.५६. विवाह, हुंडा, स्त्रीधन यांच्याविषयी विवेचन करताना मनूने गृहस्थाश्रमातील स्त्रीचे महत्त्व येथे सांगितले आहे.

मू. – **यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।**

यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥

अ. – 'ज्या कुळात स्त्रीला बहुमान दिला जातो तेथे देवता संतुष्ट राहातात. मात्र ज्या घरात त्यांची अवहेलना होते तेथे सर्व कार्ये निष्फल होतात.'

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे)

व्य. – घरची लक्ष्मी म्हणून स्त्रीला योग्य मानाने वागविले म्हणजे ती संतुष्ट राहून सर्वांना सांभाळते, संतुष्ट ठेवते. ज्या घरात संतोष, समाधान राहाते त्या घरातच देवतांचा अधिवास असतो.

स्त्रियांची अवहेलना झाल्यास घराचा नाश होतो, याचे स्मरण देण्याकरिता हा उक्तिविशेष वापरला जातो.

३७५. यथा काष्ठं च काष्ठं च

सं. – वारा. २.१०५.२६. रामाला राज्याभिषेकाऐवजी चौदा वर्षे वनवास व भरताला राज्याभिषेक हे दोन वर कैकेयीने मागितले. पितृवचनपूर्तीसाठी राम वनवासाला गेला. भरत परत आल्यावर त्याला हे वृत्त कळताच रामाला परत आणण्यासाठी तोही वनात गेला. रामाशी भेट झाल्यावर भरताने आपला हेतू रामाला सांगितला. तेव्हा आपल्या दुःखी भ्रात्याचे सांत्वन करून राम असे म्हणाला:

महा. १२.२८.३६. भाऊबंदांच्या दुःखामुळे दुःखाकुल झालेल्या धर्मराजाचे व्यासांनी सांत्वन केले. त्या वेळी निरनिराळे दाखले देऊन सुख-दुःख. संयोग-वियोग हे सर्व क्षणिक आहे हेही सांगितले.

मू. – **यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महार्णवे ।**

समेत्य तु व्यपेयातां कालमासाद्य कंचन ॥ वारा. २.१०५.२६.

अ. – 'जसे एक लाकूड आणि दुसरे लाकूड समुद्रामध्ये एकत्र येतात (आणि) एकत्र येऊनही कांही कालानंतर त्यांची ताटातूट होते.'

मू. – **यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महोदधौ ।**

समेत्य च व्यपेयातां तद्वद्भूतसमागमः ॥ महा. १२.२८.३६.

अ. – 'ज्याप्रमाणे एक लाकूड आणि दुसरे लाकूड महासागरांत एकत्र येतात

आणि (काही कालानंतर) एकमेकापासून दूर जातात, त्याचप्रमाणे (सर्व) प्राणिमात्रांचा सहवास असतो.'

व्य. – मानव हा पराधीन आहे. एकत्र येणे वा त्यांचा वियोग होणे हे सारे काही दैवाच्या हातात असते. थोडक्यात म्हणजे माणूस हा दैवाच्या हातातील एक खेळणे आहे. जीवनातील एक फार मोठे कटु सत्य रामाने या श्लोकातून सांगितले. ' दोन ओंडक्यांची होते सागरात भेट । एक लाट तोडी दोघां पुन्हा नाही गाठ ॥" म्हणजेच समागम वियोग हे सारे क्षणिक आहे आणि म्हणूनच त्याबद्दल दुःख करता कामा नये. जीवनात असे समागम-वियोगाचे क्षण ज्या ज्या वेळी येतात त्या त्या क्षणी ह्या रामाच्या उक्तीची आठवण अगदी सहजी होते.

३७६. यथा राजा तथा प्रजाः

सं. – भोज. ४४. धारानगरीचा राजा मुञ्ज याने आपला पुतण्या भोजराजा याला मारण्याचे कारस्थान केले; नंतर त्या कर्माचा त्याला पश्चात्ताप झाला. त्याने अग्निप्रवेश करण्याचे ठरविले. लोक राजाचा आदर्श पुढे ठेवतात. नीतिभ्रष्ट राजा सत्ताधारी असणे योग्य नाही, असा मुञ्जाने विचार केला. (परिशिष्ट पाहा)

मू. – राज्ञि धर्मिणि धर्मिष्ठाः पापे पापपराः सदा ।
राजानमनुवर्तन्ते यथा राजा तथा प्रजाः ॥

अ. – ' राजा धर्मानुसार आचरण करणारा असेल तर प्रजा धार्मिक असते; राजा दुर्वर्तनी असेल तर प्रजाही दुष्कृत्ये करण्यात गढलेली असते. जसा राजा तशी प्रजा. ती नेहमी राजाचे अनुकरण करते.'

व्य. – सत्ताधारी व्यक्तींचे वागणे सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीपुढे असते. सर्व व्यवहार त्यांच्या कलाने पार पाडावा लागतो. राजसत्तेतील न्याय-नीतीचे जे स्वरूप तेच प्रजेच्या न्याय-नीतीविषयक व्यवहाराचे स्वरूप ठरत असते; हे सार्वकालिक सत्य आहे. आदर्श राजा रामाच्या राज्यात कलह, चोरी, चहाडी, व्यभिचार यांचा मागमूसही नव्हता. सर्व प्रजा धार्मिक, यथान्याय वागणारी व अत्यन्त सुखी होती. याउलट मोगल बादशहांच्या अमदानीतील बादशाही अत्याचाराबरोबरच त्यांच्या मुसलमानी प्रजेतील दंडेलीचे नि अधःपतनाचे चित्रही इतिहासात अनेक ठिकाणी आढळते. दोन्ही प्रकारची उदाहरणे पाहून ह्या उक्तिविशेषाचे स्मरण होते.

३७७. यद् गत्वा न निवर्तन्ते

सं. – भगी. १५.६. गीतेच्या पंधराव्या ' पुरुषोत्तमयोग ' अध्यायात संसाराचे वर्णन अश्वत्थ वृक्षाच्या रूपकाने केले आहे. तो संसारवृक्ष वैराग्यशस्त्राने तोडून

परमात्म्याच्या परमपदाला पोचण्याचा उपाय श्रीकृष्णांनी सांगितला आहे. त्या परमपदाचे हे वर्णन आहे.

मू. – न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः ।

यद् गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ।।

अ. – ' ते (परमस्थान) सूर्य, चंद्र किंवा अग्नीही प्रकाशित करू शकत नाही. जेथे गेल्यावर परत येणे नाही (परत यावे लागत नाही) असे ते माझे श्रेष्ठ स्थान आहे.'

व्य. – परब्रह्माच्या स्वरूपाचे वर्णन श्वेताश्वतर (६.१४), मुण्डक (२.२.१०) व कठ (२.२.१५) या उपनिषदांतून आलेले आहे. गीतेतही ते आले आहे. आध्यात्मिक संदर्भात मोक्षस्थिती आणि व्यावहारिक संदर्भात अज्ञात, अगम्य, गूढ स्थान यांचा निर्देश वरील उक्तीने केला जातो.

३७८. यदभावि न तद्भावि

सं. – हित. प्रस्ताविका ३०. आपल्या उनाड मुलांना शहाणे कसे करावे या चिंतेत असलेला सुदर्शन राजा आपल्या नशिबाला दोष देऊ लागला.

हित. ४.८. सरोवरातील मासे पकडण्यासाठी कोळी आलेला पाहून 'अनागतविधाता' हा मासा सरोवर सोडून गेला; 'प्रत्युत्पन्नमती'ने आयत्या वेळी युक्ती लढवून आपली सुटका करून घेतली; 'यद्भविष्य' नावाचा मासा नशिबावर विसंबून राहिला व कोळ्याच्या जाळ्यात अडकला.

मू. – यदभावि न तद्भावि भावि चेन्न तदन्यथा ।

इति चिन्ताविषघ्नोऽयमगदः किं न पीयते ।।

अ. – ' जे घडणार नाही ते होण्याची शक्यता नाही; आणि जे घडणारच असेल त्यात बदल होण्याची शक्यता नाही; हा विचार हेच कोणी चिन्तारूपी विषाचा नाश करणारे औषध म्हणून का पिऊ नये ? '

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे.)

व्य. – प्रयत्न करूनही एखादी घटना टाळता आली नाही म्हणजे जे होणार ते चुकत नाही अशा अर्थाचा हा उक्तिविशेष उच्चारला जातो.

३७९. यद्वा तद्वा भविष्यति

सं. – सुर. ३. सामान्यनीति २६८. एकात एक भर घालणाऱ्या विचित्र गोष्टी घडत गेल्या म्हणजे त्यांचा शेवट काय होईल याचा अंदाज करता येत नाही हे, एका गमतीदार उदाहरणाने सुभाषितकाराने येथे सांगितले आहे.

सप. य ३.

मू. – मर्कटस्य सुरापानं तस्य वृश्चिकदंशनम् ।
तन्मध्ये भूतसंचारो यद्वा तद्वा भविष्यति ॥ सुर. ३. सामान्यनीति २६८.

अ. – 'माकड दारु प्याले, त्याला विंचू चावला आणि त्यात त्याच्या अंगी भूत संचारले; मग काय होईल अन् काय नाही !'

मू. – यस्य कस्य तरोर्मूलं येन केनापि मिश्रितम् ।
यस्मै कस्मै प्रदातव्यं यद्वा तद्वा भविष्यति ।। सप. य ३.

अ. – 'कोणत्यातरी झाडाचे मूळ कुठल्या तरी वस्तूत मिसळायचे आणि कोणाला तरी द्यायचे; मग त्याचा परिणाम काय घडेल तो घडेल!'

व्य. – काही योजना न करता, मागचापुढचा विचार न करता केलेल्या विसंगत, असंबद्ध गोष्टीला उद्देशून हा उक्तिविशेष वापरला जातो. मराठीत 'अद्वातद्वा' असे त्याचे अपभ्रष्ट रूप दिसून येते. अद्वातद्वा बोलणे म्हणजे विसंगत, भलतेच बोलणे.

३८०. यदहरेव विरजेत्तदहरेव प्रव्रजेत्

सं. – जाबालोपनिषद खंड ४. जनकाने 'संन्यासाचे प्रकार मला सांगा' अशी याज्ञवल्क्यांना विनंती केली. तेव्हा याज्ञवल्क्यांनी संन्यासाला अधिकारी कोण, तो केव्हा आणि कसा घ्यावा याची सांगोपांग चर्चा केली.

मू. – अथ पुनरव्रती वा व्रती वा स्नातको वाऽस्नातको वा ।
उत्सन्नाग्निरनग्निको वा यदहरेव विरजेत्तदहरेव प्रव्रजेत् ।।

अ. – 'आता एखाद्याला (मग तो) व्रतपालन केलेला असो किंवा नसो, सर्व वेदांचा सांग अभ्यास करणारा असो किंवा नसो, अग्निहोत्र बाळगणारा असो किंवा अग्निहोत्र पालन करणारा नसो, ज्या दिवशी विरक्ती येईल त्या दिवशीच(त्याने) संन्यास घ्यावा.'

व्य. – संन्यास घेण्यास अमुक व्यक्ती अधिकारी आहे व अमुक नाही असा पंक्ति-प्रपंच येथे केलेला नाही. म्हणूनच एखादा साधक असो की संसारी असो, ज्ञानी असो वा अज्ञानी असो; त्याला ऐहिक सुखोपभोगाबद्दल वैराग्य उत्पन्न झाले की तो संन्यास घेण्यास पात्र ठरतो. म्हणजेच वैराग्य उत्पन्न होणे एवढेच संन्यासग्रहणासाठी आवश्यक आहे. खरोखरीच ज्याला वैराग्य उत्पन्न झाले त्याने तात्काळ सर्वसंग-परित्याग करावा, अशा अर्थानेच ही उक्ती वापरली जाते.

३८१. यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः

(पाहा : लोकस्तदनुवर्तते)

सं. – भगी. ३.२१. लोकसंग्रह करण्याचे कर्तव्य किंवा अधिकार ज्ञानी पुरुषाकडे का येतो ते या श्लोकात सांगितले आहे.

मू. – यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ।
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥

अ. – 'श्रेष्ठ (आत्मज्ञानी कर्मयोगी) पुरुष जे जे करतो ते तेच इतर म्हणजे सामान्य लोक करीत असतात. तो जी गोष्ट प्रमाण म्हणून अंगीकारतो तिलाच लोक अनुसरतात.'

व्य. – संसारात एखाद्या प्रसंगी कसे वागावे याविषयी संदेह वाटल्यास ज्ञानी व धर्मिष्ठ ब्राह्मण त्या बाबतीत जसे वागत असतील त्याप्रमाणे वागावे, असा उपनिषदांचाही (तैति. १.११.४) आदेश आहे. श्रीकृष्णानेही तोच उपदेश केला आहे. विष्णुदूत आणि यमदूत यांचे धर्माधर्माविषयी संभाषण चालले असता श्रेष्ठांच्या वर्तनाचेच अनुकरण करावे असे (भाग. ६.२.४) म्हटले आहे. सामान्य माणसे धर्माधर्माची इतर चिकित्सा करीत नाहीत, त्यांनी ती करूही नये. व्यवहारामध्ये श्रेष्ठ व्यक्तींच्या वागण्याचे-आचरण्याचे अनुकरण करावे, किंवा केले जाते हे सांगण्यासाठीच हा उक्तिविशेष वापरला जातो.

३८२. यद्यद्विभूतिमत्सत्त्वम्

सं. – भगी. १०.४१. परमेश्वराला ओळखावे कसे ? कोणकोणत्या पदार्थांत त्याचे स्वरूप पाहावे ? असा प्रश्न अर्जुनाने विचारल्यावर निरनिराळ्या विभूतींचे वर्णन करून श्रीकृष्णाने या श्लोकाने विभूतियोगाचा उपसंहार केला आहे.

मू. – यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंशसम्भवम् ॥

अ. – 'जी जी वस्तू वैभव, लक्ष्मी किंवा प्रभाव यांनी युक्त आहे ती ती माझ्या तेजाच्या अंशापासून झाली आहे असेच तू समज.'

व्य. – अव्यक्त ईश्वराचे सामान्यांना आकलन होत नाही. परमेश्वराच्या सगुण स्वरूपाची त्यासाठी अपेक्षा असते. विश्वात ईश्वराच्या सगुणतेचा ठायी ठायी झालेला आविष्कार म्हणजेच विभूती होत. विभूती हे परमेश्वराचे व्यष्टिरूप व विश्वरूप हे परमेश्वराचेच समष्टिरूप आहे. अलौकिक, असामान्य परंतु सुंदर, मंगल, पवित्र अशा वस्तू, व्यक्ती इत्यादींच्या ठिकाणी ईश्वरभाव पाहण्यास ही उक्ती सांगते.

३८३. यदा यदा हि धर्मस्य...

सं. – भगी ४. ७. अव्यक्त परमेश्वर व्यक्त केव्हा व कशासाठी होतो याचे स्पष्टीकरण या श्लोकात आहे.

मू. – यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य यदात्मानं सृजाम्यहम् ॥

अ. – 'जेव्हा जेव्हा धर्माची ग्लानी होऊन अधर्माचे प्राबल्य माजते तेव्हा (तेव्हा) मी स्वत:च जन्म (अवतार) घेत असतो.'

व्य. – अन्याय, अत्याचार, जुलूम यांनी पीडित झालेल्या जगाला, सज्जनांना नि शांततेने जीवन जगू इच्छिणाऱ्या सात्त्विकांना परमेश्वरी वाणीने दिलेला हे विश्वात्मक आश्वासन आहे. प्रत्येक कंसाला त्याचा कृष्ण नि प्रत्येक रावणाला त्याचा राम भेटतच असतो; अन्यायाचे परिमार्जन कधी ना कधी कोणा ना कोणाच्या रूपाने येऊन परमेश्वर करीत असतो, ही आशा या उक्तिविशेषाने व्यक्तविली जाते.

३८४. यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति तत् क्वचित

सं. – महा. १.५६.३३. महाभारताची अलौकिकता व सर्वसमावेशकता अपूर्व असल्याची राजा जनमेजयाला जाणीव झाली होती. म्हणून त्याने विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना वैशंपायनांनी मुक्तकंठाने महाभारताची प्रशंसा केली.

योवा. ३.८.१२. 'आत्मज्ञान होण्यासाठी चोखाळाव्या लागणाऱ्या सर्व मार्गांचा सांगोपांग विचार या ग्रंथाइतका दुसऱ्या कोठल्याच ग्रंथात आढळणार नाही' असे वसिष्ठांनी रामाला सांगितले.

मू. – **धर्मे चाऽर्थे च कामे च मोक्षे च भरतर्षभ ।**
यदिहाऽस्ति तदन्यत्र यन्नेहाऽस्ति न तत्क्वचित् ।। महा. १.५६.३३.

अ. – 'हे भरतश्रेष्ठा (जनमेजया), धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थां-विषयी यात जे वर्णन आहे तेच इतरत्रही आहे. (पण) जे यात नसेल ते इतरत्र कोठेही आढळणार नाही.'

मू. – **यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत् क्वचित् ।**
इमं समस्तविज्ञानशास्त्रकोशं विदुर्बुधाः ।। योवा. ३.८.१२.

अ. – 'जे यात (योगवासिष्ठात) आहे तेच इतरत्र (इतर ग्रंथांत) आढळेल (पण) जे यात नसेल ते कोठेच आढळणार नाही. कारण हा (ग्रंथ) सर्व आध्या-त्मिक सिद्धान्तांचे आगर आहे हे ज्ञानी माणसे जाणतात.'

व्य. – सर्वसंग्राहक असे महाभारताचे स्वरूप आहे; कारण या जगतावरील कोणताही विषय व्यासांच्या बुद्धिमत्तेला अगम्य नाही. म्हणूनच 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं' म्हटले जाते. जे जे या भूतलावर असेल त्याची व्यासांना आलेली प्रतीति या ग्रंथात आढळेलच. जे यात नाही असे वाटेल ते अस्तित्वातच नसेल. सारांश, महाभारताचे सर्वसमावेशक व्यापक स्वरूप असल्यामुळे ही शब्दावली सार्थनामा झाली.

३८५. यद् रोचते तद् ग्राह्यम्

सं. – श्राद्धविधीत आलेली एक प्रार्थना. श्राद्धासाठी क्षण दिलेले ब्राह्मण देवस्थानी

व पितृस्थानी येऊन बसले व भोजनाला प्रारंभ झाला की श्राद्धकर्त्याने त्यांची करावयाची प्रार्थना.

मू. – यद् रोचते तद्ग्राह्यम् । यन्न रोचते तद् त्याज्यम् ।

सुखेनैव भोक्तव्यम् ।

अ. – ' जे आवडेल ते घ्या. जे आवडत नसेल ते टाकून द्या. सुखाने आनंदाने भोजन करा. '

व्य. – ही उक्ती मुख्यतः श्राद्धविधीत उपयोजिली जात असली तरी सर्वसामान्यतः उच्च शिक्षित, सुसंस्कृत मंडळीत यजमानाने आमंत्रित पाहुण्यांना भोजनप्रसंगी गौरवाने ' स्वस्थ होऊ द्या ' अशा अर्थाने हा उक्तिविशेष वापरला जात असतो.

३८६. यदेव रोचते यस्मै

सं. – हित. २.५३. सुहृद्भेद तंत्रात, करटक व दमनक हे दोघे अमात्यपुत्र (कोल्हे) वनराज सिंहाला भेटायला जाऊ इच्छितात. न बोलावता जाण्याने सिंह नाराज होईल असे करटक म्हणाला तेव्हा दमनकाने त्याला उत्तर दिले :

मू. – किमप्यस्ति स्वभावेन सुंदरं वाऽप्यसुंदरम् ।

यदेव रोचते यस्मै भवेत्तत्तस्य सुंदरम् ।।

अ. – ' कोणतीही वस्तू स्वभावतःच चांगली किंवा वाईट नसते. जे ज्याला आवडले ते त्याला चांगले वाटेल. '

व्य. – सौंदर्य वस्तूत नसून पाहाणाऱ्याच्या दृष्टीत असते. ज्याच्या त्याच्या अभिरुचीप्रमाणे तो वस्तूची निवड करतो; ती त्याला आवडते; मग दुसऱ्याला तिच्यामध्ये वैगुण्य का दिसेना. अशा प्रकारची परिस्थिती पाहिली की हा उक्तिविशेष स्मरणात येतो.

३८७. यस्य राष्ट्रे प्रजाः ...

सं. – भाग. १.१७.१०. गोरूप धारण केलेल्या पृथ्वीला अभय देताना परीक्षिति राजा म्हणाला की, जेथे अनाचार असेल तेथेच कली प्रभाव गाजवू शकेल; अनासक्त वृत्तीने राहाणाऱ्या भक्तांवर नाही.

मू. – यस्य राष्ट्रे प्रजाः सर्वास्त्रस्यन्ते साध्व्यसाधुभिः ।

तस्य मत्तस्य नश्यन्ति कीर्तिरायुर्भगो गतिः ।।

अ. – ' (हे साध्वी) ज्या राजाच्या राज्यात दुष्टांचा त्रास निरपराधी लोकांना (निमूटपणे) सहन करावा लागतो त्या उन्मत्त राजाची कीर्ती, आयुष्य, भाग्य व उत्तम लोक सर्व काही नष्ट होते. '

व्य. – उन्मत्त शासक आणि त्यांच्या आश्रयाने निरपराध जनतेची पिळवणूक करणारे अनाचारी अनुयायी यांना त्यांच्या वागण्याच्या परिणामाची जाणीव या उक्तिविशेषाने करून दिली जाते.

३८८. यस्यार्थाः स च पण्डितः

सं. – वारा. ६.८३.३५. 'जगातील सर्व कार्ये अनुकूल करून देणाऱ्या राजलक्ष्मीचा तू त्याग केल्यामुळेच तुझ्यावर ही सर्व अनर्थपरंपरा कोसळली आहे,' असे युद्धाचे वेळी शोकाकुल झालेल्या रामाला लक्ष्मणाने बजावले.

पंच. १.३. धन असेल तरच सर्व वस्तू प्राप्त होतात; या बुद्धीने वर्धमान नावाच्या वाण्याने भांडयांचा व्यापार करण्यासाठी परदेशी जाण्याचे ठरविले.

मू. – **यस्यार्थास्तस्य मित्राणि यस्यार्थास्तस्य बान्धवाः ।**
यस्यार्थाः स पुमाँल्लोके यस्यार्थाः स च पण्डितः ।।

अ. – 'ज्याच्याजवळ धन असते त्यालाच मित्र आणि बांधव प्राप्त होतात. ज्याच्याजवळ संपत्ती असेल त्यालाच जगात पुरुषार्थी मानले जाते; आणि तोच जगात शहाणा म्हटला जातो.'

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे.)

व्य. – पैसा हे ऐहिक सुखोपभोगांचे, यशाचे साधन आहे. ज्याच्याजवळ पैसा आहे त्याला सर्व गोष्टी सहज प्राप्त असतात. त्यामुळे व्यवहारी लोकांची दृष्टी साहजिकच मुख्यतः धनाकडे असते. सर्व सुखदुःखांचा संबंध ते पैशाशी लावतात. 'यस्यास्ति वित्तं'.. हे प्रसिद्ध सुभाषित याच उक्तिविशेषाच्या अर्थाचे आहे. वास्तविक मुळात हे उपरोधाने म्हटलेले आहे आणि त्याच अर्थाने ते वापरले जाते.

३८९. या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी

– भगी. २.६९. स्थितप्रज्ञाची लक्षणे सांगत असताना श्रीकृष्णांनी हे सांगितले आहे.

योवा. निर्वाण उत्तरार्ध ४३.३१. सर्वसामान्य मनुष्य अज्ञानाने सांसारिक मोहपाशात गुरफटतो तर वासनालय झालेला ज्ञानी संसाराचे मर्म जाणून त्यापासून अलिप्त राहतो. हे गीतेतील रूपकानेच वसिष्ठ रामाला समजावून सांगतात.

मू. – **या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।**
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ।।

अ. – 'सर्व लोकांची जेव्हा रात्र असते तेव्हा (त्या ठिकाणी) स्थितप्रज्ञ जागृत असतो, आणि सर्व प्राणिमात्राचा दिवस असतो, ते ज्या ठिकाणी ज्याबाबत जागे असतात त्याबाबत ज्ञानवान पुरुष रात्र मानून झोपी गेलेला असतो.'

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे)

व्य. – विषयसेवनाच्या बाबतीत, प्रापंचिक सांसारिक सुखोपभोगांविषयी सर्वसामान्य (बद्ध) मनुष्य तत्पर असतो, जागृत असतो. उलट नेमक्या त्याच बाबतीत स्थित-प्रज्ञ उदासीन असतो. हे सांगण्यासाठी हा दृष्टान्त योजिलेला आहे. त्याच अर्थाने या उक्तिविशेषाचा उपयोग केला जातो.

३९०. यादृशी भावना यस्य

(पाहा : सिद्धिर्भवति तादृशी)

सं. – पंच. ५.९६. ब्रह्मदत्त प्रवासाला निघाला असता त्याच्या आईने त्याला एक खेकडा बरोबर देऊन 'हा तुला मदत करील' असे सांगितले. त्यानेही आईच्या वचनावर श्रद्धा ठेवून तो खेकडा बरोबर घेतला त्यामुळे त्याचे प्राण वाचले. पूर्ण श्रद्धेने केलेली कोणतीही गोष्ट फलदायी होते हेच यातून सुचविले आहे.

मू. – **मंत्रे तीर्थे द्विजे देवे दैवज्ञे भेषजे गुरौ ।**

यादृशी भावना यस्य सिद्धिर्भवति तादृशी ॥

अ. – 'मंत्रातंत्रावर, तीर्थक्षेत्राविषयी, ब्राह्मणांविषयी, देवदेवतांच्या संदर्भात, भविष्य जाणणाऱ्याच्या बाबतीत तसेच औषधाविषयी (किंवा) गुरुविषयी ही जशी (जितकी) श्रद्धा असेल तसेच (तितके) त्याचे फल मिळत असते.'

व्य. – श्रद्धेची महती सांगणारा, अनेक उदाहरणांसह ती पटवून देणारा हा श्लोक आहे. जशी श्रद्धा तसे फळ हे सांगण्यासाठीच हा उक्तिविशेष वापरला जातो.

३९१. याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते

सं. – सप. य ४०.

मू. – **दृष्ट्वा यतिर्यतिं सद्यो वैद्योवैद्यं नटं नट: ।**

याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते ॥

अ. – 'एका भिक्षूने दुसऱ्या भिक्षूला, एका वैद्याने दुसऱ्या वैद्याला, एका नटानं दुसऱ्या नटाला (किंवा) एका भिक्षेकऱ्याने दुसऱ्या भिक्षेकऱ्याला पाहिले की, (प्रतिस्पर्धी समजून, वाटेकरी समजून) तात्काळ (ते दोघे) कुत्र्याप्रमाणे (एकमेकांवर) गुरगुरायला लागतात.'

व्य. – दोन समान व्यवसायी व्यक्ती एकमेकांच्या समोर आल्याबरोबर आता हा आपल्या प्राप्तीत वाटेकरी होणार, असे वाटून त्या दोघांच्या मनांत परस्परां-विषयीची मत्सराची भावना निर्माण होते, हे सांगण्यासाठीच वरील उक्ती योजतात.

३९२. युद्धस्य वार्ता रम्या

(पाहा : दूरस्था पर्वता रम्याः)

३९३. येनकेनप्रकारेण

सं. – सुर. ३. सामान्यनीति ५०. कोणत्याही मार्गाने का होईना पण आपणाला प्रसिद्धी मिळावी ही माणसाची इच्छा; त्यासाठी तो वाटेल ते करतो. हा मानवी स्वभावाचा एक पैलू सामान्यनीतीत दाखविला आहे.

मू. – घटं भिन्द्यात्पटं छिन्द्यात्कुर्याद्रासभनिःस्वनम्* ।
येनकेनप्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् ।।

* रोहणम् : पाठभेद

अ. – 'मातीचे मडके फोडावे, (अंगावरील) वस्त्र फेडावे (आणि) गाढवासारखा आवाज करावा (काढावा) (किंवा गाढगावर बसावे). अशा या कोणत्याही (एका) प्रकाराने माणसाला आपली प्रसिद्धी करून घेता येईल (की)!'

व्य. – आपल्या पुरुषार्थाने, कर्तृत्वाने, लोकसेवेने आणि पांडित्याने माणसाला प्रसिद्धी मिळणे हा सरळ मार्ग झाला. पण यांपैकी ज्याच्याजवळ काहीच नाही आणि ते संपादन करण्याची कुवत किंवा तयारीही नाही, तो वरीलपैकी विपरीत, चमत्कारिक मार्गांनी आपली टिमकी वाजवून प्रसिद्धी मिळविण्याचा जेव्हा खटाटोप करू लागतो, तेव्हा त्याचा धिक्कार या उक्तिविशेषाने केला जातो.

३९४. ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्

सं. – भगी. ४.११. कर्मब्रह्मार्पणयोगाचे विवेचन चालू असताना श्रीकृष्णांनी ईश्वरी अवताराची मीमांसा केली आणि पुढे आपल्यापर्यंत येऊन पोचण्यासाठी आवश्यक त्या मार्गाचे विवेचन केले.

मू. – ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् ।
मम वर्त्मानुवर्तन्ते मनुष्याः पार्थ सर्वशः ।।

अ. – 'जे मला ज्या प्रकारे भजतात त्यांना मी त्याप्रमाणेच फल देतो. हे पार्था (पण) काही झाले तरी माणसे (अखेर) माझ्याच मार्गाला येऊन मिळत असतात.'

व्य. – जसा भाव तसा देव; जैसा भाव जयापाशी, तैसा देव तयासी; हे सांगणारी ही उक्ती आर्त भक्ताला असाही दिलासा देणारी आहे की, तुझा भाव जितका उत्कट, निर्मळ नि निरपेक्ष तसा भगवंत तुला प्रतिसाद देईल; अंतर देणार नाही.

३९५. यो भुङ्क्ते स्तेन एव सः

सं. – महा ६. २७.१२. (गीता ३.१२) सृष्टीची उत्पत्ती आणि सृष्टीच्या सर्व क्रिया यज्ञाच्या परिभाषेत अर्जुनाला समजावून सांगताना श्रीकृष्णांनी, देव आणि माणसे यांच्यातील नाते स्पष्ट करून सांगितले आहे.

मू. – **इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यन्ते यज्ञभाविताः ।**
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुङ्क्ते स्तेन एव सः ।।

अ. – 'यज्ञामुळे संतुष्ट झालेले देव इच्छिलेले भोग (भोग्य वस्तू) तुम्हाला देतील. त्यांना अर्पण न करता जो केवळ स्वतःच उपभोग घेतो तो खरोखर चोर होय.'

व्य. – जगद्कर्त्याबद्दल, जगातील मानवी जीवनाला उपयोगी पडणाऱ्या शक्तींबद्दल आदरपूर्ण कृतज्ञता ही भारतीय संस्कृतीतील महत्त्वाची धारणा आहे. तिच्याविरुद्ध आचरण करणाऱ्याची धर्मदृष्टचा चोरामध्ये गणना केली आहे. मिळविलेल्या द्रव्याने केवळ स्वतःची उपजीविका व चैन करणाऱ्या, त्याचा थोडाही भाग दानधर्मासाठी, इतरांसाठी खर्च न करणाऱ्या स्वार्थी मनुष्याचे वर्णन या उक्तिविशेषाने केले जाते. समष्टीच्या हिताची जाणीव, आपण समाजाचे काही देणे लागतो याची जाणीव करून देणारा हा उक्तिविशेष आहे.

३९६. यो वै भूमा तत्सुखम्

सं. – छां. ७.२३.१. सर्व वेद, पुराणे, इतिहास यांपासून धनुर्वेद–संगीत–गारुड विद्येपर्यंत सर्व शास्त्रे अवगत असून देखील नारदाच्या अंतःकरणातला शोक व मोह नष्ट झाला नाही. तो दुःखीच राहिला. तेव्हा 'शोक-मोह नष्ट करून शुद्ध आनंदाचा लाभ करून देणारी आत्मविद्या मला सांगा' अशी त्यांनी सनत्कुमारांना प्रार्थना केली. सनत्कुमारांनी त्यांना आत्म्याचे स्वरूप सांगितले.

मू. – **यो वै भूमा तत्सुखं । नाल्पे सुखमस्ति ।**
भूमैव सुखं । भूमा तु एव विजिज्ञासितव्यम् ।।

अ. – 'जे महान् आहे, असीम आहे ते सुख होय. अल्प, परिमित वस्तूमध्ये सुख नाही. म्हणून जे असीम, निरतिशय आहे त्याचीच जिज्ञासा करावी.'

व्य. – 'भूमा' हे ब्रह्माचेच एक नाव. ब्रह्म केवळ आनंदरूप आहे; पण ब्रह्मबुध्दी सिद्ध होण्यापूर्वी–मी वेगळा, तू वेगळा–हा दुजेपणा–परकेपणा, ही भावना व त्यापासून निर्माण होणारे राग-द्वेष भय व दुःख निर्माण करतात. ज्या वेळी अमर्याद, सर्वत्र भरून राहिलेल्या एकच एक आत्मतत्त्वाचा साक्षात्कार होतो त्या वेळी दुजेपणा व त्यापासून उत्पन्न होणारी दुःखांची साखळी नष्ट होते. वृत्तीची विशालता, सर्वसमावेशकता हे सुखाचे, कल्याणाचे कारण आहे; संकुचितपणा, क्षुद्रता त्याज्य आहे. या अर्थाने हा उक्तिविशेष प्रचलित आहे.

३९७. योगः कर्मसु कौशलम्

सं. – भगी. २.५०. सांख्ययोगाचे निरूपण करीत असताना ४६ ते ७२ या श्लोकांत (सम) बुद्धियोगाची तत्त्वे श्रीकृष्णांनी सांगितली आहेत.

मू. – बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।

अ. – ' (समत्व) बुद्धीने जो युक्त झाला तो पाप आणि पुण्य या दोहोंपासून या लोकी अलिप्त राहातो. म्हणून योगाचा आश्रय कर. (पापपुण्य अंगी न लागता) कर्मे करण्याची जी चतुराई (युक्ती) तिलाच योग असे म्हणतात. '

व्य. – कर्मे बंधनकारक न होता ती मोक्षपर करण्याची, पाप-पुण्याची फले अंगी लागू न देता अलिप्तभावाने कर्मे करण्याची जी युक्ती तिला ' कौशल ' असे मुळात म्हटलेले आहे. परंतु व्यवहारात मात्र ' काम करण्यातील कुशलता हाच योग ' असा सरधोपट अर्थ करून हा उक्तिविशेष वापरला जातो.

३९८. योगेनान्ते तनुत्यजाम्

सं. – रघु. १.८. रघूच्या पूर्वजांचे वर्णन कालिदासाने केले आहे. त्यात त्यांची जीवनपध्दती कशी होती याचे तपशीलवार विवरण आहे.

मू. – शैशवेऽभ्यस्तविद्यानां यौवने विषयैषिणाम् ।
वार्धक्ये मुनिवृत्तीनां योगेनान्ते तनुत्यजाम् ।।

अ. – ' बालपणी शास्त्राभ्यास करणाऱ्या, तारुण्यात विषयोपभोग भोगणाऱ्या, वार्धक्यात मुनिवृत्तीने राहाणाऱ्या आणि अंतकाली ईशचिंतन करीत देहत्याग करणाऱ्या ' (रघुकुलातील राजांचे वर्णन मी करीत आहे.) '

व्य. – आदर्श आश्रमव्यवस्थेचे हे चित्र रघुकुलातील राजांच्या वर्णनाच्या निमित्ताने येथे आले आहे. अशा आदर्श जीवन जगणाऱ्या थोर पुरुषांचे वर्णन आजही या उक्तीने केले जाते. उदाहरण म्हणून लोकमान्य टिळकांचे सांगता येईल.

३९९. योगक्षेमं वहाम्यहम्

सं. – भगी. ९.२२. अनन्यभावाने भक्तिमय जीवन होऊन गेलेल्या भक्तांचा सर्व भार आपण उचलतो असे आश्वासन श्रीकृष्णांनी येथे दिले आहे.

मू. – अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।।

अ. – ' अनन्यभावाने माझे चिंतन करून जे लोक माझी भक्ती करतात अशा माझ्याशी सदा-नित्य एकरूप होऊन गेलेल्या (भक्तांचा) सर्व प्रकारचा भार मी वाहतो. '

व्य. – वास्तविक मूळ अर्थ पाहाता विदेहस्थितीला पोचलेल्या, भक्तीच्या अत्युच्च पदावरील भक्तश्रेष्ठाबद्दल परमेश्वर कशी काळजी घेतो हे येथे सांगितले आहे. परंतु व्यवहारात मात्र 'परमेश्वराचे सतत नामस्मरण करणारा अनन्यभक्त असेल त्याचा उदारनिर्वाह ईश्वर चालवितो,' असा प्राकृत अर्थ केला जातो.

४००. योजकस्तत्र दुर्लभः

सं. – सुर. ३. सामान्यनीति १५८. पृथ्वीवरील कोणतीही वस्तू निरुपयोगी नसते, तिचा योग्य उपयोग करून घेणारा जाणकार योजक पाहिजे, अशा अर्थाची ही उक्ती आहे.

मू. – **अमंत्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम् ।**
अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभः ।।

अ. – 'मंत्र बनू शकत नाही (ज्याचे गूढ शक्तियुक्त वाक्य किंवा शब्द बनू शकत नाही) असे अक्षर नाही. औषधी उपयोग नसेल असे कोणतेही(झाडाचे इ.) मूळ नाही. (तसेच) ज्याचा काहीच उपयोग करून घेता येणार नाही असा (पुरुष) मनुष्य नाही. केवळ (त्याची त्याची योग्य प्रकारे योग्य ठिकाणी) योजना करणाराचीच वाण असते.'

व्य. – योजक माणसाचा गुणगौरव करण्यासाठी अथवा उपयुक्त वस्तू किंवा स्थिती अथवा माणूस केवळ योजक न लाभल्याने वाया जात असताना दिसून आल्यावर वरील उक्तिविशेषाचा उपयोग केला जातो.

४०१. रत्नं समागच्छतु काञ्चनेन

सं. – रघु.६.७९. 'इंदुमती स्वयंवराच्या वेळी इंदुमतीची सखी सुनंदा प्रत्येक राजाचे वर्णन करते. असे करीत शेवटी त्या दोघी अजाजवळ आल्या असतां सुनंदेने त्याचे वर्णन करून 'हा तुझ्या कुळाला साजेसा आहे, यालाच तू वरावेस' अशी आपली अपेक्षा व्यक्त केली.

मू. – **कुलेन कान्त्या वयसा नवेन गुणैश्च तैस्तैर्विनयप्रधानैः ।**
त्वमात्मनस्तुल्यममुं वृणीष्व रत्नं समागच्छतु काञ्चनेन ।।

अ. – 'कुलाने, सौंदर्याने, वयाने, पराक्रम व नम्रता आदी ठळक गुणांनी स्वतःला साजेसा असलेल्या ह्याला तू वरावेस. (खरोखर) रत्नाचा सुवर्णाशी संयोग झाला. (असे तुमच्या या मीलनाने घडून येईल).'

व्य. – 'जोडा कसा अगदी लक्ष्मीनारायणासारखा असावा अशी सामान्यतः अपेक्षा असते. कुलशीलादि सर्व दृष्टींनी अनुरूपता त्यात अभिप्रेत आहे. अशी अनुरूप वधू-वरांची जोडी पाहिल्यावर 'समसमां संयोग जाहला' असे म्हटले जाते,

याचे मूळ ही संस्कृत उक्ती. तथापि 'समसमां संयोग' होण्याच्या किंवा झाल्याच्या इतर कोणत्याही प्रकारच्या संदर्भात हा उक्तिविशेष वापरता येण्यासारखा आहे.

४०२. राजद्वारे श्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः

सं. – पंच. ५.४१. मूळ उक्तीचा आशय न जाणता नुसता शाब्दिक अर्थच लक्षात घेतल्याने चार ब्राह्मण पढतमूर्खांची कशी फजिती झाली हे या कथेत सांगितले आहे. वणिक्पुत्राच्या प्रेतयात्रेबरोबर स्मशानात गेले असता स्मशानाबाहेर एक गाढव उभे असलेले पाहून हा आपलाच बांधव (आप्त) आहे असे समजून एकाने त्याचे पाय धुतले, त्याच्या गळचात गळा घातला व शेवटी त्या गाढवाला एका उंटाच्या गळचात बांधले. गाढवाचा मालक जेव्हा काठी घेऊन आला तेव्हा ते गाढव तेथून पळून गेले.

हित. ४.६२. कौण्डिण्य नामक ब्राह्मणाचा पुत्र सर्पदंशाने मेला.पुत्राच्या मृत्यूने शोकविव्हल झालेल्या त्या ब्राह्मणाचे त्याच्या आप्तेष्टांनी विविध तऱ्हेने सांत्वन केले.

मू. – **उत्सवे व्यसने प्राप्ते दुर्भिक्षे शत्रुसङकटे ।**
राजद्वारे श्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः ।। पंच.५.४१.

अ. – 'मंगलप्रसंगी, आपत्काली, दुष्काळात, परचक्राचे संकट आले असता, मानसन्मानाच्या वेळी किंवा स्मशानात जो (साहाय्यार्थ) उभा राहातो तो बांधव(होय).'

मू. – **उत्सवे व्यसने युद्धे दुर्भिक्षे राष्ट्रविप्लवे* ।**
राजद्वारे श्मशाने च यस्तिष्ठति स बान्धवः ।। हित. ४.६२.

* राष्ट्रविग्रहे : पाठभेद

अ. – 'मंगलकार्यात, संकटकाळी, युद्धात, दुष्काळात, राष्ट्र लयाला जायची वेळ आली असताना (स्वातंत्र्य नष्ट होण्याची वेळ आली असता) जो (साहाय्यार्थ) उभा राहातो तोच खरा बांधव.'

व्य. – 'स्नेहेन बध्नाति इति बान्धवः' अशी बांधवाची व्याख्या केली आहे. सुखदुःखाच्या प्रसंगी सारखीच आत्मीयता दाखविणारा असाच बांधव पाहिजे. खऱ्या मित्राचे, हितकर्त्याचे वर्णन या उक्तिविशेषाने केले जाते.

४०३. राजा कालस्य कारणम्

सं. – महा. ५.१३०.१५. कृष्ण शिष्टाई करून पांडवांकडे परत जाण्यापूर्वी कुंतीला भेटला. 'पांडवांसाठी तुझा निरोप असल्यास सांग,' असे त्याने कुंतीला विचारताच तिने सामर्थ्यवान राजा होण्यासाठी युधिष्ठिराला प्रवृत्त करणारा उपदेश केला.

महा. १२.७०.६. 'जेव्हा राजा दण्डनीतीने राज्यकारभार करतो तेव्हा कृतयुग अस्तित्वात येते,' असे राजधर्मपर्वात भीष्मांनी युधिष्ठिराला सांगितले. राजा जर

न्यायाने शासन करीत असेल तर सत्ययुगाची निश्चितच प्रचीति येईल, असा उपदेश भीष्मांनी केला. कुंतीच्या शब्दांतच भीष्मांनी युधिष्ठिराचा संशय दूर केला.

मू. – कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम् ।
इति ते संशयो मा भूद्राजा कालस्य कारणम् ।।

अ. – 'काळाचे (परिस्थिती घडविण्यास) कारण राजा आहे की राजाचे (उत्तम राजा तयार होण्यास) कारण काळ आहे याबद्दल संशय धरू नकोस. राजाच काळाचे (काळ प्रतिकूल वा अनुकूल करून घेण्यास) कारण (समर्थ) आहे.'

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे.)

व्य. – सत्ताधारी राजा हा युग निर्माण करण्यास समर्थ असतो. सत्ययुगात किंवा कृतयुगात प्रजा सर्वात सुखी, समृद्धीचे जीवन जगणारी व न्यायाला अनुसरून वागणारी असते, अशी भारतीय परंपरेतील एक प्रमुख कल्पना आहे. तसेच कलियुग म्हणजे अन्याय, अंदाधुंदीचे राज्य-राजाही तसाच बेपर्वा. देशातील परिस्थिती, लोकांचे सुख-दुःख हे सर्व राजावर किंवा सत्ताधारी व्यक्तीच्या वर्तनावर अवलंबून असते असे या उक्तिविशेषाने सुचविले जाते.

४०४. राजा प्रकृतिरञ्जनात्

सं. – रघु. ४.१२. राजाला राजत्व मिळवून देणारे प्रजानुरंजन हेच राजाचे आद्य कर्तव्य असते. रघुराजाचे गुणगान करताना प्रथम तो 'राजा' होता ही भावना कालिदासाच्याही मनात असल्याचे दिसून येते.

मू. – यथा प्रल्हादनाच्चन्द्रः प्रतापात्तपनो यथा
तथैव सोऽभूदन्वर्थो राजा प्रकृतिरञ्जनात् ।।

अ. – 'आल्हाद देतो म्हणून चन्द्र सार्थ आहे अथवा तापदायक हाच गुण असलेला तपन हा शब्द जसा यथार्थनामा झाला तद्वत प्रजेला सुखी ठेवणारा (म्हणून रघु) राजा सार्थपणे राजा झाला.'

व्य. – प्रजेला सुखी ठेवणे हे राजाचे आद्य कर्तव्य. त्यासाठीच राजपद त्याला लाभलेले असते. ही भूमिका स्पष्ट करण्यासाठी वरील उक्ती वापरली जाते. याच भावनेने महाभारताच्या शांतिपर्वातही 'जो प्रजेला सुखी ठेवतो त्यालाच राजा म्हणावे' (१२.५९.१२५) असे म्हटले आहे.

४०५. रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव

सं. – वारा. ६.१०७.५२. देव, ऋषी व गंधर्वगण राम-रावणांचे घोर व रोमांचकारी युद्ध पाहात होते. असे 'न–भूतो न भविष्यति पूर्वी कधी पाहिले नाही आणि पुढे कधी होणार नाही'–अशा प्रकारच्या त्या संग्रामाला त्यांना उपमा देता येईना.

मू. – रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ।
एवं ब्रुवन्तो ददृशुस्तद्युद्धं रामरावणम् ।।

अ. – 'खरोखर राम-रावणांचे युद्ध राम-रावणांच्या युद्धासारखेच आहे,' अशा प्रकारे परस्परांशी बोलत, ते (गंधर्व व अप्सरांचे समुदाय) रामरावणांचे अनुपम युद्ध पाहू लागले.'

व्य. – एखाद्या अद्‌भुत वस्तूला किंवा घटनेला उपमा देण्याजोगी दुसरी वस्तू-घटना जगात आढळत नाही; मग तिची तिलाच उपमा देऊन तिचे अनुपमेय स्वरूप सांगितले म्हणजे एक आगळे सौंदर्य त्या उक्तीला प्राप्त होते. 'अनन्वय' या अलंकाराचे उदाहरण म्हणून वरील उक्तिविशेष प्रसिद्ध आहे.

'न भूतो न भविष्यति' अशा स्वरूपाची, अतुलनीय अशी कोणतीही घटना या उक्तिविशेषाने निर्देशिली जाते.

४०६. रामः सत्यपराक्रमः

सं. – वारा. ५.३३.२५. अशोकवनात पोचलेल्या मारुतीला स्वतःची ओळख सांगताना सीतेने रामाचे गुणवर्णन केले.

मू. – दद्यान्न प्रतिगृह्णीयात्सत्यं ब्रूयान्न चानृतम् ।
अपि जीवितहेतोर्हि रामः सत्यपराक्रमः ।।

अ. – 'स्वतः दान देईल पण दुसऱ्याकडून कधीही दान घेणार नाही. तो अमोघ पराक्रमी राम नेहमी सत्य भाषणच करील. स्वतःच्या जीवितरक्षणाकरिताही कधी (तो) खोटे बोलणार नाही.'

व्य. – राम हा नैतिक मूल्यांचा संस्थापक, सदाचार व धर्मतत्त्वांचा निधी व मानवी मर्यादापालनाचा आदर्श म्हणून 'मर्यादापुरुषोत्तम' हे सार्थ विशेषण रामाला लावले जाते. त्याचेच हे एक गुणवैशिष्टय.

४०७. रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति

सं. – लोकोक्ती. फारसा विचार न करता, 'सगळ्यांचेच भले होवो' अशा प्रकारचा निरुपद्रवी आशावाद प्रकट करणारी ही उक्ती आहे.

मू. – रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति ।

अ. – 'रामाचे कल्याण असो; रावणाचेही कल्याण असो.'

व्य. – वादात किंवा लढाईत अथवा परस्परांच्या कोणत्याही संघर्षात नक्की कोण जिंकेल ही खात्री नसते. त्यांतील कोणा एकाची सरशी झाली व दुसऱ्याची हार झाली तर–हार होणाराची बाजू घेतली तर ती आपल्या अंगावर येईल, आपल्याला हानीकारक होईल, हा स्वार्थी हेतू मनात धरून कोणत्याच बाजूचे समर्थन अथवा धिक्कार न करणाऱ्या माणसाच्या वागण्याचे वर्णन या उक्तिविशेषाने केले जाते.

४०८. रामो द्विर्नाभिभाषते

सं. – वारा. २.१८.३०. कैकेयीची दोन वरांची मागणी ऐकून दशरथाला अतिशय दुःख झाले. पित्याला वंदन करण्यासाठी राम गेला असता पित्याची ती दयनीय अवस्था पाहून त्यालाही थोडे आश्चर्य वाटले आणि त्याने मातेला विचारले :

मू. – **तद्ब्रूहि वचनं देवि राज्ञो यदभिकाङ्क्षितम् ।**
करिष्ये प्रतिजाने च रामो द्विर्नाभिभाषते ।।

अ. – 'हे देवी, राजाची जी इच्छा असेल ती सांग. (मी) प्रतिज्ञा करतो आणि वचन देतो (कारण) राम (कधीही) दोनदा बोलत नाही (परस्परविरुद्ध बोलत नाही; आपले बोलणे फिरवीत नाही).'

व्य. – रामाच्या एकवचनी बाण्याचे अथवा रामासारख्या एकवचनी महनीय व्यक्तीचे वर्णन वरील उक्तिविशेष उच्चारून केले जाते.

४०९. रिक्तपाणिर्न पश्येत

सं. – महा. ७. प्रउ. १२२३.२. भारतीय युद्धाचे वेळी घटोत्कच व दुर्योधनाचा जो संवाद झाला त्यात घटोत्कच दुर्योधनाला म्हणाला की, स्वधर्म, अर्थ व काम हे तीनही साधण्याची इच्छा करणाऱ्याने राजा, ब्राह्मण व स्त्री यांना उपहार अर्पण करावा व त्यांचा आदर करावा.

मू. – **स्वधर्ममर्थं कामं च त्रितयं योऽभिवाञ्छति ।**
रिक्तपाणिर्न पश्येत राजानं ब्राह्मणं स्त्रियम् ।। □

□ **देवतां गुरुम्** : पाठभेद

अ. – 'स्वतःचा धर्म, द्रव्य व काम या तिन्हींची जो इच्छा करतो त्याने रिकाम्या हाताने राजा, ब्राह्मण किंवा स्त्रीला पाहू नये (रिकाम्या हाताने त्यांच्याकडे जाऊ नये).'

व्य. – श्रेष्ठ, आदरणीय व जिवलग व्यक्तींविषयीचा आदर व प्रेम व्यक्त करण्याकरिता त्यांना काहीतरी अर्पण करण्याची रीत आहे. द्यायची वस्तू कोणतीही असो मग ते छोटेसे फूल असले तरी चालेल. त्यांच्या प्रसन्नतेमुळे, आशीर्वादामुळे अपेक्षित लाभ होतो असा अनुभव आहे. म्हणून श्रेष्ठ व्यक्तींचे दर्शन रिकाम्या हाताने घेऊ नये अशी सूचना या उक्तिविशेषाद्वारे दिली जाते.

४१०. रुचीनां वैचित्र्यात्

(पाहा : त्वमसि पयसामर्णव इव)

(ल)

४११. लभेत सिकतासु तैलम्

(पाहा : न मूर्खजनचित्तमाराधयेत्)

४१२. लिखितमपि ललाटे प्रोज्झितुं कः समर्थः

सं. – हित. १.२१. लोभाला बळी पडून जमिनीवरील दाणे खाण्यास इतर कबुतरांनी जाऊ नये म्हणून कबुतरांच्या राजाने 'म्हातारा वाघ व सुवर्णकंकणाच्या लोभाने आकर्षिला गेलेला वाटसरू' यांची कथा सांगून दैव किती अटळ आहे ते सांगितले. एका वृद्ध वाघाने 'हे सुवर्णकंकण घे' असे म्हटले तेव्हा लोभाने ते घेण्यास कोणी एक वाटसरू प्रवृत्त झाला. ते घेण्यासाठी स्नान करून पवित्र व्हावे म्हणून तळ्यात गेला असता तो चिखलात रुतला. 'तू चिखलात रुतला आहेस, तुला मी वर काढतो' असे म्हणून वाघाने त्याच्यावर झडप घालून त्याला ठार मारले. वाघ माणसाला खातो हे माहीत असूनही लोभाने तो वाटसरू तळ्यावर आला आणि वाघाकडून ठार झाला. यावरून विधिलिखित चुकत नाही, हे सांगत असताना त्याची ही महती.

मू. – **स हि गगनविहारी कल्मषध्वंसकारी दशशतकरधारी ज्योतिषां मध्यचारी ।**
विधुरपि विधियोगाद्ग्रस्यते राहुणासौ लिखितमपि ललाटे प्रोज्झितुं कः समर्थः ॥

अ. – 'तो हा गगनात फिरणारा, अंधकाराचा नाश करणारा, सहस्र (किरणरूपी) हात असलेला, प्रकाशणाऱ्यांत मध्यभागी असणारा (नक्षत्र-ग्रहगोलादीमध्ये श्रेष्ठ असलेला) चंद्र सुद्धा दैवयोगाने राहूकडून गिळला जातो. (खरोखर) कपाळावर (ब्रह्मदेवाने) लिहिलेले (दैव) बाजूला सारण्यास (पुसून टाकण्यास) कोण समर्थ आहे?'

व्य. – 'देवादिकांनाही विधिलिखित चुकले नाही मग आपल्यासारख्या पामरांची काय कथा?' 'नशिबात असेल ते चुकणार नाही;' 'होणारे न चुके येईल जरी ब्रह्मा तया आडवा' अशी वचने सिद्ध करण्यासाठीच हा उक्तिविशेष दैववाद्यांकडून वापरला जात असतो.

४१३. लोकस्तदनुवर्तते

(पाहा : यद्यदाचरति श्रेष्ठः)

४१४. लोकोत्तराणां चेतांसि

(पाहा : वज्रादपि कठोराणि)

सं. – उरा. २.७. सीतेची मैत्रीण वासंती रामावर रागावली असता आत्रेयी राम अश्वमेध करीत असल्याचे सांगते. तेव्हा 'यज्ञात सहधर्मचारिणी कोण? दुसरे लग्नही केले वाटते?' असे क्रोधानेच ती विचारते. त्या वेळी आत्रेयी तिला सीतेचीच सुवर्ण-प्रतिमा केल्याचे सांगते. ते ऐकून संतुष्ट झालेली वासंती पुढील उद्गार काढते :

मू. – **वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।**
लोकोत्तराणां चेतांसि को विज्ञातुमर्हति ॥

अ. – 'वज्रापेक्षा कठोर आणि फुलाहूनही कोमल अशी लोकविलक्षण (असामान्य) व्यक्तींची अंतःकरणे कोणाला समजून घेता येतील? (अर्थात सर्वसामान्य माणसांना अलौकिक व्यक्तींच्या अंतःकरणाचा ठाव लागणार नाही).'

व्य. – असामान्य व्यक्तीही भयंकर रागावतात आणि त्यांच्या अंतःकरणात कमालीची कोवळीक उत्पन्न होऊन त्या परमकारुणिकही बनतात. पण मोठ्यांचे सारेच मोठे असते. सामान्यांप्रमाणे ते चटकन नि एवढ्यातेवढ्याने रागावत नाहीत की क्षुल्लक गोष्टीवरून त्यांचे अंतःकरण विरघळतही नाही. अशांचे हे वर्णन.

४१५. लोभमूलानि पापानि

सं. – सुर. ३. सामान्यनीति २१४. ज्यांच्या बाबतीत नेहमी सावध राहायला हवे' ज्यांना आवर घालायला हवा अशा माणसाच्या सहा प्रवृत्तींपैकी (काम-क्रोध-लोभ–मोह–मद–मत्सर हे षड्रिपू) लोभ ही वृत्ती अनेक आपत्तींचे मूळ आहे असे सुभाषितकाराने येथे सुचविले आहे.

सप. ल ४.

मू. – **लोभमूलानि पापानि रसमूलानि व्याधयः।**
इष्टमूलानि शोकानि त्रीणि त्यक्त्वा सुखी भव ।। सुर. सानी. २१४.

अ. – 'लोभ हे दुराचरणाचे कारण आहे; अन्नातील विशिष्ट चवीची आवड हे रोगाचे कारण आहे; अमुक गोष्ट हवी आहे या भावनेत शोकाचे मूळ आहे. (म्हणून) या तिन्हींचा त्याग करून सुखी हो.'

मू. – **लोभमूलानि पापानि लाभाल्लोभो विवर्धते।**
त्रिमाषघटितं कार्यं त्रिकोटचापि न पूर्यते ।। सप. ल ४.

अ – 'लोभ हे पापाचे मूळ आहे; मिळकतीमुळे लोभ वाढत जातो. तीन माशांनी, (सुवर्णपरिमाण) पुरे व्हावयाचे काम तीन कोटी झाले तरी पुरे होत नाही.'

व्य. – मन लोभाविष्ट झाले की माणसाला चांगले–वाईट, जवळचा–दूरचा याचा विवेक राहात नाही. आपण करतो ते पुण्य की पाप, त्याचा परिणाम काय होईल याचे भानही त्याला राहात नाही. कधी न शमणारा, सतत वाढत जाणारा व शेवटी पापाच्या गर्तेत लोटणारा लोभीपणा काबूत ठेवावा असा इशारा देण्यासाठी हा उक्तिविशेष उच्चारला जातो.

(व)

४१६. वक्ता दशसहस्रेषु

(पाहा : दाता भवति वा न वा)

४१७. वक्ता श्रोता च दुर्लभः

(पाहा : अप्रियस्य च पथ्यस्य)

४१८. वचनं कर्तुमुद्यतः

सं. – वारा. १.२६.५. यज्ञरक्षणासाठी वनात संचार करीत असताना विश्वामित्रांच्या आज्ञेवरून ताटिका स्त्री असूनही तिचा वध करण्यास राम तयार झाला, त्याची कारणीमांसा.

मू. – **गोब्राह्मणहितार्थाय देशस्य च हिताय च ।**
तव चैवाप्रमेयस्य वचनं कर्तुमुद्यतः ।।

अ. – 'गोब्राह्मणांच्या हिताकरिता व देशाच्या कल्याणाकरिता, अतर्क्य महिमा असलेल्या आपल्या आज्ञेप्रमाणे वागण्यास मी तयार आहे.'

व्य. – एखादी गोष्ट स्वतःला पटत नसली, करणे योग्य, प्रशस्त वाटत नसली तरी थोरांच्या, हितकर्त्यांच्या, जाणकारांच्या सांगण्यावरून ती करण्यास प्रवृत्त होणारा या शब्दांत आपली संमती विनयपूर्वक प्रकट करीत असतो.

४१९. वचने किं दरिद्रता

सं. – सुर. ३. सामान्यनीति ८३.११९. माणसे जोडण्याचा, लोकसंग्रहाचा एक साधा व्यावहारिक उपाय येथे सांगितला आहे.

मू. – **प्रियवाक्यप्रदानेन सर्वे तुष्यन्ति जन्तवः ।**
तस्मात् तदेव वक्तव्यं वचने किं दरिद्रता ।। सुर. ३. सामान्यनीति ८३.

अ. – 'गोड बोलण्याने (जर) सर्वांना बरे वाटते, तर तेच बोलावे. बोलण्यात क्षुद्रता कशाला?'

मू. – **हस्तादपि न दातव्यं गृहादपि न दीयते ।**
परोपकरणार्थाय वचने किं दरिद्रता ।। सुर. ३. सामान्यनीति ११९.

अ. – 'प्रत्येक वेळी हाताने काही दिले पाहिजे असे नाही (किंवा) घरातून काही वस्तूही द्यावी लागत नाही; (मग केवळ) दुसऱ्याचे भले करण्यासाठी गोड शब्दांचे दारिद्र्य कशाला?'

व्य. – गोड बोलण्याने, उदार, मोकळ्या मनाने दुसऱ्याचे कौतुक करण्यामुळे दुसऱ्याचे समाधान होते, आपले काम होते. प्रत्यक्षात त्यासाठी काही कष्ट पडत नाहीत किंवा पदरचे काही खर्चही होत नाही. तरीही माणसे अहंकारामुळे कठोर, तुटक आणि दुसऱ्याचे अंतःकरण दुखावेल असे शब्द बोलत असतात. अशा माणसांना उद्देशून हा उक्तिविशेष वापरला जातो. तसेच 'तोंड भरून, भरघोस आश्वासन द्यायला काय बिघडते, माणसाची पाठ फिरली की त्याचे काम करावे वा न करावे' अशा वृत्तीच्या लोकांच्या (विशेषतः सत्ताधारी, अधिकारी) घोषणांचा आणि आश्वासनांचा उपहास या उक्तिविशेषाने केला जातो.

४२०. वज्रलेपो भविष्यति

सं. – सप. व ६,२३. तीर्थस्थानाचे व गुरुस्थानाचे माहात्म्य या श्लोकातून वर्णिले आहे. आयुष्यात कळत वा नकळत घडलेल्या पापाचे क्षालन मनुष्य पुण्यक्षेत्री जाऊन करतो. पण ज्या पुण्यक्षेत्री जाऊन पुण्य करायचे तेथेही जर मनुष्य पापाचरण करू लागला तर त्या पापाचे क्षालन कशानेही होत नाही.

मू. – **अन्यक्षेत्रे कृतं पापं पुण्यक्षेत्रे विनश्यति ।**
पुण्यक्षेत्रे कृतं पापं वज्रलेपो भविष्यति ।। सप. व ६.

अ. – 'इतर ठिकाणी केलेले पाप तीर्थक्षेत्री नाहीसे होते, (परंतु) तीर्थक्षेत्राला जाऊन केलेले पाप वज्रलेपाप्रमाणे (शाश्वत) कायम राहाते.'

मू. – **ब्रह्मस्थाने कृतं पापं विष्णुस्थानेषु मुच्यते**
विष्णुस्थाने कृतं पापं शिवस्थानेषु मुच्यते ।
शिवस्थाने कृतं पापं गुरुस्थानेषु मुच्यते
गुरुस्थाने कृतं पापं वज्रलेपो भविष्यति ।। सप. व २३.

अ. – 'ब्रह्मलोकी केलेले पाप विष्णुलोकी नष्ट होते. विष्णुलोकी केलेले पाप शिवलोकी नाहीसे होते. शिवलोकी केलेले पाप गुरुगृही नष्ट होते. (मात्र) गुरुगृही केलेले पाप वज्रलेपासारखे (चिरस्थायी) होऊन राहाते.'

व्य. – वज्रलेप म्हणजे चुन्यात कात व गूळ घालून त्याचा लेप तयार करतात. दोन दगड सांधण्याच्या कामी याचा उपयोग होतो. प्रसंगी तो दगड भंगतो पण लेप निघत नाही. यावरून हा वाक्प्रचार रूढ झाला. भंगलेल्या मूर्ती सांधण्यासाठीही वज्र लेप विधिपूर्वक केला जातो. तो केला म्हणजे मूर्ती दीर्घकाल टिकते, अभंग राहाते. यावरून चिरकाल टिकणारे, नाहीसे न होणारे अशा अर्थाने या उक्तिविशेषाचा वापर केला जातो.

४२१. वज्रादपि कठोराणि

(पाहा : लोकोत्तराणां चेतांसि)

४२२. वटस्य पत्रस्य पुटे शयानम् ...

सं. – भाग. १२.९.२०–२५. भगवंताच्या प्राप्तीसाठी एकाग्रतेने अखंड तप करणाऱ्या मार्कंडेय ऋषींना नर-नारायणांचे स्वरूपात दर्शन देऊन भगवंतांनी त्यांना वर मागण्याची आज्ञा केली. ईश्वराच्या मायेचे स्वरूप काय आहे हे पाहाण्याची इच्छा त्यांनी दर्शविली. तेव्हा एकदा, पुष्पभद्रा नदीच्या काठी बसून उपासना करीत असताना, मार्कंडेयांना एकदम प्रचंड वादळ व पाऊस पडतो आहे, असे दिसले. सर्व पृथ्वी जलप्रलयात बुडून गेली. मार्कंडेय ऋषी व्याकुळ होऊन जीव

वाचविण्यासाठी पळू लागले. एका छोटया टेकाडावर असलेल्या वटवृक्षाचा त्यांना आश्रय मिळाला. त्या वडाच्या एका पानावर एक तेजस्वी व सुकुमार बालक निश्चिंतपणे, आनंदाने खेळत आहे असे त्यांना दिसले. ते अद्‌भुत दृश्य पाहून चकित झालेल्या मार्कंडेयांनी या अर्थाच्या श्लोकाने त्या दैवी बालकाचे वर्णन केले. ही कथा पद्मपुराणादी अनेक पुराणांत उपलब्ध आहे. परंतु नेमका हा श्लोक कोठेही आढळत नाही. कथेतील वर्णनावरून एखाद्या उत्तरकालीन कवीने हा श्लोक केला असावा.

मू. – करारविन्देन पदारविन्दं मुखारविन्दे विनिवेशयन्तम् ।
वटस्य पत्रस्य पुटे शयानं बालं मुकुंदं मनसा स्मरामि ।।

अ. – ‘ कमलासारख्या कोमल हाताने कमलचरण मुखरूप कमलामध्ये घालून (चोखणाऱ्या) वडाच्या पानाच्या पृष्ठभागी पहुडलेल्या बालकृष्णाचे मी अंतःकरणपूर्वक स्मरण करतो.’

व्य. – सर्वशक्तिमान् भगवंताने क्षणात सृष्टीचा प्रलय केला आणि स्वतः एका लहान बालकाच्या रूपाने तो मार्कंडेयांसमोर आला. ही त्याची अद्‌भुत माया होय. तिचा कार्यकारणभाव मानवी बुद्धीला कधीही कळू शकणार नाही. मात्र बालकासमान निरागस निर्मल अंतःकरणाच्या प्रेमळ भक्ताला त्याचे मंगलमय दर्शन होऊ शकते. बाल श्रीकृष्णाच्या मनोहर वर्णनाचा हा श्लोक धार्मिक माणसांच्या नित्यपाठात असतो.

४२३. वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम्

सं. – भाग. ११.५.३३,३४. जनक राजाने चालविलेल्या यज्ञसत्रात महाज्ञानी, ब्रह्मवेत्ते असे नऊ ऋषभपुत्र अचानक उपस्थित झाले. त्या नऊ जणांना राजाने नऊ प्रश्न विचारले. त्यांपैकी करभाजनांना विचारलेल्या ‘ चारी युगात परमेश्वराचे स्वरूप कसे असते व त्याची आराधना कशी करावी ’ या प्रश्नाचे उत्तर देताना, कलियुगात परमेश्वराचे स्तवन कोणत्या शब्दांत करावे हे त्यांनी खालील श्लोकात सांगितले.

मू. – ध्येयं सदा परिभवघ्नमभीष्टदोहं तीर्थास्पदं शिवविरिञ्चिनुतं शरण्यम् ।
भृत्यार्तिहं प्रणतपाल भवाब्धिपोतं वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम् ।।

भाग. ११.५.३३.

अ. – ‘ हे परमेश्वरा, तुझ्या चरणकमली मी नमस्कार करतो. (ते तुझे चरणकमल) अखंड निदिध्यासन करण्यास योग्य आहेत; सर्व प्रकारच्या संकटांचा निरास करून इष्ट मनोरथ पूर्ण करणारे आहेत. ते पवित्र तीर्थांचे आश्रयस्थान आहेत. शंकर, ब्रह्मा आदी देव त्याचे स्तवन करतात. आश्रय करण्यास ते अगदी

योग्य स्थान आहे. (भक्तांची) दासांची संकटे हरण करणारी, भवसागरातून सुखरूप पार करणारी ती नौका आहे.'

मू. – त्यक्त्वा सुदुस्त्यजसुरेप्सितराज्यलक्ष्मीं धर्मिष्ठ आर्यवचसा यदगादरण्यम् ।
मायामृगं दयितयेप्सितमन्वधावद् वन्दे महापुरुष ते चरणारविन्दम् ॥

भाग. ११.५.३४.

अ. – ' पित्याच्या आज्ञेवरून देवही ज्याची अभिलाषा धरतात असे राजवैभव सोडून (तू) अरण्यात गमन केलेस; प्रिय पत्नीने हौसेने मागितलेल्या मायावी कांचनमृगाचा पाठलाग केलास; अशा हे धर्मपालक पुरुषोत्तमा, तुझे चरणकमल मी शिरावर धारण करतो.'

व्य. – भक्ताला भगवंताचे चरण पूज्य आणि प्रिय असतात. हृदयात इष्टदेवतेच्या चरणांचे, पादुकांचे ध्यान करावे, ते शीघ्र फलदायी होते असे मानले जाते. सर्व दुःखातून तारणाऱ्या, अंधारातून प्रकाशात नेणाऱ्या सर्वसमर्थ परमेश्वराची स्तुती या भव्य शब्दांत केली जाते. भगवन्तासमान असलेल्या थोर पुरुषालाही या उक्तीने अभिवादन करतात.

४२४. वन्दे मातरम्

सं. – आनंदमठ १.९. ' एकोणिसाव्या शतकातील हिंदुस्थानातील सर्वांत मोठा साहित्यिक प्रज्ञावंत,' ' भारतीय राष्ट्रवादाचा प्रभावशाली प्रेषित ' या शब्दांत महायोगी अरविंद यांनी गौरविलेल्या बंगाली लेखक बंकिमचंद्र चतर्जी यांच्या १८८२ साली प्रसिद्ध झालेल्या ' आनंदमठ ' या कादंबरीतील गीताचे हे ध्रुवपद आहे. ' आनंदभूमी ' या संतानांच्या आदर्श राज्यातील भवानंद या प्रमुख व्यक्तीच्या मुखातून या पंक्ती उच्चारल्या गेल्या आहेत. (परिशिष्ट पाहा)

मू. – वन्दे मातरम् । सुजलां सुफलां मलयज शीतलां ।
सस्य-शामलां, मातरम् ॥
शुभ्र-ज्योत्स्ना-पुलकित-यामिनीम्
फुल्ल - कुसुमित - द्रुमदल - शोभिनीम् ।
सुहासिनीं सुमधुर - भाषिणीम्
सुखदां वरदां मातरम् ॥ वन्दे मातरम् ॥

अ. – ' माते, मी तुला वंदन करतो. जलाने परिपूर्ण अन् धनधान्याने समृद्ध; मलय पर्वतावरील चंदनाने सुगंधी बनलेल्या वायुलहरींमुळे शीतल होणाऱ्या नि विपुल पिकांमुळे श्यामलवर्ण दिसणाऱ्या हे माते ! (तुला वंदन असो.) शुभ्र चांदण्यामुळे तुझ्या रात्री आल्हादकारक असतात; तर फुलांच्या बहरांनी नटलेल्या वृक्षराजींनी तू शोभतेस; हसतमुख, नेहमी मधुर बोलणारी, सुख देणारी, वरदायिनी अशा हे माते, मी तुला वंदन करतो.'

व्य. – ' एका दिवसात अवघ्या देशवासियांना राष्ट्रधर्माची दीक्षा देणारा ' हा महामंत्र, बंगालची फाळणी रद्द करविण्यासाठी झालेल्या चळवळीच्या वेळी सगळ्या देशाला परिचित झाला व त्याच्यामुळे ठिणगीने आग पेटून ती सगळीकडे भडकावी तशा स्वातंत्र्यप्रेम, राष्ट्रीय पुनरुत्थान, पारतंत्र्याबद्दलची चीड या सगळ्या भावना भारतीय जनतेच्या अंत:करणात पेटून उठल्या. कोवळ्या वयाच्या क्रांतिकारकांनी या मंत्राच्या घोषात, निर्भयपणे मृत्यूला कवटाळले. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारताचे राष्ट्रगीत म्हणून ते सर्वतोमुखी होते. देश म्हणजे ती भूमी, तिच्यावरचा निसर्ग, तिच्या मातीत जन्माला आलेली माणसे, त्यांची गुणवैशिष्टचे, सामर्थ्य–ही सर्व होत. त्या सर्वांबद्दल उत्कट प्रेम जागृत करणारे हे उदात्त व भावमधुर गीत व त्याचे ध्रुवपद ' वन्दे मातरम् ' अमर बनले आहे. ' वन्दे मातरम् ' याचा शब्दश: अर्थ ' आईला नमस्कार. ' भारतीय संस्कृतीत मातृमहिमा अगाध आहे, अपरंपार आहे. जन्मदाया मातेपासून जगज्जननीपर्यंत भारतीय संस्कृतीने मातेला परमादराने वंदन-नमन केले आहे. ' या देवी सर्वभूतेषु मातृरूपेण संस्थिता । नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः ।' (तंत्रोक्त देवीसूक्त : २५) इतकी सर्वव्यापक भूमिका या 'वन्दे मातरम्' (मूळ संस्कृत) उक्तीमधून प्रकट होत असते.

४२५. वयं पञ्चाधिकं शतम्

सं. – महा. ३.२३२ प्रउ. १११९. घोषयात्रापर्वात पांडव वनवासात असताना दुर्योधन द्वैतवनातील सरोवरात विहार करण्यासाठी आला. तेव्हा तेथे रक्षणार्थ असलेल्या गंधर्वांनी कौरवांना सरोवराजवळ येण्याची मनाई केली. त्यांचे न ऐकताच सरोवराकडे जाणाऱ्या दुर्योधनादिकांना गंधर्वांनी पकडले. हे वृत्त धर्मराजाला कळताच त्याने भीमार्जुनांना दुर्योधनाची गंधर्वांच्या हातून सुटका करविण्याची आज्ञा केली. त्या प्रसंगी तो आपल्या भावांना म्हणाला :

मू. – **परैः परिभवे प्राप्ते वयं पञ्चोत्तरं शतम् ।**
परस्परविरोधे तु वयं पञ्च शतं तु ते ॥

अ. – ' (बाबांनो !) आपसात झगडताना ते (कौरव) शंभर आणि आपण (पांडव) पाच (एकमेकांचे विरुद्ध) आहोत (हे खरे) ; पण दुसऱ्याकडून अवहेलना होण्याचा प्रसंग आला असता (मात्र) आपण पाच अधिक ते शंभर असे (एकत्र) एकशेपाच आहोत (हे विसरू नका).'

व्य. – राष्ट्रीय व सामाजिक ऐक्याचा संदेश देणारी ही पुरातन उक्ती आहे. हिंदुस्थानाचा इतिहास आपसातील कलह आणि त्यामुळे परकीयांचा लाभ व वरचष्मा यांनी भरलेला दिसेल. ही आपसातील वैरभावना राष्ट्राला नि समाजाला भयंकर

हानिकारक ठरलेली आहे. त्या पार्श्वभूमीवर पूर्वी नि आजही ही उक्तिविशेष राष्ट्रीय व सामाजिक ऐक्याचा संदेश सतत देत राहिलेला आहे.

४२६. वसुधैव कुटुम्बकम्

(पाहा: उदारचरितानां तु; गणना लघुचेतसाम्)

४२७. वाग्भूषणं भूषणम्

सं. – नीश. १५. विद्वानांचे भूषण अशी जी वाणी तिचे माहात्म्य येथे सांगितले आहे. बाह्य आभूषणे ही टिकावू नाहीत. काही कालानंतर ती झिजतात, नष्ट होतात. पण विद्वानांचा हा वाणीरूपी अलंकार कायम टिकणारा आहे.

मू. – **केयूराणि न भूषयन्ति पुरुषं हारा न चन्द्रोज्ज्वला**
न स्नानं न विलेपनं न कुसुमं नालंकृता मूर्धजाः ।
वाण्येका समलंकरोति पुरुषं या संस्कृता धार्यते
क्षीयन्तेऽखिल* भूषणानि सततं वाग्भूषणं भूषणम् ।।

* खलु : पाठभेद

अ. – 'बाहुभूषणे माणसाला भूषवीत नाहीत, चंद्राप्रमाणे तेजस्वी असा मोत्याचा हार सुशोभित करीत नाही; स्नान, उटणे, निरनिराळी फुले (किंवा) सुशोभित केलेले केस हे माणसाला भूषवीत नाहीत. सुसंस्कारित अशी जी वाणी (तीच केवळ) माणसाला अलंकृत करते. इतर सर्व भूषणे नाश पावतात; केवळ वाणी हाच कायम टिकणारा अलंकार आहे.'

व्य. – विचार करणे व त्याला अनुसरून बोलणे ही परमेश्वराने माणसाला दिलेली विशेष देणगी आहे. वाणीमुळेच सर्व व्यवहार शक्य होतात. शास्त्रश्रवणाचा-मननाचा संस्कार झालेली, मधुर व शहाणपणाचे बोल बोलणारी वाणी ऐकणाऱ्याच्या मनाला आल्हाद देते व बोलणाऱ्यालाही शोभा आणते, अलंकृत करते. कोणत्याही बाह्य अलंकारापेक्षा शुभ वाणीचे महत्त्व सांगणारा हा उक्तिविशेष आहे.

४२८. वाचमर्थोऽनुधावति

सं. – उरा. १.१०. ऋष्यशृंग ऋषींकडे यज्ञासाठी गेलेल्या वसिष्ठांनी सीतेला आशीर्वादात्मक निरोप पाठविला. 'वीरप्रसवा हो' हा वसिष्ठांचा सीतेला लाभलेला आशीर्वाद सत्यच ठरेल अशी रामाची श्रद्धा होती; तीच त्याने बोलून दाखविली.

मू. – **लौकिकानां हि साधूनामर्थं वागनुवर्तते ।**
ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति ।।

अ. – ' सर्वसामान्य साधु-सत्पुरुष असतात त्यांना जो आशय प्रकट करावयाचा असतो त्याप्रमाणे ते आपल्या वाणीचा उच्चार करतात. परंतु वैदिक ऋषींच्या बाबतीत मात्र त्यांना अभिप्रेत असलेला आशय किंवा अर्थ हा त्यांनी उच्चारलेल्या वाणीमागोमाग धावत असतो.'

व्य. – एखाद्या माणसाच्या वाणीत इतके सामर्थ्य आलेले असते की, तो बोलेल त्याप्रमाणे प्रत्यक्षात घडून येते. अशा अलौकिक सामर्थ्यशाली व्यक्तीच्या बाबतीत वरील उक्तिविशेषाचा वापर केला जातो.

४२९. वादे वादे जायते तत्त्वबोधः

सं. – सप. व २६. वादविवाद किंवा चर्चा हे ज्ञानप्राप्तीचे एक प्रमुख साधन आहे. अस्पष्ट संकल्पनांना निश्चित स्वरूप प्राप्त होऊन निर्णायक विचार मांडले जातात. या वादविवाद पद्धतीचा अवलंब करूनच शंकराचार्यांनी वैदिक धर्माची पुनःप्रस्थापना केली.

मू. – तीर्थे तीर्थे निर्मलं ब्रह्मवृन्दं वृन्दे वृन्दे तत्त्वचिन्तानुवादः ।
वादे वादे जायते तत्त्वबोधो बोधे बोधे भासते चन्द्रचूडः ॥

अ. – ' तीर्थक्षेत्रा-क्षेत्रात पवित्र ब्राह्मणांचे समुदाय; त्या समुदाया-समुदायामध्ये वेदान्ताची चर्चा, त्या चर्चे-चर्चेमधून अन्तिम तत्त्वाबद्दलचे ज्ञान प्रकट होते; व त्या तत्त्वज्ञानामधून भगवान् शिवाचे दर्शन होते.'

व्य. – वादात पूर्वपक्ष–उत्तरपक्ष अशा दोन बाजून मांडून, दृष्टान्त देऊन सिद्धान्त निश्चित व्हावा अशी अपेक्षा असते. वादाचे हे सरळ स्वरूप आहे; परंतु अनेक वेळा वादाचा वितंडवाद होऊन त्याला भांडणाचे स्वरूप येते व दुसऱ्याने आपले म्हणणे मान्य करावे यासाठी जबरदस्ती केली जाते. ' वादे वादे जायते शीर्षभंगः ' असे म्हणण्याची वेळ तेव्हा येते. खऱ्या तत्त्वजिज्ञासूंनी पूर्वग्रहरहितबुद्धीने केलेल्या तत्त्वचर्चेची परिणती या उक्तिविशेषाने दाखविली जाते.

४३०. वासः प्रधानं खलु योग्यतायाः

सं. – सुर. ३. सामान्यनीति ८८८. माणसाची योग्यता ठरविताना वरवरच्या गोष्टींना लोकव्यवहारात किती महत्त्व दिले जाते हे सुभाषितकाराने येथे एका पौराणिक घटनेचा उपयोग करून सांगितले आहे.

मू. – किं वाससा तत्र विचारणीयं वासः प्रधानं खलु योग्यतायाः ।
पीतांबरं वीक्ष्य ददौ स्वकन्यां दिगम्बरं वीक्ष्य विषं समुद्रः ॥

अ. – ' वस्त्राने काय घडून येते हे विचार करण्यासारखे आहे. खरोखर अंगीच्या योग्यतेपेक्षाही वस्त्र महत्त्वाचे आहे. पीतांबरधारी विष्णूला पाहून समुद्राने त्याला

आपली कन्या (लक्ष्मी) दिली आणि अंगावर वस्त्रही नसलेल्या शंकराला पाहून त्याला विष दिले. '

व्य. – उंची कपडे घातलेल्या माणसाला मानसन्मान मिळतो. त्याची श्रीमंती, अभिरुची यांचे प्रदर्शन कपडयांवरून होत असते. योग्यतेहूनही अधिक मान त्यांना केवळ त्या कपडयाच्या श्रीमंतीमुळे मिळतो. वास्तविक थंडीवाऱ्यापासून रक्षण, लज्जारक्षण करणे हे कपडयाचे काम. पण माणसाने आपल्या बुद्धीने त्याचे अनंत प्रकार शोधून काढले व शरिराची शोभा वाढविण्यासाठी, आपल्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्टच दाखविण्यासाठी त्यांचा उपयोग केला. या उक्तिविशेषाने लोकव्यवहारात कपडयाचे महत्त्व केवढे आहे हे सांगितले आहे.

४३१. विद्या विनयसंपन्ने....

(पाहा : पण्डिताः समदर्शिनः ; शुनि चैव श्वपाके च)

४३२. विपरीतो वधक्रमः

सं. – पंच. १.३२९. मदोत्कट नावाच्या सिंहाच्या मित्रपरिवारात व्यापाऱ्यांच्या तांडयातून सुटलेला क्रथनक नावाचा उंट सामील झाला. गोड गोड बोलून, सिंहाचा हस्तक असलेल्या कोल्हयाने त्याला स्वामिभक्तीच्या नावाखाली स्वतः होऊन प्राणार्पण करावयास लावले व नंतर सर्वांनी मिळून त्याच्या मांसावर ताव मारला.

मू. – **अहो खलभुजंगस्य विपरीतो[१] वधक्रमः ।**
कर्णं लगति चैकस्य प्राणैरन्यो वियुज्यते ।।

असंगति

[१] **विचित्रोऽयं** : पाठभेद

अ. – ' खरोखर हे आश्चर्यच आहे ! दुर्जनरूप सापाची मारण्याची रीत उलटी दिसते; तो एकाच्या कानाशी लागतो, तर दुसराच प्राणाला मुकतो ! '

व्य. – दुर्जन हा सर्पाहूनही भयंकर आहे. सर्प ज्याला चावतो त्याचा प्राण जातो; परंतु दुष्ट मनुष्य आपल्या बोलण्याने एकाचे कान भरून त्याचे चित्त कलुषित करून देऊन परस्पर दुसऱ्या माणसाचा काटा काढतो. दुष्ट माणसाच्या अशा प्रकारच्या कृत्याला एखादा निरुपद्रवी, साधा मनुष्य बळी पडलेला दिसला म्हणजे चित्त विषण्ण होते व हा उक्तिविशेष सहजच स्मरणात येतो.

४३३. वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे

सं. – उरा. २.४. गुरु ज्ञान सर्वांनाच सारखे देतात. कुशाग्र बुद्धीचे विद्यार्थी गुरूने सांगितलेले लगेच आत्मसात करतात पण तेच ज्ञान मंद बुद्धीचे लगेच आत्मसात करू शकत नाहीत. कुश-लवांच्या कुशाग्र बुद्धीपुढे आपला टिकाव लागत नाही हे

पाहून अगस्ती ऋषींकडे वेदान्तविद्या शिकावयास आलेल्या आत्रेयीने हे उद्गार काढले आहेत.

मू. – वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे
न खलु तयोर्ज्ञाने शक्तिं करोत्यपहन्ति वा ।
भवति च पुनर्भूयान्भेदः फलं प्रति तद्यथा
प्रभवति शुचिर्बिम्बोद्ग्राहे मणिर्न मृदां चयः ।।

अ. – 'विद्यार्थी कुशाग्र बुद्धीचा असो किंवा मंद बुद्धीचा असो; गुरुजी दोघांनाही सारखेच शिकवितात. (ते) एकाची ज्ञानशक्ती (ज्ञान-ग्रहणक्षमता) वाढवितात व दुसऱ्याची कमी करतात असेही नाही. पण (शिकविलेल्या विद्येचे) फल मात्र भिन्न भिन्न आढळते. ज्याप्रमाणे निर्मळ प्रतिबिंब धारण करायला स्फटिक समर्थ असतो; मातीचे ढेकूळ (बिम्ब धारण करू शकत) नाही.'

व्य. – एकाच गुरूकडून विद्याग्रहण करणारे विद्यार्थी सारख्याच तयारीचे, विद्वान किंवा प्रवीण आढ़ळत नाहीत. त्यांच्या ज्ञानात कमी-अधिकपणा आढळतो. एकाच आचार्यांनी शिकविलेल्या अनेक विद्यार्थ्यांतील एखादाच ज्ञानी होतो, तर एखादा अडाणीच राहातो. हा ज्याच्या त्याच्या ग्रहणशक्तीचा आणि धारणाशक्तीचा प्रश्न आहे.

४३४. विद्वान् सर्वत्र पूज्यते

(पाहा : स्वदेशे पूज्यते राजा)

सं. – पंच. २.५८. लघुपतनक कावळा व हिरण्यक उंदीर यांची दाट मैत्री होती. नीती व धर्मशास्त्र यासंबंधी चर्चा करण्यात त्यांचा काळ आनंदात जात असे. दुष्काळ पडल्याने लघुपतनकाने तो प्रदेश सोडून जाण्याचे ठरविले. परक्या प्रदेशातही लघुपतनकाला योग्य असे मित्र प्राप्त होतील, त्याचा आदर होईल असे हिरण्यकाने बोलून दाखविले.

मू. – विद्वत्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन ।
स्वदेशे पूज्यते राजा विद्वान्सर्वत्र पूज्यते ।।

अ. – 'विद्वत्ता आणि राजसत्ता यांची कधीच तुलना करता येणार नाही. राजाला (केवळ) त्याच्या राज्यात मान मिळतो, तर सर्व जगातले लोक विद्वानाचा आदर करतात.'

व्य. – सत्ताधीशाला मान त्याच्या हाती असलेल्या सत्तेमुळे, तो ज्या आसनावर बसलेला असतो त्या आसनामुळे प्राप्त होत असतो. त्यावरून तो खाली उतरला की त्याला कोणी ओळखीत नाही. त्यातूनही सत्ताधारी राजाचा प्रभाव त्याच्या राज्यसीमेपुरताच मर्यादित. त्याबाहेर त्याला कोणी विचारीत नाही.

विद्वत्तेचा प्रभाव मात्र तो कोठेही गेला तरी दिसून येतो. सर्वांच्या आदराला तो सर्वत्र पात्र ठरतो. विद्वान व्यक्तीचे हे वैशिष्टच या उक्तिविशेषाने सांगितले जाते.

४३५. विद्वांसमपि कर्षति

सं. – भाग. ९.१९.१७. पुत्राचे तारुण्य अनेक वर्षे भोगल्यानंतर ययाती राजाला वैराग्य प्राप्त झाले. तृष्णा, उपभोगाची इच्छा किती दुर्दम्य आहे, तिच्यापासून सावध राहाणे किती आवश्यक आहे, हे त्याने येथे सांगितले आहे.

मनु. २.२१५. स्त्रीस्वभावाचे वर्णन करताना पुरुषाला विकारवश बनविण्यास स्त्रियाच कारणीभूत होतात; मग तो पुरुष विद्वान संयमी असो अथवा अज्ञ असो. सुखोपभोगाची इच्छा त्याला आवरता येत नाही. म्हणूनच मनूने सावधानतेचा इशारा येथे दिला आहे.

मू. – **मात्रा स्वस्रा दुहित्रा वा ना विविक्तासनो भवेत् ।**
बलवान् इन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ।।

अ. – ‘आई, बहीण किंवा मुलगी यांच्याबरोबरही एका आसनावर बसू नये. ओढाळ इंद्रियांचा समुदाय शहाण्या माणसाला देखील चळवितो.’

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे).

व्य. – मनुष्य शहाणा असला तरी त्याच्या बुद्धीला भूल पाडून इंद्रिये त्याला केव्हा विषयाकडे ओढून नेतील हे सांगता येत नाही. इन्द्रियांच्या आश्रयाने राहणाऱ्या कामक्रोधादिकांच्या बळापुढे दीर्घ तपस्या, कष्टाने मिळविलेली विद्या याचे बळ कमी पडते याची व्यवहारात अनेक उदाहरणे दिसतात. विश्वामित्राची या संदर्भातील कथा सुप्रसिद्ध आहे.

४३६. विनाशकाले विपरीतबुद्धिः

सं. – सुर. २. दैवाख्यान ५४. व्यवहारातील काही सर्वसाधारण नियमांपैकी एक येथे सांगितला आहे.

मू. – **न भूतपूर्वो न च केन दृष्टो हेम्नः कुरंगो न कदापि वार्ता ।**
तथापि तृष्णा रघुनन्दनस्य विनाशकाले विपरीतबुद्धिः ।।

अ. – ‘सोन्याचे हरीण पूर्वी कधी झाले नाही, कोणी पाहिले नाही किंवा त्याबद्दल कोणी ऐकलेही नाही. तरी सुद्धा (त्याविषयीचा) रामाचा लोभ, म्हणजे नाश व्हायची वेळ आली असता (संकटे यायची वेळ आली असता) माणसाला त्याप्रमाणेच वागण्याची बुद्धी होते, हे खरे ! ’

व्य. – वास्तविक राम हा विवेकी पुरुष; तरी सुद्धा तो कांचनमृगाच्या लोभात पडला. हा दृष्टान्त देऊन व्यवहारात एखादा माणूस सारासारविवेकाने विशिष्ट

परिस्थितीत ज्याप्रमाणे वागायला हवे तसे वागत नाही म्हणजे–विशेषत: त्या त्याच्या वागण्यामुळे त्याच्यावर आपत्ती ओढवली असता, या उक्तिविशेषाचा वापर केला जातो.

४३७. विनाश्रयं न शोभन्ते

सं. – सप. व ३७.

सुर. ३. सामान्यनीति ३२१. काही व्यक्तींचे व वस्तूंचे सौंदर्य, बल योग्य आधार मिळाल्यानेच खुलून दिसते. नाहीतर त्या निस्तेज व असून नसल्यासारख्या होतात. अशांची गणना येथे सुभाषितकाराने केली आहे.

मू. – **अनर्घमपि माणिक्यं हेमाश्रयमपेक्षते ।**

विनाश्रयं* न शोभन्ते पण्डिता वनिता लताः ।। सप. व ३७.

* सुर. मधील श्लोकात 'विनाश्रयं' ऐवजी 'अनाश्रयाः' येवढ्याच शब्दाचा फरक आहे. उरलेला श्लोक सारखा आहे.

अ. – 'बहुमूल्य रत्नालाही सोन्याच्या कोंदणाची आवश्यकता असते. विद्वान लोक, स्त्रिया आणि वेली आश्रयावाचून शोभत नाहीत.'

व्य. – विद्या, कला, सौंदर्य यांचे मोल जाणणारे सहृदय रसिक असतील तरच त्या गुणांचे चीज होते. नाहीतर उत्तम रत्न, विद्वान मनुष्य किंवा गुणी स्त्री यांची दीन अवस्था होते. त्यांचा प्रभाव पडू शकत नाही. आश्रयाची अपेक्षा असूनही आश्रय-हीन झालेल्या व्यक्तीकडे पाहून या उक्तिविशेषाचा उच्चार केला जातो.

४३८. विपदः सन्तु नः शश्वत्

सं. – भाग. १.८.२५. पांडवांसाठी अश्वत्थात्म्याच्या ब्रह्मास्त्राचे निवारण केल्यावर द्वारकेला प्रयाण करण्यास सिद्ध झालेल्या श्रीकृष्णाजवळ कुंतीने हे जगा-वेगळे वरदान मागितले.

मू. – **विपदः सन्तु नः शश्वत्तत्र तत्र जगद्गुरो ।**

भवतो दर्शनं यत्स्यादपुनर्भवदर्शनम् ।।

अ. – '(हे श्रीकृष्णा!) आमच्यावर सतत आपत्तीच येवोत; (कारण त्यामुळे आपत्तीनिवारणार्थ आम्ही तुझ्याकडे येऊ आणि त्या निमित्ताने) तुझे त्या त्या वेळी दर्शन आम्हाला घडेल. (अशा रीतीने सतत तुझे स्मरण राहिल्याकारणाने, तुझे दर्शन घडल्याने) या संसारचक्राचे पुन्हा तोंड पाहाण्याची पाळी आमच्यावर येणार नाही. (आम्ही मुक्त होऊन जाऊ.)'

व्य. – सुखात मनुष्य परमेश्वराला विसरतो. दुःख भोगण्याची वेळ आली म्हणजे मात्र त्याला देवाची आठवण होते; हा मनुष्याचा स्वभाव आहे. भगवंताचा विसर पडू

नये, अशी तळमळ ज्याला असते त्याला दुःखाची भीती वाटत नाही; किंबहुना तो स्वतःवर दारिद्र्यासारखे दुःख ओढवून घेतो. तुकाराममहाराजांचे जीवन या उक्तिविशेषाचे साक्षात उदाहरण आहे.

४३९. विभवो नैव शाश्वतः

(पाहा : कर्तव्यो धर्मसंग्रहः)

४४०. वीराः सम्भावितात्मानो

(पाहा : न दैवं पर्युपासते)

४४१. वृद्धा नारी पतिव्रता

सं. – सुर. ३. सामान्यनीति १६८. ईश्वरभक्ती, तप, पातिव्रत्य इ. विशेष गुण आहेत. पण परिस्थितीमुळे, नाइलाज होऊन त्यांचे आचरण करणे भाग पडल्यास त्यास कसले कौतुक? अशा व्यक्तींचा उपहास खालील उक्तिविशेषात सुचविला आहे.

मू. – **आर्ता देवान्नमस्यन्ति तपः कुर्वन्ति रोगिणः ।**
निर्धना दानमिच्छन्ति वृद्धा नारी पतिव्रता ॥

अ. – ' दुःखी माणसे देवापुढे नमतात; रोगाने त्रस्त झालेले तप करतात; पैसा नसलेले दानाची इच्छा करतात; तर म्हातारी स्त्री पतिव्रता (म्हणून मिरवते).'

व्य. – ' विकारहेतौ सति विक्रियन्ते येषां न चेतांसि त एव धीराः । ' मनाला आकर्षित करणाऱ्या वस्तू समोर असूनही (व त्यांचा उपभोग घेण्याची स्वतःची पात्रता असूनही) ज्यांचे मन चळत नाही, जे विकारवश होत नाहीत, ते खरे धैर्यशाली पुरुष होत...नाहीतर दुर्बळांची अहिंसा, दरिद्री माणसाची नम्रता आणि म्हाताऱ्या बाईचे पातिव्रत्य ही सर्व उपहासाला, विडंबनाला पात्र होतात. त्यांचा आदर होणे दूरच. समाजात अशी व्यक्ती मोठेपणा मिरवू लागली म्हणजे या उक्तिविशेषाने तिची संभावना केली जाते.

४४२. वेदोऽखिलो धर्ममूलम्

सं. – मनु. २.६. धर्माच्या तत्त्वांचा मूळ आधार म्हणून मनूने वेदांना सर्वाधिक महत्त्व दिले आहे.

मू. – **वेदोऽखिलो धर्ममूलं स्मृतिशीले च तद्विदाम् ।**
आचारश्चैव साधूनामात्मनस्तुष्टिरेव च ॥

अ. – ' (चारही) सर्व वेद धर्माचे मूळ प्रमाण होत; तसेच (वेदांपासून निर्माण झालेले स्मृतिग्रंथ, वेदाध्ययन करणाऱ्या ब्राह्मणांचे सदाचरण, (त्यागी, समबुद्धी झालेल्या)

साधूंचे वागणे आणि स्वतःच्या अंतःकरणाचे समाधान, या गोष्टी धर्माला प्रमाणभूत आहेत.'

व्य. – धर्माची मूलतत्वे, आपले सर्वांत प्राचीन ग्रंथ जे वेद, त्यांमधून घेतली आहेत; व त्यावरून आचाराचे विधी (अमुक करावे) व निषेध (अमुक करू नये) अशा प्रकारचे नियम सांगितले आहेत. यज्ञाचे कर्मकांड, पुढे पूर्णता पावलेले उपनिषदातील तत्त्वज्ञान यांचे मूळ वेदांत आहे; तसेच शिक्षा, कल्प, व्याकरण ज्योतिष, छंद, निरुक्त ही विविध शास्त्रे वेदांचेच अंग म्हणून प्रसिद्ध आहेत. मंत्र, तंत्र, आयुर्वेद, शिल्प, पशुवैद्यक यासारख्या जीवनाशी निगडित असलेल्या विविध विद्यांना वेदांचाच आधार आहे. वेद हा लौकिक आणि अलौकिक दोन्ही प्रकारच्या ज्ञानांचा निधी आहे. वेदांचे हे महत्त्व ध्यानात घेऊन वरील उक्तिविशेषाचा उच्चार केला जातो. वैदिक संस्कृती व वेद यांचे संशोधन, प्रसार करणाऱ्या संस्थांनी आपले ध्येयवाक्य म्हणून या उक्तिविशेषाचा स्वीकार केलेला आढळतो.

४४३. वैद्यराज नमस्तुभ्यं यमराजसहोदर

सं. – सुर. १. कुवैद्यनिंदा १,२. माणूस रोगमुक्त होऊन मरणाच्या तडाख्यातून आपण वाचावे म्हणून वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या डॉक्टर-वैद्याकडे जातो. पण अर्धवट ज्ञान असलेले निष्काळजी वैद्यक व्यवसायी किंवा ज्ञान असून त्याचा प्रामाणिकपणे उपयोग न करणारे धंदेवाईक यांच्यावर ही टीका आहे. परंतु अखेर प्राणरक्षण ही वैद्य-डॉक्टरांच्या हातचीही गोष्ट नाही, हेही येथे सुचविले आहे.

मू. – **वैद्यराज नमस्तुभ्यं यमराजसहोदर ।**

यमस्तु हरति प्राणान्वैद्यः प्राणान्धनानि च ।। सुर. १. कुवैद्यनिंदा १.

अ. – 'यमराजाचा सख्खा भाऊ असणाऱ्या हे वैद्यराजा, तुला नमस्कार असो! यम (केवळ) प्राणच घेतो. (पण) वैद्य (मात्र) प्राण आणि पैसा (दोन्ही) घेऊन जातो.'

मु. – **वैद्यराज नमस्तुभ्यं क्षपिताशेषमानव ।**

त्वयि विन्यस्तभारोऽयं कृतान्तः सुखमेधते ।। सुर. १. कुवैद्यनिंदा २.

अ. – 'सर्व माणसांना (मृत्यूप्रत) पाठविणाऱ्या हे वैद्यराजा तुला नमस्कार असो. तुझ्यावर (सर्व) भार टाकून हा यम सुख भोगतो आहे.'

व्य. – वैद्यकीय व्यवसायाचा उपहास करण्यासाठी हा उक्तिविशेष वापरला जातो.

४४४. व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्

सं. – महाभारताचे माहात्म्य सांगणाऱ्या, 'महाभारत-प्रशंसा' या, त्याच ग्रंथातील आदिपर्वातील ५६ व्या अध्यायात, व्यासांच्या विशाल बुद्धीची स्तुती केली

आहे. या ग्रंथात व्यासांनी चारही पुरुषार्थांचे सविस्तर विवरण केले आहे. सर्व जीवनव्यापी अशा या महान् कोशामध्ये जे आढळते त्याहून वेगळे असे जगात काहीही असणे शक्य नाही व या ग्रंथात जे नाही त्याचेही दर्शन आपल्याला अन्यत्र घडणे शक्य नाही – या अर्थाच्या या 'यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित्' (१.५६.३३) या महाभारतातील पंक्तीवरून वरील उक्तिविशेष रूढ झाला असावा. ज्ञानेश्वरांनीही 'व्यासोच्छिष्ट जगत्त्रय' (१.४७) असे म्हटले आहे.

मू. – व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम् ।

अ. – 'या जगातील सर्व गोष्टी व्यासांच्या मुखाने (पूर्वीच) उष्टया झालेल्या आहेत (सांगितल्या गेल्या आहेत.)'

व्य. – मनुष्याला प्राप्त होणारा असा एकही अनुभव, विचार किंवा परिस्थिती नाही की ज्याचा उल्लेख महाभारतात नाही. आपल्या सूक्ष्म व विशाल बुद्धीने व्यासांनी मानवी जीवनाचे जे चित्रण केले आहे त्याहून नवीन किंवा वेगळे आजपर्यंत कोणीही काहीही सांगू शकला नाही; त्याचा उच्चार व्यासांच्या मुखाने अगोदरच झालेला आहे. 'उच्छिष्ट' – उष्टे हा शब्द या अर्थाने येथे वापरला आहे. व्यासांचे अलौकिकत्व, अद्वितीयत्व या उक्तिविशेषाने सांगितले जाते.

४४५. विद्ययाऽमृतमश्नुते

(पाहा : अविद्यया मृत्युं तीर्त्वा)

(श)

४४६. शठं प्रति शाठ्यम्

सं. – महा. १३. प्रवि. १५.१५५६. अनुशासनपर्वातील उमा-महेश्वर संवादात, 'कसे वागल्याने जीवन सफल होईल, शुभ आणि अशुभ कर्म कोणते' या प्रश्नाला महेश्वराने दिलेल्या उत्तरातील हा श्लोक आहे. रूढ उक्तीपेक्षा मुळातील शब्द वेगळे आहेत.

मू. – शठेषु शठवत् कुर्यात् आर्येषु ऋजुवदाचरेत् ।
आपत्सु नावसीदेच्च घोरान्संक्रामयेत्परान् ।।

अ. – 'लबाड माणसाशी लबाडीने वागावे, सज्जनाशी सरळपणाने व्यवहार करावा, संकटकाळी खचून जाऊ नये. (अशा तऱ्हेने) भयंकर अशा शत्रूंवर मात करावी.'

व्य. – व्यवहारात वागताना सज्जन, लबाड–सर्व प्रकारची माणसे भेटतात. लबाड माणसाशी सरळपणे वागल्याने आपले उगाचच नुकसान होण्याची शक्यता असते; ते टाळता यावे येवढ्यासाठी चतुराईने मनुष्य पारखून त्याला अनुरूप असे वागावे, असे सांगणारा हा उक्तिविशेष आहे. 'शठं प्रति शाठ्यं' किंवा मराठीत 'ठकास महाठक' हे याच अर्थाचे उक्तिविशेष आहेत.

४४७. शतं वर्षाणि जीवति

सं. – मनु. ४.१५८. 'सदाचरणामुळे आयुष्य वाढते, इच्छिलेले धन व संतती प्राप्त होते. दुराचरणामुळे मनुष्य दुःखी व रोगी होतो.' (मनु. ४.१५७.) सदाचरणाचे महत्त्व व दीर्घायुष्याचे रहस्य मनूने येथे सांगितले आहे.

मू. – **सर्वलक्षणहीनोऽपि यः सदाचारवान्नरः ।**
श्रद्दधानोऽनसूयश्च शतं वर्षाणि जीवति ॥

अ. – 'कोणतेही (शोभादायक रूप, सुंदर वस्त्र, अलंकार इ.) लक्षण नसूनही, जो पुरुष सदाचरणी, श्रद्धावान व मत्सररहित असतो, तो शतायुषी होतो.'

व्य. – मनुष्याचे वर्तन जितके सरळ, निर्मळ असेल तितकी त्याला मनःशान्ती मिळते. शरिराने तो निरोगी राहातो. इतर माणसे त्याच्या सहवासाने प्रसन्न होतात. आधुनिक शास्त्रज्ञांनीही 'निरोगी मन आणि निरोगी शरीर' हे दीर्घायुष्याचे कारण सांगितले आहे.

४४८. शनैः पन्थाः शनैः कन्था

सं. – सुर. ३. सामान्यनीति १२६. काही गोष्टी घाईने करणे इष्ट नसते; किंबहुना शक्य नसते. त्या हळूहळूच मिळवाव्या लागतात. त्याचा एकत्रित उल्लेख या सुभाषितात केला आहे.

मू. – **शनैः पन्थाः शनैः कन्था शनैः पर्वतमस्तके● ।**
शनैर्विद्या शनैर्वित्तं पञ्चैतानि शनैः शनैः ॥

● पर्वतलङ्घनम् : पाठभेद

अ. – 'मार्ग सावकाश (आक्रमिला जातो). संन्याशाची वस्त्रे हळूहळू (मानसिक विरक्तीनंतरच) परिधान केली जावीत. पर्वतशिखरावर सावकाश (आरोहण केले जाते). ज्ञान सावकाश (प्राप्त केले जाते.) संपत्ती हळूहळू (साठते). या पाच गोष्टी सावकाश सावकाश कराव्यात.'

व्य. – काही निर्णय झटपट घ्यावयाचे असतात, कामे जलद उरकावयाची असतात, तर काही गोष्टीत घाई केल्याने काम बिघडते. विद्यार्थ्यांच्या डोक्यात धांदलीने ज्ञान कोंबून भरता येत नाही. त्याच्या ग्रहणशक्तीनुसार, योग्य तितका काल विद्यार्थ्याला दिला तरच तो ते ज्ञान आत्मसात करू शकेल. अधिऱ्या स्वभावाच्या व्यक्तींना सबुरीचा सल्ला देण्यासाठी या उक्तिविशेषाचा उपयोग केला जातो.

४४९. शत्रोरपि गुणा ग्राह्या

सं. – महा. ४. प्रउ. ८५३. ३. पांडवांना अज्ञातवासातून शोधून काढण्यासाठी गोहरणाच्या निमित्ताने दुर्योधनाने विराट नगरीवर चाल केली. कौरवसेनेत घडून

येणारी दुश्चिन्हे पाहून व अर्जुनाच्या शंखाचा ध्वनी ऐकताच ' हा खात्रीने अर्जुन आहे' असे म्हणून द्रोणांनी त्याची प्रशंसा केली. तेव्हा कर्ण आणि दुर्योधन दोघांनीही द्रोणांची निंदा केली. आपल्या पित्याची निंदा ऐकताच क्रुद्ध झालेल्या अश्वत्थाम्याने मर्मभेदक शब्दांनी कर्ण-दुर्योधनाची निर्भर्त्सना करून आपल्या पित्याच्या म्हणण्याचे समर्थन केले; त्या वेळी एक फार मोठे सत्य त्याने सांगितले.

मू. – शत्रोरपि गुणा ग्राह्या दोषा वाच्या गुरोरपि ।
सर्वथा सर्वयत्नेन पुत्रे शिष्ये हितं वदेत् ।।

अ. – ' शत्रू असला तरी त्याचे गुण घ्यावेत. गुरूचेही दोष (उघड) बोलून दाखवावेत. नेहमी हरतऱ्हेने शिष्य (आणि) मुलगा यांना हितकारक असेल तेच सांगावे. (हिताचाच उपदेश करावा.)'

व्य. – ज्याच्या ठिकाणी गुण असेल तो मित्र असो किंवा शत्रू असो, त्याचे कौतुक, प्रसंगी त्याचे अनुकरण करण्यात आपलाच लाभ असतो. मात्र त्याला जे मनाचे औदार्य व निर्मळपणा आवश्यक असतो तो सर्व माणसांजवळ नसतो; त्यांना हे आवर्जून सांगणारा हा उक्तिविशेष आहे.

४५०. शरदि न वर्षति गर्जति

सं. – सुर. २. सज्जनप्रशंसा ११४. स ज्जन आणि दुर्जनांच्या स्वभावातील व कार्यपद्धतीतील फरक एका नित्यपरिचित निसर्गघटनेचा दृष्टान्त देऊन सुभाषितकाराने येथे सांगितला आहे.

मू. – शरदि न वर्षति गर्जति वर्षति वर्षासु निःस्वनो मेघः ।
नीचो वदति न कुरुते न वदति सुजनः□ करोत्येव ।।

□ **वदति न साधुः : पाठभेद**

अ. – ' शरद ऋतूत मेघ पाऊस न पाडता फक्त गडगडाट करतात. वर्षा ऋतूत (पावसाळ्यात) मेघ गर्जना न करता (फक्त) पाऊसच पाडतात. (त्याचप्रमाणे) दुर्जन काम न करता (केवळ) बोलतात (बडबड करतात), तर सज्जन मात्र न बोलता केवळ कृतीच करतात.'

व्य. – थोर माणसे आपल्या कार्याविषयी बाष्कळ बडबड न करता एखादी गोष्ट प्रत्यक्ष करून दाखवितात; पण सामान्य लोक मात्र तोंडची वाफ दवडतात. समर्थ रामदासांनीही म्हटले आहे 'क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे.' नुसती बडबड करणाऱ्या माणसाच्या संदर्भात 'बोलेल तो करील काय आणि गर्जेल तो पडेल काय!' ही वरील उक्तिविशेषाच्या अर्थाची म्हण नेहमी वापरली जाते.

४५१. शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्

सं. – कुसं. ५. ३३. शंकराच्या प्राप्तीसाठी कठोर तप करणाऱ्या पार्वतीची परीक्षा

पाहाण्यासाठी शंकर ब्रह्मचारी वेश धारण करून तिच्याकडे गेले. तिच्या स्वागताचा स्वीकार करून, त्यांनी पार्वतीचे कुशल विचारले व स्वतःचे प्रकृतिस्वास्थ्य जपण्याचा उपदेश केला.

मू. – अपि क्रियाऽर्थं सुलभं समित्कुशं जलान्यपि स्नानविधिक्षमाणि ते ।
अपि स्वशक्त्या तपसि प्रवर्तसे शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।

अ. – ' (तुझ्या तपोवनात) हवनादी कर्मे करण्यासाठी समिधा, कुश सहज प्राप्त होतात ना ? स्नान करण्याजोगे पाणी येथे आहे ना ? आपल्या शक्तीला झेपेल इतकेच कष्ट तपश्चर्येसाठी (तू) करतेस ना ? खरोखर शरीर हेच धर्माचरणाचे श्रेष्ठ साधन आहे. '

व्य. – शरीर निरोगी, सुदृढ असेल तरच नित्याची धार्मिक कर्तव्ये तसेच उपवासादी कठोर व्रतवैकल्ये करणे शक्य असते. शरीर दुर्बल, रोगग्रस्त असेल तर धनादी सर्व साधने अनुकूल असूनही, इच्छा असूनही धर्माचे यम-नियम पाळणे कठीण होते. जीवनातील बहुतेक सर्व व्यवहार शरीर सुदृढ असेल तरच यशस्वीपणाने करता येतात. या दृष्टीने शरीरस्वास्थ्याचे महत्त्व सांगणारा म्हणून हा उक्तिविशेष प्रसिद्ध आहे.

४५२. शान्तं पापं शान्तं पापम्

सं. – प्रतिमा ६.१४ नंतर. पितृवियोगाने विव्हल झालेल्या भरताला बोलण्याच्या ओघात सुमंत्र सीताहरणाची दुःखद घटनाही नकळत सांगतो. ती वार्ता कैकेयीला सांगून तिला तो दोष देतो, त्या वेळी कैकेयी त्याला दशरथाच्या शापाची हकीगत सांगते. ऋषिकुमाराची पित्याकडून झालेली हत्या ऐकून दुःखावेगाने भरत बोलला :

मू. – हिंसित इति । शान्तं पापं शान्तं पापम् । ततस्ततः ।

अ. – ' हत्या झाली ? (अरेरे) पाप नष्ट होवो. पाप नष्ट होवो. बरं पुढं ?'

व्य. – हा अत्यंत परिचित आणि प्रचलित उक्तिविशेष आहे. आपली अशी श्रद्धा आहे की, शब्दाच्या उच्चारण्याने पाप-दोष निर्माण होतो आणि नाहीसाही होतो. म्हणूनच एखादी अभद्र वार्ता किंवा एखाद्याचे अपशब्द ऐकले की, सद्प्रवृत्त माणसाला एक प्रकारचा धक्का बसतो. त्या वेळी हे अमंगल ऐकल्याचाही दोष लागू नये म्हणून, तसेच असे घडायला नको ही भावना व्यक्त करताना आवेगाने याच पदावलीचा द्विवार उच्चार केला जातो.

४५३. (ॐ) शान्तिः शान्तिः शान्तिः

सं. – शांतिमंत्रांचे मूळ ऋग्वेदात आहे. नंतरच्या काळात यजुर्वेद, सामवेद व अथर्वण या त्याच्या मुख्य शाखा त्यामधून निर्माण झाल्या; व त्यामध्ये वेगवेगळ्या शांतिमंत्रांचा उच्चार केलेला आहे. उपनिषदांमध्ये म्हणजेच वेदशाखांच्या अन्तिम भागामध्ये हेच शांतिमंत्र ऋषींनी म्हटलेले आढळतात. नंतरच्या काळात शास्त्रीय

विषयांच्या संस्कृत ग्रंथांचा शेवट शांतिमंत्राने करण्याची प्रथा रूढ झाली. अनेक शांतिमंत्रांपैकी विशेष प्रसिद्ध असलेले शांतिमंत्र येथे दिले आहेत.

मू. – **ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात् पूर्णमुदच्यते ।**
पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥ (ईशावास्य, श्वेताश्वतर उप.)

अ. – 'ते परब्रह्म पूर्ण आहे. हे (जगद्रूपाने दिसणारे) ब्रह्म पूर्ण आहे. (कारणरूप) पूर्ण ब्रह्मापासून (कार्यरूप) पूर्ण ब्रह्म उत्पन्न होते. (कार्यरूप) ब्रह्माचे पूर्णत्व घेऊन पूर्ण (केवळ) ब्रह्म उरते. . . . त्रिविध तापांची शांती होवो.'

मू. – **ॐ आप्यायन्तु ममाङ्गानि वाक्प्राणश्चक्षुः श्रोत्रमथो बलमिन्द्रियाणि च । सर्वाणि सर्वं ब्रह्मौपनिषदं माहं ब्रह्म निराकुर्यां मा मा ब्रह्म निराकरोदनिराकरण-मस्त्वनिराकरणं मे अस्तु । तदात्मनि निरते य उपनिषत्सु धर्मास्ते मयि सन्तु ते मयि सन्तु ।**
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः । केन, छांदोग्य उप.

अ. – 'माझे हात - पाय आदी अंगे, तसेच वाणी, प्राण, डोळे, कान पुष्ट होवोत. सर्व इंद्रियांमध्ये बल येवो. सर्व उपनिषदांमध्ये ब्रह्माचे प्रतिपादन आहे. मी त्या ब्रह्माचे निराकरण न करावे; ब्रह्म माझे निराकरण न करो. आम्हां दोघांमध्ये परस्परप्रीती असो. उपनिषदांतील जे धर्म, ते त्या आत्म्यामध्ये निरत असलेल्या माझ्या ठायी असोत. माझ्या ठिकाणी असोत... त्रिविध तापांची शांती होवो.'

मू. – **ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ।**
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ।
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः । केन उप.

अ. – 'परमेश्वर (शिष्य व आचार्य) आम्हां दोघांचे रक्षण करो. तो परमात्मा आम्हां दोघांकडून (विद्येच्या) फलाचा भोग देवो. आम्ही दोघे विद्येचे सामर्थ्य बरोबर संपादन करू. आम्हां दोघांचे अध्ययन तेजस्वी (अर्थज्ञानास योग्य) असो. आम्ही एकमेकांचा द्वेष न करावा.
शांती असो,. . .'

मू. – **ॐ भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः । भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।**
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवांसस्तनूभिः । व्यशेम देवहितं यदायुः ।
स्वस्ति न इन्द्रो वृद्धश्रवाः । स्वस्ति नः पूषा विश्ववेदाः ।
स्वस्ति नस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः । स्वस्ति नो बृहस्पतिर्दधातु ॥
ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ॥ प्रश्न, मुंडक उप.

अ. – 'हे देवांनो, आम्ही कानांनी कल्याणरूप वचन ऐकावे. यज्ञास समर्थ होऊन आम्ही नेत्रांनी मंगल पाहावे. स्थिर अंगांनी-शरिरांनी आम्ही तुमची स्तुती करणारे होऊन, आयुष्यभर, देवांनी दिलेले हित प्राप्त करून घेऊ. थोर कीर्तिमान इंद्र

आमचे कल्याण करो. विश्वाला जाणणारा सूर्य (पूषा) आमचे शुभ करो. अकुंठित गतीचा गरुड आम्हांला आनंद देवो. बृहस्पती आमचे हित करो. शांती असो–शांती असो–शांती असो.'

मू. – ॐ भद्रं नो अपिवातय मनः ।।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।।

अ. – 'परमेश्वरा, आमचे कल्याण कर. आमच्या मनाला शुभ प्रेरणा दे. शांती असो–शांती असो–शांती असो.'

मू. – ॐ शं नो मित्रः शं वरुणः । शं नो भवत्वर्यमा । शं न इन्द्रो बृहस्पतिः । शं नो विष्णुरुरुक्रमः । नमो ब्रह्मणे । नमस्ते वायो । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मासि । त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्मं वदिष्यामि । ऋतं वदिष्यामि । सत्यं वदिष्यामि । तन्मामवतु । तद्वक्तारमवतु । अवतु माम् । अवतु वक्तारम् ।

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।। तैति उप.

अ. – 'मित्र (सूर्य) आम्हाला सुखदायक होवो. वरुण देव (आम्हाला) सुखकारक होवो. (चक्षु आणि सूर्य यांची देवता) अर्यमा आम्हाला सुख देणारा होवो. इन्द्र आणि बृहस्पती आमचे कल्याण करणारा होवो. ज्याचा क्रम - पाऊल विस्तीर्ण आहे असा विष्णु आम्हांला सुखकर होवो. (वायुरूप) ब्रह्माला नमस्कार असो. हे वायु-देवा, तुला नमस्कार असो. तू साक्षात् ब्रह्म आहेस; मी तुलाच प्रत्यक्ष ब्रह्म म्हणेन. मी तुला ऋत (बुद्धीमध्ये निश्चित झालेले सत्य) म्हणेन. मी तुलाच सत्य (वाणी व कर्मेंद्रियांतून प्रकट होणारे) म्हणेन. ते सर्वात्मक, वायुरूप, माझ्याकडून स्तुती केले गेलेले ब्रह्म माझे रक्षण करो. ते ब्रह्म शिकविणाऱ्या आचार्याचे रक्षण करो. माझे (विद्यार्थ्याचे) रक्षण करो. वक्त्याचे रक्षण करो. . . . त्रिविध तापांची शांती होवो.'

मू. – ॐ यश्छन्दसामृषभो विश्वरूपः । छन्दोभ्योऽध्यमृतात्सम्बभूव । स मे इन्द्रो मेधया स्पृणोतु । अमृतस्य देव धारणो भूयासम् । शरीरं मे विचर्षणम् । जिह्वा मे मधुमत्तमा । कर्णाभ्यां भूरि विश्रुवम् । ब्रह्मणः कोशोऽसि मेधाय पिहितः श्रुतं मे गोपाय । ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।। तैति. उप.

अ. – 'जो ॐकार वेदांमध्ये श्रेष्ठ आहे; सर्वरूप आहे. वेदरूप अमृतापासून जो ॐकार आधिक्याने प्रादुर्भूत झाला (सारभूत झाला), तो अशा प्रकारचा ॐकार–इंद्र (परमेश्वर) मला बुद्धीचे बल देवो. हे देव, मी अमृतत्वाला कारण होणाऱ्या ब्रह्मविद्येला धारण करणारा होवो. माझे शरीर योग्य (रोगरहित) होवो. माझी जिह्वा अतिशय मधुर भाषण करणारी होवो.कानांनी मी पुष्कळ ऐकावे. माझे (शरीर व इंद्रिये आत्मज्ञानाला योग्य होवोत.) हे ॐकारा, तू ब्रह्माचा कोश आहेस; तू लौकिक बुद्धीने झाकला गेला आहेस. मी श्रवण केलेल्या (आत्मज्ञानाचे) तू रक्षण कर.— त्रिविध तापांची शांती होवो.'

व्य. – अध्यात्मविद्येचा प्रारंभ करण्यापूर्वी, ऋषींनी शांतिपाठाचा त्रिवार उच्चार केला आहे. आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशा तीनही प्रकारच्या संकटांमुळे होणाऱ्या तापांची–त्रासांची शांती व्हावी अशी प्रार्थना या त्रिवार उच्चारामध्ये अभिप्रेत आहे.

शरीर दक्ष असेल व मन शांत असेल तरच कोणताही अभ्यास करणे, कठीण सिद्धान्त समजावून घेणे शक्य असते. म्हणून शास्त्राभ्यासाच्या आरंभी शांतिमंत्राने प्रार्थना केलेली आढळते. तर, अभ्यासाने व आध्यात्मिक प्रयत्नाने मनातील क्षोभ, खळबळ, शंका संपूर्ण नष्ट होऊन शांती प्राप्त होते. हे फल प्राप्त व्हावे म्हणून शास्त्रग्रंथांच्या अखेरीसही हे शांतिमंत्र म्हटले जातात.

'ॐ शान्तिः ..।' म्हटले म्हणजे एखाद्या गोष्टीचा शेवट झाला असे आताच्या काळात आपण मानतो.

४५४. शाकाय वा स्याल्लवणाय वा

(पाहा : दिल्लीश्वरो वा जगदीश्वरो वा)

४५५. शापादपि शरादपि

सं. – तपाचे आणि शस्त्राचे सामर्थ्य एकवटलेले आहे अशा अनेक तेजस्वी विभूती पौराणिक व ऐतिहासिक कालात होऊन गेल्या. अशा विभूतींच्या, विशेषतः द्रोणाचार्य व परशुराम यांच्या बाबतीत हा उक्तिविशेष वापरला जातो. परंतु त्यांच्याबद्दल माहिती असलेल्या प्रसिद्ध ग्रंथांत हा श्लोक आढळत नाही.

मू. – **अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।**
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ।।

अ. – 'अग्रभागी (मुखामध्ये) चारी वेद आणि पाठीवर धनुष्य व बाण ! हे ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज जिच्या ठिकाणी एकत्र झाले आहे अशी व्यक्ती (आपल्या शत्रूचा नाश) शाप देऊन अगर युद्ध करून, कोणत्याही उपायाने करू शकते.'

व्य. – शस्त्र व अस्त्रविद्येमध्ये निपुण असा योद्धा आणि तपस्वी ऋषी या दोघांचेही गुण ज्याच्या ठिकाणी एकत्र झाले आहेत, अशा तेजस्वी पुरुषांच्या वाणीमध्ये आणि शस्त्रामध्ये जग हालवून सोडण्याचे सामर्थ्य असते. त्यांच्या शापाने किंवा शस्त्रप्रयोगाने क्षणात शत्रूचा नाश होऊ शकतो. अशा विभूतींच्या तेजाचे व पराक्रमाचे सामर्थ्य सांगणारा हा उक्तिविशेष आहे.

४५६. शाब्दे परे च निष्णातम्

सं. – भाग. ११.३.२१. परीक्षित राजाने माया म्हणजे काय, त्यातून तरून जाण्याचे साधन कोणते, ब्रह्म म्हणजे काय व कर्म म्हणजे काय, असे चार प्रश्न शुकाचार्यांना

विचारले. त्या सर्वांची उत्तरे अंतरिक्षादी मुनींनी या अध्यायात दिली आहेत. या प्रश्नांच्या अनुषंगानेच 'परमेश्वरी माया जडबुद्धीच्या मानवास तरून जाण्याचा उपाय एकच – सद्गुरूला शरण जाणे' असे प्रबुद्ध मुनी सांगतात.

मु. – तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् ।
शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम् ।।

अ. – 'म्हणून सर्वोच्च कल्याण (कोणत्या उपायाने होईल) ते जाणण्याची इच्छा असलेल्याने वेदांतज्ञ आणि साक्षात्कारी (ब्रह्मानुभूती अनुभविलेल्या), शांतीचे निधान असलेल्या सद्गुरूला शरण जावे.'

व्य. – सर्वश्रेष्ठ पुरुषार्थाची इच्छा करणाऱ्या मुमुक्षूने सद्गुरूला शरण जावे हे सर्वविश्रुत आहे. पण तो सद्गुरु कसा असावा किंबहुना शब्दब्रह्म व परब्रह्मसाक्षात्कारी असलेल्या अधिकारी पुरुषालाच सद्गुरु संबोधावे असे भागवतकार येथे आवर्जून सांगतात. जर गुरुच आत्मानुभवी नसेल तर शाब्दिक ज्ञानापलीकडे शिष्याला बोध करण्यास तो असमर्थच होणार. म्हणून शब्दरूप ब्रह्माचा व शब्दाच्यावर्णनाच्या अतीत असलेल्या ब्रह्माचाही अनुभव अनुभवलेलाच सद्गुरु जाणावा. केवळ अशा गुरूचाच नव्हे तर या वर्णनाला योग्य असलेल्या इतर अधिकारी व्यक्तींचा उल्लेखही या उक्तिविशेषाने केला जातो.

४५७. शास्त्रात् रूढिर्बलीयसी

सं. – लोकोक्ती. शब्दाचे अर्थ चार प्रकारे करतात. त्यांपैकी पहिला रूढार्थ, म्हणजे लोकांमध्ये प्रचलित असलेला अर्थ आणि दुसरा योगार्थ, म्हणजे व्युत्पत्ती पाहू लावलेला अर्थ. दोन्हीपैकी रूढार्थ अगोदर पाहावा या अर्थी 'योगात् रूढिर्बलीयसी' असा नियम आहे. पण तो बाजूला पडून 'शास्त्रात् रूढिर्बलीयसी' हा उक्तिविशेष रूढ झाला व त्याचा अर्थही बदलला.

मु. – शास्त्रात् रूढिर्बलीयसी ।

अ. – 'शास्त्राहून रूढी (व्यवहार) बलवत्तर होय.'

व्य. – रूढीचा पगडा मनुष्याच्या मनावर केवढा जबरदस्त असतो हे दाखविणारा हा उक्तिविशेष आहे. रूढी म्हणजे लोकांमध्ये वर्षानुवर्षे प्रचलित असलेला आचार. शास्त्राचा आधार नसला तरी शिष्ट लोक तिला मान्यता देतात; त्यांना मान्यता द्यावी लागते. एकवेळ शास्त्रवचन डावलले जाईल, पण रूढी बाजूला सारणे फार कठीण अशा अर्थाचा हा उक्तिविशेष आहे. (परिशिष्ट पहा)

४५८. शिवः केवलोऽहम्

सं. – निर्वाणदशक. १. श्रीमत् आद्य शंकराचार्यांच्या 'निर्वाणदशक' या वेदान्त-स्तोत्राच्या प्रत्येक श्लोकाच्या चौथ्या चरणाचा अर्धा भाग – धृवपद म्हणून ही शब्दसंहती आचार्यांनी लिहिली आहे. (परिशिष्ट पहा).

मू. – न भूमिर्न तोयं न तेजो न वायुर्न खं नेन्द्रियं वा न तेषां समूहः ।
अनैकान्तिकत्वात् सुषुप्त्यैकसिद्धः तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ।।

अ. – 'मी पृथ्वी, जल, तेज, वायु, आकाश (पंचमहाभूते), इंद्रिय किंवा इंद्रियांचा समुदाय नाही. कारण ही सर्व अनेक रूपे धारण करणारी, विकार पावणारी आहेत. झोपेच्या अवस्थेत या सर्व गोष्टींचा अभाव असून देखील, निर्विकार केवळ मी स्वतःसिद्ध असा शिवरूपाने शिल्लक राहातो.'

व्य. – 'मी कोण व काय आहे,' याचे म्हणजेच स्वतःचे स्वरूप-आत्मस्वरूप समजावून घेणे हा वेदान्तशास्त्राचा मुख्य प्रश्न आहे. तो उलगडल्यानेच मनुष्याचे दुःख नाहीसे होऊन त्याला आनंद प्राप्त होतो. झोपेतील अनुभवावरून आचार्यांनी वर्णन केलेल्या शुद्ध, निर्लेप, सच्चिदानंद अशा आत्मस्वरूपाची कल्पना करता येते. झोपेत कोणताही भोग्य पदार्थ, मनाची वृत्ती, क्रिया यांचा अभाव असतो, 'केवळ' मी असतो. जाणीव-नेणीवरहित अशा त्या निर्विकार अवस्थेचा आनंद प्रत्येक मनुष्य भोगीत असतो व त्याला तो हवा असतो; आत्म्याच्या शुद्ध आनंदरूप अवस्थेचे वर्णन शंकराचार्यांनी आत्मपंचक व आत्मषट्क या स्तोत्रांतही केले आहे.

'शिवः केवलोऽहम्' ही सामान्य माणसानें उच्चारण्याची उक्ती नव्हे. परमात्म्याच्या सच्चिदानंदरूपाशी तदाकार झालेल्या या मार्गातील अधिकारी व्यक्तींनाच असे म्हणणे शोभते. आणि या उक्तिविशेषाचा वापर त्यांच्या बाबतीत केला गेला तरच तो योग्य ठरतो.

४५९. शिवस्य हृदयं विष्णुः

सं. – स्कंदोपनिषत् ८. अज्ञानाचे पटल नष्ट होताच जीव ब्रह्मरूप होतो. जीवाशिवात भेद राहात नाही. स्वस्वरूप जाणलेला आत्मा म्हणजे परब्रह्म होय. तसेच शिव आणि विष्णु एकच आहेत, एकाच परमतत्त्वाची ती दोन रूपे आहेत. अक्षय्य शांती मिळण्यासाठी हे सत्यज्ञान जाणले पाहिजे.

मू. – शिवाय विष्णुरूपाय शिवरूपाय विष्णवे ।
शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः ।।

अ. – 'विष्णुरूपात शिव आणि शिवस्वरूप (धारण केलेला) विष्णु आहे. शिवाचे हृदय विष्णुमय आहे तर विष्णूचे हृदय शिवमय आहे.'

व्य. – हिंदू धर्मातील शैवपंथीय शिवाला एकमेवाद्वितीय परब्रह्म मानून त्याची आराधना करणारे तर वैष्णवसंप्रदायी विष्णु हेच एकमेव–परमदैवत मानणारे व इतर देवांना कमी लेखणारे. आमचाच देव श्रेष्ठ म्हणून, दोन्ही पंथीयांमध्ये एकमेकांविरुद्ध पराकोटीचे वाद व भांडणे. पौराणिक कालापासून हे दोन वेगवेगळे प्रवाह दिसून येतात. त्यांच्यामध्ये समन्वय साधण्यासाठी, तत्त्वतः दोघांमध्ये भेद नाही हे सांगण्यासाठी वरील उक्तिविशेषाचा उपयोग केला जातो.

४६०. शिष्यादिच्छेत् पराजयम्

सं. – लोकोक्ती व्यवहारात मनुष्य सर्व ठिकाणी जयाची, यशाचीच इच्छा करतो. अपयश आले तर त्याला दुःख होते. काही वेळा मात्र पराजय झाला असताना त्याला तो आनंददायक किंवा अभिमानास्पद वाटतो; अशी ही स्थिती.

मू. – **सर्वत्र जयमन्विच्छेत् पुत्रात् शिष्यात् पराजयम् ।**

अ. – 'सर्व कार्यात जय मिळविण्याची इच्छा करावी. (मात्र) पुत्राकडून किंवा शिष्याकडून (आपला) पराभव व्हावा, (अशी इच्छा धरावी).'

व्य. – आपल्याला जी संधी मिळाली नाही ती आपल्या मुलांना मिळावी, त्यांनी आपल्याहून अधिक पराक्रम करावा, हुशारी दाखवावी अशी प्रत्येक आईबापाची इच्छा व धडपड असते. मुले तशी निघाली म्हणजे त्यांना आनंद होतो. शिष्य सरस निघाला, विद्येत त्याने आपल्या गुरूलाही मागे टाकले म्हणजे आपल्या शिकविण्याचे चीज झाले असे गुरूला वाटते. त्यातच त्याच्या 'गुरूपणा'चे सार्थक आहे. गुरूपेक्षा विद्वान झालेल्या त्याच्या शिष्याला पाहून कौतुकाने या उक्तिविशेषाचा उच्चार केला जातो.

४६१. शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्

सं. – भगी. २.७. एकीकडे स्वधर्म आणि दुसरीकडे गुरुहत्या, कुलक्षय अशा दुहेरी कात्रीत सापडलेला अर्जुन किंकर्तव्यमूढ झाला. कर्तव्याकर्तव्याचा निर्णय त्याला घेता येईना. तेव्हा त्याविषयी उपदेश करण्याची विनंती त्याने शिष्यभावाने श्रीकृष्णाला गुरू म्हणून केली.

मू. – **कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ।**
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥

अ. – 'हताश झाल्याने माझी स्वाभाविक वृत्ती नष्ट होऊन (मला) कर्तव्याकर्तव्य कळेनासे झाले आहे. (त्यामुळे) गोंधळून गेलेला मी तुम्हाला विचारीत आहे की, जे हितकर ते मला (समजाऊन) सांगा. मी तुमचा शिष्य आहे. (शिष्यत्व पत्करून) शरण आलेल्या मला तुम्ही शिकवा (उपदेश करा).'

व्य. – मोहाविष्ट झालेल्या अर्जुनाने शिष्यत्व स्वीकारल्याने श्रीकृष्णाने गुरू या नात्याने असे आगळे तत्त्वज्ञान सांगितले की, त्यामुळे केवळ अर्जुनालाच मार्गदर्शन न होता लक्षावधी लोकांचा शंकानिरास या तत्त्वज्ञानाने केला आहे, करीत आहे. योग्य शिष्य लाभला तर गुरू किती सढळ हाताने ज्ञानदान करून शिष्याबरोबरच विश्वाला उपकृत करतो, याचे भगवद्गीता हे उत्कृष्ट उदाहरण आहे. नित्याच्या जीवनात प्रत्येकालाच अनेक अडीअडचणींना तोंड द्यायचे असते. अशा वेळी मनुष्य भांबावून जातो. नेमके काय करणे उचित ठरेल याचा त्याला निर्णय घेता येत

नाही. कर्तव्यांचा मेळ बसत नाही. त्या वेळी समाजातील श्रेष्ठ ज्येष्ठ व्यक्तींना तो शरण जातो. त्यांच्या मार्गदर्शनानुसार निर्माण झालेला पेच सोडवितो. अशा वेळी आपल्या मनातील शरणागतीची भावना, मार्गदर्शनाची अपेक्षा याच उक्ति-विशेषाने व्यक्त केली जाते.

४६२. शिष्यापराधे गुरोर्दण्डः

सं. – लोकोक्ती. शिष्याच्या हातून अपराध घडला तर त्याचा दोष गुरूला लागतो; कारण गुरूच त्याला योग्य वळण लावणारा, त्याचे चारित्र्य घडविणारा मार्गदर्शक असतो. त्याचप्रमाणे कनिष्ठांच्या हातून घडलेल्या अपराधाचे फल वरिष्ठांना भोगावे लागते. हे सुचविणारी ही लोकोक्ती प्रचलित होण्याला पुढील श्लोक (सुर. ७ संकीर्ण ५९५) कारणीभूत झाला असावा.

मू. – **राजा राष्ट्रकृतं पापं राज्ञः पापं पुरोहितः ।**
भर्ता च स्त्रीकृतं पापं शिष्यपापं गुरुस्तथा ।।

अ. – 'प्रजेने केलेल्या चुकांचा दोष राजाला (लागतो); (तर) राजाच्या (हातून घडलेल्या) चुकीचे फल राजपुरोहिताला (भोगावे लागते); (तसेच) पत्नीचा अपराध पतीला बाधक (ठरतो) आणि शिष्याने केलेल्या चुकीबद्दल गुरूला शिक्षा (भोगावी लागते.')

व्य. – प्राचीन काळातील गुरुकुलपद्धतीला उद्देशून हा उक्तिविशेष सर्वार्थाने रूढ होता. विद्यार्थ्याला शिस्त लावण्याचे ते एक प्रभावी साधन आहे. गुरुकुलातील एखाद्या विद्यार्थ्याच्या हातून जरी उनाडपणा घडला तरी त्याबद्दल आचार्य उपवास करीत किंवा मौन धरीत. प्रसंगी देहदंडही स्वतः सोसून शिष्याला सदाचरणाची दीक्षा देत असत. आधुनिक कालात ही पदावली जरी संपूर्णतया लावणे उचित नसले तरी गुरूंना, आजच्या भाषेत बोलायचे तर प्राध्यापक - शिक्षकांना त्यांच्या जबाबदारीची-त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देताना याचाच स्मरणपूर्वक उल्लेख केला जातो. तसेच, 'विद्यार्थी जर ऐकत नसेल तर त्याबद्दल गुरूला शिक्षा काय म्हणून ?' असे उद्वेगाने बोलताना याच उक्तिविशेषाचा आधार घेतात.

४६३. शीलं परं भूषणम्

सं. – नीश. ८०. सज्जनांची - जाणत्या माणसांची जीवनपद्धती सांगताना भर्तृहरीने शीलाचे - चारित्र्यसंपन्नतेचे महत्त्व किंबहुना जीवनातील त्याचे सर्वश्रेष्ठ स्थान वर्णिले आहे. चारित्र्यभ्रष्ट होण्यापेक्षा प्राणत्याग श्रेयस्कर मानणे ही सज्जनांची रीत आहे. त्यांचे ते ब्रीद असते. सर्वच मानवजातीचे सच्छील हेच भूषण ठरावे; कारण सच्छीलता सर्व भूषणांचे भूषण आहे.

मू. – ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता शौर्यस्य वाक्संयमो
ज्ञानस्योपशमः श्रुतस्य विनयो वित्तस्य पात्रे व्ययः ।
अक्रोधस्तपसः क्षमा प्रभवितुर्धर्मस्य निर्व्याजता
सर्वेषामपि सर्वकारणमिदं शीलं परं भूषणम् ।।

अ. – ' वैभव हे सौजन्याने शोभून दिसते. संयमित वाचा हे शौर्याचे भूषण आहे. शांत वृत्तीने ज्ञान, विनम्रतेने विद्या, तर सत्पात्री दान करणे हे शोभून दिसते. राग आवरण्याने तप, तर क्षमाशील वृत्तीने अधिकार शोभतो. सरळ वागण्यातच धर्माचरण आहे. पण या सर्वांमध्ये आद्य व श्रेष्ठ भूषण शील हेच आहे. '

व्य. – शील हा केवळ अलंकार नव्हे, तर ते एक प्रभावी सामर्थ्य आहे. शील म्हणजे सत्यनिष्ठा, धैर्य, त्याग, परोपकार आदी सर्व गुणांचा सुंदर मिलाफ. ज्याने शील सांभाळले नाही त्याचे सर्वस्व गमावले. उलट जो चारित्र्यसंपन्न आहे त्याला जगात नित्य आदराचे स्थान आहे. महाभारतातही सच्छीलतेचे सामर्थ्य वर्णन करताना ' शीलेनहि त्रयो लोकाः शक्या जेतुं न संशयः ' असे म्हटले आहे. चारित्र्यसंपन्न व्यक्ती स्वतःची उन्नती तर साधतेच पण तिच्यामुळे राष्ट्राचीही प्रगती होते. म्हणून व्यष्टी आणि समष्टी या दोन्ही जीवनाच्या क्षेत्रात प्रशंसनीय, अनुकरणीय असा एकच सद्गुण व तो म्हणजे सच्छील हे जाणूनच शीलाचे महत्त्व सांगितले जाते.

४६४. शुनि चैव श्वपाके च

(पाहा : पण्डिताः समदर्शिनः; विद्याविनयसंपन्ने)

४६५. शुभास्ते पन्थानः सन्तु

सं. – शाकुं. ४.२०. नंतर. सासरी निघालेल्या शकुंतलेला पोचविण्यासाठी तिच्या सख्या, गौतमी, कण्वमुनी नदीकिनारी येताच शाङ्गरवाने कण्वादींना शकुंतलेचा निरोप घेण्यास सुचविले. शकुंतलेच्या वियोगाने दुःखित झालेल्या कण्वांनी महत्प्रयासाने स्वतःला सावरीत तिला आशीर्वाद दिला. तोच आशीर्वाद ' शुभास्ते पन्थानः सन्तु ' या रूपात प्रचलित आहे. मुळात मात्र शब्द वेगळे आहेत.

मू. – गच्छ । शिवास्ते पन्थानः सन्तु ।

अ. – ' जा. तुझा मार्ग (प्रवास) सुखाचा होवो.'

व्य. – लांबच्या प्रवासाला निघताना वियोगाचे दुःख, प्रवासातील सुरक्षिततेची चिंता पोचल्यानंतरचे कार्य कसे सिद्ध होईल याचा विचार, अशा अनेक संमिश्र भावनांची गर्दी जाणाऱ्याच्या व घरात मागे राहून निरोप देणाऱ्याच्या मनात होते. अशा सर्व भावना या उक्तिविशेषात सामावलेल्या आहेत. प्रवासाला निघालेल्या व्यक्तीबद्दल शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी ह्या उक्तिविशेषाचा उच्चार केला जातो.

४६६. शुभस्य शीघ्रं अशुभस्य कालहरणम्

सं. – लोकोक्ती जीवनात लाभदायक आणि हानीकारक दोन्ही प्रकारच्या घटना घडत असतात. त्यांच्याबाबतीत माणसाने कसे वागावे हे या उक्तिविशेषाद्वारे सांगितले आहे.

मू. – **शुभस्य शीघ्रं अशुभस्य कालहरणम् ।**

अ. – 'चांगले काम (करण्याचे मनात आले असता) ते तावडतोब करावे; व अशुभ काम करण्याची वेळ आली असताना वेळ जाऊ द्यावा.'

व्य. – 'एखादे पुण्यकर्म, स्वत:च्या फायद्याची गोष्ट मनात आली की लगेच करावी. त्याबाबतीत दिरंगाई केल्यास त्याला फाटे फुटून, मनाची उभारी कमी होण्याची शक्यता असते. याउलट करू नये ते करण्याची इच्छा झाल्यास किंवा एकादा पेच-प्रसंग समोर आल्यास, त्याबाबतीत एकदम कृती करू नये. काही काळानंतर मन निवळते, विचार सुचतो. कालहरणामुळे अनिष्ट व अरिष्ट टळतेही. शुभ कार्याचे वेळी जलद हालचाल करावी हे सुचविण्यासाठी व अशुभाला विलंब करावा हे सांगण्यासाठी हा उक्तिविशेष वापरला जातो.

४६७. शूरश्च कृतविद्यश्च

सं. – पंच. १.४६. आपल्या बुद्धिप्रभावाने राजाला वश करून घेऊन मंत्रीपद मिळविण्याच्या ईर्षेने करटक कोल्ह्याने आपल्या यशाची खात्री खालील शब्दांत दिली :

मू. – **सुवर्णपुष्पितां पृथ्वीं विचिन्वन्ति नरास्त्रयः ।**
शूरश्च कृतविद्यश्च यश्च जानाति सेवितुम् ।।

अ. – 'पराक्रमी, विद्वान् आणि सेवावृत्ती जाणणारे असे तीन प्रकारचे पुरुष सुवर्णरूपी फुलांनी परिपूर्ण अशी पृथ्वी (वरील धन प्राप्त करून) वेचून घेत असतात.'

व्य. – जगात धनाची, श्रेष्ठ पदांची कमतरता नाही. पण ती शोधून प्राप्त करून घेण्यासाठी जो पराक्रम, दीर्घोद्योग व निरभिमानता या गुणांचा उत्कर्ष व्हावा लागतो, त्याचा बहुतेक अभावच दिसून येतो. त्यामुळे धनिक किंवा श्रेष्ठ पदी पोचलेली माणसे समाजात अत्यल्प संख्येने दिसतात. अशा प्रकारच्या उत्कर्षाचे, यशाचे गमक या उक्तिविशेषाने सांगितले जाते.

४६८. शूराणां च नदीनां च प्रभवा दुर्विदाः किल

सं. – महा. १.१२७. ११. दुर्योधनाने कर्णाला अंगदेशाचे राज्य देऊन राजा बनविले. ते ऐकून भीम 'सूतपुत्र' म्हणून कर्णाची अवहेलना करू लागला. तेव्हा दुर्योधनाने कर्णाचा पराक्रम पाहा, असें भीमाला बजावले.

मू. – **क्षत्रियाणां बलं ज्येष्ठं योद्धव्यं क्षत्रबन्धुना ।**
शूराणां च नदीनां च प्रभवा दुर्विदाः किल ।।

अ. – ‘क्षत्रियांचे बल हे श्रेष्ठ आहे. क्षत्रियांबरोबर लढले पाहिजे. (युद्धात त्यांच्या बलाची परोक्षा होते.) खरोखर नदीची आणि वीर पुरुषांची उत्पत्ती (मूळ) जाणणे कठीण असते.’

व्य. – ‘ऋषीचे कूळ आणि नदीचे मूळ शोधू नये’ हा उक्तिविशेष वरील अर्थाचाच आहे. दूर डोंगरात, अडचणीच्या खडकाळ जागेतून नदीची बारीकशी धारा उगम पावते. शूरालाही अनेक अडचणीतून वाट काढीत पुढे यावे लागते. त्याच्या बाबतीत कुळाचे महत्त्व मानू नये; त्याच्या पराक्रमाकडे पाहावे. या अर्थाने हा उक्तिविशेष रूढ आहे.

४६९. शेषं कोपेन पूरयेत्

सं. – लोकोक्ती. तत्त्वाचे, सिद्धान्ताचे स्वरूप निश्चित करण्यासाठी परस्परांच्या विचारांची देवघेव, चर्चा ही एक उपयुक्त पद्धत मानली गेली आहे. आपल्या शास्त्रकारांनी, विशेषत: नैयायिकांनी अशा तत्त्वचर्चेचे नियम व प्रकार ठरविले. ती वादपद्धती म्हणून रूढ झाली. स्वत:चा सिद्धान्त प्रस्थापित करून प्रतिपक्षाच्या मताचे खंडन करणे हे वादाचे स्वरूप प्रचलित झाले. त्याचा अतिरेक कसा होतो हे वरील उक्तिविशेषात सांगितले आहे. त्याचा निश्चित संदर्भ उपलब्ध नाही.

मू. – शेषं कोपेन पूरयेत् ।

अ. – ‘उरलेला वाद रागाच्या आविर्भावाने पुरा करावा !’

व्य. – प्रतिपक्षावर मात करता आला नाही, स्वत:चे म्हणणे चुकीचे ठरू लागले म्हणजे वादात हार खावी लागू नये म्हणून शेवटी आरडाओरडा करून ‘आम्हीच जिंकली’– ‘जितं मया’ असे जोराने सांगणारे व दंडेली करणारे लोक पाहिले म्हणजे त्याचे इंगित जाणणाऱ्या मनुष्याच्या तोंडून हा उक्तिविशेष बाहेर पडतो.

४७०. श्वः कार्यमद्य कुर्वीत

सं. – महा. १२.१६९.१४. ‘काळ निघून चालला असताना कशा प्रकारचे आचरण श्रेयस्कर होईल’ या युधिष्ठिराच्या प्रश्नाला उत्तर देताना भीष्माचार्यांनी इतिहासातील एका पित्याने पुत्राच्या या प्रश्नाला दिलेले उत्तर उद्‌धृत केले.

महा. १२.३०९.७२. व्यासपुत्र शुकाचार्यांना वैराग्य कसे उत्पन्न झाले हे जाणून घेण्याची युधिष्ठिराला इच्छा होती. शुकाचार्यांचे अध्ययन पुरे झाल्यावर त्यांना व्यासांनी केलेला उपदेश भीष्मांनी युधिष्ठिराला सांगितला.

मू. – श्वः कार्यमद्य कुर्वीत पूर्वाह्णे चापराह्णिकम् ।

न हि प्रतीक्षते मृत्युः कृतं वास्य न वा कृतम् ।। महा. १२.१६९.१४

राज्ञा. १ उविसं. १७

अ. – 'उद्या करावयाचे ते (काम) आज करावे; आणि दिवसाच्या उत्तरार्धात (दुपारी) करावयाचे ते सकाळीच उरकावे; कारण मृत्यू आला म्हणजे तो, याने अमूक काम केले आहे किंवा नाही (करावयाचे राहिले आहे) म्हणून वाट पाहात नाही.'

मू. – **श्वः कार्यमद्य कुर्वीत पूर्वाह्णे चापराह्णिकम् ।**
को हि तद्वेद कस्याद्य मृत्युसेना निवेक्ष्यते ॥ महा. १२.३०९.७२.

अ. – 'उद्याचे काम आज करावे; दुपारी करावयाचे ते सकाळी करावे. खरोखर मृत्यूचे दूत कोणाकडे वळतील हे कोण जाणू शकेल?'

व्य. – आजचे काम उद्यावर टाकावे हा सर्वसाधारण मनुष्यस्वभाव आहे. मात्र त्यामुळे त्याला पश्चात्ताप करण्याची वेळ येते. आयुष्य निघून जाते आणि जे करावयास हवे होते ते झाले नाही अशी तळमळ म्हातारपणी लागते; पण त्या वेळी हातातून सर्व गेलेले असते. अशी वेळ येऊ नये म्हणून सर्वच माणसांना व्यासांनी दिलेली ही महत्त्वाची सूचना. रोज नव्याने स्मरण करण्याजोगा हा उक्तिविशेष आहे.

४७१. श्रद्धामयोऽयं पुरुषः

सं. – भगी. १७.३. दैवी व आसुरी प्रकृतीच्या माणसांचे वर्णन केल्यानंतर, 'मनुष्या-मनुष्यांमध्ये असे भेद का होतात' या अर्जुनाच्या प्रश्नाचे श्रीकृष्णाने 'श्रद्धात्रय विभाग' सांगून उत्तर दिले.

मू. – **सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ।**
श्रद्धामयोऽयं पुरुषः यो यच्छ्रद्धः स एव सः ॥

अ. – 'हे भारता (अर्जुना), सर्व लोकांची श्रद्धा (जीवनविषयक निष्ठा) त्यांच्या प्रकृतिस्वभावाला अनुसरून होत असते. मनुष्य हा श्रद्धामय आहे. जशी ज्याची श्रद्धा त्याप्रमाणे तो (बनत) असतो.'

व्य. – कोणतेही काम करण्यापूर्वी त्याविषयीचे ज्ञान हवे. तसेच ते काम आपल्या कल्याणाचे आहे असा निश्चय होऊन, आता आपण ते करावे अशी बुद्धी उत्पन्न झाली पाहिजे. अशा प्रकारची बुद्धी म्हणजेच श्रद्धा होय. श्रद्धेमुळेच मनुष्य कोणतेही काम करण्यास प्रवृत्त होतो व त्या कामातून त्याच्या व्यक्तिमत्वाला आकार येत जातो. प्रत्येकाच्या स्वभावधर्मानुसार व संस्कारानुसार त्याचे ज्ञान व श्रद्धा असते. म्हणून त्या त्या व्यक्तीचे यथार्थ दर्शन त्याच्या श्रद्धा समजूनच करून घ्यावे लागते.

४७२. श्रुतं हरति पापानि

सं. – मार्कंडेय पु. १२.२३. देवीमाहात्म्याच्या पठण-श्रवणाचे फल सांगताना त्यातील देवीच्या अवतार-लीलावर्णनाच्या श्रवणाचे फल येथे सांगितले आहे.

मू. – **श्रुतं हरति पापानि तथारोग्यं प्रयच्छति ।**
रक्षां करोति भूतेभ्यो जन्मनां कीर्तनं मम ॥

अ. – ‘माझ्या अवताराच्या वर्णनाचे श्रवण पाप नष्ट करते, आरोग्य देते आणि (हिंस्त्र) प्राण्यांपासून रक्षण करते.’

व्य. – ‘शास्त्र किंवा हरिकथा-श्रवण ही आध्यात्मिक साधनेची पहिली व महत्त्वाची पायरी आहे. त्यानंतर मनन-निदिध्यासन यांचा क्रम आहे. श्रवणामुळे कुसंस्कार, दुर्विचार नष्ट होतात, म्हणजेच पाप नष्ट होते. जे ऐकावे तेच मनात येते म्हणून नेहमी सद्‌विचार निर्माण होतील असेच ऐकावे. मात्र या कानाने ऐकून त्या कानाने सोडून दिले, अशा प्रकारच्या श्रवणाने हा लाभ होणार नाही. (त्याला खऱ्या अर्थाने श्रवणही म्हणता येणार नाही.) श्रवणाचे माहात्म्य या उक्तिविशेषाने सांगितले जाते.

४७३. श्रुतानुभावो व्यसनं हि पुंसाम्

सं. – भाग. १२.१२.४७. शुकाचार्यांनी परीक्षित राजाला आत्ममुक्तीचा मार्ग सांगताना अकराव्या स्कंधात विविध आख्याने-उपाख्याने ऐकविली. बाराव्या स्कंधात भक्तिमाहात्म्य वर्णिले असून कलियुगात नामसंकीर्तन हाच भगवत्प्राप्तीचा उपाय सांगितला आहे.

सू. – **संकीर्त्यमानो भगवाननन्तः श्रुतानुभावो व्यसनं हि पुंसाम् ।**
प्रविश्य चित्तं विधुनोत्यशेषं यथा तमोऽर्कोऽभ्रमिवातिवातः ।।

अ. – ‘जसा सूर्य अंधाराचा नाश करतो किंवा वेगवान वायू मेघांना नाहीसे करतो तसे भगवान अनन्ताचे गुणकीर्तन केल्यास वा त्याचा प्रभाव ऐकल्यास तो भगवान त्या (भक्तिमान) माणसाच्या हृदयात प्रवेश करून त्याची सर्व दुःखे नष्ट करतो.’

व्य. – ज्ञानयोगाबरोबरच व्यासांनी भक्तीचे माहात्म्य वर्णिले. कारण ‘कलौ तु केवला भक्तिर्ब्रह्मसायुज्यकारिणी’ आहे. परमात्म्याविषयी भक्तिभाव सर्वत्र वाढवून श्रीहरीच्या गुणानुवादकीर्तनात सर्वांना रंगवून त्यांचे जीवन आनंदमय करणे हेच भागवताच्या शिकवणुकीचे उद्दिष्ट आहे. या उक्तिविशेषाने भगवदभक्ताला दिलासा दिलेला आहे.

४७४. षट्कर्णो भिद्यते मंत्रः

सं. – महा. १. प्रवि. ८१.१५३. प्रउ. पांडव पराक्रमी व बलिष्ठ होत चाललेले पाहून धृतराष्ट्र असूयेने अस्वस्थ झाला आणि त्याने राजनीतिप्रवीण अशा कणिक नावाच्या मंत्र्याला बोलावून पांडवांचे वर्चस्व कमी कसे करावे याबद्दल सल्ला विचारला. त्या वेळी कणिकाने राजकारणाचे अनेक नियम धृतराष्ट्राला सांगितले.

पंच. १.१०८. पिंगलक सिंहाच्या जुन्या मंत्र्याचा पुत्र दमनक त्याच्या भेटीस आला, तेव्हा पिंगलकाने त्याला कुशलप्रश्न विचारले. आपली स्वामिनिष्ठा प्रकट

करून त्याने राजा पिंगलकाशी एकांतात बोलण्याची इच्छा व्यक्त केली व एकांतात सल्लामसलत करण्याचे महत्त्व सांगितले.

हित. ३.३६. कर्पूरद्वीपातील जलचर व पक्षी यांचा राजा हिरण्यगर्भ याने दीर्घमुख बकाला दूत म्हणून आपल्या शत्रूकडे–चित्रवर्ण मयूर राजाकडे पाठविण्याचे ठरविले तेव्हा त्याच्याबरोबर दुसरा एक बगळा गुप्तपणे पाठवावा असे त्याच्या मंत्र्याने सुचविले.

मू. – षट्कर्णश्छिद्यते मंत्र इति नीतिषु पठ्यते ।
निःसृतो नाशयेन्मंत्रो हस्तप्राप्तामपि श्रियम् ।। महा. १.प्रवि. ८१.१५३. प्रउ.

अ. – ‘(तीन लोकांच्या) सहा कानावर गेलेला मंत्र (गुप्त बेत) फसतो असा राजकारणाचा नियम सांगितला आहे. हाती आलेली लक्ष्मीही गुप्त ठेवण्यायोग्य गोष्टी लोकांना कळल्यामुळे नष्ट होते.’

मू. – षट्कर्णो भिद्यते मंत्रश्चतुष्कर्णः स्थिरो भवेत् ।
तस्मात्सर्वप्रयत्नेन षट्कर्णं वर्जयेत्सुधीः ।। पंच. १.१०८.

अ. – ‘सहा कानांनी ऐकला गेलेला मंत्र (गुप्त मसलत) फुटतो (त्याची गुप्तता नाहीशी होते). चार कानांवर पडला असताना तो स्थिर (गुप्त) राहातो. म्हणून सर्व प्रकारे खबरदारी घेऊन (मंत्र) षट्कर्णी होऊ नये याची काळजी शहाण्यानी घ्यावी.’

मू. – षट्कर्णो भिद्यते मंत्रस्तथा प्राप्तश्च वार्तया ।
इत्यात्मना द्वितीयेन मंत्रः कार्यो महीभृता ।। हित. ३.३६.

अ. – ‘सहा कानांवर गेलेला गुप्त बेत फुटतो; तसेच (लोकांत) कळलेल्या बातमीने (त. फुटतो). म्हणून राजाने स्वतः दुसऱ्याशी एकांतात गुप्त बोलणे करावे.’

व्य. – राजकारणात गुप्त मसलती-मंत्रणेला फार महत्त्व असते. आपला बेत शत्रूला कळू न देता, तो सावध होऊन प्रतिकाराला सज्ज होण्यापूर्वी पार पाडता आला तर त्या कार्याच्या यशाची आशा संबंधित अशा दोनच व्यक्तींमध्ये न राहाता गुप्त बेत तीन माणसांनी ऐकला–षट्कर्णी झाला म्हणजे तिसऱ्याने चौथ्याला व त्याने इतरांना सांगून तो सगळ्यांना कळतो आणि त्याविरुद्ध उपाययोजना होऊन तो अयशस्वी होतो. हा राजकारणातला अलिखित नियम आहे. नित्य व्यवहारातही आपला एखादा बेत–एखादी कल्पना तिला काही मूर्त स्वरूप येण्यापूर्वी अनेकांना सांगितली तर ती यशस्वी होत नाही, असा अनुभव येतो. म्हणून आपल्या मनातली गोष्ट सर्वांना सांगत सुटू नये, असा इशारा या उक्तिविशेषाने दिला जाते.

४७५. षड्विधं प्रीतिलक्षणम्

सं. – पंच. २.५०. लघुपतनक कावळा व हिरण्यक उंदीर या दोघांची मैत्री जमली.

सुखसंवाद करीत, एकमेकांना मदतीचा हात देत त्यांचे दिवस आनंदात जात होते. त्यांच्या मैत्रीला उद्देशून आलेले हे सुभाषित आहे.

हित. ४.१३. वानराला फसवून नेऊन मारून खाण्याच्या इच्छेने मगराने त्याच्याजवळ प्रेमाचा बहाणा करून त्याला आपल्या घरचा पाहुणचार घेण्याची विनंती केली. वानराने त्याच्या प्रेमाचे कौतुक केले व तो मगराबरोबर जाण्यास तयार झाला.

मू. – ददाति प्रतिगृह्णाति गुह्यमाख्याति पृच्छति ।
भुङ्क्ते भोजयते चैव षड्विधं प्रीतिलक्षणम् ।।
(दोन्ही ठिकाणी श्लोक सारखाच आहे.)

अ. – ‘ (द्रव्यादी) देतो आणि घेतो; स्वत:चे मनोगत सांगतो आणि विचारतो; (मित्राकडे) स्वत: जेवतो आणि त्याला जेवायला घालतो; अशी सहा प्रकारची प्रेमाची लक्षणे सांगितली आहेत.’

व्य. – दोन माणसांमध्ये प्रेम, मैत्री आहे हे कोणत्या लक्षणांवरून ओळखावे हे वरील उक्तिविशेषात सांगितले आहे,

(स)

४७६. स बाह्याभ्यन्तरः शुचिः

सं. – पूजेतील प्रोक्षणाचा मंत्र. याचा उच्चार करून कलशातील पाणी फुलाने किंवा तुलसीपत्राने स्वत:च्या मस्तकावर व पूजेच्या साहित्यावर शिंपडतात.

महा. १३.१११.९. दानधर्म या उपपर्वात युधिष्ठिराने भीष्मांना तीर्थ, शुचिता, स्वच्छता यांची लक्षणे विचारली. भीष्मांनी शुचि-पवित्र कोण, हे सांगितले.

मू. – अपवित्रः पवित्रो वा सर्वावस्थांगतोऽपि वा ।
यः स्मरेत् पुंडरीकाक्षं सबाह्याभ्यन्तरः शुचिः ।। प्रोक्षणमंत्र

अ. – ‘अशुची (अपवित्र) किंवा शुची (पवित्र) असो, कोणत्याही अवस्थेत असो, जो कमलनेत्र विष्णूचे स्मरण करील तो अंतर्बाह्य पवित्र आहे असे समजावे.’

मू. – नोदकक्लिन्नगात्रस्तु स्नात इत्यभिधीयते ।
स स्नातो यो दमस्नातः स बाह्याभ्यन्तरः शुचिः ।। महा. १३.१११.९.

अ. – ‘अवयव पाण्याने भिजले म्हणून स्नान झाले असे म्हणणे योग्य नाही. दम (इंद्रियसंयम) रूपी जलाने जो भिजला तो आंतर्बाह्य निर्मळ झाला, असे समजावे.’

व्य. – पूजा, जप आदी करण्याचे वेळी शरीर आणि मन दोन्ही पवित्र असावीत अशी अपेक्षा असते. त्यातही बाह्य स्वच्छता, सोवळे यापेक्षा मनाचा निर्मळपणा अधिक महत्त्वाचा आहे, हे या उक्तिविशेषाने सुचविले जाते. त्याचप्रमाणे, इतर

सर्व विषय-विचार सोडून ईश्वरस्मरण करणे, हे सर्व प्रकारच्या पावित्र्याचे गमक आहे हे या उक्तिविशेषाने सांगितले जाते.

४७७. सजीवं दहते चिन्ता

सं. – सप. स. ७४.

सुर. ७.६७०. चिंतेमुळे मनुष्य स्वतःच स्वतःचे नुकसान करून घेतो; अनेक वेळा त्याला स्वतःला हे कळत असूनही चिंता करणे तो टाळू शकत नाही. प्रत्येकाला येणारा हा अनुभव या सुभाषितात वैचित्र्यपूर्ण पद्धतीने सांगितला आहे.

मू. – **चिता चितासमा ह्युक्ता बिंदुमात्र विशेषतः ।**
सजीवं दहते चिन्ता निर्जीवं दहते चिता ।। सप. स ७४.

अ. – '(प्रेताला जाळणारी) चिता आणि चिंता एका अनुस्वाराच्या भेदाने एकच आहे असे म्हटले जाते. चिंता जिवंत माणसाला जाळते तर चिता प्राण गेलेल्या शवाला जाळते.'

मू. – **चिता दहति निर्जीवं चिंता जीवं दहत्यहो ।**
बिंदुनैवाधिका चिंता चितात्यल्पा हि भूतले ।। सुर. ७.६७०.

अ. – 'प्राणहीन झालेल्या देहाला चिता जाळते, तर चिंता जिवंत माणसाला भाजून काढते. खरोखर या जगात चिता अगदी थोडी (जाळते) तर चिंता (जाळण्याच्या कामात) तिच्याहून एका बिंदूने वरचढ आहे.'

व्य. – काळजी करणे हा सर्वसामान्य माणसाच्या स्वभावाचा एक विशेष आहे. प्रत्येकाला जीवनात काही ना काही चिंता असतेच. ही चिंता मनात राहून साऱ्या जीवनाला शुष्क करते; शक्तीचा, धैर्याचा नाश करते. 'चितासमं नास्ति शरीर-शोषणम्' हे याच अर्थाचे वचन आहे. 'चिता ही कुंकू लावून (अनुस्वाराचे), समाजात हिंडते आणि माणसाला जाळते' हे मराठी वचनही वरील अर्थाचे आहे. चिंतेने होणाऱ्या भयंकर हानीचे दर्शन घडविणारा म्हणून हा उक्तिविशेष प्रसिद्ध आहे.

४७८. सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः

सं. – शाकु. १.१९. कण्व ऋषींच्या आश्रमात प्रवेश केल्याबरोबर दुष्यंत राजाला शकुंतला, प्रियवंदा इ. आश्रमकन्यका दिसल्या. त्या झाडांना पाणी घालीत होत्या. शकुंतलेला पाहून राजा तिच्यावर लुब्ध झाला. ती कण्व ऋषींची कन्या–ब्राह्मणकन्या आहे की काय अशी शंका त्याला आली. पण ती क्षत्रियकन्याच आहे अशी ग्वाही त्याच्या अंतःकरणाने दिली.

मू. – **असंशयं क्षत्रपरिग्रहक्षमा यदार्यमस्यामभिलाषि मे मनः ।**
सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः ।।

अ. – 'ज्या अर्थी शुभ संस्कारांनी युक्त असे माझे मन हिच्याकडे ओढ घेत आहे त्या अर्थी ही (शकुंतला) क्षत्रियाशी विवाह करण्यास योग्य आहे. एकाद्या गोष्टीत संशय उत्पन्न झाला असतांना सज्जनांची अंतःप्रेरणा हेच (सत्य सांगणारे) प्रमाण होय.'

व्य. – एकादा संशय, पेचप्रसंग निर्माण झाला असताना प्रथम अंतःकरणात स्फुरणारा विचार सत्य असतो, मार्गदर्शक असतो, असा अनुभव अंतर्मुख होऊन विचार करणाऱ्या सामान्य माणसालाही येतो. 'आतला आवाज', 'अंतःकरणाची साक्ष' या शब्दांत अशा विचाराचे वर्णन केले जाते. धर्माचे लक्षण करतानाही वेद, स्मृति आदी धर्मशास्त्रांबरोबर 'विकल्प उत्पन्न झाला असताना स्वतःच्या अंतःकरणाला योग्य, प्रिय वाटणारा निर्णय' असे एक लक्षण केले आहे. ('श्रुतिः स्मृतिः सदाचारः स्वस्य च प्रियमात्मनः') मात्र धर्माला अनुसरून, सरल प्रवृत्तीने वागणाऱ्या माणसांच्याच अंतःकरणाची साक्ष प्रमाण मानावी, असे या उक्तिविशेषाने सुचविले आहे.

४७९. सत्यं वद धर्मं चर

सं. – तैत्ति. शीक्षा ११.१. ब्रह्मज्ञान होण्यासाठी चित्तशुद्धी होणे आवश्यक आहे. त्यासाठी शास्त्रानुसार, निष्ठेने कर्म करावे असे उपनिषदांत आग्रहपूर्वक सांगितले आहे.

मू. – सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः ।...

अ. – 'सत्य भाषण कर. धर्माचे आचरण कर. अध्ययन करण्याचे चुकवू नकोस.'

व्य. – प्राचीन काळी शिक्षण पुरे झाल्यानंतर गुरुकुलाचा निरोप घेऊन विद्यार्थी घरी जात व गृहस्थाश्रमाचा स्वीकार करीत. गुरुकुल सोडताना आचार्य जो 'दीक्षान्त उपदेश' करीत, त्यातील हा सुरुवातीचा, महत्त्वाचा भाग आहे. आजही विश्वविद्यालयांतील पदवीदान समारंभात दीक्षान्त भाषण करण्यापूर्वी या आदेशाचा उच्चार केला जातो. शब्दज्ञान प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार आचरण झाले पाहिजे. त्या आचरणाचे नियम या आदेशामध्ये स्पष्ट शब्दांत सांगितले आहेत.

४८०. सत्यमेव जयते नानृतम्

सं. – मुंडक. ३.१.६. चित्तातील कामक्रोधादी मल नष्ट झाल्याशिवाय आत्मज्ञान होऊ शकत नाही. तप, ब्रह्मचर्य, सत्यपालन हे चित्तशुद्धीचे उपाय सांगितल्यानंतर सत्याचे स्वरूप व श्रेष्ठत्व उपनिषत्कारांनी प्रकट केले आहे.

मू. – सत्यमेव जयति● नानृतं सत्येन पन्था विततो देवयानः ।
येनाऽऽक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा यत्र तत्सत्यस्य परमं निधानम् ॥

● जयते : पाठभेद

अ. – 'सत्याचाच (सत्यपालन करणाऱ्याचाच) जय होतो; असत्याचा नाही. सत्याने देवयानमार्ग सतत विस्तृत झाला आहे. ज्या मार्गाने चालताना त्या

सत्याचे श्रेष्ठ असे जे आश्रयस्थान असते, तेथे पूर्णकाम ऋषी जाऊन पोहोचतात.'

व्य. – आपल्या भारतीय संघराज्याचे ध्येयवाक्य म्हणून हे वाक्य सर्वांना परिचयाचे आहे. सत्य पालन करणे हे व्यक्तीच्या आणि समाजाच्या हिताचे आहे. त्यामुळेच सर्वांचे रक्षण होते. मोक्षाला कारणही मुख्यत: सत्यच आहे. शरीर, वाणी आणि मन यांनी सत्यपालन करणे, म्हणजे जसा मनाचा निश्चय तसे बोलणे व तशीच कृती करणे होय; तेच आपल्या अंतिम कल्याणाचे साधन आहे हे सत्य द्रष्टचा ऋषींनी सांगून ठेवले आहे.

४८१. सत्ये सर्वं प्रतिष्ठितम्

सं. – महा. १४.१५६.५ ज्या सत्यधर्माची सर्व ऋषी, देवता स्तुती करतात त्या सत्याचे लक्षण काय ते कसे प्राप्त करून घ्यावे व त्याचे फल काय, या युधिष्ठिराच्या प्रश्नांना उत्तर देतांना, आपद्धर्मपर्वात भीष्माचार्यांनी या श्लोकात सत्याचे महत्त्व सांगितले आहे. (परिशिष्ट पाहा)

मू. – सत्यं धर्मस्तपो योगः सत्यं ब्रह्म सनातनम् ।
सत्यं यज्ञः परः प्रोक्तः सत्ये सर्वं प्रतिष्ठितम् ।।

अ. – 'सत्य हा (च) धर्म, तप व योग होय. सत्य म्हणजेच तीनही कालांत अबाधित असणारे ब्रह्म होय. सत्य हा श्रेष्ठ यज्ञ म्हणून सांगितला आहे. सत्य सर्व वस्तूंचा आधार (प्रतिष्ठा) आहे.'

व्य. – 'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म' असे ब्रह्माचे वर्णन केले जाते. जगाचे मूळ ब्रह्म म्हणजे सत्य आहे. त्या सत्याचा शोध घेणाऱ्या सर्व उपायांना, मार्गांना 'सत्य' ही संज्ञा गौणार्थाने दिली जाते. सत्याचे माहात्म्य सांगणारा म्हणून हा उक्तिविशेष प्रसिद्ध आहे.

४८२. सत्संगात् भवति हि साधुता खलानाम्

सं. – सुर. २. सत्संगतिप्रशंसा २७. साधुसंगतीचे माहात्म्य आपल्या सर्व धर्मग्रंथांतून पुन:पुन्हा वर्णिलेले आहे. स्वत:चा उद्धार करून घेण्याचे ते एक महान साधन आहे. साधूंच्या स्वभावाचे एक वैशिष्टच येथे सांगितले आहे.

मू. – सत्सङ्गात् भवति हि साधुता खलानां साधूनां नहि खलसंगमात्खलत्वम् ।
आमोदं कुसुमभवं मृदेव धत्ते मृद्गंधं न हि कुसुमानि धारयन्ति ।।

अ. – 'सज्जनांच्या संगतीमुळे दुष्टांची (कुटिल) वृत्ती सरळ बनते; मात्र दुर्जनांच्या संगतीमुळे साधूंच्या वृत्तीत कुटिलता येत नाही. फुलांमधून दरवळणारा सुगंध माती धारण करते; मातीचा वास फुलांना लागत नाही.'

व्य. – साधुत्वाची एक कसोटीच या उक्तिविशेषाद्वारे सांगितली जाते. साधूंच्या अलौकिक औदार्याने, ईश्वरनिष्ठेने व प्राणिमात्रांविषयीच्या प्रेमाच्या दर्शनाने,

दरवडेखोर, खुनी माणसांच्या जीवनात परिवर्तन झाल्याची उदाहरणे संतचरित्रांमध्ये अनेक आढळतात. उलट, दुष्ट मनुष्याने कितीही कुटिल कारवाया केल्या तरी संत आपल्या साधुवृत्तीपासून ढळत नाहीत. तसेच सत्संगतीचा प्रभाव फार मोठा असतो, हे या उक्तिविशेषाने सुचविले जाते.

४८३. सन्तश्चारित्रभूषणाः

सं. – वारा. ६.११३.४२. रावणवधाची वार्ता घेऊन आलेल्या मारुतीचे हात, सीतेला छळणाऱ्या राक्षसींचा वध करण्यासाठी फुरफुरत होते. पण सीतेने त्याला तसे करण्यापासून परावृत्त केले व सज्जनोचित धर्माचे स्मरण करून दिले.

मू. – **न परः पापमादत्ते परेषां पापकर्मणाम् ।**
समयो रक्षितव्यस्तु सन्तश्चारित्रभूषणाः ॥

अ. – 'अपराध करणाऱ्या पापकर्मी लोकांवर सज्जन लोक उलट अपकार करीत नाहीत. सदाचरण हेच सज्जनांचे भूषण आहे; त्या सदाचाराच्या नियमांचे रक्षण त्यांनी केलेच पाहिजे.'

व्य. – 'जशास तसे' म्हणून अपकाराची फेड अपकारानेच करावी हे सामान्य, व्यवहारी माणसाचे कृत्य आहे. उलट अपकार करणाऱ्यावरही उपकार करणे हे सज्जनांचे व्रत असते. कष्ट सहन करूनही आपल्या या व्रताचे पालन करण्यात ते कधीही चुकत नाहीत. सज्जनांचे गुण सांगताना या उक्तिविशेषाचा उच्चार केला जातो.

४८४. समरे चापलायनम्

सं. – महा.१२.१४.१६. राजधर्मपर्वात कर्णवधाने निराश झालेल्या युधिष्ठिराला द्रौपदी कर्तव्याचे स्मरण करून देते. कर्णाच्या मृत्यूने शोकसंतप्त झालेला युधिष्ठिर राज्यप्राप्तीची आशा सोडून अरण्यात जाण्याची इच्छा करतो. त्या वेळी त्याच्या चारही भावांप्रमाणे पत्नी द्रौपदीनेही त्याला हा उपदेश केला :

मू. – **असतां प्रतिषेधश्च सतां च परिपालनम् ।**
एष राज्ञां परो धर्मः समरे चापलायनम् ॥

अ. – 'दुर्जनांचा प्रतिकार आणि सज्जनांचे रक्षण करणे व तसेच युद्धातून पळून न जाणे, हा राजांचा श्रेष्ठ धर्म आहे.'

व्य. – युद्ध चालू असताना त्यातून पळ काढणे, शत्रूला पाठ दाखवून जीव वचावण्याची धडपड करणे नामर्दपणाचे लक्षण आहे. खरे शूर पुरुष युद्धात जिवाची पर्वा करीत नाहीत. राजाच्या अनेक आवश्यक गुणांपैकी एक म्हणून या गुणाचा या उक्तिविशेषाने उच्चार केला जातो.

४८५. समलोष्टाश्मकाञ्चनः

सं. – भगी. ६.८. स्वतःची इंद्रिये व मन ताब्यात ठेवून ज्याने स्वतःचा उद्धार करून घेतला व जो सुखदुःखादी द्वंद्वाच्या पलीकडे गेला, अशा योगी पुरुषाचे वर्णन श्रीकृष्णांनी या श्लोकात केले आहे.

महा. ३.२४७.४२. व्रीहिद्रौणिकपर्वात, वनवासात असलेल्या पांडवांना व्यासांनी, स्वर्गसुख नाकारणाऱ्या मौद्‌गल्य ऋषींची कथा सांगितली; व त्याने मोक्ष मिळविण्यासाठी कशा प्रकारचे आचरण केले हे येथे सांगितले आहे.

महा. १२.२३२.३१. शुकाचार्यांना मोक्षधर्माचा उपदेश करताना व्यासांनी समत्वबुद्धीच्या आचरणाचे स्वरूप येथे स्पष्ट करून सांगितले आहे.

रघु. ६.२१. पराक्रमी रघु राजा आपला पुत्र अज वयात आल्याबरोबर त्याच्यावर राज्यकारभार सोपवून स्वतः संन्यस्त वृत्तीने वनात राहू लागला.

पंच. ३.२०३. ससाण्यावर प्रहार करून उंदराला सोडविणाऱ्या शालंकायन नावाच्या ब्राह्मणाला जखमी झालेल्या ससाण्याने दोष दिला व मुनीच्या धर्माचे स्मरण करून दिले.

मू. – ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेन्द्रियः ।
युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचनः ।। भगी. ६.८.

अ. – ‘(जो) (शब्द) ज्ञान व साक्षात्कार (प्रत्यक्ष अनुभव) यांच्या योगाने पूर्ण शांत झालेला आहे, (जो) नित्य अशा आत्मस्वरूपामध्ये स्थिर झाला आहे, (ज्याने) आपली इंद्रिये ताब्यात ठेवली आहेत आणि मातीचे ढेकूळ, दगड व सोने यांच्याविषयी ज्याची बुद्धी समान झाली आहे अशा योगी पुरुषास ‘युक्त’ म्हणजे सिद्धावस्थेस पोहोचलेला असे म्हणतात.’

मू. – तुल्यनिंदास्तुतिर्भूत्वा समलोष्टाश्मकांचनः ।
ज्ञानयोगेन शुद्धेन ध्याननित्यो बभूव ह ।। महा. ३.२४७.४२.

अ. – ‘निंदा आणि स्तुती सारखीच मानून, माती, दगड आणि सोने याबद्दल समान बुद्धी ठेवून, पवित्र अशा ज्ञानोपासनेच्या योगाने तो नित्य ध्यानामध्ये मग्न होऊन राहात असे.’

मू. – वेदनार्ताः प्रजा दृष्ट्वा समलोष्टाश्मकांचनः ।
एतस्मिन्निरतो मार्गे विरमेन्न विमोहितः ।। महा. १२.२३२.३१.

अ. – ‘(संसारातील) दुःखांनी पीडित झालेले लोक पाहून, माती, दगड व सोने समान मानून, विरक्त होऊन या मार्गावर मोहरहित होऊन, चालत असताना थांबू नये. (हा मार्ग सोडू नये).’

मू. – पणबन्धमुखान् गुणानजः षड्पायुङ्क्त समीक्ष्य तत्फलम् ।
रघुरप्यजयत् गुणत्रयं प्रकृतिस्थं समलोष्टकांचनः ।।

अ. – ' (पण) संधि (तह), विग्रह (लढाई) आदी सहा उपायांना (गुणांनी) त्यांची फळे नीट पाहून, योजिता झाला; व रघूने देखील मातीचे ढेकूळ व सोने यांना सारखे मानून स्वतःच्या प्रकृतीतील सत्त्व, रज व तम या तीनही गुणांवर विजय मिळविला. '

मू. – समः शत्रौ च मित्रे च समलोष्टाश्मकांचनः ।
सुहृन्मित्रे ह्युदासीनो मध्यस्थो द्वेष्यबंधुषु ।। पंच ३.२०३.

अ. – ' (मुनी) शत्रू आणि मित्र यांच्या बाबतीत समान वृत्ती धारण करणारा, मातीचे ढेकूळ, दगड आणि सोने यांना सारखीच किंमत देणारा, निकटवर्ती व मित्र यांच्या बाबतीत तसेच द्वेष करण्यास योग्य असलेल्यांच्या व कुटुंबियांच्या बाबतीत (सुद्धा) उदासीन व निःपक्षपाती असतो. '

व्य. – माती, दगड म्हणजे कःपदार्थ ! त्याला काडीचीही किंमत नाही. उलट जगात सर्वांत मौल्यवान कोणता पदार्थ असेल तर ते सोने. म्हणजे मोलाच्या दृष्टीने दगड-माती आणि सोने ही दोन टोके. सर्वसामान्य माणूस यांतल्या दुसऱ्या टोकाकडे सोन्याकडे आकर्षिला जातो, हे साहजिक आहे. परंतु या दोन्ही गोष्टींकडे समभावाने, सारख्याच उदासीनपणे पाहणारा समत्वबुद्धी प्राप्त झालेला महात्मा हा फार उच्च कोटीचा म्हणावा लागेल. अशा महात्म्यांचे-समत्वबुद्धी झालेल्यांचे वर्णन वरील उक्तीने केले जाते.

४८६. समानशीलव्यसनेषु सख्यम्

सं. – पंच. १.३०५. एकाच स्वभावाचे, वृत्तीचे लोक एकत्र येतात, नव्हे तसे येणेच इष्ट असते हे संजीवक (बैल) नावाच्या मित्राला पटवून देताना दमनकाने (कोल्हा) चंडरवाची कथा सांगितली. एका नगरातील शिकारी कुत्र्यांनी शहरात शिरलेल्या चंडरव नामक कोल्ह्यावर हल्ला चढविला. तीक्ष्ण दातांनी चावणाऱ्या कुत्र्यांपासून बचाव करताना चंडरव निळीच्या हौदात पडला. निळ्या रंगाचा लेप बसलेल्या चंडरवाला अरण्यातील पशुपक्षी घाबरू लागले. ते पाहून तो त्यांचा राजा बनला. काही कालाने त्याचे बांधव दृष्टीस पडताच हर्षातिरेकाने तो ओरडू लागला. हा कोल्हा आहे हे लक्षात येऊन सर्वांनी त्याला ठार मारले. म्हणून भलत्याशी मैत्री करण्याचे साहस करू नये असे दमनकाने सुचविले.

सप. स २५.

मू. – मृगा मृगैः सङ्गमनुव्रजन्ति गावश्च गोभिस्तुरगास्तुरङ्गैः ।
मूर्खाश्च मूर्खैः सुधियः सुधीभिः समानशीलव्यसनेन सख्यम् ।। पंच. १.३०५.

अ. – ' हरिणांशी हरीण, गायींशी गाय, अश्वांशी अश्व, मूर्ख माणसांशी मूर्ख माणूस आणि ज्ञात्याशीच ज्ञानी व्यक्ती मैत्री करतात, त्यांची संगत धरतात. ज्यांचा स्वभाव आणि आवडीनिवडी एकसारख्या असतील अशांचीच मैत्री जुळते. '

मू. – स राघवेन्द्रो हृतराजदारः स वानरेन्द्रो हृतराजदारः ।
एवं तयोरध्वनि दैवयोगात् समानशीलव्यसनेषु सख्यम् ।। सप. स २५.

अ. – ‘ज्यांचे राजपद व पत्नी हिरावली (दुरावली) गेली अशा रघुकुलश्रेष्ठ (राम) व वानरवीर (सुग्रीव) यांची नशिबानेच युद्धात मैत्री जडली. खरोखर वृत्ती आणि आपत्ती समान असलेल्यांचीच मैत्री होते.’

व्य. – सर्वसामान्यपणे स्वभाव, आवडीनिवडी सारख्या असतील अशांचीच मैत्री जुळते. क्वचित् प्रसंगी विरुद्ध स्वभावाची माणसे जरी एकत्र आलेली आढळली तरी ती काहीतरी हेतूने एकत्र येतात आणि ही हेतुनिष्ठ मैत्री क्षणकालच टिकते म्हणून समानशील व्यक्तीच जिव्हाळ्याचे मित्र होऊ शकतात, एकमेकांच्या सहवासाचे आनंद-सुख अनुभवतात. हे नेहमी प्रत्ययाला येणारे सत्य या उक्तिविशेषाने सांगितले जाते. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र **‘समानशीले व्यसनेषु सख्यम्’** असा पाठ रूढ असून ‘समान आचारविचाराची माणसे समान संकटांत सापडली की त्यांची मैत्री होते’ असा त्याचा सरधोपट अर्थ केला जातो.

४८७. सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति

सं – पांडवगीता उपसंहार ८०. पांडव, विदुर, सनत्कुमार आदी महान् भगवद्भक्तांनी भगवान् श्रीकृष्णाच्या केलेल्या स्तवनाच्या अखेरीस त्याच्या पठनाची फलश्रुती सांगितल्यानंतर या श्लोकाने स्तवनाची समाप्ती केली आहे.

मू. – आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ।।

अ. – ‘आकाशातून पडलेले पाणी ज्याप्रमाणे सागराकडे जाते, त्याप्रमाणे सर्व (कोणत्याही) देवांना केलेला नमस्कार श्रीकेशवाला पोहोचतो.’

व्य. – परमेश्वर एकच आहे. वेगवेगळ्या स्वभावाच्या उपासकांनी प्रिय मानलेली वेगवेगळी दैवते म्हणजे त्या एका तत्त्वाचीच वेगवेगळी सगुण रूपे किंवा अवतार आहेत; केवळ कार्यभेदानुसार त्यांचे वर्णन केले जाते. हे तत्त्व सांगण्यासाठी येथे ‘आकाशातून कोणत्याही डोंगरावर, भूमीवर पडलेले पाणी अखेर कोणत्या ना कोणत्या नदीत मिसळून समुद्राशीच एकरूप होते,’ हा साधा सोपा दृष्टान्त दिला आहे. हा श्लोक संस्कृत पठन-पाठन करणाऱ्या सर्वांच्या मुखी असतो.

४८८. सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज

सं. – भगी. १८.६६. गीतेचा हा भक्तिपर उपसंहार आहे. परमेश्वरप्राप्तीचे अनेक मार्ग आचरण्याऐवजी भगवंताची दृढ भक्ती कर असे येथे सांगितले आहे.

मू. – सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।।

अ. – 'सर्व (साधनमार्गांचे) धर्म सोडून तू मला एकटयालाच शरण ये. मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन. काळजी करू नकोस.'

व्य. – बाह्य व आंतरिक धर्म-अधर्म, पाप-पुण्य अशा सर्व द्वंद्वांचा त्याग, तसेच अहंकाराचा त्याग येथे अभिप्रेत आहे. तसे झाल्याशिवाय संपूर्ण शरणागती, 'मी'चा लय साधत नाही. आणि 'मी'चा लय झाल्यावाचून पाप-पुण्य, शोक-मोह सुटत नाहीत, मोक्ष मिळत नाही. भगवत्पदी अनन्य शरणागतीचे रहस्य म्हणून हा उक्तिविशेष प्रसिद्ध असला तरी सर्वसामान्य व्यवहारात विशिष्ट धर्मपंथ असा अर्थ लावून 'त्या सर्व धर्मांच्या अतीत हो' असा अर्थही काही मंडळी या उक्तीवरून लावतात. परंतु वास्तविक येथील 'धर्म' शब्द ईश्वरप्राप्तीच्या अनेक मार्गांशी संबंधित आहे.

४८९. सर्वं खल्विदं ब्रह्म

सं. – छांदोग्य. ३.१४.१. जीव, जगत् आणि जगन्नियंता या त्रयीविषयी तत्त्वचिंतकाला नेहमीच कुतूहल वाटते, कोडे पडते. विश्वाच्या बदलणाऱ्या परिस्थितीतही अखंड व अव्यय राहाणारे तत्त्व कोणते असावे याविषयी औपनिषदिक तत्त्वज्ञानाने सखोल, सांगोपांग उहापोह केला आहे. त्या सर्वाचे मर्म किंबहुना जिज्ञासूला ब्रह्मज्ञानासाठी निश्चय करण्याची प्रेरणा देणारा हा मंत्र आहे.

मू. – सर्वं खल्विदं ब्रह्म तज्जलानिति शान्त उपासीत । अथ खलु क्रतुमयः पुरुषो
यथाक्रतुरस्मिंल्लोके पुरुषो भवति तथेतः प्रेत्य भवति स क्रतुं कुर्वीत ॥

अ. – 'हे (नाम-रूपाने विकार पावलेले) सर्व विश्व ब्रह्मच आहे. त्यातूनच (परम-श्रेष्ठ तत्त्वापासून) उत्पन्न झाले असून त्यातच हे (विश्व) राहाते व शेवटी त्यातच लय पावते (तज्जलान्) हे जाणून रागद्वेषरहित होऊन त्याची (परब्रह्माची) उपासना करावी. खरोखर मनुष्य निश्चयात्मक आहे. कारण येथे (इहलोकी) तो जसा संकल्प (इच्छा, आकांक्षा) करील तसेच तो मृत्यू पावल्यावर होतो. म्हणून (ब्रह्मरूप होण्याचा) निश्चय करावा.'

व्य. – आत्मज्ञान होण्यासाठी किंबहुना परब्रह्माशी एकरूप होण्यासाठी औपनिषदिक तत्त्वज्ञानात पाच चढत्या पायऱ्यांचा सोपान सांगितला आहे. मुमुक्षूने प्रथमतः आत्म्याचे स्वरूप जाणून तोच मी आहे याचे ज्ञान करून घेणे आवश्यक आहे. आत्मा व ब्रह्म एकच असून मी म्हणजेच आत्मा व आत्मा म्हणजे ब्रह्म म्हणून मी म्हणजे ब्रह्मच आहे. पर्यायाने ज्ञाता व ज्ञेय दोन्हीही जर ब्रह्मच आहेत तर या विश्वात दृग्गोचर होणाऱ्या सर्व वस्तू मिळूनच ब्रह्म पूर्ण होते. ही संकल्पना तत्त्वज्ञानाचे अत्युच्च शिखर गाठते. अत्यंत महत्त्वाचे पूर्ण अद्वैताचे तत्त्व साररूपाने सांगणारी म्हणून ही उक्ती प्रसिद्ध आहे.

४९०. सर्वं दुःखं सर्वं क्षणिकम्

सं. – सदसं. बौद्ध. पं. ४७. ऐन तारुण्यात राजवैभवाचा त्याग करून, अनेक वर्षे कठोर तप केल्यानंतर गौतमबुद्धाला ज्या मूळ तत्त्वांचा साक्षात्कार झाला, त्यांचे विवेचन त्याने 'चार भावना' सांगून केले. त्यावरून हा उक्तिविशेष रूढ झाला आहे.

मू. – **सर्वं क्षणिकं, (सर्वं) क्षणिकं दुःखं, (सर्वं) दुःखं स्वलक्षणं, (सर्वं) स्वलक्षणं शून्यं, (सर्वं) शून्यमिति भावनाचतुष्टयमुपदिष्टं द्रष्टव्यम् ।**

अ. – 'सर्व क्षणकाल टिकणारे आहे. क्षणकाल टिकणारे ते सर्व दुःखरूप आहे. दुःखरूप आहे ते स्वतःसारखेच आहे. (प्रत्येक क्षणाचा अनुभव दुसऱ्या अनुभवाहून भिन्न म्हणजे केवळ स्वतःसारखा आहे.) जे केवळ स्वतःसारखे आहे ते सर्व शून्य आहे. (त्याचे अस्तित्वच नाही.) अशा प्रकारच्या चार भावनांचा उपदेश बुद्धाने केला आहे, असे जाणावे.

व्य. – जन्माला आल्यापासून मरेपर्यंत मनुष्य सुखासाठी धडपड करीत असतो. पण त्याच्या वाट्याला दुःखच दुःख येते. दुःखाचे मूळ कारण शोधून ते दूर करण्याचा कसा प्रयत्न करता येईल हा विचारवंतांच्या चिंतनाचा विषय आहे. गौतम बुद्धाने दीर्घ काळ तप करून, जगाचे व आपल्या अनुभवांचे विश्लेषण करून सांगितलेली ही चार 'आर्य सत्ये' म्हणजे बौद्ध तत्त्वज्ञानाची पायाभूत 'चतुःसूत्री.' जीवनाकडे पाहाण्याचा हा एक विशिष्ट दृष्टिकोन त्या अर्थानेच या उक्तिविशेषाचा वापर केला जातो.

४९१. सर्वमात्मवशं सुखम्

सं. – मनु. ४.१६०. दुसऱ्याच्या कष्टामुळे किंवा कृपेमुळे मिळणाऱ्या गोष्टी प्रयत्नपूर्वक टाळाव्यात, हा धर्माचा महत्त्वाचा नियम सांगितल्यानंतर त्याचा हेतू मनूने स्पष्ट केला आहे.

मू. – **सर्वं परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम् ।**
एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ॥

अ. – 'पराधीन असलेल्या सर्व गोष्टींमुळे दुःख निर्माण होते; व स्वाधीनपणे केलेल्या सर्व कामांमुळे सुख मिळते. थोडक्यात सांगायचे तर (स्वावलंबन) सुखाचे व (परावलंबन) हे दुःखाचे कारण आहे.'

व्य. – दुसऱ्याच्या मर्जीवर जगणाऱ्याला अपमान, लाचारी, दारिद्र्य सहन करावे लागते. स्वतःच्या मनगटाच्या जोरावर जो स्वतःची कामे पार पाडतो त्याला सन्मानाने जगता येते. व्यक्तीच्या तसेच समाजाच्या व राष्ट्राच्या बाबतीत हाच न्याय लागू आहे. त्याचा उच्चार या उक्तिविशेषाने केला जातो.

४९२. सर्वं विष्णुमयं जगत्

सं. – महा. २. प्रवि. २१.७१. राजसूय यज्ञाचे वेळी श्रीकृष्णाची अग्रपूजा करण्याचा निर्णय भीष्मांनी प्रकट केला. तो ऐकून शिशुपाल क्रोधाविष्ट झाला. तेव्हा भीष्मांनी श्रीकृष्णाचे माहात्म्य वर्णन करून सांगताना 'सर्व सृष्टिकर्ता विष्णु तोच श्रीकृष्ण आहे' असे म्हटले.

विष्णुपंजरस्तोत्र २३. बृहत्स्तोत्ररत्नाकरात समाविष्ट केलेले हे स्तोत्र मूळ ब्रह्माण्डपुराणातील आहे. इंद्र-नारद संवादात विष्णूचे माहात्म्य नारदांनी विस्ताराने वर्णिले; केवळ माहात्म्य एवढेच त्याचे स्वरूप न ठेवता त्याला तात्त्विक अधिष्ठान दिले.

मू. – चक्रवत् परिवर्तन्ते सर्वं विष्णुमयं जगत् ।
सृष्ट्वा चतुर्मुखं देवं देवो नारायणः प्रभुः ।। महा. २ प्रवि. २१.७१.

अ. – 'रहाटगाडग्याप्रमाणे नित्य बदलणारे हे चराचर विश्व विष्णुमय आहे. (चार तोंडे असलेल्या) ब्रह्मदेवाला निर्माण करून विष्णु या जगताचा पालनकर्ता झाला.'

मू. – जले विष्णुः स्थले विष्णुर्विष्णुः पर्वतमस्तके ।
ज्वालामालाकुले विष्णुः सर्वं विष्णुमयं जगत् ।। विष्णुपंजरस्तोत्र २३.

अ. – 'जलात विष्णु, भूमीवर विष्णु, पर्वतांच्या शिखरावरही विष्णु आहे. (सर्वत्र विष्णु भरून राहिला आहे). तोच विष्णु अग्नीच्या ज्वालांतही आहे. (फार काय) सर्व स्थिरचर विष्णूनेच व्यापले आहे.'

व्य. – 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म' अशी अभंगवाणी उच्चारणाऱ्या तुकोबांनी वरील संस्कृत उक्तिविशेषाचाच अर्थ, प्रत्यक्ष अनुभवून सांगितला आहे. सर्व विश्वात परमेश्वर भरून राहिला आहे, या अनुभूतीने सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी त्याचेच दर्शन घेणाऱ्या ऋषिमुनींची व साधुसंतांची शिकवण साधकाला, परमेश्वराचे तसे दर्शन घेण्यास प्रेरणा देणारी म्हणून महत्त्वाची आहे. या उक्तिविशेषाने संतांचा सत्य अनुभव व त्यापासून प्रेरणा दोन्ही सांगितले जाते.

४९३. सर्वारम्भास्तण्डुलप्रस्थमूलाः

सं. – सुर. २. दरिद्रनिंदा ४०. 'दारिद्र्यमनन्तकं दुःखं' असल्याने दरिद्री व्यक्तीला वारंवार मरणप्राय वेदना भोगाव्या लागतात. परिस्थितीने गांजलेला माणूस आपल्या नशिबाला बोल लावीत आला दिवस ढकलतो. हे त्याचे खेदोद्गारच 'दरिद्रनिंदा' नावाने संग्रहीत केले आहेत.

सुर. २. क्षुधावर्णनम् २. सर्व ऐहिक सुखांत 'पोटापुरते अन्न' मिळणे हेच सर्वोच्च सुख मानले आहे. ते जर नसेल तर क्षुधेच्या ज्वालांत इतर सारी सुखे भस्मसात होतात, निरुपयोगी ठरतात.

मू. – शय्या वस्त्रं चन्दनं चारुहास्यं वीणावाणी सुन्दरी या च नारी ।
न भ्राजन्ते क्षुत्पिपासातुराणां सर्वारम्भास्तण्डुलप्रस्थमूलाः ।।

अ. – '(सुखकर) शय्या, कपडे, चंदन, मोहक हास्य, वीणेचा झंकार किंवा सुंदर स्त्री ह्या गोष्टी तहानेने आणि भुकेने व्याकुळ झालेल्या माणसाला सुखदायक होत (वाटत) नाहीत. कारण कोणत्याही कार्याला प्रारंभ करण्यासाठी शेरभर तांदुळाची गरज असते. (त्याप्रमाणे वरील कोणत्याही उपभोगाचे सुख साधण्यासाठी भूक भागण्याकरिता प्रथम अन्नाची तरतूद होणे आवश्यक असते).'

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे).

व्य. – कोणतेही कार्य हाती घ्यावयाचे, सुरू करावयाचे झाल्यास प्रथम द्रव्याची व्यवस्था करावी लागते; द्रव्याशिवाय कोठेही कोणाचेही काही चालत नाही. या अर्थाने हा उक्तिविशेष उच्चारला जातो. कोणत्याही मंगलकार्याला प्रारंभ करण्यासाठी मापभर किंवा पसाभर तांदूळ देवता मांडण्यासाठी व पूजादी विधीसाठी लागतात. त्याशिवाय त्या कार्याला प्रारंभ करताच येत नाही.त्यावरून तांदूळ असणे म्हणजे समृद्धी असणे आणि समृद्धी म्हणजे संपत्ती असणे आवश्यक अशी संगती लावून, कोणतेही काम करावयाला निघावयाचे तर प्रथम द्रव्य हवे, असे म्हणण्यासाठी हा संकेत रूढ झाला.

४९४. सर्वेऽत्र सुखिनः सन्तु

सं. – वैदिक प्रार्थना. लहान - थोर, गरीब - श्रीमंत, जवळचा - दूरचा, मित्र - शत्रू असे सर्व भेद विसरून प्राणिमात्रांचे कल्याण व्हावे; कोणालाही दुःख भोगावे लागू नये अशा व्यापक स्वरूपाची ही प्रार्थना प्राचीन कालापासून म्हटली जाते. ती केव्हापासून रूढ झाली याबद्दल निश्चित संदर्भ किंवा काळ सांगता येत नाही.

मू. – सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् □ ।।

□ **दुःखभाक् भवेत्** : पाठभेद

अ. – 'या भूमीवरील सर्व लोक सुखी असोत; सर्वजण निरोगी असोत; सर्वांचे कल्याण असो; कोणालाही दुःख प्राप्त न होवो.'

व्य. – सर्वांविषयी सद्भावना निर्माण करणारा हा उक्तिविशेष सामुदायिक व वैयक्तिक प्रार्थनेत समाविष्ट करण्याची प्रथा आहे; वैदिक द्रष्टयांची व्यापक समष्टिभावना या उक्तिविशेषाने प्रकट होते. मनुष्यजातीच्या सार्वत्रिक कल्याणाची इच्छा प्रकट करणाऱ्या अशा अनेक प्रार्थना वैदिक वाङ्मयापासून संतवाङ्मयापर्यंत सर्वत्र आढळतात. 'वसुधैवकुटुंबकम्' मानण्याची योग्यता, पात्रता प्राप्त झालेल्या व्यक्तीने हा आशीर्वाद उच्चारणे हे सुसंगत वाटते; इतरांच्या तोंडी मात्र ते केवळ कोरडे शब्द ठरतात.

४९५. सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते

सं. – नीश. ३२. बुद्धिमत्ता, पराक्रम, सौंदर्य हे गुण संपत्तीच्या पार्श्वभूमीवर विशेष खुलून दिसतात; इतकेच नव्हे तर संपत्तीमुळे, गुणरहित असलेल्या माणसालाही हे गुण चिकटविले जातात.

मू. – **यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः स पण्डितः स श्रुतवान् गुणज्ञः ।**
स एव वक्ता स च दर्शनीयः सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते□ ।।

□ **आश्रयन्ति** : पाठभेद

अ. – 'ज्याच्याजवळ संपत्ती आहे त्या मनुष्याचे कुल उच्च, तो विद्वान, बहुश्रुत आणि गुणग्राही; तोच चतुर भाषण करणारा, तोच देखणा (मानला जातो). सर्व गुण धनाच्या आश्रयाने राहातात (हेच खरे).'

व्य. – जगातील सर्व व्यवहाराचे साधन पैसा आहे. पैशाने सुखसोयी प्राप्त करून घेता येतात, धार्मिक कृत्येही पैशामुळे अधिक सुकर होतात. पैशामुळे समाजात मानमान्यता मिळते. पण वास्तविक पैशाने प्राप्त न होणाऱ्या गोष्टीही विकत घेण्याची व देण्याची जी प्रथा समाजात पडून गेली आहे तिचा निदर्शक असा हा व्यंग्योक्तियुक्त उक्तिविशेष आहे. स्वतःची तशी पात्रता नसतानाही केवळ पैशाच्या बळावर समाजात लब्धप्रतिष्ठितपणा मिळवून बसणाऱ्या व्यक्तीला उद्देशून हा उक्तिविशेष उच्चारला जातो.

४९६. सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः

सं. – महा. ६. प्रवि २.३६. गीतामाहात्म्य सांगणाऱ्या खालील श्लोकात गीतेचे रूपकात्मक वर्णन केले आहे.

मू. – **सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः ।**
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ।।

अ. – 'सर्व उपनिषदे याच कोणी गायी, भगवान श्रीकृष्ण हा त्यांचे दूध काढणारा गवळी, बुद्धिमान अर्जुन म्हणजे (दूध) ग्रहण करणारा वत्स आणि अमृतासारखे दूध म्हणजे थोर गीताग्रंथ होय.'

व्य. – सर्व उपनिषदांचे सार गीतेमध्ये आले आहे. उपनिषदांत विखुरलेले सिद्धान्त, दृष्टान्त यांचे संकलन व समन्वय गीतेमध्ये केलेले आहे; म्हणून वेदान्ताच्या 'प्रस्थानत्रयी'त गीतेला स्थान आहे. (उपनिषदे, ब्रह्मसूत्र व गीता ही प्रस्थानत्रयी). भगवान् श्रीकृष्ण गोकुळात वाढलेले, गोपालांचा राजा नंदाचे पुत्र; या त्यांच्या वैशिष्ट्यामुळेही वरील उक्तिविशेषातील रूपक विशेष सार्थ वाटते.

मू. – **शय्या वस्त्रं चन्दनं चारुहास्यं वीणावाणी सुन्दरी या च नारी ।**
न भ्राजन्ते क्षुत्पिपासातुराणां सर्वारम्भास्तण्डुलप्रस्थमूलाः ॥

अ. – ' (सुखकर) शय्या, कपडे, चंदन, मोहक हास्य, वीणेचा झंकार किंवा सुंदर स्त्री ह्या गोष्टी तहानेने आणि भुकेने व्याकुळ झालेल्या माणसाला सुखदायक होत (वाटत) नाहीत. कारण कोणत्याही कार्याला प्रारंभ करण्यासाठी शेरभर तांदुळाची गरज असते. (त्याप्रमाणे वरील कोणत्याही उपभोगाचे सुख साधण्यासाठी भूक भागण्याकरिता प्रथम अन्नाची तरतूद होणे आवश्यक असते).'

(दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे).

व्य. – कोणतेही कार्य हाती घ्यावयाचे, सुरू करावयाचे झाल्यास प्रथम द्रव्याची व्यवस्था करावी लागते; द्रव्याशिवाय कोठेही कोणाचेही काही चालत नाही. या अर्थाने हा उक्तिविशेष उच्चारला जातो. कोणत्याही मंगलकार्याला प्रारंभ करण्यासाठी मापभर किंवा पसाभर तांदूळ देवता मांडण्यासाठी व पूजादी विधीसाठी लागतात. त्याशिवाय त्या कार्याला प्रारंभ करताच येत नाही.त्यावरून तांदूळ असणे म्हणजे समृद्धी असणे आणि समृद्धी म्हणजे संपत्ती असणे आवश्यक अशी संगती लावून, कोणतेही काम करावयाला निघावयाचे तर प्रथम द्रव्य हवे, असे म्हणण्यासाठी हा संकेत रूढ झाला.

४९४. सर्वेऽत्र सुखिनः सन्तु

सं. – वैदिक प्रार्थना. लहान - थोर, गरीब - श्रीमंत, जवळचा - दूरचा, मित्र - शत्रू असे सर्व भेद विसरून प्राणिमात्रांचे कल्याण व्हावे; कोणालाही दुःख भोगावे लागू नये अशा व्यापक स्वरूपाची ही प्रार्थना प्राचीन कालापासून म्हटली जाते. ती केव्हापासून रूढ झाली याबद्दल निश्चित संदर्भ किंवा काळ सांगता येत नाही.

मू. – **सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।**
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद्दुःखमाप्नुयात् □ **॥**

□ **दुःखभाक् भवेत्** : पाठभेद

अ. – ' या भूमीवरील सर्व लोक सुखी असोत; सर्वजण निरोगी असोत; सर्वांचे कल्याण असो; कोणालाही दुःख प्राप्त न होवो. '

व्य. – सर्वांविषयी सद्भावना निर्माण करणारा हा उक्तिविशेष सामुदायिक व वैयक्तिक प्रार्थनेत समाविष्ट करण्याची प्रथा आहे; वैदिक द्रष्टचांची व्यापक समष्टिभावना या उक्तिविशेषाने प्रकट होते. मनुष्यजातीच्या सार्वत्रिक कल्याणाची इच्छा प्रकट करणाऱ्या अशा अनेक प्रार्थना वैदिक वाङ्मयापासून संतवाङ्मयापर्यंत सर्वत्र आढळतात. ' वसुधैवकुटुंबकम् ' मानण्याची योग्यता, पात्रता प्राप्त झालेल्या व्यक्तीने हा आशीर्वाद उच्चारणे हे सुसंगत वाटते; इतरांच्या तोंडी मात्र ते केवळ कोरडे शब्द ठरतात.

४९५. सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते

सं. – नीश. ३२. बुद्धिमत्ता, पराक्रम, सौंदर्य हे गुण संपत्तीच्या पार्श्वभूमीवर विशेष खुलून दिसतात; इतकेच नव्हे तर संपत्तीमुळे, गुणरहित असलेल्या माणसालाही हे गुण चिकटविले जातात.

मू. – **यस्यास्ति वित्तं स नरः कुलीनः स पण्डितः स श्रुतवान् गुणज्ञः ।**
स एव वक्ता स च दर्शनीयः सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते□ ।।

□ **आश्रयन्ति** : पाठभेद

अ. – 'ज्याच्याजवळ संपत्ती आहे त्या मनुष्याचे कुल उच्च, तो विद्वान, बहुश्रुत आणि गुणग्राही; तोच चतुर भाषण करणारा, तोच देखणा (मानला जातो). सर्व गुण धनाच्या आश्रयाने राहातात (हेच खरे).'

व्य. – जगातील सर्व व्यवहाराचे साधन पैसा आहे. पैशाने सुखसोयी प्राप्त करून घेता येतात, धार्मिक कृत्येही पैशामुळे अधिक सुकर होतात. पैशामुळे समाजात मानमान्यता मिळते. पण वास्तविक पैशाने प्राप्त न होणाऱ्या गोष्टीही विकत घेण्याची व देण्याची जी प्रथा समाजात पडून गेली आहे तिचा निदर्शक असा हा व्यंग्योक्तियुक्त उक्तिविशेष आहे. स्वतःची तशी पात्रता नसतानाही केवळ पैशाच्या बळावर समाजात लब्धप्रतिष्ठितपणा मिळवून बसणाऱ्या व्यक्तीला उद्देशून हा उक्तिविशेष उच्चारला जातो.

४९६. सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः

सं. – महा. ६. प्रवि २.३६. गीतामाहात्म्य सांगणाऱ्या खालील श्लोकात गीतेचे रूपकात्मक वर्णन केले आहे.

मू. – **सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः ।**
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ।।

अ. – 'सर्व उपनिषदे याच कोणी गायी, भगवान श्रीकृष्ण हा त्यांचे दूध काढणारा गवळी, बुद्धिमान अर्जुन म्हणजे (दूध) ग्रहण करणारा वत्स आणि अमृतासारखे दूध म्हणजे थोर गीताग्रंथ होय.'

व्य. – सर्व उपनिषदांचे सार गीतेमध्ये आले आहे. उपनिषदांत विखुरलेले सिद्धान्त, दृष्टान्त यांचे संकलन व समन्वय गीतेमध्ये केलेले आहे; म्हणून वेदान्ताच्या 'प्रस्थानत्रयी'त गीतेला स्थान आहे. (उपनिषदे, ब्रह्मसूत्र व गीता ही प्रस्थानत्रयी). भगवान् श्रीकृष्ण गोकुळात वाढलेले, गोपालांचा राजा नंदाचे पुत्र; या त्यांच्या वैशिष्ट्यामुळेही वरील उक्तिविशेषातील रूपक विशेष सार्थ वाटते.

४९७. सहनाववतु सहनौ भुनक्तु

(पाहा : शान्तिः शान्तिः शान्तिः)

४९८. सहस्रशीर्षा पुरुषः

सं. – ऋग. १०.९०.१. पुरुषसूक्त या नावाने वैदिक वाङमयात प्रसिद्ध असलेल्या सोळा ऋचांच्या सूक्तातील ही पहिली ऋचा आहे. सर्व धार्मिक विधींमध्ये या सूक्ताचा विनियोग केला जातो. (उदा. संध्या, नित्य पूजा, सत्यनारायण पूजा इ.) षोडशोपचार पूजेत या सूक्ताची एकेक ऋचा म्हणून एकेक उपचार देवाला अर्पण करतात. (परिशिष्ट पाहा).

मू. – सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ।
स भूमिं विश्वतो वृत्वाऽत्यतिष्ठत् दशाङ्गुलम् ।।

अ. – 'हजारो मस्तके, हजारो नेत्र व असंख्य पाय आहेत असा तो परमश्रेष्ठ पुरुष या भूमीला सर्व बाजूंनी व्यापून शिवाय आणखी दहा अंगुळे वर उरला आहे.'

व्य. – 'स्थिरचर व्यापुनि अवघे दशांगुळे उरलेल्या ' परमेश्वराची अमर्याद, अनंत व अनाकलनीय स्वरूप व शक्ती या उक्तिविशेषाने सुचविली जाते. या विराट पुरुषाच्या अवयवांपासून पृथ्वी-अंतरिक्ष-स्वर्ग-सूर्य-चंद्र-अग्नि-वायु या निसर्गशक्ती, चारी वेद, चतुष्पाद प्राणी, माणसांतील (ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य-शूद्र) चार वर्ण अशी विविध सृष्टी निर्माण झाली अशा प्रकारचे वर्णन या सूक्तात केलेले आहे. गीतेतील अकरावा विश्वरूपदर्शनाचा अध्याय म्हणजे जणू परमेश्वराचे अद्भुत व भव्य दिव्य रूप वर्णन करणाऱ्या पुरुषसूक्ताचा विस्तार आहे.

४९९. सहसा विदधीत न क्रियाम्

(पाहा : अविवेकः परमापदां पदम्)

५००. साहसे श्रीः प्रतिवसति

सं. – मृच्छ. ४. वसंतसेनेची दासी मदनिका हिला दास्यमुक्त करून तिच्याशी विवाह करण्याच्या इच्छेने शर्विलकाने चारुदत्ताच्या घरात शिरून दागिने चोरून आणले व ते मदनिकेकडे दिले. ते वसंतसेनेचे दागिने होते. ते शर्विलकाच्या हाती कसे आले, या तिच्या प्रश्नाला त्याने आपल्या साहसाबद्दल स्वतःची पाठ थोपटून घेत, असे उत्तर दिले :

मू. – साहसे श्रीः प्रतिवसति ।

अ. – 'धाडस करण्यानेच संपत्ती प्राप्त होते.'

व्य. – प्रयत्नांना धाडसाची जोड असेल तर जवळ फारसे भांडवल नसतानाही, परिस्थिती प्रतिकूल असूनही यशाची प्राप्ती होते. प्रत्येक पिढीतील थोर पुरुषांच्या

जीवनात अशा प्रकारचे अनेक प्रसंग आढळतात. धोका पत्करून, संकटात उडी घेण्याची ज्याची तयारी असते त्यालाच यश, ऐश्वर्य, समृद्धी प्राप्त होते, या अर्थाने हा उक्तिविशेष वापरला जातो.

५०१. सिद्धिर्भवति तादृशी

(पाहा : यादृशी भावना कुर्यात्)

५०२. सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता

सं. – अध्या. २.६.६. गवताच्या बिछान्यावर निजलेल्या रामाला पाहून गुहकाला दुःख झाले व तो रामाच्या वनवासाला कारण झालेल्या कैकेयीला व मंथरेला दोष देऊ लागला. तेव्हा लक्ष्मणाने त्याला म्हटले :

मू. – **सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता परो ददातीति कुबुद्धिरेषा ।**
अहं करोमीति वृथाऽभिमानः स्वकर्मसूत्रग्रथितो हि लोकः ।।

अ. – ‘सुख किंवा दुःख (दुसरा) कोणी देत नाही. दुसऱ्याकडून ते दिले जाते असे मानणे ही दुर्बुद्धी होय. ‘मी करतो’ हा अभिनिवेश व्यर्थ आहे. खरोखर सर्व लोक आपापल्या (पूर्वार्जित) कर्माच्या सूत्राने बांधलेले आहेत.’

व्य. – आपल्यावर आलेली परिस्थिती, आपल्याला भोगावे लागणारे दुःख, आपल्याला आलेले अपयश या साऱ्यांचे खापर दुसऱ्याच्या डोक्यावर फोडण्याच सर्वसामान्य मनुष्याचा स्वभाव असतो. स्वतःच्या सुखदुःखाबद्दल व कर्माबद्दल विवेक सुचविण्यासाठी हा उक्तिविशेष उच्चारला जातो. तथापि मुळातला संदर्भ पाहिला तर लक्ष्मणाने तत्त्वज्ञानाच्या फार उच्च भूमिकेवरून सांगितलेले हे एक जीवनसूत्र आहे. रामाच्या कोणत्या पूर्वजन्मीच्या पातकामुळे त्याला वनवास भोगावा लागतो आहे असे त्याला येथे सुचवावयाचे नाही; तर नियतीने योजिलेले जे आहे ते घडावयाचेच, त्याबद्दल कोणी कोणाला दोष देऊ नये किंवा स्वतःलाही त्याबद्दल दुःखी करून घेऊ नये असे येथे लक्ष्मणाला म्हणावयाचे आहे. गुहकाच्या मनातले दुःख हलके करावे हा त्यातला हेतू.

५०३. सुखं हि दुःखान्यनुभूय शोभते

सं. – मृच्छ. १.१०. परोपकारी, उदार चारुदत्ताला केवळ दारिद्र्याचे दुःख नाही; त्याला क्लेश होतात ते दान करता येत नाही म्हणून. याचक विन्मुख जाण्याला कारण ठरणारे दारिद्र्य याचसाठी त्याला मरणाहून दुस्सह वाटते.

मू. – **सुखं हि दुःखान्यनुभूय शोभते घनान्धकारेष्विव□दीपदर्शनम् ।**
सुखात्तु यो याति नरो दरिद्रतां धृतः शरीरेण मृतः स जीवति ।।

□ घनान्धकारादिव : पाठभेद

अ. – 'दु:ख भोगल्यानंतर, सुखप्राप्ती (अधिक) आनंददायक होते. जणू दाट काळोखातून (नंतर) दिव्याचे दर्शन! पण सुखाचा उपभोग घेतल्यानंतर दारिद्र्य सहन करायला लागणे म्हणजे जिवंत असून मेल्याप्रमाणे जगणे होय.'

व्य. – सुख प्राप्त झाले की मागचे दुःख, कष्ट मनुष्य सहज विसरतो; पुन्हा नव्या जोमाने प्रयत्न करायला तो तयार होतो. सुखातच वाढलेल्या माणसाला अधिक सुख लाभले तरी त्याला त्याची विशेष मातब्बरी वाटत नाही. परंतु दु:खाने सतत पोळलेल्या माणसाला त्यानंतरच्या काळात थोडेसेही सुख लाभले तरी त्याला त्या सुखापासून मिळणारा आनंद शतगुणित असतो. घनदाट अंधारानंतर दिव्याचा प्रकाश माणसाला दिसावा म्हणजे त्याला त्या प्रकाशलाभाचा जो आनंद मिळतो, त्याचा दृष्टांत या शतगुणित आनंदाला समर्पकपणे दिलेला आहे. (येथे खरा पाठभेदच ' घनान्धकारात् इव ' हा योग्य अर्थ सूचित करतो.)

५०४. सुखार्थिनः कुतो विद्या

सं. – महा. ५.४०.५. प्रजागरपर्वात विदुराने धृतराष्ट्राला केलेल्या उपदेशात विविध नियमांचा व तत्त्वांचा संग्रह केलेला आहे. विद्यार्थ्याची वृत्ती कशी असावी हे सांगणारा हा श्लोक आहे.

मू. – **सुखार्थिनः कुतो विद्या * नास्ति विद्यार्थिनः सुखम् ।**
सुखार्थी वा त्यजेद्विद्यां विद्यार्थी वा सुखं त्यजेत् ।।

* कुतो : पाठभेद

अ. – 'ऐषारामाची इच्छा करणाऱ्याला विद्या कोठून येणार; विद्येची आराधना करणाऱ्याला सुख (आराम) मिळणार नाही. सुखाची इच्छा असेल तर विद्याभ्यास सोडून द्यावा व विद्येची आस असेल तर सुखाची आशा सोडावी.'

व्य. – विद्या मिळविण्यासाठी, तिचे तेज टिकविण्यासाठी, तिचा उपयोग करता येण्यासाठी अतोनात कष्ट घ्यावे लागतात. इतर सर्व गोष्टींवर, त्याबद्दलच्या इच्छेवरही पाणी सोडावे लागते. विद्या आणि सुख दोन्ही एकाच वेळी मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्याला दोन्हीकडे अपयश येते. विद्यार्थी जीवनातला हा आवश्यक नियम सांगणारा हा उक्तिविशेष आहे.

५०५. सूतोवाच

सं. – भाग. १.१.८.नंतर. नैमिषारण्यात एकत्र राहून दीर्घकाल यज्ञसत्र चालविणाऱ्या ऋषींना प्रतिदिनी यज्ञकर्म आटोपल्यानंतर विश्रांतीच्या वेळी ईश्वरी लीलांचे वर्णन करणाऱ्या विविध कथा ऐकविणारे ते 'सूत' होत. बहुश्रुत, ज्ञानी व कथा सांगण्यात चतुर असे ते धर्मपुरुष असत. त्यांना ऋषी प्रश्न करीत व नंतर सूत कथेला प्रारंभ करीत. सर्व पुराणे सूतांनी सांगितलेली आहेत.

मू. – शौनक उवाच–

अज्ञानध्वान्तविध्वंसकोटिसूर्यसमप्रभ ।

सूताख्याहि कथासारं मम कर्णरसायनम् । भाग. १.१.८.

सूतोवाच –

अ. – शौनक म्हणाले, 'अज्ञानरूपी अंधार नष्ट करण्याच्या बाबतीत कोटी सूर्याप्रमाणे तेजस्वी असणाऱ्या हे सूता, माझ्या कानांना अमृताप्रमाणे गोड लागणारी कथा तू सांग. सूत सांगतात.'

व्य. – कथेचा, चर्चेचा, एखाद्या महत्त्वाच्या विषयावर बोलण्याचा प्रारंभ करणे या अर्थी हा उक्तिविशेष वापरला जातो.

५०६. सूत्रं सूत्रविदो विदुः

सं. – सर्वलक्षणसंग्रह. स. शास्त्रकारांनी परिश्रमपूर्वक, आपल्या बुद्धिकौशल्याने महत्त्वाच्या सर्व शास्त्रीय व लौकिक पदार्थांची लक्षणे निश्चित केली आहेत. येथे सूत्राचे लक्षण सांगितले आहे.

मू. – अल्पाक्षर असंदिग्धं सारवद् विश्वतोमुखम् ।

अस्तोभं अनवद्यञ्च सूत्रं सूत्रविदो विदुः ।।

अ. – 'कमीत कमी अक्षरे असलेले, निश्चित अर्थ व सार सांगणारे, सर्व उदाहरणांना लागू पडणारे, अनावश्यक विस्ताराचा अभाव असलेले व सुश्लिष्ट रचना असलेले ते 'सूत्र' होय असे जाणते लोक मानतात.'

व्य. – प्राचीन काळी मुद्रणाची सोय उपलब्ध नसल्यामुळे सर्व विद्या मुखोद्गत करावी लागे. वेदांपासून सर्व शास्त्रग्रंथ ब्राह्मण पाठ करीत असत. पठन-पाठनाला सोयीचे व्हावे व सर्व अर्थ तर त्यामध्ये समाविष्ट व्हावा या दृष्टीने सूत्रमय रचना फार उपयुक्त होती. पाणिनीने छोटी छोटी अशी चार हजार सूत्रे लिहून संस्कृत भाषेच्या व्याकरणाचे नियम सांगितले आहेत. व्यासांनी ब्रह्मसूत्रात वेदान्ताचा सर्व विषय साडेपाचशे सूत्रांत ग्रथित केला आहे. 'सूत्र' हे संस्कृत भाषेचे एक वैशिष्टय म्हणून सांगितले जाते.

५०७. सूत्रे मणिगणा इव

सं. – भगी. ७.७. क्षराक्षरविचार सांगताना सृष्टीतील जड व चेतन अशा सर्व वस्तूंच्या ठिकाणी ईश्वरच भरून राहिला आहे, त्याच्यावाचून दुसरे काही नाही, हे श्रीकृष्णांनी स्पष्ट केले आहे.

मू. – मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ।

मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ।।

अ. – ' माझ्याहून वेगळे, हे धनंजया, दुसरे काहीही नाही. दोऱ्यात अनेक मणी ओवावेत त्याप्रमाणे हे सर्व जग माझ्या ठायी एकसूत्रित झाले आहे.'

व्य. – सर्व सृष्टीला आधारभूत, त्यातील वस्तूंना एकत्र राखणारे, त्यांचा समतोल सांभाळणारे व परस्परपूरक घटकांची जोड राखणारे असे तत्त्व, अशी शक्ती या सृष्टीच्या मागे आहे. तोच ईश्वर होय. आपण सर्वजण त्याची लेकरे होत. हे सूत्रात गुंफलेल्या मोत्यांच्या हाराच्या दृष्टान्ताने येथे सांगितले आहे. एखाद्या समूहाची, गोष्टीची सुसूत्रता, एकात्मता दृष्टीसमोर ठेवून हा उक्तिविशेष उच्चारला जातो.

५०८. सूत्रस्येवास्ति मे गतिः

सं. – रघु. १.४. प्राचीनांच्या बुद्धिवैभवानेच सूर्यापासून उत्पन्न झालेल्या रघु-वंशाची कथा सांगता येईल, असे विनयाने कालिदासाने म्हटले आहे.

मू. – अथवा कृतवाग्द्वारे वंशेऽस्मिन्पूर्वसूरिभिः ।
मणौ वज्रसमुत्कीर्णे सूत्रस्येवास्ति मे गतिः ॥

अ. – ' (मी मंदबुद्धी असलो) तरी प्राचीन विद्वानांनी–पंडितांनी (कवींनी) आपल्या बुद्धिसामर्थ्याने ह्या रघुवंशात (काव्यनाटचादि द्वारा) प्रवेश केल्यामुळे माझाही प्रवेश झाला (होऊ शकला). जसे वज्राने (किंवा मणिवेधक यंत्राने) छिद्र पाडल्यावर सुताचा–दोऱ्याचा प्रवेश त्या मण्यात (सुलभतेने) होतो तद्वत् (माझा झाला).'

व्य. – प्रसंगी स्वतःकडे कमीपणा घेऊन वडील मंडळींचा आदर राखताना विनयाने असे बोलण्याची आपली रीत आहे. म्हणूनच व्यवहारात वागताना कालिदासाच्या या उक्तीचा सर्वच आधार घेतात. साहित्यक्षेत्राप्रमाणे इतर क्षेत्रातही ज्या ठिकाणी अगोदर कोणीतरी आपल्या बुद्धिशक्तीने एक पायवाट पाडली त्याच पाऊलवाटे-वरून मागाहून येणारे वरील उक्तिविशेषाने आपला विनीत भाव प्रकट करीत असतात.

५०९. सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च

सं. – ऋग्. १.११५.१. सूर्यदेवतेला उद्देशून, कुत्स आङ्गिरस ऋषींनी त्रिष्टुप छंदात गुंफलेल्या सूक्तातील, सूर्याचे वर्णन करणारी ही ऋचा आहे.

मू. – चित्रं देवानामुदगादनीकं चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः ।
आप्रा द्यावापृथिवी अन्तरिक्षं सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ॥

अ. – ' मित्र, वरुण आणि अग्नि ह्यांचा जणू नेत्रच असे हे देवांचे आश्चर्यकारक तेजोमय रूप उदय पावले आहे. स्थावरजंगम वस्तूंचा प्राण असलेल्या सूर्याने द्युलोक, भूलोक आणि अन्तरिक्ष यांना व्यापून टाकले आहे.'

व्य. – उत्पत्तीला व जगण्याला आवश्यक अशी उष्णता व प्रकाश सूर्यापासून मिळतो. वस्तूंचे ज्ञान प्रकाशामुळेच होऊ शकते. सूर्य उगवला नाही तर सृष्टीचे सर्व व्यवहार थंडावतील, पृथ्वीवरचे जीवन नष्ट होईल, याची पूर्ण जाणीव प्राचीन

ऋषींना होती. सृष्टीतील शक्तीच्या भौतिक स्वरूपाचे. तसेच त्यांच्या दैवी व आध्यात्मिक स्वरूपाचे ज्ञान वैदिक ऋषींना होते. सूर्यदेवतेचे वर्णन करणारी अनेक सूक्ते ऋग्वेदात आहेत. सर्वश्रेष्ठ गायत्री मंत्र सूर्याला उद्देशून म्हटलेला आहे व त्यात सूर्याच्या तेजाचे ध्यान करण्यास सुचविले आहे. 'सर्व जगाचा आत्मा' या शब्दांनी सूर्याचे सर्वाधिक महत्त्व सांगितले गेले असून सूर्यासंबंधी कोणत्याही संदर्भात बोलताना हा उक्तिविशेष उच्चारला जातो.

५१०. सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः

सं. – नीश. ४७. नोकर कसाही वागला तरी त्यात खोड काढायचीच हा अधिकारी-वर्गाचा अलिखित नियम विशेषतः दुष्ट, लहरी मालक तर उणेदुणे बोलण्याची एकही संधी फुकट घालवीत नाही. अशा–मनाला वाटेल तसे वागणाऱ्यांकडे चाकरी करणे किती अवघड आहे हे भर्तृहरीने येथे सांगितले आहे.

पंच. १.३०८. पिंगलक (सिंह) राजा व संजीवक (बैलात) मंत्र्यात वितुष्ट येण्यासाठी दमनक (कोल्हा) मंत्री पिंगलकाविषयी खोटेनाटे सांगून त्याच्या मनात द्वेष जागृत करतो. 'पिंगलकाचा तुलाही मारण्याचा बेत आहे' हे दमनकाचे उद्‌गार ऐकताच संजीवकाला वाईट वाटते. इतके दिवस इमानेइतबारे चाकरी करूनही व्यर्थ गेली असे त्याला वाटू लागले. त्या वेळी खेदाने त्याने सेवाधर्म आचरणे कसे कठीण आहे ते दमनकाजवळ बोलून दाखविले.

मू. – **मौनान्मूकः प्रवचनपटुर्वाचको जल्पको वा**
धृष्टः पार्श्वे भवति च वसन्दूरतोऽप्यप्रगल्भः ।
क्षान्त्या भीरुर्यदि न सहते प्रायशो नाभिजातः
सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ।। नीश. ४७.

अ. – '(नोकर) जर गप्प राहिला तर तो मुकाच आहे (असे म्हणायचे); मोकळेपणाने काही बोलला तर बडबड्या, वाचाळ (म्हणायचे) धन्याच्या जवळ गेला तर उद्धट आणि (नोकरी) सोडून गेला तर मूर्ख (समजायचे). मालकाचे रागावणे मुकाट्याने सहन करील तो भित्रा (म्हणायचे); तर जो उलटून प्रत्युत्तर देईल तो हलक्या कुळातला (समजायचे). म्हणून योग्यांनाही आकलन होण्यास दुर्घट असा हा सेवाधर्म (आचरणे) फार कठीण आहे.'

मू. – **भावस्निग्धैरुपकृतमपि द्वेष्यतां याति लोके**
साक्षादन्यैरपकृतमपि प्रीतये चोपयाति ।
दुर्ग्राह्यत्वान्नृपतिमनसां नैकभावाश्रयाणां
सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः ।। पंच. १.३०८.

अ. – 'ह्या जगात प्रेमानेच एखाद्याने दुसऱ्यावर उपकार केला तरी (तो) शत्रुत्वाला कारण होतो, तर साक्षात् अपकार केला तरी (तो त्याच्यावर) सन्तुष्ट

होतो. प्रत्येक क्षणी एकसारखे (एकविचाराचे) न राहाणारे राजाचे (मालकाचे) मन कळणे कठीण आहे. खरोखर सेवाव्रत (आचरण्यास) अत्यंत (इतके) कठीण आहे की जे योग्यांनाही दुर्घट आहे.'

व्य. – योगसाधना ही अत्यंत कठीण मानली जाते. भक्तिमार्गाच्या तुलनेने तर याचे खडतर आचरण फार अवघड. असे असले तरी एकवेळ योगाचे यमनियम आचरणात आणणे–त्यानुसार वागणे शक्य होईल. परंतु सेवाचाकरी करून वरिष्ठांची प्रसन्नता मिळविणे दुष्प्राप्य आहे; अवघड योगमार्गापेक्षाही ही तारेवरची कसरत करून सेवाधर्म सांभाळणे फार कठीण आहे. कारण चाकरी म्हणजे पराधीनता. दुसऱ्याच्या इच्छेप्रमाणे–अपेक्षेप्रमाणे वागणे सर्व वेळी जमतेच असे नाही. व्यक्तिपरत्वे त्यात फरक आढळतो. अशा वेळी ही परवशता तीव्रतेने जाणवते. कमीअधिक प्रमाणात ही साऱ्यांनाच अनुभवावी लागते. म्हणूनच सर्वपरिचित आणि सर्वप्रचलित असा हा उक्तिविशेष वारंवार उपयोजिला जातो.

५११. सं गच्छध्वं

सं. – ऋग्. १०..१९१.२. संज्ञान-सूक्त किंवा सांमनस्य-सूक्त या नावाने प्रसिद्ध असलेल्या ह्या सूक्ताने ऋग्वेदाची समाप्ती झाली आहे.

मू. – **सं गच्छध्वं सं वदध्वं सं वो मनांसि जानताम् ।**
देवा भागं यथा पूर्वे संजानाना उपासते ।।

अ. – 'हे मानवानो ! जसे दिव्य शक्तीने संपन्न (सूर्य-चंद्र-इंद्रादी) देव अनादी कालापासून एकमताने आपापली कार्ये करीत आहेत तद्वत तुम्ही एकमताने वागा, एकविचाराने बोला, एकमेकांविषयी सद्‌भावना ठेवा.'

व्य. – या सांमनस्य सूक्तात सूक्तकर्त्याची समष्टीभावना व्यक्त होते. आजच्या काळातही उपयुक्त ठरणारा असा हा उपदेश आहे. सार्वजनिक हिताचे कार्य सामूहिक रीत्या करणारे तशा प्रकारच्या कार्याला प्रारंभ करताना, ते पुढे नेण्यासाठी प्रोत्साहन देताना, या उक्तिविशेषाचा उपयोग करतात.

५१२. संभवामि युगे युगे

सं. – भगी. ४.८. स्वतःचा दिव्य जन्म व कर्म सांगताना श्रीकृष्णाने आपल्या अवताराचे रहस्य उलगडून सांगितले आहे.

मू. – **परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।।

अ. – 'साधूंचे रक्षण व दुर्जनांचा संहार करून धर्माची प्रतिष्ठापना करण्यासाठी मी प्रत्येक युगात जन्म घेतो.'

व्य. – दुष्टांचे निर्दालन व सज्जनांचे रक्षण हेच ईश्वरी अवताराचे कार्य असल्याचा हा ईश्वरी निर्वाळा आहे. वैदिक तत्त्वज्ञानातील ईश्वरविषयक कल्पनेचे व आदर्श लोकव्यवहाराचे स्पष्ट प्रतिबिंब या उक्तीत दिसेल, 'परित्राणाय साधूनां' याचेच दुसरे अंग 'विनाशाय च दुष्कृताम्' हे आहे. धर्मसंस्थापनेसाठी या दोहींची सारखीच आवश्यकता अपरिहार्यपणे आहे. मानवी जीवन सुसह्य, समाधानकारक व सुखी व्हावे अशासाठी जो धर्म अपेक्षित आहे त्या धर्माची प्रतिष्ठापना दैवी अवताराने, ईश्वरी सामर्थ्याने होत असते हा सर्वसामान्य नियम सांगणे आणि अन्याय-अत्याचारांखाली भरडल्या जात असलेल्या त्रस्त, ग्रस्त, आश्रयहीन लोकांना आधार व आश्वासन देणे या उक्तिविशेषाने केले जाते.

५१३. संशयात्मा विनश्यति

सं. – भगी. ४.४०. ज्ञानाची महती, ज्ञानप्राप्तीचे उपाय सांगितल्यानंतर, त्यांचा अवलंब न करणाऱ्या संशयखोर माणसांची गती कशी होते हे श्रीकृष्णांनी येथे सांगितले आहे.

मू. – **अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।**
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥

अ. – 'स्वतःला ज्ञान नसून श्रद्धाही नाही असा संशयखोर मनुष्य नाश पावतो. शंका घेणाऱ्याला हा लोक साधत नाही, परलोक नाही आणि सुखही प्राप्त होत नाही.'

व्य. – कोठेतरी विश्वास, श्रद्धा असल्याशिवाय मनुष्य काही कार्य करू शकत नाही किंवा त्याची प्रगतीही होऊ शकत नाही. ज्ञात्या, अनुभवी माणसांवर विश्वास न ठेवता स्वतःच्या लहरीनुसार वागणाऱ्या माणसाचे जीवन व्यर्थ जाते. पदोपदी शंका घेणे टाळावे एवढेच या उक्तिविशेषाने सुचविले आहे. कोठेतरी एक ठाम श्रद्धा तरी असली पाहिजे किंवा स्वतःच्या बुद्धिबलकर्तृत्वावर संपूर्ण विश्वास दृढ आत्मविश्वास तरी असला पाहिजे. यापैकी कोणतीही एक भूमिका ज्यांना निश्चित करता येत नाही त्यांची स्थिती 'इदं च नास्ति वरं न लभ्यते' यासारखी होऊन त्यांना आयुष्यात स्वार्थ-परार्थ-परमार्थ काहीच साधता येत नाही, त्यांचे आयुष्य व्यर्थ जाते, असे सांगण्यासाठी या उक्तिविशेषाचा उपयोग करतात.

५१४. संसारविषवृक्षस्य द्वे फले ह्यमृतोपमे

सं. – हित. १.१५४. मंथरक नावाच्या आपल्या मित्राला (कासवाला) हिरण्यकाने (उंदीर) म्हटले की, जरी संकट आल्याने मला माझा देश सोडून या परक्या वनात यावे लागले तरी तुझ्याशी मैत्री झाल्यामुळे मला स्वर्गात असल्यासारखेच वाटते आहे. कारण या जगात सज्जनाचा सहवास मिळणे ही खरोखर मोठी भाग्याची गोष्ट आहे.

सुर. १. सुभाषितप्रशंसा ४. सुंदर वाङ्मयरत्ने ही हिरेमाणकादी पाषाणमय रत्नांपेक्षा मोलाची आहेत. सुभाषितांचे महत्त्व फार प्राचीन काळापासून मानले गेले आहे. अनेक संस्कृत कवींनी सुभाषितांची स्तुती केली आहे. या स्तुतिसुमनांचाच संग्रह सुभाषितप्रशंसेत आढळतो.

मू. – **संसारविषवृक्षस्य द्वे एव रसवत्फले ।**

काव्यामृतरसास्वादः संगमः सज्जनैः सह ॥ हित. १.१५४.

अ. – ' संसाररूपी विषवृक्षाची दोनच फळे रसाळ आहेत. ती म्हणजे काव्यरसाचा (सर्व साहित्याचा) आस्वाद (घेणे) आणि सज्जनांचा सहवास (लाभणे).'

मू. – **संसारकटुवृक्षस्य द्वे फले ह्यमृतोपमे ।**

सुभाषितरसास्वादः संगतिः सज्जनैः सह ।। सुर. १. सुभाषितप्रशंसा ४.

अ. – ' संसाररूपी कडू झाडाला दोन फळे मात्र अमृतासारखी (मधुर) येतात –एक सुभाषितरस (चाखणे) व दुसरे सत्प्रवृत्तांची संगती (मिळणे).'

व्य. – संसार म्हणजे सर्व प्रकारच्या दुःखाचा सतत अनुभव देणारा मृत्युलोक. येथे प्रत्येक जण सुखासाठी धडपडत असूनही बहुधा दुःखच त्याच्या पदरी येते. म्हणून या दुःखरूप संसाराविषयी आजवर अनेकांनी चर्चा केली आणि त्याचे सार या उक्तिविशेषात सांगितले. दुःखमय भासणाऱ्या या संसारात सत्संगतीने काही काल सुखाचा जातो, दुःखही सुसह्य होते; तसेच साहित्याचे – त्यातल्या सुभाषिताचे आहे. आपल्या भावना मोजक्या, मार्मिक शब्दांत व्यक्त करण्यास सुभाषितासारखे दुसरे साधन नाही. कटु अनुभवाचाही विसर पाडण्याचे सामर्थ्य अशा अक्षर वाङ्-मयात आहे. म्हणून आपल्या जीवनातील सत्संगाचे व सत्साहित्याचे महत्त्व ज्या ज्या क्षणी प्रकर्षाने जाणवते त्या त्या वेळी ह्याच उक्तीने ती भावना बोलकी केली जाते.

५१५. संस्काराः प्राक्तना इव

(पाहा : फलानुमेया प्रारंभाः)

५१६. संस्कारात् द्विज उच्यते

सं. – पद्म पु. उत्तर ११६. विद्या आणि धार्मिक संस्कार यांच्या योगाने माणसाची योग्यता कशी वाढते हे दाखविताना हा श्लोक सांगितला गेला आहे; व त्यावरून वरील उक्तिविशेष रूढ झाला आहे.

मू. – **जन्मना ब्राह्मणो ज्ञेयः संस्कारैर्द्विज उच्यते ।**

विद्याभ्यासी भवेद् विप्रः श्रोत्रियस्त्रिभिरेव हि ।।

अ. – ' जन्मामुळे ' ब्राह्मण ' ठरतो, तर (उपनयनादी) संस्कारांमुळे त्याला

'द्विज' म्हटले जाते. विद्येचे अध्ययन करून तो 'विप्र' बनतो; व या तीन्हीमुळें त्याला 'श्रोत्रिय' हे पद प्राप्त होते.'

व्य. – 'जन्मना जायते शूद्रः संस्कारात् द्विज उच्यते' हा अधिक प्रसिद्ध असलेला उक्तिविशेष संस्काराचे महत्त्व दाखविणारा आहे. जन्मतः मनुष्य जो स्वभाव–प्रकृती बरोबर घेऊन आला असेल त्यावर संस्कार करून माणसाला देव बनविता येते. द्विज म्हणजे दुसऱ्यांदा जन्मलेला. संस्कारांनी माणसाचा पुनर्जन्म होतो; त्याला नवीन सामर्थ्य व प्रतिभा प्राप्त होते; या अर्थाने हा उक्तिविशेष रूढ आहे.

५१७. संस्कृतिः संस्कृताश्रिता

सं. – लोकोक्ती. भाषा हे समाजाची प्रगती ओळखण्याचे गमक आहे. वैदिक कालापासून, जगातील पहिली, शुद्ध आणि समृद्ध भाषा म्हणून संस्कृतचे महत्त्व सर्व पंडितांनी मान्य केलेले आहे.

मू. – **संस्कृतिः संस्कृताश्रिता ।**

अ. – '(भारतीय) संस्कृती संस्कृत भाषेच्या आधाराने राहिलेली आहे.'

व्य. – धर्म, साहित्य, कला, विज्ञान या सर्व अंगांनी समृद्ध असलेल्या भारतीय संस्कृतीचे, तिने जोपासलेल्या श्रेष्ठ जीवनमूल्यांच्या व तिचे मस्तक असलेल्या अध्यात्मविद्येचे दर्शन संस्कृत भाषेत लिहिल्या गेलेल्या वेदवेदांगे, षड्दर्शने, पुराणे, काव्यनाटकादींच्या प्रचंड वाङमयसंभारातूनच घडणे शक्य आहे. संस्कृत भाषेचा आधार घेतल्यावाचून भारतीय संस्कृतीचे ज्ञान होणे शक्य नाही; संस्कृत भाषेचे अध्ययन-अध्यापन ताजे, जिवंत राहिले पाहिजे हे या उक्तिविशेषाने आग्रहपूर्वक सांगितले जाते.

५१८. संहतिः कार्यसाधिका

सं. – हित. १.३५. रानात विखुरलेल्या धान्यकणांच्या लोभाने पारध्याच्या जाळ्यांत अडकलेल्या कबुतरांच्या थव्याचा राजा चित्रग्रीव याने आपल्या सोबत्यांना पारध्याच्या हातून सुटण्याची युक्ती म्हणून एकजूट करून जाळ्यासह उडून जावे, असे सुचविले.

मू. – **अल्पानामपि वस्तूनां संहतिः कार्यसाधिका ।**
तृणैर्गुणत्वमापन्नैर्बध्यन्ते मत्तदन्तिनः ।।

अ. – 'कमी सामर्थ्याच्या वस्तूंची एकजूट केल्याने कार्य सिद्ध होते. गवताच्या काड्यांची दोरी वळली म्हणजे तिने उन्मत्त हत्तीही बांधले जातात.'

व्य. – सर्व समाजावर आलेल्या संकटाचा प्रतिकार किंवा प्रगतिकारक असे एखादे कार्य एकेकट्याने स्वतंत्र प्रयत्न करून सिद्ध होत नाही. त्यासाठी संघटित होऊन

एकजुटीने प्रयत्न करणे आवश्यक असते. एकजुटीचे महत्त्व सांगणारा म्हणून हा उक्तिविशेष प्रसिद्ध आहे.

५१९. स्वकर्मसूत्र ग्रथितो हि लोकः

(पाहा : सुखस्य दुःखस्य न कोऽपि दाता)

५२०. स्वदेशे पूज्यते राजा

(पाहा : विद्वान् सर्वत्र पूज्यते)

५२१. स्वभावो दुरतिक्रमः

सं. – वारा. ६.३६ ११. 'सीतेची मुक्तता करून रामाशी संधी करावा ' असा सल्ला देऊन, माल्यवान नावाच्या राक्षसाने (रावणाच्या आजाने) लंकेत होणाऱ्या अशुभ घटनांबद्दल रावणाजवळ चिंता व्यक्त केली. तेव्हा रावणाने स्वतःच्या पराक्रमाचे व हट्टी स्वभावाचे वर्णन केले. त्याने माल्यवानाचा सल्ला धुडकावून लावला.

हित. ३.५६. निळ्या रंगाच्या भांड्यात पडल्यामुळे निळा झालेला कोल्हा त्या विशेष रूपाने स्वतःला वनाचा-राजा म्हणवून घेऊ लागला व ' वनदेवतांनी मला अभिषेक केला आहे' असे सांगू लागला. त्याचे खरे रूप जाणणाऱ्या एका वृद्ध कोल्ह्याने आपल्या सोबत्यांना, त्याच्याजवळ जाऊन मोठ्याने ओरडण्यास-कोल्हेकुई करण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्या कोल्ह्यांनी ओरडण्यास सुरुवात करताच तो कोल्हा स्वतःच्या स्वभावाला अनुसरून आपल्या जातभाईबरोबर कोल्हेकुई करू लागला; व त्यामुळे त्याचे सोंग साऱ्यांच्या लक्षात आले.

मू. – द्विधा भज्येयमप्येवं न नमेयं तु कस्यचित् ।
एष मे सहजो दोषः स्वभावो दुरतिक्रमः ।। वारा. ६.३६.११.

अ. – ' माझे दोन तुकडेही होऊन पडतील परंतु मी कोणापुढे नमणार नाही. हा माझा जन्मजात दोष आहे; स्वभाव बदलणे अशक्य आहे. '

मू. – यः स्वभावो हि यस्यास्ति स नित्यं दुरतिक्रमः ।
श्वा यदि क्रियते राजा स किं नाश्नात्युपानहम् ।। हित. ३.५८.

अ. – 'जो ज्याचा स्वभाव असतो तो पालटणे कधीही शक्य नाही. कुत्र्याला राजा बनविले तरी तो कातड्याचे पायताण खाणे सोडील काय ? '

व्य. – 'आधी होता वाघ्या, दैवयोगे झाला पाग्या, त्याचा येळकोट राहीना ... ' मराठी भारुडातील हे गाणे वरील उक्तिविशेषाच्याच अर्थाचे आहे. क्षुद्र मनुष्य दैवाने वरच्या पदाला पोचला तरी त्याची क्षुद्रवृत्ती लपून राहात नाही व थोर

पुरुषाला वाईट परिस्थितीत राहावे लागले तरी त्याची उदार वृत्ती नष्ट होत नाही. एखाद्या हट्टी, दुराग्रही माणसाला योग्य गोष्ट पटविण्याचा आग्रह करण्यात अर्थ नाही हे ध्यानात येते, अशा वेळी या उक्तिविशेषाचा सहज उच्चार होतो.

५२२. स्वयमेव मृगेन्द्रता

सं. – हित. २.१९. दक्षिणापथातील सुवर्णवती नगरीचा वर्धमान नावाचा व्यापारी व्यापारासाठी काश्मीर देशास जाण्यास निघाला. सर्व सामान - व्यापाराचे जिन्नस संजीवक बैलावर लादून तो सुदुर्ग नावाच्या अरण्यापर्यंत येऊन पोहोचला, तोच संजीवकाचा पाय दुखावला. त्याला तेथेच सोडून तो व्यापारी दुसरा बैल घेऊन व्यापारासाठी पुढे निघून गेला. काही कालाने संजीवक मात्र बरा होऊन तेथेच राहू लागला. त्या वनाचा पिंगलक नावाचा सिंह राजा होता. स्वपराक्रमाने त्याने हे राज्य मिळविलेले होते. आपल्या राज्यात संजीवकाला पाहून पिंगलकाला साश्चर्य भीती वाटली.

मू. – **नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते मृगैः**□ **।**
विक्रमार्जितराज्यस्य स्वयमेव मृगेन्द्रता ॥

□**वने** : पाठभेद

अ. – '(मृगराज) सिंहाला (वनात) कोणीही (राजा म्हणून) अभिषेक करीत नाही किंवा त्याच्यावर कसलाही संस्कार केला जात नाही. तर स्वतःच्या अतुलनीय पराक्रमाने (सर्व प्राणिमात्रांना जिंकून) त्याने आपले जन्मजात सर्वश्रेष्ठत्व सिद्ध केलेले असते.'

व्य. – राजत्व–सर्वश्रेष्ठत्व हे मुळातच असावे लागते. ते स्वयंसिद्ध असते. त्याला संस्कारादी बाह्य साधनांची आवश्यकता असतेच असे नाही. स्वतःचे मोठेपण हे स्वतःच्या बुद्धिसामर्थ्यावर-शक्तीवर पूर्णांशाने अवलंबून असते,हे सांगण्यासाठी या उक्तिविशेषाचा वापर केला जातो. अशा तऱ्हेने समाजात, देशात, जगात, स्वबलाने सर्वोच्च पदावर विराजमान होणाऱ्या असामान्य कर्तृत्वाच्या व्यक्तींबाबत हा उक्तिविशेष वापरला जातो.

५२३. स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयति

सं. – सप. स ४१. दोन सख्यांच्या संवादात, दोन तथाकथित पंडितांची थट्टा केली आहे.

मू. – **चतुरः सखि मे भर्ता यल्लिखति च तत् परो न वाचयति ।**
तस्मादप्यधिको मे स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयति ॥

अ. – ' अग, माझे पती इतके बुद्धिमान आहेत की, ते जे लिहितात ते इतर लोक वाचूही शकत नाहीत. (दुसरी म्हणते) माझे यजमान तर याहूनही अधिक विद्वान आहेत; त्यांनी स्वतः लिहिलेले त्यांना स्वतःलाही वाचता येत नाही.'

व्य. – पांडित्यामुळे एखाद्याचे लेखन सामान्य वाचकाला सहज आकलन करता येत नाही; किंवा पांडित्याचे ते एक गमक मानले जाते. येथे मात्र दोन भ्रमिष्ट, स्वतःच्या गिचमीड अक्षरांमुळे दुर्बोध झालेल्या लेखनामुळेच स्वतःला पंडित मानीत आहेत व त्यांच्या अडाणी बायका त्याबद्दल फुशारकी मारीत आहेत. एखाद्याचे वाईट हस्ताक्षर वाचण्याची वेळ आली म्हणजे हा हास्यकारक उक्तिविशेष स्मरणात येतो.

५२४. स्वयं हि तीर्थानि पुनन्ति सन्तः

सं. – भाग. १.१९.८. शमीक ऋषींचा अपमान केल्याबद्दल परीक्षिताला पश्चात्ताप वाटला. शमीकपुत्राची शापोक्ती ऐकून वैराग्ययुक्त होऊन परीक्षिताने प्रायोपवेशनाचा निश्चय केला. प्रायोपवेशनाची वार्ता ऐकताच अनेक ऋषीमुनी त्याच्याकडे आले.

मू. – तत्रोपजग्मुर्भुवनं पुनाना महानुभावा मुनयः सशिष्याः ।
प्रायेण तीर्थाभिगमापदेशैः स्वयं हि तीर्थानि पुनन्ति सन्तः ।।

अ. – ' सर्व भुवनांतील पवित्र तपस्वी आपल्या शिष्यांसह तेथे (गंगातीरी) एकत्र जमले. प्रायः तीर्थक्षेत्री गेल्याने पावन होता येते; पण संत-सज्जन आपल्या सहवासाने या तीर्थक्षेत्रांनाच पवित्र बनवितात. '

व्य. – सामान्यतः तीर्थक्षेत्री पापक्षालन होऊन पवित्र होता येते. परंतु या तीर्थक्षेत्रांनाही पावनत्व संत-सज्जनांच्या संगतीमुळे येते. संतमहिमा सांगण्यासाठी या उक्तीचा वापर केला जातो.

५२५. स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्

सं. – भगी. २.४०. ' सांख्य ' म्हणजे ज्ञानमार्गाचे विवेचन केल्यानंतर कर्मयोग स्पष्ट करून सांगताना त्याचे महत्त्व श्रीकृष्णांनी येथे वर्णिले आहे.

मू. – नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ।।

अ. – ' या (योग) मार्गात एकदा आरंभिलेल्या कर्माचा नाश होत नाही व त्यात विघ्नही येत नाही. या धर्माचे थोडेही आचरण मोठ्या भयापासून रक्षण करते.'

व्य. – शुभकर्मांचे, पुण्यकर्माचे बीज लहान असले तरी कालांतराने त्याला अंकुर फुटून त्याचा विस्तार होतो व त्यापासून मोठा लाभ होतो. कर्मामध्ये त्यामागची

उदात्त भावना महत्त्वाची असते; मग ते कर्म कितीही क्षुद्र वाटणारे, सामान्य दिसणारे असो. त्यापासून सामर्थ्य निर्माण होते व त्यामुळे माणसाचे पतनापासून रक्षण होते. हा उक्तिविशेष म्हणजे मनापासून धर्माचरण करणाराला ते त्याने चालू ठेवावे, त्यातूनच त्याच्या कल्याणाचा नि उद्धाराचा मार्ग आहे असे आश्वासन देणारा आहे.

५२६. स्थानभ्रष्टा न शोभन्ते

सं. – हित. ३.१७३. मंथरक कासवाने लघुपतनक कावळ्याचे व हिरण्यक उंदराचे विविध सुभाषिते सांगून मनोरंजन केले. स्वतःच्या स्थानापासून सुटलेल्या कोणत्या गोष्टी विशोभित दिसतात, ते मंथरकाने येथे सांगितले.

मू. – **राजा कुलवधूर्विप्रा मन्त्रिणश्च पयोधराः ।**
स्थानभ्रष्टा न शोभन्ते दन्ताः केशा नखा नराः ॥

अ. – 'स्वतःच्या स्थानावरून खाली उतरलेले राजा, कुलीन स्त्री, ब्राह्मण, मंत्री आणि स्तन विशोभित दिसतात; तसेच स्वतःची जागा सोडून खाली आलेले दात केस, नखे आणि माणसे यांची शोभा नष्ट होते.'

व्य. – प्रत्येक वस्तूचे विशिष्ट कार्य व स्थान असते. त्यानुसार आपल्या मनातही तशी निश्चित अपेक्षा व प्रतिमा निर्माण होते. त्याहून विसंगत अशी स्थिती, किंवा त्यांचे पतन झालेले पाहिले म्हणजे जी हळहळ किंवा क्वचित् तिरस्कार वाटतो, तो त्या उक्तिविशेषाने प्रकट केला जातो.

५२७. स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यम्

(पाहा : देवो न जानाति कुतो मनुष्यः)

५२८. स्थितः पृथिव्या इव मानदण्डः

सं. – कुसं. १.१. संस्कृत पंच महाकाव्यांतील कालिदासाच्या कुमारसंभव या महाकाव्याचा हा प्रारंभ आहे. विविध ऋतूंतील हिमालयाचे सौंदर्य वर्णन करताना त्याचे महत्त्वपूर्ण स्थान आणि मान कालिदासाने प्रारंभीच्या श्लोकातच प्रगट केला आहे. 'अस्ति कश्चित् वाग्विशेषः' या पत्नीच्या प्रश्नाला उत्तर देताना 'अस्ति उत्तरस्यां दिशि' म्हणून हिमालयवर्णनाने कालिदासाने आपल्या प्रतिभेचे दर्शन घडविले.

मू. – **अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः ।**
पूर्वापरौ तोयनिधी वगाह्य स्थितः पृथिव्या इव मानदण्ड ॥

अ. – 'उत्तर दिशेला देवतास्वरूप हिमालय नामक पर्वतांचा राजा पूर्वपश्चिम समुद्रापर्यंत असलेल्या पृथ्वीचा मानदंडच आहे.'

व्य. – ' भारताच्या उत्तर सीमेवर पसरलेला प्रचंड लांबीरुंदीचा, पृथ्वीवरील सर्वांत मोठा पर्वत म्हणूनच केवळ हिमालयाचे महत्त्व नाही. देवांची, ऋषीमुनींची तपोभूमी, भारताला सुजल व सुफल बनविणाऱ्या, कधीही न आटणाऱ्या गंगा–सिंधु–ब्रह्मपुत्रादी पवित्र नद्यांचे उगमस्थान, निसर्गाचा सर्वांगसुंदर आविष्कार, अशा अनेक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यांमुळे हिमालयाची भव्यता व दिव्यता भारतीयांना नेहमीच अभिमानास्पद वाटते. त्या अभिमानाच्या भावनेचा उच्चार या उक्तिविशेषाने केला जातो.

५२९. स्थितस्य गतिः चिन्तनीया

सं. – लोकोक्ती. आपल्याभोवती अनेक घटना घडत असतात; प्रश्न उपस्थित होत असतात. त्यांच्या बाबतीत जागरूक राहून विचार व कृती करण्याची शिकवण देणारा हा उक्तिविशेष सर्वत्र रूढ आहे.

मू. – **स्थितस्य* गतिः चिन्तनीया ।**

***प्राप्तस्य** : पाठभेद

अ. – ' (त्यावेळी प्रत्यक्ष) उपस्थित झालेल्या प्रश्नाचाच (तो सोडविण्याचा दृष्टीने) विचार करावा.'

व्य. – थोर पदावर असलेल्या मोठ्या माणसांपासून ते सामान्यांपर्यंत, प्रत्येकाच्या जीवनात नित्य नवे प्रश्न नि समस्या उपस्थित होत असतात. काही बाबतीत तातडीने कृती करणे आवश्यक असते. अशा वेळी भूतकाळाचे स्मरण करून त्यांतील चुकांबद्दल पश्चात्ताप करीत बसणे, स्वप्नाळूपणा, तात्त्विक ऊहापोह करीत वेळ दवडणे, या गोष्टी टाळून आपले बुद्धिसामर्थ्य खर्च करून समोर ठाकलेल्या समस्येची उकल करणे, पुढे आलेल्या प्रसंगाची व्यवस्था लावणे उचित आहे, असे या उक्तिविशेषाच्या उपयोगाने सुचविले जाते. आज, प्रत्यक्ष साक्षात आपल्यापुढे काय अडचण किंवा परिस्थिती उपस्थित आहे याचे चिंतन, मनन व त्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने विचार करूनच कोणत्याही स्थितीतून पार होता येते; भविष्यकाळाची चिंता करीत बसल्याने किंवा गत गोष्टींचा शोक करीत बसल्याने प्रश्न सुटत नाहीत. हेच हा उक्तिविशेष सांगतो.

५३०. स्थितिं नो रे दध्याः

सं. – भामिनीविलास १.५२. जगन्नाथ पंडिताच्या स्फुट काव्यरचनेपैकी प्रास्ताविक विलासातील सिंहान्योक्ती म्हणून प्रसिद्ध असलेला हा श्लोक आहे.

सुर ५. स्थलचरान्योक्तयः ३५.

मू. – स्थितिं नो रे दध्याः क्षणमपि मदान्धेक्षण सखे
गजश्रेणीनाथ त्वमिह जटिलायां वनभुवि ।
असौ कुम्भिभ्रान्त्या खरनखरनिर्दारित महा-
गुरुग्रावग्रामः स्वपिति गिरिगर्भे हरिपतिः ।।

अ. – 'मदाच्या धुंदीने बेभान होऊन, हे गजराजा, या गहन वनामध्ये तू एक क्षणभरही थांबू नकोस. हा हत्ती आहे असे समजून, आपल्या नखांनी मोठा पाषाण फोडणारा वनराज सिंह गुहेमध्ये निजलेला आहे.'

व्य. – अन्योक्ती किंवा अप्रस्तुतप्रशंसा हा संस्कृत वाङमयातील प्रसिद्ध अलंकार आहे. ज्याला उद्देशून बोलावयाचे त्याच्याऐवजी दुसरी व्यक्ती किंवा वस्तू पुढे करून तिच्याबद्दल बोलावयाचे–'लेकी बोले सुने लागे'–हे या अलंकाराचे स्वरूप आहे. वरील उक्तिविशेषात, सिंहाच्या मिषाने, अतुल पराक्रमी परंतु स्वतःच्या शक्तीची व पराक्रमाची जाणीव नसलेल्या स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय जनतेचे वर्णन केले आहे व त्या सिंहाच्या मालकीच्या वनामध्ये शिरून उन्मत्तपणे संचार करणाऱ्या हत्तीच्या मिषाने, भारतभूमी वळकावून तिच्या जनतेवर उन्मत्तपणे अत्याचार करणाऱ्या परकीय सत्ताधाऱ्यांना उद्देशून इशारा दिला आहे; हा सर्व अर्थ सुचविणारा म्हणून वरील श्लोक लोकमान्यांनी आपल्या 'केसरी' या वृत्त-पत्राच्या शिरोभागी त्याच्या नावाला व त्या काळच्या परिस्थितीला अत्यंत उचित असा निवडला होता. म्हणून त्याला ऐतिहासिक महत्त्व आलेले आहे. त्या काळात ब्रिटिश राजसत्तेला उद्देशून प्रत्यक्ष बोलणे शक्य नव्हते म्हणून त्यांनी जगन्नाथ पंडिताच्या या अन्योक्तीचा आश्रय केला.

५३१. स्निग्धजनसंविभक्तं दुःखं सह्यवेदनं भवति

सं. – शाकुं. ३. दुष्यन्ताची भेट झाल्यापासून शकुंतलेचे चित्त थाऱ्यावर नाही हे तिच्या सख्यांनी ओळखले. दिवसेंदिवस क्षीण होत जाणाऱ्या शकुंतलेला सख्यांनी तिच्या अस्वास्थ्याचे कारण विचारताच लज्जेने मनातले दुःख तिने प्रगट केले नाही. त्या वेळी मैत्रिणींनी तिला आग्रह करताना म्हटले :

मू. – **स्निग्धजनसंविभक्तं हि दुःखं सह्यवेदनं भवति ।**

अ.. – '(अग) मायेच्या माणसांना आपल्या दुःखात सहभागी केलं ना म्हणजे दुःख थोडं हलकं होतं (बघ).'

व्य. – प्रेमाच्या माणसांच्या सांत्वनाच्या बोलांनी, त्यांच्या सहानुभुतीच्या फुंकरीने अंतःकरणाचा दाह थोडा शांत होतो; दुःखाचे ओझे उतरल्यासारखे वाटते. हा प्रत्येकाला येणारा एक हृद्य अनुभव आहे. हा उक्तिविशेष म्हणजे कालिदासाने त्याला दिलेले मनोहर शब्दरूप होय.

राज्ञा १ उविसं. १९

५३२. स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः

सं. – भगी. १८.४५. मानवसमाजातील चारही वर्णांच्या कर्मांची विभागणी व स्वरूप स्पष्ट केल्यानंतर, आपापल्या वर्णाश्रमधर्मानुसार कर्म करण्याने मनुष्याला ईश्वर-प्राप्तीची योग्यता प्राप्त होऊ शकते, हे श्रीकृष्णांनी या श्लोकांत सांगितले.

मू. – **स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ।**
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विन्दति तच्छृणु ॥

अ. – 'आपापले कर्म करण्यात तत्पर असलेल्या पुरुषाला परम सिद्धी प्राप्त होते. आपल्या कर्मात दक्ष असल्याने सिद्धी कशी मिळते ते ऐक.'

व्य. – स्वभावतः कोणतेही कर्म थोर-मोठे किंवा क्षुद्र-हलके नाही. समाजातील कोणत्याही घटकाची योग्यता त्या कर्मावरून कमी-अधिक पात्रतेची ठरू नये. मनुष्यजीवनाचे जे सर्वश्रेष्ठ ध्येय - ईश्वरप्राप्ती ते प्राप्त करून घेण्यास कोणतेही कर्म आड येत नाही; मात्र त्यामागे ईश्वरार्पणबुद्धी असली पाहिजे. ईश्वरप्राप्तीला सर्वकर्मसंन्यास किंवा पूर्ण कर्मत्याग यांची आवश्यकता नाही, हे प्रतिपादन करण्यासाठी हा उक्तिविशेष सांगितला जातो.

(ह)

५३३. हरेर्नामैव नामैव नामैव मम जीवनम्

सं. – पांडवगीता ५३. भक्तिपर श्लोकांच्या या नित्यपठनीय संग्रहात महाभारता-तील पांडव-कौरवादिक ६८ प्रमुख व्यक्तींनी भगवान श्रीकृष्णांची स्तुती केली आहे. हरिमय झालेल्या भक्तश्रेष्ठ विदुरांनीही आपली जीवननिष्ठा ज्या शब्दांत प्रभूला अर्पण केली तोच हा श्लोक आहे.

मू. – **हरेर्नामैव नामैव नामैव मम जीवनम् ।**
कलौ नास्त्येव नास्त्येव नास्त्येव गतिरन्यथा ॥

अ. – 'श्रीकृष्णाचे नाम–केवळ नामच माझे जीवन (चैतन्य) आहे. कलियुगामध्ये (भगवंताच्या नामाखेरीज) दुसरा (संसार तरून जाण्यास) उपाय नाहीच नाही.'

व्य. – सत्ययुगात भगवंताच्या ध्यानाने, त्रेतायुगात यज्ञाने व द्वापरात भगवंताची सेवा-अर्चा करण्याने जे फळ मिळते तेच फळ कलियुगात श्रीहरीच्या केवळ नाम-स्मरणाने मिळते (भाग. १२.३.५२). भगवंताच्या नवविधप्रकारे केल्या जाणाऱ्या भक्तीपैकी संकीर्तनाचे महत्त्व आणि माहात्म्य सांगताना हेच शब्द वारंवार बोलले जातात. संसारचक्रातून मुक्ती मिळविण्याचा हा सुलभ उपाय आहे. ज्ञान-साधना जरी करायची झाली तरी चित्तशुद्धी आवश्यक असते. आजच्या युगात या चित्तशुद्धीसाठीही नामजप हाच प्रभावी मंत्र आहे, समर्थ साधन आहे. अनेक भक्त कवी, भाविक साधक आणि अधिकारी संत यांनी नाममाहात्म्याचे माधुर्य

बहुविध प्रकारे वर्णून सामान्य जनतेला भक्तिसुख लुटण्यासाठी आवाहन करताना या उक्तिविशेषाचा आवर्जून निर्देश केला आहे.

५३४. हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम्

सं. – भगी. २.३७. शोकविव्हल झालेल्या अर्जुनाला श्रीकृष्णांनी स्वधर्माची–क्षात्रोचित कर्तव्याची जाणीव करून दिली. 'कर्तव्यपराङ्मुख झाल्याने होणारी दुष्कीर्ती ही तुला मरणापेक्षाही दुस्सह वाटेल; म्हणून 'तू प्राप्त कर्तव्यच करावेस' असे श्रीकृष्णांनी त्याला आवाहनही केले.

मू. – हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चयः ।।

अ. – '(हे अर्जुना, या युद्धात) तू मेलास (मारला गेलास) तर स्वर्गाला (स्वर्गसुख भोगशील) जाशील; आणि तू जिंकलास तर पृथ्वीचा स्वामी होशील. म्हणून हे कुन्तिपुत्रा, युद्धाचाच निश्चय करून ऊठ ! (युद्धाला तयार हो).'

व्य. – रणांगणात मारला गेलेला क्षत्रिय आणि संन्यासधर्माची दीक्षा घेतलेला परिव्राट् हे दोघे स्वर्गाचे अधिकारी आहेत अशी आपली श्रद्धा आहे. ('द्वाविमौ पुरुषव्याघ्र सूर्यमण्डलभेदिनौ । परिव्राड् योगयुक्तश्च रणे चाभिमुखो हतः ।।') युद्ध म्हणजे क्षत्रियाचा जणू बहिश्चर प्राणच. त्यामुळे मरणे किंवा मारणे एवढेच त्याला समजते. अन्य पर्याय त्याला रुचत नाही. गीतेतील ही भगवंताची उक्ती एक संजीवक मंत्र बनली आहे. वीरांना स्वधर्माची प्रेरणा देणारी, युद्धासाठी प्रोत्साहित करणारी चैतन्यदायी घोषणा म्हणूनच हा उक्तिविशेष प्रचलित आहे.

५३५. हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम्

सं. – ईश. १५. ब्रह्माची उपासना व शास्त्रानुसार कर्म करणाऱ्या पुरुषाने, आत्मज्ञान व्हावे यासाठी जगाला प्रकाशित करणाऱ्या सूर्याची प्रार्थना केली आहे.

मू. – हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ।।

अ. – 'तेजस्वी सुवर्णपात्राने सत्याचे (ब्रह्माचे) द्वार झाकलेले आहे. सत्यधर्माचे आचरण करणाऱ्या मला (त्या सत्याचे) ज्ञान करून घेण्यासाठी, हे सूर्या, ते तू उघड.'

व्य. – नामरूपात्मक जगताने ब्रह्माचे सत्स्वरूप झाकले गेले आहे. जगताचे स्वरूप आकर्षक, सोन्यासारखे चमकणारे आहे. त्यामुळे सर्व इंद्रियांच्या वृत्ती बाहेरच्या जगाकडे धावतात, आकर्षित होतात; तेथेच रंगून जातात व मोहित होतात. जगाला प्रकाशित करणाऱ्या, त्यामागे गुप्त असलेल्या सत्य ब्रह्माचे ज्ञान व्हावयाचे असेल तर जगाचे मोहमय, चमकणारे स्वरूप दूर सारून अन्तर्मुख होणे आवश्यक आहे हे या उक्तिविशेषाने सुचविले जाते.

अवलोकिलेले संदर्भग्रंथ

ग्रंथनाम	संपादक – प्रकाशक – प्रकाशनवर्ष
१. **सुभाषितपद्यरत्नाकर** खंड – १	मुनि विशालविजयजी; विजय धर्मसूरि
२. ,, खंड – २	ग्रंथमाला, उज्जैन.
३. ,, खंड – ३	
४. ,, खंड – ४	
५. **सुभाषितावलिः** (वल्लभदेव)	प्रा. र. द. करमरकर; भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे; १९६१.
६. **सदुक्ति-कर्णामृत** (श्रीधरदास)	श्री. सुरेशचंद्र बानर्जी,; १९६५.
७. **सुभाषितरत्नकोशः** (विद्याधर)	प्रा. डी. डी. कोसंबी; हार्वर्ड ओरिएंटल सीरीज, १९५७.
८. **सूक्तिः-मुक्तावलिः**	अेम्बार कृष्णम्माचार्य; ओरिएन्टल इन्स्टिटयूट, वडोदा; १९३८.
९. **साहित्यरत्नकोशे सुभाषितसंग्रहः** (प्रथमो भाग)	साहित्य अकादमी; नवी दिल्ली; १९७१.
१०. **संस्कृत सुभाषित-सौरभम्**	मुनिदेव उपाध्याय; भारतीय प्राच्यविद्या प्रतिष्ठान रामगंज, अजमेर.
११. **सुभाषितरत्नसंदोहः** (अमितगति)	पं. भावदत्त शास्त्री; निर्णयसागर प्रेस, मुंबई; १९३२.
१२. **संस्कृत लोकोक्ति-संग्रहः**	तारिणीश झा; अभिनव भारती, अलाहाबाद.
१३. **संस्कृत-मराठी सुभाषितकोश**	ल. गो. विंझे; निर्णयसागर प्रेस, मुंबई; १९६३.
१४. **महासुभाषितसंग्रह** खंड १	लुड्विक स्टर्नबॅच; मोतीलाल बनारसीदास; १९७४.
१५. **महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश** खंड १ व २	य. रा. दाते, चिं. ग. कर्वे; महाराष्ट्र कोश मंडळ, पुणे; १९४२.

याशिवाय प्रत्यक्ष संदर्भ घेतलेल्या ग्रंथांची सूची पृष्ठ १९ वर पाहावी.

परिशिष्ट : पद्धती, सूचना, स्पष्टीकरण

- मूळ उक्तीत एकापेक्षा अधिक संदर्भही दिलेले आहेत. तथापि प्रत्यक्ष त्या उक्तीशी संबंधित इतर संदर्भ, अधिक श्लोक किंवा अधिक विवरण उपलब्ध झाले व आवश्यक वाटले तसे येथे परिशिष्टात दिले आहे. क्वचित काही ठिकाणी स्पष्टीकरण व काही अधिक तपशीलही दिला आहे.
- परिशिष्टाचा अनुक्रम मुळाप्रमाणेच आहे. प्रारंभी क्रमांक, नंतर उक्तिविशेष व त्यापुढे पृष्ठांक आहे.

उक्तिविशेष : परिशिष्टक्रम

अनुक्रमांक		पृष्ठ	
४३	आत्मानं सततं रक्षेत्	२३	श्लोक
८४	कलां नार्हन्ति षोडशीम्	४६	विवरण
८७	कस्मै देवाय हविषा विधेम	४८	श्लोक
८९	क्वचिदपि कुमाता न भवति	४९	,,
१०२	काव्येषु नाटकं रम्यम्	५९	,,
१०३	काश्यां तु मरणान्मुक्तिः	५९	विवरण
१०५	किं चित्रं यदि	६१	श्लोक
१०८	क्रियासिद्धिः सत्त्वे	६२	,,
१२०	कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः	७०	,,
१३७	गुणाः सर्वत्र पूज्यन्ते	८०	,,
१४३	चक्षुर्वै सत्यम्	८३	विवरण
१४७	चराति चरतो भगः । चरैवेति	८४	श्लोक
१६६	तत्त्वमसि	९६	विवरण
१७१	तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु	९९	श्लोक
१७३	तपो हि दुरतिक्रमः	१००	,,
२०१	दारिद्र्यमेकं गुणराशिनाशी	११४	,,
२२१	धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां	१२५	विवरण
२३२	न तत्र दिवसं वसेत्	१३३	श्लोक
२६९	नाराजके जनपदे	१५५	,,
२९३	पद्मपत्रमिवाम्भसा	१६८	विवरण
३७६	यथा राजा तथा प्रजाः	२१३	श्लोक
४२४	वन्दे मातरम्	२३४	,,
४५८	शिवः केवलोऽहम्	२५१	,,
४८१	सत्ये सर्वं प्रतिष्ठितम्	२६४	,,

४३. आत्मानं सततं रक्षेत् । पृ. २३.

'आपदर्थे धनं रक्षेत्...... । हा श्लोक हित. १.४२. व पंच. १.३८७. या ठिकाणीही आढळतो. दोन्ही ठिकाणी श्लोक एकच आहे.

८४. कलां नार्हन्ति षोडशीम् । पृ. ४६.

सोळा कला – परमेश्वराच्या शक्ती किंवा अतीन्द्रिय सामर्थ्य म्हणजे कला होत; अशा प्रकारचे विवेचन बृहदारण्यक (अ. १), छांदोग्य आणि प्रश्न या उपनिषदांत (अ. ६) व शतपथ ब्राह्मणात आले आहे.

परमेश्वराजवळ सोळा कलारूप शक्ती वास करीत असतात. त्या सर्वांचे सामर्थ्य सारखे असते. ज्याप्रमाणे रथाच्या चाकाला सोळा आरे असतात, प्रत्येक आऱ्याची लांबी-रुंदी एकाच आकार-प्रकाराची असते आणि प्रत्येक आऱ्याचे चाकाशी संबंधित असलेले साहाय्यक सामर्थ्य सारखे आणि एकजिनसी असते, त्याप्रमाणे परमेश्वराच्या सोळा कलारूप शक्ती आहेत.

लघुभागवतामृतामध्ये परमेश्वराच्या सोळा कलात्मक शक्तींचा स्पष्ट उल्लेख आहे. श्री, भू, कीर्ती, इला, लीला, कान्ती आणि विद्या या शक्ती; आणि उत्कर्षिणी, ज्ञाना, क्रिया, योगा, प्रव्ही, सत्या, ईशाना, धृती आणि अनुग्रहा या नऊ कला मिळून सोळा शक्ती मानल्या आहेत.

८७. कस्मै देवाय हविषा विधेम । पृ. ४८.

ऋग. १०.१२१. ऋचा क्रमांक ५ वगळता उरलेल्या आठ ऋचा.

हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ।
स दाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम ।। १०.२१.१२१ ।।

य आत्मदा बलदा यस्य विश्व उपासते प्रशिषं यस्य देवाः ।
यस्य छायामृतं यस्य मृत्युः कस्मै देवाय हविषा विधेम ।। १०.१२१.२ ।।

यः प्राणतो निमिषतो महित्वैक इद्राजा जगतो बभूव ।
य ईशे अस्य द्विपदश्चतुष्पदः कस्मै देवाय हविषा विधेम ।। १०.१२१.३ ।।

यस्येमे हिमवन्तो महित्वा यस्य समुद्रं रसया सहाहुः ।
यस्येमाः प्रदिशो यस्य बाहू कस्मै देवाय हविषा विधेम ।। १०.१२१.४ ।।

यं क्रन्दसी अवसा तस्तभाने अभ्यैक्षेतां मनसा रेजमाने ।
यत्राधि सूर उदितो विभाति कस्मै देवाय हविषा विधेम ।। १०.१२१.६ ।।

आपो ह यद्बृहतीर्विश्वमायन्गर्भं दधाना जनयन्तीरग्निम् ।
ततो देवानां समवर्ततासुरेकः कस्मै देवाय हविषा विधेम ।। १०.१२१.७ ।।

यश्चिदापो महिना पर्यपश्यद्दक्षं दधाना जनयन्तीर्यज्ञम् ।
यो देवेष्वधि देव एक आसीत्कस्मै देवाय हविषा विधेम ।। १० १२१.८ ।।
मा नो हिंसीज्जनिता यः पृथिव्या यो वा दिवं सत्यधर्मा जजान ।
यश्चापश्चन्द्रा बृहतीर्जजान कस्मै देवाय हविषा विधेम ।। १०.१२१.९ ।।

८९. क्वचिदपि कुमाता न भवति । पृ. ४९.

'देव्यपराधक्षमापन' स्तोत्रातील श्लोक क्रमांक ४ वगळता उरलेला २ रा व ३ रा श्लोक.

विधेरज्ञानेन द्रविण-विरहेणालसतया
विधेयाशक्यत्वात् तव चरणयोर्याच्युतिरभूत् ।
तदेतत् क्षंतव्यं जननि सकलोद्धारिणि शिवे
कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ।। २ ।।
पृथिव्यां पुत्रास्ते जननि बहवः सन्ति सरलाः
परं तेषां मध्ये विरल-तरलोऽहं तव सुतः ।
मदीयोऽयं त्यागः समुचितमिदं नो तव शिवे
कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ।। ३ ।।

१०२. काव्येषु नाटकं रम्यम् । पृ. ५९

संस्कृत साहित्यात अत्युत्कृष्ट ठरलेले शाकुंतलातील लोकप्रिय श्लोकचतुष्टय.

अस्मान्साधु विचिन्त्य संयमधनानुच्चैः कुलमात्मन
स्त्वय्यस्याः कथमप्यबान्धवकृतां स्नेहप्रवृत्तिं च ताम् ।
सामान्यप्रतिपत्तिपूर्वकमियं दारेषु दृश्या त्वया
भाग्यायत्तमतःपरं न खलु तद्वाच्यं वधूबन्धुभिः ।। ४..१७ ।।
शुश्रूषस्व गुरून्कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने
भर्तुर्विप्रकृतापि रोषणतया मास्म प्रतीपं गमः ।
भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भाग्येष्वनुत्सेकिनी
यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधयः ।। ४.१८ ।।
अभिजनवतो भर्तुःश्लाघ्ये स्थिता गृहिणीपदे
विभवगुरुभिः कृत्यैस्तस्य प्रतिक्षणमाकुला ।
तनयमचिरात्प्राचीवार्कं प्रसूय च पावनं
मम विरहजां न त्वं वत्से शुचं गणयिष्यसि ।। ४.१९ ।।
अर्थो हि कन्या परकीय एव तामद्य संप्रेष्यः परिग्रहीतुः ।
जातो ममायं विशदः प्रकामं प्रत्यर्पितन्यास इवान्तरात्मा ।। ४.२० ।।

१०३. काश्यां तु मरणान्मुक्तिः । पृ. ५९.

दुसऱ्या श्लोकात काशीबरोबर उल्लेख असलेल्या आणखी तीन तीर्थक्षेत्रांची माहिती :

कमलालय – मद्रासहून धनुष्कोटीकडे जाणाऱ्या रेल्वेमार्गावर असलेल्या, मायावरम् या प्रसिद्ध गावापासून २४ मैलांवर तिरुवारूर हे गाव आहे. तेथे ‘ त्यागराज ’ या नावाने प्रसिद्ध असलेले शिवाचे मंदिर आहे. मंदिराच्या परिसरात जे विशाल सरोवर आहे त्याला ‘ कमलालय ’ असे नाव आहे. हे या स्थानाचे मुख्य तीर्थ आहे. या सरोवराला ६५ घाट आहेत.

अभ्रसरस् (किंवा अभ्रसदस्) – याचेच दुसरे नाव चिदंबरम् असून मद्रास – धनुष्कोटी रेल्वेमार्गावर वेल्लुपुरम्पासून ५० मैलांवर हे आहे. येथे नटराज शिवाचे मंदिर असून दक्षिणेतील हे एक प्रमुख व प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. येथील शिवस्थान पंचतत्त्वलिंगांपैकी ‘ आकाशतत्त्वलिंगां’चे स्थान मानले जाते. नटराजाच्या मंदिरावर एकावर एक अशी दहा मजली प्रचंड गोपुरे असून त्यांवर विविध नृत्यमुद्रांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

अरुणाचलम् – मद्रास राज्यातील तिरुवन्नमलै या गावाजवळ अरुणाचल हा पवित्र पर्वत आहे. त्यावर नंदीश्वराने स्थापन केलेले शिवाचे स्थान आहे. पंचतत्त्वलिंगांपैकी ‘ अग्नितत्त्वलिंग ’ अरुणाचलम्मध्ये आहे असे मानले जाते. हा पर्वतच शिवरूप असल्यामुळे त्याची प्रदक्षिणा करणे पुण्यकारक मानतात. अरुणाचलाच्या परिसरात रमण महर्षींचा आश्रम असल्यामुळे आधुनिक लोकांचेही ते एक महान तीर्थक्षेत्र बनले आहे.

१०५. किं चित्रं यदि... । पृ. ६१

वेदाध्ययन करणारा ब्राह्मण ज्ञानी पंडित असला तर नवल नाही; त्याप्रमाणेच परोपकार हा स्वभावधर्मच असलेल्या सज्जनांना दुसऱ्याबद्दल चटकन अनुकंपा वाटल्यास आश्चर्य नाही; हे सांगणारे हे आणखी काही श्लोक.

किमत्र चित्रं यत्सन्तः परानुग्रहतत्पराः ।
नहि स्वदेहशैत्याय जायन्ते चन्दनद्रुमाः ।। सुर. २. सज्जनप्रशंसा ३४ ।।
किं चित्रं भुवनानि पावयति यद्यच्चाहितानां
यशो हंसान्मज्जयति प्रतापदहनं निर्वापयत्याशु यत् ।
आश्चर्यं नृपनायकस्य भवतो यत्कीर्तिमन्दाकिनी
तानारोहति भूधराञ्जलनिधीनुलङ्घ्य गच्छत्यपि ।। सुर. ३. कीर्तिवर्णन ५०।।

१०८. क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे । पृ. ६२.

भोजप्रबंधातील श्लोकक्रमांक १७० वगळता उरलेले तीन श्लोक, शेवटचा श्लोक सुभाषितरत्नभांडागारातील (२. सज्जनप्रशंसा २५३) आहे.

घटो जन्मस्थानं मृगपरिजनो भूर्जवसनो
वने वासः कन्दादिकमशनमेवंविधगुणः ।
अगस्त्यः पाथोधिं यदकृत कराम्भोजकुहरे
क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ।। भोज. १६८ ।।

रथस्यैकं चक्रं भुजगयमिताः सप्त तुरगा
निरालम्बो मार्गश्चरणविकलः सारथिरपि ।
रविर्यात्येवान्तं प्रतिदिनमपारस्य नभसः
क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ।। भोज. १६९ ।।

धनुः पौष्पं मौर्वी मधुकरमयी चञ्चलदृशां
दृशां कोणो बाणः सुहृदपि जडात्मा हिमकरः ।
स्वयं चैकोऽनङ्गः सकलभुवनं व्याकुलयति
क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे ।। भोज १७१ ।।

विपक्षः श्रीकण्ठो जडतनुरमात्यः शशधरो
वसन्तः सामन्तः कुसुमिषवः सैन्यमबलाः ।
तथापि त्रैलोक्यं जयति मदनो देहरहितः
क्रियासिद्धिः सत्त्वे वसति महतां नोपकरणे ॥ सुर. २. सज्जन. २५३ ॥

१२०. कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः । पृ. ७०.

'कौपीनपञ्चक' या वेदान्तस्तोत्रातील ३ रा श्लोक सोडून राहिलेले चार श्लोक

मूलं तरोः केवलमाश्रयन्तः पाणिद्वयं भोक्तुममत्रयन्तः ।
कन्थामिव श्रीमपि कुत्सयन्तः कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः ।। १ ।।
देहादि-भावं परिवर्जयन्तः आत्मानमात्मन्यवलोकयन्तः ।
नान्तं न मध्यं न बहिः स्मरन्तः कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः ।। २ ।।
स्वानन्द-भावे परितुष्टिमन्तः संशांतसर्वेन्द्रिय-तुष्टिमन्तः ।
अहर्निशं ब्रह्मणि ये रमन्तः कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः ।। ३ ।।
पञ्चाक्षरं पावनमुच्चरन्तः पतिं पशूनां हृदि भावयन्तः ।
भिक्षाशना दिक्षु परिभ्रमन्तः कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः ।। ५ ।।

१३७. गुणाः सर्वत्र पूज्यन्ते । पृ. ८०.

ग्रंथात समाविष्ट केलेल्या दोन श्लोकांहून वेगळा, सप. ग २१ हा श्लोक पुढीलप्रमाणे आहे :

गुणाः सर्वत्र पूज्यन्ते न महत्योऽपि संपदः ।
पूर्णेन्दुः किं तथा वन्द्यो निष्कलङ्को यथा कृशः ।।

१४३. चक्षुर्वै सत्यम् । पृ. ८३.

सं. – बृहद्. ५.१४.४. गायत्रीचे तुरीय – म्हणजे चौथे पद सांगितल्यानंतर ते पद सत्यात प्रतिष्ठित आहे असे म्हटले आहे. सत्याचे एक स्वरूप येथे सांगितले आहे.

मू. – सैषा गायत्र्येतस्मिँस्तुरीये दर्शते परे परोरजसि प्रतिष्ठिता तद्वै तत्सत्ये
प्रतिष्ठितं चक्षुर्वै सत्यं चक्षुर्वै सत्यं तस्मात्........।

१४७. चराति चरतो भगः । चरैवेति ।। पृ. ८४.

श्रमशीलतेचे माहात्म्य वर्णन करणाऱ्या ऐतरेय ब्राह्मणातील ३ रा मंत्र वगळता उरलेले चार मंत्र.

नानाश्रान्ताय श्रीरस्तीति रोहित ! शुश्रुम ।
पापो नृषद् वरो जन इन्द्र इच्चरतः सखा । चरैवेति चरैवेति ।। १ ।।
पुष्पिण्यौ चरतो जङ्घे भूष्णुरात्मा फलग्रहिः ।
शेरेऽस्य सर्वे पाप्मानः श्रमेण प्रपथे हताः । चरैवेति चरैवेति ।। २ ।।
कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः ।
उत्तिष्ठंस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन् । चरैवेति चरैवेति ।। ४ ।।
चरन्वै मधु विन्दति चरन्स्वादुदुम्बरम् ।
सूर्यस्य पश्य श्रेमाणं यो न तन्द्रयते चरन् । चरैवेति चरैवेति ।। ५ ।।

१६६. तत्त्वमसि । पृ. ९६.

सामवेदाच्या या महावाक्याच्या निमित्ताने भारतीय तत्त्वज्ञानातील मुख्य सिद्धान्तांचा – महावाक्यांचा संक्षेपाने परिचय : सारगर्भ तत्त्वज्ञान सांगणाऱ्या प्रज्ञानं ब्रह्म, अहं ब्रह्मास्मि, तत्त्वमसि आणि अयमात्मा ब्रह्म या चार वाक्यांना महावाक्य म्हणतात.

प्रज्ञानं ब्रह्म हे वाक्य ऋग्वेदाच्या ऐतरेय आरण्यकात आले आहे. पंचेन्द्रिये व अंतःकरण यांच्या विविध व्यापार-क्रियांमधून जाणवणारे चैतन्य म्हणजेच ब्रह्म. शरीरेन्द्रियांपेक्षा वेगळे असणारे साक्षीभूत चैतन्य तेच जगाचे उपादान कारण आहे. प्रज्ञान म्हणजे चैतन्य व चैतन्य म्हणजेच ब्रह्म; म्हणून सर्वत्र असलेले प्रज्ञान हेच ब्रह्म होय असा भावार्थ आहे.

अयमात्मा ब्रह्म हे अथर्ववेदाच्या मांडूक्योपनिषदातील (२ रा मंत्र) असून त्यातील अयम् पदाने आत्म्याचे अपरोक्षत्व व्यक्त केले आहे. देहादीहून वेगळे असणारे अधिष्ठान व साक्षी या रूपातील चैतन्य तोच आत्मा होय. मिथ्या जगाचे अधिष्ठान आत्मरूप ब्रह्मच आहे,

अहं ब्रह्मास्मि (पाहा : पृ. १७) व तत्त्वमसि (पाहा : पृ. ९६) स्वतंत्रच घेतली आहेत. या चारही महावाक्यांचे तात्पर्य ब्रह्मात्मैक्याचे प्रतिपादन करणे हेच आहे. संन्यासग्रहणाच्या वेळी यांपैकी एका महावाक्याचा उपदेश करतात.

१७१. तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु । पृ. ९९.

ऋग्. १०. १६६ खिल ३३. मधील ऋचा क्रमांक ३ सोडून राहिलेल्या १ ते ६ ऋचा.

येनेदं भूतं भुवनं भविष्यत्परि गृहीतममृतेन सर्वम् ।
येन यज्ञस्तायते सप्तहोता तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ।।
१०.१६६. खिल ३३.१ ।।

येन कर्माण्यपसो मनीषिणो यज्ञे कृण्वन्ति विदथेषु धीराः ।
यदपूर्वं यक्षमन्तः प्रजानां तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ।।
१०.१६६. खिल ३३.२ ।।

यत्प्रज्ञानमुत चेतो धृतिश्च यज्ज्योतिरन्तरमृतं प्रजासु ।
यस्मान्न ऋते किञ्चन कर्म क्रियते तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ।।
१०.१६६. खिल ३३.४ ।।

यस्मिन्नृचः साम यजूंषि यस्मिन्प्रतिष्ठिता रथनाभाविवाराः ।
यस्मिंश्चित्तं सर्वमोतं प्रजानां तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ।।
१०.१६६ खिल ३३.५ ।।

सुषारथिरश्वानिव यन्मनुष्यान्नेनीयतेऽभीशुभिर्वाजिन इव ।
हृत्प्रतिष्ठं यदजिरं यविष्ठं तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु ।।
१०.१६६ खिल ३३.६ ।।

१७३. तपो हि दुरतिक्रमः । पृ. १००.

तपाचरणाने सर्व काही साध्य होते. तपाने अशक्य अशी कोठलीच गोष्ट नाही. हेच आवर्जून सांगणाऱ्या या आणखी काही श्लोकपंक्ती.

तपसा प्राप्यते स्वर्गस्तपसा प्राप्यते यशः ।
आयुः प्रकर्षो भोगाश्च लभ्यन्ते तपसा विभो ।। महा. १३.५७.८ ।।
दुरन्वयं दुष्प्रधर्षं दुरापं दुरतिक्रमं ।
सर्वं वें तपसाभ्यैति तपो हि बलवत्तरम् ।। महा. १३.१२२.८ ।।

सतत दीर्घ परिश्रम म्हणजेच तप. एकाच विशिष्ट दिशेने केले जाणारे सतताभ्यास किंवा अखंड साधना हेही तपाच्याच समानार्थी शब्द आहेत. अव्याहतपणा आणि अभ्यास यांची कास धरून परिश्रम करणाराला काहीही अशक्य नाही असे आपल्या पूर्वजांनी वारंवार सांगितले आहे.

२०१. दारिद्र्यमेकं गुणराशिनाशि । पृ. ११४.

कालिदासाच्या कुमारसंभवातील ज्या श्लोकावरून दारिद्र्याचे वर्णन करताना एकच दोषही सर्व गुणांचा नाश करण्यास समर्थ असतो, असे आपले मत मांडताना कवीने ज्या श्लोकाचा विरोधी म्हणून उल्लेख केला तो हा श्लोक :

अनन्तरत्नप्रभवस्य यस्य हिमं न सौभाग्यविलोपि जातम् ।
एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः ।। कुसं. १.३ ।।

२२१. धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम् । पृ. १२५

संस्कृत उक्ती आपल्या व्याख्यान-संभाषणात किंवा लेखनात वापरणारे सर्वच संस्कृतज्ञ असतात असे नाही. कोठेतरी ऐकलेले वा वाचलेले असते त्याचा वापर सहजपणे केला जातो; आणि त्यात वावगे काही नाही. परंतु कित्येकदा 'तक्रं शक्रस्य दुर्लभम्' सारखी स्थिती होऊन अर्थाचा अनर्थ किंवा निदान विपरीतार्थ तरी ती वापरणाराकडून केला जातो. कित्येकदा संस्कृतज्ञ असलेल्यांकडूनही अनवधानाने किंवा क्वचित हेतुपूर्वकही याचा उपयोग वरीलप्रमाणे केला जाताना दिसतो. 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्' याचा शब्दशः अर्थ करून 'धर्माची शिकवण गुहेत ठेवण्यासाठी असते; ती केवळ सांगण्यासाठी असते, आचरणात आणण्याकरिता नसते' असा निष्कर्ष श्रोत्यांना अथवा वाचकांना सांगितला जातो. परंतु ही उक्ती कोणत्या संदर्भात आली आहे, हे कोणाच्या कोणत्या प्रश्नाला कोणी कोठे उत्तर दिले आहे हे मुळात समजून घेतल्यास त्या उक्तीचा नीट अर्थ लागतो. मूळ संदर्भ न पाहाताच अशा उक्ती वापरणारे स्वतःची दिशाभूल व ऐकणारा-वाचणाऱ्याचा बुद्धिभेद करण्याची शक्यता असते. म्हणून नेहमी संदर्भ समजून घेणे आवश्यक असते.

२३२. न तत्र दिवसं वसेत् । पृ. १३३.

सप. न मधील श्लोकक्रमांक १५ वगळता उरलेले चार श्लोक.

धनिकः श्रोत्रियो राजा नदी वैद्यस्तु पञ्चमः ।
पञ्च यत्र न विद्यन्ते न तत्र दिवसं वसेत् ।। सप. न १२ ।।
लोकयात्रा नयो लज्जा दाक्षिण्यं त्यागशीलता ।
पञ्च यत्र न विद्यन्ते न तत्र दिवसं वसेत् ।। सप. न १३ ।।
ऋणदाता च दैवज्ञः श्रोत्रियः सुजला नदी ।
यत्र ह्येते न विद्यन्ते न तत्र दिवसं वसेत् ।। सप. न १४ ।।
यत्र विद्यागमो नास्ति यत्र नास्ति धनागमः ।
यत्र चात्मसुखं नास्ति न तत्र दिवसं वसेत् ।। सप. न १६ ।।

२६९. नाराजके जनपदे ।........ पृ. १५५.

वाल्मीकि रामायणातील अराजकाचे वर्णन : २४ वा श्लोक वगळता उरलेले वा. रा. २.६७. ८ ते ३१ (एकूण २२) श्लोक.

इक्ष्वाकूणामिहाद्यैव कश्चिद्राजा विधीयताम् ।
अराजकं हि नो राष्ट्रं विनाशं समवाप्नुयात् ॥ ८ ॥
नाराजके जनपदे विद्युन्माली महास्वनः ।
अभिवर्षति पर्जन्यो महीं दिव्येन वारिणा ॥ ९ ॥
नाराजके जनपदे बीजमुष्टिः प्रकीर्यते ।
नाराजके पितुः पुत्रो भार्या वा वर्तते वशे ॥ १० ॥
अराजके धनं नास्ति नास्ति भार्याप्यराजके ।
इदमत्याहितं चान्यत्कुतः सत्यमराजके ॥ ११ ॥
नाराजके जनपदे कारयन्ति सभां नराः ।
उद्यानानि च रम्याणि हृष्टाः पुण्यगृहाणि च ॥ १२ ॥
नाराजके जनपदे यज्ञशीला द्विजातयः ।
सत्राण्यन्वासते दान्ता ब्राह्मणाः संशितव्रताः ॥ १३ ॥
नाराजके जनपदे महायज्ञेषु यज्वनः ।
ब्राह्मणा वसुसंपूर्णा विसृजन्त्याप्तदक्षिणाः ॥ १४ ॥
नाराजके जनपदे प्रहृष्टनटनर्तकाः ।
उत्सवाश्च समाजाश्च वर्धन्ते राष्ट्रवर्धनाः ॥ १५ ॥
नाराजके जनपदे सिद्धार्था व्यवहारिणः ।
कथाभिरभिरज्यन्ते कथाशीलाः कथाप्रियैः ॥ १६ ॥
नाराजके जनपदे तूद्यानानि समागतः ।
सायाह्ने क्रीडितुं यान्ति कुमार्यो हेमभूषिताः ॥ १७ ॥
नाराजके जनपदे धनवन्तः सुरक्षिताः ।
शेरते विवृतद्वाराः कृषिगोरक्षजीविनः ॥ १८ ॥
नाराजके जनपदे वाहनैः शीघ्रवाहिभिः ।
नरा निर्यान्त्यरण्यानि नारीभिः सह कामिनः ॥ १९ ॥
नाराजके जनपदे बद्धघण्टः विषाणिनः ।
अटन्ति राजमार्गेषु कुञ्जराः षष्टिहायनाः ॥ २० ॥
नाराजके जनपदे शरान्संततमस्यताम् ।
श्रूयते तलनिर्घोष इष्वस्त्राणामुपासने ॥ २१ ॥
नाराजके जनपदे वणिजो दूरगामिनः ।
गच्छन्ति क्षेममध्वानं बहुपण्यसमाचिताः ॥ २२ ॥

नाराजके जनपदे चरत्येकचरो वशी ।
भावयन्नात्मनात्मानं यत्र सायंगृहो मुनिः ।। २३ ।।
नाराजके जनपदे हृष्टैः परमाजिभिः ।
नराः संयान्ति सहसा रथैश्च प्रतिमण्डिताः ।। २५ ।।
नाराजके जनपदे नराः शास्त्रविशारदाः ।
संवदन्तोपतिष्ठन्ते वनेषूपवनेषु वा ।। २६ ।।
नाराजके जनपदे माल्यमोदकदक्षिणाः ।
देवताभ्यर्चनार्थाय कल्प्यन्ते नियतैर्जनैः ।। २७ ।।
नाराजके जनपदे चन्दनागुरुरूषिताः ।
राजपुत्रा विराजन्ते वसन्ते इव शालिनः ।। २८ ।।
यथा ह्यनुदका नद्यो यथा वाप्यतृणं वनम् ।
अगोपाला यथा गावस्तथा राष्ट्रमराजकम् ।। २९ ।।
ध्वजो रथस्य प्रज्ञानं धूमो ज्ञानं विभावसोः ।
तेषां यो नो ध्वजो राजा स देवत्वमितो गतः ।। ३० ।।
नाराजके जनपदे स्वकं भवति कस्यचित् ।
मत्स्या इव जना नित्यं भक्षयन्ति परस्परम् ।। ३१ ।।

२९३. **पद्मपत्रमिवाम्भसा** । पृ. १६८.

वास्तविक कर्मयोगाचे रहस्य उलगडून दाखविणारी ही गुरुकिल्ली आहे. वरवर पाहाता हे तत्त्वज्ञान, असे वागणे सोपे वाटते; परंतु आसक्तिरहित कर्म आणि तेही स्वतःच्या कर्तृत्वशून्यभावनेने ईश्वरार्पणबुद्धीने करणे यासारखी अवघड गोष्ट नाही. ईर्षेशिवाय पुरुषार्थ, विजयाच्या विश्वासाशिवाय पराक्रम किंवा यशःसिद्धी समोर हात जोडून उभी असतानाही तीबद्दल उदासीनता अंगी बाणणे व व्यवहारात उतरविणे केवळ गीताप्रणित 'कर्मकुशलत्व' ज्यांना साधले आहे अशा उच्च भूमिकेवरील व्यक्तींनाच शक्य आहे. सर्वसामान्यांना हा उपदेश करताना त्याचा मागचापुढचा संदर्भ लक्षात घेणे आवश्यक आहे. 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' – 'मारितां मारितां घ्यावें । राज्य आपुलें ।।' असेच सर्व-सामान्यांना सांगावे लागते. 'पद्मपत्रमिवाम्भसा' हे अत्यंत प्रखर पण दुधारी शस्त्र आहे. त्याचा वापर जपून व जाणीवपूर्वकच केला पाहिजे. अन्यथा मनाच्या तरल भावना जाणण्याचे सामर्थ्य नसलेल्याकडून या उक्तीमुळे एकतर कर्मशून्यता संभवते; अथवा दुसऱ्या टोकाला जाऊन स्वैराचाराला मुभा घेण्याची शक्यता असते. कारण 'मी आसक्ती सोडली, कर्म ईश्वराला अर्पण केले' असे तोंडाने, शब्दाने म्हणून भागत नाही; तर अंतःकरणाची तशी सहज वृत्ती व्हावी लागते – तरच 'पद्मपत्रमिवाम्भसा' हा परिणाम लाभू शकतो.

३७६. यथा राजा तथा प्रजाः । पृ. २१३.

राजाप्रमाणेच प्रजा असते असेच सांगणारे हे सप. मधील य ८ ते १२ श्लोक.

राज्ञि धर्मिणि धर्मिष्ठाः पापे पापाः समे समाः ।
लोकस्तदनुवर्तन्ते यथा राजा तथा प्रजाः ।। सप. य ८ ।।
यथा देशस्तथा भाषा यथा राजा तथा प्रजाः ।
यथा भूमिस्तथा तोयं यथा बीजं तथाङ्कुरः ।। सप. य ९ ।।
स्वधर्मरूपो राजेन्द्रो दयारूपेण मन्त्रिणः ।
सेवकाः साधुरूपेण यथा राजा तथा प्रजाः ।। सप. य १० ।।
राजा राक्षसरूपेण व्याघ्ररूपेण मन्त्रिणः ।
सेवकाः साधुरूपेण यथा राजा तथा प्रजाः ।। सप. य ११ ।।
अश्विनी सूयते वत्सं कामधेनुस्तुरंगमम् ।
तथैव सागरो वह्नि यथा राजा तथा प्रजाः ।। सप. य १२ ।।

४२४. वन्दे मातरम् ।........ पृ. २३४.

राष्ट्रभक्तीचा महामंत्र ज्या प्रेरणादायी शब्दाशब्दांतून उच्चारला गेला ते हे बंकिमचंद्रांचे मूळ बंगाली गीत. (ग्रंथात आलेली पहिली दोन कडवी वगळून)

त्रिशत्कोटि*-कण्ठ-कलकल-निनाद-कराले
द्वित्रिशत्कोटि*-भुजैर्धृत-खरकरवाले
के बले मा तुमि अबले !
बहुबल-धारिणीं नमामि तारिणीं । रिपुदल-वारिणीं मातरम् ।।
तुमि विद्या तुमि धर्म्म । तुमि हृदि तुमि मर्म्म त्वं हि प्राणाः शरीरे ।
बाहुते तुमि मा शक्ति । हृदये तुमि मा भक्ति
तोमारइ प्रतिमा गड़ि । मन्दिरे मन्दिरे ।
त्वं हि दुर्गा दशप्रहरण-धारिणी । कमला-कमल-दल-विहारिणी
वाणी विद्यादायिनी
नमामि त्वां ।
नमामि कमलां अमलां अतुलां सुजलां सुफलां मातरम्,
वन्दे मातरम् ।
श्यामलां सरलां सुस्मितां भूषितां । धरणीं भरणीं मातरम् ।।

---

* मुळात सप्त व द्विसप्त होते. आधुनिक कालात ' कोटि-कोटि ' अशी नवी शब्दयोजना झाली.

४५८. शिवः केवलोऽहम् । पृ. २१५

आत्मस्वरूप वर्णन करणाऱ्या निर्वाणदशकातील पहिला श्लोक वगळता उरलेले नऊ श्लोक.

न वर्णा न वर्णाश्रमाचारधर्मा न मे धारणाध्यानयोगादयोऽपि ।
अनात्माश्रयोऽहं ममाध्यासहानात्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ।। २ ।।
न माता पिता वा न देवा न लोका न वेदा न यज्ञा न तीर्थं ब्रुवन्ति ।
सुषुप्तौ निरतास्तिशून्यात्मकत्वात्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ।। ३ ।।
न सांख्यं न शैवं न तत्पाञ्चरात्रं न जैनं न मीमांसकादेर्मतं वा ।
विशिष्टानुभूत्या विशुद्धात्मकत्वात्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ।। ४ ।।
न शुक्लं न कृष्णं न रक्तं न पीतं न पीनं न कुब्जं न ह्रस्वं न दीर्घम् ।
अरूपं तथा ज्योतिराकारकत्वात्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ।। ५ ।।
न जाग्रन्न न मे स्वप्नको वा सुषुप्तिर्न विश्वो न वा तैजसः प्राज्ञको वा ।
अविद्यात्मकत्वात्त्रयाणां तुरीयं तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ।। ६ ।।
न शास्ता न शास्त्रं न शिष्यो न शिक्षा न च त्वं न चाहं न चायं प्रपञ्चः ।
स्वरूपावबोधाद्विकल्पासहिष्णुस्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ।। ७ ।।
न चोर्ध्वं न चाधो न चांतर्न बाह्यं न मध्यं न तिर्यङ्‌ न पूर्वा परा दिक् ।
वियद्व्यापकत्वादखंडैकरूपस्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोऽहम् ।। ८ ।।
अपि व्यापकत्वादितत्त्वात्प्रयोगात्स्वतःसिद्धभावादनन्याश्रयत्वात् ।
जगत्तुच्छमेतत्समस्तं तदन्यस्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोहम् ।। ९ ।।
न चैकं तदन्यद्द्वितीयं कुतः स्यान्न चाकेवलत्वं न वा केवलऽवम् ।
न शून्यं न चाशून्यमद्वैतकत्वात्कथं सर्ववेदान्तसिद्धं ब्रवीमि ।। १० ।।

४८१. सत्ये सर्वं प्रतिष्ठितम् । पृ. २६४.

सर्व जगताचा आधार सत्यच आहे; कारण तप-योगादी सर्व सत्यातच समाविष्ट आहे. सत्य म्हणजेच ब्रह्म होय. हेच आवर्जून प्रतिपादन करणाऱ्या या पद्यपंक्ती वाल्मीकि रामायणातील आहेत.

सत्यमेकपदं ब्रह्म सत्ये धर्मः प्रतिष्ठितः ।
सत्यमेवाक्षया वेदाः सत्येनावाप्यते परम् ।। वारा. २.१४.७. ।।
सत्यमेवानृशंसं च राजवृत्तं सनातनम् ।
तस्मात्सत्यात्मकं राज्यं सत्ये लोकः प्रतिष्ठितः ।। वारा. २.१०९.१०. ।।
सत्यमेवेश्वरो लोके सत्ये धर्मः सदाश्रितः ।
सत्यमूलानि सर्वाणि सत्यान्नास्ति परं पदम् ।। वारा. २.१०९.१३. ।।

उक्तिविशेषात आलेल्या मूळ श्लोकांची

श्लोकसूची

(आद्याक्षरानुसार श्लोक, त्यापुढे उक्तिविशेषक्रमांक व पृष्ठांक दिले आहेत.)

१. अकीर्तिं चापि भूतानि ३४४.१९७
२. अखण्डमण्डलाकारं १७९.१०३
३. अग्निमीळे पुरोहितं ३. २
४. अग्ने नय सुपथा ४. २
५. अग्रतः चतुरो वेदाः ४५५.२५०
६. अङ्गं गलितं १. १
७. अङ्गुष्ठमात्रः पुरुषो २. १
८. अजरामरवत् प्राज्ञो १४१. ८१
९. अज्ञश्चाश्रद्धधानश्च ५१३.२८१
१०. अज्ञानतिमिरान्धस्य १७९.१०३
११. अज्ञानध्वान्तविध्वंस ५०५.२७७
१२. अणोरणीयान् महतो ३४६.१९८
१३. अतिदानात् बलिर्बद्धः ७. ४
१४. अतिपरिचयादवज्ञा ५. ३
१५. अतिलोभो न कर्तव्यो १४२. ८२
१६. अथ पुनरव्रती वा ३८०.२१५
१७. अथवा कृतवाग्द्वारे ५०८.२७८
१८. अथाङ्गराजादवतार्य ३३२.१९१
१९. अद्य प्रभृत्यवनताङ्गि ११६.६८
२०. अद्वेष्टा सर्वभूतानां १३. ६
२१. अर्धाषितानां शूराणां ३४४.१९७
२२. अधिष्टानं तथा कर्ता २१२.१२०
२३. अधीत्य चतुरो वेदान् १९७.११२
२४. अन्तकाले च ९. ५
२५. अन्यक्षेत्रे कृतं ४२०.२३२
२६. अनन्तपारं किल १७. ८
२७. अनन्तरत्नप्रभवस्य परि. ३००
२८. अनन्तं बत मे २४६.१४१
२९. अनन्तानीह दुःखानि १६. ८
३०. अनन्याश्चिन्तयन्तो ३९९.२२३
३१. अनर्घमपि माणिक्यं ४३७.२४१
३२. अनागतविधाता च २०६.११७
३३. अनायासेन मरणं १९. ९
३४. अनित्यानि शरीराणि ८२. ४५
३५. अनिर्वेदः श्रियो मूलं २०. १०
३६. अनुद्वेगः श्रियो मूलं २१. ११
३७. अनेकवार्षिको यस्तु १००. ५७
३८. अपवित्रः पवित्रो वा ४७६.२६१
३९. अपि क्रियार्थं सुलभं ४५१.२४७
४०. अपि स्वर्णमयी लंका १५२. ८८
४१. अप्रियस्यापि पथ्यस्य २४. १२
४२. अबला यत्र प्रबला २५. १३
४३. अभिजनवतो भर्तुः परि. २९५
४४. अमित्रमथनार्थाय २५३.१४४
४५. अमंत्रं अक्षरं नास्ति ४००.२२४
४६. अयुध्यमानो म्रियते २२८.१३०
४७. अयं बन्धुरयं नेति ६२. ३५
४८. अर्थस्य पुरुषो दासः ११. ५
४९. अर्थातुराणां न १२. ६
५०. अर्थानामर्जने दुःखं ४८. २६
५१. अर्थो हि कन्या परि. २९५

५२. अन्हीको वा विमूढो २८७.१६६
५३. अल्पाक्षरमसंदिग्धं ५०६.२७७
५४. अल्पानामपि वस्तूनां ५१८.२८३
५५. अव्यापारेषु व्यापारं ३१. १७
५६. अश्वत्थामा यथा ३७०.२१०
५७. अश्वप्लुतं
वासवगर्जितं २११.११९
५८. अश्वं नैव गजं नैव २१०.११९
५९. अश्विनी सूयते परि. ३०३
६०. अस्माकं बदरीचक्रं ३१७.१८३
६१. अस्मान्साधु विचिन्त्य परि. २९५
६२. अस्मिन्महामोहमये ३३३.१९१
६३. अस्त्युत्तरस्यां दिशि ५२८.२८७
६४. असतां प्रतिषेधश्च ४८४.२६५
६५. असङगसङगदोषेण १०४. ६०
६६. असंशयं क्षत्र-
परिग्रहक्षमा ४७८.२६२
६७. अहस्तानि सहस्तानां १५९. ९२
६८. अहिंसा परमो धर्मः ३३. १८
६९. अहिंसा सत्यं ३४. १८
७०. अहो खलभुजङगस्य ४३२.२३८
७१. आ नो भद्रा ३६. १९
७२. आकाशात् पतितं
तोयं ४८७.२६८
७३. आगमानां हि सर्वेषां ३७. २०
७४. आचारप्रभवो धर्मो : ३७. २०
७५. आत्मनो मुखदोषेण ३६७.२०८
७६. आत्मवत् सर्वभूतानि ४५. २५
७७. आत्मा वा अरे ४०. २२
७८. आत्मानं रथिनं ४२. २३
७९. आत्मानं सततं ४३. २४
८०. आततायिनमायान्तं ३८. २१
८१. आदित्यचन्द्रा-
वनिलानलौ २२०.१२४
८२. आदित्याद्या ग्रहाः
सर्वे १५६. ९०
८३. आद्वीपात्
परतोऽप्यमी २७८.१५९
८४. आदौ न वा ३३४.१९२
८५. आपदर्थे धनं ४३. २४
८६. आपत्काले तु ४६. २५
८७. आपरितोषात् विदुषां ४७. २६
८८. आपो ह यद् बृहती परि. २९४
८९. आ ब्रह्मन् २१५.१२२
९०. आर्ता देवान् ४४१.२४२
९१. आशा नाम ५०. २७
९२. आशा हि परमं ५१. २८
९३. आस्ते भग
आसीनस्य १४७. ८५
९४. आहारनिद्राभय ५२. २८
९५. इतरकर्मफलानि २६. १३
९६. इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः ५३. २९
९७. इतिहासपुराणाभ्यां ३५८.२०४
९८. इदाह्वः पीतिमुत वो २२७.१२९
९९. इन्द्रं मित्रं वरुण ७०. ३९
१००. इन्द्रं वर्धन्तो १११. ६४
१०१. इन्द्रस्य भवने ५५. ३०
१०२. इष्टान् भोगान् हि ३९५.२२२
१०३. ईशावास्यमिदं ५८. ३२
१०४. ईश्वरः सर्वभूतानां ३७२.२११
१०५. उत्तमं प्रणिपातेन ५६. ३१
१०६. उत्तिष्ठत जाग्रत ६०. ३४
१०७. उत्पत्तिपरिपूतायाः २६६.१५३
१०८. उत्सवे व्यसने
प्राप्ते ४०२.२२५
१०९. उत्सवे व्यसने युद्धे ४०२.२२५
११०. उत्साहो बलवानार्य ६१. ३४
१११. उदारस्य तृणं वित्तं २८०.१६१

११२. उद्धरेदात्मनात्मानं ६३. ३५
११३. उद्यमेन हि सिध्यन्ति ६५. ३६
११४. उद्योगिनं पुरुषसिंह ६४. ३६
११५. उपकारोऽपि नीचानां २९४.१६९
११६. उपदेशो हि मूर्खाणां २९४.१६९
११७. उपाध्यायान्दशाचार्य ३५१.२००
११८. उपमा कालिदासस्य ६६. ३७
११९. उष्ट्राणां च विवाहेषु ३५. १९
१२०. ऊर्ध्वबाहुर्विरौम्येष ६७. ३७
१२१. ऋणदाता च दैवज्ञः परि. ३००
१२२. ऋणानि त्रीण्यपाकृत्य ६९. ३९
१२३. एकस्य कर्म संवीक्ष्य १२९. ७५
१२४. एकस्य दुःखस्य न १५१. ८७
१२५. एका केवलमर्थ-साधनविधौ ३२४.१८७
१२६. एकातपत्रं जगतः २७. १४
१२७. एकादशचमूभर्ता २२८.१३०
१२८. एको देवः केशवो ७१. ४०
१२९. एको देवः सर्वभूतेषु ७२. ४०
१३०. एको हि दोषो २०१.११४
१३१. एतद्देशप्रसूतस्य ७४. ४१
१३२. एतावानेव पुरुषो २८७.१६६
१३३. एते चांशकलाः पुंसः ११३. ६६
१३४. एते सत्पुरुषाः १८७.१०७
१३५. एवमुक्तस्तु रामेण २८२.१६२
१३६. ऐश्वर्यस्य विभूषणं ४६३.२५५
१३७. कनकभूषण-संग्रहणोचितो ३२८.१८९
१३८. कर्तुमकर्तुं शक्तः ८१. ४५
१३९. कर्मण्येवाधिकारस्ते ८३. ४६
१४०. कर्मणो ह्यपि बोद्धव्यं १३४. ७७
१४१. कर्मायत्तं फलं पुंसां ३२१.१८६
१४२. कर्मेंद्रियाणि संयम्य ३५९.२०५
१४३. करारविन्देन पदारविन्दं ४२२.२३३
१४४. क्व सूर्यप्रभवो वंशः ९१. ५०
१४५. क्वचिद्दन्तालको मूर्खः १२५. ७३
१४६. क्वचित्पृथ्वीशय्यः ३४०.१९५
१४७. क्वचिद् विद्वद्गोष्ठी ९०. ४९
१४८. कल्याणी बत गाथेयं ८५. ४७
१४९. कस्त्वं कोऽहं ११९. ७०
१५०. काकः कृष्णः पिकः ९२. ५१
१५१. काकतालीयवत् ९३. ५१
१५२. कारणेन विना कार्यं ९६. ५४
१५३. कार्पण्यदोषोपहत ४६१.२५३
१५४. कालो वा कारणं ४०३.२२६
१५५. कालः पचति भूतानि १००. ५७
१५६. काव्यशास्त्रविनोदेन ९९. ५६
१५७. काव्येषु नाटकं १०२. ५९
१५८. काश्यां तु मरणान्मुक्तिः १०३. ६०
१५९. किं कूर्मस्य भरव्यथा २७७.१५८
१६०. किं चित्रं यदि १०५. ६१
१६१. किं चित्रं भुवनानि परि. २९६
१६२. किं वाससा तत्र ४३०.२३७
१६३. किं शेषस्य भरव्यथा २७७.१५९
१६४. किमत्र चित्रं परि. २९६
१६५. किमप्यस्ति स्वभावेन ३८६.२१८

१६६. कुतः कृतघ्नस्य
यशः १०९. ६४
१६७. कुलेन कान्त्या ४०१. २२४
१६८. कृपणेन समो दाता २४१. १३८
१६९. केयूराणि न
भूषयन्ति ४२७. २३६
१७०. क्लैब्यं मा स्म
गमः ११७. ६९
१७१. क्रोधात् भवति
संमोहः ३२२. १८६
१७२. कौशिकेन स किल १८९. १०८
१७३. क्षणशः कणशश्चैव १२१. ७१
१७४. क्षणे तुष्टः क्षणे
रुष्टः ३०. १६
१७५. क्षते प्रहारा १५१. ८७
१७६. क्षत्रियाणां बलं
ज्येष्ठं ४६८. २५६
१७७. क्षपयिष्यति नः
सर्वान् ३७०. २१०
१७८. क्षिप्रं भवति
धर्मात्मा २४७. १४१
१७९. गच्छन् पिपीलिका २९२. १६८
१८०. गतानुगतिको
लोकः १२९. ७५
१८१. गतिरेका पतिर्नार्या १३०. ७६
१८२. गते शोको न १३२. ७६
१८३. गतोदके
सेतुबन्धो न १३१. ७६
१८४. गर्जन्ति न वृथा १३३. ७७
१८५. गंगे च यमुने चैव १५३. ८८
१८६. गीता सुगीता
कर्तव्या १३५. ७९
१८७. गुणाः सर्वत्र पूज्यन्ते १३७. ८०
गुणाः सर्वत्र पूज्यन्ते परि. २९७
१८८. गुणी गुणं वेत्ति १३९. ८०
१८९. गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः १७९. १०३
१९०. गुरुं वा बालवृद्धौ ३८. २१
१९१. गुरोरप्यवलिप्तस्य ९७. ५५
१९२. गोघ्ने चैव
सुरापे च १०९. ६३
१९३. गोब्राह्मणहितार्थाय
४१८. २३१
१९४. घटो जन्मस्थानं परि. २९७
१९५. चक्रवत् परिवर्तन्ते ४९२. २७१
१९६. चतुरः सखि मे
भर्ता ५२३. २८५
१९७. चरत भिक्खवे ३१४. १८२
१९८. चरन्वै मधु परि. २९८
१९९. चातुर्वर्ण्यं मया
सृष्टं १४८. ८५
२००. चित्रं देवानामुदगा ५०९. २७८
२०१. चिता चिंतासमा ४७७. २६२
२०२. चिता दहति ४७७. २६२
२०३. छिन्नोऽपि रोहति
तरुः १५०. ८६
२०४. जगन्मातर्मातस्तव ८९. ४९
२०५. जन्मना ब्राह्मणो
ज्ञेयः ५१६. २८२
२०६. जलबिन्दुनिपातेन ८८. ४८
२०७. जले विष्णुः स्थले
विष्णुः ४९२. २७१
२०८. जातस्य हि ध्रुवो १५४. ८९
२०९. जानामि धर्मं १५५. ८९
२१०. जाया त्वर्धं
शरीरस्य १५७. ९१
२११. जीवत्सु तातपादेषु १९२. १०९
२१२. जीवन्ति च
म्रियन्ते च २४१. १३८
२१३. ज्येष्ठो भ्राता
पितृसमो १६०. ९२

२१४. ज्ञानविज्ञान-
तृप्तात्मा ४८५.२६६
२१५. तच्चक्षुर्देवहितं
शुक्रमुच्चरत् ३००.१७३
२१६. तच्चक्षुर्देवहितं
पुरस्तात् ३००.१७३
२१७. तद् ब्रूहि वचनं
देवि ४०८.२२८
२१८. तदेव लग्नं
सुदिनं १६८. ९७
२१९. तद्विद्धि प्रणिपातेन १७०. ९८
२२०. तत्सवितुर्वरेण्यं २२६.१२९
२२१. तत्रोपजग्मुर्भुवनं
पुनाना ५२४.२८६
२२२. तपसा प्राप्यते स्वर्गः परि. २९९
२२३. तर्कोऽप्रतिष्ठः
श्रुतयो २२१.१२५
२२४. तस्मात गुरुं प्रपद्येत ४५६.२५१
२२५. तस्मात्वमुत्तिष्ठ
यशो लभस्व २७६.१५८
२२६. तस्मात् सर्वेषु
कालेषु ३५७.२०४
२२७. तस्मात् शास्त्रं
प्रमाणं १७८.१०२
२२८. तस्य संवृतमन्त्रस्य ३१३.१८१
२२९. त्यक्त्वा सुदुस्त्यज ४२३.२३४
२३०. त्यजेदेकं कुलस्यार्थे ४४. २४
२३१. त्यजेत् क्षुधार्ता ३२५.१८८
२३२. त्वमेव माता च
पिता १८१.१०५
२३३. त्रयी सांख्यं योगः १८०.१०४
२३४. त्रिभिर्वर्षैस्त्रिभिमासै ५७. ३१
२३५. तीर्थे तीर्थे ४२९.२३७
२३६. तुल्यनिंदा-
स्तुतिर्भूत्वा ४८५.२६६
२३७. तृणं ब्रह्मविदः २८०.१६१
२३८. दण्ड एव परो लोके १९५.११०
२३९. ददाति
प्रतिगृह्णाति ४७५.२६१
२४०. दद्यान्न
प्रतिगृह्णीयात् ४०६.२२७
२४१. दह्यमानेन मानसः ३०१.१७४
२४२. दाने तपसि ३१५.१८२
२४३. दारिद्र्यात्
मरणात् २०२.११५
२४४. दारिद्र्यान्मरणा-
द्वापि २०२.११५
२४५. द्वा सुपर्णा सयुजा २०३.११५
२४६. दिल्लीश्वरो वा
जगदीश्वरो २०४.११६
२४७. दिवं यदि प्रार्थयसे २४९.१४३
२४८. दिष्टमेतत् पुरा चैव ३७०.२१०
२४९. द्विधा भजेयमप्ये-
वम् ५२१.२८४
२५०. दीक्षा दानं ८४. ४६
२५१. दुर्जनं प्रथमं वन्दे २०७.११७
२५२. दुर्जनः प्रियवादी च ३३७.१९३
२५३. दुर्बलस्य बलं
राजा ३१९.१८४
२५४. दुरन्वयं दुष्प्रधर्षं परि. २९९
२५५. दूरस्थाः पर्वता रम्या २०८.११८
२५६. दृष्टा देवीति २१६.१२२
२५७. दृष्ट्वा यतिर्यतिं ३९१.२२०
२५८. दृष्टिपूतं
न्यसेत्पादं ३३९.१९४
२५९. देवताराधनैः शास्त्रैः ९९. ५७
२६०. देवपितृकार्याभ्याम् ३५५.२०२
२६१. देहादि-भावम् परि. २९७
२६२. दैवं पुरुषकारेण २१३.१२१

२६३. धनानि भूमौ २१७.१२३
२६४. धनिकः श्रोत्रियो परि. ३००
२६५. धनिनोऽपि निरुन्मादाः १९१.१०८
२६६. धनुः पौष्पं मौर्वी परि. २९७
२६७. धर्म एव हतो २२३.१२७
२६८. धर्मादर्थः प्रभवति २१९.१२४
२६९. धर्मार्थकाम- मोक्षाणां १७६.१०१
२७०. धर्मे चाऽर्थे च कामे ३८४.२१७
२७१. धर्मो हि परमो २२२.१२६
२७२. धारणात् धर्ममित्याहुः २२४.१२८
२७३. धारयन्त आदित्यासो २०९.११८
२७४. धिगस्तु खलु मानुष्यम् २२५.१२८
२७५. ध्येयं सदा परिभवघ्न ४२३.२३३
२७६. न कालः कालमत्येति २२८.१३०
२७७. न कालः खड्गमुद्यम्य २२९.१३१
२७८. न गृहं गृहमित्याहुः १४०.८१
२७९. न चैकं तदन्यद्द्वितीय परि. ३०४
२८०. न चोर्ध्वं न चाधो परि. ३०४
२८१. न जाग्रन्न मे स्वप्नको परि. ३०४
२८२. न जातु कामः २३०.१३२
२८३. न जानपदिकं दुःखमेकः २३१.१३३
२८४. न तद् भासयते सूर्यो ३७७.२१४
२८५. न तेन वृद्धो १९४.११०
२८६. न त्वहं कामये राज्यं ९५.५३
२८७. न देवा दण्डमादाय २३४.१३५
२८८. न देवाय न धर्माय २३५.१३६
२८९. न देवो विद्यते ३३०.१९०
२९०. न परः पापमादत्ते ४८३.२६५
२९१. न पापानां वधे पापं २३७.१३७
२९२. न पिता नात्मजो २९०.१६७
२९३. न भीतो मरणादस्मि २४०.१३८
२९४. न भूतपूर्वो न च केन दृष्टो ४३६.२४०
२९५. न भूमिर्न तोयं ४५८.२५२
२९६. न माता पिता वा परि. ३०४
२९७. न मे स्तेनो जनपदे २४८.१४२
२९८. न वर्णो न वर्णा- श्रमाचार परि. ३०४
२९९. न विश्वसेद- विश्वस्ते ३६४.२०७
३००. न शास्ता न शास्त्रं परि. ३०४
३०१. न शुक्लं न कृष्णं परि. ३०४
३०२. न शोभार्थाविमौ बाहू २५३.१४४
३०३. न सा सभा २५४.१४५
३०४. न संध्या संधत्ते २६१.१४९
३०५. न सांख्यं न शैवं परि. ३०४
३०६. न हि ज्ञानेन २५८.१४८
३०७. न हि तद्भविता राष्ट्रं १६९. ९८
३०८. न हि ते स्त्रीवधकृते २६०.१४९
३०९. नन्वात्मानं बहु २८१.१६२
३१०. नभः स्पृशं २३९.१३७
३११. नमोऽस्तु ते व्यास ३०२.१७५

३१२. नरपतिहितकर्ता २८४.१६३
३१३. नष्टो मोहः ८०. ४४
३१४. नागेन्द्रहाराय
त्रिलोचनाय २४२.१३९
३१५. नाघ्नतः
कीर्तिरस्तीह ५४. ३०
३१६. नादत्ते कस्यचित्
पापं २६४.१५१
३१७. नान्‍ऋषिः कुरुते
काव्यं २६५.१५२
३१८. नान्नोदकसमं दानं २४४.१४०
३१९. नापृष्टः कस्यचित् २६७.१५३
३२०. नाभिषेको न
संस्कारः ५२२.२८५
३२१. नायमात्मा
प्रवचनेन २६८.१५४
३२२. नाराजके जनपदे २६९.१५५
(२३ श्लोक) "—" परि. ३०१
३२३. नाराजकेषु
राष्ट्रेषु २६९.१५५
३२४. नासदासीन्नो
सदासीत् २७२.१५७
३२५. नासतो विद्यते
भावो २७१.१५६
३२६. निन्दन्तु नीति-
निपुणाः २७५.१५७
३२७. निर्विषेणापि सर्पेण १२४. ७२
३२८. नृदेहमाद्यं सुलभं २८३.१६३
३२९. नेहाभिक्रमना-
शोऽस्ति ५२५.२८६
३३०. नैनं छिन्दन्ति
शस्त्राणि २८६.१६५
३३१. नोदकक्लिन्न-
गात्रस्तु ४७६.२६१
३३२. पक्षिणां
बलमाकाशो ३१९.१८४
३३३. पञ्चाक्षरं पावन-
मुच्चरन्तः परि. २९७
३३४. पञ्चमेऽहनि षष्ठे वा २२. ११
३३५. पठकाः पाठका-
श्चैव ३६८.२०९
३३६. पणबन्धमुखान्
गुणानजः ४८५.२६६
३३७. पत्रं पुष्पं फलं तोयं २९१.१६८
३३८. परित्राणाय
साधूनां [illegible]
३३९. परेः परिभवे प्राप्ते ४२५.२[illegible]
३४०. परोपदेशे
पाण्डित्यं २९९.१७२
३४१. परोपदेशवेलायां २९९.१७२
३४२. परोपदेशसमये २९९.१७३
३४३. पश्येम शरदः शतम् ३००.१७४
३४४. प्रतिपच्चंद्ररेखेव ३०३.१७६
३४५. प्रथमे नार्जिता
विद्या १४५. ८४
३४६. पार्थ नैवेह नामुत्र २५६.१४६
३४७. प्रारभ्यते न खलु ३०७.१७७
३४८. पिण्डे पिण्डे ३०८.१७८
३४९. पिता रक्षति
कौमारे २५५.१४५
३५०. पिता रत्नाकरो
यस्य २६३.१५०
३५१. पिता हि भवति १६०. ९२
३५२. पिबन्ति नद्यः
स्वयमेव २९८.१७२
३५३. प्रियवाक्यप्रदानेन ४१९.२३१
३५४. पुन्नाम्नो नरकाद्य १७७.१०२
३५५. पुरा कवीनां १८. ९

३५६. पुराणमित्येव न साधु ३११.१८०
३५७. पुष्पं पुष्पं विचिन्वीत ३६३.२०६
३५८. पुस्तकेषु च या विद्या २९६.१७०
३५९. पुस्तकस्था तु या विद्या २९६.१७०
३६०. पृथिव्यां त्रीणि रत्नानि ३१२.१८०
३६१. पृथिव्यां पुत्रास्ते परि. २९५
३६२. बहूनां जन्मनामन्ते ३१६.१८३
३६३. बुद्धिर्यस्य बलं तस्य ३२३.१८७
३६४. बुद्धियुक्तो जहातीह ३९७.२२३
३६५. बुद्ध्या भवति संयुक्तो २२८.१३०
३६६. बुभुक्षित: किं न करोति ३२५.१८८
३६७. बोद्धारो मत्सरग्रस्ता: १५८.९१
३६८. ब्रह्मण्याधाय कर्माणि २९३.१६८
३६९. ब्रह्मस्थाने कृतं पापं ४२०.२३२
३७०. भरतस्याथ पक्ष्यो वा ३६५.२०७
३७१. भवन्ति नम्रास्तरव: ३२७.१८९
३७२. भ्रमन्वनान्ते ५९. ३३
३७३. भार्गवेण हता माता २३३.१३४
३७४. भारत: पञ्चमो वेद: १५६. ९०
३७५. भावस्निग्धैरुपकृतमपि ५१०.२७९
३७६. भाषासु मुख्या मधुरा २०५.११६
३७७. भिद्यते हृदयग्रन्थि ३३१.१९०
३७८. भूपस्य चित्तं २११.११९
३७९. भेदाभेदौ सपदि गलितौ २७९.१६०
३८०. भो भो लव महाबाहो १८८.१०७
३८१. भोगा न भुक्ता ३३५.१९२
३८२. भोजनान्ते च किं पेयं १६३. ९४
३८३. मत्त: परतरं नान्य ५०७.२७७
३८४. मन एव मनुष्याणां ३३८.१९३
३८५. मन:प्रसाद: सौम्यत्वं १७२. ९९
३८६. मनस्यन्यद्वचस्यन्यत् ३४१.१९५
३८७. मनसैव कृतं पापं ३४२.१९६
३८८. मनसैवानुद्रष्टव्यं २८५.१६४
३८९. मनसैवेदमवाप्तव्यं २८५.१६४
३९०. मनुष्याणां सहस्रेषु ३६९.२०९
३९१. मर्कटस्य सुरापानं ३७९.२१५
३९२. मरणान्तानि वैराणि ३४५.१९७
३९३. महदपि परदु:खं २९५.१७०
३९४. मा निषाद प्रतिष्ठा ३४९.१९९
३९५. मा नो हिंसीज्जनिता परि. २९५
३९६. माता निन्दति १९८.११२
३९७. माता रुद्राणां दुहिता ३५३.२०१
३९८. मात्रा समं नास्ति शरीरपोषणं १४९. ८६
३९९. मात्रा स्वस्रा दुहित्रा ४३५.२४०
४००. मातेव रक्षति ३५४.२०२

४०१. मातृवत्परदाराणि ३५६.२०३
४०२. मातृवत्परदारेषु ३५६.२०३
४०३. मां हि पार्थ
व्यपाश्रित्य १८६.१०६
४०४. मुहूर्तं ज्वलितं श्रेयो ३६१.२०६
४०५. मूलं तरोः केवल परि. २९७
४०६. मृगा मृगैः
सङ्गमनुव्रजन्ति ४८६.२६७
४०७. मृत्युर्जन्मवतां वीर ३६६.२०८
४०८. मोघमन्नं विन्दते ११४.६७
४०९. मौनान्मूकः
प्रवचनपटु ५१०.२७९
४१०. मंत्रे तीर्थे द्विजे ३९०.२२०
४११. य आत्मदा परि. २९४
४१२. यः प्राणतो परि. २९४
४१३. यः स्वभावो हि ५२१.२८४
४१४. यश्चिदापो परि. २९५
४१५. यज्जाग्रतो
दूरमुदैति १७१. ९९
४१६. यज्जीव्यते क्षणमपि ९४.५२
४१७. यत्प्रज्ञानमुत चेतो परि. २९९
४१८. यत्ते मध्यं
पृथिवी ३५२.२०१
४१९. यत्र नार्यस्तु
पूज्यन्ते ३७४.२१२
४२०. यत्र योगेश्वरः
कृष्णो १६५. ९५
४२१. यत्र विद्वज्जनो
नास्ति ७५. ४१
४२२. यत्र विद्यागमो नास्ति परि. ३००
४२३. यथा काष्ठं च
काष्ठं च ३७५.२१२
४२४. यथा चतुर्भिः कनकं १६७. ९७
४२५. यथा देशस्तथा भाषा परि. ३०३
४२६. यथा प्रह्लादना-
च्चंद्रः ४०४.२२६
४२७. यथैधांसि समिद्धोग्नि १६१.९३
४२८. यद्दुरापं दुराराध्यं १७३.१००
४२९. यदभावि न
तद्भावि ३७८.२१४
४३०. यद्यदाचरति श्रेष्ठ ३८१.२१६
४३१. यद्यद्विभूतिमत्सत्त्वं ३८२.२१६
४३२. यदा यदा हि धर्मस्य ३८३.२१६
४३३. यदि सन्ति गुणाः २५७.१४७
४३४. यदिहास्ति
तदन्यत्र ३८४.२१७
४३५. यस्मिन्देशे न
सम्मानो २३२.१३४
४३६. यस्मिन्नृचः साम परि. २९९
४३७. यस्य कस्य तरोर्मूलं ३७९.२१५
४३८. यस्य नास्ति निजा १९७.११२
४३९. यस्य नास्ति
विवेकस्तु १९७.११२
४४०. यस्य वृत्तं न
जल्पन्ति २८७.१६६
४४१. यस्य राष्ट्रे प्रजाः ३८७.२१८
४४२. यस्याश्चोरश्चिकुर-
निकरः ८६. ४७
४४३. यस्यास्ति वित्तं ४९५.२७३
४४४. यस्यास्ति सर्वत्र
गतिः १२२. ७२
४४५. यस्यार्थास्तस्य
मित्राणि ३८८.२१९
४४६. यस्तु संचरते १९३.१०९
४४७. यस्येमे हिमवन्तो परि. २९४
४४८. या निशा
सर्वभूतानां ३८९.२१९
४४९. यावज्जीवेत् सुखं
जीवेत् ६८. ३८

४५०. ये नाम केचिदिह १०१. ५८
४५१. ये यथा माम् ३९४. २२१
४५२. येन कर्माण्यपसो परि. २९९
४५३. येन द्यौरुग्रा ८७. ४८
४५४. येनेदं भूतं भुवनं परि. २९९
४५५. यो नात्मना न च ९४. ५२
४५६. यो वै भूमा तत्सुखं ३९६. २२२
४५७. यौवनं धनसंपत्तिः १०७. ६२
४५८. यं क्रन्दसि परि. २९४
४५९. रत्नाकरः किं
कुरुते २९८. १७२
४६०. रथस्यैकं चक्रं परि. २९७
४६१. राजपत्नी गुरोः
पत्नी २८८. १६६
४६२. राजा
कुलवधूर्विप्राः ५२६. २८७
४६३. राजा राक्षसरूपेण परि. ३०३
४६४. राजा राष्ट्रकृतं पापं ४६२. २५४
४६५. राजानं धर्मगोप्तारं २२३. १२७
४६६. राज्ञि धर्मिणि ३७६. २१३
राज्ञि धर्मिणि परि. ३०३
४६७. रामं दशरथं विद्धि १२६. ७४
४६८. रामरावणयोर्युद्धं ४०५. २२७
४६९. लक्ष्मीश्चन्द्रादपेयाद्वा ६. ३
४७०. लभेत सिकतासु
तैलमपि २४५. १४०
४७१. लालने बहवो
दोषास्ताडने १८२. १०५
४७२. लालयेत्
पञ्चवर्षाणि ३०९. १७८
४७३. लेखनी सर्ववर्णेषु १४. ७
४७४. लोकयात्रा नयो लज्जा परि. ३००
४७५. लोभमूलानि
पापानि ४१५. २३०
४७६. लौकिकानां हि
साधूनामर्थं ४२८. २३६
४७७. वज्रादपि
कठोराणि ४१४. २२९
४७८. वत्सोत्सुकापि
स्तिमिता ३०५. १७६
४७९. वनजौ वनजौ खर्वौ ११३. ६६
४८०. वन्दे मातरम् ४२४. २३४
४८१. वयमिह परितुष्टा ११८. ६९
४८२. वरं वरयते कन्या ३६०. २०५
४८३. वसुदेवसुतं देवं ११२. ६५
४८४. वह्नौ विशुद्धामपि
जानकीं ५९. ३३
४८५. व्यतिषजति
पदार्थानान्तरः ३९. २५
४८६. व्यवस्थितः
प्रशान्तात्मा ३०. १६
४८७. व्याधेस्तत्त्वपरि-
ज्ञानं २५१. १४३
४८८. विक्लवो वीर्यहीनो २३६. १३६
४८९. विजेतव्या लङ्का १०८. ६२
४९०. वितरति गुरुः प्राज्ञे ४३३. २३९
४९१. विद्यां चाविद्यां २८. १५
४९२. विद्याविनयसंपन्ने २८९. १६७
४९३. विद्यानां सदनं
काशी १०३. ५९
४९४. विद्वत्त्वं च
नृपत्वं च ४३४. २३९
४९५. विद्वानेव
विजानाति २५९. १४८
४९६. विना वाजिन-
हस्तिभ्यो ११५. ६८
४९७. विधेरज्ञानेन परि. २९५
४९८. विपक्षः श्रीकण्ठो परि. २९७

४९९. विपदः सन्तु नः शश्वत्तत्र ४३८.२४१
५००. विपत्तौ किं विषादेन १३४. ७८
५०१. विषादप्यमृतं ग्राह्यं ३१८.१८४
५०२. वृकोदरबलो नान्यो २४१.१३८
५०३. वेदनार्ताः प्रजा दृष्ट्वा ४८५.२६६
५०४. वेदान्तवाक्येषु सदा रमन्तो १२०.७०
५.०५ वेदोऽखिलो धर्ममूलं ४४२.२४२
५०६. वैद्यराज नमस्तुभ्यं यमराज ४४३.२४३
५०७. वैद्यराज नमस्तुभ्यं क्षपिता ४४३.२४३
५०८. शठेषु शठवत् कुर्यात् ४४६.२४४
५०९. शतेषु जायते शूरः १९९.११३
५१०. शत्रूमुन्मूलयेत्प्राज्ञ ७८. ४३
५११. शत्रोरपि गुणा ग्राह्या ४४९.२४६
५१२. शनैः पन्थाः शनैः कन्था ४४८.२४५
५१३. शरदि न वर्षति ४५०.२४६
५१४. शरीरे जर्जरीभूते ७७.४३
५१५. शय्या वस्त्रं चंदनं ४९३.२७२
५१६. शिवाय विष्णुरूपाय ४५९.२५२
५१७. शिशुर्वा शिष्या वा १३६.७९
५१८. शुश्रूषस्व गुरून् परि. २९५
५१९. शूरश्च कृतविद्यश्च १२७.७४
५२०. शैले शैले न माणिक्यं १४६. ८४
५२१. शैशवेऽभ्यस्त-विद्यानां ३९८.२२३
५२२. श्वः कार्यमद्य कुर्वीत ४७०.२५७
५२३. श्रुतं हरति पापानि ४७२.२५८
५२४. श्रूयतां धर्मसर्वस्वं ४१. २३
५२५. श्रेयो हि ज्ञानमभ्यासा १८४.१०६
५२६. श्रोत्रं श्रुतेनैव न च कुण्डलेन २००.११३
५२७. षट्कर्णश्छिद्यते मंत्रः ४७४.२६०
५२८. षट्कर्णो भिद्यते मंत्रश्चतुष्कर्णः ४७४.२६०
५२९. षट्कर्णो भिद्यते मंत्रस्तथा ४७४.२६०
५३०. स त्वं भ्रान्तोऽसि १६०. ९३
५३१. स त्वां रामहिते ७६. ४२
५३२. स राघवेन्द्रो ४८६.२६८
५३३. स हि गगनविहारी ४१२.२२९
५३४. सकलभुवनतल-वन्दित ७९. ४४
५३५. सर्गश्च प्रतिसर्गश्च ३१०.१७९
५३६. सर्गश्चाथ विसर्गश्च ३१०.१७९
५३७. सत्कुलेयोजयेत् कन्यां ५६. ३१
५३८. सत्त्वानुरूपा सर्वस्य ४७१.२५८
५३९. सत्सङ्गात् भवति ४८२.२६४
५४०. सत्यं धर्मस्तपो ४८१.२६४
५४१. सत्यं ब्रूयात्प्रियं ब्रूयान्न ७६. ४२
५४२. सत्यं सत्यं मुनेर्वाक्यं २६३.१५०
५४३. सत्यमेकपदं ब्रह्म परि. २०४
५४४. सत्यमेव जयति नानृतं ४८०.२६३

५४५. सत्यमेवानृशंसं च परि. ३०४
५४६. सत्यमेवेश्वरो लोके परि. ३०४
५४७. सत्यानुसारिणी लक्ष्मीः ३२१. १८५
५४८. सदा वक्रः १५६. ९०
५४९. सन्तः स्वतः प्रकाशन्ते २५७. १४७
५५०. समः शत्रौ च मित्रे च ४८५. २६७
५५१. सरसिजमनुविद्धं १०६. ६१
५५२. सर्वधर्मान् परित्यज्य ४८८. २६८
५५३. सर्वनाशे समुत्पन्ने १५. ७
५५४. सर्वलक्षणहीनोऽपि ४४७. २४५
५५५. सर्वं परवशं दुःखं ४९१. २७०
५५६. सर्वागमानामाचारः ३७. २०
५५७. सर्वेऽत्र सुखिनः सन्तु ४९४. २७२
५५८. सर्वो दण्डजितो लोको १९६. १११
५५९. सर्वोपनिषदो गावो ४९६. २७३
५६०. सहसा विदधीत न २९. १५
५६१. सहस्रशीर्षा पुरुषः ४९८. २७४
५६२. स्वधर्ममर्थं कामं ४०९. २२८
५६३. स्वधर्मरूपो राजेन्द्रो परि. ३०३
५६४. स्वयं महेशः श्वशुरो ५९. ३३
५६५. सा रम्या नगरी ९८. ५५
५६६. सानन्दं सदनं २१८. १२३
५६७. स्वानंद-भावे परि. २९७
५६८. स्थितिं नो रे दध्याः ५३०. २८९
५६९. सुखदुःखे समे कृत्वा १६४. ९५
५७०. सुखं वा यदि वा दुःखं ३०६. १७७
५७१. सुखं हि दुःखान्यनुभूय ५०३. २७५
५७२. सुखस्य दुःखस्य न कोऽपि ५०२. २७५
५७३. सुखार्थिनः कुतो विद्या ५०४. २७६
५७४. सुलभाः पुरुषा राजन् २४. १२
५७५. सुवर्णपुष्पितां पृथ्वीं ४६७. २५६
५७६. सुषारथिरश्वानिव परि. २९९
५७७. सूतो वा सूतपुत्रो वा २१४. १२१
५७८. सैषा गायत्र्येतस्मि परि. २९८
५७९. स्नेहं दयां च सौख्यं च ४९. २७
५८०. स्वे स्वे कर्मण्यभिरतः ५३२. २९०
५८१. सं गच्छध्वं ५११. २८०
५८२. संकीर्त्यमानो भगवाननन्तः ४७३. २५९
५८३. संक्षेपात्कथ्यते धर्मो २९७. १७१
५८४. संसारकटुवृक्षस्य ५१४. २८२
५८५. संसारविषवृक्षस्य ५१४. २८२
५८६. हतो वा प्राप्स्यसि ५३४. २९१
५८७. हरेर्नामैव नामैव ५३३. २९०
५८८. हस्तादपि न दातव्यं ४१९. २३१
५८९. हिरण्मयेन पात्रेण ५३५. २९१
५९०. हिरण्यगर्भः समवर्तताग्रे परि. २९४

परिशिष्टांतील राहून गेलेल्या काही श्लोकांची पादसूची पुढीलप्रमाणे वाचावी :

४७ अ. अराजके धनं नास्ति परि. ३०१
९४ अ. इक्ष्वाकूणामिहाद्यैव परि. ३०१
१४३ अ. कलिः शयानो परि. २९८
२७५ अ. ध्वजो रथस्य प्रज्ञानं परि. ३०१
३१६ अ. नानाश्रान्तस्य श्रीरस्ति परि. २९८
३५४ अ. पुष्पिण्यौ चरतो परि. २९८
४२६ अ. यथा ह्यनुदका परि. ३०२

विषयसूची

(विषय व त्यापुढे उक्तिक्रमांक दिले आहेत.)

अग्निस्तुती ४.
अतिरेक ७; - परिचय ५; - लोभ १४२.
अध्ययन आरंभ १०.
अनर्थपरंपरा १५१.
अन्तःप्रेरणा सज्जनांची ४७८.
अन्तकाल ९.
अन्न – ची प्राथमिक गरज ४९३; –दान श्रेष्ठता २३.
अनिष्ट राज्यस्थिती २५.
अन्याय करणाऱ्याच्या रक्षकाला इशारा (राजनीती) ५५.
अपकीर्ती, अपमान ३४४.
अरसिकनिंदा २६.
अराजक २६९, परि. २६९.
अर्जुनाला आदेश–युद्धासाठी ३५७; –ला उपदेश युद्धार्थ २७६; – ला प्रोत्साहन युद्धार्थ ११७, १६४; –ची संदेहनष्टता ८०; –वर गीतोपदेश-परिणाम ८०.
अर्थ – द्रव्य अशा अर्थी ११, १२; –ची अपरिहार्यता ४९३; – वाणीचा ४२८.
अर्धवट स्थिती – दुष्परिणाम ५३.
अध्ययनारंभ १०.
अल्पशिक्षित ३५८.
अवतार ३८३; केव्हा होतो (श्रीकृष्णोक्ती) ५१२.
अविचार २९.
अहिंसा ३३, ३४.
आचारमाहात्म्य ३७.
आज्ञापालन (रामाचे) ४१८.
आततायी दंडार्ह ३८.
आदित्य ; सूर्य २०९; जगाचा आत्मा ५०९.
आदेश – एकमताने कार्यासाठी २११; – बुद्धभिक्षूंना ३१४ , ३२०; – सदाचाराबद्दल (वैदिक) ४७९.
आधिक्यापेक्षा १४.
आत्मा २, ४०, २०३; – चे तत्त्वज्ञान १६६, परि. १६६; अविकारी २८६; – ची अलिप्तता २६४; – चे ज्ञान २६८; – चा महिमा ३४६; – च्या ज्ञानाचा मार्ग ६०;
आत्मकल्याण ४३, ४४, परि. ४३.
आत्मोद्धार ६३.
आपत्ती – साठी प्रार्थना (कुंतीची) ४३८.
आपलपोटा ३९५.
आर्ताबद्दल कणव ९५.
आर्यांची महदाकांक्षा १११.
आवडनिवड ३३२.
आशा ५०, ५१.
इंद्रिये – ची अनावर शक्ती ४३५.
ईश्वर–चे ज्ञान ३६९; –चे अनेकत्व ७०; –चे अनुसंधान ४३८; –ची इच्छा प्रबल ५९; – च्या प्राप्तीचा मार्ग ४८८; –ला शरणागती १८६; – चे सर्वव्यापकत्व ७२, ७३; – चे सामर्थ्य ८१.
उणीव १५१.
उत्साहप्रशंसा २०, २१, ६१.
उदारचरित पुरुष १२८.

उद्यम – ची प्रशंसा ६४, ६५;
– चे सातत्य १४७, परि. १४७.
उपदेश दीक्षान्त ४७९; – व्यावहारिक १५, २७, ३१, ४१, १२४, १३१, १३२, १४४, २०६, २०८, ३०६, ३१८, ३३९, ३६३, ३६४, ४४६, ४४८, ४९९, ५२९.
उपहास ४४१.
ऋग्वेद – आरंभ ३; – समाप्ती २११.
ऋणत्रय ६९.
एकदेवत्व ४८७.
एक न्याय ९३.
एकनिष्ठा ७१.
एक मंत्र : विद्यारंभ २४३.
औदार्य ६२.
कर्म आसक्तीरहित २९३, परि. २९३; – ची गती ३२९; – च्या गतीचे रहस्य १३४; – चे चांगले फळ २५६; – ची जीवनान्ती संगत २१७; पूर्वार्जित – चे फल ५०२; –फलाशाराहित्य ८३.
कवी ३८७.
कलेची कसोटी ४७.
कवी रसिकता १८३; – चा आत्मविश्वास १०१; – ची वैशिष्टचे ८६.
कष्टसाफल्य ११६.
काम २३०.
कार्यकर्ता २८४.
कार्यकारणभाव ९६.
कार्य तडीला नेणे २७७, ३०७; – सिद्धीला कारण पराक्रम १०८, परि. १०८; – सिद्धी ५१०.
काव्य उत्कटता, श्रेष्ठता १०२; कसोटी ३११; –रचनेसाठी क्षमता ऋषीची २६५; –रसिकता १८३.
कणव आर्ताविषयी २५२.
काल अनुल्लंघ्य १००; –ची गती परि. १०२; अनिवार्य २२८; – चा महिमा ९८; ४७०; – चे लक्षण २२९.
कालिदासप्रशंसा १८; – चा विनय ९१, १८५; –ची कृतज्ञता ५०८.
काशीमाहात्म्य, १०३; परि. १०३.
कुलवैशिष्टच १२७.
कुसंगतीचा दुष्परिणाम १०४.
कूपमंडुकवृत्ती १२२.
केशव (एकदेव) ४८७.
कृतघ्नता महापाप १०९.
कृपणनिंदा ११४.
कृष्णमहती – दैवतीकरण ११३.
क्षणभंगुरत्व ४९०.
क्षात्रधर्म ५३४.
गतस्मृती १९२.
गती अन्तिम १८६.
गीतामाहात्म्य १३५, ४९६.
गीतोपदेश परिणाम – अर्जुनाची संदेहनष्टता ८०.
गुणग्राहकता, शत्रूपासूनही घ्यावेत ४४९; –ची जाण १३९; –ची प्रशंसा १३७; –चा विकास २५७, परि. १३७.
गुणवंत पूजनीय १३६; –ला संपत्तीची प्राप्ती १३८.
गुरू – ला नमन १७९; –ही शासनार्ह ९७.
गृहस्थाश्रम आदर्श २१८.
गृहिणी १४०.
गोमाता ३५३.
घर १४०.

चंचलत्व परिणाम ३०.

चिंता १४९, ३७८, ४७७.

चातुर्वर्ण्य १४८.

चार्वाकनीती ६८.

चोर ३९५.

जगन्मिथ्यात्व ११९.

जन्मभूमी गौरव १५२, ४२४, परि. ४२४.

जन्ममृत्यू १५४.

जावई १५६.

जीवन तीन पायऱ्या ३९८; – चा आदर्श १९; –क्रम : दोन प्रकार ९९; –विषयक अभिलाषा १; – तील विसंगती १०५; व्यर्थ १४५; परि. १०५; संघर्ष १५९.

ज्येष्ठ बंधु १६०.

ज्ञान १६१, १६२; - चा उपदेश १७०; –ची महती २५८.

ज्ञानी १३, ३१६.

तत्त्वज्ञान:जीवनातील क्षणिकता ३७५; परमात्म्याचे सर्वव्यापकत्व ४९८; परमधाम-मोक्ष ३७७; महानता ३९६; - सत् – असत् २७१; -श्रेष्ठ भूमिका ४५८.

तत्त्वबोध झालेल्याची स्थिती २७९.

तप-ने सर्वसाध्य १७३, परि. १७३; –चे तीन प्रकार १७२.

तीर्थक्षेत्र – संतसहवासाने पावनत्व ५२४.

तुच्छता – कव्युक्ती ४५४.

तेजस्विता १८८, १८९, ३६१.

थोर पुरुष – च्या वृत्तीचे विशालत्व ४२६; – ची अविचलता २७५.

द्रव्य – ची अपरिहार्यता ४९३; दुःखकारक ४८; –ची महती १९८.

दाता १९९.

दान, परोपकार २००.

दारिद्रय २०१, परि. २०१, २०२.

दिल्लीश्वर – कवीकृत प्रशंसा २०४.

दीर्घोद्योग ४११.

दुःख–आधिक्य १६; दुसऱ्याचे २९५; वाटण्याने हलके होते ५३१; शमन, शांती (भरतोक्ती) ४५२; –सार्वजनिक २३१.

दुर्जन २०७, ३३७, ४३२; –स्वभाव-विशेष ४५०.

दुर्बलत्व २१०.

दृढनिश्चयी पुरुष ३४०.

देवचरित अनाचरणीय २३३.

दैव २१२; व पराक्रम २१३, २३६, ४४०; – कर्णोक्ती २१४; व यत्न ३७३; – ची गती ४१२.

धन–ऐश्वर्यप्राप्ती कोणाला होते ४६७; निरुपयोगी २३५; मिळविणे व विद्यार्जन १२१.

धर्म - अधर्म १५५.

धर्म–चा उपदेश ६७; – चा जय ३७०; –चे अल्पाचरणही तारक ५२५; रक्षिणाऱ्याचे रक्षण करतो २२३; –चे मूळ वेद ४४२; श्रेष्ठांचा मार्ग २२१,–परि. २२१; व सत्य २२२; –आचारहीनता २६१; –ची व्याख्या २२४, ३७१.

धर्म महती ५२, २१९, २२०.

धर्माचरण १४१; – साठी शरीर आवश्यक ४५१; – चा आग्रह ८२.

धर्मविधी विवाहातील – पति-प्रतिज्ञा २६२.
धर्मविहित व्यवहार ५६.
नदी (व वीरपुरुष)–मूळ जाणणे कठीण ४६८.
नदीस्मरण १५३.
नरदेह २८३.
नामसंकीर्तन ४७३.
निश्चयी पुरुषाचे वागणे २७३.
निर्भयता ३५०.
निःस्पृहता २८०.
पत्नी १५७;– चा गौरव १४९.
परमात्मा ४३८.
परवशता–निंदा २२५; –चे दुःख ४९१.
परस्परप्रशंसा ३५.
पराक्रम ३३६; – विषयक एक संकेत १२७; शून्यता, २८७; – हीन निर्वीर पृथ्वी (जनकोक्ती) २७८.
परोपकार ३२७; व पाप २९७; व संत २९८.
परोपदेश २९९.
पवित्रता २६६.
पंडित, शहाणा माणूस ३६८; व धनवान ३८८.
प्रजा–वर अन्याय ३८७;–ची पुण्याई ३०१.
प्रजापतिस्तुती ८७, परि.८७.
प्रतिज्ञा ६०.
प्रतिष्ठेचे जीवन ९४.
प्रत्युपकार ११०.
प्रबोधन १२३ .
प्रयत्न ९३.
प्रलय ४२२.
प्रव्रज्या ३८०.
प्रसादचिन्ह ३०५.
प्रसिद्धीची हाव ३९३.
पापपुण्याची उत्कटता ५७.
पाप–मनाने केलेले ३४२.
पापभीरू ३५६.
पार्वती–तपाचा हेतू २४९.
प्रार्थना यज्ञातील व वैयक्तिक १७४; सार्वजनिक कल्याणासाठी २१५; २७४; (वैदिक, ४९४; शतायुत्वासाठी ३००; सहकार्यासाठी ४९७.
पुत्र १७७; – शी वर्तन ३०९.
पुरुष–ची परीक्षा १६७; – चे भाग्य ५२७.
पुराण–चे लक्षण ३१०;– चे कथन ५०५.
पृथ्वी ३१५.
पूर्वकर्म ५१९.
प्रेम ८.
बळ एकीचे ४२५.
ब्रह्म ३२;– संबंधीची जिज्ञासा १०; –चे ज्ञान–परिणाम ३३१; – शी एकरूप होण्याचा मार्ग ४८९;–तेज व क्षात्रतेज ४५५.
ब्रह्मनिष्ठ पुरुष ४५६.
ब्रह्मात्मैक्य २८५.
बाल ३१९.
बालकृष्ण वटपत्रावरील ४२२.
बांधव ४०२.
बुद्धी–चे सामर्थ्य सर्वश्रेष्ठ ११५;–चा विकास १९३;–चे बल ३२३,३२४; साठीप्रार्थना वदिक २२६; हितकारक २३४; व नशीब ३२१; वर विषयचिंतनाचा परिणाम ३३२; विपरीत ४३६.

बुद्धिमान २६७, ३२६.
बोलणे गोड ४१९.
भक्त नाश पावत नाही २४७; –ला प्राप्त फल ३९४; व भक्ती २९१.
भगवदेकनिष्ठा १८१.
भारतभूमी गौरव ७४, ४२४, परि. ४२४.
भाव ३३०.
भावनाचतुष्टय ४९०.
भूक ३२५.
भोजनसमयीची प्रार्थना (श्राद्धकर्मविधीतील) ३८५.
मन –चा आदेश प्रमाण ३३९; बंधमोक्षाचे कारण ३३८; मनोरथ ३४३; –च्या संतोषाचे रहस्य ११८; –विषयी प्रार्थना १७१, परि. १७१.
मनुष्यजन्म निरर्थक १७६.
मनुष्यस्वभाव २५०, ४०७; चे प्रकार १८७; न पालटणारा ५२१.
मनोव्यापार गूढ ३९.
महात्म्याची एक दृष्टी ७९.
महापुरुषवंदना ४२३.
महाभारत अलौकिकता, सर्वसंग्राहकता ३८४.
मंत्र-प्रोक्षणाचा शुचितेसाठी ४७६; षटकर्णी करू नये ४७४.
माघ कविप्रशस्ती ६६, ३४८.
माणसाचा अधःपात–कारणे,अनर्थकारक चतुष्टय १०७.
माता पाच प्रकार २८८.
मातृगौरव ८९, परि. ८९; २४४, ३५१, ३५२, ३५५; व जन्मभूमीगौरव १५२.
मानवी जीवन : रथप्रतीक ४२.
माया : जगद्व्यापार ३७२.
मिथ्याचार ३५९.
मिष्टान्न ३६०.
मूर्खवर्णन २४५, ३६२; व दुष्ट २९४, ४११.
मृत्यू अटळ ३६६; विषयी व्यावहारिक उपदेश ४७० (भीष्मोक्ती); – केव्हा स्वागतार्ह २४०; –कसा यावा १९.
मृदुपणाचा परिणाम (लक्ष्मणोक्ती) ३६५.
मैत्री ४६, ३३४, ४७६.
मौन ३६७.
यज्ञ ३९५.
याचक ३९१.
योग : कर्मकौशल ३९७.
योगक्षेम ३९९.
योजकता ३२८, ४००.
युद्ध – ची वार्ता रम्य ३९२; रामरावणाचे ४०५.
रत्न तीन प्रकार ३१२.
राजधर्म ४८४.
राजनीती ५४, ७८, ३१३.
राजा विष्णुरूप २७०; प्रजेचा आदर्श ३७६, परि. ३७६; उन्मत्त ३८७; रघुकालाचे कारण ४०३; रघु ४०४.
राज्य आदर्श २४८; – कर्त्याचा आदर्श ४९.
राम १६९; –ची सत्यनिष्ठा ४०६; – चा एकवचनी बाणा ४०८.
रामायणारंभ (वाल्मीकीचा) ३४९.

राष्ट्र १६९.
रुचिवैचित्र्य ४१०.
रूढी ४५७.
लक्ष्मण – आदर्श आचार, शील २८२.
लग्नमुहूर्त १६८.
ललाटरेषा ४१२.
लेखनातील क्लिष्टता ५२३.
लोककल्याण ३१४.
लोकरीती १२९, ४१३.
लोकसमजूत १२५.
लोकोत्तर पुरुष ४२१; – चे अंतःकरण जाणण्यास कठीण ४१४.
लोभ पापाचे मूळ ४१५.
वधूवर ४०१.
वक्ता ४१६; – व श्रोता ४१७.
वज्रलेप – पापनष्टता ४२०.
वस्ती – अयोग्य स्थिती २३२, परि. २३२.
वस्त्राचा प्रभाव ४३०.
व्यक्तिवैशिष्टय ३०८; – चा बरेवाईटपणा ३८६.
वाणी अप्रिय २४, ४२७; – चा अर्थ ४२८.
वार्ता ३३३.
वादविवाद – ची परिणती ४२९; – तील अनिष्ट प्रकार ४६९.
व्यासस्तुती ३०२; ४४४.
विचारऔदार्य ३६.
विचित्रता ३७९.
विद्वान १९४, ४३४; – च्या परिश्रमाची जाण २५९; – सर्वत्र पूजिला जातो ५२०.
विद्या ३५४, ४३३.
विद्या-अविद्या २८, ४४५.
विद्यार्जनासाठी सुखत्याग ५०४.
विनाशकाल ४३६.
विनोद ५२३.
विभूतीमत्व ३८२.
विरक्तमहती १२०, परि. १२०; ४८५.
विराटस्वरूपदर्शन (गीता) २३९.
विश्वारंभ – औपनिषदिक उपपत्ती २७२; भागवतानुसार ४२२.
विष्णुमय जगत् ४९२.
वृद्धावस्थेतील अगतिकता ७७.
वेदाभ्यासासाठी निकष ३५८.
वैद्य २५१, ४४३.
वैभवाची अशाश्वतता ४३९.
वैर ३४५.
शकुंतला-सौंदर्यवर्णन १०६.
शक्ती सुप्त ५३०.
शतायुषी महत्त्व ८५, ४४७.
शत्रुनाश (लक्ष्मणोक्ती) २५३.
शब्दमाहात्म्य १७.
'शाकुंतल'गौरव १०२.
शांतीची प्राप्ती १८४; शांतिमंत्र ४५३.
शास्त्र १७८.
शास्त्राध्ययन – तत्त्व जाणल्याविना निरर्थक १९७.
शिक्षा अपराध्याला (रावणोक्ती) २३७; – ची आवश्यकता १९५, १९६; पुत्राला व शिष्याला १८२.
शिवमहिम्न माहात्म्य ८४, परि. ८४.
शिवमुद्रा (शिवाजी महाराजांची) ३०३.
शिव – ची स्तुती १८०; – नमन २४२; –रूपत्व ४५८, परि. ४५८; –ची विष्णूशी एकरूपता ४५९.
शिष्टाचार ४०९.

शिष्यत्व (अर्जुनोक्ती) ४६१.
शिष्याच्या अपराधासाठी गुरूला दंड ४६२.
शील ४६३; – निदर्शक लक्ष्मणोक्ती २८२.
शुभशकुन ३०५.
शुभ-अशुभाच्या बाबतीत काल ४६६.
शूर पुरुषलक्षण १३३.
श्रद्धा ३९०, ५०१; – मय पुरुष ४७१.
श्रमप्रतिष्ठा २२७.
श्रवण देवीमाहात्म्य ग्रंथाचे ४७२.
श्रीकृष्ण १६५; – ला वंदना ११२.
श्रेष्ठत्व १९१.
श्रेष्ठ पुरुषाचे गुण २७७, ३०७, ३४१, ३८१.
श्रेष्ठाभावी क्षुद्राला महत्त्व ७५.
सख्य कोणाचे होते ४८६.
सज्जन स्वभावविशेष ४५०.
सततोद्योग ८८.
सत्य १४३, परि. १४३; – अप्रिय २३८; –चा जय होतो ४८०; –सर्वाधार ४८१, परि ४८१; – चे मुख झाकलेले ५३५; –व्यावहारिक २६३, २८१, २९२, २९६, ३११, ३१९, ३३४, ३३५, ३४७, ३६०, ३६१, ४३२, ४३७.
सत्संगाचा परिणाम ४८२, ५१४.
सद्‌गुरू ४५६.
सदाचार ४४७.
सनातन धर्म ७६.
सभा २५४.
समचित्तता २४६, २८९, ४३१, ४६४.
समयपरीक्षा ९२.
समदर्शी पुरुष ४५.
सर्वव्यापकत्व ईश्वराचे ५८.
सर्वश्रेष्ठत्व जन्मजात ५२२.
संकीर्ण १६३, १७५, २४१, ३०४.
संस्कार ५१५; – मुळे द्विजत्व ५१६.
संस्कृत भाषा संस्कृतीचा आधार ५१७.
संस्कृत वाणी-गौरव २०५.
संघटन ५११.
संत ची क्षमाशीलता १५०; – चे सदाचरण ४८३.
संपत्तीचा प्रभव ४९५.
संबंध एकमेकांशी – विडंबनात्मक ३१७.
संयमी पुरुष ३८९.
संन्यास ३८०.
संशय सर्वनाशक ५१३.
संसारातील – वैविध्य ९०; – रूपी वृक्ष ५१४.
साधु १४६; – ची मनोभावना ९५.
सामाजिक कर्तव्याची जाणीव १९०.
सामर्थ्य कोणाचे कशात ३१९.
साहस करणाराला संपत्तीची प्राप्ती ५००.
साहित्यरसग्रहण ५१४.
स्थानभ्रष्टता अशोभनीय ५२६.
स्वाधीनता ४९१.
सिद्धी – परमसिद्धी ५३२.
सिंह – केसरी ५३०.
स्थितप्रज्ञलक्षणे ३८९.
सीताशोध (हनुमानवचन) २१६.
स्त्री – चारित्र्य २११; –अतर्क्य ५२७; – चा आधार १३०, २९०; – चे स्वातंत्र्य २५५; पूजनीय ३७४.
स्त्रीवध २६०.

सुख – ची व्याख्या २२; आणि दु:ख ५०३.
सुभाषित १५८; –हेच रत्न ३१२,५१४.
सुमित्रेचा लक्ष्मणाला आदेश १२६.
सूत ५०५.
सूत्र – व्याख्या ५०६, ५०७.
सेवाधर्म परमगहन ५१०
सोमस्तुती १११.
हरिनाम ५३३.
हास्यास्पदता २९६.
हिमालय ५२८.

संदर्भांचा संख्याक्रम

उक्तिविशेषात उपयोजिलेल्या संदर्भांचा संख्याक्रम खाली दिला आहे, यावरून अभ्यासकांना काही निष्कर्ष काढता येण्यासारखे आहेत.

क्रम	ग्रंथ	संदर्भसंख्या
(१)	महाभारत	८३
(२)	सुभाषितरत्नभांडागार*	७७
(३)	भगवद्गीता	६१
(४)	संस्कृत काव्य–नाटके	५४
(५)	रामायणे	४६
(६)	पंचतंत्र	४३
(७)	समयोचितपद्यमालिका*	३८
(८)	हितोपदेश	२६
(९)	उपनिषदे	२५
(१०)	वेद	२२
(११)	पुराणे	२२
(१२)	शतकत्रय	१९
(१३)	मनुस्मृती	१४
(१४)	योगवासिष्ठ	८
(१५)	स्तोत्रे (शंकराचार्यादींची)	७
(१६)	ब्रह्मसूत्र व सर्वदर्शनसंग्रह	५
(१७)	ब्राह्मणग्रंथ	२

---

* वरीलपैकी 'सुभाषितरत्नभांडागार' व 'समयोचितपद्यमालिका' हे संकलनात्मक ग्रंथ आहेत. याशिवाय ज्यांचे संदर्भ सापडू शकले नाहीत असे लोकसाहित्यातील संदर्भ लोकोक्ती म्हणून दिले आहेत.

शुद्धिपत्र

पृष्ठांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
अनु. २७	व. २	न्यायात्पथः	न्याय्यात्पथः ।
२	व. १३	वैद्रिक	वैदिक
६	खा. ७	सर्वभतानां	सर्वभूतानां
१३	व. ९	जीवितआशापि	जीविताशाऽपि
१३	व. २९	शिरसी	शिरसि
१६	व. ११	तुष्टाः	तुष्टः
१६	व. ,,	रुष्टाः	रुष्टः
१९	व. ६	गदर्भाः ।	गर्दभाः ।
२०	खा. १५	धमस्य	धर्मस्य
२२	व. १९	विज्ञानेनेदूं	विज्ञानेनेदं
२५	खा. ७	सुहृद्भवेत्	सुहृद् भवेत्
२६	व. १, ५	आ परितोषात्	आपरितोषाद्
२८	व. ७	संछिद्य	संच्छिद्य
२८	खा. ७	समानतेतत्पशुभिर्नराणाम्	समानमेतत्पशुभिर्नराणाम्
३३	व. १४	गन्धफलीमजिघ्रत् ।	गन्धफलीमजिघ्रत ।
३६	व. ७, १२	लक्ष्मी	लक्ष्मीः
३६	खा. ९	यजिद्दीया	जिद्दीच्या
३६	खा. १०	ासाठी	यासाठी
३८	व. १८	यावज्जीवेत्	यावज्जीवं
४०	व. ९	वास	वासः
४४	व. २४	लब्ध्वा	लब्धा
५१	खा. ४	दृष्टापि	दृष्ट्वापि
५१	खा. ८	शास्त्रविहित	शास्त्रविरहित
५२	व. २४	जिवति	जीवति
६२	व. २७	सहायाः	सहायाश्च
६३	शेवटची	सभ्दिः	सद्भिः
७६	खा. १३	कल्याणी	कल्याणि
८६	व. १२	शरिर	शरीर
१०३	खा. १३	अखंडं मंडलाकारं	अखण्डमण्डलाकारं
११२	व. २७	कान्ताच	कान्ता च
११७	व. ६	प्रत्युप्तन्नमतिश्च	प्रत्युत्पन्नमतिश्च

पृष्ठांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
१२२	व. ८	यज मानस्य	यजमानस्य
१२६	व. १५	पितृ	पितु
१३४	व. १६	एकजायांश्च	एकजायाश्च
१३५	व. २	आचारितव्यानि	आचरितव्यानि
१३७	व. १७	दृष्ट्वा	दृष्ट्वा
१४०	खा. ५	न तु प्रतिनिर्विष्ट	न तु प्रतिनिविष्ट
१४०	व. ९	मन्त्रा	मन्त्रो
१४०	व. २५	०विर्षाण	विषाण
१४४	व. १४	धनूर्भुषणाय	धनुर्भूषणाय
१४५	व. २९	पुत्रा . ।	पुत्रा न
१५२	व. १, ६	नान्ऋृषि:	नानृषि:
१५६	व. १३	भावी	भावो
१५७	व. २६	न्यायात्पथ:	न्याय्यात्पथ:
१६२	व. ७	चक्रनोमिक्रमेण	चक्रनेमिक्रमेण
१६८	व. ४	० तनश्नामि	० तमश्नामि
१६९	व. २३	भुजङ्गानां	भुजङ्गानां
१७०	व. २६	चं या	च
१७०	व. २६	पूंसां	पुंसां
१७३	व. २	मुनयोऽपृ	मुनयोऽपि
१७८	व. १६	वर्ष	वर्षे
१८८	खा. १३	पापं क्षी णा	पापं क्षीणा
१८९	व. १२	० दूँर ०	० दूॅर ०
१८९	व. १३	समृद्धिभि	समृद्धिभि:
१९२	व. ९	पतनाभ्दयमेव	पतनाद्भयमेव
१९७	व. २२	०चाकीर्तिम०	चाकीर्तिर्म०
२०७	व. ४	विश्वतेविश्वस्ते	विश्वस्ते विश्वस्ते
२०७	खा. ५	प्राणिनांध्रुव:	प्राणिनां ध्रुव:
२११	व. १	यतोऽभ्युदय नि:श्रेय०	यतोऽभ्युदयनि:श्रेय ०
२१६	शेवटची	यदात्मानं	तदात्मानं
२१९	व. १०	-भगी. २.६९	सं. - भगी २.६९.
२२०	व. २०	वैद्योवैद्यं	वैद्यो वैद्यं
२२४	व. २५	० प्रधाने:	० प्रधानै:

पृष्ठांक	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२४०	व. ११	ना विविक्तासनो	नाविविक्तासनो
२४०	खा. ७	तष्णा	तृष्णा
२४१	खा. ८	भवता	भवतो
२६६	व. ९	रघु. ६.२१.	रघु. ८.२१.
२६६	खा.२	षड्पायुङ्क्त	षड्पायुङक्त
२७७	व. १४	अल्पाक्षर	० अल्पाक्षरम ०
२९४	व. १२	हिरण्यग:र्भ	हिरण्यगर्भ:
२९८	व. १५	० स्वादुदुमुम्बरम्	स्वादुमुदुम्बरम्
३०२	व. ३	परमाजिभि:	परमवाजिभि:
३०४	खा. १३	केवलऽवम्	केवलत्वम्
३०४	खा. १२	केवलोहम्	केवलोऽहम्

संदर्भक्रमनियमात द्यावयाचा राहून गेलेला खुलासा. :

महाभारताच्या संदर्भात लिहिलेले **प्रवि**. म्हणजे प्रक्षिप्त विभाग–भांडारकर इन्स्टि. च्या प्रतीत त्या त्या खंडातील Appendix या भागातील आहेत; व **प्रउ**. म्हणजे प्रक्षिप्त उतारे मूळ पुस्तकाच्या त्या त्या सर्गाच्या तळटीपांतील आहेत.

‘ उक्तिविशेष ’ ग्रंथाची
पुरवणी प्रत सवलतीने मिळविण्यासाठी
वाचक-अभ्यासकांना विनंती

प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट व्हावयास पाहिजे होत्या अशा आणखीही अनेक उक्ती राहून गेल्या असतील हे शक्य आहे. किंबहुना हा ग्रंथ पुरा होईपर्यंत आणखी काही उक्तींचा समावेश या ग्रंथात करावयास हवा होता हे आमच्याही लक्षात आलेले आहे. या दृष्टीने या ग्रंथाची पुरवणी प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे. तरी वाचक-अभ्यासकांना आमची विनंती आहे की, त्यांनी आपल्या – याहून अधिक उक्ती असलेल्या व इतरही प्रकारच्या सूचना या कागदावर लिहून तो कागद आपल्या नाव-पत्त्यानिशी कृपया आमचेकडे पाठवावा. सूचना अधिक असतील तर आणखी अधिक कागद वापरण्यासही हरकत नाही.

प्रस्तुत ग्रंथाची पुरवणी आपल्याला पाहिजे असेल तर तसे कळवावे; म्हणजे त्याप्रमाणे आपल्या नावाची नोंद केली जाईल आणि पुरवणी तयार होताच आपल्याला तसे कळविले जाईल. अर्थात नाव नोंद-विल्यामुळे पुरवणीची प्रत घेण्याचे बंधन आपल्यावर राहाणार नाही; मात्र पुरवणीसाठी नाव नोंदविणाऱ्यांना पुरवणी प्रत हवी असल्यास त्यांना किंमतीत किंवा टपालखर्चात बरीच सवलत मिळू शकेल.

सूचकाचे नाव :

व्यवसाय :

पत्ता :

स्वाक्षरी

पुरवणीप्रत हवी आहे / नको.

आपल्या सूचना या कागदाच्या मागील बाजूवर लिहून तो कागद कृपया खालील पत्त्यावर पाठवावा :

संपादक : ‘ राष्ट्रीय ज्ञानकोश ’, ११९४, सदाशिव, पुणे ४११०३०.